Dyansadhana Shikshan Prasarak Mandal Niwade, Sanchalit

# M.H.Shinde Mahavidyalaya ,Tisangi

Tal. Gaganbavada, Dist. Kolhapur (M.S.)

## One Day
## Interdisciplinary National Seminar

**17th Feb.2018**

## On
# Nation Builders

A Special Issue of

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

Special Issue - **XXI**

**ISSN –2349-638x UGC Approved No. 64259**

**Impact Factor 4.574**

**Editor**

PRIN. DR . N. K. SHINDE

DR . VINOD KAMBLE

# बलस्थानांच्या जाणिवेची ऊर्जा....

ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी यांच्यावतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी मी प्रारंभीच मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

'Nation Builders' या विषयाच्या अनुषंगाने होत असलेल्या या चर्चासत्रात देश उभारणीत योगदान असलेल्या साहित्य, कला, क्रीडा, चळवळ, आंदोलन, गीत, संगीत, माहिती तंत्रज्ञान यांचा कोणता परिणाम देशाच्या उभारणीस कारणीभूत आहे याचे विवेचन निबंधाच्या माध्यमातून नेमकेपणाने आलेले दिसते.

एखाद्या देशाच्या उभारणीत वेगवेगळ्या गोष्टी, घटनांचा प्रभाव होत असतो. त्यामध्ये व्यक्तीही असते. आपल्या देशाच्या उभारणीस ती आपल्यापरीने विकासाच्या दिशेने पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करते. अशा व्यक्ती सर्वसामान्य नसतात. त्या देशामध्ये राहून समाजाप्रती असामान्य असे कार्य करत असतात. त्यातून त्या देशाचे बलस्थान कळत असते. या व्यक्ती देशाच्या उभारणीस पोषक वातावरणही तयार करत असतात. या चर्चासत्राच्या निमित्ताने अशा विषयाला नव्याने उजाळा मिळेल अशी खात्री वाटते.

धन्यवाद !

**पी. जी. शिंदे**

**संस्थापक अध्यक्ष**

ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळ, निवडे

# विकासाच्या नांदीची सुरुवात....

'Nation Builders' या विषयाला अनुसरुन होत असलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी मी हार्दिक शुभेच्छा देतो.

म. ह. शिंदे महाविद्यालयाच्या वतीने होत असलेल्या या चर्चासत्रात ‘राष्ट्रीय योगदान’ असलेल्या व्यक्ती, संस्था, चळवळ, आंदोलन, साहित्य, समाज, संस्कृती याबाबतची नेमकेपणाने माहिती आलेली जाणवते. आज आपल्या देशाला अनेक समस्यांनी ग्रासलेले असताना एक जाणीव म्हणून देशसेवेसाठी ज्यांनी आपले योगदान दिलेले आहे, त्यांचे स्मरण म्हणून आपण 'Nation Builders' या विषयाकडे पहावे.

कुठल्याही संस्थेच्या उभारणीला तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती जबाबदार असते. संस्था रौप्यमहोत्सवाकडे वाटचाल करत असताना महाविद्यालयाने आयोजित केलेल्या चर्चासत्राचे महत्त्व आमच्यादृष्टीने ही एक विकासाची नांदीच ठरु शकते. त्यामुळे मी पुन:श्च शुभेच्छा देतो.

**जनार्दन शिंदे (बापू)**

**सहसचिव**

ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळ, निवडे

<u>संपादकीय</u>

# उभारणीला बळ प्रोत्साहनाचे....

म. ह. शिंदे महाविद्यालय ‘कला’ शाखेच्या वतीने 'Nation Builders' या विषयावरील आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राचा हा अंक पुस्तक रुपाने व ऑनलाईन प्रकाशित करत असताना आम्हाला मनसोक्त आनंद होत आहे.

या चर्चासत्रासाठीच्या विषयाची निवड करत असताना सर्वांच्या वतीने 'Nation Builders' (राष्ट्र उभारणीत योगदान) या अनुषंगाने झाली. आम्हांला अपेक्षा होती त्यापेक्षाही अधिक प्रतिसाद निबंधाच्या रुपाने महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, गोवा, हरियाणा इत्यादी राज्यातील प्राध्यापकांनी दिला आहे. त्याचबरोबर विविध विद्यापीठातील, महाविद्यालयातील विद्यार्थी यांनीही निबंध दिलेत. त्यामुळे या विषयाचे महत्त्व ही आजच्या काळाची गरज बनलेली जाणवेत.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने या दरम्यानच्या काळात सगळीकडे साहित्य संमेलन, शिबिर, कार्यशाळा, चर्चासत्रे होत आहेत. तरीही आमच्या महाविद्यालयाने दिलेल्या आवाहनाला आपण सर्वांनी भरभरुन प्रतिसाद दिलात. त्यामुळे आम्ही नक्कीच भारावून गेलेलो नाहीत. उलट आमची जबाबदारी वाढलेली आहे, याची जाणीव आम्हांस आहे.

या चर्चासत्रासाठीचा हा अंक ग्रंथरुपाने करत असताना निवडक निबंधांना यामध्ये समाविष्ट केलेले आहे. यामध्ये दुमत असू शकते परंतु येणारे सर्वच निबंध आम्ही सीडी तसेच ऑनलाईच्या स्वरुपात प्रकाशित करणार आहोत.

प्रस्तुतचा अंक प्रकाशित करत असताना आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. पी. जी. शिंदे साहेब, सहसचिव जनार्दन शिंदे (बापू), यांनी चर्चासत्रासाठी प्रारंभीपासूनच प्रोत्साहन दिले आहे. प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मित्रांनी निबंध देऊन सहकार्य केले. कवीमित्र आणि नामवंत गीतकार, चित्रकार विष्णू थोरे (नाशिक) यांनी नेमके आणि बोलके मुखपृष्ठ तयार केले. साया ग्राफिक्सचे फारुक मुल्ला यांचेही सहकार्य मिळाले. आमचा मित्र आणि आयुषी जर्नलचा प्रमुख प्रमोद तांदळे (लातूर) यांनी प्रकाशनाची सर्व जबाबदारी स्वीकारली. या सर्वांप्रती मन:पूर्वक ऋण व्यक्त करतो.

**प्राचार्य डॉ. एन. के. शिंदे**

**डॉ. विनोद कांबळे**

**संपादक**

# Chief Patrons

**Hon. P.G. Shinde**
President

**Hon. Narendra Sardesai**
Vice President

**Hon. A.B. Patil**
Secretary

**Hon. J.G. Shinde**
Joint Secretary

# Advisory Committee

Pro.V.C. Dr.D.T.Shirke
Prof. (Dr.) J.F.Patil
Dr. Krantikumar Patil
Prof. (Dr.) Ashok Chausalkar
Prof. (Dr.).P. S. Kamble
Prin. (Dr.) J.B.Patil
Prof. (Dr.) Nanda Parekar
Prin. (Dr.) P. A. Attar
Dr. I. H. Pathan
Prin. (Dr.) D. D. Kuralapakar
Dr. Namdev Khavare

Prin. (Dr.) B. M. Ladgaonker
Dr. R. P. Adhav
Dr. S. B. Bhambar
Dr. P. B. Patil
Dr. Sunil Bansode
Dr. Sanjay Chindge
Dr. Shivkumar Sonalkar
Dr. Datta Patil
Dr. Archana Kamble
Dr. P. T. Gaikwad
Dr. Suresh Chavan
Dr. Santosh Jethithor
Dr. Rajendra Ponde

# Organizing Committee

**Prin. (Dr.) N. K. Shinde**
Chairman

**Shri. P. G. Kumbhar**
Convener

**Shri. J. S. Jadhav**
Organizing Secretary

# Co-ordinators

**Dr. N. K.Mole**
**Smt. V. U. Jadhav**
**Dr. S. A. More**

**Shri.B. D. Patil**
**Dr. D. B. Ingawale**
**Dr. B. S. Padval**

# Organizing Committee Members

SMT. M. B. SAWANT
DR. P. K. POWAR
SHRI. A. B. MOHITE
SHRI. A. D. PHALKE
SHRI. M. P. SHINDE

# Editorial Board


| | | |
|---|---|---|
| Prin. Dr. N. K. Shinde | – | Editor |
| Dr. Vinod Kamble | – | Editor |
| Shri. P. G. Kumbhar | – | Member |
| Smt. M. B. Sawant | – | Member |
| Dr. P. K. Powar | – | Member |
| Shri. A. B. Mohite | – | Member |
| Shri. A. D. Phalke | – | Member |

| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. डॉ. दत्ता पाटील | राष्ट्रउभारणीत नवमानवतावादी विचार आणि सं. कायदेभंग नाटक | 1 To 2 |
| 2. | डॉ. दीपककुमार वळवी | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी स्त्री स्वातंत्र्य सेनानी : दशरीबेन | 3 To 4 |
| 3. | प्रा.शिवाजी विठ्ठल सुतार | यशवंतराव चव्हाण. यांचे भाषाविषयक विचार | 5 To 7 |
| 4. | प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे | महात्मा जोतीराव फुले यांच्या शेतीविषय विचारांचे महत्व | 8 To 10 |
| 5. | श्री. एम. वाय. पोवार | ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्य | 11 To 12 |
| 6. | प्रा. महादेव ज.जाधव | मराठी कविता व नाटकाचे राष्ट्र उभारणीतील योगदान | 13 To 14 |
| 7. | रेखा काशिनाथ पसाले | राष्ट्रबांधणीत समाजसुधारकांच्या साहित्याचे योगदान | 15 To 17 |
| 8. | प्रा. श्रीमती नंदा श्रीपती पाटील | महात्मा फुले यांचा शैक्षणिक दृष्टिकोन | 18 To 21 |
| 9. | श्री. अनिल रामचंद्र महाजन | भारतीय विकासात शिक्षणाचे योगदान | 22 To 24 |
| 10. | प्रा.प्रेरणा एल.चव्हाण | 'कृष्णाकाठ' मधील राष्ट्रउभारणी विषयक विचार | 25 To 27 |
| 11. | प्रा. सौ.एस.एस. पाटील | कादंबरी वाङ्मयाचे राष्ट्रीय योगदान | 27 To 29 |
| 12. | प्रा.सौ. ऋचा ऋतुराज जांभळे | यशवंतराव चव्हाण - राष्ट्रीय विचार | 30 To 31 |
| 13. | श्री. संभाजी राजाराम उबारे | कविवर्य नारायण सुर्वेचे साहित्यातील योगदान (सुर्वेच्या कवितेतील स्त्री रुप) | 32 To 33 |
| 14. | प्रा.आशालता नारायण खोत | कुसुमाग्रजांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवा | 34 To 35 |
| 15. | कु. शैलजा शहाजी हिरवे | राजर्षि शाहू महाराजांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान | 36 To 37 |
| 16. | प्रा.सुखदेव नारायण एकल | राष्ट्रबांधणीत समाजसुधारक महात्मा फुले यांचे योगदान | 38 To 40 |
| 17. | प्रा. डी. एन. सोनकांबळे | पंतप्रधान : इंदिरा गांधी यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान | 41 To 43 |
| 18. | डॉ.वर्षा शिरीष फाटक | पुरोगामी विचारवंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | 44 To 46 |
| 19. | प्रा.सौ.अश्विनी हिरीकुडे | राष्ट्रबांधणीतील १९४२ च्या लढयाचे योगदान | 47 To 48 |
| 20. | प्रा.ए.ए.घोडके | राष्ट्रनिर्माणातील शिक्षकांचे योगदान | 49 To 52 |
| 21. | प्रा. डॉ. मधुकर ग. धुतुरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान | 53 To 57 |
| 22. | अमर रंगनाथ दीक्षित | ग्रंथालय विध्वंस (Library Vandalism) : ग्रंथालय विकासातील अदृष्य शत्रू | 58 To 61 |
| 23. | प्रा.डॉ.आर.पी.आडाव<br>श्री. सरदार निवृत्ती पाटील | राष्ट्र उभारणीमध्ये ग्रंथालयांचे स्थान | 62 To 66 |
| 24. | प्रा. उदयकुमार. ना. लाड | सहकारी चळवळ आणि राजकारण : विकासात्मक वाटचाल | 67 To 70 |
| 25. | प्रा. कमलाकर एन. राक्षसे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी | 71 To 72 |
| 26. | प्रा. दयानंद इनामदार | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित नेतृत्वांची चळवळ (संदर्भ : गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे) | 73 To 75 |
| 27. | प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सूर्यवंशी | पंडीत नेहरू /राष्ट्रवाद, लोकशाही विचार | 76 To 77 |
| 28. | प्रा. ए. बी. मोहिते | महाराजा सयाजीराव गायकवाड – सुशासित राज्यकारभाराचा आदर्श | 78 To 81 |
| 29. | प्रा. भरत पाटील<br>प्रा.डॉ.बी.एस.जाधव | पर्यावरण संवर्धन चळवळ व्यक्तीगत संस्थात्मक वा गटात्मक | 82 To 83 |
| 30. | कु. श्रध्दा तुकाराम भालेकर | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रभक्ती गीतांचे असणारे योगदान | 84 To 85 |

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|


| | | | |
|---|---|---|---|
| 31. | डॉ.प्रा. बी. डी. इंगवले | शेतकरी बाजार – शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाचा एक चिकित्सक अभ्यास | 86 To 89 |
| 32. | प्रा. ए. बी. कांबळे | गट शेती–शाश्वत विकासाचा मार्ग | 90 To 92 |
| 33. | प्रा. डॉ. प्रमिला विजय डोणे | भारताच्या कृषी विकासाच्या व्यूहरचनेचे शिल्पकार पंडित नेहरू | 93 To 96 |
| 34. | प्रा. भीमराव जोतिबा शिंदे | ज. र. तथा दादा पेडणेकर : सामाजिक व राजकीय योगदान | 97 To 98 |
| 35. | डॉ. दादासाहेब बापूराव जाधव | आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक | 99 To 100 |
| 36. | धनराज शिंदे | मराठीतील आद्य वृत्तपत्र : मुंबापूर वर्तमान | 101 To 104 |
| 37. | डॉ. संभाजीराव आनंदा मोरे | राष्ट्र उभारणीतील गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाचे योगदान | 105 To 107 |
| 38. | प्रा.डॉ.तानाजी रामचंद्र हवलदार | राष्ट्र निर्माते : पांडुरंग सदाशिव साने | 108 To 109 |
| 39. | प्रा.पी.आर.फराकटे | नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढयात दिलेले योगदान | 110 To 112 |
| 40. | श्री. दगडू अर्जुन जगताप | संशोधन कार्यात 'आशय विश्लेषणा'चे महत्त्व | 113 To 114 |
| 41. | प्रा. जनार्दन श्रीकांत जाधव | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील यशवंतराव चव्हाणांचे योगदान | 115 To 117 |
| 42. | श्री. कृष्णात पांडुरंग पाटील | राष्ट्रीय व सामाजिक विकासातील ग्रंथालयांचे महत्व | 118 To 121 |
| 43. | कुबेर दिनकर दिंड | भारतीय अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत महात्मा गांधीजींच्या 'स्वदेशी' चळवळीचे योगदान | 122 To 124 |
| 44. | डॉ. मधुकर विठोबा जाधव | भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यवीरांगना वीणा दास | 125 To 127 |
| 45. | श्रीमती मीना भा. सावंत | राष्ट्र उभारणीस बळ प्राप्त करून देणारे महिला सक्षमीकरण | 128 To 130 |
| 46. | प्रा. गुरूनाथ कृष्णा मोरे | स्वर्गीय, आमदार तुकाराम कोलेकर यांचे राष्ट्रबांधणीतील योगदान | 131 To 132 |
| 47. | श्री. एन.पी.महागांवकर | भारतातील उच्च शिक्षणातील संस्था–विद्यापीठ अनुदान आयोग | 133 To 135 |
| 48. | प्रा. दत्तात्रय हरी नाईक | महात्मा जोतिबा फुले - एक समाजसुधारक | 136 To 139 |
| 49. | प्रा. प्रकाश बा. कांबळे | राष्ट्र बांधणी – एक सामाजिक शिक्षण प्रक्रिया | 140 To 142 |
| 50. | प्रा. पद्माकर सदाशिव | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शेतकरी चळवळी | 143 To 146 |
| 51. | पूनम रमेश भुयेकर | ब्रिटिश सरकरचे सतीप्रथेविषयक धोरण | 147 To 149 |
| 52. | प्रा.डॉ.बाबासाहेब एस. शिंदे | राजर्षि शाहू महाराज यांचे देश उभारणीतील कार्य | 150 To 154 |
| 53. | प्रा.रा.सु.गडकरी | भारतीय ज्ञानकेंद्राचे राष्ट्र उभारणीतील योगदान | 155 To 158 |
| 54. | रीना रामचंद्र कांबळे | राष्ट्र बांधणी मधील भारतीय सैन्यदलाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास | 159 To 161 |
| 55. | प्रा. संभाजी शंकर कांबळे | दलित पॅंथर एक चळवळ | 162 To 164 |
| 56. | प्रा.डॉ.संतोष तुकाराम कदम | मा.शरदरावांची राजकारणातील वाटचाल:एक दृष्टिक्षेप (सन १९४० ते १९९५) | 165 To 167 |
| 57. | प्रा. सरिता आण्णासो मोरे<br>प्रा. आण्णासो विलास जाधव | माध्यमिक स्तरावर इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेची वाचन विषयक अभिरुची – एक अभ्यास | 168 To 170 |
| 58. | प्रा. सतीश यशवंत चौगुले | महात्मा ज्योतीराव फुले यांच्या जलव्यवस्थापनाबाबतच्या विचारांची प्रस्तुतता | 171 To 173 |
| 59. | प्रा.सयाजीराव यशवंत पाटील | संरक्षणमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रबांधणीतील योगदान | 174 To 176 |
| 60. | प्रा. डॉ. सुरेश मारूती चव्हाण | राष्ट्रबांधणीच्या कार्यातील सौ सिंधुताई सपकाळ यांचे योगदान | 177 To 178 |

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi<br>Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 61. | प्रा.सौ.स्मिता तानाजी पाटील | राष्ट्र बांधणीसाठी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य | 179 To 181 |
| 62. | प्रा.नरेंद्र एन. सूर्यवंशी | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जल व विज निर्मिती धोरण – ऐतिहासिक राष्ट्र कार्य | 182 To 183 |
| 63. | कु. वैशाली दशरथ चोरगे | विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक योगदान | 184 To 188 |
| 64. | युवराज आनंदराव पाटील | माहिती साक्षरता आणि ग्रंथालय | 189 To 190 |
| 65. | डॉ. शर्मिला अशोक साबळे<br>सौ. लक्ष्मी दादासो भोसले | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य | 191 To 198 |
| 66. | श्री.तुकाराम महादेव पाटील | महात्मा जोतिराव फुले – एक द्रष्टा शिक्षण तज्ञ | 199 To 202 |
| 67. | प्रा. विक्रम सयाजी यमगेकर | ऑलिम्पिकवीर- खाशाबा जाधव - एक दृष्टीक्षेप | 203 To 205 |
| 68. | प्रा. डॉ अभिजित वणिरे | भारतीय क्रीडा क्षेत्राचे जागतिक स्तरावरील स्थान व देशाच्या उभारणीतील क्रीडा क्षेत्राचे योगदान | 206 To 208 |
| 69. | कु. स्वाती सरदार पाटील | लोकमान्य टिळक व त्यांची चतुःसुत्री | 209 To 212 |
| 70. | प्रा.एस. बी. देसाई | व्यवस्थापणातील आधुनिक तंत्र : सकल गुणवता व्यवस्थापण | 213 To 215 |
| 71. | प्रा. सौ. चंद्रलेखा चव्हाण | हिंदी काव्य में राष्ट्रीय चेतना | 216 To 218 |
| 72. | प्रा. सौ. वसुंधरा उदयसिंह जाधव | राष्ट्र निर्माण में महात्मा गांधी के विचारों का योगदान | 219 To 221 |
| 73. | प्रा.अजित दादू फाळके | राष्ट्र निर्माण में राष्ट्रसंत तुकडोजी का योगदान | 222 To 223 |
| 74. | प्रा. श्रीमती एस.के.पाटील | प्रवासी महाकवि हरिशंकर आदेश का राष्ट्र निर्माण में योगदान | 224 To 227 |
| 75. | प्रा.डॉ.सरोज पाटील | राष्ट्रनिर्माण में महात्मा गांधी की भूमिका | 228 To 230 |
| 76. | प्रा. सौ. सुपर्णा संसुद्धी | राष्ट्रभक्त कवयित्री शुभद्राकुमारी चौहान | 231 To 232 |
| 77. | प्रा. सौ. स्मिता वणिरे | देश के आजादी की लडाई में हिंदी साहित्यिकों का योगदान | 233 To 235 |
| 78. | प्रा. शंकर दळवी | देश–विदेशों में हिंदी भाषा का योगदान | 236 To 237 |
| 79. | प्रा.स्नेहलता गौतम कांबळे | आधुनिक भारत का जनक-राजाराममोहन राय | 238 To 239 |
| 80. | प्रा. सुचिता संतोष भोसले | 'रंगबसन्ती' नाटक में चित्रित भगतसिंह | 240 To 240 |
| 81. | प्रा. नितीन विठ्ठल पाटील | राष्ट्र निर्माण में मैथिलीशरण गुप्त जी के साहित्य का योगदान (भारत–भारती काव्यकृति के संदर्भ में) | 241 To 243 |
| 82. | Dr. Neeta Vijaykumar Jokhe | Anita Desai's : Cry, the Peacock : A Psychoanalytical Study | 244 To 245 |
| 83. | Dr. N.P. Khavare | Cultural Ghetto In Jhumpa Lahiri's Mrs. Sen's | 246 To 248 |
| 84. | Dr. Dadasaheb Ganpati. Ghodake | Exploration of Indianness in The God of Small Things of Arundhati Roy | 249 To 250 |
| 85. | Mrs.Megha Nikam | Study on Chetan Bhagat's Novels and Its Impacts on Society | 251 To 254 |

| | | | |
|---|---|---|---|
| 86. | Dr. Manisha Mohan Mujumdar | Women: The Ambassador of Nation Building | 255 To 257 |
| 87. | Prof. P G Kumbhar | Postcolonial Consciousness in Thea Astley's Reaching Tin River | 257 To 260 |
| 88. | Mr. Suhas Raut | Family Metaphor In The Modern Indian English Poetry With Special Reference To A. K. Ramanujan | 561 To 264 |
| 89. | Miss Shilpa Eknath Kamble & Miss Swati Eknath Kamble | Vijay Tendulkar's Plays : A Critique Of Contemporary Society | 265 To 266 |
| 90. | Mrs. Sujata Sardar Patil | Mirror Of Contemporary Indian Society : Mahesh Dattani's Plays | 267 To 269 |
| 91. | Mr. Suresh Pandurang Patil | Image Ofindiain The Select Poems Of Nissim Ezekiel | 270 To 272 |
| 92. | Anandi Sadashiv Kamble | Pat Barker's Blow Your House Down: A Social Novel | 273 To 275 |
| 93. | Dr. R. Y. Shinde | The Use Media And Music In Teaching Language And Literature | 276 To 278 |
| 94. | Dr. P. L. Bhadvankar | A Study Of Mental Health Between Male And Female Students | 279 To 283 |
| 95. | Dr. Nivrutti Dhondiram Mangore | Emotional Intelligence Of Rural Junior College Students In Relation Of Their Gender | 284 To 287 |
| 96. | Dr. Namdev D. Patil | Environmental Movements In India | 288 To 292 |
| 97. | Dr. Sunita M. Watore | A Study Of Youth Problem Among Male And Female College Going Students | 293 To 296 |
| 98. | Vijay Ramchandra Patil | Challenges Before Higher Education System In India | 297 To 300 |
| 99. | Arun S. Katkole | Educational Thought Of Dr. Babasaheb Ambedkar And His Contribution To Education | 301 To 303 |
| 100. | Bala Mandrekar | Use Of Information Communication Technologies In Libraries | 304 To 306 |
| 101. | Mr.Balaji A.Kamble Dr.Namita Khot | Application Of OPAC In Annasaheb Dange College Library: A Practical Approach | 307 To 310 |
| 102. | Ms. Nishigandha P. Bansode | To Study The Performance Of Demonetization In India | 311 To 314 |
| 103. | Dr. Mrs. H. A. Chougule | A Study On Public And Private Sector Life Insurance Companies In India | 315 To 317 |
| 104. | Dadasaheb B.Mane | Key Challenges In Education Sector In India | 318 To 320 |
| 105. | Prof. Dr. Ravindra A. Kulkarni | Swami Vivekananda : 'The Cyclonic Leader Of India | 321 To 323 |
| 106. | Dr. Sanjay Namadev Gaikwad | National Education And Freedom Movement | 324 To 326 |
| 107. | Dr. Shraddha Patil & Dr. Ravindra Mirajkar | Teacher's Progressive Role For Nation Building | 327 To 328 |
| 108. | Dr. Suresh Malik & Dr. Anurag Sachan & Mrs. Geeta | Techniques And Benefits Of Surya Namaskar | 329 To 330 |

| | | | |
|---|---|---|---|
| 109. | Dr. B.N. Ravan | Condition Of Higher Education In India | 331 To 333 |
| 110. | Dr.Swapnil D.Patil | Training The Libero Tracker | 334 To 335 |
| 111. | Mrs. Gaikwad Rajashri D | Nation Builder Of India: Dr. A. P. J. Abdul Kalam | 336 To 337 |
| 112. | Mr. Tanaji Laxman Kamble & Dr. N. I. Divatankar | Information As The Resource For Industrial Development | 338 To 342 |
| 113. | Yashodhan K. Kharade | Major Dhyan Chand Singh: Wizard Of Hockey | 343 To 346 |
| 114. | Mr. Dinesh Sitaram Betkar | The Father Of Indian Law And Constitution: Dr. B.R. Ambedkar | 347 To 350 |
| 115. | B. D Patil | Achivement Of Women Wrestlers In Nation Building | 351 To 352 |
| 116. | RamchandraKeshavWakarekar | Role Of Banks In Nation Building | 353 To 355 |
| 117. | Prof. SocorinaFernandes | Role Of Women In Nation Building | 356 To 359 |
| 118. | Nilesh Mohanrao Wankhade | Hierarchal Analysis Of Weekly Market Centres In Devgad Tahsil Of Sindhudurg District, Maharashtra | 360 To 364 |
| 119. | Dr. P. S. Kamble & Dr. Vishal Vishnu Ovhal | Leather Industry: Sustainable Livelihood Model Of Rural Development With Reference To Kolhapur District | 365 To 369 |
| 120. | Dr. P. S. Kamble & Mr. Vishal Madhukar Kurane | Journey Of Goods And Service Tax (GST) In India | 370 To 373 |
| 121. | Dr D.B . Ingawale | The Voice Of Denotified And Nomadic Tribes In Nation Building | 374 To 378 |
| 122. | DR. PRASHANT K. POWAR | Overview On Infrastruture In Nation Development | 379 To 383 |
| 123. | Dr. Sachin A. Kamble & Dr. B.T. Waghmare | Role Of Globalization In Agricultural Development Of India | 384 To 385 |
| 124. | Dr. S.F. Bothikar | The Role Of Teachers In Nation Building– A Study With Respect To Qualities Of Best Teacher | 386 To 388 |
| 125. | Sunny S. Pandhre | Bank Marketing And Its Role In Development Of Indian Economy: A Study | 389 To 391 |
| 126. | Sunita S. Amrutsagar | A Study Of Green Banking Trends In India | 392 To 397 |
| 127. | Dr. M. K. Kamble & Dr. D. B. Ingavle | A Study Of Population Growth Of Hilly Talukas In Kolhapur District And Its Impact | 398 To 401 |
| 128. | Samina S Jamadar | Importance Of Agriculture Credit In Indian Economy | 402 To 406 |
| 129. | Prof.Samadhan Sandipan Bansode | E-NAM | 407 To 410 |
| 130. | Mr. Rohit Dinkar Barsing & Miss. Sarika Namdev Shinde | Profit Analysis Of Public Sector Banks (Psbs) In India | 411 To 414 |
| 131. | Miss. Sarika Vishwas More | Status Of Agricultural Labour In India | 415 To 419 |
| 132. | Prof. P. R. Mali | Tourism Places In Shirala Taluka In Sangli District | 420 To 421 |

| | | | |
|---|---|---|---|
| 133. | Mrs. Rashmi.A. Godhi | Role Of ICT In India | 422 To 428 |
| 134. | Pratik Anil Kamble | NGO, Role Of NGO In Rural Development | 429 To 430 |
| 135. | Mr. Maruti . I . Kumbhar | Demonetization And Its Impact In India | 431 To 433 |
| 136. | Shri. Shashikant S. Patil & Dr. Arun A. Patil | Correlation Between Cropping Pattern And Location Of Agro Based Industries In Kolhapur District | 434 To 436 |
| 137. | Mr Sandip T Patil* and Dr. Mrs. Savitsmita V. Chawan | Status Of Employment Guarantee Schemes In Rural Development Programme | 437 To 443 |
| 138. | Mr. Rohit Dinkar Barsing & Miss. Punam Ravindra Naik | Cropping Pattern Of Scheduled Caste Farmers In Sangli District | 442 To 449 |
| 139. | Vrushali Kamalakar Herekar. | A Study Of Households Consumption Pattern In Chandgad Taluka | 450 To 453 |
| 140. | Mrs.Dhanawanti Sunil Bamane | Digital Library : Its Work And Challenges | 454 To 456 |
| 141 | Dr. Shivanand B. Bhanje | Digitalization : A Rising Aspect And Problems | 457 To 460 |
| 142. | B. S. Padval | Model For Re-Engineering Of Academic Libraries | 461 To 464 |
| 143. | Shri. Anil D. Patil | Demand For Bifurcation Of Pune District: An Administrative Study | 465 To 468 |
| 144. | Urmila Rajendra Kadam | Information Seeking Needs Of Lawyers In Kolhapur City research Article In Library And Information Science | 469 To 472 |
| 145. | Dr. Ravindra Pandurang Adav | Digital Library Consortia | 473 To 476 |
| 146. | Prof. Mayur S. Hiremath | Demonitization : A Step Towards Modified India | 477 To 479 |
| 147. | Mr. Mahesh B. Nilaje | Role Of Administration And Good Governance In Nation Building | 480 To 485 |
| 148. | Ms.Shirke Sadhana Uttam | Effects Of Information Technology In Agricultural Sector | 486 To 488 |
| 149. | Pralhad Kamble | "Economic Analysis Of Water Resources In Sindhudurg District Of Maharashtra" | 489 To 494 |
| 150. | Prof. Ranjana Bansude | Demonitization And It's Impact On Indian Economy | 495 To 498 |
| 151. | Mr. Sambhaji Rajaram Shinde | Demonetization | 499 To 501 |
| 152. | Prof. Umashanakar G. Nadargi | Demonitization And Black Money | 502 To 506 |



| | |
|---|---|
| Disclaimer | • We do not warrant the accuracy or completeness of the information, text, graphics, links or other items contained within these articles.<br>• We accept no liability for any loss, damage or inconvenience caused as a result of reliance on such content.<br>• Only the author is the authority for the subjective content and may be contacted.<br>• Any specific advice or reply to query on any content is the personal opinion of the author and is not necessarily subscribed to by anyone else. |

# राष्ट्रउभारणीत नवमानवतावादी विचार आणि सं. कायदेभंग नाटक

**प्रा. डॉ. दत्ता पाटील**
मराठी विभागप्रमुख,
डॉ. घाळी कॉलेज,गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**प्रास्ताविक :**

विसाव्या शतकाच्या पूर्वाधात भारतात नवमानवतावाद उदयाला आला. भारतातील या नवमानवतावादाचे उद्गाते मानवेंद्रनाथ रॉय (१८८७–१९५४) हे होत. त्यांची नवमानवतावादी तत्त्वज्ञानाची निर्मिती ही त्यांच्या वैचारिक प्रवासातील एक महत्त्वाची घटना होय. रॉय हे साधारणपणे १९४० पर्यंत मार्क्सवादी होते.मार्क्सवादामध्ये रॉय यांना सामाजिक आशय आढळला होता. केवळ व्यक्तीची नव्हे तर साऱ्या जनतेची चैतन्यशक्ती एकवटून सामाजिक कल्याण साधण्याचा तो एक मार्ग आहे हे त्यांनी समाजाला पटवून दिले. मार्क्सवाद हा जनसमुहालाच क्रांतीच्या लढाईत समाविष्ट करून घेणारा आहे. शोषणरहित, वर्गरहित समानतेवर आधारलेली आणि समृद्धीचा मार्ग दाखवून देणारी व व्यक्तिविकास साधणारी अशी ही विचारसरणी आहे. त्यामुळे मार्क्सवाद हे मानवी समाजाच्या विकासातील एक पुढचे पाऊल आहे हा विचार मानवेंद्रनाथ रॉय यांनी समाजात रूजविला. पण पुढे मार्क्सची ही भविष्यवाणी खोटी ठरू लागली. म्हणून रॉयनी मार्क्सवादाला रजा देऊन नवमानवतावादी तत्त्वज्ञान मांडले. १९४० नंतर त्यांनी मार्क्सवादाकडे पाठ फिरविली. मार्क्सवादामुळे एका वर्गाच्या कल्याणासाठी लढता येते समस्त समष्ठीच्या कल्याणासाठी नाही. अशी त्यांची धारणा झाली. या पाठीमागे त्यांची एक पक्की वैचारिक बैठक होती. युरोपातील प्रबोधनकाळात उदयाला आलेल्या नवमानवतावादी या विचारसरणीचा तो पुरस्कार होय. यातून त्यांनी राष्ट्रउभारणीच्या कार्यात सम न्यायी भूमिका घेऊन व्यक्तिविकासासंदर्भात जे विचार मांडले त्यालाच रॉयवादी विचारसरणी असे म्हणतात.

**विषय विवेचन :**

नवमानवतावादी विचारामध्ये रॉयनी सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, धार्मिक आणि शैक्षणिक इ. मानवी जीवनाचे सर्वांग व्यापणाऱ्या गोष्टींचा विचार प्रामुख्याने सांगितला आहे. मनुष्य हा इतिहासाचा निर्मिता आहे. तो स्वभावत: विवेकशील आहे. म्हणून तो सार्वभौम असायला पाहिजे. शिवाय समष्टीचे अस्तित्व व्यक्तीच्या अस्तित्त्वावरच आधारलेले असते अशी त्यांची भूमिका होती. म्हणजे व्यक्तिविकास हा मूळ विचार नवमानवतावादात आहे. रॉय हे धर्म व धार्मिकतेचे कट्टर विरोधक होते. त्यामुळे त्यांनी ईश्वराचे अस्तित्वच नाकारले. समाजाभिमुख, जीवनाभिमुख गोष्टींची समाजाला योग्य शिकवण देणे हा नवमानवतावादाचा आशय आहे. रॉय यांनी वैज्ञानिक दृष्टीने विचार करून स्वत:चे एक स्वतंत्र भौतिकवादी पण बुद्धीनिष्ठ दर्शन नवमानवतावादाच्या रूपाने घडवून दिले. यातूनच भौतिक वास्तववाद मांडला. राष्ट्रउभारणीच्या पार्श्वभूमीवर हा विचार महत्त्वाचा आहे.

१९४० मध्ये त्यांनी 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' म्हणून नवीन पक्ष सुरू केला. या पक्षाचे लक्ष नवमानवतावादी समाजाची स्थापना करण्याचे होते. पण या आधीही साधारणपणे १९३० पासून भारतात परत आल्यानंतर रॉयनी सभा भरविणे, शिबिरे घेणे, प्रचार करणे, वर्तमानपत्रे व नियतकालिकांतून लेख लिहिणे या माध्यमातून नवमानवतावादी विचारांचा प्रसार सुरू केला होता. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नवमानवतावादात मनुष्य (कोणत्याही वर्गाचा वा धर्माचा, पंथाचा) हा केंद्रबिंदू असून त्याच्या विचारशीलतेला उच्च स्थान आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा कोंडमारा करणाऱ्या सर्व घटकांचा नवमानवतावादात निषेध आहे. तर्कशून्य परंपरा, हुकूमशाही, वर्गवाद आणि संसदीय लोकशाहीसुद्धा व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करतात असे रॉय यांचे मत आहे. यासाठी माणसाचा बुद्धिवादच त्याच्या नैतिकतेचा आधार आहे असे रॉय मानतात. त्यामुळे नवमानवतावादी तत्त्वज्ञानामध्ये सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, धार्मिक आणि शैक्षणिक इत्यादी मानवी जीवनाचे सर्वांग व्यापणाऱ्या गोष्टींचा प्रामुख्याने विचार केला आहे. शिवाय सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, इतिहास दर्शन व नवीन आदर्श समाज या गोष्टीसुद्धा रॉयनी नवमानवतावादात मांडल्या. या विचारसरणीचा तत्कालीन काळातील काही नाट्यकृतींवर प्रभाव झाल्याचे जाणवते. याचा विचार या ठिकाणी केला आहे. या दृष्टीने नवमानवतावादाचा विचार करणारे भा. गो. पेंढारकर यांचे 'संगीत कायदेभंग' (१९३०) हे एक महत्त्वाचे नाटक आहे असे वाटते. या शिवाय वीर वामनराव जोशी, वा. वा. भोळे, अनंत हरि गद्रे, गणेश कृष्णशास्त्री फाटक, मा. कृ. शिंदे, य. ना. टिपणीस आणि मो. ग. रांगणेकर इत्यादींच्या काही नाट्यकृतींतून नवमानवतावादातील काही मूल्यांच्या अनुषंगाने विचार आलेला आढळतो.

प्रस्तुत संगीत कायदेभंगनाटकातील स्वयंभू विचाराची 'क्रांती' ही 'सत्यनाम'ला नवमानवतावादी विचारांचे आणि जीवनप्रणालीचे महत्त्व सांगते. वर्ण, जात, धर्म, आणि रूढी ह्या व्यक्तिविकासाला पर्यायाने समाजविकासाला घातक आहेत; त्या नष्ट झाल्या पाहिजेत. पण हे 'सत्यनाम'ला पटत नाही तो म्हणतो, ''वर्णाश्रम व जातिभेद तू भिन्न समजतेस?

क्रांति – होय! समजते नव्हे, दोन्हीमध्ये फरक आहे असं मला वाटतं. वर्णाश्रमधर्मात, राजर्षीचा ब्रह्मर्षी होऊ शकेल, ब्राह्मणाचा क्षत्रीय होईल. धंद्यावर वर्ण ठरेल. जन्मावर नाही. महत्त्वाकांक्षी लोकांना उत्क्रांतीची आशा राहील व जन्मजात मोठेपणाला कलंक लावणाऱ्या कित्येक राक्षसांना, अति शूद्रांत ढकलता येईल. जिकडे तिकडे उत्साहाचं व प्रयत्नवादाचं साम्राज्य राहील.

सत्यनाम – आणि जातिभेदाने!

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

क्रांति – क्षत्रियांला लाजविण्यासारखी तरवार गाजवून, शूद्र शूद्रच राहील. ब्राह्मणला शोभणारी विद्वता असूनहि क्षत्रियाला ब्राह्मण्यासाठी निराश व्हावे लागेल. ब्राह्मणापोटी आलेला ब्राह्मणपुत्र ब्रकह्मर्म करीत नाही. क्षत्रियाचा पुत्र क्षात्रधर्माला चिकटून रहात नाही. उदरभरणार्थ वाटेल त्यानं वाटेल तो धंदा आरंभल्यावर, जन्मावर उच्च नीचत्व का अवलंबून रहावं? चार पाच पिढ्या भिन्न व्यवसायात गेल्यावर, रक्तातील संस्कार, उच्च नीचत्व कायम राहाणं केव्हाहि शक्य नाही. समाजाच्या सोयीसाठी हलकी कामे करणाऱ्या आप्त बांधवाना, पशूपेक्षाहि नीचपणानं व परकीयांपेक्षाहि परकेपणानं वागावयास लावणारा हा जातिभेद मला मान्य नाही... जुलमी भेद नष्ट झाल्याशिवाय संघटना नाही. संघटनेशिवाय सुधारणा नाही आणि सुधारणेशिवाय हिंदूना जगतां येणार नाही! हिंदूच राहून मरता येणार नाही!

सत्यनाम – मुली तू बुद्धीमान आहेस. माझ्या मताने तुझ्या कल्पना दुर्घट व अवेळी आहेत... आज या कल्पनेचा नुस्ता उच्चार करणाऱ्याचा समाज बळी घेईल.

क्रांति – त्याबद्धल माझी खात्री आहे. पण अशा बलिदानाशिवाय कार्यपूर्ती नाही. वीरांचे बळी दिल्याशिवाय राज्य मिळत नाही आणि नवमत स्वत:च्या रक्तात रंगवून डोळ्यांसमोर धरल्याखेरीज समाज तिकडे ढुंकूनही पहात नाही.''[१] नवमानवतावादात धर्म, जात आणि वर्णश्रेष्ठत्वाच्या भ्रामक कल्पना पोकळ ठरविल्या होत्या. केवळ व्यक्तिविकास याच मूल्याला अधिक प्राधान्य दिले होते. व्यक्ती ही समाजाची प्रतिकृती आहे. समाजाचे मूळ आहे. समाजामध्ये व्यक्तिव्यक्तींच्या परस्पर सहकार्यपूर्ण संबंधामुळेच व्यक्तित्वाचा विकास होतो. म्हणून मानवी व्यक्ती ही खरी गोष्ट आहे. मानवी व्यक्तित्वाचा जास्तीत जास्त विकास हेच समाजाचे उद्दिष्ट असायला हवे. एक पार्टी व एक विचारसरणी ह्या तऱ्हेच्या गोष्टी बोलल्या जातात. त्या सर्वात वाईट गोष्टी आहेत अशी नवमानवतावादी विचारसरणी आहे. 'क्रांती'चे वरील उद्‌गार या विचारसरणीचे स्पष्टीकरण देणारे आहेत.

परंपरागत अनेक सामाजिक रूढी, बंधने ह्यांच्या पलीकडे जाऊन जातिभेदातित अशी समतेच्या आधारावर समाजरचना असली पाहिजे. तेथे व्यक्तित्वाच्या श्रेष्ठत्वाला आणि कर्तृत्वाला वाव असला पहिजे अशी नवमानवतावादी विचारसरणी होती. याचा प्रभाव प्रस्तुत नाटकावर पडलेला दिसतो. नाटकातील 'ज्ञातीभैरव' या आपल्या परंपराभिमानी वडिलांना 'क्रांती' म्हणते, ''बाबा, ज्या धर्मावतार जगद्‌गुरूबद्दल आपण बोलत आहांत, त्यांनी गेल्या शंभर वर्षात आपल्या मस्तकावरील मुगूट बाजूला सारून बदलत्या परिस्थितीचा कितीसा विचार केला आहे? लौकिक बंधनं शिथिल करणं म्हणजे अनीतीला व पळवापळवीला वाव देणं नव्हे. बाबा, वेद, श्रुतिस्मृति व सदाचार यावर हिंदुधर्माची प्रमुखपणे उभारणी आहे. स्मृतीच्या आज्ञा, सदाचाराच्या कल्पना कालमानाप्रमाणं बदलत आल्या आहेत. रूढीत बदल होणं हीच समाजाच्या जिवंतपणाची लक्षणं आहेत. नव्या युगाबरोबर बदलत न जाणारी रूढी, समाजघात करते. इच्छा असो वा नसो काल समाजाला बदलत ओढत नेणार! मग सर्वच जुनं ते सोनं म्हणणारे काहिहि म्हणोत... हेच उत्तर प्रतिपक्षालाहि पटलं पाहिजे. माझ्या या विचारसरणीनं घोरत पडलेल्या समाजाला अगदी लहानसा जरी धक्का बसला तरी जागृत झालेला समाज पुष्कळ गोष्टींचा विचार करील. मी पापी ठरले, माझा समाजानं बळी घेतला तरी हे बलिदान फुकट जाणार नाही खास.''[२] दैववादाचा किंवा धर्माचा आश्रय घेणारी माणसे नव्या, समृद्ध जीवनाची उभारणी करू शकतील काय? हा रॉय यांच्यापुढे प्रश्न होता. म्हणून त्यांनी दैववादाला व धर्माला फाटा दिला. या ऐवजी माणसाच्या विवेकशीलतेला, बुद्धीला प्राधान्य देऊन नैतिकतेच्या आधारावर समाजरचनेचे तत्त्वज्ञान सांगितले. आपली विचारसरणी तर्कशुद्ध असावी आणि आपले आचरण त्या विचारसरणीशी विसंगत होऊ नये हा रॉय यांचा कटाक्ष होता. दैववादाने ईश्वरावरील श्रद्धेने भारलेले लोक त्यांना नको होते. तर स्वत:च्या विवेकशीलतेला आणि बुद्धिनिष्ठेला आवाहन करून पारंपरिक अनेक हीन रूढी व बंधनाना झुगारून देऊन व्यक्तिविकास साधला पाहिजे आणि त्यामधून समष्टीचे कल्याण साधले पाहिजे. हे नवमानवतावादी विचारसरणीचे दर्शन 'क्रांति'च्या उद्‌गारातून आपल्यासमोर उभे राहते.

**सारांश :**

१९२० नंतर हळूहळू नवमानवतावादी विचारसरणीचा प्रसार समाजजीवनात होऊ लागला होता. १९४० पासून रॉयनी मार्क्सवादाला पूर्ण रजा दिल्यानंतर त्यांनी नवमानवतावादी विचारसरणीचा पूर्णत: स्वीकार करून त्याविषयी विचार प्रवर्तन सुरू केलेत्याचाप्रभाव तत्कालीन संवेदशनशील मनाच्या नाटककारांवर होत होता. आपल्या नाट्यकृतींतून असे विषय मांडून समाजजीवनात नवविचारप्रवर्तन व्हावे या व्यापक प्रचारकी हेतूने सं. कायदेभंगसारखी नाटके उदयाला आली आहेत.नवमानवतावादाचा विचार करणाऱ्या भा. गो. पेंढारकरांच्या या नाट्यकृतींबरोबर वीर वामनराव जोशी, अनंत हरि गद्रे, गणेश कृष्णशास्त्री फाटक, मा. कृ. शिंदे, रॉय किणीकर, य. ना. टिपणीस आणि मो. ग. रांगणेकर आदी नाटककारांनी आपल्या काही नाट्यकृतींतून नवमानवतावादी विचारसरणीचा त्रोटक उल्लेख केल्याचे आढळते. तत्कालीन काळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रउभारणीच्या कार्यात अशा नवविचार प्रवाहांचे आणि त्या अनुषंगाने उयाला नाटयकृतींचे महत्त्व अधोरेखित करण्यासारखे आहे.

**संदर्भटीपा :**

१. पेंढारकर, भा. गो. संगीत कायदेभंग, १९३०, मुंबई, प्रका. परचुरे, पुराणिक आणि मंडळी, आवृत्ती पहिली, पृ. ७८, ७९.
२. तत्रैव, पृ. १०, १२

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी स्त्री स्वातंत्र्य सेनानी : दशरीबेन

**डॉ. दीपककुमार वळवी**
मराठी विभाग प्रमुख,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.

महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यलढत्यातील अहिंसावादी संग्रामातील आदेशानुसार दशरीबेन यांनी परदेशी मालाला केलेल्या विरोधाचे नेतृत्त्व केले. तेंव्हा त्यांचे वय अवघे १४ वर्षे इतके होते. इतक्या लहान वयात एखाद्या आदिवासी मुलीने स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेणे हे भारतातील कदाचित पहिले उदाहरण असावे.

सुरत जिल्ह्यातील व्यारा, सोनगड, मांडवी, मांगरोळ, वाली, बारडोली, महुआ या तालुक्याच्या ठिकाणी आदिवासी जमातींचे पिढ्यान्‌पिढ्या परंपरागत वास्तव्य आहे. आदिवासी जमातीतील चौधरी ही एक महत्त्वाची जमात आजही अभिमानाने वास्तव्य करते.

१९११ च्या सुमारास आदिवासी जमातींचे एक संमेलन भरविण्यात आले. या संमेलनात वेठबिगारीच्या निमित्ताने आदिवासी जमातींचे जे शोषण होत होते त्याविरूद्ध बंड करण्याचे ठरले. इंग्रज सरकाराची जुलमी गुलामगिरी नाकारून समाजामध्ये जागृती करण्याच्या उद्देशाने जमातीतील संमेलनात इंग्रजांविरूद्ध आंदोलन करण्याचे ठरले. या आंदोलनाचे नेतृत्त्व दशरीबेन यांचे आजोबा जीवनभाई चौधरी यांच्याकडे होते.

जीवनभाई चौधरी यांनी आदिवासी बांधवांना एकत्र करून व्यापारी लोकांकडून होणारी लुट थांबविण्याचा प्रयत्न केला. ताडीची पाने, व्यापारीपेढ्या, लाकडाचे व्यवहार होताना आदिवासी बांधवांना कमी मोबदला देऊन त्यांच्याकडून अतोनात काम करून घेतले जात होते. व्यापाऱ्यांकडून घेतलेली कर्जे आदिवासी फेडू न शकल्यामुळे व्यापारी लोक आदिवासी जमातींच्या जमिनी कवडीमोल भावाने अंगठे उठवून जप्त करते होते. त्यातून एखाद्या आदिवासीने विरोध केला तर त्याची शेती जप्त केली जात होती. आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध दशरीबेन यांचे आजोबा जीवनभाई चौधरी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडे आपल्या अनुयायांसह भेटीस गेले. आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध मार्ग काढण्याची विनंती केली. आदिवासींनी केलेल्या मागण्यांमध्ये मुलाबाळांचे शिक्षण, आदिवासी लोकांची सावकारांनी जप्त केलेली जमीन, इंग्रज सरकारचे जमीनविषयक कायदे, आदिवासींच्या सावकारांनी हिसकावलेल्या जमिनी, चक्रवाढ व्याजाने दिलेले पैसे यातून कर्जमुक्त करावे या प्रमुख मागण्या होत्या. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी अनुकूलता दर्शवून आदिवासींच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून न्याय दिला.

स्वातंत्र्यसंग्रामाची कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेल्या दशरीबेन यांचा जन्म पुण्यवान देशभक्त कुटुंबात झालेला होता. आदिवासी जमातींच्या दृष्टीने हा फार मोठा विजय होता. इंग्रज सरकारविरोधातील स्वातंत्र्य चळवळ आकार घेत असताना महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी यांचे बारडोली आश्रमात येणे-जाणे वाढलेले होते. आश्रमात दिले जाणारे शिक्षण, शिक्षण घेणारे कार्यकर्ते, स्वातंत्र्यसंग्रामासाठी सुतकताई करणे, खादी विणने, सुसंस्कार करणे, शिक्षण देणे-घेणे इ. उपक्रम राबविले जात होते. चौधरी कुटुंबातील सर्व माणसे स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्याचे पाहून महात्मा गांधी यांना अभिमान वाटला. दशरीबेन यांचे कार्य ऐकून महात्मा गांधी घरी आल्यानंतर दशरीबेन यांनी घातलेली सुताची लडी महात्मा गांधींना भरपूर काही सांगून गेली. एवढीशी लहान मुलगी स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होते आहे याचा त्यांना अभिमान होता. चौधरी कुटुंबातील लोकांनी आपल्या गळ्यातील सर्व दागिने महात्मा गांधींकडे सुपूर्द केले आणि स्वातंत्र्यलढ्यासाठी सहभाग नोंदविला. यात दशरीबेन आघाडीवर होत्या.

महात्मा गांधी यांना १९३२ ला अटक केल्यानंतर कायदेभंग चळवळ सुरू झाली. कायदेभंग करताना इंग्रजांनी कडक बंदोबस्त ठेवला. दशरीबेन आनंदाने सहभागी झाल्या. आदिवासी कार्यकर्त्यां बरोबर गावोगावी फिरून ज्वारी, साळ, तूर, मूग, वाल, उडीद इ. वस्तू गोळा केल्या आणि भूमिगत झालेल्या स्वातंत्र्यसेनानी यांना जेवू-खाऊ घातले. दशरीबेन यांचे हे काम इंग्रजांना आवडले नाही. त्यांनी त्यांच्या कुटुंबावर दहशत माजवून जप्ती आणली आणि घरातील खाटा, घरांचे दरवाजे, भांडी, तांब्याच्या घागरी, ताटे, ग्लास इ. सर्व साहित्य जप्त केले.

कुटुंबावर कोसळलेले संकट पाहून दशरीबेन यांनी आपल्या आईला धीर दिला. मामाच्या घरी जाऊन पीठ मागून आणले आणि आपल्या आईला जेवू घातले. आपल्या आईला आणि बहिणींना स्वत: बैलगाडीत बसवून दशरीबेन दुसऱ्या गावातील नातेवाईकांच्या घरी आणले. नातेवाईकांनी कोसळलेल्या कुटुंबाला धीर दिला. परंतु त्यांना सांभाळण्याची जबाबदारी नाकारली. कारण ही माणसे आपल्या घरी राहिल्यानंतर इंग्रज अधिकारी आपल्याकडे येतील आणि आपल्या घरावर जप्ती आणून आपणाला जेलमध्ये टाकतील या भीतीने नातेवाईकांनी दशरीबेन आणि त्यांच्या आईला घर सोडण्याचा सल्ला दिला. दशरीबेन पुन्हा पुढच्या गावी नात्यातील कुटुंबाकडे गेल्या. तेथील माणसांनी त्यांचे आनंदाने स्वागत केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी धडपडणारी ही माणसे आपल्याकडे आश्रयासाठी आलेली आहेत याचा त्यांना अभिमान वाटला आणि देशप्रेमाच्या भावनेने दशरीबेन यांना त्यांनी आश्रय दिला.

१९३३ ला शेतकऱ्यांनी शेतसारा भरण्यासाठी नकार देताच आदिवासी स्त्रियांवर इंग्रज अधिकाऱ्यांनी हल्ले केले. कित्येक महिलांना अटक करण्यात आली. काहींना मारहाण झाल्यामुळे कस्तुरबा गांधी स्वत: त्या महिलांची विचारपूस करण्यासाठी आलेल्या होत्या. कस्तुरबा गांधी यांनी दशरीबेन यांची भेट घेऊन विचारपूस केली आणि या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्त्व स्त्रियांच्या समूहाने करावे अशी सूचना केली. दशरीबेन या त्याच्या प्रमुख असल्यामुळे आणि कस्तुरबा यांचा आदेश असल्यामुळे संघर्षाला अधिक धार आली. विदेशी मालाच्या विरोधात दशरीबेन यांनी खादीच्या पांढऱ्या साड्या घालून परदेशी मालाला विरोध करून खरेदी करण्यावर निर्बंध लादले. आपले नुकसान होते आहे हे इंग्रजांना कळताच त्यांनी सत्याग्रही महिलांना अटक करून जेलमध्ये टाकले. गुजरात, मुंबई आणि शेवटी पुणे असा प्रवास करत सर्व महिला दशरीबेनसह पुण्यातील येरवडा काराग्रहात बंदी करून ठेवल्या. कस्तुरबा गांधीही याच काराग्रहात होत्या. त्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानाबद्दल चर्चा करत असताना दशरीबेन यांची ओळख आणखीन दृढ झाली. गुजराती शिक्षणाची आवड असणाऱ्या कस्तुरबा यांनी दशरीबेन यांच्याकडून ज्ञानाची देवाणघेवाण केली. दशरीबेन शिक्षणकार्याला अनुकूल आहेत हे समजताच सजा संपल्यानंतर आदिवासींच्या शिक्षणासाठी जागृती करण्याचा कस्तुरबा सल्ला देतात.

दशरीबेन यांची शिक्षा संपल्यानंतर गावी येताच आश्रमशाळा चालवून आदिवासी मुलींना शिक्षणाचे धडे देतात. त्यांच्या राष्ट्रीय कार्याला शुभेच्छा देण्यासाठी कस्तुरबा आलेल्या असताना एका बांधावरून चालताना त्या पडतात. त्यांच्या पायाला दुखापत होते. त्यांना दवाखान्यात घेऊन जाण्याची जबाबदारी दशरीबेन स्वीकारतात आणि त्यांची मोठ्या बहिणीप्रमाणे सेवा करतात. कस्तुरबा बऱ्या झाल्यानंतर पुन्हा राष्ट्रीय कार्यात सक्रीय सहभाग घेतात.

स्वातंत्र्यसंग्राम अधिक तीव्र होत असतानाच कानजीभाई यांच्या बरोबर दशरीबेन यांचा विवाह ठरतो. विवाह ठरल्यानंतर ते स्वातंत्र्यसेनानी असल्यामुळे एक वर्ष जेलमध्ये जातात. एक वर्षाची सजा संपवून कानजीभाई बाहेर येतात तेंव्हा दुसऱ्या आंदोलनात दशरीबेन यांना एक वर्षाची शिक्षा होते. त्यामुळे दोन वर्षे स्वातंत्र्यलढ्याच्या संग्रामातील सहभागामुळे त्यांचा विवाह पुढे ढकलला जातो. दोन वर्षानंतर दोघे विवाहीत होतात आणि संसार करत करत आपले पुढील जीवनही देशासाठी समर्पित करण्याचा विडा उचलतात. भारताला स्वातंत्र्य मिळते. स्वातंत्र्यलढ्यातील दशरीबेन यांचे कार्य आजही सूरत जिल्ह्यात अभिमानाने उल्लेखले जाते. स्वातंत्र्यलढ्यातील दशरीबेन यांचे हे कार्य अतुलनीय असून आजच्या एकविसाव्या शतकातील भारताला अभिमानास्पद आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) स्वातंत्र्यसंग्रामातील आदिवासी वीर स्त्री – दशरीबेन, वीरसिंग पाडवी, प्रकाशक – रेखा पाडवी, नंदुरबार.
२) स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी क्रांतीकारक – डॉ. गोविंद गारे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००४.

## यशवंतराव चव्हाण. यांचे भाषाविषयक विचार

**प्रा.शिवाजी विठ्ठल सुतार**
मराठी विभाग.
स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर.

यशवंतराव चव्हाणांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हटले जाते कारण त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचा पाया घातला. त्यांनी हा पाया घालताना अनेक अंगांनी राज्याचा आणि देशाच्या विकासाचा विचार केला होता. त्यांनी जेजे निर्णय घेतले त्या मागे त्यांचे स्वत:चे वैचारिक अधिष्ठान होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वैचारिक प्रगल्भता वाचन आणि अनुभवातून आलेली होती. तो काळ पारतंत्र्याचा होता. १९३१ मध्ये शालेय शिक्षण घेत असतसानाच तिरंगा फडकविल्याबद्दल यशवंतरावांना १८ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली. या काळात वाचनातून त्यांना गांधीवादी व मार्क्सवादी विचारांचा चांगला परिचय झाला. शिक्षेचा काळ पूर्ण होताच १९३३ ला त्यांची तुरुंगातून सुटका झाली. पुढे उच्च शिक्षणासाठी ते कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात दाखल झाले. स्वातंत्र्य चळवळीला पोषक असणारे कोल्हापूरचे वातावरण त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. परिणामी उच्च शिक्षण घेत असताना यशवंतराव स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले.

स्वातंत्र्यानंतर एक अभिरुची संपन्न ,सुसंस्कृत व संयमी नेता म्हणून त्यांना द्विभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली व आपला मुत्सद्दीपणा वापरून स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती करून घेतली. त्यांनी १ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२ या काळात स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी पार पाडली. महाराष्ट्रात पुढे शैक्षणिक , आर्थिक, सांस्कृतिक ,राजकीय आणि सहकारात झालेला विकास हा यशवंतरावांच्या कार्याचाच परिपाक आहे. यशवंतराव कुशल प्रशासक होते, तसेच विचारवंत आणि साहित्यिकही होते. शिवनेरीच्या नौबती, युगांतर , विचारधारा , सहयाद्रीचे वारे, भूमिका (भाषणसंग्रह), ऋणानुबंध (ललित लेखसंग्रह) आणि कृष्णाकाठ (आत्मचरित्र) इत्यादी साहित्य यशवंतरावांच्या नांवावर आहे. या साहित्य संपदेमधून त्यांची विचारधारा अभिव्यक्त झाली आहे. त्यांनी त्यातून साहित्य, भाषा,शिक्षण, प्रशासन आणि आर्थिक विषयावर आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यापैकी त्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांविषयी मांडलेले विचार आपण पाहणार आहोत. ते निश्चितच भारतासारख्या बहुभाषिक राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपुर्ण असे आहेत. हे विचार विविध प्रसंगी केलेल्या शिवनेरीवर , सोनियाचा दिवस , मतभेद वाढवू नका. जनता जननी, साहित्य व संस्कृती महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर, नवपदवीधरांकडून अपेक्षा, जगन्नाथाचा रथ , साहित्यिकांची जबाबदारी, राष्ट्रभाषा हिंदी, प्रगतीचे पहिले पाऊल , संकट ही संधी, लोकभाषा हीच ज्ञानभाषा. राष्ट्रभाषेचा प्रश्न इत्यादी भाषणातून व्यक्त केले आहे.

मराठी ही यशवंतरावांची मातृभाषा होती. तिच्याबद्दल त्यांच्या मनात अतिव प्रेम होते. त्यांचे प्रेम डोळस होते.अभिमान जरूर होता पण दुराभिमान अजिबात नव्हता त्यांनी त्रिभाषा सूत्र सांगितले आहे. म्हणूनच ते मराठीचे महत्त्व सांगत असताना राष्ट्रीय पातळीवर हिंदी ,तर जागतिक पातळीवर इंग्रजी आवश्यक असल्याचे आवर्जून नमूद करतात. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५६ ला भाषावार प्रांतरचना करण्यात आली. राज्यकारभार करणे सोयीचे व्हावे आणि शिक्षण त्या त्या प्रांतिक भाषेत घेता यावे व इतर व्यवहार सुलभ पध्दतीने करता यावेत, हा हेतू त्यामागे होता. दिनांक १ मे १९६० रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतानाच महाराष्ट्राचा राज्यकारभार इंग्रजीऐवजी मराठी भाषेत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. मानवी विकासातील भाषेचे महत्त्व त्यांना चांगलेच ठाऊक होते. त्यांना हेही माहीत होते की, प्रशासन मराठीत चालवायचे असेल तर सर्व शिक्षणही मातृभाषेतून दिले पाहिजे.

यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या विकासाची दिशा मनात निश्चित केली होती. त्यामध्ये मराठीचा विकास करणे हे ध्येयही होते. त्यांनी मराठीच्या विकासासाठी मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषा सल्लागार मंडळ आणि महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाची स्थापना केली. मराठी भाषेच्या विकासाचा ध्यास आणि हातात सत्ता त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा म्हणून मराठीला दर्जा दिला. कोणतेही राज्य किंवा देशाचा विकास हा समाजाच्या सर्वात शेवटच्या घटकाला सोयी सुविधा मिळतात तेव्हाच होतो. राज्यभाषेचा दर्जा दिल्यामुळे शिक्षणाचे माध्यम मराठी झाले. अर्थात समाजाच्या सर्वात कनिष्ठस्तरापर्यंत शिक्षण पोहचले. अनेक विद्यापीठानींही पदव्युत्तर शिक्षण मराठीतून देण्यास सुरुवात केली. त्यांनी मराठी भाषेच्या विकासाला चालना मिळावी म्हणून मंत्रालयात स्वतंत्र भाषा विभाग सुरु केला. मराठी भाषेच्या विकासात शास्त्रज्ञ आणि साहित्यिकांनीही योगदान द्यावे, असे यशवंतराव आवाहन करतात. ज्या भाषेत शब्द भांडार दर्जेदार आणि वाड्:मय निर्मिती जास्त ती भाषा अधिक समृध्द होत जाते,याची जाण त्यांना होती. म्हणून आपल्याच वाढदिवसाच्या समारंभात मराठी भाषेविषयी म्हणतात, ‘नव्या महाराष्ट्रात मराठी भाषेचे काम करावयाचे आहे , ही विनंती मी लेखकांना करीत आहे . मराठी भाषेत जी शब्दाची वाणवा आहे, ती नव्या महाराष्ट्रात भरून काढावयाची आहे. जुने शब्द तर वापराच, पण नवीन अमृतासारखे शब्द आणि विचार शोधून काढा. नवीन शास्त्रीय ज्ञानाचा इमला उभारावयाचा आहे. तो तोलून धरतील असे शब्द निर्माण करा.केवळ

भूतकाळाकडे पाहून चालणार नाही, भविष्यकाळात पुढे जावयाचे आहे. भूतकाळातील परंपरा सध्या आपण कोठे आहोत व कोठे जावयाचे आहे हे पाहून पुढे जावयाचे आहे.' त्यांच्या या आवाहनाचा इष्ट परिणाम झाला व साहित्यक्षेत्रात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

कोणत्याही भाषेच्या उगमाचा इतिहास पाहिला तर असे दिसते की, भाषेची निर्मिती एका विशिष्ट प्रदेशात होऊन तिला सार्वत्रिकता प्राप्त होते तिचा आजूबाजूला प्रसार होतो. उत्तरोत्तर वापर वाढत जातो. मराठीचा उगम महाराष्ट्रातील विशिष्ट प्रदेशात झालेला असला तरी आज महाराष्ट्राच्या सर्व भागात मराठी बोलली जाते , हे सर्व विभाग एकत्र ठेवण्याचे काम मराठी भाषेमुळे शक्य झाले आहे,अशी यशवंतरावांची ठाम भूमिका आहे.

भाषा केवळ पुस्तकात बंदिस्त करून तिचा विकास होत नाही ,तर तिचा जास्तीत जास्त सर्व घटकात वापर झाला पाहिजे असे यशवंतराव चव्हाणांना वाटत होते. ते सतत भाषेच्या विकासाबद्दल विचार, चिंतन करीत होते. मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात बोलताना ते भाषेविषयी म्हणतात, 'भाषेचा विकास हा केवळ त्याभाषेतील ललित साहित्याच्या संदर्भातच ही समजूत चुकीची आहे. निरनिराळया वैज्ञानिक शास्त्रांचा आविष्कार जेव्हा भाषा करू लागेल, तेव्हाच तिचा खरा विकास झाला असे म्हणता येईल. तेव्हा साहित्यिकांबरोबर शास्त्रज्ञ ,इतिहासकार तत्ववेत्ते हे सर्वजण मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासास चालना देतील , असा मला विश्वास वाटतो. '

यशवंतरावांच्या युगांतर या भाषण संग्रहात 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा' हे भाषण समाविष्ट असून ते त्यांनी कोपरगाव येथील महाविद्यालयाच्या पायाभरणी समारंभात केलेले आहे. त्यांनी भाषेच्या प्रश्नावर आपले विचार मांडले आहेत ते म्हणतात, 'उच्च शिक्षण मातृभाषेतून असावे की नसावे याबद्दल वाद सुरु झाला आहे. शिक्षण खालच्या थरापर्यंत पोहचायला हवे असेल, तर ते मातृभाषेतच झाले पाहिजे. त्यांनी आपला मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी दिडशे वर्षाच्या इंग्रजी शिक्षणाच्या फसलेल्या प्रयोगाचे उदाहरण दिले आहे. मानसशास्त्रीय दृष्ट्या परकिय भाषा शिकणे मातृभाषेपेक्षा अवघड जाते. म्हणूनच यशवंतरावांनी प्रश्न उपस्थित केला होता की, जर सामान्य माणसाची सगळी ताकद परकीय भाषा शिकण्यात गेली, तर तो ज्ञानसंपादन कधी करणार?

भारतावर अनेक आक्रमणे झाली. अनेकांची सत्ता आली आणि गेली,पण ज्या काळात ज्यांची सत्ता, वर्चस्व त्यांचीच भाषा या देशातील लोकांना स्वीकारावी लागली असे चित्र पाहायला मिळते. येथे नेहमीच असे घडत आलंय की, सत्ताधाऱ्यांची भाषा वेगळी आणि लोकांची भाषा वेगळी. त्यामुळे लोकांचा आणि राज्यकर्त्यांचा सांधा कळी जुळलाच नाही. जी भाषा लोकांची तीच भाषा कोर्टाची असायला पाहिजे, अशी भूमिका यशवंतराव मांडतात. लोकभाषा हे समाज व्यवहाराच्या लोकशाही करणाचे साधन आहे, असे त्यांना वाटते. म्हणूनच ते लोकभाषेचा आग्रह धरतात. उच्च शिक्षण मराठी भाषेतून देण्यात ज्यांना अवघडलेपण वाटते त्यांना ते का देता येणार नाही?'' असा सवाल ते करतात. शिक्षण आणि संशोधनक्षेत्रात लोकभाषेचा वापर करणाऱ्या माणसांची संख्या वाढत जाईल . त्या प्रमाणात भाषेचा विकास होईल. आपल्यातील विद्वान मंडळींनी वैद्यकीय आणि इंजिनिअरींगमधील ज्ञान आपल्या भाषेत आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसे केले तर त्यासाठी आवश्यक असणारी परिभाषा विकसित होईल. केवळ भाषांतराने भाषा विकसित होत नाही किंवा ती वाढत जाणार नाही , असाही ते इशारा देतात. भाषा ही जिवंतच असली पाहिजे. भाषेने लोकमानसाचा कल घेऊनच वाढले पाहिजे. नवे विचार आपल्या भाषेत आणण्याचा ध्यास असेल, त्यावेळी ही गोष्ट करणे शक्य आहे. यासाठी पा.वा.गाडगीळ आणि इतर साम्यवादी समाजवादी विचारवंताचा ते दाखला देतात. या विचारवंतानी साम्यवाद या विषयावरील लेखन मराठील आणले आहे.

यशवंतरावांच्या भाषाविषयक विचारात त्यांची चिंतनशीलता दिसून येते उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेतून घेता येईल असा विचार मांडणारा एकही राजकीय नेता यशवंतरावांच्या काळात तर नव्हताच, पण आजही तशी आग्रही भूमिका मांडणारा नेता नाही. यशवंतरावांचा हा विचार संपूर्ण भारताला महत्वाचा ठरावा असा आहे . खरे तर आजही प्रत्येक राज्यातील प्रादेशिक भाषा ही पोटाची, जगण्याची, रोजगार मिळवून देणारी भाषा झाली पाहिजे पण यासाठी काय करता येईल. किंवा करायला पाहिजे, याची अभ्यासपूर्ण मांडणी झाली पाहिजे.

यशवंतरावांनी मराठीबरोबरच हिंदी भाषेविषयीही आपली भूमिका मांडली आहे. त्यांच्या भाषणसंग्रहात 'राष्ट्रभाषा हिंदी' व 'राष्ट्रभाषेचा प्रश्न' ही दोन भाषणे आहेत. यशवंतराव संकुचित वृत्तीचे नव्हते. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला हिंदी भाषेचाही विकास करण्याचे आश्वासन दिले होते. भारतासारख्या बहुभाषिक राष्ट्रात संपर्क भाषेची मोठी गरज आहे. हे ध्यानात घेऊनच त्यांनी हिंदी भाषेकडे संपर्क भाषा म्हणून पाहण्याचा विचार मांडला होता. संपर्क भाषा ही सहज बोलता येण्यासारखी असावी लागते.ती जास्तीत जास्त लोकांना बोलता आली पाहिजे. हे हिंदीच्या बाबतीत सहज शक्य आहे, असे यशवंतरावांना वाटत होते .

हिंदी भाषा बोलणाऱ्यांची संख्या आणि प्रदेश लक्षात घेऊन हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा दिला पण तो दर्जा टिकविला पाहिजे ,असे यशवंतरावांना वाटते हे काम साहित्यिकांनी करायला पाहिजे असेही ते सूचवितात. याविषयी ते म्हणतात. आज देशाच्या कानाकोपऱ्यातून हिंदीचा प्रचार करण्याची आवश्यकता तर आहेच परंतु त्याहीपेक्षा हिंदी भाषेतील शब्दसंपत्ती आज अशाप्रकारे वाढविली पाहिजे की, ज्यामुळे आधुनिक विचारप्रवाह, शास्त्रीय व तांत्रिक विषय आणि त्याचप्रमाणे राज्यकारभार यांची संपूर्ण गरज ती चांगल्याप्रकारे भागवू

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

शकेल.या दिशेने केंद्रीय सरकारतर्फे उच्च पातळीवर बरेच कार्य चालू आहे. तथापि हे महान कार्य त्वरित पूर्ण होण्यासाठी सर्वच हिंदी साहित्यिंकाच्या हार्दिक सहकार्याची विशेष आवश्यकता आहे.''

कोणत्याही भाषांमधील वाक्प्रचार शब्द, म्हणींची , परस्परांशी देवाण-घेवाण झाली पाहिजे ,हे काम साहित्यिक आणि अनुवादक किंवा भाषांतरकार करू शकतात. त्यामुळे भाषा समृध्द बनतात. हिंदीच्या बाबतीत हे काम होणे आवश्यक असल्याचे ते म्हणतात. लिपी आणि भाषेचा अन्योन्य संबंध आहे. किंबहुना लिपीविना भाषा लुळीपांगळी ठरते. हिंदीच्या प्रसारामध्ये लिपीची मोठी अडचण होती. यावर त्यांनी एक तोडगा सुचविला होता, तो म्हणजे भारतातील प्रमुख भाषांसाठी एकाच लिपीचा वापर करायचा . यामुळे लोकांनाही हिंदी भाषा लवकर शिकता येईल , असे त्यांचे मत होते. हिंदीच्याबाबतीत आणखी एक महत्वाची बाब म्हणजे तिला राष्ट्रभाषेचा दर्जा दिल्यामुळे तिच्या वापरातून राष्ट्रीय एकात्मतेची निश्चितच वाढ होण्यास मदत झाली आहे. म्हणूनच हिंदीचा प्रचार आणि प्रसार करण्यात कमी पडणार नाही, असे वचन यशवंतरावांनी दिले होते.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण यांनी त्रिभाषा सूत्र सांगितले होते. त्यापैकी मराठी, हिंदी या भाषांबरोबर इंग्रजीचे महत्त्व त्यांनी जाणले होते . मराठीची गरज प्रादेशिक पातळीवर, हिंदीची आवश्यकता राष्ट्रीय पातळीर आणि इंग्रजी ची अनिवार्यता आंतरराष्ट्रीय पातळीवर आहे, हे यशवंतरावाना उमगले होते.म्हणून ते त्याबाबत आपले स्पष्ट मत मांडत होते. १५ ऑक्टोंबर १९६० मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात संपन्न झाला. त्या कार्यक्रमाला यशवंतराव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी केलेल्या भाषणात ते म्हणतात, 'अर्थात मराठीच्या अभ्यासाबरोबरच राष्ट्रभाषा म्हणून हिंदी, सर्व भाषांची मायभाषा व प्राचीन संस्कृतीची भाषा म्हणून संस्कृत व आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी याभाषांचाही अभ्यास करणे आपल्याला आवश्यक आहे. इतिहासाने इंग्रजी भाषेशी आपला जो घनिष्ठ संबंध आला ,त्यामुळे इंग्रजी भाषा आपल्याला परकी राहिलेली नसून तिने आपले फार मोठे हितच साधले आहेत व त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यवहारही सुलभ केला आहे.' संशोधन, वैद्यकीय शास्त्र आणि इंजिनिअरींग या क्षेत्रासाठी इंग्रजीत जे शब्दभांडार आहे ते मिळविण्यासाठी इंग्रजीचा द्वेष करून चालणार नाही . त्यांच्या मते ज्ञानाची भाषा आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधन ज्याभाषेत होते तीच ज्ञानभाषा होय आणि हा मान इंग्रजीला जातो.

यशवंतरावाचे हे भाषाविषयक विचार महाराष्ट्राबरोबर देशाच्या विकासाला पूरक आणि पोषक होते. राष्ट्राची एकात्मता आणि भाषिक सलोखा वाढविण्यास मदत करणारे होते. राष्ट्र उभारणीत या गोष्टींना अनन्य साधारण महत्व आहे. त्या अर्थाने यशवंतराव राष्ट्राचे शिल्पकार ठरतात.

**संदर्भ :-**

१) चव्हाण, यशवंतराव १९९२ सहयाद्रीचे वारे, मुंबई यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान.
२) चव्हाण, यशवंतराव १९९९ युगांतर, पुणे, कॉन्टिनेन्टल.
३) चव्हाण, यशवंतराव १९८६ ऋणानुबंध, पुणे, प्रेस्टीज पब्लिकेशन.
४) चव्हाण, यशवंतराव १९८१ शिवनेरीच्या नौबत , संपादक तळवळकर गोविंद व लिमये ,आ.ह. पुणे, व्हीनस बुक स्टॉल.
५) वाघमारे जे.एम. १९८६ मा. यशवंतराव चव्हाण- एक स्मरण - संपादक कुलकर्णी जी.बी.
६) जयस्वाल डॉ. राजन २००७-वाङ्मयातील वैचारिकता , नागपूर, विजय प्रकाशन.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# महात्मा जोतीराव फुले यांच्या शेतीविषय विचारांचे महत्व

**प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे**
विभाग प्रमुख –मराठी
म.ह. शिंदे महविद्यालय, तिसंगी,
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर.

**प्रास्ताविकः**

१९ व्या शतकातील सामाजिक सुधारणेचे प्रणेते म्हणून महात्मा जोतीराव फुले यांचे नाव घ्यावे लागते. जोतीरावांनी लिहिलेल्या विविध ग्रंथामधून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक शेती व शेतकरी यांच्या प्रश्नांची जाणीव होते. अहोरात्र कष्ट उपसणारा, शेतात राबराब, राबणारा शेतकरी हा प्रतिष्ठित मानला गेला पाहिजे. अशी विचारसरणी महात्मा फुले यांची होती. भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकरी व शेतमजूर यांची संख्या अधिक आहे. त्यांच्या दु:खांना वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. महात्मा फुले यांच्या समाजपरिवर्तनाचा समाज क्रांतीचा दृष्टिकोन किती विशाल होता याची साक्ष त्यांच्या सामाजिक चिंतनात, विचारात व प्रत्यक्ष कार्यात आढळते यामध्ये समाजातील सर्वच उपेक्षित घटकांचा समावेश झालेला आहे. महात्मा फुले यांच्या काळात शेतकरी व शेती यासारख्या प्रश्नांवर अन्य कोणी लिहिलेले फारसे आढळत नाही. महात्मा फुले यांनी मात्र प्रथम आपले विचार अत्यंत तळमळीने मांडलेले आहेत. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या काळात जोतीरावांच्या विचारांची आवश्यकता पुन्हा निर्माण होत आहे. त्यांनी सांगितलेल्या विविध विचारांचे महत्व आजही पुन्हा नव्याने स्वीकारण्याची गरज आहे. त्यामुळे जोतीराव फुले यांच्या शेतकरी व शेतीविषक विचारांचा वेध प्रस्तुत निबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शेती व शेतकरी विषयक विचार :**

शेती व शेतकरी हाच गावच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. कारण स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था शेती व्यवसायाभोवतीच केंद्रित झालेली होती. उत्तर पेशवाईत महसूल वसुलीसाठी खेड्याचे विभाजन झालेले दिसते. इनाम खेडी, मोकासा खेडी इत्यादी पेशवाईत हा मसहूल अनेक निकष लावून ठरविलेला असे. उदा. जमिनीची प्रत, पिकाचा प्रकार, खरीप रब्बी पीक, बागायती, जिरायती पिके इत्यादी. साधारणत: एकूण उत्पन्नाच्या एकतृतीयांश महसूल सरकारकडून आकारला जात असे. हा महसूल रोख किंवा वस्तूंच्या स्वरूपात स्वीकारला जाई. गावात शेतकऱ्यांत वतनदार, मिरासदार, उपरी असे काही वर्ग होते. शेतकरी सर्वांचा पोषणकर्ता होता. पण त्यांची स्थिती अत्यंत वाईट होती. कारण महाराष्ट्रातील नैसर्गिक परिस्थिती, येथील लहरी पाऊस, कधी कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, रोगराई, टोळधाड, लष्कराने पिकाचे केलेले नुकसान इत्यादींमुळे शेतपिकाचे व शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होई. त्यातून आलेल्या पीक उत्पन्नातून बलुते द्यावे लागते. महसूल द्यावा लागे. शासकीय विविध कर द्यावे लागत. लग्न, दुष्काळ अडी–अडचणींसाठी सावकारांच्याकडून कर्ज घेतलेले असे. सावकरांचा व्याजाचा दर प्रचंड होता. कर्ज फिटले नाही तर सावकार जमिनी ताब्यात घेई. कर्ज व करवसुलीसाठी शेतकऱ्यांचा अमानुष पद्धतीने, क्रूर पद्धतीने छळ केला जात असे. त्यामुळे या काळात शेतकरी, शेतमजूर यांची अवस्था दयनीय होती. त्यातच शेतमालाची चोरी, लुटालूट, जाळपोळ इत्यादींमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होई. महाराष्ट्रातील सर्व शेती जिरायती होती. पेशव्यांनी शेती पिकासाठी खास प्रयत्न केल्याचे फारसे दिसत नाही. कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचे प्रयत्न या काळातील राज्यकर्त्यांकडून झालेले दिसत नाहीत. अशाप्रकारे घरातील सर्व लोकांच्यासह शेतावर रात्रंदिवस राबूनसुद्धा शेतकऱ्याला सुखाने जगता येत नव्हते. दारिद्र्य तर त्यांच्या पाचवीलाच पूजलेले होते. उत्तर पेशवाईत तर या बाबींचा कळस झाला. चैन, विलास, दानधर्म, भोजनावळीसाठी रयतेकडून जास्त पैसा वसूल केला जाईल. शेतकरी व रयत यांना कोणी वाली उरला नाही. शेतसारा व करवसुलीसाठी शेतकऱ्यांस फार छळत. मिरचीची धुरी देत. ओणवे करून पाठीवर मोठे दगड ठेवत. तापल्या तव्यावर उभे करत इत्यादी कौर्याची परिसीमा गाठली जाई. वरील सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर शेती, शेतकरी व शेतमजूर यांची परिस्थिती कशी होती याचे चित्र आपल्यासमोर उभे राहते.

'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाच्या उपोद्घातातच महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या जातीवर ओझरता प्रकाश टाकला आहे. शुद्ध शेतकरी म्हणजे केवळ शेती करणारा कुणबी, माळी, धनगर हे होत. त्यांचा मूळ व्यवसाय शेती हाच होता. त्याचे उदरनिर्वाहाचे साधन शेती हेच होते. पण आता या तीन वेगवेगळ्या जाती झाल्या आहेत. असे महात्मा फुले नमूद करतात. कुणबी माळी आणि धनगर यांच्या सद्य:स्थितीचेही वर्णन महात्मा फुले यांनी उपद्घोषात केले आहे. जगातील एकंदर सर्व देशाचे इतिहास एकमेकांशी ताडून पाहता, हिंदुस्थानातील अज्ञानी व देवभोळ्या शुद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशातील शेतकऱ्यांपेक्षा फार वाईट होती.

महात्मा फुले यांचे सूक्ष्म निरीक्षण, चिंतन आणि शेतकऱ्यांची जी स्थिती पाहिली ती पुस्तकरूपाने मांडण्याची त्यांची तळमळ लक्षात घेता महात्मा फुले यांच्या व्यक्तित्वातील पैलूंचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या व्यक्तित्वाची झेप, त्यांचे समाजचिंतन आणि मानवतेची व्यापकदृष्टी याची जाणीव त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' आणि अन्य ग्रंथातूनही होते. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात महात्मा फुले

यांनी अत्यंत पोटतिडकीने आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या विचारांना वास्तवाची बैठक आहे. कित्येक शतकापासून शेतकऱ्यांची दैन्यावस्था चालूच होती. त्यांच्या दु:खाला कोणीही वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला नव्हता. पेशवे राजवटीतही शेतकऱ्यांच्या परिस्थितीत बदल झालेला नव्हता. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचे, जुलमाचे चित्रण या ग्रंथात केले आहे.

शेतकऱ्यांच्या परिस्थितीत त्यांच्या हालाखीच्या जगण्यात सुधारणा व्हावी, असा त्यांचा उद्देश होता. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या पूर्वीच्या स्थितीचे, आजच्या स्थितीचे, या स्थितीत होणारे शोषण, नागविला जाणारा शेतकरी, त्यांची होणारी लुबाडणूक त्यांचे अज्ञान त्याने जोपासलेल्या अंधश्रद्धा, त्यांच्या कुंटुंबावर होणारा याचा परिणाम आणि साऱ्यावरचा उपाय यावरचे आपले चिंतन प्रकट केले आहे.

'तृतीयरत्न' या नाटकातूनही भट ब्राह्मणाकडून लुबाडल्या जाणाऱ्या कुणब्याचे चित्रण त्यांनी केले आहे. महात्मा फुले यांच्या लेखनाचे स्वरूप शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडणारे आहे. महात्मा फुले यांच्या शेती विषयक आणि शेतकरी विषयक विचाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या आर्थिक शोषणाचा महात्मा फुले यांनी केलेला मूलगामी विचार होय. पारंपरिक समाज व्यवस्थेतील जातीभेदाच्या दुष्परिणामाची दखल महात्मा फुले घेतात. त्याचबरोबर त्यांचे आर्थिक शोषणही त्यांना महत्त्वाचे वाटते हे होय. याच दृष्टीने महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांविषयी आपले विचार लेखनातून मांडले असे म्हणता येते.

शिक्षणापासून शेतकऱ्यांना वंचित ठेवण्याचा इंग्रजांचा प्रयत्न तसाच स्थानिक भट ब्राह्मणांचाही या स्वरूपाचा प्रयत्न महात्मा फुले यांनी विचारात घेऊन बहुजनाना शिक्षण मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. शूद्रातिशूद्राप्रमाणेच शेतकऱ्यांनी अज्ञानी राहावे, असे भट ब्राम्हणांना वाटते. भट ब्राम्हण, नोकरशाहीतील भट भिक्षुक आणि सावकार हे शेतकऱ्यांचे कसे शोषण करतात त्याचे सविस्तर वर्णन महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात केले आहे. या तीन स्तरावर होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणामुळे शेतकऱ्यांची स्थिती अधिकच हलाखीची बनत चालली होती. महात्मा फुले यांच्या काळातील शेतकऱ्यांची स्थिती त्यांनी जवळून पाहिली होती. शेतकऱ्यांच्या या हालाखीच्या स्थितीचे, त्यामागील कारणांचे महात्मा फुले यांनी सखोल चिंतन केले होते. त्यांच्या या चिंतनातूनच शेतकऱ्यांविषयी, शेतीविषयक आणि एकूणच त्यांच्या शोषणामागील कारणांचा विचार त्यांच्या लेखनातून व्यक्त झाले आहेत. या साऱ्यातून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावयाची असेल तर त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे ही जाणीव महात्मा फुले यांना झाली होती.

शेतकऱ्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत भूदेव मानला गेलेला ब्राह्मण धर्मकल्पनांचा आधार घेऊन, अज्ञानी शेतकऱ्यांची कशी लुबाडणूक करतो याचे चित्रण महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड'मध्ये प्रभावीपणे केले आहे. त्यास निरनिराळ्या धर्मविधी, संस्कार विधी पार पाडण्यास भाग पाडून खोट्या कुंडल्या करून तसेच लग्नाच्याप्रसंगी निरनिराळ्या सणांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना पाप-पुण्याची भिती दाखवून, देवदेवतांच्या क्रोधापासून, कोपापासून रक्षण मिळविण्याच्या नावावर भट ब्राह्मण कसे लुबाडतात त्यांचे वास्तव चित्रण महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड'या ग्रंथात करून भट-ब्राह्मणांच्या दांभिक स्वार्थी वृत्तीचे तसेच शेतकऱ्यांच्या अज्ञानाचेही वर्णन त्यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी कसा नाडला जातो, सरकारी नोकर या शेतकऱ्यांना कसा लुबाडतो, त्यांच्याकडून कशी लाच घेतो याचेही बारकाईने वर्णन महात्मा फुले यांनी केलेले आहे. शेतकऱ्यांची इतकी पिळवूण करूनही त्याला माणसासारखी वागणूक भट ब्राह्मण आणि नोकरशाहीतील लोक देत नसत. इंग्रज अधिकारीही नोकरशाहीच्या या वर्तनाकडे दुर्लक्ष करीत सर्व बाजूनी शेतकरी नागवला जातो याचे चित्रण आपल्या लेखनातून महात्मा फुले यांनी केले आहे.

'शेतकऱ्यांचा आसूड'या ग्रंथात महात्मा फुले यांनी अत्यंत परखडपणे शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे, दुर्दशेचे, कर्जबाजारीपणाचे, परंपरेवर विश्वास ठेवण्याच्यावृत्तीचे आणि त्यातून त्याच्या उद्ध्वस्त होण्याचे प्रभावी चित्रण केलेले आहे. शेतकऱ्यांच्या या चित्रणाला समाजव्यवस्थेची, समाजातील वृत्ती प्रवृत्तींची पार्श्वभूमी लाभली असल्यामुळे तर त्यातील वास्तवता अधिक प्रखर बनली आहे. धर्ममिषाने शेतकऱ्यांची अधोगती कसकशी होत गेली याचाही ऐतिहासिक पद्धतीने विचार केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सामान्य माणसाच्या जीवन इतिहासाचा विचार त्यांनी केला असे म्हणता येते. शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण करताना महात्मा फुले यांनी त्यांच्या घरातील भांडीकुंडी, भाजी-भाकरी, मुले-बाळे त्याचा फाटका-तुटका संसार, त्याचे कष्ट करणे इत्यादीचा बारकाईने व सविस्तरपणे तपशील दिला आहे. त्यावरून त्यांचे निरीक्षण किती सूक्ष्म होते याची कल्पना येते. शेतकऱ्यांचा एकूण जगण्याचा सामाजिक इतिहास महात्मा फुले यांनी दिला आहे.

महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांविषयी विचारांचे एक वैशिष्ट्ये म्हणजे शेतकऱ्यांच्या दु:खदायी वेदनेची, हाल-अपेष्टांची त्यांनी जशी दखल घेतली तशीच त्यांच्या मूर्खपणाचीही दखल घेतली आहे. शेतकऱ्यांनी अधिक बायका करू नये, असा विचार त्यांनी उपहासगर्भ भाषेत व्यक्त केला आहे. हिंदू समाजव्यवस्थेत शेतकऱ्याला शूद्राचा हीन दर्जा दिला त्यामागील उच्च वर्णीयांचा स्वार्थ महात्मा फुले यांनी ओळखला होता. शेतकऱ्यांचे सर्व पातळीवर शोषण करून त्याला लाचार बनविल्याशिवाय आपला स्वार्थ साधता येणार नाही. ही उच्चवर्णीयांची मानसिकता होती. त्यांच्या या मानसिकतेतून समाजातील विषमता कायम राहू शकली ही सामाजिक विषमता दूर करावयाची असेल तर शुद्रातिशुद्रांना शिक्षण मिळाले पाहिजे ते डोळस झाले पाहिजेत. शेतकरी व शेती सुधारली पाहिजे हे महात्मा फुले यांनी ओळखले होते.

त्यामुळेच त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' उगारण्याचा प्रयत्न केला. त्याच्या हिन-दिन अवस्थेला, त्यांच्या होणाऱ्या अन्यायाला महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' मधून वाचा फोडली.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याच्या कारणांचा शोध घेतला. त्यात शेतकऱ्यांचे अज्ञान, त्यांची होणारी लुबाडणूक हे एक कारण होते. तसेच शेत जमिनींचे पडणारे तुकडे हेही एक कारण असल्याचे ते स्पष्ट करतात. फुले यांनी शेती आणि शेतकरी याविषयी सखोल चिंतन केलेले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी काही उपाय सुचविले हा त्यांच्या सामाजिक विचारातील एक महत्त्वाचा भाग आहे. इंग्रज सरकारने भारतातील शेती सुधारण्यासाठी काही उपाय करावेत असे त्यांनी सुचविले. महात्मा फुले यांनी इंग्रज सरकारला या संदर्भात काय उपाय करता येतील हे सुचविताना त्यांनी शेतकऱ्यांच्या कामात, शेतीच्या उपाय योजनेत भट ब्राह्मणांना कोणतेच स्थान देऊ नये, असे सांगितले. शेतीच्या विकासाच्या प्रयत्नांवर या उपाय योजनेचा भर असावा, तसेच शेतकऱ्यांची नैतिकताही याबाबतीत विचारात घ्यावी, असे महात्मा फुले यांना वाटते.

शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनातील सुधारणा बरोबरच त्यांच्या शेतीतही सुधारणा झाली पाहिजे. हा महात्मा फुले यांचा चौफेर दृष्टिकोन होता. शेतीचा विकास होण्यासाठी शेती सुधारण्यासाठी, शेती संबंधीचे अधिक ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. असे काही उपाय महात्मा फुले यांनी शेती सुधारण्यासाठी सुचविले. त्यांच्या या विचारावरून शेती विज्ञाननिष्ठ असावी, असे महात्मा फुले यांनी शेती सुधारण्यासाठी सुचविले. टेकड्यावर तलाव बांधावे, नद्यांवर धरणे बांधावीत, हाडे, राख, शेण वाहून जावू नये, याची उपाययोजना करावी तसेच नदीचे पाणी विहिरीत साठवून ते फळबागासाठी आणि शेतीसाठी उपयोगात आणावे, जमिनीची धूप जाऊ नये, म्हणून उपाय करावेत. शेतकऱ्यांना विहीर खणण्यासाठी सरकारने आर्थिक मदत करावी, तलाव, विहीर, नदी यांचा गाळ सरकारने काढून द्यावा, वृक्ष तोडले जावू नयेत, शेळ्यांच्या लेंढ्याचा उपयोग खतासाठी करावा, शेतकऱ्यांसाठी शेती प्रदर्शने भरवावीत, शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल केला जातो. त्याचा उपयोग त्याच्या मुलांच्या शिक्षणासाठी व्हावा, शेतीच्या पद्धतीत व शेतीच्या अवजारात आधुनिकता आणावी, शेतकऱ्यांना सावकाराच्या तावडीतून सोडविण्यासाठी सरकारने कायदा करावा, असे अनेकविध उपाय महात्मा फुले यांनी सुचविले होते. त्यांच्या शेती सुधारणाविषयक विचारात वैचारिकदृष्टी होती. शेतकऱ्यांच्या प्रगतीची तळमळ होती. याचा प्रत्यय त्यांच्या शेतकरी व शेतीविषयक विचाराचे सखोल चिंतन त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून प्रकट झाले आहे. त्यांचे हे चिंतन आजही महत्त्वाचे आहे.

**समारोप**

महात्मा फुले यांच्या वाङ्मयातील शेतकरी व शेतीविषयक विचारांचा वेध प्रस्तुत ठिकाणी घेण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा फुले हे कृतीशील विचारवंत व समाज सुधारक असल्याने त्यांच्या वाङ्मयातून सामाजिक विचार व्यक्त होणे स्वभाविकच ठरते. समाजातील दुर्बल, पारंपरिक व्यवस्थेने गुलाम बनविलेल्या उपेक्षित अशा या वर्गाच्या सद्य:स्थितीचे, त्यांच्या हाल-अपेष्टांचे, दुर्दशेचे चित्रण महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड' इत्यादी आपल्या वाङ्मयीन कृतीतून केलेले आहे. त्यांचे सर्वच लेखन अत्यंतिक पोट तिडकीतून झालेले असल्यामुळे त्यांच्या या लेखनाला धार आलेली आहे.

महात्मा फुले यांच्या काळात आणि तत्पूर्वीही शेतीचा विचार फारसा कोणीही केलेला नव्हता. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड'मध्ये प्रथमच शेती आणि शेतकरी यांच्याविषयी विचार करून उन्नतीचे मार्गही सांगितले आहेत. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्यांच्या कारणांचा शोध घेऊन अज्ञान, त्यांची होणारी लुबाडणूक, शेतजमिनीचे पाडणारे तुकडे याचाही उल्लेख केला आहे. त्यावर इंग्रज सरकारने शेती सुधारणेसाठी काही उपाय करावेत, ते उपायही फुले यांनी सांगितले आहेत. यामुळे त्यांचे हे चिंतन आजही महत्त्वाचे वाटते. महात्मा फुले यांच्या वाङ्मयातून मांडलेल्या सामाजिक विचारांना त्यांची समाज चिंतनाची बैठक आहे. सूक्ष्म आणि चौफेर समाजनिरीक्षणातून प्रत्यक्ष अनुभवातून महात्मा फुले यांचे समाजचिंतन झालेले असल्यामुळे या विचारांना वास्तवतेचा आधार प्राप्त झालेला आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

१) कीर धनंजय व मालशे स. ग. (संपा.) 'महात्मा जोतीराव फुले, समग्र वाङ्मय', म. रा. सा. स. मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती १९८१
२) फडके य. दि. (संपा) 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', म.रा.सा. आणि सं. मंडळ,मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९१

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

## ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्य

**श्री. एम. वाय. पोवार**
श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स
कॉलेज, माळवाडी–कोतोली,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

---

१९७० च्या आसपास महाराष्ट्रातील वातावरण आणि वाङ्मयीन क्षेत्रातील पर्यावरणात क्रमाक्रमाने बदल होऊ लागला. आत्तापर्यंत दलित साहित्याचा प्रवाह नावारुपाला आलेला होता. दलित साहित्याचे वेगळेपणही लक्षात येऊ लागलेले होते. अशा परिस्थितीत आणखी दोन चळवळीला प्रारंभ झालेला दिसतो. ग्रामीण साहित्य आणि स्त्री वादी साहित्य या त्या दोन चळवळी होत.

म. फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. त्या काळात या वेगळ्या साहित्याची दखल घेतली गेली नसली तरी १९२० नंतरच्या ग्रामीण साहित्याची मात्र बऱ्यापैकी दखल घेतली गेली होती. नाविण्याचा भाग म्हणून असेल, अगर चांगले लेखन म्हणून असेल त्या त्या साहित्याची प्रासंगिक म्हणून का होईना दखल घेतली गेली होती. किंबहुना असे म्हणता येईल की, निदान या साहित्याच्या विरोधात तरी कुणी बोलत नव्हते. परंतु १९७० नंतर ग्रामीण साहित्याच्या, चळवळीच्या भाषा सुरू झाली आणि एकूण मराठी साहित्य ग्रामीण चळवळीच्या ग्रामीण साहित्याच्या बाबतीत प्रतिकूल अभिप्राय नोंदवू लागले. प्रकट–अप्रकटपणे या साहित्य चळवळीच्या विरोधी सूर लावू लागली. असे का झाले असावे, याचीही काही मिमांसा करता येऊ शकते. एक तर १९७० पूर्वीचे ग्रामीण साहित्य आणि इतर साहित्य यांच्या प्रेरणा आणि स्वरूप यामध्ये फारसे अंतर नव्हतेच. म्हणजे फडके, खांडेकर माडखोलकर यांच्या प्रेरणा रंजकाच्या होत्या, तर ठोकळ दिघे यांच्या साहित्याचे स्वरूप रंजनपर होते किंवा पुढे नवकथेच्या काळात प्रयोगशीलता, मनोविश्लेषण इत्यादी बाबी नागर कथेन कशा महत्त्वाच्या होत्या, त्याप्रमाणेच ग्रामीण साहित्यातही महत्त्वाच्या ठरल्या. याचा अर्थ एवढाच की, प्रस्थापित लेखनाचे संकेत आणि प्रस्थापित अभिरूची यांचे आणि ग्रामीण साहित्य प्रवाहांचे संबंध परस्परपुरक होते. त्यामुळे या काळातील साहित्यासंबंधी प्रतिकूल भूमिका घेण्याचे काही कारण नव्हते आणि अशी प्रतिकूल भूमिका घेतलीही गेली नाही. परंतु ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाल्याबरोबर अशी प्रतिकूल भूमिका घेतली जाऊ लागली. त्याचे कारण उघडच आहे आणि ते म्हणजे प्रस्थापित अभिरूचीशी काही एक संघर्षाची भूमिका ही चळवळ घेऊ पहात होती. विशेषतः स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागातून जन्मलेली पिढी आता लिहू वाचू लागली होती आणि तिला आपला गाव, गावातील माणसे आणि त्यांचे वास्तव भोवतीच्या ग्रामीण साहित्यात कुठेच नाही असे वाटत होते. ज्या ग्रामीण जीवनाचा म. गांधी यांच्या काळात गौरव केला गेला होता ते ग्रामीण जीवन तर भोवती कुठेच नव्हते. ग्रामीण जीवनाचे, ग्रामीण कृषिकेंद्रितेचे स्वरूप संपूर्णतः बदलून गेलेले होते आणि त्या लेखकाला वाटत होते की, जे वास्तव आपण अनुभवले त्या वास्तवाचे स्वरूप उलगडून पहावे त्या वास्तवामागे असणाऱ्या वास्तवाचा शोध घ्यावा. जीवनामध्ये जेव्हा जेवहा काही परिवर्तने होतात अगर जीवनामध्ये काही असंतोष निर्माण होतो, तेव्हा तेव्हा वाङ्मयीन जगतामध्ये चळवळीची भाषा सुरू होते. मध्ययुगीन सांप्रदायिक चळवळीपासून आजतागायत झालेल्या चळवळींचा इतिहास जर पाहिला तर असे लक्षात येते की, ज्या वाङ्मयीन चळवळींची पाळेमुळे समाजात असतात, त्याच चळवळी अर्थपूर्ण होतात, टिकतात आणि वाढतात. जसे वारकरी चळवळ आजतागायत टिकून आहे; परंतु दत्त संप्रदाय अगर लघु नियतकालिकांची चळवळ कोलमडून पडल्या. कारण मर्यादित हेतूने केलेल्या चळवळी टिकत नाहीत. याचा अर्थ असा की, ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरू झालेली असेल तर त्याची कारणे तत्कालीन सामाजिक जीवनात असणार हे उघड आहे.

साधारणपणे १९७१ ते १९७४ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळत होता आणि त्यामुळे नव्याने शिकलेली ग्रामीण भागातील नवी पिढी अधिक अंतःर्मुख झाली होती. ज्या कृषिव्यवस्थेचा गौरव केला जातो. तिचे तर धिंडवडे निघालेलेच होते. हे एक तात्कालिक असे कारण असले तरी यानिमित्ताने लेखक जागरुक झाला. महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ आणि शहरांच्या समृद्धीमध्ये मात्र कणभरही उणीव नाही, हे एक नवेच वास्तव त्याला जाणवायला लागले. याशिवायही ग्रामीण भागात विविध प्रश्न निर्माण होऊ लागले होते. जमिनीचे छोटे–छोटे तुकडे, सुशिक्षित बेकारी, नवी बी–बियाणे, नवी खते असे असंख्य नवे प्रश्न उपस्थित होत होते. निवडणुका तर होतच होत्या. अशा या सगळ्या प्रश्नांनी भोवंडून गेलेला शेतकरी हा या नव्या लेखकांच्या चिंतनाचा विषय बनला. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे खेडी ओस पडण्याची प्रक्रिया कधीच सुरू झाली होती. तिने आता वेग घेतला ही बाबही नव्या लेखकांच्या दृष्टीने चिंतेची आणि चिंतनाची होती. ग्रामीण भागात असंतोषाला प्रारंभ झाला होता आणि त्याची धग चळवळ करू इच्छिणाऱ्या नव्या लेखकांना जाणवत होती.

म. फुले यांनी शेतकऱ्यांचा असूड हा ग्रंथ लिहिला तेव्हापासून महाराष्ट्राच्या आणि भारताच्याही ग्रामीण भागात असंतोषाला प्रारंभ झालेला होता. ग्रामीण भागत अनेक प्रश्न निर्माण होत होते. त्यांचे काही उद्रेकही झालेले होते. महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकामध्ये ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांनी उठाव केले होते. डेक्कन रॉयटस या नावाने ते ओळखले जातात. प्रामुख्याने सावकारशाही विरूद्ध हे उठाव होते. शेतकऱ्याचा असूड निर्माण होण्याचे हेही एक कारण होते. त्याकाळी संपूर्ण भारतभर उठाव झालेले दिसतात. १९४७ ते १९४९ या काळात जमीनदार आणि कुळे यांच्यातील संघर्ष उत्तर प्रदेशात झाला. १९४६ ते १९४७ मध्ये महाराष्ट्रातील वारली समाजाचा लढा महत्त्वाचा आहे.

१९४६ ते १९५० या कालावधीत बंगालमध्ये तिभागा चळवळ कुळांचीच झाली होती. याच कालखंडात तेलंगाना आंदोलन झाले. त्रिपूरा, मणिपूर या भागातही शेतकरी आंदोलन पेटले होते. दुष्काळ हे जसे या चळवळीला तात्कालिक कारण झाले असे म्हटले आहे त्याप्रमाणेच आणखी एक कारण घडलेले आहे ते म्हणजे शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचे आंदोलन साधारण १९७२ ते १९७३ नंतर शेतकरी संघटना शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे, यासाठी लढे देऊ लागली. त्याबरोबरच भारत आणि इंडिया यामध्ये आपला देश विभागला आहे असे त्यांनी सांगावयास प्रारंभ केला. अंतिमतः शरद जोशी उजव्या दिशेला झुकले याबाबतीत त्यांच्याशी मतभेद असले तरी त्यांनी केलेल्या लढ्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात एक नवीन जागृती झाली. या लढ्यामुळे ग्रामीण साहित्याच्या चळवळीला काही आधार प्राप्त झाला. १९७०–१९७५ नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ करू इच्छिणाऱ्या लेखकांनी आपल्या भोवतीच्या वास्तवाचा अन्वयार्थ लावण्यासाठी आपले नाते म. फुले यांच्याशी जोडले. ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करण्यामध्ये ज्यांचा वाटा आहे, त्यात रा.रं.बोराडे आणि आनंद यादव हे प्रमुख आहेत. रा. रं. बोराडे त्यांच्या वैजापूर येथील महाविद्यालयात ग्रामीण आत्मकथनांची शिबिरे अनेक वर्षे भरवीत होते. त्यातूनच 'रानखळगी' सारखे भीमराव वाघचौरे यांचे आगळेवेगळे आत्मकथन साकारले. आनंद यादवांनी स्वतंत्र संमेलने भरवून ग्रामीण साहित्याचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीनंतर एक मोठी लेखकांची पिढी आकाराला आलेली आहे. त्यांचा सामाजिक स्तरही आधीच्या लेखकांपेक्षा वेगळा आहे. आधीचे ग्रामीण लेखक उच्चभ्रू वर्गातील होते. पण आज लेखन करणारे समाजातील वेगवेगळ्या वर्गातून आलेले आहेत. त्यामध्ये भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, रविंद्र शोभणे, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, शेषराव मोहिते, तानाजी राऊ पाटील, मोहन पाटील, आनंद पाटील, कृष्णात खोत असे कितीतरी ग्रामीण लेखक–कवी आज लिहित आहेत. या लेखकांचे लेखन एकूण परंपरांचा आणि समाजव्यवस्थेचाही अर्थ शोधू पाहते आहे. आपल्या वाट्याला आलेल्या दुय्यम स्थानाचा ते शोध घेऊ पाहत आहेत. 'विषवृक्षाच्या मुळ्या', 'बुढाई', 'बस्तान', 'लिगाड आणि खांदे पालट', 'इंजाळ', 'हल्या हल्या दुदूदे', 'नवी वारूळ', 'जांभळ ढव्ह', 'पीकपाणी', 'बळीवंत', 'गावठाण' अशा काही कलाकृती पाहिल्या की, ग्रामीण जीवनाच्या उपक्षेची पाळेमुळे भांडवलदारी अर्थव्यवस्थेत आहेत हे लेखकाला मांडावयाचे आहे. हा अर्थव्यवस्थेचा हल्या दूध काही देत नाही याचा अनुभव बाबाराव मुसळे मांडताहेत. सहकारामुळे उद्धार होण्याऐवजी शोषणच वाढले आहे. याचा अनुभव वासुदेव मुलाटे देऊ पाहतात. शहरांचे खेड्यावर होणारे आक्रमण मोहन पाटील यांच्या 'बस्तान' मध्ये आणि प्रतिमा इंगोले यांचे 'बुढाई' मध्ये अर्थपूर्ण होऊन येते. शतकानुशतकांपासून लुटला गेलेला 'बळीवंत' श्रीकांत देशमुख काव्यात्म करतात, तर ग्रामीण भावबंध इंद्रजित भालेराव प्रकट करीत आहेत. धरणग्रस्तांच्या वाट्याला येणारी ससेहोलपट 'झाडाझडती' मधून प्रकट होते. तसेच विश्वास पाटील यांची 'पांगिरा' सदानंद देशमुख यांची 'तहान' यासारख्या कादंबऱ्यामधून ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न कसा तीव्र होतो हे दिसते. भास्कर चंदनशिव यांच्या 'अंगारमाती', 'बिरंड', 'नवी वारूळ' या काव्यसंग्रहातून ग्रामीणांच्या वाट्याला येणारे दुःख आणि दारिद्र्य कोणामुळे आणि का येते आहे? हा प्रश्न उभा करतात. आजचे ग्रामीण लेखक म. फुले यांच्याशी नाते सांगत हाच प्रश्न अधिकाधिक ठसठशीतपणे उभा करीत आहेत.

**संदर्भ :**

१) मुलाटे वासुदेव – ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा
२) पाटील मोहन – ग्रामीण साहित्य आणि संस्कृती
३) नलगे चंद्रकुमार – ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास
४) कोत्तापल्ले नागनाथ – ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

## मराठी कविता व नाटकाचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**प्रा. महादेव ज.जाधव**
मराठी विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

---

**प्रस्तावना –**

राष्ट्र म्हणजे भौगोलिक सीमांनी बंदिस्त केलेला एक विशिष्ठ प्रदेश असे न म्हणता राष्ट्र ही एक व्यापक अशी संकल्पना आहे. 'समान भाषा, समान संस्कृती, समान विचार यावर आधरित जगण्याची पध्दती घेऊन एका मर्यादित भौगोलिक प्रदेशामध्ये वास्तव्यास असलेला लोक समुह म्हणजे राष्ट्र' अशी व्याख्या ठोबळमनाने करता येईल. यामध्ये राष्ट्र ही लोक समुहाची ओळख किंवा अस्मिता असते प्रत्येक व्यक्तिला आपल्या राष्ट्राविषयी प्रेम, आपूलकी, निष्ठा असते. तर राष्ट्र सुध्दा प्रत्येक व्यक्तिचा सर्वांगिण विकास करण्यासाठी कटिबध्द असते. व्यक्ति–व्यक्ति मिळून राष्ट्र बनते तर या व्यक्ति आपल्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी, उध्दारासाठी, विकासासाठी जे कार्य करते त्याला राष्ट्र उभारणीचे कार्य असे म्हटले जाते. प्रत्येक राष्ट्र हे आपल्या राष्ट्रातील व्यक्तिचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करत असते तर प्रत्येक व्यक्ति आपले राष्ट्र उभारणीचा प्रयत्न आपआपल्या परीने करत असते. व्यक्तिचे जीवनमान उंचावण्यासाठी समाजातील अनिष्ठ प्रथा काढून टाकणे, अन्याय अत्याचाराचे उच्चाटन करणे, नवीन प्रगत विचार देणे, देश सेवेचे, निष्ठेचे धडे शिकविणे. आपल्या लोक समुहाचे इतरांपासून संरक्षण करणे तसेच त्यांना चांगले शिक्षण, आरोग्य, न्याय देण्याचे कार्य राष्ट्र करत असते. सदर कार्याला राष्ट्र उभारणीचे कार्य असे म्हणता येईल.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. समाजातून राष्ट्राची निर्मिती होत असते. मराठी साहित्यामध्ये कविता व नाटक या वाड.मय प्रकाराने समाज बदलण्यासाठी, समाजाची प्रगती होण्यासाठी म्हणजे पर्यायाने राष्ट्र उभारणीसाठी महत्वपूर्ण साहित्याची मांडणी केलेली दिसते.

मराठी कवितेचे राष्ट्र उभारणीतील योगदान

मराठी कवितेचा विचार करता प्राचीन काळापासून निर्माण झालेल्या संत साहित्यांने अज्ञान, अंधश्रध्दा, परकीय आक्रमणातून संस्कृतीवर झालेले अतिक्रमण रोखण्यासाठी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदासापासून संत गाडगेबाबा ते संत तुकडोजीपर्यंत आपल्या अभंगाच्या माध्यमातून कार्य केलेचे दिसते. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून अखिल मानव जातीचे कल्याण; तर अभंगाच्या माध्यमातून मानवाच्या जीवनामधील अन्याय, अत्याचार दूर करुन समाजाच्या उध्दारासाठी कार्य केलेचे दिसते.

संत साहित्यानंतर खऱ्या अर्थाने राष्ट्रासाठी केवळ देशभक्तीने प्रेरित होऊन काव्याची उपासना वि.दा. सावरकर यांनी केली. सावरकरांच्या मते ही स्वतंत्रता देवी म्हणजे राष्ट्राच्या नितिची, संपदेची चैतन्याची मूर्तीच होय. त्यामुळेच ते म्हणतात.

*तुचसाठी मरण ते जनन ।*
*तुजसाठी जनन ते मरण ।*

टिळक व महात्मा गांधी यांनी केलेल्या राष्ट्रीय जागृतीचे पडसाद ही मराठी कवितेवर उमटलेले दिसतात. नाशिकचे कवी गोविंद यांच्या कवितेत देशप्रेमाचे मोठे विलोभनीय दर्शन दिसते. मेळयातील पदे लिहून या स्वातंत्र्य शाहिरांनी मराठी कवितेस देशभक्तीचा अलंकार समर्पण केला. देशभक्तीने भारावलेल्या राष्ट्रवृत्तीची जोपासना करणारी कविता गोविंदांच्या मुखातून स्त्रवली 'प्रभू रामरायाची प्रार्थना','श्री रामदासाची आरती', 'टिळकांची भूपाळी', 'शिवाजी', 'नरविर तानाजी यांच्या स्त्रीचा वीरोचित विलाप', 'स्वातंत्रतेचा प्राण', 'स्वातंत्र्याचा पाळणा', 'स्वातंत्र्य लक्ष्मीस्तव', 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले','भारत प्रशस्ती' इत्यादी कवितांनी मराठी कवितेच्या इतिहास मानाचे स्थान मिळविले.

दुर्गादास आत्माराम तिवारी यांची देशभक्तीची स्फुट कविता 'मराठयांची संग्रामगीते', 'झाशींचे संग्रामदेवता', अशा काव्यसंग्रहात एकत्रित झाली. राष्ट्रीय विषयांवर माधव केशव काटदरे उर्फ कवी माधव यांनी आपल्या 'शनिवार वाडयापुढे','तारापूरचा संग्राम','पानपतचा सूड', 'मस्तानी', 'गोकलखाँ बापू', अशा अनेक कवितांमुळे ते मान्यता पावले. मुलांना 'गोड गोष्टी' सांगून रंजविणारे पांडूरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी हे या राष्ट्रीय परंपरेतील एक नावाजलेली कवी होत. साने गुरुजीच्या स्फुट कवितेला एक सहज उमाळा व कोवळेपणा प्राप्त झाला आहे.

*आम्ही मांडू निर्भय ठाण*
*स्थार्याची करुणी होळी*
*छातीवर झेलू गोळी*

या त्यांच्या ओळी त्या काळात घरोघरी व युवकांच्या पथकांतून म्हटल्या जात असत. आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांच्या आनंदगीता मधील अनेक कविता राष्ट्रभक्तीने भारावलेल्या आहेत. ना.के. बेहरे यांच्या 'मोत्यांची माळ' या कविता संग्राहातील राष्ट्रीयवृत्तीच्या अनेक कविता आहेत.

या बरोबर सेनापती बापट, य. ख. कुलकर्णी, त्र्यं.य.घाटपुरे, मो.वि.जोशी, रा.बा.नाबर, गो.रा. हिंगणेकर, गं.रा. साने अशा आणखीही कवींनी या काळात राष्ट्रीयवृत्तीची कविता लिहिली. पांडूरंग दत्तात्रेय खाडिलकर, रंगनाथ विष्णू खाडिलकर, अ.ब. कोल्हटकर, ब.ग. खापर्डे, रं.वि. खानविलकर, गं.वि. गोखले, दासगणू, म.ना. नानिवडेकर, सि.ब. मुचाटे, हैदर लहरी, वि.गो. साठे, श्री.य.सोनाळीकर, सोपानदेव, न. शे. पोहनेरकर अशा अनेक शाहिरानी जुन्या पोवाडयाची परंपरा टिकवून राष्ट्रीयवृत्तीची चांगली जोपासना केलेली दिसते. आपल्याा कवितेच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी वरील कवींनी मोलाचे कार्य केलेचे दिसते.

**मराठी नाटकाचे राष्ट्र उभारणीसाठी योगदान –**

मराठी नाटयसुष्टीनेही आपले महत्वपूर्ण योगदान राष्ट्र उभारणीकामी दिले आहे. किर्लोस्कर देवल यांच्याप्रमाणेच आपल्या थोर नाटयकृत्तीनी मराठी रंगभूमी गाजविली ती कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी हिंदुस्थानातील राजकीय चळवळीतील संघर्ष आपल्या नाटकातून मांडलेला दिसतो. अशा राष्ट्रीयवृत्तीच्या क्रियाशील लेखकाची एकूण पंधरा नाटके रंगभूमीस मिळाली. पौराणिक नाटकाची जुनीदृष्टी बदलून ती नव्या काळास अनुसरुन हेतूनिष्ठ बनविण्याचे कार्य खाडिलकरांनी केले. त्यांचे 'किचकवध' हे नाटक पौराणिक असले तरीही समकालीन कर्झनशाहिच्या संदर्भात फार मोठा प्रक्षोभ निर्माण करणारे ठरले. आपल्या नाटकातून राजकीय परिस्थितीवर भाष्य करुन देशभक्तीची प्रेरणा देण्यास खाडिलकर समर्थ ठरले. एक समर्थ नाटककार म्हणून खाडिलकरांच्या या नाटकाने कीर्ती प्राप्त करुन दिली. त्याचे हे नाटक अर्थातच त्यावेळच्या सरकारनेही जप्त ही केले.

राम गणेश गडकरी यांनी 'गर्वनिर्वाण' हे अपूर्ण नाटक लिहिले. साहित्याच्या विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटविणारे एक थोर क्रांतीकारक विनायक दामोदर सावरकर यांनीही आपल्या तत्वांच्या प्रचारासाठी 'उःशाप','संन्यस्त खड्ग', 'उत्तरक्रिया' अशी नाटके लिहिली. नाटयगुणापेक्षा या नाटकातील विचारसणी,तत्वचिंतन, सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा यांना अधिक महत्व होते.

खाडिलकरांप्रमाणेच ज्यांनी राजकारणात रस घेऊन नाटय निर्मिती केली असे एक नाटककार म्हणजे वीर वामन जोशी हे होते. 'राक्षसी महत्वकांक्षा', 'रणदुंदुभी','धर्मसिंहासन','झोटींग पादशाही','शीलसंन्यास' यापैकी पहिली दोन विशेष गाजली.

वासुदेव रंगनाथ शिरवळकरांनी 'अस्मानी सुलतांनी अथवा पानपतचा मुकाबला' व वि.त्रिं. मोडक यांनी लिहिलेली 'रांणा भीमदेव' ही नाटके इतकी गाजली की, जोरदार भाषा, आवेशपूर्ण दणदणीत आवाज, स्वदेशाचा उत्कट अभिमान इत्यादी विशेषांमुळे अशा दणकेबाज नाटकांना राणा भीमदेवी नाटके म्हणण्याची चाल पडली.

भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांनी ही राजकीय समस्या आपल्या नाटकातून मांडल्या. अशा प्रकारे वरील सर्व नाटककारांनी आपल्या राजकीय नाटकातून समस्या मांडत आपल्या अभिव्यक्तीव्दारे राष्ट्र उभारणीचे महत्वपूर्ण कार्य केले हे मान्य करावे लागते.

**निष्कर्ष**

१) राष्ट्र उभारणीसाठी मराठी साहित्याचे योगदान महत्वपूर्ण आहे.
२) मराठी कवितेने राष्ट्र उभारणीकामी आपल्या काव्याच्या माध्यमातून महत्वाचे कार्य केलेले दिसते.
३) मराठी नाटकांनी राजकीय समस्यांचे निराकरण व राष्ट्रभक्ती निर्माण करण्यासाठी नाटक या वाड.मय प्रकाराचा अतिशय योग्य वापर केला आहे.

**संदर्भ :**

१) प्र.न. जोशी– मराठी वाड.मयाचा विवेचक इतिहास– अर्वाचिन काळ, स्नेहवर्धन प्रकाशन– पूणे सुधारित आवृत्ती –२००९.
२) ल.रा. नशिराबादकर– प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन–कोल्हापूर,दहावी आवृत्ती–२०१०
३) प्राचार्य डॉ. वसंत बिरादार–आधुनिक मराठी वाड.मयाचा इतिहास–कैलास औरंगापूरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती–२०१४
४) (संपा.)प्राचार्य रा.,तु.भगत– संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मूलन, चैतन्य प्रकाशक, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती–२०१२

## राष्ट्रबांधणीत समाजसुधारकांच्या साहित्याचे योगदान

**सहा.प्रा. रेखा काशिनाथ पसाले**
कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्याल,इस्लामपूर

**प्रस्तावना–**

भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर अगदी काही काळातच इथल्या समाजजीनावर त्याचे पडसाद उमटण्यास प्रारंभ झाला आणि भारतीय इतिहासात एका नव्या विचारप्रवाहाची सुरूवात झाली. महाराष्टांमध्ये १८१८ नंतर म्हणजेच पेशव्यांच्या पराभवानंतर ब्रिटिश सत्ता स्थिर झालेली पहावयास मिळते. हळूहळू भारतीय समाजाला पाश्चिमात्त्य संस्कृतीचा, साहित्याचा, भौतिक प्रगतीचा, आचारविचाराचा एक आगळावेगळा असा अनुभव येऊ लागला. या अनुभवातूनच भारतीय समाजाच्या सर्वांगीण जीवनावर खोलवर असा परिणाम होण्यास प्रारंभ झाला आणि त्यातूनच सामाजिक सुधारणेच्या चळवळीला महाराष्ट्रात गती मिळाली. महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता स्थिर झाल्यानंतर त्यांनी समाजला शिक्षण देण्याचेही कार्य हाती घेतले. त्यांनी शिक्षण प्रसाराला चालना दिली. त्यातूनच त्यांनी महाराष्ट्रात विविध शैक्षणिक संस्था स्थापन केल्या, यामध्ये मिशनऱ्यांचे कार्य महत्त्वपूर्ण होते असे म्हणावे लागेल.

शिक्षणाच्या प्रचार आणि पसारामुळे महाराष्ट्रामध्ये नवशिक्षित तरूणांची एक नवी पिढी उदयास आली पाश्चिमात्त्य संस्कृती, त्यांची झालेली भौतिक प्रगती, उदारमतवाद, स्वातंत्र्य, मानवतावाद, समानता सारख्या आधुनिक विचारांचे ज्ञान महाराष्ट्रातील नवशिक्षित तरूणांना झाले. नवविचार आत्मसात केलेल्या तरूणांनी आपल्या सामाजिक आणि धार्मिक जीवनाकडे डोळसपणे पहावयास सुरूवात केली यातून समाजातील जातीपातीच्या खोलवर रूजलेल्या शृंखला, मानवी हक्कापासून वंचित राहिलेला समाज, शिक्षणावर असलेली विशिष्ट वर्गाची मक्तेदारी, अनिष्ठ रूढी परंपरा, समाजातील स्त्रियांची दयनीय स्थिती आणि त्यांच्यावरील अनिष्ट अशी बंधने अशा प्रकारची समाजातील परिस्थितीची जाणीव नवशिक्षित तरूणांना प्रथम झाली, आणि यामधून सामाजिक सुधारणांना गती मिळाली असे म्हणावयास हरकत नाही. समाजात बुद्धिप्रामाण्यापेक्षा ग्रंथप्रामाण्याला अधिक महत्त्व मिळाले होते. धार्मिक आचारामध्ये विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. समाजमनावर अंधश्रद्धेचे वर्चस्व होते. यामुळे समाज अधोगतीकडे वाटचाल करीत होता. त्यामुळे सामाजिक आणि नैतिक अधःपतनाच जाणीव झालेल्या नवशिक्षित तरूणांना समाजात परिवर्तन घडवून आणने गरजेच वाटू लागले आणि त्यातूनच समाजसुधारणेची तळमळ असलेला तरूणांचा एक नवा वर्ग उदयास येऊ लागला. त्यामध्ये महात्मा फुले, जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी, भाऊ दाजी लाड, महर्षी वि.रा.शिंदे, न्या. रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर इत्यादी समाजसुधारकांचे कार्य महत्त्वपूर्ण असे आहे. देशाच्या नव्या निर्मितीमध्ये उपरोक्त सर्व समाजसुधारकांचा मोलाचा वाटा आहे. उपरोक्त सुधारकांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहचावेत यासाठी साहित्याचा आधार घेतला आणि समाजाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत ठिकाणी महाराष्ट्रातील काही समाजसुधारकांनी देशबांधणीमध्ये साहित्याच्या माध्यमातून दिलेल्या योगदानाचा विचार केला जाणार आहे.

**समाजसुधारकांचे साहित्यिक योगदान–**

समाजसुधारणा घडविण्यासाठी, परिवर्तनाचा नवा विचार देण्यासाठी समाजसुधारकांनी लेखनीचा वापर केला. आपल्या लेखनीद्वारे समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरांवर टिका करण्यास प्रारंभ केला आणि आपल्या कार्याला कृतीची जोड दिली. समाजसुधारक प्रारंभी वृत्तपत्रांकडे आणि ग्रंथलेखनाकडे वळले. निरनिराळी वृत्तपत्रे आणि ग्रंथांमधून विचार स्वातंत्र्याचा उपयोग योग्य पद्धतीने केला. आपल्या लेखनामधून अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी यावर टिका तर केलीच पण समाजाला नवविचारांचे ज्ञानही दिले. आपल्या साहित्यामधून स्त्रियांच्या समस्या, विधवांचे प्रश्न, शेतकरी, कष्टकरी वर्गाचे होणारे शोषण, अस्पृश्यांची होणारी दयनीय स्थिती यावरती भाष्य केले.

अंधारात चाचपडणाऱ्या समाजाला नवा प्रकाश देणारे आधुनिक महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक म्हणून ***बाळशास्त्री जांभेकर*** यांना ओळखले जाते. मराठी वृत्तपत्राचे जनक, इतिहास संशोधक आणि विचारवंत अशी ओळख बाळशास्त्री जांभेकरांची महाराष्टांला आहे. वृत्तपत्र ही जनजागृतीसाठीचे प्रभावी माध्यम आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यातूनच त्यांनी ***दर्पण*** हे मराठीतील पहिले साप्ताहिक सुरू केले. समाजाच्या विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी त्यामधून मांडले. स्त्री शिक्षण, पाश्चात्त्य ज्ञान, विधवा विवाह इत्यादींचा पुरस्कार त्यांनी सदर साप्ताहिकांमधून केला. सरकारच्या अन्यायी धोरणाविरूद्ध टिका केली. विज्ञानाचा समाजामध्ये प्रसार करण्याच्या हेतूने पुढे १८४० मध्ये त्यांनी ***दिग्दर्शन*** नावाचे मराठी मासिक सुरू केले. साहित्यिक गुण, विद्वता आणि अनेक विषयांचा गाढा अभ्यास यामुळे जांभेकरांनी इतिहास, धर्म तत्त्वज्ञान, व्याकरण, विज्ञान इत्यादी विषयांवर ग्रंथ लिहिले. भारतीय शिलालेख आणि ताम्रपटांचे संशोधन व वाचन करून अनेक निबंध लिहिले. त्यामुळे त्यांना आद्य इतिहासकार म्हणूनही ओळखले जाते. **ज्ञानेश्वरीचे पाठभेदांसह केलेल संपादन** हे त्यांचे महत्त्वाचे साहित्यिक योगदान होय. त्याबरोबरच ***बाल व्याकरण हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास, हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा इतिहास, इंग्लडचा इतिहास*** इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथही त्यांनी लिहिले. जांभेकरांनी आपल्या साहित्यामधून समाजसुधारणेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असे विचार मांडलेले दिसतात.

महाराष्ट्राच्या सुधारणा चळवळीतील दुसरे महत्त्वाचे समाजसुधारक म्हणजे **दादोबा पांडुरंग तर्खडकर**. समाजसुधारणेसाठी तर्खडकरांनी लेखणीचा वापर केला. त्यांना साहित्यिक दृष्टी चांगली होती. त्यांनी ***मराठी भाषेचे व्याकरण, मराठी नकाशाचे पुस्तक, यशोदा पांडुरंगी,***

***पारमहंसिक ब्राह्मधर्म, आत्मचरित्र, शिशुबोध*** इत्यादी ग्रंथ लिहिले. एकूणच साहित्यामध्ये सहृदयता, चिकित्सक बुद्धी, बहुश्रुतता याचे दर्शन होते. मराठी भाषेत टिकेचा अपूर्व प्रकार त्यांनी प्रथम सुरू केला. भाषेबद्दल तर्खडकरांना अपार प्रेम होते. भाषेची कोंडी विचारात घेऊन शास्त्रशुद्ध व्याकरण व्याकरण लिहून मराठी भाषेच्या उद्धाराचे मोठे कार्य केले. त्यामुळे त्यांना मराठी भाषेचे पाणिनी म्हणूनही ओळखले जाते. **भाऊ दाजी लाड** यांचे समाजसुधारणेबरोबर वाङ्मयीन कार्यही मोलाचे आहे **कालिदासाचा कालनिर्णय, शकांचे हल्ले** इत्यादीबाबतही त्यांनी ग्रंथामधून चिकित्सक अशी मांडणी केली आहे. जैन धर्माची परंपरा, जैन पट्टावतीचा कलानुक्रम, हेमाद्रीचा काल इत्यादी विषयावरही महत्त्वपूर्ण असे संशोधनपर ग्रंथ लिहिले.

***गोपाळ हरी देशमुख*** उर्फ ***लोकहितवादी*** हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे विचारवंत म्हणून ओळखले जातात. आपल्या साहित्याच्या माध्यमातून लोकहितवादींनी सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा, शिक्षण इत्यादीविषयी महत्त्वपूर्ण असे विचार मांडले. लोकहितवादी जसे समाजसुधारक होत तसे उत्तम साहित्यिकही होते. आपल्या लेखनाच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी तळटिपा, प्रस्तावना, परिशिष्टे जोडलेली आहेत, त्यामुळे त्यांच्या लेखनातील विवेचक बुद्धिची साक्ष पटते. त्यांच्या साहित्याची भाषा ही सरळ आणि मार्मिक आहे. आपले विचार त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडले. १८४८ मध्ये समाजाला उद्देशून त्यांनी ***शतपत्रे*** लिहिली. सुधारणावादी विचाराच्या दृष्टीने शतपत्रे महत्त्वाची आहेत. शतपत्रामध्ये राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक विषयाचा परामर्श घेतला आहे. समाजातील गुंतागुंतीच्या प्रश्नाचा उहापोह त्यांनी शतपत्रातून मांडला. भाषेतील साधेपणा आणि सरळपणा यामुळे त्यांचे साहित्य वाचकांच्या अंतःकरणाला भिडते. याबरोबर त्यांनी ***लक्ष्मीज्ञान, हिंदुस्थानास दारिद्र्य येण्याची कारणे आणि परिहार व व्यापरविषयी विचार, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, ग्रामरचना*** यासारखे छत्तिसेक ग्रंथ लिहिले. याशिवाय ***पृथ्वीराज चौहान, स्वामी दयानंद सरस्वती*** यांची चरित्रलेखनही केले.

महाराष्ट्रातील कर्ते समाजसुधारक म्हणून **महात्मा जोतिबा फुले** यांना ओळखले जाते. आधुनिक भारतातील क्रांतिकारी विचार मांडणारे फुले हे समाजसुधारणा चळवळीमधील सोनरी पान म्हणून ओळखले जातात. सामाजिक विषमतेविरूद्ध जोतिबांनी बंड पुकारले. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी संघटन बांधले. गोरगरीबांसाठी रात्रंदिवस राबणारे ते कर्ते समाजसुधारक म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख झाली ते त्यांच्या अफाट अशा कार्यकर्तृत्वामुळेच आपले विचार त्यांना आपल्या ग्रंथसंपदेमधून लोकांपर्यंत पोहचविले. आपले मूलगामी विचार त्यांनी आपल्या छोट्या मोठ्या ग्रंथामधून लोकांसमोर ठेवले. बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी आणि दलितमुक्तीचा प्रसार करण्यासाठी, प्रचार करण्यासाठी त्यांनी ग्रंथामधून विचार मांडले. शेतकरी, कष्टकरी, शुद्र हाच त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यामुळे त्यांची दुःखे वेशीवर टांगण्यासाठी त्यांनी ग्रंथाचे लेखन केले. त्यांच्या ग्रंथातील भाषा अस्सल मराठमोळी वळणाची आहे. फुल्यांची तळागाळातल्या रांजल्या पिचल्या समाजाला आपलीशी वाटणारी होती. ***गुलामगिरी*** या ग्रंथामधून फुल्यांनी सर्वसामान्य लोकांना भोगाव्या लागणाऱ्या आर्थिक, धार्मिक, सामाजिक गुलामगिरीवर परखड असे भाष्य केले आहे. ***शेतकऱ्यांचा असूड*** या ग्रंथामध्ये शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण त्यांनी केले आहे. त्याबरोबरच त्यांच्या या अवस्थेवरती उपायही सूचविले आहेत. ***ब्राह्मणांचे कसब*** या ग्रंथामधे फुल्यांनी स्वार्थी आणि समाजाची फसवणूक करणाऱ्या ब्राह्मणी पाखंडी वृत्तीवर परखड असे भाष्य केले आहे. ***तृतीय रत्न*** या नाटकामध्ये धर्माचा नावावरसर्वसामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या लोकांवर ओरखडे ओढून लोकांना खरे ज्ञान सांगण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथात केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनवरही फुल्यानी लेखन केलेले दिसून येते.त्यांनी आपल्या ग्रंथामधून विविध सामाजिक विषयांना स्पर्श केला आहे. फुल्यांच्या सर्व लेखनामागे तळागाळतील कष्टकरी, दलित, श्रमिक वर्गाचे होणारे शोषण हा मुख्य उद्देश असलेला दिसून येतो. मराठी साहित्यनिर्मितीमध्ये फुल्यांचे साहित्य मोलाची भर घालणारे असे आहे. समाजसुधारणेच्या चळवळीमध्ये फुल्यांचे साहित्यिक योगदान महत्त्वपूर्ण असे आहे असे म्हणावे लागेल.

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे** हे सर्वांगीन सुधारणेचे पुरस्कर्ते होते.रानडे यांनी ***मराठी ग्रंथोत्तेजक मंडळ*** नावाची संस्था स्थापन केली. इतिहास, शास्त्रे, थोर पुरुषांची चरित्रे, धर्म, देशाची सुधारणा इत्यादी अनेक विषयावर त्यांनी ग्रंथ लिहून प्रसिद्ध करणे हा या संस्थेचा मुख्य हेतू होता. ***मराठी सत्तेचा उदय*** या ग्रंथामधून त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाबद्दल पाश्चात्त्य इतिहासकारांच्या विकृत मतांचे खंडन केले आहे. न्या. रानडेंच्या समकालातील परखड समाजसुधारक म्हणजे **गोपाळ गणेश आगरकर** हे होय. आगरकरांनी काही काळ केसरी चे संपादन केल्यानंतर***सुधारक*** हे वृत्तपत्र काढले. इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार हे ब्रीद त्यांच्या लेखनातून जाणवते. आपल्या लेखनामधून त्यांनी समाजातील दुष्ट प्रवृत्तीवर हल्ले चढविले. समाज, धर्म, जातिभेद याबाबात आपले सडेतोड विचार त्यांनी मांडले. बुद्धिवाद, विवेकाचे महत्त्व, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, सत्यप्रियता, ह्या गोष्टी सुधारणेचा पाया आहेत असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांच्या साहित्याची भाषा ही बोचणारी व सडेतोड होती. ***डोंगरीच्या तुरूंगातील १०१ दिवस*** हे पुस्तक त्यांनी महत्त्वाच्या विषयांवर भाष्य करणारे आहे, त्याबरोबरच त्यामध्ये टिळक आगरकर यांच्या मैत्रीचे, मनोमिलनाचे आणि वैचारिक मतभेदाचे चित्रण प्रस्तुत पुस्तकात आले आहे. तसेच त्यांनी शेक्सपिअरच्या हॅम्लेट या नाटकाचे ***विकारविलसित*** असे भाषांतर करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे असे म्हणता येईल.

आपल्या आयुष्यामध्ये मानवी मूल्यांना महत्त्व देणारा समाजसुधारक म्हणजे **कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे**होय. कर्मवीर शिंदे यांची निरीक्षणशक्ती सूक्ष्म, पांडित्यपूर्ण आणि सखोल अशी होती. ***भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न*** हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ होय. या ग्रंथावरून त्या काळातील अस्पृश्यतेसंदर्भातील सर्व माहिती मिळते. अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा मूलगामी असा विचार त्यात मांडला आहे. ***माझ्या आठवणी व***

***अनुभव*** हे आत्मचरित्रही त्यांनी लिहिले. त्यांच्या साहित्यामधून लेखनातील व्यापक दृष्टीकोन, मूलगामी वृत्ती, विचारांचे गांभीर्य तसेच भावनांचे उत्कट दर्शन घडते. भाषेतील सात्विकपणा, सरळपणा वाचकांना आकर्षिक करणारा आहे असे त्यांच्या लेखनाकडे पाहिल्यानंतर लक्षात येते.

आधुनिक भारताचे शिल्पकार, एक युगप्रवर्तक समाजसुधारक म्हणून **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना** सारे जग ओळखते. दलितोद्धारासाठी बाबासाहेबांनी आपले सारे आयुष्य वेचले. आपल्या कृतीला कार्याची जोड दिली. आपले विचार लोकांपर्यंत पोहचविण्याठी लेखनीच्या माध्यमाचा वापर केला. वृत्तपत्रे आणि ग्रंथाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. कारण समाजाच्या विकासाला चालना देणारी ती उपयुक्त साधने आहेत. हे त्यांनी ओळखले होते. आपल्या लेखनातून त्यांनी दलितांवर होणारे अन्याय अत्याचार समाजासमोर मांडले. साहित्याच्या माध्यमातून दलितांना आत्मभान देण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले हे कधीही विसरून चालणार नाही. स्वातंत्र्य समता, न्याय, बंधुता, हे विचार त्यांनी साहित्यामधून मांडले. आपल्या कार्याची भूमिका लोकांना स्पष्टपणे कळावी यासाठी वृत्तपत्रांचा, ग्रंथाचा आधार घेतला. मुकनायक, जनता, प्रबुद्ध भारत सारखी वृत्तपत्रे याचीच साक्ष देतात.बाबासाहेबांनी ग्रंथांना गुरू मानले. त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे त्यांच्या पांडित्याचा पुरावाच आहेत. कोणताही विषय मांडताना त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या सखोल चिंतनाचा परिचय वाचकांना येतो. मराठी भाषेवर चांगले प्रभूत्व असतानाही त्यांनी सर्व ग्रंथांचे लेखन हे प्रामुख्याने इंग्रजीमधून केल्याचे दिसून येते. ब्रिटिश राज्यकर्त्यांना भारतातील अस्पृश्यांची स्थिती भारतातील राज्यकर्त्यांना समजावी, त्यांच्यावरील अन्याय अत्याचाराची कल्पना यावी तसेच सुशिक्षित अस्पृश्य समाजाला नवविचारांची, तत्त्वज्ञानाची जाणीव व्हावी हा त्यांच्या साहित्यलेखनामागील मुख्य हेतू होता असे दिसते. आर्थिक विचार, सामाजिक विचार, धार्मिक आणि शैक्षणिक विचार त्यांनी आपल्या ग्रंथांमधून लोकांसमोर ठेवले. एकूण त्यांचे साहित्य हे त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या कुशाग्र बुद्धिमत्तेची साक्ष देणारे आहे असे म्हणावे लागते. दलितोद्धारासाठी लिहिलेल्या साहित्यामुळे, लेखनामुळे समाजाला नवी दिशा मिळाली ही गोष्ट येथे आवर्जुन नमूद करावी लागेल.

**समारोप–**

प्रस्तुत विषयाची मांडणी करताना समाजसुधारकांनी साहित्याला दिलेल्या योगदानाचा विचार मांडताना काही गोष्टीचा निर्देश होतो तो असा की, समाजसुधारकांच्या साहित्यनिर्मितीमागे समाजाला नवा विचार देणे, समाजाला प्रगतीच्या दिशेन घेऊन जाणे, समाजाला गतिमान बनविणे, समाजात क्रांतिकारी विचाराचा प्रचार करणे, अंधश्रद्धा, अनिष्ठ रूढी परंपरांवर हल्ला करून त्यांचे समाजातून समूळ उच्चाटन करणे, साहित्यामधून समाजाला आपल्या अस्तित्वाची, मानवी हक्काची, मूल्यांची, ज्ञानाची, तत्त्वज्ञानाची ओळख करून देणे ही काही महत्त्वाची प्रयोजने समोर होती असे दिसते. समाजसुधारकांच्या साहित्यनिर्मितीचा राष्टंबांधणीत मोलाचा वाटा असलेला दिसून येतो. त्यामुळे नवविचाराची आणि परिवर्तनाची मोठी क्रांती समाजमनावर करता आली असे आपल्याला या ठिकाणी म्हणता येईल.

**संदर्भ–**

१. भोळे भा. ल., भारतीय राजकीय विचारवंत, पी. बी. डी. प्रकाशन, नागपूर,२०१४
२. कुलकर्णी कुसूम, प्रबोधन पर्व, सिंहवाणी प्रकाशन, कोल्हापूर, २००२
३. जी. एल. भिडे, एन. डी. पाटील., महाराष्टांतील समाजसुधारणेचा इतिहास, कोल्हापूर, २००३
४. सोमण अंजली, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००५

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# महात्मा फुले यांचा शैक्षणिक दृष्टिकोन

**प्रा. श्रीमती नंदा श्रीपती पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
स.ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे,
ता. करवीर, जि. कोल्हापूर.

**प्रास्ताविकः**

१९ व्या शतकात महाराष्ट्रात जे सामाजिक प्रबोधन झाले त्याचे शिल्पकार जोतीराव फुले होते. महात्मा फुले म्हणजे आचार आणि विचार यांच्या एकसंघ सहचार्याचे मूर्तिमंत रुप होते. जोतीराव फुले हे एक थोर शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी दीडशे वर्षापूर्वी आधुनिक शेतीशिक्षणाचा आग्रह धरलेला होता. आपल्या हातात सत्याचे निशान धरुन आपल्या हयातभर आपले सर्वस्व पणाला लावून सत्यासाठी झगडा दिला. प्राणाचीही पर्वा न करता जागरुक राहून त्यांनी निर्भयपणे लोकक्षोभाला दाद न देता आपले कृतिशील कार्य सुरु ठेवले. आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले होत. १९ व्या शतकामध्ये महत्वाच्या व्यक्तिमध्ये त्यांचा उल्लेख करावा लागतो. तसेच २० व्या शतकातील अनेक चळवळींचा, प्रवाहांचा आरंभबिंदू म्हणूनही त्यांचा उल्लेख करावा लागतो. आधुनिक विद्येवर आधारलेल्या लोकशाही आणि आर्थिक संपन्नता या भौतिक तत्वांचा संदेश महात्मा फुले यांनी दिला. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला. अस्पृश्यासांठी शाळा सुरु केल्या. शिक्षणाने माणूस डोळस बनून आपली प्रगती करतो अशी त्यांची धारणा होती. महात्मा फुलेंनी प्राथमिक शिक्षणास विशेष महत्व दिले. शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हावे असा महात्मा फुले यांचा आग्रह होता. त्यांनी सांगितलेल्या विविध विचारांचे महत्व आजही पुन्हा स्वीकारण्याची गरज आहे. म्हणून त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचा वेध प्रस्तुत निबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शैक्षणिक विचार :**

सामाजिक अज्ञानाचे मुळापासून उच्चाटन करावयाचे असेल तर स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. या भूमिकेतून महात्मा फुले यांनी मुलींसाठी (१८४८) पुण्यामध्ये पहिली शाळा सुरू केली. या शाळेत त्यांच्या पत्नी सावित्रीबाई शिक्षिका म्हणून मुलींना शिकवू लागल्या. शिक्षिकेचे काम करत असताना सावित्रीबाईंना समाजातील काही लोकांच्याकडून खूप त्रास सहन करावा लागला. असे असताना या फुले दांपत्यांनी त्याकडे दुर्लक्ष करून आपले स्त्री शिक्षणाचे कार्य जोमाने सुरूच ठेवले. महात्मा फुले यांनी सावित्रीबाईंना शिकवून पहिली भारतीय शिक्षिका घडविली. स्त्रियांना सार्वजनिक जीवनात आणून स्त्रीच्या कर्तृत्वाला वाव दिला. जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतून पुढे आलेल्या ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून स्त्री-पुरुष समतेची कणखर भूमिका या ग्रंथातून मांडलेली दिसते. अस्पृश्यांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी संस्थाही सुरू केली होती. त्या शाळेत धुराजी आप्पाजी चांभार आणि गणू शिवाजी मांग हे दलित शिक्षक काम करीत होते. स्त्री शिक्षणाचा पाया घातल्यावर त्यांनी दुसरी क्रांतिकारक गोष्ट केली ती म्हणजे ''विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, हे सारे अनर्थ एका अविद्येने केले.''[1] या त्यांच्या विचारदर्शनाप्रमाणे शूद्रावरील सर्व अनर्थ दूर करण्यासाठी शूद्रातिशूद्रांना शिक्षण देणेच गरजेचे आहे हे जाणून १८५२ साली पुणे शहरातील नानापेठेत भोकरवाडी या भागात अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू केली. मुलांना शाळेत पाठविण्यासाठी त्यांनी अस्पृश्यांची मने वळविली. त्यांना स्वच्छता, शिस्त शिकविली. पाट्या, पुस्तके, कपडेही पुरविले. १८५२ च्या मे महिन्यात वेताळपेठेत स्वखर्चाने महार, मांग व अस्पृश्य जातीतील मुलांसाठी पुन्हा शाळा सुरू केली.

महात्मा फुले यांची शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी, त्यांचे शिक्षणविषयक चिंतन महत्त्वाचे होते. शिक्षणाने माणूस डोळस बनून त्याला आपली प्रगती करता येते, अशी महात्मा फुले यांची धारणा होती. त्यांनी शिक्षणाच्या विविध पैलूंचे, शिक्षण पद्धतीचे प्रसाराच्या स्वरूपाचेही चिंतन केलेले होते. सन १८८२ मध्ये शिक्षणाचा करण्यासाठी इंग्रज सरकारने हंटर कमिशन नेमले होते. या कमिशनने समाजातील विविध स्तरातील लोकांची शिक्षणविषयक मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी हंटर कमिशनला आपले शिक्षणविषयक एक निवेदन सादर केले. त्यात त्यांनी शिक्षणविषयक विचार व आपली मते स्पष्टपणे मांडली. हंटर शिक्षण आयोगा पुढे सादर केलेल्या निवेदनात त्यांनी मुलांना शाळेत कधी घालावे, तसेच प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण कसे असावे, याचबरोबर प्रचलित शिक्षणपद्धती, सुधारीत शिक्षणपद्धती यांचा सविस्तर विचार मांडलेला आहे. शूद्रातिशूद्र व स्त्रिया यांना शिक्षण मिळावे तसेच प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, याच प्रमाणे व्यवसाय शिक्षणावर अधिक भर देऊन त्यांनी शिक्षण पद्धतीतील दोष, अभ्यासक्रमातील उणिवा सांगून त्या दृष्टीने काही उपाय सूचविले आहेत.

''अभ्यासक्रमात मोडी-बालबोध, लेखन-वाचन, हिशेबाची माहिती, सर्व साधारण इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान, शेतकीचे प्राथमिक ज्ञान तसेच नीती आणि आरोग्य या संबंधीचे सोपे धडे अंतर्भूत करावेत... यांत्रिक, नीतीबोध, आरोग्य, शेतकी आणि उपयुक्त कला या विषयावरील पाठ पुस्तकामधून श्रेणीनुसार वाढत्या प्रमाणात देण्यात यावेत.''[2] बहुजन समाजातील मुलांची परिस्थिती विचारत घेवून त्यांनी सुचविलेला हा अभ्यासक्रम त्यांच्या चौकस शिक्षण दृष्टीचा ठळक प्रत्यय घडवितो. येथे त्यांनी इतिहास, भूगोल यांसारख्या विषयाबरोबर

शेतकी, यांत्रिकी, उपयुक्त कला व नीतीला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. माणसाचे माणूस म्हणून मूल्य वाढीस लावायचे असेल तर नीतीला पर्याय नाही म्हणूनच वाढत्या वयाबरोबर विद्यार्थ्याला नीतिशिक्षण दिले गेले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती.

व्यक्तिच्या व्यावहारिक कार्यक्षमतेचा विकास घडविणे हे त्यांना अभिप्रेत असणाऱ्या शिक्षणाचे एक ध्येय होते. त्याला महात्मा फुले यांनी ''विद्यार्थ्यांना शेतकी पाठांच्या जोडीने प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण देता यावे म्हणून एक 'आदर्श' शेतीची छोटीशी योजना आखल्यास ती निश्चितच फायदेशीर होईल.''[3] असे सुचविले आहे. यामुळे माणसांच्या दैनंदिन जीवनातील प्राथमिक गरजा तर भागतीलच पण सावकार, वकील अशा लोकांकडून जी लुबाडणूक होते तिलाही आळा बसेल.

शिक्षणामुळे सरकारी नोकरी हमखास मिळेल हे शक्य नव्हते. म्हणून स्वतःची उपजीविका चांगल्या रितीने करता यावी, यासाठी व्यासायिक कौशल्याचे शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले पाहिजे. तसे शिक्षण मिळाले नाही तर, ''ते आळशी स्वभावाचे होतात. आपले घरगुती धंदे किंवा दुसरे मेहनतीचे काम किंवा स्वतंत्र धंदा उद्योग करण्याचे टाळून नोकरीच्या शोधात राहतात.''[4] यामुळे त्यांच्यावर बेकारीची वेळ येते व जीवनात हतबल होतात. त्यांना नैराश्य येते. म्हणून महात्मा फुले म्हणतात, ''घिसाडी, लोहार, बटई, सुतार, कढई, चांभार, सोनार, तांबट, साळी, शिंपी वगैरे कारागिरांच्या मुलांकरिता निरनिराळ्या शाळा घालून त्यामध्ये त्या सर्वांच्या कसबासंबंधी सर्व प्रकारच्या विद्या शिकविण्याच्या कामी थोडा खर्च करावा.''[5] कारागिरांचे व्यवसाय कौशल्य एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केले जात असले तरी त्या विषयी तांत्रिक शिक्षण दिले पाहिजे. आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. बहुसंख्य लोकांची उपजीविका शेतीवरच आहे. शेतीस पूरक असे व्यावसायिक शिक्षण दिले तर स्वतःची उपजीविका होईल व राष्ट्राचाही विकास होईल हा महात्मा फुले यांचा विश्वास होता.

महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षणाचा अत्यंत मूलगामी पद्धतीने विचार केला आहे. विकसनशील समाजाला शिक्षणाची अन्नपाण्याएवढीच आवश्यकता असते, हे ओळखून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे अशी मागणी केली. या विषयी हंटर कमिशनला सादर केलेल्या निवेदनात ते म्हणतात, ''वंशपरंपरा लेखनावर उपजीविका करणारे ब्राह्मण, प्रभू इत्यादी वर्ग आणि व्यापारी वर्ग हेच बहुधा शहरातूनसुद्धा शिक्षणाचा लाभ घेताना आढळतात. शेतकरी व तत्सम वर्गांना प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेता येत नाही. या वर्गापैकी काही थोडी मुले प्राथमिक शाळेत आणि माध्यमिक शाळात घातली जातात पण दारिद्र्यादी कारणामुळे ती या शाळांत टिकून राहत नाहीत. घरकाम किंवा दुसरा एखादा कामधंदा मिळाला की ती स्वाभाविकच शाळा सोडून देतात. शाळेत टिकून राहण्याच्यादृष्टीने विशेष प्रलोभने नसल्यामुळे खेड्यामधील शेतकरी वर्गाची बहुतेक मुले शाळेपासून दूरच राहतात. एकतर हा शेतकरी वर्ग पराकोटीच्या दारिद्र्यामुळे गांजलेला असतो. शिवाय त्याला आपली मुले गुरेढारे राखण्यासाठी आणि शेतीच्या कामासाठी हवी असतात. शाळांच्या संख्येत वाढ
करण्याबरोबरच या वर्गाला आपली मुले शाळेत पाठविण्यास उत्तेजन मिळावे, त्यामध्ये विद्येची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून शिष्यवृत्त्यांची व सहामाही वा वार्षिक बक्षिसांची विशेष प्रलोभने ठेवणे अगत्याचे आहे. काही ठराविक वयोमर्यादेपर्यंत, निदान वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे, शूद्रातिशूद्र व शेतकऱ्यांसाठी किमान प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळण्याची मागणी करणारे महात्मा फुले हे महाराष्ट्रातील पहिले कृतिशील विचारवंत ठरतात.

प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करण्यात यावी व त्यांना विशेष मदत करण्यात यावी, असे महात्मा फुलेंनी सूचविले होते. ज्या देशी शाळेत शिक्षक आहेत, अशा शाळांना अनुदान देण्यात यावे. तसेच स्थानिक करातील निधीपैकी निम्मा निधी प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा याचबरोबर आपआपल्या हद्दीतील सर्व प्राथमिक शाळा स्वखर्चाने चालविण्यास नगरपालिकांना भाग पाडण्यासाठी सरकारने रीतसर कायदा पास करावा व प्रांतिक किंवा मध्यवर्ती निधीमधून पुरेसे अनुदान मिळण्याची तरतूद करण्यात यावी, अशा मौलिक सूचना महात्मा फुले यांनी आयोगाला केल्या होत्या. यावरील बाबींचा विचार करता महात्मा फुले यांनी सक्तीच्या व मोफत शिक्षणाची केलेली मागणी किती व्यापक व त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय घडविणारी होती. हे सहज लक्षात येते.

प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन कसे असावे, याविषयी महात्मा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगाला काही सूचना केल्या होत्या. प्राथमिक शाळांवरील निरीक्षण यंत्रणा सदोष आणि अपुरी आहे. दुय्यम शाळा तपासनीस वर्षातून एकदा शाळेला भेट देतात. अशा या भेटीपासून म्हणण्यासारखा फायदा होत नाही. अधिक वेळा नाही तरी, कमीत कमी दर तिमाहीस या सर्व शाळांची तपासणी होणे अगत्याचे आहे. पूर्वसूचना न देता इतर वेळीही या शाळांना भेटी दिल्यास तेही फार उपयुक्त ठरण्याजोगे आहे. मोठ्या शहरातील नगरपालिकांनी आपल्या हद्दीतील प्राथमिक शाळांचा खर्च स्वतः करावा व त्यांना तसे आदेश द्यावेत, परंतु शाळांचा कारभार सर्वस्वी नगरपालिकांवर सोपवू नये तर त्या शाळा शिक्षणखात्याच्या देखरेखीखाली असाव्यात, तसेच ज्या माध्यमिक किंवा खाजगी इंग्रजी शाळा शिक्षणखात्याच्या नियमानुसार चालविल्या जात असतील, त्यांनाही शक्य असल्यास आर्थिक सहाय्य करावे, सहाय्य दरवर्षी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात देण्यात यावे. या स्वरूपाची अनुदाने देण्याची तरतूद करण्याची नगरपालिकांवर सक्ती असावी व यासाठी शासनाने कायदा करावा. याचबरोबर प्राथमिक शिक्षणावर खर्च करावयाच्या निधीच्या विनियोगावर शिक्षणखात्याच्या संचालकांचे नियंत्रण असावे. जिल्हा व स्थानिक पातळीवर सुशिक्षित व बुद्धिमान नागरिकांच्या समित्या जिल्हाधिकारी किंवा शिक्षणखात्यामार्फत नेमाव्यात व त्यांच्याकडे अनुदाननिधींची व्यवस्था सोपवावी.

शूद्रातिशूद्रांच्या मुलांसाठी शाळेत येण्यास काही प्रलोभने दाखवावीत या विषयी महात्मा फुले लिहितात, ''शाळांच्या संख्येत वाढ करण्याबरोबरच या वर्गाला आपली मुले शाळेत पाठविण्यास उत्तेजन मिळावे आणि त्यामध्ये विद्येची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून शिष्यवृत्तीची व सहामाही वा वार्षिक बक्षिसांची विशेष प्रलोभने ठेवणे अगत्याचे आहे.''[6] या शिष्यवृत्त्यांच्या रकमेत व संख्येत ठराविक काळाने वाढ करावी, असेही त्यांनी सुचविले आहे. ही सूचना करण्यापाठीमागे महात्मा फुले यांचा एक गर्भित दृष्टिकोन आहे.

आपल्या शिक्षण विषयक तत्त्वज्ञानात महात्मा फुले यांनी शाळांची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे. भारत हा प्रामुख्याने शेतकऱ्यांचा व शेतीप्रधान देश आहे, आजही जवळपास ७०% लोक ग्रामीण भागातच राहतात व त्यांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन म्हणजे शेती हेच आहे. शेतकरी वर्गाचे दारिद्र्य, त्यांच्या ठिकाणी असलेला स्वावलंबनाचा अभाव, सुशिक्षित व बुद्धिवादी वर्गावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची वृत्ती व आजच्या काळात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या याचाही गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची मुले व शूद्रातिशूद्र शिक्षणापासून वंचित राहतात, अशा मुलांसाठी ज्या ठिकाणी जातीची वस्ती पुरेशी मोठी असेल, त्या ठिकाणी त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा उघडाव्यात. अशी विधायक सूचना महात्मा फुले करतात.

सरकारी अनुदान घेणाऱ्या शाळांचे प्रमाण अत्यंत अल्प होते. पुण्यासारख्या ठिकाणी एकच प्राथमिक शाळा होती व विद्यार्थी संख्याही अत्यल्प होती, ही वस्तुस्थिती स्पष्ट करून ज्या शासकीय प्राथमिक शाळा चालवल्या जात आहेत त्यांचा शैक्षणिक दर्जा योग्य नाही. त्यांची पुनर्रचना करण्याची गरज आहे, अशी विधायक सूचना त्यांनी केली. शूद्रातिशूद्र व शेतकरी हा खेड्यापाड्यात विखुरला होता. या वर्गासाठी खेड्यापाड्यातून शिक्षणप्रसाराचे कार्य सिद्धीस न्यावयाचे तर तेथील लोकवस्ती विचारात घेऊन शाळांची संख्या वाढवावी, असा महात्मा फुले यांचा आग्रह होता.

शूद्रातिशूद्र समाजाकडे उच्च शिक्षणासंदर्भात लक्ष देणे हिताचे ठरेल.शिक्षण घेतल्यामुळे ते आपले जीवन सुकरतेने जगतील याविषयी महात्मा फुले निवेदनात लिहितात, ''उच्च आणि श्रीमंत वर्गात, ब्राह्मण, प्रभू इत्यादी जातीत व विशेषतः जे लोक लेखनीवर उपजीविका चालवितात, अशा वर्गात सध्या शिक्षणाची गोडी उत्पन्न झालेली आहे. या वर्गाच्या बाबतीत होणारी सरकारी मदत क्रमाक्रमाने कमी करीत नेणे शक्य आहे. परंतु ज्या मध्यम आणि कनिष्ठ वर्गामध्ये शिक्षणाची म्हणण्यासारखी प्रगती अद्याप झालेली नाही, अशा वर्गाचे अनुदान थांबविल्यास ती एक आपत्तीच ठरेल.''[7] यामुळे शैक्षणिक कार्याची हानी होईल. हे सर्व शिक्षण हे सरकारी नियंत्रणाखाली ठेवणे योग्य ठरेल, असेही विचार महात्मा फुले प्रकट करतात. ज्या वर्गाला खऱ्या अर्थाने उच्च शिक्षणाची गरज आहे अशा स्वरूपाचे उच्च शिक्षणविषयक धोरण आखावे. शिक्षण प्रसार करणे ही सरकारची जबाबदारी आहे. उच्च शिक्षणावरील शासनाचे नियंत्रण काढले तर शिक्षणाची होणारी वाढ खुंटेल, असा धोकाही फुले सांगतात.

उच्च शिक्षणाचे व्यवस्थापन आणि नियंत्रण कोणाचे असावे, या विषयी महात्मा फुले सूचवितात, ''कोणत्याही पातळीवर शिक्षण व्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपविणे इष्ट ठरणार नाही. या पुढे बहुत काळापर्यंत, धंदेशिक्षण असो वा कारभारविषयक शिक्षण असो, सर्व पातळीवरच्या शिक्षणयंत्रणा सरकारी नियंत्रणाखाली राहणे योग्य ठरेल. प्राथमिक आणि उच्च या दोन्ही पातळ्यांवरील शिक्षणाचे संवर्धन होण्यासाठी आवश्यक असणारी आस्था आणि कृपादृष्टी केवळ सरकारच दाखवू शकेल.''[8] हिंदुस्थानात अनेक जाती-धर्माचे लोक आहेत त्यांच्या समस्याही जातिपरत्वे भिन्न भिन्न आहेत. या सर्व विचारात घेऊन सर्वांसाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे व त्या दिल्या जाणाऱ्या शिक्षणावर सरकारचे नियंत्रण असावे, असे महात्मा फुले यांचे मत होते. तत्कालीन परिस्थितीत महात्मा फुले यांचा हा विचार योग्यच होता. उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाबाबत महात्मा फुले उदासीन होते. महाविद्यालयातून दिले जात असणारे शिक्षण सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविणारे नाही. ते कमकुवत आहे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास, ''सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे.

**समारोपः**

जोतीराव फुले यांनी शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया टप्पाटप्प्याने अंमलात आणली. प्रथम स्त्री-शिक्षण व स्त्रियांची दास्यमुक्ती करण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षणाव्दारे बहुजन समाजाला जाग आणण्याचा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांच्या सर्वच कार्यात उच्च वर्णियांकडून विरोध झाला तरी हा महात्मा सामान्यजनांची अस्मिता फुलविण्यासाठी व त्यांचे जीवन समृध्द करण्यासाठी अविरत झगडत राहिला. सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाची मागणी करणारे फुले भारतातील पाहिले कृतिशील सुधारक आहेत. शिक्षण हे जीवनाभिमुख असावे त्याव्दारे बहुजन समाजाचा स्वाभिमान जागृत व्हावा, समाजपरिवर्तन व्हावे व समाजात बुध्दिप्रामाण्य व शास्त्रीय दृष्टिकोन यावा इत्यादी विचार त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतात. स्त्री-शिक्षण व दलित-शिक्षण याबाबतचे त्यांचे कृतिशील प्रयत्न महत्वाचे आहेत. शैक्षणिक समस्येची जाणीव असणाऱ्या महात्मा फुले यांनी हंटर कमिशनला दिलेले निवेदन त्यांच्या द्रष्टेपणाचे प्रतिकच आहे. खेड्यापाड्यातील परिस्थितीने गांजलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना खास शैक्षणिक सवलती द्याव्यात, शिष्यवृत्यांची व सहामाही वा वार्षिक विशेष प्रलोभने ठेवावित. या मुलांना शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असावेत व ते शेतकरी वर्गापैकीच असावेत. शिक्षण क्षेत्रात चांगले लोक आले

तरच सकस शिक्षण मिळेल ही त्यांची भूमिका आहे. एकूणच सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाची मागणी करुन शासनाला त्यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव करुन दिली. अशाप्रकारे जोतीबांच्या सार्वजनिक जीवनात सामाजिक व शैक्षणिक कार्याचा सुरेख संगम झालेला दिसतो.

**संदर्भ सूची**

१. फडके य. दि. (संपा) ‘महात्मा फुले समग्र वाङमय’, म.रा.सा. आणि सं. मंडळ,मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९१ पृष्ठ क्र.२५३
२. तत्रैव, पृष्ठ क्र. २३५, २३६
३. तत्रैव, पृष्ठ क्र. ७२०
४. तत्रैव, पृष्ठ क्र. ७२०
५. तत्रैव, पृष्ठ क्र. ५१३
६. तत्रैव, पृष्ठ क्र. ७१८
७. तत्रैव, पृष्ठ क्र. ७२३
८. तत्रैव, पृष्ठ क्र. ७२३

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# भारतीय विकासात शिक्षणाचे योगदान

**श्री. अनिल रामचंद्र महाजन**
प्रमुख, मराठी विभाग,
श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज,
माळवाडी- कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

१९९१ नंतर आपल्या देशात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (खाउजा) यांचे वारे वाहू लागले. जागतिक बॅंक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी डब्ल्यूटीओ, गॅट यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या ध्येयधोरणांचे आपल्या देशातील विविध क्षेत्रात होणारे परिणाम जाणवू लागले. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नव्हते. त्यामुळे या नव्या जागतिक प्रवाहाच्या रेटयाचे शिक्षण क्षेत्रावरही दूरगामी व मूलभूत स्वरूपांचे व्यापक परिणाम झालेले दिसतात.

१५ ऑगस्ट १९४७ लासुमारे १२०० वर्षाच्या परकीय आक्रमणाच्या विळख्यातून भारत मुक्त झाला. त्यातील शेवटची दिडशे वर्षे हा विळखा ब्रिटीश साम्राज्यांचा होता.या स्फूर्तिदायक घटनेचा आपण लवकरच अमृतमहोत्सव साजरा करणार आहोत. स्वातंत्र्याचा लढा लढताना आपण जी स्वप्ने पाहिली ज्या मूल्यांसाठी प्राणांच्या आहुती दिल्या, त्यांचे पुढे काय झाले? व्यक्ती आणि संपूर्ण समाजाचे जीवन विकसित व समृध्द करणा-या हरएक क्षेत्रात आपण किती प्रगती केली. या पुढील दिशा ठरविण्याचा हा काळ आहे.

शैक्षणिक ध्येय धोरणांच्या निश्चितीसाठी स्वातंत्र्योत्तर काळात आपण अनेक समित्या वा आयोगांची निर्मिती केलेली आहे. १९४८साली भारतातील विद्यापीठीय शिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली होती. तेव्हापासून आतापर्यंत विविध समित्यांच्या माध्यमातून समित्यांनी सरकारला ज्या शिफारसी केल्या त्याचे प्रतिबिंब भारत सरकारच्या प्रत्येक शैक्षणिक धोरणात उमटलेले दिसून येते. मेकॉलेच्या 'मिनिट' -(१८३५) पासून जॉन सार्जंट यांच्या 'युध्दोत्तर भारतातील शैक्षणिक विकास' (१९४४) असे १२ समित्यांचे अहवाल ब्रिटीशांच्या कारकीर्दीत सरकारने स्विकारले. एकंदरीत हे सर्व अहवाल व आयोगाच्या शिफारशी पाहता भारतातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, विद्यापीठीय, व्यावसायिक व रोजगाराभिमुख शिक्षणाचे कोणते चित्र आपल्यासमोर उभे आहे त्याचा मागोवा घेणे कमप्राप्त आहे. १९९१ नंतर खाउजा ने सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या आणिपुढारलेल्या समाजात बदलाचे परिणाम कोणते झाले. शिक्षण क्षेत्रात काही समस्या निर्माण झाल्या काय? त्यावर मात करून आपण कोणकोणत्या उपाययोजना केल्या हे महत्त्वाचे आहे.

**शिक्षण विषयक चिंतन :**

ऋग्वेदात 'माणसाला स्वावलंबी व निःस्वार्थ बनविते ते शिक्षण' अशी संकल्पना आहे. तर तैत्तरीय उपनिषदात 'मुक्ती हे ज्याचे गंतव्यस्थान आहे ते शिक्षण' असा उल्लेख आला आहे. 'माणसाला चारित्र्यसंपन्न व समाजोपयोगी बनविते त शिक्षण' अशी संकल्पना याज्ञवल्क्य ऋषींनी मांडली तर पाणिनीने - मानवी शिक्षण म्हणजे निसर्गाकडून माणसाला मिळणारे प्रशिक्षण असे निसर्गवादी चिंतन मांडले. कौटिल्याने तर 'देश उभारणीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण व देशविषयी प्रेम उत्पन्न करते ते शिक्षण अशी देशहिताची शिक्षणविषयक व्याख्या केली. आधुनिक काळात स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, रवींद्रनाथ टागोर व मं. गांधीनी आपले शिक्षणविषयक वेगवेगळे चिंतन मांडले आहे. माणसाच्या व्यक्तिमत्वात जी दैवी परिपूर्णता अस्तित्वात असते त्याचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण असे विवेकानंद म्हणतात. तर 'अंतिम सत्याचा शोध घेण्याची मनाला मिळणारी शक्ती म्हणजे शिक्षण असे रविंद्रनाथ टागोर म्हणतात. मं. गांधीनीतर बालक आणि माणूस यांच्या शरीर, मन आणि चैतन्य यातील सर्वोत्तम सर्व अंश प्रकट होणे व त्याचा सर्वांग विकास होणे याला शिक्षण म्हटले आहे.

पाश्चात्यांनी आपले शिक्षणविषयक चिंतन व्यक्त करताना व्यावहारिक व जामिनीवरील वास्तवाचा विचार करून मते मांडली आहेत. उदा. ग्रीक तत्वज्ञ प्लेटोच्या मते कोणत्याही विद्यार्थ्यांत सौंदर्य आणि परिपूर्णता यांचा विकास होण्याची जेवढी क्षमता आहे. तेवढा त्याचा शरीर व मनाचा विकास शिक्षण करीत असते. जॉन डयुईच्या मते 'अनुभवांच्या सातत्याने होणा-या पुनर्रचेतून जीवन जगणे, ही शिक्षणाची प्रक्रिया आहे. व्यक्तीला आजूबाजूच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी व त्याच्या ठायी असणा-या सर्व शक्यतांची परिपूर्ती करण्यासाठी ज्या क्षमतांची आवश्यकता असते, त्यांचा विकास म्हणजे शिक्षण.' तर, 'शब्दसंपत्ती, उपासना आणि परिश्रम या त्रिगुणातून शिक्षणाची जडणघडण होत असते. शिक्षणामुळे माणसाला त्याच्यातील पशूला काढून ठेवता आले पाहिजे असे मत व्यक्त केले. हर्बट स्पेन्सरच्या मते- शरीरसंपदा कशी मिळवावी, मनाची मशागत कशी करावी, आपल्या जीवनाचे नियोजन कसे करावे, आपल्या कुटुंबाचा उत्कर्ष कसा करावा, नागरिक म्हणून आपला व्यवहार कसा असावा, निसर्गातील सुखांचा उपयोग कसा करून घ्यावा या सा-यांचे ज्ञान मिळविणे म्हणजे शिक्षण होय. तर रूसोने शिक्षण ही एक नैसर्गिक व काही अंशी कृत्रिम प्रक्रिया आहे. त्याद्वारेच माणसाच्या अंतःशक्तीचा विकास होत आहे. हि जीवनभर चालणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण असे म्हटले आहे. या सर्व मतांवरून आपल्याला असे म्हणता येईल की, शिक्षण हे एक बलशाली साधन आहे. त्याआधारे व्यक्ती व समाज सुखी, समृध्द, समर्थ व सुसंस्कृत होवू शकतो. त्यामुळेच शिक्षणाच्या क्षेत्रात होणारी संस्थात्मक व गुणात्मक प्रगती त्या त्या समाजाच्या व राष्ट्राच्या सांस्कृतिक पातळीची निदर्शक असते. या अर्थाचे शिक्षण म्हणजे आपली जीवनाच्या विकासात केलेली दीर्घकालीन गुंतवणूक असते. संस्कृती हा भारतीयांचा कणा आहे. त्यामुळे या देशावर राज्यकरण्यासाठी आपले गुण सिध्द करण्याची पाळी ब्रिटीशांच्यावर आली.

**ब्रिटीशांचे भारतातील शैक्षणिक धोरण :**

१८१३ पर्यंतईस्ट इंडिया कंपनीला भारतातील शिक्षणाबद्दल तिळमात्र काळजी नव्हती. पण ब्रिटीश पार्लमेंटने लोक शिक्षणासाठी दरसाल १० हजार पौंड खर्च करावा असा आदेश दिल्यामुळे १० वर्षानंतर एलफिन्स्टनच्या पाठपुराव्यामुळे भारतीयांना त्यांच्या प्रचलित शिक्षण पध्दतीत प्रत्यक्ष ढवळाढवळ न करता या संस्थाना आर्थिक मदत द्यावी. खेडयांतून शाळांची संख्या वाढवून व पात्र शिक्षक नेमूण शिक्षणाचा दर्जा सुधारावा. दुय्यम भाषा म्हणून इंग्रजीचा अभ्यास करावा.पाश्चात्य शिक्षण देशी भाषेतून दयावे. इंग्रजी शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणाच्या सोयी महत्त्वाच्या असल्यामुळे प्राथमिक शिक्षणाची सोय सुनियोजित पध्दत घालून दयावी. शिक्षणाचा उपयोग केवळ कारकुनांचा पुरवठा करण्यापुरता मर्यादित नसून, ज्ञानाचा प्रसार करणे हा असला पाहिजे पण मेकॉले मात्र धूर्त होता त्याने मुळातच विदेशी वस्तू व इंग्रजी भाषा आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे असा विचार भारतीयांच्या मनात रुजविल्याशिवाय त्यांचा आत्मसन्मान आणि संस्कृती हरवून बसणार नाहीत भारत देश आम्हाला हवा तसा गुलामी वृत्तीच्या माणसांचा देश वागवता येईल. थोडक्यात भारतीयांना काळे इंग्रज निर्माण करणारे शिक्षण दयावे. लॉर्ड ऑकलंडने अधोगामी झिरप सिध्दांत मांडला. याचबरोबर वुड, हंटर कमिशन, हरटॉक, ॲबटवूड जॉन सार्जंट यांनीही आपले अहवाल सादर केले. वूडच्या खलित्याने विद्यापीठांची स्थापना केली व मुंबई, मद्रास व कोलकत्ता येथे विद्यापीठे स्थापन झाली.

इंग्रजांनी भारतात राबविलेली शिक्षण पध्दती जरी सुधारणामतवादी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात ती तशी नव्हती. इतिहासाचे केलेले विकृत पुणर्लेखन, धर्मांतराला दिलेले उत्तेजक, स्थानिक उद्योग व कलाकौशल्याचे केलेले खच्चीकरण येथील समाजरचना व मूल्यव्यवस्था यावर केलेले हल्ले, आर्थिक शोषण या सा-यातून येथील समाजाचे नैतिकदृष्टया खच्चीकरण व्हावे, तो स्वाभिमान शून्य, आत्मविस्मृत, निराश व हातवीर्य व्हावा हीच इंग्रजांची व्यूहरचना होती. यासाठी त्यांनी जे महत्त्वपूर्ण शस्त्र वापरले ते म्हणजे शिक्षणव्यवस्था त्याचे दूरगामी परिणाम आपल्या देशावर झाले आहेत व आजही विद्यमान आहेत.

**स्वातंत्र्योत्तर शिक्षण :-**

ब्रिटीशांनी राबविलेल्या शैक्षणिक धोरणांचा धूर्तपणा भारतीयांच्या हळूहळू लक्षात यायला लागला. सामाजिक आणि आर्थिकदृष्टया वर्षानुवर्षे वंचित समाजाला शिक्षणाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवणा-या या धोरणाला भारतातील विचारवंतांनी स्पष्ट शब्दात विरोध केलेला दिसतो. भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रणी असलेल्या म. फुले यांना हंटर कमिशनपुढे साक्ष देताना शिक्षणाच्या या अधोगामी झिरप सिध्दांताला स्पष्ट शब्दात विरोध केला. ''सहा ते चौदा या वयोगटातील सर्व मुलामुलींना सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे आणि त्या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी शासनाने स्विकारली पाहिजे,'' असे त्यांनी ठणकावून सांगितले. म. फुले यांच्या दूरदृष्टीचे व द्रष्टेपणाचे हे ज्वलंत उदाहरण आहे त्याचबरोबर नामदार गोखले यांनीही असाच आग्रह धरलेला दिसतो. म. फुल्यांनी पुण्यात मुलींसाठी व समाजातील दुर्बल घटकांसाठी शाळा काढल्या. म. कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचे जाळे विणले. छ. शाहू महाराज, म. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणविस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली. तरी देखील मेकॉले प्रणीत शिक्षण पध्दतीली आपण आजपर्यंत नाकारू शकलो नाही. पाश्चात्य ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञान, आधुनिक जीवनमूल्ये, वाङ्‌मय, तत्वज्ञान, संशोधन यांचा आदर करूनही या सर्वांना आपण भारतीय चौकशीत व पर्यावरणातबसविणे आवश्यक होते. त्यात आपण कमी पडलो. उत्तरेकडील राज्यांनी त्रिभाषा सूत्राचा मनःपूर्वक स्वीकार न केल्यामुळे इंग्रजीचा वरचष्मा आज ब्रिटीशांच्या कारकीर्दीपेक्षा वाढलेला आहे. परिणामतः आज मराठी शाळा म्हणाव्या तशा चालत नाहीत. बंद पडताहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण क्षेत्रात सर्वांगीण सुधारणा करण्याचे व्यापक प्रयत्नझाले. त्यात बालशिक्षण, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च व विद्यापीठीय शिक्षण अशा विविध टप्प्यांत परिवर्तनझाले तसेच ते स्त्री - शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शिक्षणशास्त्र अशा वेगवेगळया पैलुंवर स्वतंत्रपणे सखोल अभ्यास करणारे आयोग नेमले गेले. त्यातील काही महत्त्वाच्या आयोगाच्या अहवालांचा मागोवा आपण घेवू-

१९४८ साली डॉ. राधाकृष्णन यांचा विद्यापीठ शिक्षण आयोग स्थापन केला गेला. यात प्रामुख्याने

१) शालेय शिक्षण १२ वर्षाचे करावे व तद्नंतर तीन वर्षाचा सल्ला व एकसंघ अभ्यासक्रम पदवीचा असावा.

२) शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषेत करावे. प्रादेशिक भाषा समृध्द करावी. हिंदीचा वेगाने विकास करून इंग्रजीचा अभ्यास ज्ञानभाषा म्हणून करावा.

३) मूलभूत संशोधनाची जबाबदारी विद्यापीठानी घेवून ज्ञानशाखांमध्ये प्रयत्नपूर्वक वाढ करावी. उच्च बौध्दिक क्षमता, व्यवहारिक अनुभव व व्यावसायिकता यांचा सुमेळ घालून राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासासाठी मनुष्यबळाचा विकास साधावा यासाठी गुणवत्तायुक्त व समर्पित भावनेचे शिक्षक तसेच त्यांचे प्रशिक्षण महत्त्वाचे आहे.

४) मध्यवर्ती अनुदान आयोगाची स्थापना करून विद्यापीठाचा सर्वांगीण विकास साधावा.

५) शिक्षकांची गुणवत्ता, वेतनश्रेणी, बढती व सेवातंर्गत प्रशिक्षण यांच्या योजना तयार कराव्यात. ६) परीक्षा पध्दतीत सुधारणा करून गुणवत्ता विकास करण्यासाठी ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडांगणे, शा.शि.समाजसेवा यांच्या विकासावर भर दयावा.

७) धार्मिक शिक्षण दयावे.

८) ग्रामीण विद्यापीठाची स्थापना करून शेती, उद्योग, ग्रामीण व्यवसाय, हस्तकला, कुटिरोद्योग याकडे लक्ष दयावे.

या शिफारशींचा परिपोष म्हणून विद्यापीठ आयोगाची स्थापना (UGC) १९५३ ला झाली. तो आयोगच विद्यापीठ व महाविद्यालये यांना विकासनिधी उपलब्ध करून देवू लागला. संशोधणासाठी CSIR, ICSSR, ICHR, ICAR, ICMR, NCERT यासारख्या संस्था

स्थापन झाल्या. तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम संपूर्ण देशात स्विकारला गेला इतके असले तरी पहिल्या पंचवार्षिक योजनेत फक्त २।। ते ३ टक्कांपेक्षा जास्त खर्च केला गेला नाही.१९५२ सालच्या डॉ. मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला. तर १९५८ साली डॉ. दुर्गाबाई देशमुख यांच्या समितीने स्त्री - शिक्षणाचा विचार केला. डॉ. कोठारी आयोगाने मात्र पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत तपशीलवार विचार केला आहे.

**आधुनिक शिक्षण प्रणाली :-**

१९८४ ला इंदिरा गांधीच्या निधनानंतर देशाची सूत्रे राजीव गांधीनी स्विकारली त्यांनी १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित केले. शिक्षणाची नवी संकल्पना मांडणारे हे धोरण होते त्यात मानवी साधनसंपत्तीचा विकास करण्याच्यादृष्टीने विचार करण्यात आला होता. शैक्षणिक परिवर्तन प्रत्यक्षात घडवून आणण्यासाठी त्यांनी तज्ञांचे अनेक अभ्यासगट निर्माण करून ठोस कृती कार्यक्रम विकसित केला. आजवरचे सगळे आयोग किंवा समित्यांनी केलेल्या शिफारसींची अमंलबजावणी झाली नाही. याबद्दलची परखड मीमांसा करून शिक्षणांचे निश्चित उद्दिष्ट गाठण्यासाठी त्याचे अग्रक्रम, आशय, अध्ययन, अध्यापन पध्दती, मूल्यमापन, व्यवस्थापन पध्दती, व्यावसायिक शिस्त यात अमूलाग्र बदल घडवूण आणण्यासाठी शिक्षण प्रक्रिया गतिमान व कालसुसंगत करणे आवश्यक होते, असे सुचविले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रौढ शिक्षणाचा विकास, साक्षरता निर्मुलन, बालसंगोपन व शिक्षण, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण, प्राथमिक शिक्षणातील वाढ, शाळांना आधुनिक सुविधा पुरविणे, ग्रामीण भागातील बुध्दिमंतांचा शोध व त्यांच्यासाठी माध्यमिक शाळांची स्थापना, शिक्षणाचे व्यावसायीकीकरण, उच्च शिक्षणाचा विस्तार व गुणवत्ता वाढ, Operation Blackboard, शिक्षण संस्थांची स्वायत्तता, मुक्त शिक्षणाचा प्रसार, स्वातंत्र्याबरोबर उत्तरदायित्वाची भावना जोपासणे, भारतीय प्राचीन परंपरा व आधुनिक जीवनमूल्ये यांचा समन्वय, आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर, माहिती तंत्रज्ञान व संगणक प्रशिक्षण, मूल्यशिक्षणावर भर, मूल्यमापन पध्दतीत सुधारणा व सातत्य, शिक्षकांच्या दर्जात निरंतर सेवांतर्गत प्रशिक्षणाद्वारे सुधारणा, राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या ६ टक्के शिक्षणावर खर्च, शिक्षण संस्था व औद्योगिक संस्था यांच्यातील समन्वय इ. पण इथली राजकीय इच्छाशक्ती म्हणावी तशी अंमलबजावणी करताना दिसत नाही, किंवा शिक्षणावर ६ टक्के खर्च अपेक्षित असतादेखील आपण आजपर्यंत ३ टक्क्यांपेक्षा पुढे गेलेलो नाही ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. १९९१ नंतर खाउजा प्रवृत्तीचा जबरदस्त रेट वाढल्यामुळे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक व्यापार संघटन व गॅट करारामुळे मुक्त/खुली अर्थव्यस्थापना स्विकारली त्यामुळे देखिल शिक्षणावर परिणाम होत गेले. २००२ नंतर ६ ते १४ वयोगटातील बालकांसाठी प्राथमिक शिक्षण हा त्यांचा मूलभूत हक्क झाला. त्या अगोदर पासून ८० %खर्च प्राथमिक शिक्षणांवर खर्च होत होता. उरलेल्या २०%पैकी अधिकतर खर्च प्राथमिकडे वळवून माध्यमिक व उच्च शिक्षणांवरील खर्चातून हळूहळू सरकारने आपले अंग काढून घेतले. फक्त कायदेशीर बाबतीच लक्ष्य देणे व पूर्वपरंपरेने चालू राहिलेली प्रक्रिया पूर्ण करणे हे एकच ध्येय त्यांनी आपल्या समोर ठेवले. कोणतीही वाढ वा विकास विनाअनुदानित तत्त्वावर व्हावा, कोणत्याही नव्या शिक्षण संस्था कायमचा विनाअनुदानित तत्त्वावर सुरू व्हाव्यात असे धोरण शासनाने स्वीकारले. यातून विनाअनुदानित संस्कृतीचा उदय झाला. साखरसम्राट सहकार महर्षी व बलदंड राज्यकर्ते यांनी याचा लाभ उठवून आपली शिक्षण साम्राज्ये उभी करायला सुरूवात केली खाजगीकरणामुळे विद्यापीठाची व शासनाची बंधने निदान आर्थिक बाबतीत तर पाळण्याची जबाबदारी शासनावर उरली नाही. शासनाला विद्यापीठे व महाविद्यालये स्वायत्त व्हायला हवी पूर्वीचे मान्यता प्राप्त शिक्षण/विद्याशाखा/विषय/तुकडी यावर होणारा खर्च वगळता बाकी विकास संस्थांनी स्वतःच्या बळावर करावा. त्यासाठी महाविद्यालयाला उच्च शिक्षण संस्थेला आपली शुल्क रचना ठरविण्याची अनुमती देण्याचे ठरले याचा परिणाम शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्याकडून मिळणारे शुल्क भरमसाठ वाढविले.

**समारोपः**

शिक्षणक्षेत्रात सध्या स्पर्धेची सुरूवात झाली आहे स्पर्धेत टिकण्यासाठी प्रत्येक संस्थेला प्रगती करावीच लागेल, दर्जा उंचवावा लागेल, गुणवत्ता वाढवावी लागेल अन्यथा ‘प्रगती करा वा नष्ट व्हा’ या जमिनीवरील वास्तवाला सामोरे जावे लागेल. शेवटी देशभक्ती, उद्यमशिलता, श्रमप्रतिष्ठा, ध्येयवाद, महत्त्वाकांक्षा व समाजभिमुखता ही मूल्ये शिक्षणातील सर्व स्तरात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यात रूजवली जाणे आवश्यक आहे. ख-या अर्थाने मनुष्यबळाचा सर्वांगीण विकास झाला तर व्यक्ती, समाज व राष्ट्रासमोरील कोणत्याही आवाहनाला सामोरे जाण्याची व त्यावर मात करण्याची क्षमता सिध्द होवू शकेल. शिक्षणाच्या या शक्तीनेच भारत जगात महाशक्ती म्हणून नावारूपास येवू शकेल.

**संदर्भ ग्रंथः**

१. भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या - डॉ. मीनल नरवणे
2- Indian Education:Today and Tomarrow- Suresh Bhatnagar
3- Education Thougths In India- B. R. Taneja
४. स्वातंत्र्याची हिरकमहोत्सवी वाटचाल - संपा.रमेश पतंगे
५. उच्च शिक्षण :ध्येय वादाकडून बाजारपेठेकडे- द.ना.धनागरे
६. भारतीय शिक्षण पध्दती- डॉ. अरूणा जोशी

## 'कृष्णाकाठ' मधील राष्ट्रउभारणी विषयक विचार

**प्रा.प्रेरणा एल.चव्हाण**
(मराठी विभाग)
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,
कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

**प्रस्तावना**

जातीयता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. ही जातीयता समुळ नष्ट व्हावी. यासाठी अनेक समाजसुधारक पुढे आले, त्यापैकीच एक यशवंतराव चव्हाण हे आहेत. त्यांना जातीपेक्षा व्यक्ती महत्वाचा वाटत असे. माणसाने माणसासारखे जगावे. असे त्यांना केवळ वाटत नव्हते, तर त्या दिशेने त्यांनी आपल्या आयुष्याची वाटचाल केलेली दिसून येते. कितीही सुशिक्षित झाले तरी ब्रिटिश नोकरशाही आपल्याला समतेची वागणूक देणार नाही. आपले अधिकार आपल्याला मिळवायचे असतील तर आपण संघटित होणे गरजेचे आहे. या उद्देशाने बंगाल, मुंबई, मद्रास या ठिकाणी राजकारणी व्यक्ती एकत्र येऊन १९८५ मध्ये काँग्रेसची स्थापना केली. एखाद्या भितींत झाड उगवावे आणि ते झाड मोठे झाले की, ती भिंत उखडावी तशा पध्दतीने जाती-वादाची मुळे महाराष्ट्र काँग्रेसचा पाया उखडू पाहत होती.

यशवंतराव चव्हाण यांनी 'सहयाद्रीचे वारे', 'युगांतर', 'ऋणानुबंध', 'भूमिका', 'कृष्णाकाठ' इत्यादी पुस्तके लिहिली. या पुस्तकातून त्यांची स्वतःची भाषणे व स्वतःच्या जीवनातील राजकारणाकडे वाटचाल का व कशासाठी केली आहे ते सांगितले. यशवंतरारव चव्हाण यांच्या वाटयाला आलेले राजकारण हे पिढयानपिढया चालत आलेले नव्हते. तसेच उमेदवारीचा आव आणत राजकारणात नेतृत्व मिळविणे हा त्यांचा पिंड नव्हता. तर त्यांच्यात असलेली जातीयता नष्ट करुन राष्ट्रीय एकात्मतेची उर्मी त्यांना राजकारणाकडे खेचून आणलेली होती. राष्ट्रीय नेतृत्वाच्या चळवळीत जातीभेदाच्या पलिकडचे राजकारण अंगी बाणलेला एकमेव व्यक्ती म्हणून १९६२ साली यशवंतराव चव्हाण यांना संरक्षण मंत्री पदासाठी दिल्लीला बोलावून घेण्यात आले. त्यावेळचे राजकारण हे इंग्रज सरकारच्या मतावर आधारित होते. या नवीन पिढीने गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. यशवंतराव चव्हाण तुरुंगात गेले. तुरुंगात गेल्यानंतर प्रेरित होऊन तुरुंगातून बाहेर आल्यानंतर ठिकठिकाणी फिरुन त्यांनी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. व या पक्षाचे ध्येय लोकांना समजावून सांगितले. सर्व लोक जातीयता विसरुन एकत्र आले. किंबहुना वेगवेगळया जातीपाती धर्म पंथाच्या लोकांना एकत्र बांधण्यात यशवंतराव चव्हाण यांना यश आले आणि आज यशवंतराव चव्हाण राष्ट्रबांधणीच्या चळवळीतील मेरुमणी ठरले.

राष्ट्रबांधणीच्या चळवळीत सक्रीय सहभागी असलेले व्यक्तीमत्व म्हणून नावारुपाला आलेले व्यक्तीमत्व यशवंतराव चव्हाण यांनी मराठी साहित्यात स्वतःच्या जीवनात आलेले अनुभव तसेच भाषणे व लेख यांचा संग्रह असलेली बरीचशी पुस्तके लिहिली. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे आत्मचरित्र आहे. हे पुस्तक तीन खंडामध्ये सांगितले आहे. ते म्हणजे 'जडणघडण' 'वैचारिक आंदोलन' आणि 'निवड' इत्यादी.

यशवंतराव चव्हाण जे घडले त्याच्यामागे त्यांच्या आईचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या आईला शिक्षणाविषयी आस्था वाटत होती. आपल्या मुलांनी खूप शिक्षण घ्यावे. या हेतूने देवराष्ट्र सोडून कराड येथे ते स्थलांतरित झाले. देवराष्ट्र हे यशवंतराव चव्हाण यांचे आजोळ तेथेच त्यांचे सर्व बालपण गेले. गावात राहत असताना बालवयात त्यांची जडणघडण झाली ती अशी; महार, मांग, चांभार हा समाज गावापासून, समाजापासून दुर राहतो. हा दलित समाज गावकुसाबाहेर का राहतो, हा त्यांच्या मनाला पडलेला प्रश्न, त्याला जीवन हे नाव दयायचे की नाही हा प्रश्न त्यांना सतावत होता. (कृष्णाकाठ पृ.२२) हे पण काय जीवन आहे. मग माणसात आणि प्राण्यात काय फरक आहे. याच ग्रामीण भागात काही दहा-पंधरा ब्राम्हण कुटुंब होते. त्यांच्याविषयी असलेल्या आदराविषयी त्यांना पुढे पुढे झाकलेले अंतर लक्षात येऊ लागले. शिक्षण घेऊन मामलेदार होणे आणि समाजात प्रतिष्ठा मिळवणे, वाढवणे इत्यादी बाबी शिक्षणामुळे पूर्णत्वास येतात. इत्यादी जाणिवांची शिदोरी घेऊन यशवंतराव चव्हाणयांचे कुटुंब कराड येथे स्थलांतरित झाले.

कराडला आल्यानंतर देशातले सर्वच महत्वाचे राजकीय चळवळीचे प्रतिनिधी कराडमध्ये होते. या सर्व राजकीय नेत्यांच्या संपर्कामुळे त्यांच्यातील कार्यकत्यांची जडणघडण झाली. वयाच्या १३-१४ व्या वर्षी दिनकरराव जवळकर यांचे भाषण त्यांच्या ऐकण्यात आले. तसेच त्यांना असलेल्या वाचनाच्या आवडीमुळे देशाचे शत्रू कोण आहेत, याची ओळख झाली. तसेच राष्ट्र उभारणी संदर्भातील वैचारिक संघर्ष सुरु झाला. राष्ट्र उभारणीच्या चळवळीत सिंहाचा वाटा असलेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले.

'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रातील त्यांचे लेखन पाहिल्यास त्यांच्या प्रतिमेची अनुभूती, भाषेवर असलेले प्रभुत्व तसेच लेखकगत, वाचकगत प्रयोजन पूर्ण होते. त्यांच्या मते राष्ट्रबांधणी, समाजबांधणी होण्या अगोदर व्यक्तीच्या मनाची बांधणी होणे गरजेचे आहे. व्यक्तिच्या मनाचा मानसिक विकास व्हावा. हा मानसिक विकास कशा प्रकारे करता येतो. याचेही काही उत्तम उदाहरण त्यांच्या लेखनातून वाचावयास मिळतात. त्यांच्या 'माझा विरंगुळा' या लेखातून व्यक्तिने मनाची जोपासना करण्यासाठी विरंगुळा जपणे गरजेचे आहे. विरंगुळा वेगवेगळे असू शकतात. जसे की, संगीत, वादन, वाचन वगैरे सर्व विरंगुळा सांगून वाचनाचा विरंगुळा यशवंतराव चव्हाण यांना होता, असे लक्षात येते. पुस्तकाच्या कपाटाजवळ बसून एखादे पुस्तक उलट वाचावे का सुलट वाचावे, असा बेत ते मनाशी आखत. संत रामदासांच्या वचनाप्रमाणे 'मन

करा रे प्रसन्न सर्व सिध्दिचे कारण' यशाच्या शिखरावर जाऊन पोचण्यासाठी प्रथम मन प्रसन्न आणि विकसित करण्याविषयी त्यांनी सांगितले आहे. विधान सभेतील त्यांची भाषणे वाचली तर खरोखरच त्यांचे मन पूर्ण विकसित होते याचा प्रत्यय येतो.

**सारांश**

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व, राजकारण आणि राष्ट्रउभारणीमध्ये त्यांचे असलेले योगदान इथे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातील जातीभेद मिटावा व सदृढ सुसंस्कृत राष्ट्र निर्माण व्हावे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी. या उद्देशाने प्रेरित होऊन त्यांनी समाजकारण, राजकारण केले. याचे पडसाद त्यांच्या साहित्य लेखनातून दिसून येते. राष्ट्राची बांधणी होण्याच्या दृष्टीने त्यांची लेखनी एक शस्त्र ठरली.

**संदर्भ ग्रंथ**

१) समाज प्रबोधन पत्रिक -२०१३ तील लेख 'कृष्णकाठ' आणि ऋणानुबंध- बाळकृष्ण कवठेकर
२) 'कृष्णाकाठ' -यशवंतराव चव्हाण- प्रेस्टिज पब्लिकेशन, पूणे
३) यशवंतराव चव्हाण साहित्य आणि राजकारण- भास्कर लक्ष्मण मोळे, साकेत प्रकाशन औरंगाबाद
४) यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य- द.भा. भागवत ठोकळ प्रकाशन, पूणे
५) यशवंतराव चव्हाण इतिहासाचे एक पान- रामभाऊ जोशी, केसरी प्रकाशन, पूणे

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# कादंबरी वाङ्मयाचे राष्ट्रीय योगदान

**प्रा. सौ.एस.एस. पाटील**
मराठी विभाग,
आनंदीबाई रावराणे महाविद्यालय, वैभववाडी.

**प्रस्तावना :**

कादंबरी हा एक वाङ्मय प्रकार आज मराठी साहित्यात रूढ झालेला आहे. या साहित्य प्रकाराने जे काही आपल्या अवकाशात सामावून घेतले आहे, तेच मुळी इतके व्यापक आहे की, त्यातून बरेच संदर्भ समोर येतात. हे संदर्भ एकेरी असे नाहीत तर त्यांचीही एक गुंफण उलगडत जाते. एक-एक गुंफण उलगडताना त्यातूनच 'राष्ट्रीयता' हा ही एक संदर्भ स्पष्ट होतो. ही राष्ट्रीयता या वाङ्मय प्रकाराने कोणकोणत्या पातळीवर जोपासली आहे हे लक्षात येते.

खरं तर राष्ट्र आणि कादंबरी वाङ्मय हे फक्त शब्द वाचताना अगर उच्चारताना त्यांचा काही परस्पर संबंध असेल असे प्रथम दर्शनी वाटत नाही. तसे वाटण्याचे कारण राष्ट्र म्हणजे एक समूह अशी कल्पना आपल्यासमोर साकारते. तर कादंबरी म्हणजे शब्दांचा व्यापक पट डोळ्यासमोर येतो. मात्र या शब्दांचा मागोवा घेतला तर आपण समूहाकडेच येतो. पर्यायाने 'राष्ट्र' या संकल्पनेत येतो. या अर्थाने कादंबरी वाङ्मयाने राष्ट्राच्या जडण-घडणीत योगदान दिलेले आहे असेच म्हणावे लागते.

**कादंबरी वाङ्मयाची सुरूवात :**

कादंबरी हा वाङ्मय प्रकार तसा आंग्ल काळापासूनच आपल्याकडे आलेला आहे. त्यांच्याच नॉव्हेलवरून आपण कादंबरी असा पर्याय स्वीकारत त्या वाङ्मयाचा स्वीकार केला. त्यांचा आपल्यापेक्षा सुधारलेला दृष्टीकोण बघून आपणही आपल्या भोवतालचे वास्तव सजगपणे बघू लागलो. त्या सजगतेतूनच कादंबरीचा उदय झाला असे म्हणता येते. हरी केशवजी पठारे यांच्या 'भाषिक क्रमण' चे कांदबरीची सुरूवात झाली. तशी ही भाषांवरील आहे. त्यात पौराणिक आख्याने गद्य स्वरूपात लिहिलीत. मात्र बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीने ही सुरुवात खऱ्या अर्थाने झाली हे स्पष्ट होते.

पुढे त्यात पण लक्षात कोण घेते पासून एक नवा आशय सामावत गेला. 'ब्राह्मण कन्या', इंदू काळे, सरला भोळे, 'बळी' या कादंबऱ्यांच्या निमित्ताने हा आशय अधिकाधिक चिंतनशील बनला. पुढच्या अनेक टप्प्यांवर आशयाची वळणे विस्तारली. कादंबरी प्रगल्भ होत गेली.

**राष्ट्र किंवा देश संकल्पनेचा उदय :**

आपला मानवी इतिहास एका मोठ्या कालपटाचा आहे. त्या कालपटाचा एकूण विचार केला तर तिथे 'समूह', 'गट' असा प्रत्यय येतो. भौगोलिक दृष्टीकोणातून भारत या 'देश' संकल्पनेचा विचार केला तर त्याही संकल्पनेचा उदय ब्रिटिशांच्या राजवटीनंतर झालेला दिसतो. तत्पूर्वी 'एकात्म समाज' असा नव्हता. इथे हिंदू, मुस्लीम, पारशी आदिवासी असे समूह होते. त्यांच्यामध्ये एकत्रित असा कोणता अनुबंध नव्हता. त्यामुळे 'राष्ट्र' ही संकल्पनाही नव्हती. त्या प्रदेशाला 'भारत' हे परंपरेतील एक नांव होते. या नावाला इथल्या कोणत्याही समूहाचा तसा संदर्भ नव्हता. एका अर्थाने हा शब्द जाती-धर्म निरपेक्ष होता.

पुढे स्वातंत्र्याचे भान आलेल्या विचारवंतांनी 'भारत' हाच शब्द जाणीवपूर्वक रूढ केला. टिळक युग सुरू झाल्यावर खऱ्या अर्थाने 'स्वदेश' ही संकल्पना निर्माण झाली. त्यातूनच स्वराष्ट्र, राष्ट्राभिमान या भावना उदयास आल्यात.

म्हणजे कादंबरी वाङ्मय आणि 'राष्ट्र' संकल्पना या दोन्हींचा उदय एकाच कालखंडातील आहे. शिवाय दोन्हींचा उदय होण्यामागे ब्रिटिशांची राजवट हेच एक कारण आहे. त्यामुळे ज्या भावनेतून 'राष्ट्र' ही संकल्पना उदात्त होत गेली, त्यात कादंबरी वाङ्मयाचेही तितकेच योगदान आहे.

**कादंबरी लेखनाचा भोवताल :**

कादंबरीचा पट मुळातच व्यापक असल्याने तिचा भवतालही मोठा आहे. कादंबरी लेखक या भवतालाला जेव्हा पाहतो, तेव्हा त्यात एक बदल, मुक्ती आणि मोठी सामाजिक गरज दिसत असते. कादंबरी लेखक या भवतालाला शब्दात बोध कादंबरी घडत जाते. खुल्या मनाने या भवतालाला लेखक सामोरा जातो. लेखक म्हणून त्याचा असणारा सहसंबंध इथे महत्वाचा ठरतो.

'देश' या संकल्पनेचा उदय झाल्यापासून अगदी आधुनिक काळापर्यंतचा इतिहास पाहिला तर इथल्या भोवतालात समाज व्यवस्थेचा काय आणि तो संपवण्यासाठी संघर्ष किंवा चळवळी आणि नव्या मुल्यांची रूजवण, असाच प्रवास दिसतो. कधी हा संघर्ष परक्यांविरूध्द होता, तर कधी स्वकीयांविरूध्दच होता. त्यातून 'मुक्ती मिळविणे' हेच उद्दिष्ट असते. त्यातूनच वैचारीक मंथनही घडते. त्यातून भोवताल बदलतो. या सगळ्या भोवतालाच्या परिसरात कादंबरी घडताना दिसते.

**स्वातंत्र्यपूर्व कालखंड आणि कादंबरी :**

स्वातंत्र्यपूर्वकाळ म्हणजे ब्रिटिश राजवटीचा काळ. या काळात प्रथमच इथल्या सामाजिकतेला एक नवी दृष्टी लाभली. त्या नव्या दृष्टीत इथल्या जुन्या रूढी-परंपरांचे शोषण दिसू लागले. सामाजिक विषमता, अज्ञान, दारिद्र्य, स्त्री दास्यत्व, धर्माभिमानता, त्यातून आलेल्या श्रेष्ठत्वाच्या कल्पना हे सारे म्हणजे देश संकल्पनेला मारक आहे हे ही प्रथमच जाणवू लागले. त्या जाणवण्यातूनच हरीभाऊंच्या कादंबऱ्या निर्माण झाल्यात. त्यांच्या कालखंडात असणारे हे प्रश्न म्हणजे राष्ट्रासाठी प्रतिकूल नाहीत. या प्रश्नांना नीट सोडवले तर राष्ट्र अधिक चांगले होईल. या सामाजिक गुंत्याने घुटमळत राहणार नाही. पर्यायाने विकासाची गती वाढेल. असाच एक हेतू त्यांच्या लेखनामागे होता. कारण आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी सामाजिक सुधारणा अनुकूल अशा आहेत, हेच पटवून देण्याचा प्रयत्न केला. 'पण लक्षात कोण (१८९३)' ही सामाजिक कादंबरी आधुनिक कादंबरीचा पाया म्हणून ओळखतात. श्रीधर व्यं. केतकरांची 'ब्राह्मण कन्या', 'गावसासू', 'विचक्षणा', 'गोंडवनातील प्रियवंदा', 'आशावादी', 'भटक्या' अशा या कादंबरी लेखनातून समाजहितच जोपासले. केतकर स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी होते. त्यातूनच त्यांच्या कादंबरीतील नायिका, 'राष्ट्र म्हणजे बायका, पुरूष नव्हे !' असं सांगते. स्त्रियांनी अर्थार्जन करून ध्यायासक्त पुरूषाला साथ द्यावी, असाही विचार ते आपल्या कादंबरी लेखनातून मांडतात. वामन मल्हार जोशींच्या 'सुशीलेचा देव' इंदू काळे, सरला भोळे 'आश्रम हरिणी' या कादंबऱ्यांमधूनही समाजविकास तत्वालाच प्राधान्य दिलेले आहे.

अशा सामाजिक लेखनाबरोबरच समाजमनात ऐतिहासिकता जागवत स्वराष्ट्र अभिमानाची भावना तेवत ठेवणाऱ्या नाथमाधवांच्या कादंबऱ्या, त्यातील उणीवांसह उल्लेखनीय ठरतात. सहकारी कृष्ण यांची 'शापित महाराष्ट्र' अशाच ऐतिहासिकावार आधारित आहे.

ग. त्र्यं. माडखोलकरांची 'शाप' आणि भा. वि. वेटवकर यांच्या 'धावता धोटा', 'विधवाकुमारी', 'कुलदैवत', 'वेणू वेलणकर', 'शिपायाची बायको' या कादंबरी लेखनातून समाज सुधारणेचाच आविष्कार पहायला मिळतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात असलेली एकूण सामाजिकता आणि राष्ट्र स्वातंत्र्याची आस पाहता, या कादंबऱ्यांचे योगदान नाकारता येत नाही. या सर्व लेखकांनी आपआपल्या लेखनास या सामाजिक समस्यांचा उहापोह करत नवतेचा पुरस्कार केला आहे. स्वातंत्र्याचे मोल आणि त्यासाठीचे कार्य यांचे प्रेरणादायी चित्रण केले आहे.

**स्वातंत्र्योत्तर कालखंड आणि कादंबरी :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात देश स्वतंत्र झाला म्हणून एक स्वाभीमानाचा भाग समाज मनात होताच. मात्र मिळालेले स्वातंत्र्य देशवासीयांसाठी कसे असणार याविषयी विभ्रमही होता. राज्यकर्त्यांनी त्यासाठी चिंतन, मंथन केले. हरितक्रांती, यंत्रक्रांती यांसारख्या नव्या योजना आणल्या. राज्यघटना निर्माण करून स्वातंत्र्य, समता व बंधुता या मुल्यांवर आधारित समाजरचनेला महत्व दिले. शिक्षणाचे महत्व ओळखून त्याचा प्रसार केला. देशाचे संरक्षणही महत्वाचे आहे हे ओळखून त्याची बांधणी केली. स्त्री शिक्षणाला प्राधान्य देत बाल विकासाचाही ध्यास घेतला.

या सगळ्या घडामोडीत एकूणच समाजरचना, समाजमन यांच्यातही वेगवेगळ्या पातळ्यांवर बदल होऊ लागले. बदलणारी मूल्ये स्वीकारताना जुन्या मुल्यांची तोडफोड झाली. यंत्रयुगाने गावगाड्यांचे रूपच बदलले. काही वरवर वाटणाऱ्या गोष्टी अधिक गुंतागुंतीच्या झाल्यात. त्यातूनच चळवळ, आंदोलने यांचा उदय झाला. या पाठीमागे असलेली भूमिकाही स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणेच स्वातंत्र्याची होती. मात्र त्यात 'व्यक्ती स्वातंत्र्य', 'केंद्रवर्ती' होते. स्वातंत्र्य, समता व बंधुता याच मुल्यांचा जणू पाठपुरावा होता.

यातील दलित चळवळीने तर पारंपरिक मूल्यांना छेद देत 'माणूस' पणासाठी दिलेला लढा म्हणजे एक क्रांतीच होती. या क्रांती लढ्यामुळे महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरूजी ही माणसे आणि त्यांचे राष्ट्र उभारणीतले कार्य ठळकपणे अधोरेखित झाले. त्यांच्या कार्याच्या प्रेरणेतून हा मानवमुक्तीचा लढा अधिक तेजस्वी झाला. त्या प्रकाशणे इथल्या प्रत्येक माणसाचे आत्मभान उजळून निघाले. जाणीव जागृती झाली. या एकूणच जाणीव जागृतीने कादंबरी वाङ्मयाचाही चेहरा-मोहरा बदलला. तिच्या रूपात्मक मांडणीत खूप मोठा बदल झाला.

या समतेच्या चळवळीतून पहिला अविष्कार फकीरातून आण्णाभाऊ साठेंनी घडविला. त्यापुढील प्रत्येक कादंबरीत या समतेचा शोध वेगवेगळ्या पातळीवर ते घेतच राहिले. शंकरराव खरात यांनी झोपडपट्टी, माणुसकीची हाक, 'पोतराज', 'गावचा टिनोपॉल गुरूजी' यासारख्या कादंबऱ्या लिहिल्यात. हिं. गो. बनसोडे यांची 'मुक्ती संग्राम' हरिभाऊ पगारे यांची 'कालिंदी', ज. वि. पवार यांची 'बलिदान', अशोक लोखंडे यांची 'निष्ठा' यातून बदललेली मराठी कादंबरी म्हणजे राष्ट्र समतेच्या संग्रामातील साहित्यकृती आहेत. या साहित्य कृतीत आत्मभानाची प्रेरणा मांडली ती नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडवळा' आणि बाबुराव बागुलांच्या 'सूड' या कादंबऱ्यांनी / या मुक्तीसंग्रामाने एकूण समाजमन अनेक प्रश्न विचारत जाणीव प्रगल्भतेचा वसा घेतला. राष्ट्रसमतेला बाधा आणणाऱ्या गोष्टींना नाकारून राष्ट्राभिमानालाच बळ दिले. पुढे केशव मेश्राम, सुधाकर गायकवाड, अशोक व्हटकर, प्रेमानंद गज्वी, वामन इंगळे यांचेही त्यात योगदान महत्वाचे आहे. समाजवास्तवाला सामोरं जात निर्माण झालेलया या कादंबऱ्या आशयसूत्रापासून भाषाशैलीपर्यंत बदललेल्या आहेत. या बदललेल्या कादंबरी वाङ्मयातून घडणारे बदलही

तितकेच महत्वाचे मानावे लागतात. जे जे शोषित होते, त्या सर्वांनाच यातून बळ मिळाले. त्याचा परिणाम म्हणजे साहित्य चळवळीचा उदय हा आहे. कादंबरीच्या आशय-विषयांनी चळवळी निर्माण झाल्या. तसेच चळवळीमुळेही कादंबरी व्यापक होत गेली असा हा अनुबंध आहे.

या संदर्भाने ग्रामीण चळवळ, स्त्री मुक्ती चळवळ, आदिवासी चळवळ, कामगार चळवळ, मच्छिमाराची चळवळ, नक्षलवादी चळवळ आणि आजही दिसणारी शेतकरी चळवळ या सगळ्यांकडे पाहिले तर कादंबरी वाङ्मयाने शब्द माध्यमातून दिलेले योगदान लक्षात येते. नंतरचा कादंबरी वाङ्मयाचा अवकाश तर अशा परिवर्तनवादी विचार-प्रवाहांनी व्यापलेला आहे. हे विचारप्रवाह म्हणजे राष्ट्राच्या सुव्यवस्थेला आधार देणारे ऊर्जाप्रवाहच असतात. काही वेळा राष्ट्राच्या विकासाची गती थांबली आहे असे वाटते, तेव्हा-तेव्हा या विचारप्रवाहांनीच त्या गतीला प्रवाहीत केलेले आहे. अशा प्रवाहाची मांडणी म्हणजे कादंबरी वाङ्मय होय.

**कादंबरी वाङ्मय – सामाजिक दस्तऐवज :**

सामाजिक दस्तऐवज म्हणून कादंबरीकडे पाहिले जाते. त्यात समाजातील सर्व नातेसंबंधाचा पट सूक्ष्मपणे जसा व्यक्त होतो, तसेच अनुभवाचे कंगोरेही येतात. कठीण वाटणाऱ्या समस्यांच्या व्यूहांना सामावून घेण्याची शक्ती या कादंबरीमध्ये असते. त्यामुळे आंदोलने चळवळीतील संघर्षही कादंबरी वाङ्मय सामावून घेते. त्यातून समाजाला काही दिशादर्शक तत्व मिळतात. त्यामुळे राष्ट्राच्या जडणघडणीबरोबरच या कादंबरी वाङ्मयाचेही रूप बदलताना दिसते.

**निष्कर्ष :**

१. कादंबरी हा वाङ्मय प्रकार व्यापक आणि सर्वसमावेशक असा आहे.
२. जे लेखक समूहमनाला जवळून अनुभवतात, तेच कादंबरीच्या माध्यमातून समाजभिमुख होतात.
३. समाजातील समस्यांना, गुंतागुंतीच्या प्रश्नांना भिडताना नव्या विचारांचा पाठपुरावा करणारे कादंबरी वाङ्मय आहे.
४. व्यक्तीत्व निर्माण करणे व त्यातून आदर्श समाज घडविणे हे अप्रत्यक्षपणे कादंबरी वाङ्मयातून झालेले आहे.

या निष्कर्षांच्या आधारे आणि एकूण मांडणीद्वारे कादंबरी वाङ्मयाचे राष्ट्रीय जडणघडणीतील योगदान स्पष्ट होते. समाजाचे गुणात्मक परिवर्तन करत सामाजिक परिवर्तनाचे कादंबरी हे खूप मोठे माध्यम आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. जाधव रा. ग. – काही नोंदी – काही निरीक्षणे – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ १२०.
२. प्रा. भगत दत्ता – आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद,पृष्ठ १४१, १४२, १४३.
३. पाटील चंद्रकांत – आणि तोपर्यंत, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ नं. ८७-८८.
४. गवस राजन यांचा लेख ‘चळवळ आणि कादंबरी’, ‘अक्षरगाथा’, जानेवारी, २०१४, पृष्ठ १२१, १२२.

# यशवंतराव चव्हाण – राष्ट्रीय विचार

**प्रा.सौ. ऋचा ऋतुराज जांभळे.**
स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे.
मराठी विभाग

**प्रस्तावना –**

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व बहुरंगी, बहुढंगी होते. त्यांना वाचनाची आवड होती, साहित्याची त्यांना जाग होती. पुढे त्यांचा राजकारणात प्रवेश झाला आणि व्दिभाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यांनी विविध राजकीय पक्षांचा अभ्यास केला व कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. ते मातब्बर राजकारणी होते म्हणून दिल्ली मध्ये भारत- चीन युध्दाच्यावेळी पं. जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतरावांना मदतीसाठी दिल्ली मध्ये बोलावले. त्याचे राजकीय विचार स्पष्ट होते. त्यांची राजकीय विचार, मत यांचा विचार येथे करायचा आहे.

यशवंतरावांच्या व्यक्तीमत्वाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे ते सुसंस्कृत होते. स्वातंत्र्य लढयातील प्रत्यक्ष सहभागी यशवंतरावांची सार्वजनिक जीवनातील उमेदवारी सुरु झाली. स्वतंत्र भारताचे राज्यकर्ते म्हणून राष्ट्रीय स्तरावर वेगवेगळया जबाबदाऱ्या पार पाडल्या. इतर देशांकडेही लक्ष देऊन आपली व्युहनीती ठरवायला हवी असे त्यांनी सांगितले.

लहानपणी यशवंतरावांच्या जीवनावर, मनावर लोकमान्य टिळकांचा सर्वाधिक प्रभाव पडला होता. 'आपले सबंध जीवन सातत्यपूर्वक देशाच्या कामाकरिता द्यायचे हा टिळक व आगरकर यांनी घेतलेला निर्णय रोमहर्षक व ऐतिहासिक वाटतो''[२]. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी दिर्घकाळ लढा चालू असताना टिळकांचा आक्रमकपणा त्यांना भावला होता. या लढयात यशवंतराव स्वतः सहभागी झाले. २६ जानेवारीला झेंडा फडकविला होता म्हणून त्यांना अटक होऊन दोषी म्हणून शिक्षाही झाली. वयाच्या १७ व्या वर्षी यशवंतरावांनी आपल्या जीवनाची दिशा निश्चित करुन राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाले. दीर्घकाळ उराशी बाळगलेले स्वप्न सत्यात उतरणार होते. एक अमूर्त कल्पना मूर्त स्वरुपात येत होती. देशातील क्रांतीकारकांनी भारताचे स्वातंत्र्य खेचून आणले. त्यांचा यशवंतरावांना अभिमान वाटतो. स्वतंत्र्य ही देशाची एक वृत्ती, शक्ती आहे असे त्यांचे मत आहे. त्यांचा देशाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्र यावे आणि प्रगतीच्या, विकासाच्या दृष्टीने कार्य करावे असा विचार होता. राष्ट्र उभारणीची प्रक्रिया ही कोण एका व्यक्ती मुळे होत नाही. अनेकांचा यात समावेश असतो. 'राष्ट्र उभा करताना ती एक राष्ट्र उभारणीच्या प्रक्रिया आहेत त्यात अनेकांचा हातभार लागणार अशावेळी नानाविध विचारांना एकत्रित घेऊन त्या जायची भूमिका यशवंतराव करतात''[१].

यशवंतराव चव्हाण आपल्या राष्ट्र उभारणीबद्दल मत व्यक्त करताना राष्ट्राच्या निर्मिती अवस्थेत असणारा भारत स्वतःच्या पायावर उभा रहायचा असेल तर थोडा वेळ आपल्या राज्यकर्त्यांना दयावा लागेल. भारताला स्वातंत्र्य मिळाले पण या स्वातंत्र्याने आपल्या सर्वांवर मोठी जबाबदारी टाकली आहे, ती पूर्ण करणे हे आपले कर्तव्य आहे. ही जबाबदारी यशवंतरावांनी पूर्णपणे पेलली आहे. स्वातंत्र्याचा विचार व्यक्त करताना यशवंतराव म्हणतात, " सत्याचा शोध म्हणजेच स्वातंत्र्य" असा विश्वव्यापी विचार यशवंतराव मांडतात[१].

यशवंतरावांनी मुख्यमंत्रीपदाची धुरा प्रामाणिकपणे सांभाळली. त्यांनी आपल्या विरोधी पक्षाला देखील मदतीचा हात दिला. "१९५७ च्या निवडणूकीत कॉंगेसला बहुमत मिळाल्यानंतर यशवंतरावांनी मुख्यमंत्री म्हणून अत्यंत कुशलतेने काम केले. सर्वसमावेशक भूमिका घेऊन विरोधी पक्षाला त्यांनी सन्मानाने वागविले. महाराष्ट्रातील जनतेला जास्तीत जास्त विशुध्द, कार्यक्षम आणि निःपक्षपाती कारभाराची अनुभूती याकाळात आली आणि देशातले स्थिर आणि पुरोगामी अशी महाराष्ट्राची प्रतिमा निर्माण झाली."[२] जेव्हा यशवंतरावांनी मुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळली तो काळ राज्याचा उभारणीचा होता. पुरोगामी विचार महाराष्ट्रात रचविण्याच्यादृष्टीने बहुजन समाजाचा विचार करताना दलित अल्पसंख्यांकाना आधार दिला. शिक्षणाने माणूस प्रतिभासंपन्न होतो असे ते सांगतात. ते स्वतः एक विचारवंत साहित्यीक होते. समाजातील सर्व स्तरांमधील लोंकांनी शिक्षण घ्यावे असे त्यांचे ध्येय होते. शिक्षणाशिवाय सर्वांगीन प्रगती शक्य नाही याची खूणगाठ मनाशी बांधताना आर्थिदृष्टया दुर्बल असणाऱ्या आणि वार्षिक उत्पन्न रु.१२०० हून कमी असणाऱ्यांसाठी शिक्षणाची सोय केली.

ग्रामिण भागातील शेती व्यवसाय करणाऱ्या जनतेसाठीही त्यांनी आपले विचार स्पष्ट केले. शेतीचे उत्पन्न वाढावे त्यासाठी त्यांनी सहकारी चळवळीचा शेतीत समावेश केला. शेतीमध्ये विविध सवलती दिल्या. उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीत आधुनिकीकरण करावे असे त्यांचे मत होते. महाराष्ट्रात सहकार चळवळीचा प्रयोग शेतीत व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. षेती सुधारवायाची असेल तर 'शेती शिक्षण अत्यंत महत्वाचे असून शेतकरी आणि शेतीशी संबंधित असणारा माणूसही शहाणा असल्याशिवाय शक्य होणार नाही' यावर यशवंतरावांचा विश्वास होता'[२].

महाराष्ट्र राज्य प्रगत झाल्याचे चित्र आपण पाहतो ते यशवंतरावांमुळेच आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला गतिमान करण्याचे काम त्यांनी केली. साखर कारखानदारीमध्ये त्यांनी सहकाराचा प्रयोग केला. या धोरणामुळेच महाराष्ट्रात सहकारी संस्था, सहकारी तत्वावरील साखर कारखाने, सहकारी खरेदी-विक्री संघ, सहकारी बँका स्थापन झाल्या. त्यासाठी त्यांनी आर्थिक पाठिंबा उपलब्ध करुन दिला आणि ग्रामीण जनतेला समृध्दीच्या वाटेवर नेऊन ठेवले. यामुळे लोकांना रोजगार मिळाला आणि परिसराचा विकास झाला. १८ सहकारी साखर कारखान्यांची प्रथम नोंद करुन सहकारात नवा विक्रम केला. आज महाराष्ट्रात १३० पेक्षा जास्त साखर कारखाने आहेत ते यशवंतरावांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे.

सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी आपले भरीव योगदान दिले. पंचायत राज्याची चळवळ उभी करत असताना सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे या दृष्टीनेही प्रयत्न केले. ही सर्व प्रगतीची व विकासाची वाटचाल चालू होती. यातच १९६२ साली चीन व भारत युध्द झाले. या

युध्दाप्रसंगी भारताच्या पंतप्रधानांनी यशवंतरावांना केंद्रात पाचारण केले. महाराष्ट्राच्यादृष्टीने हा गौरवाचा आणि अभिमानाचा क्षण होता आणि त्याचबरोबर दु:खाचाही होता. पण ''महाराष्ट्राने, 'सहयाद्री हिमालयाच्या संरक्षणासाठी धावला' अशी भावना मनात ठेवत यशवंतरांनी निरोप दिला''[१].

यशवंतरावांनी १९६२ पासून ते जीवनाच्या अखेरीपर्यंत राजकारणात राहिले. या त्यांच्या राजकीय विचारांमुळे काही काळाचा अपवाद वगळता ते सत्तापदावर कार्यरत राहिले. संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृह, परराष्ट्र याबरोबर देशाचे उपपंतप्रधानही झाले. महाराष्ट्राचा सुपुत्र लोकप्रेमाच्या शिदोरीवर राष्ट्रीय पातळीवर स्थिरावला.

१ मे १९६२ रोजी यशवंतरावांनी महाराष्ट्रात पंचायत राज्याचा कारभार सुरु केला. जिल्हा- तालुका व ग्रामस्तरावर लोकशाही सत्तेचे विकेद्रीकरण प्रत्यक्षात आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले कारण त्यांनी जिल्हा परिषद व पंचायत राज्याची योजना प्रत्यक्ष आमलात आणली.

सत्तेचा वापर त्यांनी पुरोगामी दृष्टीने केला. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असताना यशवंतराव यांनी राष्ट्रवादाची कल्पना व्यापकपणे मांडली आहे. त्यांनी आयुष्यभर माणूसकेंद्री राजकारण केले. भारताची सीमा स्पष्ट करताना म्हणतात, ''भारताच्या सीमा म्हणजेच भारत अशी भूमिका न ठेवता, हिदुस्थान म्हणजे या देशातील नद्यांच्या काठावर कशीबशी कालक्रमणा करणारे, या देशाच्या माळरानात, डोंगर कपारीत उपेक्षित जीवन जगणारे या देशाच्या विस्तीर्ण पठारावर जीवन संग्रामाला हतबल झालेले असे लक्षावधी, कोटयावधी लोक आहेत. ते लोक म्हणजे हिंदुस्थान असे म्हटले आहे''[१].

भारताची उभारणी करण्याच्या दृष्टीने विविध मते मांडली. राजकीय, सामाजिक, बौध्दीक, आर्थिक या पातळयांवर कोणती धोरणे राबवायची याची चर्चा झाली. यशवंतरावांनीही यासंबंधी विचार मांडले. भारताच्या राजकीय ध्येयधोरणाची उभारणी करताना पहिले ध्येय म्हणजे प्रादेशिक व राजकीय एक्य निरंतर ठेवण्याचे असायला हवे. दुसरे धोरण राष्ट्र उभारणी करताना लोकशाही प्रधान व स्वतंत्र्य समाजाची निर्मिती करणे. त्यांनी प्रजासत्ताक लोकशाहीचा पुरस्कार केला. 'समतेचे तत्व मानण्या बरोबरच एकत्वाचा संदेशही दिला, ही व्यवस्था सुरळीतपणे समाजात रूजवण्यासाठी लागणाऱ्या 'राजकीय संस्थेचे संवर्धन' ही बाबही त्यांना महत्वाची वाटते'[१] न्यायव्यस्था त्यांनी महत्वाची मानली. तिसरे ध्येय म्हणजे राष्ट्रसंरक्षणाच्या अद्ययावत तयारीला प्राधान्य देणे. देश सुरक्षित असेल तरच देशातील लोक सुरक्षित होतील. या भावनेमुळेच त्यांनी संरक्षण सिध्दतेला महत्वाचे स्थान दिले. देशाच्या संरक्षणाची अद्ययावत सामग्रीची गरज अपरिहार्य मानली.

यशवंतरावांनी विज्ञानावादी भुमिकेला नेहमीच महत्व दिले. लहानपणापासून झालेले संस्कार शिक्षणामुळे आधुनिक विचारांचा झालेला परिचय आणि देश विदेशामधील लोकांच्या जीवनाचा अनुभव घेत असताना त्यांच्या मनात माणूस केंद्री विचार प्रबळ होत गेले. त्यांनी परमेश्वर या संकल्पनेवर श्रध्दा ठेवली पण विचार मात्र वस्तुस्थितीचे मान ठेवून केले त्यामुळे त्यांनी भारत खऱ्या अर्थाने नवा व्हायचा असेल तर जुने मोडून टाकल्याशिवाय पर्याय नाही असे त्यांचे मत आहे.

देशाची उभारणी करताना अनेक गोष्टींचा पुन:विचार करावा लागतो. देशात राहणारी माणसेच देशाचा आत्मा असतात. त्यामुळे लोकांच्या जीवनाचा स्वास्थाचा आणि भविष्याचा विचार करून राज्यकर्त्यांनी आपली धोरणे राबवावीत ही भावना प्रबळ करावी. असे ते म्हणतात त्यांच्या मते लोकांच्या मनातील जुनाट परंपरा आणि त्यामध्ये अडकलेल्या भारतीय मनाला बाहेर काढावे लागेल असे त्यांचे मत आहे. बुध्दीवंतांनी लोकांचे वैचारिक प्रबोधन करून त्यांच्या मनातील आंतरिक शक्तींना जागृत करून विचारांची वाट मोकाट करावी असे मानले.

यशवंतरावांनी राजकारणी म्हणून समाजात कोणकोणते बदल करावयाला हवे ते सांगितले स्वातंत्र्य ही अमृर्त कल्पना आहे असे स्पष्ट केले. राष्ट्राची च देशाची प्रगती कोणा एका व्यक्तीची नाही तर ती एक सामुहायिक जबाबदारी आहे असे सांगितले. राष्ट्र उभारणीसाठी आपले राष्ट्रीय विचार व्यक्त करतना त्यांनी पुरोगामी विचारांच्या दृष्टीने कार्य केले असे यांचे विचार व त्यांची दिशा या दृष्टीने विचार करणे सध्याच्या काळात महत्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. राजेखान शानेदिवण यांचे 'यशवंतराव चव्हाण यांची वैचारिकता', अक्षर प्रकाशन.
२) रामभाऊ जोशी यांचे 'यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा', श्रीयशोदा प्रकाशन.
३) केशव बा. वसेकर यांचे 'सहयाद्रीचे वारे एक अभ्यास', पवन प्रकाशन.

# कविवर्य नारायण सुर्वेंचे साहित्यातील योगदान
## (सुर्वेंच्या कवितेतील स्त्री रुप)

**श्री. संभाजी राजाराम उबारे**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री लहू बाळा परितकर कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, पणोरे,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.

**प्रस्तावना**

साहित्य सामाजिक घटनाक्रमाच्या साक्षीने वास्तवाच्या मुशीत आकार घेत असते. साहित्याचा मानवी समाजातील वास्तविकतेशी अतूट संबंध असतो. साठीपुर्व मराठी साहित्य आत्मकेंद्री, व्यक्तिवादी व मर्यादित अनुभववर्तुळात अडकलेले होते. एकूणच मराठी कविता या काळात सामाजिक जीवनातील विरोध-विसंगतीचा अर्थ लावण्यास दुबळी ठरली. ही कोंडी फोडण्याचे कार्य नारायण सुर्वेंच्या कवितेने केली. या तलवार हाती घेतलेल्या सारस्वताने उपेक्षितांच्या अंतरंगाचा मनस्वी वेध घेतला. शोषण, विषमता, छळ, अन्याय यांच्या विरोधातील विद्रोहांना सुर्वे यांनी कलात्मक काव्याकार दिला. या नव्या युगाच्या कवीने वास्तवातील निखारे साहित्यात आणून मराठी कवितेला जिवंतपणा आणला.

कविवर्य नारायण सुर्वेंनी 'ऐसा गा मी ब्रम्ह', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'सनद' यांसारख्या काव्यसंग्रहातून वास्तव समाजजीवनाचे दर्शन आपल्या कवितेतून केले. सुर्वेंची कविता ही स्त्रीरुपाचा जागर करताना आढळते.

**कविवर्य नारायण सुर्वेंच्या साहित्यातील स्त्रीरुप**

नारायण सुर्वेंनी वास्तवाचे चित्रण करताना आपल्या कवितेमध्ये अनेक चित्रे रेखाटली. 'आफ्रिकी चाचा', 'शीगवाला' या पुरुषांच्या प्रमाणेच 'चंद्रनायकिणी' चे चित्रणही कवितेतून केले.

'स्त्री' ही कवितेसाठी प्रेरक शक्ती आहे. स्त्रीची कवितेत आई, बहिण, प्रियसी, मैत्रीण, पत्नी यासारखी अनेकविध रूपे पहायला मिळतात. कवि नारायण सुर्वेंच्या कवितेतील 'स्त्री' ही निर्मितीक्षम जगातील महत्त्वाची भागीदार म्हणून समोर येते.

कवीच्या व्यक्तिगत भावविश्वाकडे पाहिले असता तिथली स्त्री ही एका वेगळ्या अर्थाने सृजनदायीच आहे. तिच्या केवळ 'किती वाळलात तुम्ही' या सारख्या उद्‌गाराने त्यांच्या हृदयाचे पोलाद होते. त्यांच्या पद्य पंक्तीवर तिच्या पापण्यांचा सततचा 'पहारा' असतो. त्यामुळेच की काय कवी सतत कवितेत सत्याचा आग्रह धरतो.

एकूणच जीवनाच्या प्रवासामध्ये तिने त्याला फूलासारखे जपताना स्वतःही 'झाड', 'आकाश' अशा विविध भूमिकात वावरून एका अर्थाने त्याला या नवसृजनाच्या कार्यात साथच केलेली दिसते. आयुष्यभराच्या कष्टी जिण्यानंतरही व्यक्तिगत जीवनातले स्वतःचे फुलपण कायम ठेवून कवीला सतत कार्यरत ठेवणे ही महत्त्वाची जबाबदारी या स्त्रीयांनी पार पाडली आहे. म्हणूनच कवी एके ठिकाणी म्हणतो,

*खूप दूरवर नांगरून पडला आहे उजेड*
*खुशीत आहे मी; तुझे फूलपण*
*तुला विसरले नाही*
(दगड : माझे विद्यापीठ)

सुर्व्यांच्या कवितेत 'स्त्री' अनेक नात्यांनी येते. कधी प्रेयसी, कधी पत्नी, कधी आई तर कधी संपातील सहकारिणी म्हणून. नारायण सुर्वेंची कविता विवाहपूर्व प्रणयातील हुरहुर, आर्तता, अनामिक कातरता, गोड शिरशिरी, बेहोशी, मादकता, सौंदर्यासक्ती त्यांनी बहरलेली कविता नाही तर समाज जीवनातल्या उत्पादन व्यवस्थेत ही 'स्त्री' प्रत्यक्ष क्रियाशील आहे आणि त्या अर्थाने ती 'सृजनशील स्त्री' च आहे.

ताऱ्यांपलिकडून येणारी नवरचना याच वस्तीतून येईल असा विश्वास ज्या कविमनाला वाटतो त्या कविमनाला विश्वास, दिलासा म्हणून ती एके ठिकाणी म्हणते,

*थांब! पहाट झाली नाही*
*दिवे मालवून कसे चालेल?*
*तू थकला असशील तर*
*माझी देहवात पेटवून ठेव*
('धीर', माझे विद्यापीठ)

विझता विझता श्वास पेरून जाणारी ही स्त्री कविला आत्मबळ देते. त्यामुळे ज्या प्रत्यक्ष क्रांतीची कविमन अपेक्षा करतो. त्या प्रत्यक्ष संघर्षातदेखील ही स्त्री सृजनशीलच राहिलेली आहे.

सुर्वेच्या कवितेतील स्त्री आपल्यासोबत कारुण्य घेऊन येते. 'माझे विद्यापीठ', कवितेमधली चंद्रा नायकिणीची फरफट आणि 'डेकवर' कवितेमधल्या मादामच्या पतीच्या मृत्यूनंतरचा 'कुठल्याशा खोल समुद्रात' चाललेली एकाकी प्रवास हे कारुण्याचेच प्रतिनिधीत्व करताना आढळतात.

वैफल्याने त्रासलेल्या स्त्री जीवनात अपरिहार्य म्हणून वेश्या व्यवसायासारखा घृणास्पद व्यवसाय येतो. समाजातल्या विशिष्ट वृत्ती-प्रवृत्ती तिचे शरीर हे तिच्या उपजीविकेचे साधन बनवितात. 'मनिआडर' ही या संदर्भातील वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. या कवितेत ही स्त्री असे घृणास्पद जीवन का स्वीकारते तिचे अगतीकता दिसून येते.

*म्होरं लिवा-*
*मनिआडर उशीरानी का व्हयना,*
*पर जाती*
*म्हणाव-नवीन वजरटिक घडवलीय*
*वाक्या पाटिवल्यात इष्णूकडं*
*आन् धा कमी पन्नास रुपयं बी*
*त्येचं गंगीला याक पुस्तक घ्या.*

समाज जीवनाच्या अनेक अनैतिक समस्यांनी स्त्रीचे आयुष्य पूर्ण होरपळून जाते. रूढी आणि परंपरेच्या दगडाखाली सापडलेल्या प्रौढ कुमारिकांचे दाहक जीवन सुर्वेंनी 'दुःख' सारख्या कवितेतून मांडले आहे. थोडक्यात वास्तव जीवनातल्या अनैतिक रूढींनी समाज जीवनात 'स्त्री' ची केलेली कोंडी आणि त्यातून 'स्त्री' च्या अस्तित्वाला भेडसावणारे प्रश्न तिच्या जीवनातील असुरक्षितता साऱ्यामधून स्त्रीच्या अस्तित्वाबद्दलचे मूलभूत प्रश्न समोर येतात.

पती-पत्नीच्या नात्यातील ओलावा बाह्य वास्तवाचा ताण कमी करतो. त्यामुळेच कवितेत पती-पत्नीचा शृंगारानुभव देखील कवीच्या भोवतालच्या वास्तव जीवनाचे संदर्भ घेऊनच कवितेत व्यक्त होतो. एके ठिकाणी कवी म्हणतो,

*तुझे गरम ओठ : ओठांवर टेकलेस तेव्हा,*
*तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी*
*पलिकडे खडखडणारे कारखाने*
*खोल्याखोल्यातून अंथरले बिछाने*
*मुल्लाचा अखेरचा अल्लासाठी गजर*
*काटे ओलांडीत चालले प्रहर* ('सत्य' - माझे विद्यापीठ)

सुर्वेच्या कवितेमधील स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वांना परिपूर्णता लाभलेली असल्यामुळे त्यांच्यामधल्या संबंधांना सामंजस्य, सुजाणता प्राप्त झालेली आहे. त्यामुळेच हे स्त्री-पुरुष परस्परांचा राग, द्वेष, तिरस्कार समजून घेतात. यामुळेच त्यांच्या कवितेतील पुरुष स्त्रीला म्हणतो जेव्हा मी अस्तित्वाच्या पोकळीत नसेल तेव्हा चिरवेदनेच्या नादी न लागता 'नवे घर' करण्याचा सल्ला देतो.

एकूणच सुर्वेच्या कवितेमधील स्त्री ची कुस पवित्र आहे. काया मखमली, स्पर्श अमृताचा आहे. तिच्या मुठीत मेघझरा असल्याचा विश्वास कवीला वाटतो. पतीवर मायेचे पांघरूण घालणारी ती पत्नी आहे. गलबलून गेलेल्या कवीला आश्वासन देण्याची ताकद तिच्या स्पर्शात आहे. अशा या पत्नीचे भारलेले, सावरणारे छत्ररुप हात कवीला जीवनाच्या सर्व क्षेत्रात हवेहवेसे वाटतात.

सुर्वेची कविता ही भोळ्या सहानुभूतीवर आधारलेली नसून ती खऱ्याखुऱ्या ज्वलंत वास्तवाच्या आधारावर एका नव्या मानुषतेचा शोध घेणारी आहे. त्यांची कविता त्यांच्या जीवनातून अंकुरली. कामगारवर्गाच्या जीवनातून बहरली. शोषित-उपक्षितांच्या वास्तवाशी भिडली आहे. सुर्वेच्या कवितेत जीवनावरची व जनसमुहाच्या क्रांतीकारी सृजनशीलतेची डोळस व समंजस श्रद्धा सूक्ष्म संवेदनशीलता, सहज सोप्या शब्दांमधील प्रतिमा सामर्थ्य आढळते. म्हणूनच नारायण सुर्वेच्या कवितेतील स्त्री खऱ्या वास्तव जीवनाला भिडते आणि ती वाचकाला 'स्व' कडून समष्ठीकडे कधी घेऊन जाते हेच कळत नाही. यावरून कविवर्य नारायण सुर्वेचे साहित्यातील योगदान लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. प्रदक्षिणा खंड दुसरा
२. सुर्व्यांच्या कवितेची इहवादी समीक्षा
३. सर्व सुर्वे (सुर्व्यांच्या कवितेतील स्त्रीरुप - निळकंठ कदम)
४. सुर्वे यांची प्रेमकविता - चंद्रकांत बांदिवडेकर
५. माझे विद्यापीठ - काव्यसंग्रह - नारायण सुर्वे
६. जाहीरनामा - काव्यसंग्रह - नारायण सुर्वे

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

## कुसुमाग्रजांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवा

**प्रा.आशालता नारायण खोत**
मराठी विभाग देवचंद कॉलेज,अर्जुननगर,ता.कागल

**प्रस्तावना** - साहित्य हे मानवाला प्राप्त झालेल्या वाणीच्या शक्तीचा एक आविष्कार दिसून येतो.मानवी जीवनामध्ये कलात्मक साहित्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिसून येते.कोणत्याही समाजात सामाजिकता दिसून येते.साहित्यातून मनुष्याच्या सर्जनशीलतेचा आविष्कार होत असतो.समाजाचे स्थैर्य व प्रगती यासाठी तत्त्वज्ञान आणि विज्ञान हे घटक आवश्यक असतात.परंतु तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांना कलेची जोड लाभल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णतः येत नाही.कला ही मानवी जीवनाला समग्रतेने अर्थपूर्णता आणत असते.मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनातील प्रवाहांचा वेध घेण्याचे सामर्थ्य साहित्यामध्ये दिसून येते.साहित्यातून विशिष्ट काळाचे,प्रदेशाचे, संस्कृतीचे रूप प्रतिबिंबित झालेले असते.त्यामुळेच केवळ संस्कृतीचे वर्णन करणे एवढेच साहित्याचे काम नसते;तर संस्कृतीचे संगोपन,संवर्धन प्रसार करण्याचे साहित्यिक माध्यमातून करीत असतात.

कुसुमाग्रजांनी नाटक आणि कविता या दोन वाङ्मयप्रकारांमध्ये विपुल लेखन केले आहे.कथा,कादंबरी,ललितगदय,एकांकिका,समीक्षा या सर्व प्रकारांतून लेखकाची जीवनदृष्टी साहित्यातून कशी प्रतित होते हे दिसून येते.कुसुमाग्रजांच्या कवितेतून मराठी माणसाचे मनोगत व्यक्त झालेले.दिसून येते.सत्य,शिव आणि सौंदर्य यांचा शोध त्यांच्या कवितेत दिसून येतो.त्यांनी आपल्या साहित्यातून जीवनमूल्ये चित्रित केली.कुसुमाग्रजांच्या साहित्यातून सामाजिक बांधिलकी,सामाजिक जाणिवा दिसून येतात.

**विषय विवेचन** - कुसुमाग्रजांचा पहिला काव्यसंग्रह 'जीवनलहरी'(१९३३)होय.या काव्यसंग्रहातून कुसुमाग्रजांनी जीवनाचे अवलोकन केलेले दिसून येते.त्यामुळे त्या जाणिवांमध्ये तीव्रता,भेदकता या बरोबरच समाजातील गोष्टींचे त्यांनी प्रातिनिधिक स्वरुपात चित्रण केले.त्यामुळे त्या काव्यसंग्रहाची भाषा 'स्व' ची दिसत नाही.ती संपूर्ण समाजाशी बांधिल दिसून येते.अनेक पातळीवरील जीवनाच्या संदर्भातील आपल्या क्रिया-प्रतिक्रिया त्यांनी त्या काव्यसंग्रहातून नोंदविल्या.काही कवितांमधून त्यांनी मानवतेवरील निष्ठा,स्वातंत्र्य,समता या मुल्यांचा अंकुर रुजवला गेला.

त्यानंतरच्या कवितांमधूनही त्यांनी मानवी जीवनावरील अपार श्रद्धा,स्वातंत्र्याची अपेक्षा, जीवनाची,भविष्यकाळाची आशावादी भूमिका मांडलेली दिसून येते.समाजनिष्ठा आणि मानवी स्वातंत्र्याविषयीची तळमळ हे विषय त्या कालखंडात कवितांमधून येत होते.तसेच कुसुमाग्रजाच्या कवितेत सामाजिक परिवर्तन आणि व्यक्तीस्वातंत्र्य दिसून येते.जीवन सुंदर असून ते अधिक सुंदर करण्यातच माणसाच्या जगण्याचे तथ्य आहे.एखादा माणूस निघून गेला तर त्याची जागा रिकामी राहत नाही;तर ती भरून निघतच असते.हा सृष्टीचा क्रम असतो.म्हणूनच ते म्हणतात कि,

म्हणतो हे माझे घर — भ्रमरापरि कमलातिल
म्हणतो हे माझे जन — त्यामध्ये गुंते मन

त्यामुळे 'जीवनलहरी' काव्यसंग्रहातून त्यांनी मानवतेवरील निष्ठा व्यक्त केलेली दिसून येते.

'विशाखा' (१९४२) मधून राष्ट्र,समाज,ईश्वराचे अस्तित्व या संदर्भातील अनुभव अधिक प्रखरतेने मांडले.समाजमनाचे 'हृदगत' कुसुमाग्रजांच्या कवितांमधून व्यक्त होऊ लागले.साहित्य हे केवळ सामाजिक,भावनिक प्रकटीकरण किंवा समाज प्रबोधनासाठी निर्माण होत नसले तरी प्रत्येक माणसाच्या हृदयाचे बोल कुसुमाग्रजांच्या कवितेतून व्यक्त होऊ लागले.मानवी जीवनाच्या संदर्भातील अनंत समस्या,जीवन जगण्यातील अडचणी,त्यांचा उदगार कुसुमाग्रजांच्या कवितेतून होऊ लागला.त्यामुळे त्यांचा कवितेतील उदगार सर्वसामान्यांना आपला वाटू लागला.देशाविषयी, समाजाविषयी आपल्या मनात येणारे विचार,सत्ताधा-यांविषयीची चीड त्यांच्या कवितेतून येऊ लागली.तरुण पिढीच्या मनामनांच्या क्रिया-प्रतिक्रियांचा वाङ्मयीन आविष्कार 'विशाखा' मधून झालेला दिसतो.

कोणताही कलावंत हा समाजाचा एक अविभाज्य घटक असतो.कलावंताचे भावतरंग, विचारतरंग कल्पनेत उतरून त्यातूनच कलानिर्मिती होत असते.सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या समाजपरिवर्तनाच्या बाबतीतील ज्वालामुखी कुसुमाग्रजांच्या कवितेतून जागृत झाला.सामाजिक असंतोष,राजकीय परिवर्तने यांची वर्णने कवितेतून येऊ लागली.कुसुमाग्रजांच्या कवितेत राजकीय पारतंत्र्य,माणसां-माणसांमधील भेद व्यवस्था यावर प्रखर हल्ला दिसून येतो. 'स्वप्नांची समाप्ती', 'गर्जा जयजयकार', 'स्मृती', 'प्रीतिविण' या रुपबंधाच्या दृष्टीने वेगळया असणा-या कवितांमधूनही त्यांनी बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे वर्णन केलेले दिसून येते.

माणसानेच माणसाला जगण्याच्या अधिकारापासून वंचित करणे यासारखे दुसरे अधम पाप कोणतेही नसेल.जीत आणि जेते, स्वतंत्र-परतंत्र, राजा-प्रजा हे दुरावे निर्माण करणारीही माणसेच आणि त्यांचा जुलूम,अन्याय याविरुदध लढणारी हीदेखील ध्येयवेडी माणसेच असतात.माणसाने चालविलेला हा निर्दयी छळ केव्हा,कुठे,कसा थांबणार? त्यामुळेच 'क्रांतीचा जयजयकार' ,'जा जरा पुर्वेकडे','आव्हान','सात','बंदी' या कवितांमधून राजकीय पारतंत्र्याने पेठून उठलेल्या देशभक्त तरुणाचे वर्णन दिसते.

'हे हृदय नसे परि स्थंडिल धगधगलेले
आशांचे इंधन अखंड त्यावर चाले'

अशी या तरुणांची भावना दिसून येते.आणि तरीही हे तरुण

'येईल असा सोन्याचा दिन,
तुटेल हे पोलादी बंधन'

या विश्वासाने,खात्रीने जगताना दिसतात.त्यांच्या कवितांमधून स्वातंत्र्यासाठी जीवनाची होळी करणारे तरुण भेटतात.छातीवरती प्रहार झेलता-झेलता येणारा अंतःकाळ आणि त्यातून आलेली विषण्णता देखील'पावनखिंडीत'या कवितेतून दिसून येते.

समाजरचनेत फार प्राचीन काळापासून भेदाभेदांमुळे माणसांमध्ये प्रचंड भावनिक दरी दिसून येते.श्रेष्ठ-कनिष्ठ,उच्च-नीच अशी विभागणी केल्यामुळे समाजात आलेले दुःख दिसून येते 'बळी','लिलाव','गुलाम' या कवितांमधून सामाजिक भेद व त्याचे विदारक चित्रण दिसून येते 'हिमलाट' जगावर येताच श्रीमंत आणि गरीब यांच्यावर त्याचा काय परिणाम होतो.त्याचे चित्रण कवी आपल्या कवितेतून करतात.त्यावेळी ते म्हणतात की,

ज्योतीतुनि धावत या तेजःकण सारे रे ढाळ नमा, तव ते ज्वालामय तारे
या यज्ञातील अन् सरणातील निखारे पेटवू दया वणवा कणाकणांत मशाली

अशा प्रकारे सामाजिक जाणिवांचे वर्णनही कुसुमाग्रज करतात.माणसाचे माणूसपण आणि त्याच्यावर लादली गेलेली परिस्थिती यामुळे कुसुमाग्रज अस्वस्थ होतात.त्यामुळेच माणसाचा मोठेपणा,त्याचे कार्य,आकाशाला भिडणारे त्याचे कर्तुत्व आणि व्यक्तित्व यांच्याविषयी त्यांच्या मनात विलक्षण आस्था,आदर दिसून येतो.त्यांच्या 'समिधा'(१९४७)ह्या काव्यसंग्रहातूनही जीवनाविषयीचे चिंतन आणि त्यासंबंधीच्या क्रिया-प्रतिक्रिया दिसून येतात.

कवितेप्रमाणेच कुसुमाग्रजांच्या नाटकांमधूनही त्यांचे सामाजिक चिंतन दिसून येते.'नटसम्राट' हया नाटकामध्ये त्यांनी कौटुंबिक,सामाजिक जीवनस्तरातील अनेक गुंतागुंतीचे अनुभव चित्रित केले.हया नाटकात बाह्यसंघर्षाबरोबरच आत्मसंघर्ष प्रामुख्याने मांडला.तसेच मानवी जीवनातील अनेक मूल्ये,त्याचे स्वरूप,जगण्यातील अपरिहार्यता,परस्पर नातेसंबंध यासारख्या अनेक गोष्टींवर प्रकाश टाकलेला दिसून येतो.या नाटकात भावनिकतेबरोबरच वैचारिकताही दिसून येते.कुसुमाग्रजांच्या सर्वच नाटकांमधून जीवनावादाचा पुरस्कार दिसून येतो.माणुसकीचे,मानवतेचे दर्शन त्यांच्या नाटकांमधून दिसून येते.उदा.कावेरीच्या पश्चात एकाकी राहत नाही तर विठोबा आणि राजा त्यांना जवळ करतात.म्हणजेच इथे माणुसकीचे दर्शन लेखक घडवितात.

'दुसरा पेशवा'मध्ये त्यांनी वेगवेगळ्या व्यक्तींच्या भावजीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.विशिष्ट मूल्यांसाठी आयुष्य वेचणारी माणसे ही अंतिमतः पराभूत झाल्यासारखी वाटतात.तरीही ती माणसे पराभूत होत नसून प्रत्येक क्षणासाठी त्यांनी जीवनामध्ये दिलेला झगडा हाच त्यांचा दुर्दम्य विजय असतो.या नाटकामध्ये इतिहास केंद्रबिंदू नाही.तर ऐतिहासिक व्यक्ती म्हणून बाजीराव आणि बाजीरावाचा परिवार त्यांनी या नाटकातून चित्रित केलेला दिसून येतो.भारतीय श्रद्धा,जीवनमूल्ये,जीवननिष्ठा,एकत्र कुटुंबपद्धती,कौटुंबिक व जीवनातील पिढ्यांपिढयांचे संगोपन करण्याची शिस्त,धर्माधिष्ठित जीवन व्यवहार यांचे चित्रण थोडया प्रमाणात का होईना पण 'राजमुकुट' मध्ये दिसून येते.

'आमचं नाव बाबूराव' हे कुसुमाग्रजांचे एक स्वतंत्र सामाजिक विनोदी नाटक म्हणून लक्षात घ्यावे लागते.हया नाटकातील बाबूरावच्या प्रत्येक कृतिउक्तीला दोन अर्थ दिसून येतात.दोन माणसांच्या चेहऱ्यातील साम्य या मूळ पायावर हे नाटक आधारित आहे.त्यामुळे एका विशिष्ट वर्गाचे नेतृत्व करणारा बाबूराव आणि सर्व जनतेचे पालन करणारा राजा यांच्यातील चाललेला गोंधळ लेखक या नाटकातून मांडतात.समाजकारण व राजकारण यातील द्वेष,खोटेपणा या गोष्टी या नाटकातून प्रखरतेने मांडल्या.'ययाति आणि देवयानी'या नाटकामध्ये त्यांनी महाभारतातील मूळ कथानकात काही बदल घडविले.

'बेकेट' या नाटकामधून त्यांनी माणूसकी,मानवतेवरील अपार श्रद्धा,मानवी जीवनमूल्ये,सत्य तत्त्वावर आणि शिवत्त्वावर निष्ठा असणारी माणसं आणि त्याच सत्यासाठी जीवनाचा यज्ञ करणारी माणसं चित्रित केली.'विदूषक'या नाटकातूनही त्यांनी माणुसकीची नितळ भावना असलेला बगाराम चित्रित केलेला दिसून येतो.

अशा प्रकारे कुसुमाग्रजांच्या साहित्यातून एक जीवनदृष्टी दिसून येते.त्यांच्या जीवनदृष्टीत आणि साहित्यदृष्टीत तादात्म्य दिसून येते.'ईश्वरविषयक निष्ठांपेक्षा मानव निष्ठा महत्त्वाची'हाच आशय त्यांच्या साहित्यातून दिसून येतो.त्यांच्या साहित्यात 'माणूस,मानवता,जीवनमूल्ये' ही महत्त्वाची मानलेली प्रामुख्याने दिसून येतात.जीवनविषय जाणिवा त्यांच्या साहित्यात दिसून येतात.

**सारांश–**

१) कुसुमाग्रजांच्या कवितेतून माणूस,मानवता हा महत्त्वाचा घटक दिसून येतो.त्यामुळेच सत्य,शिव,सौंदर्य यांचा शोध त्यांच्या कवितेत दिसून येतो
२) साहित्यातून केवळ सामाजिक,भावनिक प्रकटीकरण होत नसते,तर समाजप्रबोधनाबरोबरच माणसांच्या हृदयाचे बोल व्यक्त होत असतात.
३) त्यांच्या कवितांमधून सामाजिक जाणिवांची वर्णने तर येतातच;पण त्याचबरोबर जीवनाविषयीचे चिंतनही दिसून येते
४) कुसुमाग्रजांच्या नाटकांमधूनही सामाजिक चिंतन दिसून येते.तसेच माणुसकीचे,मानवतेचे दर्शनदेखिल त्यांच्या नाटकांमधून घडते
५) भारतीय श्रद्धा,जीवनमूल्ये,जीवननिष्ठा,एकत्र कुटुंबपद्धती,कौटुंबिक व सामाजिक जीवनव्यवहार यांची वर्णने त्यांच्या नाटकांमधून दिसून येतात

**संदर्भ ग्रंथ–**

१) संपा.प्रा.नागनाथ कोत्तापल्ले – साहित्य आणि समाज - प्रतिमा प्रकाशन,पुणे.प्रथमावृत्ती १३मे २००७
२) संपा.गो.मा.पवार, म.द.हातकणंगलेकर– मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप - पॉप्युलर प्रकाशन,पुणे.प्रथमावृत्ती १९८६
३) उषा मा.देशमुख – कुसुमाग्रज साहित्यदर्शन - शलाका प्रकाशन,मुंबई.प्रथमावृत्ती मे १९८९

# राजर्षि शाहू महाराजांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान

**कु. शैलजा शहाजी हिरवे**
मराठी विभाग (बी.ए. भाग-२)
म. ह. शिंदे महाविद्यालय,तिसंगी.
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर

**प्रास्ताविक :**

चौथे शाहू, अर्थातच राजर्षि छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर राज्याचे इ.स. १८८४–१९२२ सालादरम्यान छत्रपती होते. शाहू महाराज प्रभावी समाजसुधारक तर होतेच पण त्याचप्रमाणे ते सुधारणावादीही होते. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व कार्यांचा वारसा मोठया समर्थपणे घेवून जाण्याचे कार्य करणारा एक महान मानवतावादी राजा म्हणून राजर्षि शाहू महाराजांनी आपली ओळख निर्माण केली. या व्यापक दूरदृष्टीच्या राजाने त्याकाळी राजेशाही असतानासुध्दा सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये आजच्या लोकशाहीतील शासनालाही करणे शक्य होत नाही असे अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून राजाज्ञा काढली. अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पध्दत बंद केली यामागे अस्पृश्यता नष्ट करणे हा मुख्य हेतू होता. तसेच जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. राजर्षि शाहूंनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या संस्थानात जनहितार्थ अनेक कायदा केले. प्रसंगी टीका, अपमान, बदनामी, यांची पर्वा केली नाही. आणि आजचे राज्यकर्ते शाहूंच्या नावाने राजकारण करतात. मात्र त्यांचे विचार जपत नाहीत ही दुर्देवी बाब आहे. म्हणून राजर्षि शाहूच्या शिक्षणविषयक विचारांचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केलेला आहे.

**शैक्षणिक तत्वज्ञान :**

राजर्षि शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशुत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी अस्त्र म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाशिवाय आपला उध्दार होणारा नाही हे राजर्षिंनी ओळखले होते. समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्मितीसाठी शिक्षण प्रसार हे राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक तत्वज्ञान होते.

शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे त्यांचे मत होते. ''शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात मुत्सदी व लढवय्ये वीर, कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.''[१] असे महाराजांना वाटत होते.

**राजर्षि शाहू महाराजांची शैक्षणिक विचारांविषयीची चतु:सूत्री :-**

१. समाजात प्राथमिक शिक्षण प्रथम सर्वांना उपलब्ध करून देणे. मग दुय्यम शिक्षण व शेवटी उच्च शिक्षणाची सोय करणे.
२. समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील घटकांना शिक्षणाच्या सोयीसवलती विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देणे.
३. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येवून अल्पखर्चात शिक्षण घेता यावे म्हणून शहरांना सर्व जमातीसाठी वसतिगृहे सुरू करणे.
४. प्रथमच शिकून तयार झालेल्यांचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून त्यांच्यासाठी रोजगाराची सोय करणे. त्यांच्यासाठी नोकऱ्यात राखीव जागा ठेवणे.

**प्राथमिक शिक्षण :**

राजर्षि शाहू महाराज लोकशाहीवादी विचाराचे असल्याने त्यांना रयतेच्या राज्यकारभारात सहभाग वाढविण्याची मनस्वी इच्छा होती. यासाठी लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रथम ''लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर जड व जुलमी ओझे लादले गेले आहे ते काढून टाकून देण्याची शक्ती बहुजन समाजाचे अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे.''[२] अशाप्रकारे प्रजा शिकुन तयार होत नाही तोपर्यंत मात्र राजर्षि लोकांच्या हाती राज्यकारभार देण्यास तयार नव्हते. ''आमची सर्व प्रजा'' शिक्षित असणे यावर त्यांचा जास्तीत जास्त भर होता. कारण इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये अशी त्यांची अपेक्षा होती. शाहू महाराजांनी नेहमी प्रजेच्या हिताचा विचार केला यासाठी रयतेतील सर्व लोक शिक्षित होणे गरजेचे आहे आणि केवळ यामुळेच आपला कारभार व्यवस्थित व सुरळीतपणे पार पडेल असे त्यांचे प्रामाणिक मत होते.

राजर्षि शाहू महाराजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशुत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी अस्त्र म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाविषयी आपला उध्दार होणार नाही. हे राजर्षिंनी ओळखले होते. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. एवढेच नाही तर ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळांची निर्मिती केली. एवढयावरही महाराज थांबले नाहीत तर जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रूपया दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

**अस्पृश्यांचे शिक्षण :**

आपला शैक्षणिक दृष्टिकोन स्पष्ट करीत असताना राजर्षि शाहू महाराजांनी स्वतः असे म्हटले आहे की, "My principle has been to take care of weak among my subjects than the strong."[४]

या धोरणानुसार समाजाने ज्या लोकांना अस्पृश्य समजलेले होते त्या समाजाच्या विकासाची काळजी घेणे राजर्षि शाहू महाराजांना महत्त्वाचे वाटत होते. अस्पृश्य समाज हा चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे नेहमीच शिक्षणापासून दूर ठेवण्यात आला होता आणि शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही शाहू महाराजांची भूमिका होती. यासाठी त्यांना अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे खास लक्ष पुरवावे लागेल असे दिसून येते. याचाच एक भाग म्हणून अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी त्यांच्याकरिता शाळा सुरू केल्या. शिक्षण प्रसारामधून सामाजिक विषमता नष्ट व्हावी ही महाराजांची दृष्टी होती, तथापि अस्पृश्यांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळांमुळे हे होणे शक्य नव्हते हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्या शाळा बंद करून अस्पृश्य मुलांना इतर मुलांच्याप्रमाणे सरकारी शाळेत दाखल करून घेण्याचा आदेश त्यांनी दिला होता. सरकारी शाळांतून शिवाशिव पाळण्यास बंदी असल्याने सर्व धर्मांची आणि जातींची मुले एकत्र राहू शकतील आणि सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होईल असे त्यांचे मत होते. त्यामुळेच की शाहू महाराज एवढयावरच थांबले नाहीत तर शैक्षणिक संस्थांमध्ये अस्पृश्यांना चांगली वागणूक मिळाली नाही तर संबंधितांवर कारवाई करावे लागेल असे सूचित करण्यात आले होते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी मांग, महार, मुलांना स्कॉलरशीप देण्याचे धोरण राजर्षिंनी सुरू केले होते.

**स्त्री शिक्षण :-** राजर्षि शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणांच्या प्रसारासाठीही काम केले होते. त्यापाठीमागे त्यांची शैक्षणिक दृष्टी अशी होती की, स्त्री ही शिकून स्वावलंबी झाली पाहिजे कारण शिक्षण हे मानवाच्या विकासाचे प्रमुख साधन आहे. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. कारण जर समाजाची प्रगती अर्थातच विकास व्हावा असे वाटत असेल तर समाजाने शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे आणि त्यामध्ये स्त्रीने सहभाग घ्यावा असे त्यांचे ठाम मत होते. यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणावरही विशेष भर दिला.

**व्यवसाय शिक्षण :-** प्रगतीसाठी शिक्षणतज्ज्ञांप्रमाणे शिक्षित कामगार असणे आवश्यक असते आणि त्यासाठी कामगारांना हवी असलेल्या कौशल्ये वृध्दिंगत करण्यासाठी त्यांना त्यांच्या व्यवसायातील अत्याधुनिक ज्ञान मिळविता यावे यासाठी व्यवसाय शिक्षणाची गरज आहे, हे राजर्षिंनाही पटले होते. कारण जर कामगार शिक्षित असेल तरच तो नवनवीन पध्दतींचा अवलंब करून प्रगती करू शकतो. यामुळे महाराजांनी व्यवसाय शिक्षणासही पाठींबा दिला.

**राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :-** राजर्षि शाहू महाराज कृतिशील विचारवंत होते. त्यामुळे त्यांनी जो शैक्षणिक विचार मांडला तो प्रत्यक्षात कसोशीने आणण्याचा प्रयत्न केला. हे त्यांच्या शैक्षणिक कार्यातून स्पष्ट होते. तसेच त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन समाजाभिमुख होता. "शिक्षण ही समाजातील कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी न राहता निसर्ग नियमाप्रमाणे सर्व मानवप्राणी समान असल्याने सर्वांना शैक्षणिक सुविधा समानतेच्या पातळीवर प्राप्त झाल्या पाहिजेत आणि त्या जर मिळत नसतील तर त्या मिळविण्यासाठी संघर्ष अटळ आहे."[५] असे त्यांचे स्पष्ट मत होते. यासाठी त्यांनी अनेक प्रकारची शैक्षणिक कार्य केलीत. 'गाव तेथे शाळा' असावी त्याचे मत होते. यासाठी त्यांनी पाटील शाळांची सुरूवात केली.

१. प्राथमिक शिक्षण
२. माध्यमिक शाळा
३. उच्च शिक्षण
४. स्त्री शिक्षण
५. वसतिगृहे

**समारोप :**

महाराष्ट्राने देशाला अनेक समाज सुधारक दिले, महात्मा फुले पासून ते आंबेडकर, गाडगे महाराज, कर्मवीर असे अनेक पण समतेची शिकवण देणारे शाहू महाराज हे लोकोत्तर पुरूष होते. समाजातल्या तळागाळातील लोकांना त्यांचा आधार वाटायचा. भारतात पहिल्यांदा सर्व समाजाच्या मुलांना शिक्षणाची आणि वसतीगृहाची सोय करून देणारे ते युगपुरूष होते. मुलींच्या शिक्षणालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. ते कर्ते सुधारक होते. अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय करून विकासाच्या प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणारा हा पहिला भारतातील राजा होता. आजही महाराजांच्या कार्याचा अलौकिक ठसा कोल्हापूर परिसरात दिसून येतो. समाजवादी समाजरचनेचा स्वीकार करणारा राजा होणे नाही. थोडक्यातच काय तर, राजर्षिंच्या सार्वजनिक जीवनात सामाजिक व शैक्षणिक कार्यांचा सुरेख संगम झालेला दिसतो.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. बालबा विभूते, तीन शिक्षणतज्ज्ञ (शाहू, फुले, आंबेडकर) प्रथमावृत्ती : १९९४, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर - १२.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi<br>Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# राष्ट्रबांधणीत समाजसुधारक महात्मा फुले यांचे योगदान

**प्रा.सुखदेव नारायण एकल**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,गडहिंग्लज.

**प्रस्तावना**

महात्मा जोतीबा फुले हे एक सामाजिक समतेचा महान प्रवक्ता म्हणून साऱ्या जगाला ओळख असलेला समाजसुधारक होय. त्यांनी सत्य आणि समता या तत्त्वांचा सक्रीय संदेश देऊन टिकाऊ सामाजिक स्वास्थाचा आणि उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. त्यांच्या कार्याची प्रेरणा ही मानवधर्माची होती. म. फुले जातिव्यवस्थेवर प्रहार करणाारे आधुनिक भारतातील पहिले बंडखोर पुरुष म्हणून ओळखले जातात. त्यांच्या आचारांचा आणि विचारांचा मुख्य आशय हा विश्वबंधुत्त्वाचा होता, त्यामुळे महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळीतील कर्ते समासुधारक म्हणून महात्मा फुल्यांना ओळखले जाते. आपल्या कार्याला कृतीची जोड देत स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची शिकवण समाजाला दिली. स्त्री शिक्षण, दलितोद्धार, जातिव्यवस्थेवर प्रखर हल्ले हे फुल्यांच्या कार्याची मुख्य उद्दिष्ठ्ये होती. महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील समाजसुधाारणेच्या चळवळीचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येती ती म्हणजे फुल्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून परिवर्तनाचा एक नवा दृष्टीकोन भारतीय समाजाला दिला. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांचे राष्ट्रबांधणीतील योगदान या अनुषंगाने त्यांचा कार्याचा विचार केला जाणार आहे.

**महात्मा फुले यांचे सामाजिक कार्यातील योगदान**

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक क्रांतिचे आद्य जनक म्हणून महात्मा जोतीराव फुले यांना ओळखले जाते. भारतात सर्वप्रथम त्यांनीच सामाजिक क्रांतिचा विचार मांडला असे दिसून येते. संपूर्ण भारताच्या सामाजिक क्रांतिचे प्रणेते म्हणून महात्मा फुलेचा सर्वत्र गौरव केला जातो तो त्यांच्या सामाजिक कार्यामुळे आणि त्यामागील त्यांच्या तत्त्वज्ञानामुळे, विचारांमुळे. महात्मा फुले यांच्या समकालीन ज्या सुधारणावादी चळवळी फोफावल्या होत्या त्या हिंदु धर्माच्या प्रमुख मूल्यविरोधी नव्हत्या. या उलट महात्मा फुल्यांनी यांचा विरोध या मूल्यांनाच होता. त्यांनी जुन्या परंपरा, रूढी व रीतीरिवाज यांच्यावर हल्ला चढविला. वेद उपनिषदांचा त्यांनी अभ्यास करून चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेतील विकृतीवर आसूड ओढले. समाजातील दुष्ट चालीरिती धर्ममार्तंडाचा निष्ठूरपणा सामाजिक विषमता, स्पृश्यास्पृश्य भेदनीती मोडून काढण्यासाठी त्यांनी आपला लढा प्रखर केला. 'महात्मा फुल्यांनी थॉमस पेनची एकेश्वरवादी भूमिका आवडली होती. दासप्रथेचे उच्चाटन, व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह आणि मानवतेची प्रतिष्ठापना या तत्त्वांचा जोतीबांनी आपल्या लेखनातून प्रभाविपणे पुरस्कार केला. जोतीबांना समाजात समता अपेक्षित होती. शूद्रांनी माणुसकीने वागविले जावे असे त्यांना वाटत होते. जेव्हा त्यांच्या कल्पनेतला सुखी समाज त्यांना प्रत्यक्षात दिसत नव्हता ते विषमतेविरूद्ध बंड करून उभे राहिले.'[१] तत्कालीन कालखंडात समाजात राजकीयदृष्ट्या अनास्था होती. सांस्कृतिक पातळीवर नैराश्य पसरले होते. सामाजिक पातळीवर दुही आणि विषमता होती. अशा परिस्थितीमध्ये फुले यांना समाजात ऐक्य प्रस्थापित करावयाचे होते. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. त्यामुळे अज्ञान दूर करण्यासाठी त्यांनी समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.देशबांणीत फुल्यांचे हे महत्त्वाचे योगदान मानावे लागते.

महात्मा जोतीराव फुले यांनी माणूस जन्मल्यापासून त्याला काही अधिकार प्राप्त होतात असे म्हटले आहे. समाजाच्या परिवर्तनाच्या चळवळीत त्यांना सर्व समजा एका व्यासपीठावर हवा होता. जोतीवर फुले म्हणतात, 'ईश्वराने शुद्रादी शुद्रास व इतर लोकास आपण निर्माण केलेल्या सृष्टीतील सर्व वस्तुंचा सारख्याच प्रमाणात उपभोग घेण्याची मोकळीक दिली असून भट लोकांनी त्यांच्या नावाने खोटे ग्रंथ बनवून त्याजमध्ये सर्वांचे हक्क रद्द करून आपणच अग्रगण्य होऊन बसले.'[२] उपरोक्त विचारातून असे स्पष्ट होते की, महात्मा फुले हे ऐकेश्वरवादी होते. मानवाचे अधिकार हे ईश्वरदत्त आहेत अशी त्यांची धारणा होती. ईश्वर हा समदृष्टी आहे. त्याने एकंदर सर्व स्त्री पुरुषांस एकंदर सर्व मानवी अधिकाराचे धनी केले आहे. या संदर्भात गं. बा. सरदार म्हणतात, 'आपल्या सामाजिक व्यवहारात संधीसमानतेचे तत्त्व आपण जाणीवपूर्वक अवलंबिले पाहिजे. समाजाच्या कोणत्याही एका बलिष्ठ घटकाने दुसऱ्या दुर्बल घटकावर जुलूम करून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेता कामा नये. समतावादी लोकांचा विरोध अर्थातच मानवनिर्मित विषमतेला आहे. '[३]

महात्मा फुल्यांनी अस्पृश्यांची त्यांच्या समाजाची दुःखे समजून घेतली तसेच त्यांच्या वाटाल्या आलेल्या दुःखात ते सहभागीही झाले. त्यांनी आपली उभी हयात दीनदुबळ्या अस्पृश्यांच्या सेवेत घालविली. सामाजिक समता निर्माण करण्यासाठी त्यांनी १५ मे १८४८ रोजी पुण्यात महारवाड्यात मुलामुलींसाठी एक शाळा सुरू केली.इ.स. १८५१ मध्ये भोकरवाडी नानापेठ येथे अस्पृश्य मांग, महार मुलांसाठी शाळेची स्थापना केली. अस्पृश्यांसाठी त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद इ.स.१८६८ साली खुला केला. देशबांधणीसाठी महात्मा फुलेंचे हे क्रांतिकारी पाऊल होते असे म्हणावे लागेल. सामाजिकदृष्ट्या हीन मानल्या गेलेल्या अस्पृश्य, महार, मांग समाजाला सामाजिक समता मिळवून देण्याच्या हेतूने फुले यांनी जातीभेदाविरोधी आपल्या विचारांचे व कृतींचे प्रहार सुरू केले. अस्पृश्यता निवारण्यासाठी केलेले त्यांचे कार्य हे क्रांतिकारी तसेच देशबांधणीसाठी मोलाचे ठरणारे असे आहे.

**स्त्री मुक्ती विषयक योगदान**

स्त्रियांचे शिक्षण, दास्यविमोचन हे महात्मा फुले यांचे जीवनाचे एक उद्दिष्ठ होते. स्त्रियांमधील अज्ञान दूर व्हावे, त्यांना भोवतालच्या परिस्थितीची जाण व्हावी, सद्य परिस्थितीचे भान यावे या हेतूने फुल्यांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी मोलाचे कार्य केले आहे. या कार्याबद्दल भालबा विभूते म्हणतात,'महात्मा फुले स्त्रीस्वातंत्र्यांचे खंदे पुरस्कर्ते होते. स्त्री व पुरुष प्रथम मानव आहेत. लिंगभेदामुळे त्यांचा कोणताही अडथळा येत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्रीला समाजात नेहम दुय्यम स्थान मिळाले त्याविरोधात जोतीरावांनी आवाज उठविला. स्त्री शिक्षणासाठी मुलींच्या शाळा काढल्या. त्यासाठी सावित्रीबाईना शिकविले. बालविवाह, बालजरठविवाह, बहुपत्नीकत्व, केशवपन, वेश्यागमन यावर कठोर प्रहार केला.'[४] स्त्री पुरुष समाजाची दोन चाके आहेत ती समानच असली पाहिजेत. समाजाचे भले स्त्री पुरुष समतेतच आहे. यासाठी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारच्या संधी मिळाल्या गेल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. फुले स्त्रीविषयक विचार मांडताना लिहितात, 'काही लोभी पुरुष आपल्यास जास्ती सुख व्हावे यासाठी घरात दोन दोन, तीन तीन लग्नाच्या बायका करून नांदतात व त्या कृत्यासाठी धर्मग्रंथाचा आधार घेतात. त्याप्रमाणे काही स्त्रियांनी आपल्या मनःकामना पूर्ण करण्यासाठी दोन दोन, तीन तीन लग्नाचे नवरे करून एका घरात नांदू लागल्यास आपणा सर्व पुरुषास याविषयी काही विधिनिषेध वाटणार नाही का?'[५] स्त्रियांची परंपरेच्या जोखडातून मुक्तता व्हावयाची असेल त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे असा आग्रह जोतिरावांनी नेहमी धरला. त्यासाठी त्यांनी तसे प्रयत्नही केले. महात्मा फुले यांनी स्त्रियांना केवळ दयेचा विषय न समजता केवळ अनुषंगिक सुधारणांनी डागडूजी केली नाही, तर मूलग्राही पद्धतीने चिंतन करून स्त्री पुरुष समतेवर आधारलेल्या स्त्री स्वातंत्र्याचा उच्चार केला. सार्वजनिक सत्यधर्मात मांडलेल्या स्त्रीविषयक सुधारमतवादी भूमिका स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करणाऱ्या आहेत असे म्हणावे लागेल. राष्ट्रबांधणीत फुल्यांचे स्त्रीमुक्ती संदर्भातील योगदान पाहता. देशाच्या समाजसुधारणेच्या इतिहास फुल्यांचे प्रस्तुत कार्य हे गौरवास्पद आहे असे वाटते.

**महात्मा फुले यांचे साहित्यिक योगदान**

बहुजन समाजाचे प्रबोधन व दलितमुक्तीचा प्रचार हे जोतीरावांच्या समाजसुधारणा चळवळीचे एक प्रमुख अंग होते. त्यासाठी त्यांनी अनेक लहानमोठी पुस्तके लिहिली. त्यांचे सर्व लेखन हे सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी निगडीत होते. त्यामुळे त्यांच्या साहित्याचे अंतरंग आणि बाह्यरंग हे तत्कालीन साहित्यापासून पूर्णपणे वेगळे होते असे निश्चितच म्हणावे लागेल. एकोणिसाव्या शतकातील मराठी साहित्य शहरातील पांढरपेशा वर्गाच्या जीवनाचा चतुःसीमेतच घुटमळत होते. उच्चवर्णीय मध्यमवर्गाच्या प्रश्नांच्याव आशाआकांक्षांच्या पलिकडे सहसा म्यांची मजल जाऊ शकली नाही. त्यांचे लेखक व वाचक एकाच थरातील होते. खेड्यातीपाड्यातील गरीब शेतकरी व कारागीर यांच्या सुखदुःखाची व अडीअडचणींची त्यात कमी प्रमाणात दखल घेतली जाई.इ.स. १८८५ मध्ये पुणे येथे भरलेल्या मराठी भाषेतील ग्रंथकारांच्या दुसऱ्या संमेलनात फुल्यांना आमंत्रण आले होते. त्यांनी उत्तरादाखल न्यायमूर्ती रानडेंना पत्र पाठविले, त्यात अशाच अशायाचे आपले मत कुठलाही आडपडदा न ठेवता निःसंकोचपणे मांडले होते. ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यास ते हक्क त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकातील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही.[६] फुल्यांनी मात्र आपली नजर शहराकडून खेड्यांकडे आणि बुद्धिजीवी वर्गाकडून श्रमजीव वर्गाकडे वळवली होती. शेतकरी व इतर कष्टकरी समाज हाच त्यांच्या विचारांचा व कार्याचा केंद्रबिंदू होता. शेतकऱ्यांच्या दिवसेंदिवस खालावत चाललेल्या परिस्थितीशी ते तादात्म्य पावले होते. त्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठीच तर त्यांनी आपल्या हातात लेखणी घेतली होती.सहाजिकच शूद्र आणि अतिशूद्र समाजातील नव्यान अक्षरओळख झालेले आणि आपले जिव्हाळ्याचे प्रश्न समजून घेण्यास उत्सूक असलेले तरूण हे जोतीरावांच्या साहित्याचे वाचक होते. त्यांची संख्या फार थोडी होती हे खरे असले तर हेच वाचक डोळ्यापुढे ठेवून त्यांनी आपले लेखनविषय निवडले होते. त्यांची विवेचनपद्धती आणि भाषासरणी हीदेखील त्यांनी आपल्या या उद्दिष्टांशी सुसंगत अशी राखली होती वरील विवेचनावरून एकूणच महात्मा फुल्यांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी आणि साहित्याकडून असणारी अपेक्षा आपल्या ध्यानात येतात.

महात्मा जोतीराव फुले यांनी तृतीय रत्न (नाटक), पवाडा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा, ब्राह्मणांचे कसब, शेतकऱ्यांचा असूड, सत्सार, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, अखंडादी काव्यरचना इत्यादी ग्रंथसंपदा लिहिली. प्रांरभी त्यांच्या तृतीय रत्न नाटकाचा विचार करू त्यांच्या मते भट जोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रास कसेकसे फसवून खात व ख्रिस्ती उपदेशक आपल्या निःपक्षपाती धर्माच्या आधाराने अज्ञानी शूद्रास खरे ज्ञान सांगून त्यास सत्यमार्गावर कसे आणतात ते दाखवून त्याचे मर्म लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी जोतीरावांनी तृतीय रत्न हे नाटक लिहिले. जोशी भट धर्माच्या नावाखाली सर्वसामान्य लोकांची कशी फसवणूक करतात याचे चित्रण नाटकात आले आहे. नाटकातील जोशी भटाच्या कर्मकांडाला बळी पडणाऱ्या धर्मोपदेशक सांगतात की, मूर्तिपूजा ही खऱ्या ईश्वरोपासनेला बाधक आहे. तिच्यामुळे धर्मभोळेपणाचे प्रस्थ वाढून गरीब बिचारे भाविक लोक अनाठायी खर्च करून स्वतःचे नुकसान करून घेतात. यांनी शिक्षण घेतल्याखेरीज त्यांना या गोष्टींची उमज पडणार नाही, आणि अंधश्रद्धेच्या कचाट्यातून ते कधी सुटणार नाहीत. ब्राह्मणांचे कसब हे फुल्यांचे सहेतूक केलेले लेखन होय. शूद्रातिशूद्रांच्या दुरवस्थेची कारणे विशद करून त्यांचे प्रबोधन करणे, बहुजन समाजातील सुशिक्षित तरूणांना आपल्या सामाजिक कर्तव्यांची जाणीव करून देणे. आणि मागासलेल्या जातीजमातीत शिक्षणप्रसार झाल्याखेरीज त्यांची परिस्थिती सुधारणार

नाही. ही गोष्ट सरकारला पटवून देण्याच्या हेतून प्रस्तुत ग्रंथाचे लेखन केले गेले आहे. गुलामगिरी हा फुल्यांचा आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ. गुलामगिरी मग ती धार्मिक, आर्थिक, सामाजिक अथवा कोणत्याही स्वरूपाची असो फुल्यांच्या मनात तिच्याबद्दल द्वेषच होता. आपल्या समाजातील बांधव शुद्रबांधवांची ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून मुक्तता करतील अशी अपेक्षा ठेवून त्यांनी या ग्रंथाचे लेखन केले. शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथामध्ये शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीची सविस्तर चर्चा केली असून त्यावरती उपायही त्यांनी सूचविले आहेत असे दिसून येते. महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्यांच्या केविलवाण्या जीवनक्रमाचे वास्तवपूर्ण असे चित्रण त्यांनी केले आहे शेतीविषयीच्या अनेक प्रश्नांचा उहापोह प्रस्तुत ग्रंथात फुल्यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची जी अनेक कारणे आहेत ती प्रायः धर्म व राज्य या दोन संस्थांशी निगडीत आहेत असे प्रतिपादन प्रस्तुत ग्रंथात फुल्यांनी केले आहे. सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांमधून होणाऱ्या आर्थिक शोषणाकडे या ग्रंथाच्याद्वारे जोतीरावांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या आसूडाचे फटके प्रस्थापिताच्या हस्तकांच्या वर्मी लागावेत असे आहेत.

महात्मा फुल्यांनी अनेक गद्यग्रंथ लिहिले त्याप्रमाणेच त्यांनी पद्यग्रंथही लिहिले. त्यांचे बरेचसे पद्यवाङ्मयही आज उपलब्ध आहे. त्यांची पद्यरचना ही ***शिवाजीचा पवाडा***आणि ***ब्राह्मणांचे कसब*** ह्या पुस्तिका वगळल्या तर बहुतांशी स्फूट स्वरूपाची आणि जन्या मराठी साहित्यातील अभंगवाङ्मयाच्या धर्तीची आहे. मात्र या रचनाप्रकाराला त्यांनी ***अखंड*** असे नाव दिले आहे. यामध्ये त्यांनी विविध विषयांचा अंतर्भाव केला आहे. मानवाचा धर्म एक, आत्मपरीक्षण, नीती, धीर, समाधान, सहिष्णुता, सद्विवेक इत्यादी विषय उघडउघड बोधपर स्वरूपाचे आहेत. गणपती, भटाची वाणी, ब्राह्मणांचा भोंदूपणा यासारख्या विषयांच्या माध्यमातून त्यांनी आपल्या नेहमीच्या धारधार पद्धतीने हिंदु धर्मावर टिकास्त्र सोडले आहे. बळी राजा, मानव महंमद या थोर महात्म्याची महती वर्णन करण्यासाठी त्यांनी अखंडाची रचना केली आहे. याबरोबरच सार्वजनिक सत्यधर्म नावाची पुस्तिका, शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा, सत्सार, इशारा हे साहित्यही उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. फुल्यांच्या एकूणच सर्व साहित्याचा विचार केल्यानंतर असे दिसून येते की, समाजसुधारणा हे त्यांच्या साहित्यनिर्मितीमागे मुख्य उद्दिष्ट होते असे दिसून येते. त्याचा परिणाम आजच्या मराठी वाङ्मयावर मोठ्या प्रमाणावर झाला आहे. खासकरून मराठी ग्रामीण साहित्यामागची महत्त्वाची प्रेरणा म्हणून फुल्यांकडे व त्यांच्या सबंध लेखनाकडे पाहिले जाते. राष्ट्रनिर्मितीमध्य साहित्याचा मोठा वाटा असतो. समाजात मूल्य रूजवण्याचे काम व जागृती निर्माण करण्याचे काम साहित्य करत असते. त्यामुळे राष्ट्रनिर्मितीमध्ये महात्मा फुल्यांचे साहित्याचे योगदान उल्लेखनीय अशा स्वरूपाचे आहे.

**समारोप**

महात्मा जोतीराव फुले यांना एकोणिसाव्या शतकातील थोर समाजक्रांतिकारक म्हणून ओळखले जाते. भारतीय समाजव्यवस्थेचा नवा अन्वयार्थ लावून राष्ट्राची नव्या आचारविचारांनी बांधणी करण्याचे महान कार्य जोतीरावांनी आपल्या कार्यातून समाजासमोर ठेवले. म्हणून आधुनिक भारतातील समाजक्रांतिचे आद्य जनक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जो. फुले यांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, साहित्यिक कार्य राष्ट्रबांधणीतील मोलाचे योगदान म्हणून महत्त्वाचे ठरते, त्यामुळे राष्ट्रबांधणीतील कर्ते समाजसुधारक म्हणून महात्मा जोतीराव फुले यांच्याकडे, त्यांच्या कार्याकडे पहावे लागते.

**संदर्भ**

१. जाधव राजा, प्रबोधनाचे शिल्पकार, ठाणे, २००५, पृ.५३
२. नरके हरी, फडके य. दी, (संपा), महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, १९९१, पृ.९१
३. सरदार गं. बा., महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली, मुंबई, १९८८, पृ.१३५
४. विभूते भालबा, महात्मा फुले यांचे विचारधन, कोल्हापूर, १९९१, पृ. ९
५. उनि, १९९१, पृ.४५०
६. उनि, १९९१, पृ.३५०

# पंतप्रधान : इंदिरा गांधी यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान

**प्रा. डी. एन. सोनकांबळे,**
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
अर्थशास्त्र विभाग.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. देशाच्या विकासाकरीता आवश्यक असलेले मूलभूत व पायाभूत उद्योगाचा समावेश सार्वजनिक क्षेत्रात करण्यात आला. तर कमी महत्वाचे असलेल्या उद्योगाचा समावेश खाजगी क्षेत्रात करण्यात आला. अशा स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचे नियोजन करून, नियोजनाचा मार्ग स्वीकारण्यात आला. पहिल्या योजनेत शेतीला प्राधान्य देण्यात आले. तर दुसऱ्या योजनेत उद्योगाला प्राधान्य देण्यात आले. या योजनेचा लाभ देशाच्या शाश्वत विकासाला भविष्यात होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण बदलत्या काळानुसार अर्थव्यवस्थेत होणारे बदल, नैसर्गिक आपत्ती, परकीयांचे हल्ले, वाढते परकीय कर्ज व इतर काही कारणाने देशाच्या आर्थिक विकासात अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्येतून बाहेर पडण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देश हितासाठी काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत. त्यात मक्तेदारी नियंत्रण कायदा, व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण, परकीय चलन, विनिमय नियंत्रण कायदा व इतर सामाजिक कल्याणाच्या हेतूने घेतलेले निर्णय, गरिबी हटावचा नारा, निराधार अनुदान योजना, इंदिरा आवास योजना व स्वयंरोजगार योजना इत्यादी निर्णयाने देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात महत्वाचे कार्य पूर्ण केले.

**उद्दिष्टये :**

१. इंदिरा गांधी यांचा राजकीय प्रवास यांचा अभ्यास करणे.
२. इंदिरा गांधींनी देशाच्या विकासाकरीता केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**बालपण :**

जन्म १९ नोव्हेंबर, १९१७ रोजी इलाहाबाद येथे झाला. त्यांचे पूर्ण नांव इंदिरा जवाहरलाल नेहरू असे होते, तर आईचे नांव कमला नेहरू. आजोबा मोतीलाल नेहरू. मोतीलाल नेहरू व्यवसायाने वकील होते तसेच भारतीय काँग्रेसचे ते आघाडीचे नेते होते. इंदिराजींचे शिक्षण ऑक्सफर्ड विद्यापीठात पूर्ण झाले. युरोपमध्ये वास्तव्यादरम्यान त्यांची ओळख फिरोज गांधी सोबत झाली. ही ओळख नंतर प्रेमात बदलून अखेर दोघांचा विवाह झाला.

**राजकारणात प्रवेश :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून १९५९ मध्ये इंदिरा गांधी निवडून आल्या. जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूनंतर लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. यात त्यांनी माहिती व नभोवाणी मंत्र पद जबाबदारीने सांभाळले. जानेवारी, १९६६ मध्ये लाल बहादूर शास्त्री यांचे हृदय विकाराने निधन झाले. राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष श्री.कामराज यांच्या नेतृत्वाने इंदिरा गांधी यांनी १९ जानेवारी, १९६६ रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या.

**कार्ये :**

पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे कार्य देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात उल्लेखनीय आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख आज समाजात कौतुकास्पद आहे. निराधार अनुदान योजना, इंदिरा आवास योजना, स्वयंरोजगार योजना ह्या योजना तसेच देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता इंदिरा गांधींनी घेतलेले निर्णय म्हणजे देशाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**१.मक्तेदारी नियंत्रण कायदा, १९६९ :** स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक कल्याणाचा संकल्प करण्यात आला. या संकल्पाचा हेतू साध्य करण्याकरीता अर्थव्यवस्थेतील आर्थिक संरचनेचा अभ्यास करण्यात आला असता अर्थव्यवस्थेत देशातील काही मोजक्याच भांडवलदारांचे वर्चस्व निर्माण होत आहे. अशा प्रकारचे वर्चस्व देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता अडथळा ठरू शकतो. आर्थिक व सामाजिक लोकशाही धोक्यात येऊ शकते. यावर वेळीच उपाय योजना करणे गरजेचे आहे. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती के.सी. दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने अर्थव्यवस्थेतील आर्थिक केंद्रीकरणाचे प्रमाण आणि परिणाम यांचा अभ्यास करणे. तसेच त्यावर मक्तेदारी प्रतिबंधित व्यापारी पध्दतीची कारणे शोधून त्यावर उपाय सुचविणे हे काम समितीकडे सोपविले होते. अशा प्रकारच्या थोड्या उद्योगपतीकडे देशाच्या आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण झाल्याने अनेक क्षेत्रात

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

वर्चस्व गाजवितात आणि त्यांचे परिणाम इतर राजकीय, लोकशाही आणि सामजिक कल्याणाच्या मूल्यावर होतो. यावर वेळीच अंकुश ठेवणे देशहिताच्या दृष्टीने योग्य आहे. असे समजून पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मक्तेदारी विरोधी कायदा लोकसभेत संमत केला. (M.R.T.P.Act, 1969) १ जून, १९७० पासून लागू करण्यात आला. सदर कायद्यात १९७४, १९८०, १९८२, १९८४ आणि १९९१ मध्ये बदल करण्यात आला.

सदर कायद्यात – ''एक कोटीपेक्षा जास्त भांडवल गुंतवणूक असलेल्या उद्योग संस्थेचा विस्तार, एकत्रीकरण आणि विलिनीकरण आणि त्यांच्या संचालक नियुक्त्यांबाबत नियमन करण्यात आले. २० कोटीपेक्षा जास्त मालमत्ता होईल अशा उद्योगाशी संलग्न होऊ इच्छिणाऱ्या नवीन उद्योगाचे नियमन करण्यात आले. सार्वजनिक हिताला बाधक ठरतील अशा मक्तेदारी आणि प्रतिबंधित व्यापारी प्रथाचे नियंत्रण व त्यावर बंदी घालण्यात आली. तसेच वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण व विपणन नियंत्रित ठेवून त्यांच्या किंमती अवाजवी ठेवणे, यावर कायद्याने बंदी घालण्यात आली.''

**२.व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण (१९६९) :** अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाकरीता व्यापारी बँकांची भूमिका महत्वाची आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात काही जमीनदार श्रीमंत लोक आणि संस्थानिकांनी देशात बँका सुरू केल्या. आपल्याच भौगोलिक क्षेत्रातील उद्योग आणि व्यापाराला चालना देणे हाच उद्देश त्यांच्या समोर होता. स्वाभाविकपणे श्रीमंत व्यापारी आणि उद्योगपतींना कर्ज पुरवठा होत होता. सामान्य नागरिक, शेतकरी, भूमिहीन, अल्प उत्पन्न गटातील लोकांना कर्ज पुरवठा होत नव्हता. अशा लोकांनी त्यांच्या कर्जाची गरज, खाजगी सावकार, व्यापारी, जमीनदार यांच्याकडे जावून भागवित असत. पण यांच्या कर्जाच्या अटी मात्र जाचक स्वरूपाच्या असत. अवाजवी व्याज दर असून अशा प्रकारची वित्त संरचना देशाच्या आर्थिक विकासाला अयोग्य आहे असे समजून स्वातंत्र्यानंतर व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याचा संकल्प १९६० च्या सुमारास करण्यात आला होता. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अखिल भारतीय कॉंग्रेसच्या समितीच्या वार्षिक अधिवेशनात, ''Stray thoughts on Bank Nationalization'' असा शोधनिबंध सादर करण्यात आला. या शोधनिबंधात बँकांच्या राष्ट्रीयकरणाची ध्येय धोरणे जाहीर करण्यात आली. याचे सर्वांनी जाहीर स्वागत केले. त्यानंतर एक अध्यादेश काढून देशातील ज्या बँकांचे भाग भांडवल किमान ५० कोटी आहे, अशा १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण १९ जुलै, १९६९ रोजीच्या मध्यरात्री पासून करण्यात आले. पुढे दोन आठवड्यात संसदेत अशा प्रकारचा कायदा करून ("Banking Companies Bill") त्यास १ ऑगस्ट, १९६९ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली. तर पुढे १५ मार्च, १९८० रोजी अशाच प्रकारच्या ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. ज्यांचे भाग भांडवलाची मर्यादा २०० कोटी रूपये होती. अशा प्रकारे व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच देशातील वित्तीय संरचनेत सुसुत्रता निर्माण होऊन – एकूण बचत – गुंतवणूक – रोजगार विकासाला उत्तेजन मिळेल, लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळेल, सामान्य लोक, शेतकरी, भूमिहीन, अल्प उत्पन्न असणारे लोक यांना कर्जाची सुविधा मिळेल, तर सरकारचे मौद्रिक धोरण नियंत्रित करण्यास मदत होईल. एकंदरीत अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. आर्थिक व सामाजिक लोकशाहीचा विकासाचा हेतू साध्य होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**३.परकीय चलन विनिमय नियंत्रण कायदा, १९७३ :** स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता परकीय गुंतवणूकीचे स्वागत करण्यात आले असले तरीही त्यावर काही मर्यादा असणे आवश्यक आहे. कारण देशातील उद्योगाच्या विकासाचे महत्व लक्षात घेवून ही मर्यादा घालण्यात आली. परकीय चलन विनिमय व हस्तांतरण यांचे नियोजन करून देशाच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. या कायद्याचे ध्येय, भारतीय नागरिकांकडून मिळविलेले परकीय चलन व त्यांच्याकडून देण्यात येणारे परकीय चलन यावर कार्यक्षमपणे नजर ठेवून आर्थिक विकासाला गती कशी मिळेल या दृष्टीने परकीय चलनाचा वापर करणे.

**या कायद्यात भारताच्या रिझर्व्ह बँकेला दिलेले अधिकार :**

१. भारतीयांकडून होणाऱ्या निर्यातीपासून मिळविलेले परीय चलनांचा हिशोब ठेवणे.
२. भारतीयांनी मिळविलेले परकीय चलन व त्यांनी देवू केलेले परकीय चलन या व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.
३. व्यापारी बँका, प्रवासी संस्था व परकीय चलनाशी संबंधीत असणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे.
४. या संबंधित नियमन करून संबंधितांना कळविणे.

**यासंबंधी करण्यात आलेले नियमन :**

१. कोणत्याही परदेशी व्यक्तीस किंवा कंपनीस कोणत्याही प्रकारच्या व्यापाराशी किंवा औद्योगिक व्यवहाराशी संबंधी किंवा भारतीय उद्योगाचे भाग भांडवल खरेदीचा व्यवहार करायचे झाल्यास त्या परदेशी व्यक्तीस किंवा कंपनीस भारताच्या रिझर्व्ह बँकेची

अगोदर परवानगी घ्यावी लागेल.

२. सर्वसाधारणपणे परदेशीयांना किंवा भारताबाहेर कायमचे राहणाऱ्यांना एखाद्या भारतीय औद्योगिक कंपनीच्या भाग भांडवलापैकी ४०% पेक्षा जास्त भाग भांडवल खरेदी करता येणार नाही.

३. रिझर्व्ह बँकेकडून परवानगी मिळाल्यानंतरच परदेशी चलनाशी व्यवहार करता येईल.

४. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय कोणत्या भारतीय नागरिकांना परदेशात परकीय चलन वापरता येणार नाही.

५. भारतातून केली जाणारी निर्यात किंवा आयतीद्वारा किंमतीत खोटी वाढ दाखवून परस्पर परकीय चलन मिळवून त्यांची मालकी परदेशात स्थापन करणे बेकायदेशीर ठरविले जाईल.

६. भारतात न राहणाऱ्या भारतीयांकडून भारतात कोणतीही मालमत्ता विकत घेणे किंवा विकणे व इतर व्यवहार रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

अशाप्रकारे वर नमूद करण्यात आलेल्या सर्व नियमांचे पालन करून परकीय गंगाजळीत वाढ करून देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासाच्या हेतूने प्रोत्साहन देण्यात आले.

**४.कल्याणकारी राज्य :** तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या लोकांना आर्थिकदृष्ट्या समृध्द करण्यासाठी नवीन काही योजना चालू केल्या आहेत. त्यात निराधार अनुदान योजना, इंदिरा आवास योजना व स्वयंरोजगार रोजगार व इतर कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून देशातील निराधार, वृध्द व्यक्ती, अंध, अपंग, शारीरिक व मानसिक आजाराने रोगगृहस्थ व्यक्ती, विधवा व अत्याचारीत महिला, वेश्या व्यवसायातून मुक्त असलेल्या महिला, घटस्फोटीत महिला या सर्व व्यक्तिश: आर्थिक साह्य करून त्यांचे जीवन सुखी व आनंददायी करण्याच्या हेतूने १९८० मध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना चालू करण्यात आली. तर १९७९ मध्ये मागासवर्गीय समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षण देवून त्यांना स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहन देण्याची योजना राबविण्यात आली. तर त्याचबरोबर अशा मागासलेल्या जातीतील दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या बेघर कुटुंबांना इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकूल योजनांची सुरूवात करण्यात आली. तर पाचव्या पंचवार्षिक योजनेत 'गरीबी हटाओ' नारा देण्यात देवून, समाजातील दलित व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना विभिन्न योजनांच्या माध्यमातून आर्थिक साह्य करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**इतर कार्य :**

त्यांच्या वर दर्शविलेल्या कार्याचा गौरव करावा तितका कमीच असून आणखीन ही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. १९८० च्या औद्योगिक धोरणात खाजगी क्षेत्रांना दिलेले झुकते माप, १९७१ मध्ये बांग्लादेशाच्या प्रश्नावरून भारत-पाकिस्तानात झालेल्या युध्दात भारताचा झालेला विजय हा त्यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेला गौरवच आहे. त्यांनी त्यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात केलेली कार्ये देशाला जागतिक स्तरावर सन्मान मिळवून देणारे होते.

**निष्कर्ष :**

तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता केलेले कार्य हे अविस्मरणीय आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून १९७२ मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याची लोकप्रियता जगातल्या बहुतांश देशांनी मान्य केली होती, तर अमेरिकेच्या मदर पुरस्काराने व इटलीच्या इसाबेल डीइस्टे पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तर संयुक्त राष्ट्र मुख्यालयामध्ये देखील आपल्या उपस्थितीने छाप पाडली होती. जगातल्या बहुतांश देशांचा दौरा करून आपल्या देशाकरीता काय करता येईल याविषयी घेतलेले निर्णय हे विकासाच्या दिशेने वाटचाल करणारेच ठरले हे मात्र निश्चित झाले.

**संदर्भ ग्रंथ :**

१. भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. देसाई भालेराव
२. दृष्टीआडच्या इंदिरा गांधी - डॉ. के. पी. माथुर.
३. लोकसत्ता - दिनांक १० जुलै, २००६.
४. shodhganga.inflibnet.ac.in
५. Internet-www.samanyagyan.com.
६. Internet-www.india.gov.in.

# पुरोगामी विचारवंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,

**डॉ.वर्षा शिरीष फाटक**
आठल्ये - सप्रे - पित्रे महाविद्यालय, देवरुख.

आज २१ व्या शतकातही ग्राम व शहरविकासाच्या उग्र होत चाललेल्या समस्या, स्त्री - पुरुष विषमता, जाती - धर्म विषमता, विज्ञानयुगातही बोकाळलेले बुवाबाजीचे स्तोम पाहता या सर्व समस्यांचे प्रत्यक्ष कृतीतूनच व उद्बोधनातून निराकरण करु पाहणारे समानधर्मी संत महाराष्ट्रात एकेकाळी होऊन गेले. त्यांचे विचार व कार्य खरोखरच क्रांतिकारी होते. आजच्या काळात पुन्हा या विचार व आचारांचे जागरण करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यांच्या विचारांची व कृतीची प्रस्तुतता या निमिताने शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे.

ऋग्वेदातील एका ऋचेने राष्ट्र संत तुकडोजी महाराजविरचित ग्रामगीतेचा आरंभ होतो. " विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन्ननातूरम" म्हणजेच गावागावातील ही सर्व जनता निरोगी, धष्टपुष्ट व सुखी असो. (ऋग्वेद १-११४) याच हेतूने संत तुकडोजी महाराजांनी आयुष्यभर अत्यंत तळमळीने ग्रामोद्वाराचे कार्य केले. देशाच्या विकासात गावच्या विकासाला फार मोठे महत्व आहे हे भारताचे माजी पंतप्रधान मा.राजीव गांधी यांनी ओळखले होते. गावाचा विकास होण्यासाठी ग्रामपंचायती स्थापन कराव्यात व ग्रामपंचायती स्वायत्त संस्था म्हणुन काम करु शकतील इतक्या बळकट कराव्यात असे भारताच्या राज्यघटनेतील ४०साव्या कलमात सुचविले आहे. त्याप्रमाणे पंचायती राज्यव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी व लोकांच्या हातात सत्ता देण्याकरिता घटना दुरुस्तीचे विधेयक लोकसभेत मांडले. लोकसभेने त्याला २२ डिसेंबर १९९२ रोजी मंजुरी दिली आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेनेही ते मंजूर केले. अशा तऱ्हेने केंद्र सरकारने पंचायत राज्य पध्दतीला बळकट करण्यासाठी ७३ वी घटना दुरुस्ती केली. आणि भारतात २४ एप्रिल १९९३ पासून तिची अमंलबजावणी सुरु झाली. आज महाराष्ट्र ग्रामपंचायतीच्या कायद्याने अगोदरच ग्रामसभा सुरु झाल्या आहेत आणि त्या ग्रामसभेला घटनात्मक दर्जा मिळाला आहे. ग्रामसभा ही गावाची सर्वोच्च सभा आहे आणि ही प्रत्यक्ष लोकशाही आहे. त्यामुळे ती सशक्त असेल तर राज्याचा पर्यायाने राष्ट्राचा विकास होण्यास विलंब लागणार नाही.

'भारत हा खेड्यांचा देश आहे' हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला तरच राष्ट्राचा विकास होईल अशी त्यांची विचारसरणी होती. 'ग्रामकल्याण' हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मुलभूत विचार करुन त्या समस्या कशा सोडवाव्यात याविषयी उपाययोजनाही सुचविल्या होत्या. त्यांनी सुचविलेल्या उपाययोजना आजच्या कालातही उपयोगी ठरत आहेत यातच त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. गाव सुधारावे गावातील नागरिक सुशिक्षित व सुसंस्कृत व्हावेत. ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्य गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगाना प्रोत्साहन मिळावे, प्रचारकांच्या रुपाने गावाला नेतृत्व मिळावे असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या ग्रामगीतेत दिसून येते.

**जिवनपरिचय व कार्य :-**

राष्ट्रसत तुकडोजी महाराज म्हणजेच माणिक बंडोजी इंगळे. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावतीमधील यावली खेडयात झ ाला. त्यांचे गुरु आडकोजी यांनी त्यांचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे ठेवले. जन्मभर त्यांनी जातीभेद व अंधश्रध्दा निर्मूलनासाठी कार्य केले. त्यांनी १२० किमी दूर मोझरी नावाच्या गावात 'गुरुकुंज' आश्रमाची स्थापना केली तेथून त्यांचे संरचनात्मक कार्य सुरु केले. आश्रमाच्या द्वारावर ' हे मंदिर सर्व धर्म आणि पंथांतील व्यक्तीसाठी खुले आहे येथे सर्व देशी व विदेशी व्यक्तींने स्वागत आहे' असे लिहिले आहे. खेडेगावात स्वयंपूर्ण होण्यासाठी त्यांनी ग्रामगीतांच्या माध्यमातून काम केले. त्यांच्या लेखनातून व कीर्तनातून अंधश्रध्देवर प्रहार केले. विदर्भात त्यांचा संचार असला तरी महाराष्ट्रभर नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करत त्यांनी आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान आंदोलनात सहभाग घेतला. त्यानंतर १९५५ मध्ये जपानमध्ये विश्वशांती संमेलनात भाग घेतला आणि या अनुभवांवर आधारित एक 'माझी जपान यात्रा' हे पुस्तक लिहिले. सन १९४२च्या भारत छोडो आंदोलनात त्यांना अटक झाली. 'आते है नाथ हमारे' हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वतंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तीगान ठरले. महिलोन्नती हाही तुकडोजी महाराज्यांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटुंबव्यवस्था समाजव्यवस्था राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवरच कशी अवलंबून असते हे त्यांनी आपल्या कीर्तनाद्वारे समाजाला पटवून दिले देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करु शकतील. ते नीतीमान व सुसंस्कृत कसे होतील, याविषयीचे उपदेश पर्व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. 'ग्रामगीता ' , ' अनुभव सागर' , 'भजनावली' , 'सेवा स्वधर्म ', 'राष्ट्रीय भजनावली ' असे लेखन त्यांनी केले. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला. त्यानी मराठीप्रमाणेच हिंदीतूनही विपुल लेखन केले. राष्ट्रपतीभवनात त्यांचे खंजिर भवन ऐकून राष्ट्रपती राजेन्दप्रसार यांनी तुकडोजी महाराज्यांना राष्ट्रसंत म्हणून संबोधिले होते.

**ग्रामगीतेची रचना :-**

ग्रामगीतेत एकूण ४१ अध्याय असून या अध्यायांची सद्धर्ममंथन पंचक, ग्रामनिर्माण पंचक, दृष्टीपरिवर्तन पंचक, लोक वशिकरण पंच, संस्कारशोधन पंचक, प्रेमधर्मस्थापन पंचक, देवत्व-साधन पंचक व आदर्श - जीवन पंचकांमध्ये विभागणी केली आहे. उपरोक्त शीर्षकांवरुन प्रत्येक घटकाला दिलेले महत्व लक्षात येते.

**सदधर्ममंथन पंचक :-**

या अध्यायात देवदर्शन, धर्माध्ययन, आश्रम-धर्म, संसार - परमार्थवर्ण - व्यवस्था या विषयीचे उद्बोधन येते. तुकोडजी महाराजांनी विश्वव्यापक अशा परमशक्तीचे सामर्थ उदधृत करुन त्या शक्तीची स्तुती केली आहे. 'अज्ञानानेच विकार निर्माण होतात. जीवाचे दारिद्रय निवारण्यासाठी तुझी कृपादृष्टी राहो.' असे म्हणत व्यक्ती ते समष्टी समाज रचना, ग्राम रचना व पुढे देश कसा निर्माण होतो व मानवाने या सर्व टप्प्यावर प्रगती करत कसे पुढे 'जन हेच ग्राम.ग्राम हेची मंदिर. ग्रामातील जन सर्वेश्वर सेवा हिच पूजा समग्र' ग्रामगीतेचा महत्वाचा हेतू तुकडोजी महाराजांनी मांडला आहे. मानवा मानवात युध्दे होऊ नयेत, देवाच्या नावे कुकर्म करणारे गाव बुडवितात, देव देव करुन गाव भिकेला लागते. मानवोध्दार हेच साधूचे कर्म आहे हे ते सांगतात. 'धर्म' या शब्दाचा विस्तार सर्वाठायी संभावना ठेवून हे विश्वची माझे कुटुंब आहे' असे मानून जो आचरण करतो त्याला धर्म म्हणावे. आपल्या चारित्र्याने जगाची सुव्यवस्था सांभाळावी राष्ट्रधर्म बळकट करण्यासाठी व्यक्तीने कुटुंबपूरक व्हावे. कुटुंब समाजपोषक असावे आणि गावाने राष्ट्राला सहाय्य करावे. अहिंसा, सत्य, असत्य, अपरिग्रह, ब्रम्हाचर्य हे धर्माचे मुख्य लक्षण आहे. माणूस हा गावाचा पाया आहे. त्याला व्यक्तीधर्म कळ अल्श्रील भाषण करु नये, वाईट दृश्य पाहू नयेत, व्यसने करु नयेत, लहानमुलांवर उत्तम संस्कार करावेत.

मुलाचे अन्न कसे सात्विक असावे त्याला शिक्षण कसे द्यावे तो निर्भय होण्यासाठी कोणते प्रशिक्षण द्यावे जे नियम मुलां मुलींमध्ये भेद न करता मुलांप्रमाणेच मुली सुध्दा आरोग्यसंपन्न व बलशाली विद्यासंपन्न तेजस्विनी झाल्या पाहिजेत' असा लिंगभेदातील विचार त्यांनी मांडला. आश्रमधर्म कसा असावा याबाबत ते म्हणतात, 'नैष्ठिक धर्म पाळा परंतु अधःपात टाळा, मुक्याने वेद अभ्यासावे, लंगडयाने पर्वत चढावे, आंधळयाने युदध करावे तसे हे ब्रम्हचर्य पाळणे कठीण आहे. चैन हे विद्यार्थ्याचे जीवनध्येय असता नये. तुम्ही मनापासून जीव ओतून जेव्हा ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करता तेव्हा सुकीर्ती प्राप्त होते. संत तुकडोजी महाराजांच्या विचारांवर संत तुकारामांच्या अभगवाणीचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे उपदेशाची भाषा परखड असल्याचा प्रयत्न येतो. माणसाने प्रपंच नेटका करावा. दोघांचे मन एक असेल तर स्वर्ग सुख निर्माण होईल.

संसार - परमार्थ या अध्यायात ते म्हणतात मुलं मार्गी लागली की ग्रामसेवा व जनसेवा यासाठी घर सोडावे पण बायका - मुलांची जबाबदारी टाळून वैराग्याचे सोंग नको. वैराग्य म्हणजे असक्ती त्याग, संग्रहत्याग, उपभोग त्याग होय. वर्णव्यवस्था देखील कशी असावी हे सांगताना ते म्हणतात, माणसामध्ये राजस, तामस व सात्विक हे गुण असतात. जसा त्याचा स्वभाव तसे त्याला कर्म दिले आहे. पण ते करताना ना तो बेताल झाला तर वर्णव्यवस्था बिघडते. उच्च नीच भेदभावाचे अवडंबर माजल्याने गावाचे पतन होते. लोकशिक्षण न्यायरक्षण, जनांचे पोषण व श्रमदान यासाठी जे प्रयत्न करतील त्यानाच वर्णाश्रम लाभेल.

**लोकवशीकरण पंचकामध्ये संसर्ग -** प्रभाव, आचार - प्राबल्य प्रचार, महिमा, सेवा, सामर्थ्य व संघटन-शक्ति यांवर भाष्य येते. संसार सुखाचा करायचा असेल तर स्वतः पासून त्याची सुरुवात करायला हवी. प्राणिमात्रांच्या झुंजी लावून आनंद साजरा करणं हे हीनपणाचे लक्षण आहे. मुक्या प्राण्यांचे स्वतःच्या आनंदासाठी हाल करणे योग्य नव्हे. कुस्ती व्यायामाबरोबर उत्तम खेळ, उत्तम कार्य, उत्तम कला, उत्तम सौदर्य यामुळेच गावास शोभा प्राप्त होते. प्रामाणिकपणे व ग्रामसुधाराच्या आस्थेने कार्य करणारे पुढारी गावाला सुधारतात पैसा, प्रतिष्ठा व सत्ता नेतयाची माती भष्ट करते. मग तो गुंडांना हाताशी धरुन स्वतःची मनमानी करत गरीब जनतेचे जिणे त्रस्त करुन टाकतो. हातात तलवार न घेताही बुध्द जगावर राज्य करता झाला हा दाखला देऊन तुकडोजी सांगतात की, प्रचारकाच्या अंगी शील, सत्य, शुध्द चारित्र्य व नम्रता हवी. आत्मशुध्दीने गावास सुधारता येईल. जगात जेवढे पुरुष सज्जन म्हणून गणले जातात ते त्यांच्यातील सेवाधर्मामुळेच तीर्थी दान, सत्पात्री भोजन, यज्ञादिकी खर्चावे अन्नधन' आजच्या विज्ञान युगात देहदान, ग्रामदान, दृष्टिदान, भूदान, रक्तदान ही दान श्रेष्ठतम आहेत. त्याचे महत्व गावच्या नेत्याने गावकऱ्यांना समजावून सांगितले पाहिजे. फुटीर वृत्तीचे गुंड गावास नासवतात. मतदान म्हणजे करमणूक नव्हे. मनात एक आणि व्यवहारात एक असा व्यवहार करणारे नेते गावच्या कलयाणस घातक ठरतात.

ग्रामनिर्माण पंचकामध्ये ग्रामरक्षण, ग्रामशुध्दी ग्रामनिर्माणकला, ग्राम - आरोग्य, गोवंश- सुधार या प्रकरणांचा समावेश आहे. ग्रामसुधारणेसाठी सज्जनांनी एकत्र येणे का आवश्यक आहे हे ते सांगतात. ग्रामसेवेसाठी कोणी अडचण सांगू नये गावाचा तरुण वर्ग सुसज्ज असावा हे सांगताना त्यांनी संभाव्य आपत्तींची कल्पना दिली आहे त्यावरुन त्यांचा ग्रामरचनेचा सूक्ष्म अभ्यास दिसून येतो. जेव्हा तरुणांना आपण 'खेडयाकडे चला' असा संदेश देतो तेव्हा गावात काय सोयी आहेत गावातील वतनदार इजारदार ग्रामजोशी देशकर ज्यांना ग्रामाधिकार आहे ते मनमानी न करता गावाचे आरोग्य असे राखतात हे पाहिले पाहिजे. सांडपाण्याची योग्य व्यवस्था सौचालयांची बांधणी रोगराईप्रतिबंधात्मक योजना, विहीर, रस्ते दुरुस्ती, कचऱ्याची योग्य तऱ्हेने विल्हेवाट याला महत्व देऊन आदर्श ग्राम बनले पाहिजे. 'हात फिरे तेथे लक्ष्मी वसे' या उत्कीप्रमाणे गावकऱ्यांनी आपल्यातील कौशल्य ओळखून आपल्या कारागिरीने खेडी स्वयंपूर्ण करावीत. तुकडोजी महाराजांनी शहरीकरण व यांत्रिकीकरणामुळे गावातील लघुउद्योग कसे बंद पडतात याचे दाखले दिले आहेत. आज शहरात उभ्या राहणाऱ्या भव्य मॉलस मुळे छोटे उद्योग पूर्णपणे बंद पडलेले दिसतात. नगरपालिका, महानगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींनी यामध्ये गांभीर्याने लक्ष घालणे व लघुद्योगांचे पुनरुज्जीवन होईल असे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. ग्रामांची रचना सुशोभिकरण, दुकाने पेठा यांची रचना जीवित व वित्त सुरक्षेच्या व्यवस्था करमणूकीची केंद्रे, सुंदर रस्ते, साफ नाले, विश्रामगृहे भव्य क्रीडांगणे, सुंदर हस्ताक्षरानी रंगविलेल्या भिंती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, संस्कार व उद्बोधनासाठी वृत्तपत्रे, मासिके, हस्तलिखिते, व्याख्याने कीर्तने, कलापथके सर्व कलांचे कौतुक गावकऱ्यानी करावे. गावच्या नेत्यांनी कलाकरांना प्रोत्साहन द्यावे या त्यांच्या विचरामागे तुकडोजी महाराजांची किती व्यापक दृष्टी होती हे दिसून येते. फास्ट

फूड, जंक फूडच्या जमान्यात वाढते आजार लक्षात घेऊन आहारतज्ज्ञ कुपथ्य टाळावयास सांगतात तसेच तुकडोजी मद्य, जंक फुडच्या जमान्यात वाढते आजार लक्षात घेऊन आहारतज्ज्ञ कुपथ्य टाळावयास सांगतात तसेच तुकडोजी मद्य मांसाहाराने विकासबुध्दि वाढते अति गोड,तळलेले, मसाल्याचे पदार्थ टाळून पालेभाज्या, फळे असा सकस आहार भोजनसमयी प्रसन्न चित्ताने घ्यावे असे सांगतात. गोवंश वदवून संपूर्ण भारत सुखी समृध्द होईल गोरसतुल्या दुसरे काही नाही.' असे म्हणत गायीच्या दुधाचे महत्व विशद करतात. व्यायाम व योग्य आचारावर भर देतात.

दृष्टी परिवर्तन पंचकामध्ये वेश-वैभव, गरिबी-श्रीमंती, श्रम-संपत्ती, जीवन-शिक्षण, महिलोन्नती या विषयावर भाष्य येते. शरीर सुदृढ नसेल तर वरवरच्या रंगरंगोटीचा काय उपयोग? हौसेपोटी पैशची उधळण माणसाला अखेर कर्जबाजारी बनवते. माणसाने काटकसरीने संसार करावा. देवळातील पुजाऱ्याने देवाच्या नावावर बाजार मांडू नये. तर मुलाचे चारित्र्य घडविण्यात मातृशक्तीचा वाटा मोठा आहे. पुरुषांनी स्त्रीला आपल्या कार्यातील धोंड समजू नये. वर-वधूना आपला जोडीदार निवडण्याचे समान हक्क असावेत. महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास होईल असे उपक्रम योजावेत असे विचार मांडले आहेत.

**संस्कारशोधन पंचकात** - वैवाहिक-जीवन, अत्यसंस्कार, सणोत्सव, यात्रा-मळे, देवदेवळे यावरील भाष्य येते. महिला व पुरुष यांच्या बरोबरीच्या योगदानानेच सृष्टीचक्र सुरळीत चालते परस्पर सहकार्य महत्वाचे असते विषय विकारातून होणारे विवाह सफल होत नाहीत लग्नाचा बाजार मांडू नये. त्यांच्या घरी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होतो तेव्हा त्याचे कुटुंब उघडयावर पडते व्यक्ती दुरावल्याचे दु:ख असतेच गरिबीचा संसार असेल तर दु:ख करत बसण्यासही वेळ नसतो अशा वेळी गावकऱ्यांनी समजून घेणे गरजेचे असते. सोयरसुतकाचे अवडंबर माजवू नये. या विचारांत असलेला सुज्ञपणा, गरीबाबद्दलची तळमळ आपल्याला जुन्या चालीरितीबाबत पुन्हा विचार करायला लावते.

**प्रमधर्मस्थापन पंचकात मूर्ती -** उपासना, सामुदायिक प्राथना व विश्वधर्म, दलित - सेवा, भजन - प्रभाव यांचा समावेश होतो. कवि केशवसुतांनी मूर्तीभंजन कवितेत अंधश्रध्देवर प्रहार केला आहे. आणि 'मजुरावर उपासमारीची वेळ' या कवितेत मजुराचे श्रमिकाचे दु:ख मांडले आहे तद्वतच तुकडोजी महाराज म्हणतात, देवाच्या मूर्तीसाठी धनिक लोक सोने हिरे मुकुटी बैसविण्यास तत्पर असतात. पण श्रमिकास मंदिर बांधताना मेला तरी पहात नाही. श्रीमंताच्या या मस्तवाल वृत्तीवर ते प्रहार करतात. लोकांमध्ये जाती - पाती - धर्म यामुळे विषमता निर्माण होत सामुदायिक प्रार्थनेमुळे सर्व लोक प्रेमभावाने व विश्वकल्याणाच्या उदात्त भावनेने जवळ येतात.

**दैवत्व -** साधन पंचकात संत - चमत्कार, संत - स्वरुप, अवताराकार्य, प्रारब्धवाद, प्रयत्न - प्रभाव यांवरील भाष्य येते. मानव हा विश्वकुटुंबाचा घटक आहे तो पूर्णपणे सुखी व समाधानी कसा होईल याबाबत तुकडोजी महाराजांनी मांडलेले विचार मननीय आहेत. प्रेमाने साऱ्या जगाला जिंकता येते.

**आदर्श -** जीवन पंचकात जीवन - कला, आत्मानुभव, ग्राम - कुटुंब, भू-वैकुंठ, ग्रंथाध्ययन व ग्रंथ-महिमा या प्रकरणांचा समावेश होतो. मानवामध्ये अनेक प्रकारची कौशल्य आहेत तरीही अभ्यासाने पकटावे, ज्याला ज्या कलेची आवड त्या विषयात त्याने अभ्यासाने चिंतनाने कौशल्य प्राप्त करावे. स्वर्ग निर्माण करावयाचा असेल तर मी आणि माझे कुटुंब असा स्वार्थी विचार सोडा. राष्ट्रकार्यासाठी तन मन धन अर्पण करण्याची वृत्ती अंगी बाळगा. उत्तमोत्तम ग्रंथमध्ये जीवनाचे खरे मर्म सांगितले आहे त्याचे वाचन व आकलन केल्यास मानव उन्नत होऊन लौकिकास पात्र होईल असे सांगत तुकडोजी महाराजांनी अनेक उतमोत्तम ग्रंथांचे दाखले व त्याच्या वाचनाने मिळणारी फलश्रुती सांगितली आहे. गावाचे चारित्र्य घडविण्यासाठी ग्रामगीतेसारखे लोकांना सन्मार्गावर नेणारे ग्रंथ व्हावेत ही इच्छा व्यक्त केली आहे.

**निष्कर्ष :-**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या संपुर्ण ग्रामगीतेचे अवलोकन केल्यास आजच्या काळात देखील या ग्रंथाची मौलिकता लक्षात येते. ग्रंथाच्या माध्यमातून तुकडोजी महाराजांनी केलेल्या ग्रामविकासाच्या या चळवळीचे मूल्य असाधारण असेच आहे. आपला विषय समजावून सांगताना त्यांनी दिलेले विविध दाखले त्यांचा विविध ग्रंथांचा व्यासंग दाखवितात. त्यांनी या काळातील मानवी जीवनव्यवहारांतील विसंगती, अंधश्रध्दा लक्षात घेऊन विज्ञानाला प्राधान्य देऊन विषमतेकडे चालेल्या समाज रचनेत परिवर्तन करुन जीवनात समत्व घडवून आणणाऱ्या समज रचनेचे कार्य केले 'परीजगाचे दु:ख नाही मिटले उपदेश त्यांचे नाही उतरले' ही खंत आज ही आहे.

संत तुकडोजींचा आदर्श डोळयासमोर ठेवून राळेगणसिध्दी गावच्या पंचक्रोशीत स्वंयपूर्ण व विकसित खेडयांचा प्रकल्प सिध्दीस नेणारे अण्णा हजारे आणि त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत ग्रामविकासाचे स्वप्न साक्षात करणारे हिवरेबाजाराचे सरपंच पोपटराव पवार यांच्यासारखे कर्मयोगी समाजासमोर ग्रामविकासाची नवीन पाऊलवाट निर्माण करत आहेत. जलयुक्त शिवार योजनांसाठी अनेक गावे, गावकऱ्यांचे समूह झटून प्रयत्न करीत आहेत. खेडयातील बांधवांना योग्य नेतृत्वाची गरज आहे. ही नेतृत्व आपल्यातूनच पुढे यायला हवीत. समाजातील एक जबाबदार नागरिक म्हणून माझे कर्तव्य मी चोखपणे बजावायला हवे तरच मला स्वत:ला सुसंस्कृत म्हणण्याचा अधिकार आहे. डॉ.प्रकाश आमटे, डॉ.विकास आमटे, डॉ.अभय बंग, डॉ.रवींद्र कोल्हे आपल्या कुटुंबियांसह ग्रामविकासाचा ध्यास घेऊन सामान्यातल्या सामान्य माणसासाठी पृथ्वीवर नंदनवन निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

ज्याच्या विचाराने व कृतीने देशातील नागरिकांची सुधारणा त्यांचे कार्य ही एक प्रभावी चळवळ बनली आहे त्यांचे विचार व समाजाप्रती असणारे ऋण आजच्या काळात विसरु शकणार नाही. तरीही नगरपातळी वरील प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी निरपेक्ष बुध्दीने व निस्वार्थीपणे ही चळवळ हाती घेतल्यास तुकडोजी महाराजांचे ग्रामविकासातून राष्ट्रविकास हे स्वप्न दूर राहणार नाही.

# राष्ट्रबांधणीतील १९४२ च्या लढयाचे योगदान

**प्रा.सौ.अश्विनी हिरीकुडे**
इतिहास विभाग,
ओंकार महाविद्यालय,गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

इ.स. १९१६ लखनौ येथे राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग यांच्या अधिवेशनातून स्वराज्यातून एकत्रित इंग्रजांकडे मागणी करण्यात आली होती. पण १९१९ चा कायदा, सायमन कमिशन, १९३३ चा कायदा, क्रिप्स योजना इ. भारतीयांच्या मागण्यांचे पुर्तता करण्यासाठी हया योजना पाठवल्या होत्या पण भारतीय राष्ट्रीय सभेला म्हणजेच भारतीय जनतेला जे 'स्वराज्य' हवे होते ते आजपर्यंत प्राप्त झाले नव्हते. हिन्दुस्थानातील सर्व पक्षांनी क्रिप्स योजना फेटाळली होती. वैयक्तिक सत्याग्रहामुळे ब्रिटिश सरकार नमले नाही. त्यामुळे चळवळीची तिव्रता वाढवली पाहिजे असे कॉंग्रेसला वाटले. याचवेळेस दुसरे महायुद्ध सुरू होते त्यावेळी जपानच्या मदतीस महान क्रांतीकारक नेताजी बोस गेले व त्यांनी 'चलो दिल्ली' ही घोषणा केली. या घोषणेमुळे ''ब्रिटिशांची अडचण हीच आमची संधी'' असे मानणऱ्या जहालवादी नेताजींचय व जपानच्या स्वागतास तयार झाले. जपानचे भारतावरील आक्रमण हे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादावर आक्रमण होते. त्यामुळे ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य द्यावे. भारत स्वतंत्र असता तर जपानने भारतावर आक्रमण करण्याचे काहीच कारण नव्हते म्हणून कॉंग्रेसने एक नवीन आक्रमण चळवळ लोकांपुढे ठेवली. ती चळवळ म्हणजेच चलेजाव आंदोलन होय.

हिन्दुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यास हिंदी जनता शत्रुच्या आक्रमणास एकदिलाने प्रतिकार करील. यासाठी देशात एक तात्पुरते सरकार प्रस्थापित करण्यात यावे. त्याचे मुख्य कार्य सशस्त्र-निशस्त्र शक्तिनिशी व दोस्ताचे सहाय्य घेवून आक्रमणाचा प्रतिकार करणे हे राहील. ''हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे ब्रिटिश सरकारने नाकारल्यास महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानच्या जनतेने अहिंसात्मक झगडा सुरू करावा अशी ही सभा जनतेस आदेश देत आहे'' हा ठराव मांडताना महात्मा गांधीजींनी ''हा निर्वाणीचा झगडा आहे असे जाहीर केले.'' 'करा किंवा मरा' (Do or Die) या निश्चयाने हा अंतिम लढा सुरू करण्याचा जनतेला उपदेश केला. इंग्रजांना चालते व्हा म्हटल्याबरोबर निघुन जाण्यासाठी इंग्रज भारतात आले नव्हते. ब्रिटिशांनी कॉंग्रेसचे आवाहन स्वीकारून दडपशाहीचे शस्त्र उपसले.

८ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींनी चलेजाव (Quit India) ची घोषणा केली व ९ तारखेपासुन सुरवात होणार होती. ब्रिटिश सरकारनेही हे आंदोलन दडपून टाकण्याचे ठरविले. ९ ऑगस्टला पहाटेच गांधीजींसह सरदार पटेल, पंडित नेहरू, आचार्य कृपलानी, मौलाना आझाद, गोविंद, वल्लभपंत, असफअली अशा अनेक कॉंग्रेसच्या नेत्यांना अटक करण्यात येऊन त्यांना विविध तुरूंगात टाकण्यात आले. गांधीजींना पुणे येथील आगाखान पॅलेसमध्ये तर इतर नेत्यांना अहमदनगरच्या तुरूंगात ठेवण्यात आले. कॉंग्रेसला बेकायदेशीर ठरविण्यात येऊन या संघटनेची बॅंकेतील खाती सरकारजमा केली.

कॉंग्रेस नेत्यांना अटक केल्याबरोर चळवळ थांबेल असे ब्रिटिशांना वाटत होते. पण कॉंग्रेस नेत्यांच्या मार्गदर्शनाशिवाय जनतेने सर्व देशभर उत्स्फुर्त आंदोलन सुरू केले. सर्व देश हिंसा अहिंसेचा विचार न करता आंदोलनात सामीला झाला. राजयंत्रणा मोडून काढण्यासाठी भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब केला. रेल्वे लुटने, सरकारी तिजोऱ्या ताब्यात घेणे, सरकारी मालमत्ता उध्वस्त करणे, पोस्ट, तारा यंत्रे, वाहतुकीची साधने बंद पाडून राजयंत्रणा खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला.

सातारा जिल्हयात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेला लढा अभूतपूर्व होता. सरकारी यंत्रणा मोडून त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले. रेल्वे लुटल्या, राज्यव्यवस्थेसाठी पैसा मिळवला. स्वतंत्र न्यायव्यवस्था उभारली. या भागात ब्रिटिश सेनेचा अवशेष देखिल ठेवला नाही असाच प्रयत्न बंगाल, पंजाब प्रांतात झाला. भारत छोडो आंदोलन देशव्यापी झाले. जनतेतील नैराश्याची भावना नष्ट होऊन जनतेला नवा मार्ग दाखवण्याचे कार्य या चळवळीने केले. या काळात ५०० पोस्ट ऑफिसे, २५० रेल्वे स्टेशन, १५० पोलीस चौक्या नष्ट केल्या. ३१ पोलीस व शिपाई ठार झाले. या चळवळीत सुमारे ६५० लोक चळवळ करताना मारले गेले तर हजारोंना तुरूंगात डांबले. तुरूंग अपुरे पडले म्हणून अटल गुन्हेगारांना सोडले. स्वयंसेवकांसाठी तुरूंगात जागा केल्या.

भुमिगतांनी तर दहशतवादाचा कहर केला. जयप्रकाश नारायण, मनोहर लोहिया, अरूणा असफ अली यांच्याकडे भुमिगतांचे नेतृत्व होते. त्यांनी राजयंत्रणा मोडून काढण्याचा प्रयत्न केला. सर्व देशभर अत्याचार, अन्याय व तुलुम यांनी थैमान घातले. गांधीजींचा अहिंसेवर विश्वास होता. गांधीजींनी आत्मशुध्दीसाठी ९ फेब्रुवारी १९४३ रोजी २१ दिवसाचे उपोषण केले. या उपोषण काळात गांधीजींची प्रकृती चिंताजनक असुनही सरकारने त्यांना सोडले नाही. सरकारचा निषेध म्हणून ए.पी. मोदी, एम.एस. व

नलिनी रंजन सरकार यांनी कार्यकारिणीच्या सदस्यत्वाचे राजीनामे दिले. शेवटी ३ मार्च १९४३ रोजी गांधीजींनी २१ दिवसाचे उपोषण पूर्ण केले.

८ ऑगस्टच्या छोडो हिन्दुस्थान चळवळीस मुस्लीम लीगचा पाठिंबा नव्हता. १६ ऑगस्ट १९४२ रोजी मुस्लीम लीगने ठराव करून कॉंग्रेसची ही चळवळ म्हणजे उघडबंड असून त्यांना हिन्दुस्थानात हिंदुचे राज्य स्थापन करायचे आहे अशी टिका केली. त्यामुळे ब्रिटिशांनी मुस्लीमांना पाठिंबा दिला. १९४३ मध्ये कराची येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात 'फाळणी कराव मग जा' असा मुस्लीम लीगने ठराव केला त्यामुळे ही चळवळ म्हणजे इंग्रज विरूद्ध कॉंग्रेस न राहता मुस्लीम लीग विरूद्ध कॉंग्रेस असे या चळवळीस स्वरूप प्राप्त झाले. १९४४ अखेरपर्यंत या चळवळीचा जोर होता. या काळातच देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी व संभाव्य राज्यघटना ठरविण्यासाठी राजांनी योजना, देसाई लियाकत अली योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजना इ. मुस्लीम लीग व कॉंग्रेस यांच्यात तडजोड घडवणाऱ्या योजना पुढे आल्या.

या चळवळीला आधुनिक भारताच्या इतिहासात अतिशय महत्वाचे स्थान आहे. ही चळवळ पूर्णता झाली नसली तरी तिचे महत्व कमी होत नाही. याविषयी जयप्रकाश नारायण म्हणतात, १७८९ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या राज्य क्रांतीस आणि १९१७ मध्ये झालेल्या रशियन क्रांतीस जसे त्या त्या देशात महत्वाचे स्थान आहे तसेच महत्व भारताच्या इतिहासात १९४२ च्या आंदोलनास आहे.

भारताच्या राजकारणत व समाजकारणात महात्मा गांधीजींचे स्थान अलौकिक आहे. १९२० ते १९४७ पर्यंत भारतीय राजकारण व समाजकारणावर त्यांचा प्रभाव कायम राहिला. हिंदुस्थानातील जनतेने त्यांना महात्मा ही पदवी दिली. सुभाषचंद्र बोस यांनी गांधीजींना Father of our Nation असे म्हटले होते.

या चळवळीचे वैशिष्टय हे की ही चळवळ जनतेने सुरू केली राष्ट्रसभेने नाही. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने महात्मा गांधीजींच्या ठरावास मान्यता देऊन त्यांना चळवळ सुरू करण्याचा आदेश दिला. पण त्याच दिवशी महात्मा गांधींसह इतर सर्व प्रमुख नेते पकडले गेल्याने कॉंग्रेस कमिटीचे आदेश कागदावरच राहिले. लोकांना चळवळ करायची एवढेच माहिती होते. पण ती कशी करायची याविषयी सुसंगत असा कार्यक्रम तयार झाला नाही. याचा परिणाम म्हणून लोकांनी आपणहुनच चळवळीचे नेतृत्व केले.

१९१६ पासून १९४० पर्यंत भारतीयांना स्वातंत्र्याविषयी अनेक अमिषे ब्रिटिशांनी भारतीयांना दाखवली होती पण भारतीयांच्या स्वराज्याची अपेक्षा पूर्ण झाली नव्हती. त्यामहे जनतेने क्रिप्स योजना फेटाळली. अशा परिस्थितीत गांधीजींनी एक देशव्यापी चळवळ सुरू केली ती म्हणजे चलेजाव आंदोलन. या चळवळीच्या वेळी राजकीय पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन नसताना जनतेने ही चळवळ देशव्यापी बनवली. अश या आंदोलनाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होते आहे.

**समारोप :**

१. १९५७ पासून १९४० पर्यंत इंग्रजांच्या तीव्र प्रतिकारास भारतीयांना सामोरं जावं लागले.
२. इतिहासात अशा आंदोलनांना अतिशय महत्वाचे स्थान आहे.
३. या आंदोलनापासून ब्रिटिशांनी भारतातील आपला राज्यकारभार आटोपता घेऊन भारतीयांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य देण्याचा विचार केला.

**संदर्भ पुस्तके :**

१. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. बी. एन. सरदेसाई, डॉ. व्ही. एन. नलवडे, पान नं. ३०३ ते ३०६.
२. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास - डॉ. जयसिंगराव पवार, पान नं. २४९ ते २५२.
३. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास - गायकवाड थोरात, पान नं. २२३ ते २२६.
४. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास - जयसिंगराव पवार, पान नं. १७, १०.
५. भारताचा स्वातंत्र्य लढा - डॉ. पी. एन. शिंदे, ए. जी. थोरात, पान नं. १११ ते १२१.

# राष्टनिर्माणातील शिक्षकांचे योगदान

**प्रा.ए.ए.घोडके**
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

राष्ट्रनिर्मिती ही एक प्रगतीची, विकासाची आणि कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीची प्रक्रिया असते आपण सर्वजण एक आहोत ही मानसिक प्रक्रिया राष्ट्रनिर्मितीचा खरा स्त्रोत आहे. या साठी देशातील लोकाच्या मनात स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे विचार रूजविणे अत्यंत महत्त्वाचे असते. हे विचार रूजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षकच करीत असतात. राष्ट्रनिर्माणात अनेक महापुरूषानी आपले मोलाचे योगदान दिले आहे. ही गोष्ट त्रिकालाबाधीत सत्य आहे. मात्र या महापुरूषाच्या जडणघडणीत खरा वाटा त्यांना लाभलेल्या शिक्षकाचाही आहे. म्हणून महापुरूषाच्या माध्यमातून शिक्षकानी राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान दिलेले आहे. असे म्हटल्यास अनूचित ठरणार नाही. राष्ट्रनिर्माणाची खरी सुरूवात होते ती शाळेतून जिथे राष्ट्रनिर्माण करण्यासाठी घडविली जाते नवी पिढी.

आपला इतिहास शिक्षकांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाची साक्ष देतो.चांगले गुरू शिक्षक यांनीच तर समाजाला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन सारख्या शिक्षकांनी देशाचे नेतृत्व केले.साने गुरूजींनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावेची शिकवण संपूर्ण मानवजातीला दिली. ते केळुस्कर गुरूजीच होते ज्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान व्यक्तीच्या जीवनाचा पाया घातला.पहिली स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना जगण्याचा बळ दिले.अशा लाखो शिक्षकांनी समाजाला घडविले.देशाला योग्य मनुष्यबळ पुरविले.चांगले डॉक्टर, वकील, अभियंते, संशोधक, अर्थतज्ञ, देशातील सर्वोच्च पदावर काम करणारे उत्तम प्रशासक ही सारी मंडळी घडली ती त्यांना लाभलेल्या शिक्षकांच्यामुळेच.ही राष्ट्रीय संपत्ती निर्माण करण्याचे काम शिक्षकांनीच तर केलेले आहे.ही मानवीरूपी संपत्ती राष्ट्रबांधणीत आपला हातभार लावीत आहे.याचं बहुतांशी श्रेय शिक्षकांना दिल्यास वावगे ठरणार नाही.आजपर्यंत शिक्षकांनी राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.अनेकांगानी शिक्षकांनी राष्ट्रबांधणीत आपला मोलाचा वाटा उचललेला आहे.येथून पुढील काळातही राष्टउभारणीत शिक्षकांचे योगदान अधिकच असणार आहे यात शंका नाही. राष्ट्रीय जीवनातील शिक्षकांचे महत्त्व दुलर्क्षित करता येत नाही.देशाच्या विकासामध्ये त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.देशाला प्रगतीपथावर न्यावयाचे असेल तर देशाला उत्तम दर्जाचे ज्ञानसंपन्न, प्रतिभासंपन्न, दुरदृष्टी असणारे तसेच काळाची पाऊले ओळखणारे शिक्षक हवे आहेत.असे शिक्षक निर्माण होण्यासाठी सर्वप्रथम आपणाला हवी एक चांगली शिक्षण पध्दती.उत्तम शिक्षणपध्दतीतूनच उत्तम शिक्षक घडू शकतील. हेच शिक्षक उद्याचे शिक्षणतज्ञ बनून राष्ट्रबांधणीसाठी भरघोस योगदान देतील. शिक्षक राष्ट्र बांधणीत कोणत्या प्रकारची भूमिका पार पाडत आहेत त्यांच्या याच योगदानाचा अभ्यास प्रस्तूत शोध निबंधाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. राष्ट्रबांधणीतील शिक्षकाची भूमिका समजून घेणे.
२. राष्ट्रबांधणीतील राष्ट्रउभारणीतील शिक्षकांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
३. राष्ट्रबांधणीत शिक्षकांने कोणते गुण आत्मसात करावे याची चर्चा करणे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोध निबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.
**संशोधनाचे स्त्रोत :** प्रस्तुत शोध निबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा वापर करण्यात आलेला असून यासाठी उपलब्ध संदर्भ साहित्य, वतर्मानपत्रे तसेच इंटरनेट या माध्यमांचा वापर करण्यात आहे.

**राष्ट्रीय जीवनातील शिक्षकांची भूमिका :** प्राचीन भारतीय समाजात शिक्षकाला सर्वश्रेष्ठ स्थान होते.त्यांच्यापुढे संपूर्ण समाज आदराने नतमस्तक होत असे.विद्यार्थ्यांच्या दृष्टीने तर अध्यापक गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णू गुरूर्साक्षात परब्रम्हच होते.गुरूजवळ ज्ञान होते.ज्ञान हीच संपत्ती समजली जाई.गुरू ज्ञानसंपन्न, चारित्र्यसंपन्न, निःस्वार्थी, निगर्वी, निस्पृह, निर्भिड, निःपक्षपाती वृत्तीचे असत.म्हणूनच आपल्या पाल्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पाल्याला गुरूकडे सोपविले जात.गुरू ज्ञानदानाचे पवित्र कार्य

यशस्वीपणे पार पाडीत.म्हणूनच भारत संपूर्ण जगात ज्ञानाच्या उच्च शिखरावर जाऊन पोहचला होता.राजा असो रंक सर्वजण गुरूंच मार्गदर्शन घेत.शिक्षक कल्याणकारी समाजव्यवस्थेचे विश्वस्त होते.आपल्या इतिहासात महान शिक्षकांची अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात ज्यांच्या निर्णयामुळे समाजाला दिशा प्राप्त झालेली आहे.चांगल्या राष्ट्राची निर्मिती चांगल्या नागरिकांमुळे होते.चांगले नागरिक चांगल्या शिक्षकांमुळे घडतात तर चांगले शिक्षक चांगल्या शिक्षणतज्ञामुळे घडत असतात.चाणक्याच्या मते 'राष्ट्राचा खरा निर्माता हा शिक्षकच असतो.' मुलांच्या अपरिपक्व मनांना आकार देण्याचे कार्य त्याच्या हातून घडत असते.आपल्या स्वतःच्या जोखीमवरच मुलांना पुढील काळासाठी तयार करीत असतो.म्हणूनच एम.एल.जॅक्स या कार्याची महती सांगताना म्हणतो की 'उद्याचं जग हे आजच्या शाळांमधून जन्म घेते' उद्याच्या सुंदर जगाचा निर्माता शिक्षकच होऊ शकतो.

**शिक्षक एक राष्ट्र निर्माता :**

शिक्षकांना राष्ट्रनिर्माते म्हणणे योग्यच आहे.कारण शिक्षकांनीच त्यांच्या धैर्याने त्यागाने आणि प्रेमाने आम्हाला योग्य मार्ग दाखविला आहे या वाटेवरून वाटचाल करीत महान पुरूषानी आपले राष्ट्र निर्माण केलेले आहे.हे शिक्षकच आपल्या व्यक्तिमत्वाला योग्य आकार देऊन आपणास योग्य दिशा दाखवित आपल्या इच्छित ध्येयापर्यंत पोहचण्यास मदत करतात.शिक्षकांच्यामुळेच राष्ट्राचा विकास आणि समृध्दी प्राप्त होण्यास मदत होते.एका कुशल समाजाच्या निर्मितीमध्ये ते मार्गदर्शकाची भूमिका बजावितात.समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीने आपल्या वाटयाला आलेली सामाजिक भूमिका कशा पध्दतीने पार पाडावी याचे योग्य मार्गदर्शन शिक्षकच तर करीत असतात.शिक्षकच असतात जे समाजातील राष्ट्रातील जनतेला नैतिकतेचे धडे घालून देत असतात.ही नैतिकता त्या समाजाला राष्ट्राला एका वेगळयाच उंचीवर नेत असते.जशी आंधळया व्यक्तीला काठीची गरज असते तसेच राष्ट्राला मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षकाची गरज असते.यासाठी शिक्षकांनीही आपल्या कर्तव्याप्रती वचनबध्दता पाळणे तितकेच गरजेचे आहे.त्याने आपल्या वाटयाला आलेली भूमिका आधिक जबाबदारीने पार पाडली पाहिजे.तो एक न्यायाधिश असतो.जो मुलांना त्यांची बुध्दिमता आणि सामाजिक कौशल्यांची पारख करून त्यांना जीवनात पार पाडाव्या लागणा-या सामाजिक व व्यावसायिक भूमिकांसाठी तयार करीत असतो.विविध टप्प्यावंर विद्यार्थ्यांना विविध परीक्षांसाठी मार्गदर्शन करून त्यांच्या विविध समस्यांच्या अनुषंगाने त्यांचे समुपदेशन करीत असतो.विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या पालकांनाही विविध कोर्सेस, अभ्यासक्रम, त्याच्याशी संबधित उपलब्ध रोजगार यांच्याविषयी योग्य ती माहिती पुरवून पाल्य पालक यांचे जगणे सुखकर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतो.

**शिक्षकाने राष्ट्रबांधणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावायला पाहिजे :** नव्या पिढीच्या चारित्र्य निर्माणात शिक्षकांची भूमिका बहुआयामी आहे.कोणत्याही समाजाची संस्कृती, सभ्यता घडविण्याचे कार्य शिक्षकांच्या माध्यमातून होत असते.व्यक्तीचे समाजीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण तो करीत असतो.एकाच वेळी तो अनेक भूमिका पार पाडत असतो.आपली संस्कृती, सभ्यता, देश याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम, अभिमान आणि आत्मविश्वास निर्माण करीत असतो.आपला सामाजिक वारसा, रूढी, उच्च परंपरा, वैभवशाली इतिहास यांचे हस्तांतर नव्या पिढीकडे करीत असतो.त्यामुळेच शिक्षकांनी सातत्याने ज्ञान प्राप्ती करावी.आपले चारित्र्य सदैव शुध्द ठेवण्याचा प्रयत्न करावा.त्याने नेहमीच सर्जनशील, नाविन्यपूर्ण व प्रभावी अध्यपन पध्दतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.शिक्षकांचे कार्य इतके महान असते की त्यामुळे आपण ज्ञानी व्यक्ती बनून समाज धर्म आणि राष्ट्र यांच्या प्रगतीत मोलाचे योगदान करीत असतो.शिक्षक हे देशाचे भविष्य घडविणारे असून ते आपल्याला ज्ञान आणि शहाणपण देतात.ते देशातील बहुतांशी लोकांच्या ज्ञानाचा मुख्य स्त्रोत असून तेच राष्ट्र निर्मितीला हातभार लावीत असतात.ते जाणत असतात की राष्ट्र निर्माणासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे.त्यानुसारच देशातील जनतेला शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत असतात.समाजातील विघातक गोष्टींचा सामना करण्याची क्षमता ते बाळगून असतात यातूनच ते भारत देशाला एक शक्तिशाली आणि शैक्षणिक महासत्ता बनवू शकतात.राष्ट्रबांधणीमध्ये त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.कारण देशाचे भविष्य त्यांच्याच हातात आहे.प्रगत राष्ट्रांची प्रगती पाहिल्यास हे दिसून येते की त्या देशाची खरी संपत्ती हे त्यांचे शिक्षकच आहेत.ते राष्ट्रनिर्माणासाठी मुलांची मानसिकता तयार करीत असतात.त्यांना देशाच्या प्रगतीचे मजबूत खांब बनवित असतात.देशातील मुलांच्या जीवनामध्ये समतोल राखत उद्याचे सक्षम नागरिक घडविण्याची जबाबदारी पार पाडत असतात.त्यांनी घडविलेले सक्षम नागरिकच राष्ट्राला महासत्ता बनविण्यासाठी मदत करीत आहेत.

**शिक्षकाच्या विविधांगी भूमिका :** शिक्षक आपल्या संपूर्ण सेवाकाळात बहुआयामी भूमिका पार पाडीत असतो.ज्ञानदान करणे, मार्गदर्शक, मित्र, हितचिंतक, पालक, तत्ववेता, समाजसुधारक, विचारवंत या विविधांगी पार पाडत विद्यार्थ्यांना पालकांना समाजाला मार्गदर्शन करीत असतो.यांच्या मार्गदर्शनातून समाजाला पुढे जाण्याची दिशा प्राप्त होत असते.

**१. मुलांना आयुष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार करतो :** अगदी लहानपणापासून शिक्षक विद्यार्थ्यांना पालकांपासून थोडा वेळ दूर ठेवून मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून त्या लहान बालकांना घडविण्याचे कार्य करीत असतात.त्यावेळी

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

तो त्यांचा पालकच असतो.मुलांनाही त्यांच्या सान्निध्यात स्वतःला सुरक्षित वाटत असते.कळत न कळतपणे शिक्षक विद्यार्थ्यांना वेगळया वातावरणात जगण्याचे धडे देत असतात.पुढील आयुष्यात येणा–या आव्हानांना सामोरे जाण्यासाठीचे बळ त्यांच्यात निर्माण करीत असतात.

**२. साक्षरता, शहाणपण आणि चातुर्य यांची शिकवण** :शिक्षक विद्यार्थ्यांना फक्त उदरनिर्वाहापुरते शिक्षण देत नाहीत तर जीवन जगण्याचे शहाणपणही देत असतात.यातूनच त्यांचे व्यक्तिमत्वाला आकार येत असतो.शिक्षक अधिकाधिक निस्वार्थी भावाने आपल्या ज्ञानदानातून विद्यार्थ्यांना सज्ञान, सुसंस्कारित करीत असतो.तो फक्त पुस्तकी पांडित्य न शिकविता मुलांच्यात शहाणपण, चातुर्य, देशप्रेम, संवेदनशीलता, मैत्रीभाव, प्राणीमात्रावर भूतदया या गुणांच्या विकासासाठी प्रयत्नशील असतो.असे गुणसंपन्न विद्यार्थीच देशाच्या प्रगतीचे शिल्पकार बनतात.

**३. शिक्षक एक मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक** :बदलत्या काळानुरूप शिक्षकांनी आपली भूमिकाही बदलेली पाहायला मिळते.जुन्या काळातील कडक शिस्तीची भूमिका बदलून नव्या पिढीशी त्यानी मैत्री केलेली आहे.तो विद्यार्थ्यांचा मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक बनलेला आहे.त्याच्या या बदलेले भूमिकेमुळेच विद्यार्थी आपल्या अनेक प्रश्न, समस्या, अडचणी शिक्षकांबरोबर मनमोकळे पणाने सांगतात.यावेळी शिक्षकही त्यांच्या विविध प्रश्नावर त्यांना योग्य व मोलाचे मार्गदर्शन करीत असतो.हे मार्गदर्शनच जीवनात पदोपदी पुढे जाण्यासाठी त्यांना वाट दाखवित असते.तो विद्यार्थ्यांच्या धैर्य निर्माण करीत असतो.कोणत्याही संकटांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांच्या जागृत करतो.विद्यार्थ्यांनी आजपर्यंत जे करण्याचे धैर्य दाखविले नाही ते करण्यासाठी त्यांच्या सदैव पाठीशी राहून लढण्याचे बळ देत असतो.

**४. शिक्षक एक हितचिंतक** :शिक्षकाला विद्यार्थ्यांची कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक तसेच शैक्षणिक परिस्थिती माहीत असते.त्यामुळे विद्यार्थ्यांच्यात समतोल राखून तो विद्यार्थ्यांना त्याच्या विविध समस्यामुळे ती गैरवर्तनाकडे अथवा व्यसनांकडे वळनार नाहीत याची दक्षता घेत असतो.त्याला माहीत असते एक निरोगी, निव्यसनी पिढीच देशाचे उज्वल भवितव्य असते.त्यांची तो निर्मिती करीत असतो.चांगला शिक्षक नेहमी विद्यार्थ्यांच्या हिताचाचा विचार करीत असतात.ते त्यांचे हितचिंतक असतात.विद्यार्थ्यांचा हितचिंतक बनून त्याला पदोपदी चांगल्या वाईटाची जाणीव करून देत असतो.शिक्षक एक दीपस्तंभ असतो जो ध्येयापासून भरकटलेल्या विद्यार्थ्यांना जगण्याचा प्रेरणा देत असतो.विद्यार्थ्यांवर त्यांचा खूप मोठा प्रभाव असतो.त्यांच्यावर इतर कोणाचाही इतका प्रभाव नसतो जेवढा त्याच्या शिक्षकांचा असतो.विद्यार्थी शिक्षकांच्या ज्ञान, प्रेम, चारित्र्यप्रतिमा, मनमिळावूपणा, निस्वार्थी वृत्ती यामुळे भारावून गेलेले असतात.यामुळेच ते शिक्षकांच्या वर्तणूकीचे अनुकरण करीत असतात.

**५. शिक्षक एक राष्ट्रनिर्माता** : शिक्षकांची राष्ट्रनिर्माणातील आपली भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी काही गुण आत्मसात करणे आवश्यक आहे.देशाला प्रामाणिक, सेवावृत्तीने कर्म हीच पूजा मानणा–या, स्वतःला बदलत्या काळानुरूप अद्ययावत ठेवणा–या शिक्षकांची गरज आहे.यासाठी त्यांनी काही गुण आत्मसात करावेत.

१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांप्रती सदैव दयाळूपणा दाखवावा.याचबरोबर विद्यार्थ्यांच्याप्रती कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता सर्वांना निस्वार्थी भावनेने ज्ञानदान करावे.
२. शिक्षकांनी विद्यार्थ्यांप्रती संवेदनशीलता बाळगावी.विद्यार्थ्यांप्रती दाखविलेल्या संवेदनशीलतेमुळे त्यांना शिक्षक अधिक जवळचे वाटू लागतील.
३. चांगला शिक्षक घडण्यासाठी त्याच्याकडे सर्व विद्यार्थ्याप्रती सहानुभूती बाळगावी ज्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षकांप्रती आदर प्रेम निर्माण होण्यास मदत होईल.
४. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा प्रेरणास्त्रोत असतो.यासाठी शिक्षकांनी आपला दृष्टिकोन सदैव सकारात्मक ठेवावा.हा सकारात्मक दृष्टिकोनाच विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी मदत करीत असतो. तसेच विद्यार्थ्यांचाही जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होण्यास मदत होते.
५. आपण राष्ट्रनिर्माणात मोलाचे योगदान करतो याची सदैव जाणीव ठेवून कार्य करावे.एक चांगला शिक्षक समाजातील विषमता दुर करण्याचा एक पूल असतो.तो समाज अधिकाधिक कसा उन्नत होईल याची करीत असतो.समाजाबरोबर तो अधिक चांगले नाते निर्माण करीत असतो.यासाठी एका चांगल्या समाजनिर्मिती सदैव बांधील राहून शिक्षकांनी आपली भूमिका पार पाडली पाहिजे.
६. अप्रामाणिक, चारित्र्यहीन, कामचुकार, अज्ञानी शिक्षक कोणत्याही देशाची अतोनात हानी करू शकतो.एक अकार्यक्षम शिक्षक अनेक पिढयांचे नुकसान करू शकतो.अशा शिक्षकांच्या हातून भरकटलेली पिढी राष्ट्र निर्माणात अक्षम ठरतात याचे सदैव स्मरण शिक्षकाने ठेवावे.

**राष्ट्रनिर्माणासाठी शिक्षक काय करू शकतात**

१. राष्ट्रनिर्माणासाठी लोकाना आपल्या गौरवशाली इतिहासाची माहिती असावी लागते. हा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांना सांगून विद्यार्थ्यांच्यामध्ये शिक्षक राष्ट्राभिमान निर्माण करू शकतो.

२. भारतीय संविधान ही आपल्या देशाची राज्यघटना आहे. या राज्य घटनेमध्ये देशाच्या अपेक्षा आणि जाणिवा प्रतिबिबींत झालेल्या आहेत. शालेय अभ्यासक्रमांत सुद्धा हा आशय प्रतिबिबींत झाला पाहीजे आणि ही जबाबदारी शिक्षकाची आहे.

३. विद्यार्थ्यांच्यात राष्ट्रीय अस्मिता वाढवण्यासाठी राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती विकसीत करून शिक्षक राष्ट्रनिर्मितीला चालना देवू शकतो.

४. आपल्या देशाच्या सांस्कृतिक वारसाबद्धल सांगून विद्यार्थ्यांच्या मनात देशाबद्दल आत्मियता निर्माण करू शकतो.

५. बंधूता, समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या मुल्याची जोपासना विद्यार्थ्यांमध्ये करून देशाचा विकास शिक्षकाच्या माध्यमातून केला जावू शकतो.

६. विद्यार्थ्यांमध्ये स्त्री पुरूष समानतेचा दृष्टिकोन विकसीत करून राष्ट्रनिर्मितीला चालना देवू शकतो.

७. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करून देशाची उन्नती करता येवू शकते हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षक रूजवू शकतो.

८. मानवता माझा धर्म आणि भारतीय माझी जात या उद्दिष्टा प्रत विद्यार्थ्यांना घेवून जावू शकतो.

९. अधिक लोकसंख्येतून गरीबी प्राप्त होते त्यामुळे छोट्या कुंटूंबाचे फायदे नविन पिढीच्या मनावर बिंबवू शकतो.

१०. २१ व्या शतक हे अतिवैज्ञानिक व अतिऔद्योगिक आहे. त्यामुळे उदयोन्मुख भारतीय समाजाची नविन पिढी घडविताना तिच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करून शकतो.

अशा तऱ्हेने भारतीय समाजातील नविन पिढीला यशस्वी करून आपल्या देशाचा सर्वांगीण विकास शिक्षकच करू शकतो हेच त्याचे राष्टनिर्माणातील योगदान होय.

**सारांश**

शिक्षक हा नव्या पिढीचा शिल्पकार आहे.कोवळया वयाच्या बालकांतून आदर्श नागरिक साकारणारा कुशल कारागीर आहे.विकसनशील बालकावर जर सर्वात जास्त कोणाचा प्रभाव पडत असेल तर तो शिक्षकाचा.शिक्षक नव्या पिढीला मार्गदर्शन करणारा मार्गदर्शक आहे.सामाजिक परिवर्तन करणारा किमयागार आहे.तो एक राष्ट्र निर्माता आहे.आज सर्वत्र अस्थिरतेचे अशांततेचे वातावरण दिसत आहे.भ्रष्टाचार, काळाबाजार, चंगळवाद, व्यक्तिवाद, वशिलेबाजी, तस्करी, परकीय शक्तींचा हस्तक्षेप, दहशतवाद, अज्ञान, अंधश्रध्दा, नव्याने उफाळणारा जातीयवाद, धर्म श्रेष्ठत्वावरून होणारे वाद तसेच देशात गरीब आणि श्रीमंतातील आर्थिक विषमतेची दरी प्रचंड प्रमाणात वाढत चाललेली आहे या व अशा अनेक समस्यांमुळे देशाच्या एकातमतेला तडे जात आहेत.देशातील विविधतेतील एकता विस्कळीत होत चाललेली आहे.राष्ट्रबांधणी वा राष्ट्रनिर्माणात अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत.देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, देशासाठी त्याग वगैरे गोष्टी काळानुरूप संपुष्टात आल्या की काय अशी शंका उपस्थिती होत आहे.अशा एक ना अनेक कारणांनी आजचा समाज त्रस्त झालेला आहे.अशावेळेस आशेचा एक किरण दिसतो म्हणजे शिक्षक होय.कारण या शिक्षकात समाजपरिवर्तनाचे सामर्थ्य आहे.आपल्या अपेक्षेनुसार समाजाला घडविण्याची ताकद आहे.नव्या पिढीला सन्मार्गावर नेण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे.समाजाची विस्कटलेली घडी सुव्यवस्थित करण्याची धमक आहे.राष्ट्रनिर्माणात शिक्षकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.देशातील तरूणांच्यात राष्ट्रप्रेमाचे स्फुलिंग शिक्षकांनीच चेतवलेले आहे.समाजात मानवी मूल्यांचे बीजारोपण करण्याचे कार्य शिक्षकांनीच केले आहे.हा शिक्षकच त्या देशाला प्रगतीपथावर नेऊ शकतो. यामुळे असे म्हणता येईल की शिक्षकानीच राष्ट्रनिर्मितीला खऱ्याअर्थाने मोलाचे योगदान दिले आहे.

**संदर्भ :**

१.उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक डॉ.हिरा अहेर

२.उच्च शिक्षण : ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे डॉ.द.ना.धनागरे लोकवाङमय गृह मुबई नोव्हेंबर २०१०.

३.शिक्षण संपादक प्रा.विलास रभसुभे लोकवाङमय गृह मुंबई जून २०१५.

४.नवे शिक्षण नवे शिक्षक डॉ.सुनिककुमार लवटे अक्षर दालन कोल्हापूर ऑक्टोबर २०१६.

५.उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण डॉ.व्ही.के.सिंग अनुवादक डॉ.अरविंद दुनाखे डायमंड पब्लिकेशन पुणे २००७.

६. शिक्षकांसाठी साने गुरूजी हेरंब कुलकर्णी मनोविकास प्रकाशन पुणे १९ जुलै २०१७.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**प्रा. डॉ. मधुकर ग. धुतुरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

**प्रस्तावना :**

भारतीया समोरील वर्तमानात जे जे मूलभूत प्रश्न आहेत ते सर्व प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पूर्वीच मांडले हे प्रश्न सर्व समाजाचे समाजाच्या उत्थापनाचे आहेत. प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द आपल्या कार्यातून लेखनातून विद्रोह केला. सर्व जाती–जमाती धर्म यातील शोषित पीडितांचे शोषणमुक्त जीवन उभारण्यासाठी त्यांचा हा लढा होता. कोणत्या एका जातीचे एका जमातीचे एका धर्माचे नेतृत्व त्यांना कधीच करायचे नव्हते ते ज्या शोषित, पीडित जाती–जमातीत जन्मले. त्या जाती–जमातीच्या माणसांच्या आत्मसन्मानासाठी ते लढले त्यांनी अनुभवलेल्या पीडा भविष्यात नको म्हणून त्यांनी प्रस्थापित व्यवस्थे विरुध्द युध्द पुकारले. या युध्दात जे जे सोबत होते त्यांना सोबत घेतले जे सोबत नव्हते पण पीडित, शोषित होते त्यांच्या प्रश्नासाठीही हे युध्द होते हे आज समजून घेण्याची गरज आहे ही गरज का व कशासाठी १७ नोव्हेंबर, १९५१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथील जाहीर सभेत केलेल्या भाषणाात यांची उत्तरे सापडतात. ''ह्या देशात जनतेची सर्वांगीण हित करणारा असा कोणताही पक्ष पुढे आला. त्याने कोणतेही नाव धार केले तरी त्याला ज्योतिबाचे धोरण त्यांचे तत्वज्ञान आणि त्यांचे कार्यक्रम घेऊन पुढे जावे लागेल तोच एक खराखुरा लोकशाहीचा मार्ग आहे. समाजातील ८०% लोकास विद्याप्राप्ती करुन देणे आणि त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरीत जखडून ठेवणे हे दिवस असता स्वराज्य – स्वराज्य म्हणून ओरडण्यात काय फायदा. स्वराज्याचा फायदा सर्वांना मिळाला पाहिजे. मागासलेल्या वर्गाचा सर्वांगीण उन्नतीचा कार्यक्रम घेऊन पुढे आल्याशिवाय कोणताही पक्ष आज जनतेचे नेतृत्व देऊ शकत नव्हता हे सुर्यप्रकाशा एवढे स्पष्ट आहे. या देशाची विषय पत्रिका होऊ शकते तेच समजून घेण्याची गरज आहे. सर्व समाजासाठी काम करावे नाहीतर हे ते जातीवादी आहेत असे मला म्हणता येईल हे विसत्रत वर्तन आज दिसत आहे. परिणामी या देशातील तमाम शोषित पिडित लोकांसाठी काम करणारे सारे महापुरुष आम्ही जातीमध्ये अडकून टाकतो आहोत.''

'का बांधून घेतो आहे प्रत्येकजन स्वत:ला
जातीच्या दावणीला ?
सुरक्षिततेच्या सांस्कृतिक अफवेवर विश्वास ठेवून.....
जयभवानी – जयशिवाजी
अल्लाहो अकबर
जयभीम बोलो'

या आरोळ्यानी विभागून टाकलंय माझ्या सुंदर मानसाना जातीतली माणसं
मायभूमीपेक्षा मोठी आणि प्यारी वाटतील तोपर्यंत खुशाल समजा माणुसकीची लढाई आम्ही हरलो आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जातीच्या, धर्माच्या, राज्याच्या सीमा नव्हत्या तर ते या देशाच्या सर्व प्रश्नांशी, सर्व चळवळीशी, सर्व आंदोलनाशी, सर्व समाजाशी एकरुप झालेले महान नेते होते. आपल्या देशाचा एकूण इतिहास आणि डॉ. आंबेडकरांचा जीवनपट त्यांच्या समकालीन झालेलया चळवळी आणि त्यांनी केलेल्या चळवळी यांचा एक अनुबंध आपल्या लक्षात येतो. या देशातील अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक समस्यांचा गुंता सोडविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान फारच महत्वाचे आहे. आजही त्यांचे कार्य, तत्वज्ञान आणि कार्यक्रम सुंदर समाजनिर्मितीसाठी आवश्यक आहेत.
प्रस्तुत शोध निबंध संशोधन पध्दती पैकी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे :**

**१)भारतीय स्त्री विषयी विचार :–** स्त्री स्वातंत्र्याचा आणि समानतेचा पुरस्कारही त्यातून स्पष्ट होतो. स्त्रियांना सर्व हक्क मिळावेत आणि त्यासाठी स्त्रियांना आत्मभान यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सतत सर्घंषात्मक भुमिका घेतात. स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल. त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मोजत असतो असे सांगून डॉ. बाबासाहेब म्हणतात स्वच्छ राहण्यास शिका, सर्व दुर्गुणापासून मुक्त रहा, तुमच्या मुलांना शिक्षण द्या, हळूहळू त्यांच्या मनात महत्वकांक्षा जागृत करा. ते थोर पुरुष होणार

आहेत, असे त्याच्या मनात बिंबवा, त्यांच्यातील हीनगंड नाहीसा करा, लग्न करण्याची घाई करु नका, लग्न म्हणजे जबाबदार, लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्या इतपत आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्याच्यावर लग्न लादू नका जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की अती जास्तमुळे हे दृष्टहुल्या आहे. आपल्या लहानपणी आपणाला मिळू शकलो. त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या प्रत्येक मुलांला देणे हे आईवडीलांचे कर्तव्य आहे. प्रत्येक मुलीने पतीची मैत्रिण म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे तिने नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा.

कोणत्याही देशाच्या विकासाचे समतोल विकासाचे मापदंड स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असतात म्हणूनच या देशातील कुमारी, विवाहीता, परित्यक्ता, विधवा, घटस्फोटीत स्त्रियांच्या संरक्षणाचा हक्क आणि विकासाचा हेतू ठेवून हिंदू कोड बिलाचा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धरला होता. या बिलाचे महत्व फार मोठे आहे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मान्य केले, मात्र बिलाला पाठिंबा देत त्यांचे कायद्यात रुपांतर होऊ शकले नाही हे वास्तव आहे.

**हिंदू कोड बिलातील तरतुदी खालीलप्रमाणे :**

१) वैवाहिक हक्काची भरपाई म्हणून पतीच्या संपतीमध्ये पत्नीचा हक्क मिळालेल्या स्त्रीधनावर पत्नीचा हक्क, विधवा झाल्यावर संपतीचा वारसा हक्क.
२) स्त्रीला पतीपासून घटस्फोट मागण्याचा हक्क, नवऱ्याने घटस्फो दिल्यास पोटगीची तरतूद.
३) स्त्रीला दत्तक निवडण्याचा, घेण्याचा हक्क पारंपारिक दत्तक विधान पध्दती रद्द आणि कायदेशीर तरतुदीनुसार दत्तक घेण्याची पध्दत निश्चित आपला मुलगा दत्तक देण्याचा मातेस अधिकार देण्याची तरतूद.
४) अल्पवयीन मुलाचे पालकत्व वडील ह्यात नसल्यास आईकडे जाण्याची तरतूद निसर्गदत्त पालकाने धर्मल्याग केल्यास अगर संसार त्याग केल्यास त्यांचे पालकत्व निसर्गदत्त पालकाकडेच राहील ही तरतूद.
५) दत्तकास संपतीचा अर्धाहिस्सा आणि आईस संपत्तीचा अर्धा हिस्सा मिळेल संपतीचा अर्धा हिस्सा तिच्याच ताब्यात राहून ती उपभोग होईल. दत्तक आपल्या मातेस संपतीच्या हक्कापासून वंचित करणार नाही.
६) एकपत्नी त्याची तरतूद स्त्री जीवनाला स्थैर्य.
७) वडिलांच्या मिळकतीत मुलीला हिस्सा.
८) स्त्रीला स्वत:चा वारस ठरविण्याचा अधिकार.
९) ज्यांना पारंपारिक पध्दतीचे विवाह करावयाचा आहे त्यांना मोकळीक मात्र वर्ण, जात, पोटजात या बाहेरील पध्दती विवाह केला तर तो कायदेशीर विवाह म्हणून मान्यता देणारी तरतूद.

**लहान राज्य व डॉ. आंबेडकर :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२८ ते १९५६ या कालावधीत भारताच्या राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेसाठी विविध क्रांतीकारी बदल सुचविले होते. ब्रिटीश कालावधीत बाबासाहेबांनी १९२८ मध्ये सायमन कमिशन पुढे साक्ष देताना भाषावार प्रांताची भुमिका फेटाळून लावली होती त्याचबरोबर त्यांनी भिती व्यक्त केली ती म्हणजे भाषावार प्रांतामुळे स्थानिक राष्ट्रवाद प्रांतीय किंवा विभागीयवाद व स्थानिक लोकामध्ये स्वत:चे जे अस्थितत्व आहे ते जोपासण्यासाठी चढाओढ लागेल व त्यामुळे भारताच्या स्थैर्याला आणि विकासाला खिळ बसेल. बाबासाहेबांनी भाषावार प्रांत रचनेला दोन कारणासी विरोध केला.

१) विभागीय जागरुकता निर्माण होऊन राष्ट्राच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.

२) एकाच जातीच्या लोकांकडे राज्याची सत्ता किंवा सरकारे हस्तांतरीत होऊ शकतात.असे बाबासाहेबांनी राष्ट्रहिताच्या दृष्टिकोणाचा विचार करुन विचार मांडले होते. तेच आपल्याला पुरक आहेत कारण आजही भारताच्या अंतर्गत सुरक्षेचा जेव्हा आपण विचार करतो तेंव्हा प्रांतिय व भाषावादामुळे किंवा राज्या-राज्यामधील सिमाप्रश्न, पाणीवाटप व केंद्र सरकाराद्वारा दिली जाणारी आर्थिक मदत यावर विविध विरोधा भाषा भुमिका आपल्याला आढळते. आजही कांही राज्यांची सरकारे एका विशिष्ट जातीच्या गटाच्या लोकाकडेच आहे.

बाबासाहेबांनी भाषावार प्रांतीय रचनेबाबत अशी मागणी केली की भारता सामाजिक आणि राजकीय समानता निर्माण करण्यासाठी Checks & Balances ची गरज आहे. त्यांना अशी भिती वाटत होती की, नविन भाषावार प्रांतीय रचनेत प्रगत जातीचे प्राबल्य जास्त असणार आहे. व त्याच्याकडेच राज्याच्या सत्तेचे केंद्रीकरण होणार आहे त्यांनी मोठ्या राज्याची कल्पना मोडीत काढली व लहान राज्य निर्माण करण्यासाठी सूचना दिल्या त्यामुळे अल्पसंख्याक दलित आदिवासी व उच्च वर्गीय यांचे समान विभाजन होऊन राज्ये निर्माण झाले पाहिजे, ही त्यामागील त्यांची भुमिका होती बाबासाहेबांच्या प्रत्येक दिवसात भारताच्या राष्ट्राची सुरक्षितता आणि

अखंडता ही कशी टिकवता येईल यासाठी त्यांचा प्रयत्न होता आजही दक्षिण भारत हा शैक्षणिक व सांस्कृतिक बाबतीत उत्तर भारतापेक्षा सरस आहे. त्यांचे महत्वाचे कारण शिक्षण, प्रशासकीय व राजकीयदृष्ट्या येथील राज्यांनी केलेले कार्य हे विसरता येणार नाही आजही मराठी भाषेच्या आणि प्रातांच्या अस्मितेचे राजकारण काही मंडळी करीत आहेत. परंतु जोपर्यंत सर्व भारतीय एक आहेत असा सर्व समावेशक दृष्टिकोन ठेवत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारत एक संघ होणार नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार भारताच्या धोरण निश्चितीत उपयुक्त :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे त्यांनी आपल्या देशातील तत्कालीन आर्थिक प्रश्न संशोधनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविले, त्यांची चर्चा केली या शिवाय शिक्षणपूर्ण झाल्यानंतर त्यांनी वेळोवेळी केलेल्या लिखाणातून आणि शोध निबंधातून महत्वाचे आर्थिक विचार मांडले आहेत त्यामुळेच डॉ. आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ तर होतेच त्याच बरोबर ते अंतरराष्ट्रीय किर्तीचे आर्थिक धोरणकर्तेही होते याची जाणीव असणे आजच्या परिस्थितीला गरज वाटते.

डॉ. आंबेडकरांनी अनेक आर्थिक विचार स्वातंत्रपूर्व काळात आणि स्वातंत्रोतर काळातही मांडले आहेत. भारताची सध्या आर्थिक स्थिती आणि समस्या विचारात घेता आजही डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार देशाच्या आर्थिक धोरण निश्चितीत उपयुक्त आहेत. त्यामुळेच डॉ. आंबेडकर हे आर्थिक धोरणकर्ते अर्थशास्त्रज्ञ आहेत असे म्हणणे वावगे ठरु नये. डॉ. आंबेडकरांनी दारिद्र व आर्थिक विषमता या प्रश्नांच्या सोडवणुकीस अधिक महत्व अग्रक्रम द्यावा असे सांगितले होते. आज आपण दारिद्रयाची अत्यंत संकुचित आणि अन्य व्यवहारिक संकल्पना स्विकारली आहे. तर विषमतेचा प्रश्न १९९१ नंतर गंभीर होत असतांना त्यांचे नियंत्रण करण्यासाठीचे उपाय आपण राबवत नाहीत. आपल्या देशातील भाववाढीचा प्रश्न नियंत्रीत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चलन विषयक विचार प्रामुख्याने स्थिर आणि मर्यादित अपरिर्वतनीय चलन पध्दत उपयुक्त आहे. आपण करण्याचे व्यवस्थेचा वापर विषमता नियंत्रणासाठी करु शकतो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार :**

डॉ. आंबेडकरांचे कृषिविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्याच्या समस्यावरील उपाय “Small Holdings in India and Their Remedies and stats and minorities” यामधून व्यक्त केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुख्य भुमिका अशी होती की, स्वांतत्र भारतात ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करेल त्यांचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे. औद्योगिकरण व शेती यांचे अतूट नाते असले पाहिजेत. शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या शेतमंजूराच्या लाभासाठी निर्माण करणारे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणाऱ्या लाभाची न्याय तत्वावर समान वाटणी आणि आजवर जे वंचित म्हणून जगत आहेत. अग्रहक्क देण्याची गरज त्यानी वारंवार प्रतिपादन केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटीश सरकारला परखडपणे बजावले की, भारतावरील कर्जाचा बोजा काही अंशतरी शिरावर घ्यावा आपल्या विश्लेषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात १९५८ कायद्यानुसार लाभ होईल. तो इंग्लडच्या खिशात आणि कर्जाचा डोंगर भारताच्या डोक्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे विश्लेषण त्यांच्या प्रचंड राष्ट्रीय बाण्याचे प्रतिक आहे.

**अ) दामोदर नदी प्रकल्प :–**

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदीपूर चौकशी कमीटी समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत सरकारचे मंजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्याला हितावह ठरते. दामोदर नदिच्या पुरामुळे हाजारो लोकांचे प्राणजात आणि लाखोरुपयांचे नुकसान होते असे दामोदर नदीला पुर येऊ नये त्या पाण्याचा उपयोग शेती, विद्युत आणि वाहतूकीसाठी करता यावा म्हणून दामोदर नदी प्रकल्पला मान्यता मिळवण्याची शिफारस केली.

**ब) नद्याजोड चे प्रवर्तक :–**

पाण्यामुळे आज महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती आहे. पाण्याच्या बाबतीत उॉ. बाबाासहेब आंबेडकर गंभीर होते याचे विस्तृत वर्णन एल.टी. लवात्रे यांनी केले आहे. ‘बिहारमध्ये १९४३ रोजी भिषण पुर आला सत्तर गावे नष्ट झाली ११ हजार घरे वाहून गेली. पुराने बंगाल आणि भारताचा संपर्क तुटला पुढे बंगालमध्ये दुष्काळाने २५ हजार लोक मरण पावले. तेव्हा या नदीवर धरणे बांधण्याची कल्पना डॉ. आंबेडकरांनी ती ब्रिटीशांच्या गळी उतरवली तिचे काम सुरु आहे. बिहार, ओरिया आणि बंगालला जीवदान दिले. व्हॉईसरॉयच्या मंत्री मंडळात असतांना त्यांनी नद्याजोड प्रकल्पांची कल्पना मांडली. जलवाहतूक, विजनिर्मिती, पॉवर ग्रीड या कल्पनाही त्यांनीच मांडल्या.’

**क) खोत पध्दत कायदाकरुन नष्ट केली.:-**

१७ सप्टेंबर, १९३७ रोजी बाबासाहेबांनी खोत पध्दती नष्ट करण्या संबंधीचे विधेयक मांडले. खोत हा गावचा मालक आहे त्यास ते गांव गहान टाकता येते. विकता येते. खोत कुलाची धारेकडील कुळे बनविता येतात. सरकारला खोताने कबुली दिली म्हणजे सरकारला ती नाकारता येत नाही. भात जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धाभाग आणि वरकस जमिनीतील पिकाचा एक तृतियांश भाग खोताने कुळाकडून वसुल करावा अशी पध्दत होती. ओसाड तसेच जंगलानी वेढलेल्या पडित बुडित जमिनी अपार श्रमकरुन आणि भांडवल खर्च करुन लागवडीस आणल्या आणि अशा प्रकारे कुळाला त्रास देऊन गावच्या गावे बसविली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खोत पध्दती नष्ट करण्या संबंधीचे विधेयक आणून जमिनदाराकडून होणारी शेतकरी कुळाची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला आणि खोत ही प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळाचे संरक्षण व्हावे अशा स्वरुपाचे कायदे केलेत. राष्ट्रीय स्तरावर सर्वांच्या फायद्याचे काम करुन डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. शेतकऱ्या विषयी डॉ. बाबासाहेबांना केवढी कनवा होती हे ह्या वरुन दिसून येते.

**डॉ. आंबेडकर आणि महाराष्ट्र :-**

संयुक्त महाराष्ट्रराज्य समितीसाठी महाराष्ट्रातील माणसांनी अत्यंत संघटितपणे चिवट असा लढा दिला आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सर्वापेक्षा आगदी भिन्न आणि वेगळी अशी भुमिका बजावली. कॉंग्रेसच्या मूळ धोरणानुसार स्वातंत्र्यपूर्व काळात भाषावार प्रात निर्मितीचे वचन देण्यात आले होते. न्या. दार यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ साली भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात एक आयोग नेमण्यात आला या आयोगामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘महाराष्ट्र ॲज ए लिंग्विस्टक प्रॉव्हिन्स’ या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि तुलनात्मक आकडेवारीसह निवेदन सादर के. यामध्ये मुंबई महाराष्ट्राची आहे या संबंधी अत्यंत जोरदार समर्थन केले. ‘भाषावार प्रांत रचनेची मागणी मान्य केल्यास मुंबई शहर महाराष्ट्राचा अविभाज्यभाग असल्यामुळे ते महाराष्ट्रापासून अलग करु नये’ असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट नमूद केले.

मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे ते निषेपार्ह आहे. मुंबई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असून भौगोलिक ऐतिहासिक व संस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्रापासून मुंबई विलग करण्याचे कोणतेही षडयंत्र खपवून घेतले जाणार नाही आणि अशी बाब न्यायाला धरुन होणार नाही. मुंबईस संयुक्त महाराष्ट्राची मागणी आंदोलन पूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील विषयात लेखी स्वरुपात मांडले आहेत.

**लोकसंख्या विषय विचार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-** लोकसंख्या वाढत जाईल ती समस्या बनेल हे बाबासाहेबांनी खूप आधी जाणून दिले होते ते म्हणतात. ‘लोकसंख्या सुख दु:खाचा ज्या आर्थिक परिस्थितीशी संबंध असतो. त्यात सुधारणा घडवून आणण्या सोबतच जन्माचे प्रमाण कमी करण्याच्या उपायाचा अवलंब करुन वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्याची आपण काळजी घेतली नाही तर लोकांच्या जीवन मानात भरीव आणि कायमस्वरुपी वाढ शकणार नाही. त्यामुळे लोकसंख्या वाजवीपेक्षा अधिक वाढणार नाही. ती नियंत्रणात राहील यासाठी प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. त्याशिवाय दारिद्र्याचे निर्मुलन करता येणार नाही. आणि ते जर झाले नाहीतर वाढत्या लोकसंख्येचा देशातील विविध वस्तुच्या उत्पादनाशी मेळ घालणे केवळ अशक्य होईल. लोकसंख्या वाढीमुळे वनांची तसेच कुरणांची जमीन दिवसेनदिवस कमी होत आहे. इतर देशाच्या तुलनेत आपल्या देशातील जमिनीचे प्रमाण अगोदित नगण्य आहे. त्यामुळे आपल्या देशात गुराढोरांची अवस्था दयनिय आहे. आज लोकांच्या निवासाची समस्या निर्माण झाली आहे. जोवर वाढत्या लोकसंख्येला आळा घालता येत नाही तोवर शासनाचे विकासाचे प्रश्न तसेच असतील.’

**भारताचे संरक्षण व परराष्ट्रीय धोरणाबाबत :-** गेल्या सात दशकापासून खऱ्या अर्थाने सर्वकक्ष चर्चा केली नाही. किंबहुना चर्चा होऊ दिली नाही. त्यामुळे आजही दहशतवाद, नक्षलवाद अंतर्गत सुरक्षचे प्रश्न निर्माण झाले होते.

जुलै १९४१ मध्ये ब्रिटीश सरकारने कार्यकारी मंडळाची पुनर्रचना व सदस्याची वाढ करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्यकारी मंडळात संरक्षण सल्लागार समितीत निवड केली.त्यामुळे बाबासाहेबांनी दुसऱ्या महायुध्दाच्यावेळी या समितीची जबाबदारी स्विकारुन भारताच्या संरक्षण सिध्द बाबत व लष्करी शिक्षणासोबतच व इतर महत्वाच्या बाबीमध्ये विचार राष्ट्रीय सुरक्षेच्या मंडळात आपले विचार मांडले.

३ सप्टेंबर १९३९ मध्ये नाझी जर्मनीने पोलंडवर कब्जा केल्यानंतर दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली त्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताने आपल्या सुरक्षिततेसाठी व जागतिक सुरक्षतेतेबाबत नाझी जर्मनिचा विरोध करावा व त्यासाठी भारत

सरकारने प्रयत्न करावेत अशी भुमिका घेतली. त्याच बरोबर ब्रिटीश सरकारने गोलमेज परिषदेमध्ये जी आश्वासने दिली होती त्याची पुर्तता करावी त्यात प्रामुख्याने भारताच्या सुरक्षततेची हमी द्यावी. शिवाय गोलमेज परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेबांनी भारतीय युवकांना ठराविक वयानंतर लष्करी शिक्षण समितीचे करावे व त्याद्वारे त्याच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होईल. शिवाय चांगले सुदृढ प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावे यासाठी लष्करात भरती करताना सर्वांना ती खुली करण्यात यावी सर्व जाती धर्माच्या लोकांना लष्करात सामावहून घ्यावे अशी भुमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सदस्य असतांना घेतली त्याच बरोबर दुसऱ्या महायुध्दाचे वर्णन करताना युध्द हे केवळ कोणत्या प्रदेशाचेच विभाजन करत नाही तर मानवा मानवात एक मूलभूत बदल घडवून आणते, त्यात राष्ट्राराष्ट्रात बदल होतो. त्यामुळे आपल्या संस्कृती व मूल्यात बदल होतो. म्हणून युध्द थांबविणे व नाझीवादावर विजय मिळविणे हे सर्वांच्या हिताचे आहे. नाझीवादाद्वारे झालेल्या युध्दामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता, समानता निर्माण होणार नाही. त्यामुळे अशा सर्व प्रवृत्तीवर विजय मिळविणे गरजेचे आहे. म्हणून त्यांनी नाझीवादाच्या विरोधात भूमिका घेऊन युध्दाचे समर्थन करून नवीन समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय प्रस्थापित व्हावीत नाझीवादामुळे निर्माण झालेले वांशिक प्रश्नच, दोन भिन्न संस्कृतीचे प्रश्नच हे केवळ युध्द केल्यावर संपणार नाहीत तर त्यासाठी युध्द जिंकून शांतता निर्माण करणे गरजेचे आहे व शांतता टिकविण्यासाठी सर्वांची गरज आहे.

**सारांश :**

राष्ट्र उभारणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य अनन्यसाधारण आहे हे मान्य करावेच लागते.डॉ. बाबासाहेबांनीच आयुष्यभर स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार केला. कुटुंबातील मुलांचा विकास, स्त्री शिक्षण, नितीमत्ता, स्त्रियांचे आरोग्य, कुटुंब नियोजनातील स्त्रियांची जबाबदारी, संपत्तीमध्ये स्त्रियांचा वारसा हक्क, स्त्री समानतेचा पुरस्कार, संघटीत स्त्री शक्तीचा देशातील गरिबीला हद्दपार करू शकेल आणि त्यातूनच देशाच्या आर्थिक उन्नतीचा, सामाजिक उन्नतीचा मार्ग निघू शकेल असा विश्वास त्यांनी सतत व्यक्त केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील सामान्य जनतेसाठी प्रामाणिक राहून काम केले.त्यांच्या नावाचा वापर राजकारणासाठी केला.'कोलंबिय विद्यापीठाने ५ जून, १९५२ रोजी एल.एल.डी. ही पदवी बहाल करताना' भारताचे एक प्रमुख नागरिक समाजसुधारक, मानवी हक्कासाठी झगडणारे वीर या शब्दात गौरव केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, सिंचन, ऊर्जा, शेती, नदीजोड प्रकल्प, याचा गंभीरपणे विचार केला. त्या विचारांना प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मुंबईसह महाराष्ट्रातील सर्वासंबंधी असणारीही भावना फारच महत्वाची आहे. संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे, मुंबई महाराष्ट्रात असली पाहिजे. अशाप्रकारे यांची भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि नियोजन देशातील गरीब माणसाच्या बाजूने आहे. जाती-व्यवस्थेने केलेल्या शोषणातून ही गरिबी निर्माण झाली आहे. आर्थिक भेद करणारी संस्कृती नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटते.

लोकांच्या दारिद्र्याला कारण ठरणारी अति लोकसंख्या संतती नियमनातून रोखली पाहिजे, त्यासाठी शासनाने दारिद्र्य निवारण आणि संतती नियमन ह्या दोन्हीचे धोरण एकाचवेळी राबविले पाहिजे ही आग्रहाची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती.त्याचप्रमाणे लहान राज्याच्या संदर्भात व भारताचे संरक्षण विषयक विचार सुध्दा तेवढेच महत्वाचे आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र आणि कार्य - श्री. चांगदेव खैरमोडे.
२. रायटिंग्ज ॲन्ड स्पिचेस ऑफ आंबेडकर - महाराष्ट्र शासन.
३. राज्य आणि अल्पसंख्यांक - डॉ. बी. आर. आंबेडकर.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार - डॉ. भालचंद्र मुगेकर.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गौरवग्रंथ - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# ग्रंथालय विध्वंस (Library Vandalism) : ग्रंथालय विकासातील अदृष्य शत्रू.

**अमर रंगनाथ दीक्षित**
ग्रंथपाल,
यु.ई.एस.महिला महाविद्यालय,
१४३अ, सिध्देश्वर पेठ,सोलापूर.

**सारांश** :-डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या पाचव्या मुलभूत कायद्यानुसार ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. ग्रंथालयाच्या स्थापनेनंतर ही संस्था निरंतर वाढत राहते. आधुनिक काळात संगणकीकरणामुळे हयात वृद्धीच झाली आहे. ग्रंथालयाचा निर्दोष विकास होण्यासाठी ग्रंथालयांना होणाऱ्या हानीकारक उपद्रवी घटकांवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. प्रस्तुत शोध निबंधात ग्रंथालय विध्वंसासाठी कारणीभूत घटकाची सविस्तर माहिती देऊन त्यावर करावयाच्या उपाययोजनांची चर्चा केली आहे.

**शोध संज्ञा** :- ग्रंथालय विध्वंस, ग्रंथालय विध्वंसाचे प्रकार, वाचनसाहित्य विध्वंस, पायाभूत सुविधा विध्वंस, ग्रंथालय कर्मचयाऱ्यांशी गैरवर्तन , व्यवस्थापनातील मतभेद इ.

ग्रंथालय यांना शैक्षणिक संस्थांचा आत्मा मानले जाते. डॉ. राधाकृष्णन् यांनी तर ग्रंथालय प्रस्तावना हे शिक्षण संस्थेतील सर्वात महत्वाचे अंग मानून त्यास हृदयाची उपमा दिली आहे. शिक्षण संस्थाच्या रचनेमध्ये ग्रंथालयांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन यांना उच्चशिक्षणात अत्यंत महत्वाचे स्थान असून संशोधकांच्या उधीष्ठपूर्तीसाठी ग्रंथालये अविरत प्रयत्नशील असतात. आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या दैनंदिन कार्यात करुन वाचकांच्या माहितीविषयक विविध गरजांच्या पूर्तीसाठी सेवा सुविधांची योजना ग्रंथालयांनी केलेली आहे. या विविध सेवा व सुविधांसाठी पूरक वाचन साहित्य संग्रहविकास, मनुष्यबळ विकास, पायाभूत सुविधाचा विकास केला जातो, या विकासाची प्रक्रिया अखंड व सातत्यपूर्ण असल्याने ग्रंथालये आपल्या अंदाजपत्रकात या सुविधांचा समावेश करतात. निधीची तरतूद करुन पथदर्शक प्रकल्पही राबवले जातात. बऱ्याच संस्थामध्ये या सर्व योजना राबवण्यासाठी भविष्यकालीन धोरण ठरवण्यात येऊन ठरवलेल्या कालखंडात त्याची निर्मिती केली जाते.

ग्रंथालय सेवा व सुविधांच्या सातत्याकडे व त्यांच्या मूल्यमापनाकडे मात्र ग्रंथालये किंवा शैक्षणिक संस्था व्यवस्थापनांनी पाहिजे तेवढया प्रमाणात लक्ष दिल्याचे आढळत नाही. राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) किंवा नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडिटेशन (एनबीए) किंवा इंटरनॅशनल ऑर्गनायजेशन फॉर स्टँडर्डडायजेशन (आयएसओ)द्वारे उच्च शिक्षणातील संस्थाचे मूल्यांकन करुन घेण्याचे बंधन घातल्यामुळे किंवा या संस्थानी केलेले मूल्यांकन व त्याद्वारे मिळालेला दर्जा ही गौरवाची बाब असल्याने महाविद्यालये व विद्यापीठांनी आपल्या ग्रंथालयात विविधांगी सुधारणा केल्या, त्यात वाचनसाहित्य संग्रह विकास, संगणक प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक वाचनवाहित्याची खरेदी व व्यवस्थापन, ग्रंथालयाचे अंशतः किंवा पूर्णतः संगणकीकरण ग्रंथसंग्रहाच्या संरक्षासाठी, स्मार्टकार्ड योजना, आरएफआयडी तंत्रज्ञान यांचा समावेश होतो.

या सोयी सुविधाच्या भविष्यकाळातील सातत्यपूर्ण कार्यामध्ये अनेक धोके किंवा अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते जसे तंत्रज्ञानाची अधयावतता, कर्मचाऱ्यांची बदली किंवा निवृत्ती, नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा दृष्टीकोन, आर्थिक तरतूद इ. या सर्व धोक्यांमध्ये वाचनसाहित्य विध्वंस (Books, Manuscripts and Related malerial Vandalism) हा ग्रंथालयासमोरील गंभीर धोका असून या व इतर सर्व भविष्यकालीन धोक्यांबाबत ग्रंथालयानी आपली व्यवस्थापकीय धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**विध्वंस** :- (Vandalism) ऑक्सफर्ड डिक्शनरीनुसार Vandalism म्हणजे "Action involving deliberate destruction of or damage to public or private property ". सार्वजनिक मालमत्तेची सहेतुकपणे केलेली मोडतोड म्हणजे विध्वंस होय हा विध्वंस परिवहन व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, प्रशासन व्यवस्था या सारख्या सार्वजनिक सेवा संदर्भात सातत्याने अनुभवास येतो. समाजाचा शासन, प्रशासन सार्वज़निक घटना याच्या विरोधात निषेध प्रकट करण्याचा प्रयत्न याद्वारे होत असतो.

ब्रिटीश समाजशास्त्रज्ञ प्रा.स्टॅनली कोहन, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स यांनी अशा विध्वंसाची पुढील पाच प्रकारामध्ये विभागणी केलेली आहे.

१) **मूल्यवान वस्तुंच्या प्राप्तीसाठी** :- (Acquisitive Vandalism)सार्वजनिक मालमत्तेचा विध्वंस पैसा किंवा मूल्यवान सामानाची लूट करण्यासाठी केला जातो. ए.टी.एम. मशीन्स किंवा वेडींग मशीन्स फोडण्याची उदाहरणे नियमित घडल्याचे वाचनास मिळते.

२) **पध्दतशीरपणे ठरवून केलेला विध्वंस** :- (Tactical Vandalism) एखाद्या घटनेची किंवा निणर्ययाची प्रतिक्रीया म्हणून, प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी म्हणून विध्वंस केला जातो. इमारतीची, दारे, खिडक्यांची मोडतोड करणे इ. चा यात समावेश होतो.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

३) **वैचारिक धोरण भूमिकेतून विध्वंस :-** (ideological Vandalism) हा Tactical Vandalism चा पुढील भाग असतो. प्रशासनाच्या विरोधात भिंतीवर घोषणा रंगवणे, पोस्टर/बॅनर लावणे, पोलीसांचा हस्तक्षेप होऊन प्रसिध्दी मिळवण्यासाठी केलेल्या चळवळी, रास्ता रोको, निर्दशने, चक्काजाम इ. चा यात समावेश होतो.

४) **प्रत्युत्तर म्हणून केलेला विध्वंस :-** मालमत्तेच्या मालकाविरोधात रोष व्यक्त करण्यासाठी केलेला विध्वंस जसे वाहनांची मोडतोड, मालमतेची नासधूस याचा यात समावेश होतो.

५) **सहजपणे /खेळ म्हणून केलेला विध्वंस :-** (Play Vandalism) गटामधील एकमेकांना दिलेल्या आव्हानांची परिणीती म्हणून केलेला विध्वंस यात समाविष्ठ होतो. इमारतीच्या वरच्या मजल्यावरील खिडक्यांची तावदाने फोडणे, रस्त्यावरील खांबाचे दिवे फोडणे इ. या प्रकारच्या विध्वंसाची उदाहरणे आहेत.

६) **उद्वीगनतेतून केलेला विध्वंस** :- (Malicious Vandalism) दुजाभाव, श्रेय न मिळणे या कारणामुळे काही गटाद्वारे विध्वंस केला जातो.

**ग्रंथालय व वाचनसाहित्य विध्वंस :-** समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या संस्थामध्ये ग्रंथालयाचे स्थान अग्रभागी आहे. उच्चशिक्षणातील संस्थाची ग्रंथालये तेथील उच्चशिक्षण प्रचार, प्रसार व संशोधन कार्यात मदत करतांना उपभोक्त्याद्वारे केलेल्या विध्वंसाचा सामना करत असतात. ग्रंथालयाच्या विकासाचा आराखडा तयार करतांना भविष्यात होणाऱ्या अश्या विविध प्रकारच्या विध्वंसांना आळा घालण्यासाठी धोरण निर्माण करुन त्याबाबतची उपाय योजना करणे आवश्यक आहे. या ग्रंथालयाचे उपभोक्ते विविध वयोगटातील शैक्षणिक पातळीतील, विविध सामाजिक किंवा राजकीय पाश्वभूमी असलेले असतात त्याच बरोबर अध्यापक, संस्थेचे विविध कर्मचारी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, माजी विद्यार्थी परिसरातील विद्यार्थी व नागरिक यांचाही त्यात समावेश असतो. हेतूपूर्वक किंवा आजानपणाने यापैकी बऱ्याच उपभोक्त्यांकडून ग्रंथालयाच्या वाचनसाहित्य संग्रहाचे, पायाभूत सुविधांचे नुकसान करण्यात येते. तर काही वेळा नैसर्गिक आपत्तिमुळे ग्रंथालयाचे नुकसान होते. हे नुकसान तात्पुरते किंवा कायम स्वरुपी ठरते.

**ग्रंथालय विध्वंसाचे पुढील प्रकार आहेत.**

१) **वाचनसाहित्य विध्वंस :-** ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा उपयोग करणारे उपभोक्तेच ग्रंथालयाच्या वाचनसाहित्याचे विध्वंसक असतात. ग्रंथ किंवा नियतकालीकाचे अंक, अमुद्रीत वाचनसाहित्य यावर खुणा करणे, अधोरेखीत करणे, ग्रंथाच्या दर्जाविषयी मुख्यपृष्ठ किंवा इतरत्र लेखन करणे, ग्रंथाची पाने दमडणे, पत्ते, फोन नंबर लिहिण्यासाठी ग्रंथाचा वापर करणे, बांधणी खिळखीळ होण्यापर्यंत पुस्तके फेकणे, आपटणे, एकमेकांना मारहाण करण्यासाठी वापरणे, मुक्तद्वार ग्रंथालय पध्दतीमध्ये ग्रंथाची कपाटातील जागा बदलणे ग्रंथातील महत्वाची माहिती असलेली पाने फाडणे, ग्रंथाची चोरी करणे, ग्रंथालयाचे ग्रंथ परत न करणे, वारंवार स्मरणपत्रे देऊन सुध्दा त्याची दखल न घेणे, बदली होणे, विवाह, मृत्यू या कारणाममुळे वाचकांच्या शिक्षणात खंड पडतो पर्यायाने ग्रंथालयाचे वाचनसाहित्य त्यांच्याकडून परत न केल्याने मौल्यवान ग्रंथ संग्रहातून बाद होतात.

२) **पायाभूत सुविधांचा विध्वंस :-** ग्रंथालयामध्ये वाचकांसाठी विविध सोयी व सुविधांचा विकास करण्यात आलेला असतो. यामध्ये वाचनकक्ष, अभ्यासिका, स्वागत कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, झेरॉक्स सुविधा, महाविद्यालय व विद्यापीठ ग्रंथालयामध्ये मोफत इंटरनेट सेवा देण्यासाठी सुराज्य संगणक प्रयोगशाळांची निर्मिती, स्वागत कक्ष, अभ्यासिका येथे प्रसन्नता येण्यासाठी शोभेच्या फुलांची रोपांची योजना, ग्रंथालयातील नोटीसबोर्ड, फॅन किंवा
वातानुकुलीत यंत्रणा, मेन्स व विमेन्स रुम्स, कॉफी वेंडींग मशिन्स इ. सुविधा निर्माण केले जाते. ग्रंथालयाचा उपयोग करणाऱ्या वाचकांपासून या सेवांना धोका पोहवला जातो व या सेवासुविधाच्या सातत्यात खंड पडतो.

टेबली खुर्च्यांची मोडतोड करणे, ग्रंथालयाच्या विविध विभागांच्या इमारतीवर शेरेबाजी लिहिणे, विद्युत उपकरणांची मोडतोड किंवा अव्याहत वापर करणे, नोटीसबोर्डावरील मजकूर नष्ट करणे, संगणक व इंटरनेट सेवेचा दुरुपयोग करणे, टेबलांवर रेखाटने, आकृती, नांवे लिहिणे इ. कृती वाचक करतो.

३) **ग्रंथालय कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन :-**वाचनसाहित्य व वाचक यांना जोडणारा दुवा म्हणजे ग्रंथालय कर्मचारी होय. वाचनसाहित्याची निवड, व खरेदी करणे त्यावर वर्गीकरण तांत्रिकीकरण या तांत्रिक प्रक्रिया करुन नोंदी करणे, संगणकाच्या (OPAC) च्या माध्यमातून त्याची सूचना वाचकांपर्यंत पोहचवणे इ. कार्ये अविरतपणे तो करत असतो. वरिष्ठांचे आदेश, वाचकांच्या अपेक्षा व ग्रंथालयाची उद्दिष्टेपूर्ण करण्यासाठी परीश्रम करत असतो, ग्रंथालयाचे यश याच कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाचे फळ असते. या कर्मचाऱ्यांचा कामाचा उत्साह व

मानसिकता त्यांना मिळालेल्या प्रोत्साहनामुळे टिकून राहते. त्यांना विविध प्रकृतिंच्या वाचकांकडून अपशब्द वापरणे, अरेरावी, प्रसंगी मारहाण करण्याच्या घटना घडतात.

प्रशासनाच्या पातळीवरही त्यांच्याशी वरिष्ठांद्वारे असेच गैरवर्तन झाल्याचे अनुभवास येते. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना इतरत्र नेमणूक देणे, त्यांच्याकडून अशैक्षणिक कामे करुन घेणे, कार्यालयीन वेळेपेक्षा ही अधिक वेळ थांबण्याचे आदेश देणे, वार्षिक वेतनवाढ रोखणे, कालबध्द पदोन्नती देण्यास उशीर करणे, ग्रंथालय नुकसानीस जबाबदार धरुन भरपाई देण्यास भाग पाडणे, नैमत्तिक, अर्जीत रजांचे प्रस्ताव नामंजूर करणे, उजळणी, उद्बोधन वर्गात सहभागी होण्यापासून रोखणे, विविध विकासकामांसाठी वेळी अवेळी त्यांना आर्थिक सहकार्य करण्याचे आदेश देणे या व यासारख्या गैरवर्तनामुळे कर्मचाऱ्यांची निराश मानसिकता होते. पर्यायाने त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

४) **व्यवस्थापनातील मतभेद :-** महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व अकृषी महाविद्यालये ही धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत संस्थाद्वारे चालवली जातात. उच्चशिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शासनाने अनुदानित महाविद्यालयाचे प्रशासन अश्या संस्थाकडेच दिलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ध्येयनिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अश्या महाविद्यालयांनी पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता यात वाढ करुन ही महाविद्यालये नांवारुपास आणली मात्र कालांतराने व्यवस्थापकांची नवी पीढी या शैक्षणिक संस्थाकडे व्यवसायीक दृष्टीकोनातून पाहू लागल्याने संचालक मंडळामध्ये गटातटाचे वाद विकोपाला गेले आहेत. बऱ्याच महाविद्यालय यांच्या व्यवस्थापन मंडळाचे हक्काचे वाद न्यायालयीन प्रक्रियेत अडकले आहेत. या वादाचा परिणाम महाविद्यालयांच्या दैनंदिन प्रशासनावर पडतो व शैक्षणिक विकास खुंटल्याचे आढळून येते.

ग्रंथालये याच महाविद्यालयाच्या महत्वाचा विभाग असल्याने या घडामोडीचा ग्रंथालयावर परिणाम होतो. वार्षिक अंदाजपत्रक, पायाभूत सुविधांचा विकास, मनुष्यबळ व्यवस्थापन, गुणवत्ता विकास कार्यक्रमांचे आयोजन इ. बाबतचे निर्णय महाविद्यालय विकास समितीच्या (स्थानिक व्यवस्थापन समितीच्या) मंजुरी अभावी प्रलंबित राहतात. यामुळे ग्रंथालयाच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होतात.

५) **नैसर्गिक आपत्तिद्वारे विध्वंस :-** भारतीय हवामान व भौगोलिक विविधता याला अनुसरुन ग्रंथालय इमारतींची निर्मिती करणे आवश्यक आहे. उष्णता, पर्जन्यमान, दमटपणा या श्रुतुंचा परिणाम ग्रंथालयातील वाचनसाहित्यावर होतो, तीव्र हवामान रोधक ग्रंथालय इमारती बनवणे,पूरक फर्निचरचा वापर करणे त्यावर उत्तम उपाय ठरतो. ग्रंथसंग्रहाची जागा पूर, उष्णता, धुळ, कृमीकीटक मुक्त असावयास हवी.स्वच्छ सूर्यप्रकाश, मोकळी हवा, प्रदुषणमुक्त परिसर वाचनसाहित्याचे आयुष्य वाढवण्यास मदत करतात. ग्रंथालयामध्ये विद्युत उपकरणांची नियमित तपासणी व दुरुस्ती करावी. त्यामुळे शॉर्टसर्किट होणे टाळता येते. प्लंबिंग सुविधाची देखरेख केली पाहिजे. ग्रंथालयात अग्नीरोधक यंत्रणेची उभारणी आवश्यक आहे. ग्रंथालय इमारतींना नियमितपणे पेस्टीसाईड करुन वाळवी पासून संग्रहाचे होणारे नुकसान टाळता येते. काही वेळा समाजातील मतभेदाचा, राजकारणांचा गटातटातील विरोधांचा प्रतिकुल परिणाम ग्रंथालयावर होतो. समाजकंटकानी अश्यावेळी ग्रंथालयाची नासधुस किंवा जाळपोळ केल्याच्या घटना घडल्या आहेत. यासाठी ग्रंथालयाच्या संरक्षासाठी पुरेशी काळजी घ्यावयास हवी.

आधुनिक काळात ग्रंथालय संगणकीकरण झाल्याने दैनंदिन कार्याचे संगणकामार्फत नियंत्रण होते, सेवा सुविधा, नोंद आकडेवारी अहवाल उपस्थिती नोंद, संगणकामध्ये साठवलेल्या असतात. काही ग्रंथालयामध्ये आज्ञावली (साप्टवेअर्स) क्लाउड कॉम्प्युटींग सुविधांद्वारे पुरविलेली असतात. ग्रंथालये आपल्या सेवा सुविधांसाठी संकेतस्थळांचा वापर करतात. इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्याचा पुरवठा व वापर वाढल्याने ग्रंथालयानी आपल्या संग्रहात व देवघेव सेवेमध्ये इ-बुक्स व ई-जर्नलची संख्याही वाढवलेली आहे. या अर्ध किंवा पूर्ण संगणकीकृत अवस्थेमध्ये ग्रंथालयांना डेटा करप्ट होतो संकेतस्थळ हॅक होणे, संगणक व्हायरस या संगणकीय विध्वंसाचा सामना करावा लागतो यामुळे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचे प्रसंग घडतात. यासाइी अँटीव्हायरस सॉप्टवेअर वापरणे, बनावट अज्ञावलींचा वापर टाळणे योग्य उपभोक्ता ओळखून सभासदत्व देणे, पासवर्ड, युजर आयडी इ.ची सुरक्षितता राबवणे इ. उपाय करणे शक्य आहे.

**असोसिएशन्स ऑफ कॉलेज ॲन्ड रिसर्च लायब्ररीतून (ACRL) ची मार्गदर्शक तत्वे :-** एसीआरएल या संघटनेने आपल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सुरक्षा उपाययोजना व ग्रंथचोरी विरोधात कार्यवाही या दोन प्रमुख विभागांतर्गत अनेक उपाययोजनांचा अवलंब करण्याच्या सूचना केल्या आहेत त्यात प्रामुख्याने, सुरक्षा रक्षक नियुक्ती, संरक्षण धोरण निर्माण, कर्मचारी नियुक्ती व त्यांचे प्रशिक्षण, जबाबदाऱ्यांचे वाटप, कायदेशीर उपाय योजना अहवाल, नोंद व्यवस्थापन, इ. चा प्रामुख्याने समावेश होतो.

**ग्रंथालय विध्वंस विरोधात ग्रंथालयाने करावयाची उपाययोजना :-**

१) **ग्रंथालय ओळख कार्यक्रम :-** उच्चशिक्षण क्षेत्रातील संस्थाच्या ग्रंथालयानी नव्याने प्रवेश घेतलेल्या सभासदांसाठी ग्रंथालय ओळख कार्यक्रमाचे आयोजन करावयास हवे या अंतर्गत ग्रंथालयाचे विविध विभाग व त्यांची कार्ये त्यांचे प्रमुख, तेथे उपलब्ध सोयी सुविधा व

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

त्यांच्या वेळा याची इत्यंभूत ओळख वाचकांना करुन द्यावयास हवी यासाठी फिल्म, माहितीपत्रक, व्याख्यान इ. पध्दतीचा वापर केला जाऊ शकतो.

२) **माहिती साक्षरता कार्यक्रम :-** या अंतर्गत ग्रंथालयातील मुद्रीत अमुद्रीत वाचनसाहित्य संग्रहाची ओळख करुन देवून या वाचनसाहित्याची रचना समजावून द्यावी. माहिती उपभोक्त्यांना त्यांच्या माहिती विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी याचा उपयोग कसा करता येतो यांचे प्रात्यक्षिक करुन दाखववावे संगणकाची ओळख त्याची हाताळणी इ-बुक, इ-जर्नल, माहितीसाठे (डेटाबेस) यांची रचना व वापर याबाबत कार्यशाळेचे आयोजन केले जावे. मुद्रित व अमुद्रीत वाचनसाहित्याचा संशोधन व संशोधनपूरक कार्यासाठी वापर करण्याचे प्रशिक्षण उपभोक्त्याना दिले गेले पाहिजे विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्था, प्रकाशन संस्था यांच्या संशोधन सादर करावयाच्या नियमांवलींची (Style mannual) ओळख वाचकांना करुन द्यावी पूर्वी झालेल्या संशोधनाचे योग्य संदर्भ देऊन वाड:मयचौर्य टाळण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

३) **वाचनसाहित्य संरक्षण योजना :-** मुल्यवान, दुर्मिळ वाचनसाहित्याचे जतन करण्यासाठी ग्रंथालयानी विशेष काळज घेतली पाहिजे. मुक्तद्वार पध्दतीअंतर्गत उपभोक्त्यांच्या ग्रंथालयातील वावरावर लक्ष देवून त्यांना योग्य सूचना देण्यात याव्यात. ग्रंथदेवघेव कक्षामध्येही या सूचना लिखित स्वरुपात लावण्यात याव्यात. वाचनसाहित्याची देवघेव करताना त्याची बांधणी पृष्ठे इ. ची तपासणी करण्यात यावी. अधोरेखांकन, पाने फाडणे, दुमडणे, आकृती चित्रे यांना फाडणे इ.कृती करण्यापासून वाचकांना परावृत्त करावे. वाचनसाहित्याचे आयुष्य वाढण्यासाठी त्यावर वाळवी विरोधी प्रक्रिया करावी.

४) **सुरक्षारक्षकांची नियुक्ती :-** ग्रंथालय इमारत, ग्रंथालय सेवा, वाचनसाहित्य, ग्रंथालय कर्मचारी यांना अनावश्यक उपद्रवापासून वाचवण्यासाठी योग्य संस्थेने सुरक्षारक्षकांची नियुक्ती करावी आधुनिक तंत्रज्ञानांतर्गत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, आर.एफ.आय.डी. संरक्षण प्रणाली बसवण्यात याव्यात. उपभोक्ते कर्मचारी किंवा सेवाबाबतच्या तक्रारीचा तात्काळ निपटारा करण्यासाठी तक्रारनिवारण यंत्रणेची उभारणी केल्यास समस्या निर्माण होणार नाहीत.

ग्रंथालय इमारत, वाचनसाहित्य कर्मचारी यांना विमासंरक्षण दिले जावे, इमारती व इतर पायाभूत सुविधांची नियमित तपासणी करण्यात यावी.

५) **ग्रंथालय - वाचक सेतू प्रकल्प :-** ग्रंथालय व त्यांचे वाचक यांच्यामध्ये निकोप संबंध निर्माण करण्यासाठी एखाद्या संघटनेची स्थापना करता येईल. या अंतर्गत वार्षिक कायर्रक्रमांचे आयोजन सोयी सुविधा व सेवांचा आढावा घेऊन नविन सेवा सुरु करणे किंवा कालबाहय सेवा बंद करणे याविषयीचे निर्णय घेणे.वाचक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे, वाचकांद्वारे सूचना मागवणे त्यावर उपाययोजना करणे, यासाठी तक्रार / सूचना पेटीची योजना करणे. इ. कार्ये करता येतील.

६) **ग्रंथालय कर्मचारी प्रशिक्षण :-** ग्रंथालय कर्मचारी ग्रंथालयशास्त्र विषयातील तज्ञ असतात मात्र सेवाक्षेत्रासाठी आवश्यक कौशल्यांची बऱ्याच जणांमध्ये उणिव असते. ग्रंथालय सेवा परिणामकारक होण्यासाठी ही कौशल्ये कर्मचाऱ्यांनी आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करावे.या अंतर्गत भाषा कौशल्य,संभाषण कौशल्य,संगणक हाताळणी कौशल्य, वैयक्तीक स्वच्छता व निटनिटकेपणा, सामान्यज्ञान कौशल्य, परिसर, राज्य याबाबतचे सामान्यज्ञान, छंद जोपासणे, वक्तृत्व कौशल्य संशोधन प्रक्रियेचे ज्ञान, नेतृत्वगुण इ. सारखी कौशल्ये कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण करता येणे शक्य आहे.

**निष्कर्ष :-**ग्रंथालयातील वाचनसाहित्य अमूल्य आहे, त्याची भरपाई रुपयामध्ये करता येणार नाही. हे मूल्यवान वाचनसाहित्य संग्रहीत करण्यासाठी अनेक वर्ष नियोजन करावे लागते. अर्थसंकल्पात तरतूद करावी लागते. हा वाचनसंग्रह अद्यावत ठेवण्यासाठी ग्रंथालय कर्मचारी आपले व्यावसायीक कौशल्य पणाला लावतात त्यामुळेच वाचनसाहित्य संग्रह परिपूर्ण राहतो. अशा परिपूर्ण संग्रहास अंतर्गत किंवा बाहय शत्रुपासून हानी होण्याची शक्यता असते. ग्रंथालयाच्या वाढ व विकासाचे नियोजन प्रत्येक संस्थेमध्ये केले जाते मात्र ग्रंथालयांना असणाऱ्या संभाव्य धोक्याबाबत कमी उपाय योजना केल्या जातात. अशा उपाययोजनांबाबत शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनामध्ये जाणिवजागृती होणे हे ग्रंथालयाच्या विकासामध्ये महत्वाचे धोरण ठरेल.

**संदर्भ :-**

1) httpp://en.oxforddictionaries.com/definition/vamdalism
2) www.ala.ora//acrl/standards/security on 22/01/2018
3)S.J. Gadekar : Library crime & vandalism in Engineering College download through shodhganga.inflibaet. ac. in on 24/01/2018.

# राष्ट्र उभारणीमध्ये ग्रंथालयांचे स्थान

**प्रा.डॉ.आर.पी.आडाव**
ग्रंथपाल–न्यु कॉलेज कोल्हापूर

**श्री. सरदार निवृत्ती पाटील**
संशोधक विदयार्थी – कोल्हापूर

**प्रस्तावना :–**

देशाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विकासासाठण्ी ज्ञान व माहिती अत्यंत महत्वाची समजली जाते. तसेच आधुनिक समाजात जीवनविषयक असणाऱ्या बऱ्याचश्या गरजा हया विविध संस्थामार्फत संघटीत व नियंत्रित केल्या जातात. त्यामध्ये ग्रंथालये ही समाजाच्या विविध गरजांची पुर्तता करत असतात. कारण ग्रंथालयाच्या माध्यमातुनच एक सुशिक्षीत व आपल्या कर्तव्याची भान असणारा जबाबदार नागरिक उदयास येत असतो.

देशाच्या जडणघडणीत विकासाचे प्रयत्न योजना, कार्यक्रम या सर्वांच्या मुळाशी माहिती व ज्ञान असण्याची सर्वप्रथम गरज आहे आणि ती गरज ग्रंथालयेच समाजाची मार्गदर्शक केंद्रे म्हणुन पुर्ण करु शकतात कारण ग्रंथालये वाचनसाहित्याच्या माध्यमातुन राजकिय, आर्थिक, सामाजिक इत्यादी परिस्थितीची माहिती देऊन वाचक वर्गास जागरुक बनविण्याचे कार्य ग्रंथालये करत असतात.

आज माहिती प्रदान समाज उदयास येत आहे विज्ञान व तंत्रज्ञानाने फार मोठी प्रगती केलेली आहे. नव नवे संशोधन होत आहे. संशोधनासप्रोत्साहान आवश्यक असणारी अदयावत माहिती संशोधकांना पुरविण्याचे कार्य ग्रंथालये करत असतात.

प्रत्येक राष्ट्र हे आपला सांस्कृतिक वारसा जपण्याचे काम करत असतात त्यासाठी ते ग्रंथालयाच्या माध्यमातुन समाजाच्या विविध पातळीवर ग्रंथ व नियतकालिकाचा वापर करुन माहितीचे प्रसारण करत असतात.

**ग्रंथालय चळवळ व विकास :–** प्राचीन काळापासून भारत देशाने आपल्या ज्ञानाचा व संस्कृतीचा वारसा जपतेले आहे. प्राचीन भारतात अयोध्या, काशी, उदतपूरी, गुणशीला, तक्षशिला, नालंदा अशी विदयापीठे अस्तिवात होती. यामधूनच हिंदू, जैन, बौध्द धर्माच्या हस्तालिखितांच्या जतन केले जात असे.

पूर्वीच्या काळी भूजपत्र, ताडपत्र, कॉटन, सिल्क कापड, सोन, चांदी, तांबे, इत्यादी धातूचा लेखनासाठी उपयोग केला जात असे. पण गुटेनबर्ग या शास्त्रज्ञांने लावलेल्या छपाई यंत्राच्या शोधामुळेलिखित स्वरुपातील कागदपत्रे विकसित होण्यास मदत झाली.

ग्रंथालय चळवळीचा कालखंड हा प्रामुख्याने तीन कालखंडात गणला जातो. तो म्हणजे मुद्रणकलेचा आधीचा काळ, स्वातंत्र्य पुर्वकाळ व स्वातंत्र्य नंतरचा काळ. ग्रंथालय चळवळीचा विकास होण्यामार्ग ग्रंथालय शिक्षणाचा भाग महत्वाचा मानता जातो. १९१० साली बडोदाचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी ग्रंथालयशास्त्राचा पाया विकसित करण्यासाठी अमेरिकेन ग्रंथपाल डब्लु एस बोर्डम यांना आमंत्रित करुन शिक्षणाची मुहर्त मेढ रोवली. पंजाब विदयापीठात अमेरिकिन ग्रंथपाल डिकसन यांनी लाहोर येथे १९९५ साली तीन महिन्याचा प्रशिक्षण कार्यक्रम राबवला. त्यानंतर १९३७ साली डॉ. एस. आर. रंगनाथ यांनी मद्रास विदयापीठात ग्रंथालय शास्त्रातील पदविका अभ्यासक्रमास सुरुवात केली.

भारतातील ग्रंथालय चळवळीचा खरा विकास हा स्वातंत्र्य प्राप्ती नंतर झालेला दिसून येतो. त्यासाठी ग्रंथालय संघाच्या माध्यमातून विविध स्तरावर ग्रंथालय संघटनाची स्थापना, ग्रंथालयकायदा, राष्ट्रीय माहिती प्रणाली इत्यादी महत्वाची ग्रंथालय चळवळीला लाभदायक ठरलेले आहे.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर विविध राज्यात सार्वजनिक ग्रंथालय कायदे अस्तित्वात आले त्यामुळे ग्रंथालय चळवळ अधिकच गतिमान झाली. १९५० नंतर देशात विविध विदयापीठे, महाविदयालये शालेय संस्थाची संख्या वाढल्याने त्याच्यामधुन दर्जेदार ग्रंथालये उदयास आलेली आहेत. देशाच्या सामाजिक, आर्थिक क्षेत्राात, उच्चशिक्षण व तंत्रज्ञान औद्योगिक संशोधन क्षेत्रात सातत्याने प्रगती होत गेल्याने माहिती व ज्ञानाची गरज वाढत आहे. परिणामी ग्रंथालय सेवाची गरजही तितकीच महत्वाची वाटू लागल्याने देशाला राष्ट्रीय ग्रंथालय धोरणाची गरज जाणवू लागली.

ग्रंथालय व माहितीशास्त्रविषय राष्ट्रीय धोरण ठरविण्यासाठी भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाने राष्ट्रीय नियोजन मंडळाची स्थापना केली. तसेच ग्रंथालये व माहिती व्यवसायाच्या बळकटीसाठी पंचवार्षिक योजनामधुन गेल्या चाळीस वर्षात प्रयत्न केलेले आहेत. ग्रंथालय व माहितीविषयक धोरणाचा मसुदा हा एकुन दहा प्रकरणात विभागलेला असुन त्यामध्ये प्रस्तावना, उदिदष्टये सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्था, शैक्षणिक ग्रंथालय व्यवस्था, विशेष ग्रंथालये व माहिती संस्था, राष्ट्रीय ग्रंथालयाची उभारणी, व संदर्भसुची व्यवस्था, मनुष्यबळ विकास व व्यावसायिक दर्जा, ग्रंथालय व माहिती सेवेचे आणि निधी व यंत्रणेचा योग्य उपयोग अशी अर्थव्यापक मांडणी केलेची आहे.

देशातील ग्रंथालय सेवा बळकट होण्याच्या दृष्टीने सर्व पातळीवरील ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करुन त्याचे जाळे तयार करण्याच्या दृष्टीने महत्वाची गरज निर्माण झालेली आहे. या ग्रंथालय जाळयामार्फत अगदी शहरापासून खेडयापर्यंत सेवा ग्रंथालय सेवा पोहचण्यास मदत झालेली आहे.

**ग्रंथालयांचे समाजातील महत्व:—**

आजचा समाज हा माहिती प्रधान समाज म्हणून ओळखला जातो. कारण प्रत्येक देशात माहिती व ज्ञानाला सर्वोच्च प्राधन्य दिले जाते माहितीचा वेग फार मोठया प्रमाणात प्रसारित होत असतो म्हणून त्यास ''माहितीचा विस्फोट'' असेही संबोधले जाते. समाजातील ही माहिती व ज्ञानशास्त्रीय पदधतीने संघटीत करुन पाहिजे असेल त्या वेळेस उपलब्ध करुन देण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालये करित असतात.

आधुनिक समाजाच्या गरजा हया विविध प्रकारच्या असतात. उदा. शिक्षण, सांस्कृतिक प्रगती, माहिती, अध्यात्मक व तत्वचिंतन, करमणुक इत्यादी गरजाची पुर्तता करण्याची महत्वाची जबाबदारी ही ग्रंथालयाची असते. आजच्या आधुनिक युगात ग्रंथालयाचे संघटन प्रबळ असल्यामुळे उपयोजकांना कमी वेळेत, कमी श्रमात, कमी खर्चात माहिती सेवा ग्रंथालयाच्या माध्यमातून प्राप्त होऊ लागल्या आहेत.

आज कोणत्याही समाजात शिक्षण आणि शैक्षणिक संशोधनाचे माध्यम म्हणून ग्रंथालयाकडे पाहिले जाते. कारणहजारो लोकाच्या माहितीविषक गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी ही त्या समाज्यातील ग्रंथालयावर असते.

एखादया राष्ट्राची संस्कृती इतिहास, साहित्य आणि कलेची प्रगती आपल्याला पाहावयाची असल्यास प्रथम त्या राष्ट्रात असणा—या ग्रंथालयाकडे पाहिले जाते. कारण ग्रंथालयाचे भांडार विशाल असेल तर तो देश प्रगत विकसित व शैक्षणिक बाबतीत प्रगत समजला जातो.

मानवाची आजच्या ज्ञानाची भुक ही फार मोठी आहे. त्याने कितीही ज्ञान प्राप्त केले तरीही त्याचे समाधान होऊ शकतनाही. हिच क्रिया मानवी संस्कृतीपासून आजतागायत चालूच आहे. मोठया परिश्रमाने मिळवलेले ज्ञान आणि माहिती मोलाची असल्याने ती जतन करणे तितकेच महत्वाचे आहे. हे ज्ञान आणि माहितीचे पदधतशिर संग्रह संघटन, संरक्षण आणि प्रसार करण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालयाचे असते.

ग्रंथालयाचे समाजात ग्रंथ, नियतकालिक व इतर माध्यमाचा वापर करुन युवकांना राजकिय, व्यापार, उदयोग, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रातील अदयावत ठेवण्याचे कार्य करित असतात. औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणाव्दारे चालना देण्याचे काम सर्वच्चस्तरावर ग्रंथालये करत असतात. तसेच विकसनशील राष्ट्रामध्ये अनेक उदयोगधंदे, कारखाने यामध्ये कामगार वर्ग काम करत असतो. या कामगार वर्गाला ग्रंथालयातील पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या व्यवसायबददल ज्ञान व माहिती मिळाल्यास त्याच्या व्यवसायाची कार्यक्षमता वाढून राष्ट्राच्या विकासाला ते उपकारक ठरण्यास मदत होते.

समाजात विविधांगी बदल होत असतात ते म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकीय श्शैक्षणिक, संशोधन व विकास उदयोग व्यवसाय, व्यापार, वाणिज्य श्शासनसंस्था, प्रशासन सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत असतात. आजचे ग्रंथालये ही महत्वाची सेवा देणारी वाहिनी म्हणून काम करत असते.

**संशोधनाचे ग्रंथालयांचे स्थान :—**

आज देशामध्ये विज्ञान तंत्रज्ञानाने मोठया प्रमाणावर प्रगती केलेली आहे. ही प्रगती होण्यामागे संशोधन हा महत्वाचा घटक आहे. अन्न, वस्त्र, निवारा, या मानवी गरजाची पूर्तता नवनवीन श्शोधामुळे आधिकच प्रभावी होऊ लागली आहेत. म्हणजेच मानवी जीवनावर संशोधनाचा फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेले दिसून येतो.

संशोधनही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक देशात सर्व विषयांवर शास्त्रज्ञ संशोधन करत असतात. हे संशोधन करताना प्रत्येकाला विचारांची देवाणघेवाण करावी लागते व अनेक अडचणीत सामोरे जावे लागते. संशोधक प्रथमता नियतकालिकद्वारे टिपन लिहून अन्य संशोधकांना माहिती देत असते. ती प्रक्रिया लक्षात घेऊन इतर संशोधक संशोधनात सुधारणा करत असत. म्हणजेच प्रत्येक टप्पावरती संशोधकांना संदर्भग्रंथाची आवश्यकता असते. असे संदर्भ केवळ ग्रंथालयाचे पूरवु शकतात. म्हणजेच मानवी प्रगतीसाठी संशोधन आवश्यक आहेत व संशोधनासाठी ग्रंथालय आवश्यक आहे.

संशोधन संस्थेत उच्च दर्जाचे संशोधन कार्य हवे असल्यास ग्रंथालयही सुसज्ज असणे गरजेचे आहे. त्यामुळे संशोधन प्रक्रियेस वेग व गुणवत्ता प्राप्त होते तसेच वेळ व श्रमाची बचत होते. संशोधन प्रसाराचे महत्वाचे कार्य हे ग्रंथालय संस्था करत असतात. त्यसाठी ग्रंथालय विविध स्तरावर व्याख्याने परिसंवाद आयोजित करत असतात.

संशोधनामध्ये ग्रंथालयाद्वारे पूरविण्यात येणा—या सेवा खालीलप्रमाणे

१.प्रचलीत जागरुकता सेवा
२. निवडक माहितीचे प्रसारण
३. सार सेवा
४. निर्देशत सेवा
५. भाषांतर सेवा
६. प्रतिलिपी सेवा
७. संदर्भ सेवा
८. वृत्तपत्र कात्रण सेवा
९. इंटरनेट, ईमेल सेवा
१०. वार्तालाप सेवा

११. नियतकालिक आदानप्रदान सेवा
१२. तांत्रिक चौकशी सेवा
१३. प्रलेख प्रधान सेवा
१४. सुचीकरण सेवा
१५. माहिती एकत्रीकरण सेवा
१६. माहिती आदानप्रदान सेवा

वरील प्रकाराची माहिती ग्रंथालयात उपलब्ध असल्यास संशोधकाचा वेळ व श्रम वाचला जातो.

**भारताचे ग्रंथालय विषयक राष्ट्रीय धोरण :—**

भारतामध्ये सार्वजानिक शैक्षणिक व विशेष ग्रंथालय यांचे स्वतंत्र अस्तित्व व कार्यप्रणाली अस्तित्वात आहे. ग्रंथालयाना असणारे कायद्याचे पाठबळ बंधने यामुळे ग्रंथालयाच्या सेवा व कार्यक्रम यामध्ये एकसुत्रीपणा येऊन राष्ट्रभर ज्ञानाचा प्रसार वेगाने होऊ लागला. यासाठी महत्वाचे योगदान लाभले ते म्हणजे डॉ. एस.आर रंगनायन याचे लेखन व १९५८ च्या ग्रंथालय समिती अहवाल कारणीभुत ठरलेला आहे. यासाठी भारत सरकारने १९७२ साली राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची स्थापना केली.

राष्ट्रीय ग्रंथालय व माहिती पदधती सुरु करणेची गरज असलेली जाणीव प्रा. आर. के. दासगुप्ता व राजाराममोहन रॉय प्रतिष्ठान कलकत्ता यांनी करुन दिली. त्या अनुषंगाने प्रा.डी.पी.चटटोपाध्याय याच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने राष्ट्रीय ग्रंथालय व माहिती विषयक धोरण निश्चित करणेसाठी एक समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल ३१ मे १९८६ रोजी भारत सरकारला सादर केला समितीची धोरण पुढीलप्रमाणे

१. राष्ट्रीय कार्यात ग्रंथालय व माहिती स्त्रोताचा वापर करणे.
२. ज्ञानी नागरीक ही राष्ट्रीय संपत्ती असुन माहितीचा विनियोग नागरिकाच्या विकासासाठी करणे आवश्यक आहे.
३. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नवीन सेवा सुरु करणे व मानवी संस्कृतिचा ठेवा जतन करुन तो जनतेसमोर मांडणे.
४. ज्ञान संवर्धन व ज्ञान संपादनामुळे मिळणारे फायदे जनतेच्या गरजांसाठी करणे आवश्यक आहे.
५. ग्रंथालय व माहितीसेवाचा विकास होणेसाठी सर्व स्तरावर माहितीचा उपयोग करणे.
६. ग्रंथालय व माहिती क्षेत्रातील सेवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना उच्चप्रतिच्या सेवा देण्यासाठी तयार करणे.
७. राष्ट्रीय गरजांशी संबंधीत कार्यक्रमाचे नियोजन व आधुनिक माहिती तत्रज्ञानांचा वापर करणेसाठी सरकारने प्रयत्नशील राहावे.

भारतीय ग्रंथालय व माहिती पदधतीचे समन्वय व निरिक्षण व विकासाचे काम राष्ट्रीय पातळीवरअ) सार्वजनिक ग्रंथालयसाठी — राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान आ) विदयापीठ, महाविदयालय व उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी —विदयापीठ अनुदान आयोग या संस्थाकडे जबाबदारी सोपवलेली आहे.

**आधुनिक समाजात ग्रंथालयांचे योगदान :—** समाजाच्या विकासामध्ये ग्रंथालयाच सहभाग हा महत्वाचा समजला जातो. त्यासाठी ग्रंथालये विविध स्तरावरती आपली भूमिका बजावत असतात.

१) **वाचनसाहित्याचा संग्रह करणे:—** प्रत्येक ग्रंथालयाचे प्रथम कार्य म्हणजे वाचन साहित्याचा संग्रह करणे होय. ज्ञानपुर्ण, माहितीपुर्ण, रुचीपूर्ण वाचन साहित्य ग्रंथालयासाठी प्राप्त करुन देणे तसेच वाचक वर्गाला ते उपलब्ध करुन त्यांचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी ही ग्रंथपालयांची असते. त्यामुळे समाजाचे हित राखले जाते.

**२) अनौपचारिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे :—**अनौपचारिक शिक्षण पदधतीद्वारे समाजातील अशिक्षित लोकांना शिक्षित करणे ही मुख्य जबाबदारी ग्रंथालयाची असते. अल्पशिक्षित, नवसाक्षर अशा लोकांना अक्षर ओळख टिकवून ठेवण्यासाठी त्याच्या आवडीनिवडीनुसार साहित्य उपलब्ध करुन त्यांना शिक्षण देण्याचे काम हे समाजात ग्रंथालये करित असतात.

**३) प्रबोधन करणे :—**आपल्या अवतीभोवतीचा समाज हा विविध व्यावसायिक, सामाजिक, आर्थिकस्तर, तसेच विविध प्रकारची सांस्कृतिक पार्श्वभुमी असलेला असतो त्या गटाच्या गरजेनुसार बालकमेळावे, व्याख्यानमाला, परिसंवाद, नाटय, अथवा समितीचे कार्यक्रम, कथाकथन, क्रिडास्पर्धा इ. उपक्रम सादर करुन ग्रंथालये समाजात प्रबोधन करत असतात.

४) **विश्वासार्ह माहिती प्रदान करणें:—** आज आधुनिक युगात प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा इतकी वाढली आहे की विश्वासार्ह माहिती मिळणे दूरापास्त झाले आहे. त्यासाठी ग्रंथालये परिपुर्ण व विश्वासार्ह माहिती साधने उपलब्ध करुन जीवनाच्या प्रत्येक टप्यावर होणारे नुकसान टाळण्याचे काम ग्रंथालये करत असतात.

५) **संशोधन कार्यास प्रोत्साहन देणे :—** विज्ञानातील महत्वपुर्ण शोधामुळे मानवी गरजा पुर्ण होत आहेत. तितक्याच वेगाने मानवी गरजा वाढत असल्याने जीवनात उपयोगी करणाऱ्या संशोधनकार्यासाठी योग्य वाचन साहित्य आणि माहिती साधने उपलब्ध करुन देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी ही ग्रंथालयाचे पार पाडत असतात.

६) **बौदिधक मनोरंजन करणे:—**निरोगी नागरिक हे देशाची संपत्ती असते. मनुष्याला दिवसभ कष्ट केल्यानंतर त्याच्या शरीराला व मनाला विश्रांती हवी असते. त्यासाठी तो कुठल्यातरी मनोरंजन साधनाचा आधार देत असतो. बौदिधक मनोरंजनासाठी ग्रंथालये महत्वाची असतात. त्यासाठी ग्रंथालये लोकांना सुख व शांती प्राप्त करण्यासाठी सर्व प्रकारच्या मनोरंजन वाचन साहित्य उपलब्ध करुन देत असते.

**७) स्थानिक वैशिष्टयाचे जतन करणे:—**ग्रंथालये ज्या गावात किंवा विभागात कार्य करत असतात तेथील विशिष्ट सांस्कृतिक वारसा सांगणाऱ्या वस्तूचे संरक्षण म्हणजे ऐतिहासिक वास्तु, हस्तकला, चित्रे, नकाशे, पत्र, छायाचित्रे, ऐतिहासिक कागदपत्रे, हस्तलिखित वाड:मय गोळा करुन त्याचे दर्शन लोकांना घडविण्याचे कार्य ग्रंथालये करित असतात.

**८) राष्ट्रीय विकासात मदत करणे :—** प्रगत राष्ट्रीय संस्कृती, इतिहास कलेची प्रगती पाहावयाची असल्यास तेथील ग्रंथालयाकडे पाहिले पाहिजे त्या देशातील ग्रंथालये ही विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिक व सामान्य क्षेत्रांमध्ये महत्वाची भुमिका बजावत असतात. त्यांनी केलेले संशोधन, विकास संबंधीची माहिती तो देश ग्रंथ व नियतकालिक व अन्य प्रसारमाध्यमातून प्रकाशित करत असतो. त्याचा प्रसारण करण्याचे महत्वाचे कार्य ही ग्रंथालये करत असतात.

**९) निरंतर शिक्षणाचे कार्य :—** ग्रंथालयएक सामाजिक संस्था असल्याने ती सर्वांसाठी निरंतर अध्ययनाचे माध्यम म्हणून काम करत असते. औपचारिक, अनौपचारिक शिक्षणाबरोबरच ग्रंथालये समाजातील व्यक्तींमध्ये आत्मविश्वास, आत्मनिर्भयता, नवनवीन कार्य पार पाडण्याची महत्वपूर्ण जाणीव करुन देण्याचे कार्य ग्रंथालये करत असतात.

**१०) अध्ययन संबंधी मार्गदर्शक कार्य :—** वाचकांना उत्तम वाचनसाहित्य उपलब्ध करुन दिल्याने ग्रंथालयाचे काम संपत नाही. त्यासाठी वाचन साहित्यातील लपलेले ज्ञान प्रसारीत करण्यासाठी अधिक अधिक वाचक वाचू शकतील किंवा त्यासंबधी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी ग्रंथालयाची असते.

**ग्रंथालयाचे समाजासाठी विस्तारित कार्यक्रम :—**

ग्रंथालये ही वाचनसाहित्याचा संग्रह करून ठेवत असतात पण हया वाचनसाहित्याला योग्य वचान न मिळाल्यास त्या वाचन संग्रहाचा उपयोग शुन्य झाला असे समजते. तसेच बऱ्याच वाचक वर्गाला आपण काय वाचावे?त्याचे फायदे काय?याची जाणीव नसते त्यासाठी वाचकांच्या मनामध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी ग्रंथालये पुढील विस्तारीत कार्यक्रम समाजात राबवत असतात.

**१) ग्रंथजत्रा /ग्रथप्रदर्शन :—** समाजातील वाचकांना विनामुल्य उपलब्ध असणारा कार्यक्रम म्हणजे ग्रंथजत्रा किंवा ग्रंथप्रदर्शन होय. सन १९९४ साली जागतीक ग्रंथजत्रा भरली होती यामध्ये प्रकाशक, मुद्रक, लेखक, ग्रंथपाल, ग्रंथालय संघ इ. संघटनाच्या सभा व परिषदाचे आयोजन करण्यात आले होत.या ग्रंथजत्रेतुन विविध भाषेतील, विषयातील प्रकाशनाचे साहित्य प्रत्यक्ष वाचकांना हाताळण्याची संधी मिळत असते व त्यातून वाचक आपल्या आवडीचा ग्रंथ खरेदी करू शकतो.

**२) ग्रंथालय सप्ताह :—** दरवर्षी भारतामध्ये १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर हा ग्रंथालय सप्ताह साजरा केला जातो. या सप्ताहामध्ये व्याख्याने नवीन ग्रंथ प्रकाशन ग्रंथविषयकपोस्टर्स लावणे, आकाशवाणीवर व्याख्याने, दूरदर्शनवर नवीन ग्रंथाचा परिचय असे कार्यक्रम आयोजित करून वाचक वर्गामध्ये ग्रंथविषयक प्रेम निर्माण करणे व जागृती निर्माण करणे हा सप्ताहाचा मुळ उद्देश असतो.

**३) वाचक अभ्यास / वाचक प्रशिक्षण :—** आधुनिक युगात माहितीचा विस्फोटझालेला आहे. म्हणजे माहिती प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे. ग्रंथालयात विविध माध्यमातुन वाचनसाहित्य उपलब्ध होत असते. या संग्रहातुन आपल्याले हवे असलेले वाचन साहित्य शोधने व ते प्राप्त करणे हे वाचकांसाठी अवघड बाब बनली आहे. यावरती उपाय म्हणुन वाचक प्रशिक्षणाद्वारे वाचकांनी ग्रंथालयाचा वापर कसा करावा, ग्रंथालयात असणारा ग्रंथसग्रह, ग्रंथालयाचे नियम व अटी वाचाकांच्या आवडी निवडी काय आहेत यासंबंधी प्रशिक्षण दिले जाते.

**४) दृकश्राव्य कार्यक्रम :—**ग्रंथालयाद्वारे प्रवास, पर्यटन, सिनेमा विविध कार्यक्रमाचा स्लाइड शो या माध्यमातुन आवडीच्या क्षेत्रातील प्रवास अथवा पर्यटन घडवुन आणले जाते.

**५) नाटयवाचन, कथावाचन, काव्यवाचन :—** यासारख्या कार्यक्रमामुळे वाचकांना मुळ ग्रंथ वाचण्याविषयी प्रवृत्ती केले जाते. ग्रंथचर्चा व्याख्याने सभा, प्रकाशन समारंभ इ. माध्यमातून नवीन ग्रंथाचा परिचय करून दिला जातो परिणामी ग्रंथालावाचक मिळतो.

**६) फिरती ग्रंथालय सेवा अथवा घरपोच ग्रंथालय सेवा :—** ग्रंथालय श्शास्त्राच्या पंचसूत्रीचे पालन करण्याच्या दृष्टीने वाचन व्यवस्था वाचकाभिमुख करण्यासाठी ग्रंथालयानी वाचकाच्या दारापर्यंत ग्रंथ घेऊन जाणे या संकल्पनेतूनच फिरती अथवा घरपोच ग्रंथालय सेवा अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

भारतात सर्वप्रथम फिरत्या ग्रंथालय सेवेचा प्रारंभ तंजावर प्रातांत मन्नारगुडी येथे १९३१ साली इंजिनिअर श्री भिलाई यानी बैलगाडीतून २४२ खेडयापैकी ७५ खेडयात ग्रंथवाटप केंद्र चालू केले. दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाने अनेक राज्यात फिरत्या ग्रंथालय सेवेचा प्रसार केला आहे.

**समारोप :**

समाजातील सर्व स्तरावरती ग्रंथालये आपली सेवा देत असतात कारण ती एक सामाजिक संस्था आहे. प्रत्येक व्यक्तीची ज्ञानतृष्णा भागविण्याचे पुण्यकर्म ग्रंथालये करत असतात ग्रंथालये म्हणजे समाजाचे हृदय आहे. त्याशिवाय मनुष्य जगुच शकत नाही. आज प्रत्येक देशाच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य, कृषी सेवा जितक्या महत्वाच्या आहेत तितकेच ग्रंथालय सेवाही महत्वाच्या

मानल्या जातात. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राचा विचार केल्यास माहिती व ज्ञानाचा सर्व स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसार करणेसाठी ग्रंथालयांसारख्या संस्थाचे फार मोठे योगदान आहे.

ग्रंथालये ही सामाजाच्या शिक्षण, संशोधन, सांस्कृतीक विकास, माहिती करमणुक, अध्यात्म इत्यादी समाजविषयक गरजा पुर्ण करणारी सामाजिक संस्था आहे. तसेच राष्ट्राची संस्कृ ती, धर्म, मानव विकास, इत्यादी संबंधी माहिती गोळा करून तिचा वारसा पुढील पिढीसाठी जतन करून ठेवण्याची प्रमुख जबाबदारी ही ग्रंथालयाची असते.

ग्रंथालयाद्वारे समाजामध्ये केली जाणारी महत्वाची कार्ये म्हणजे वाचनसाहित्याचा संग्रह करणे, निरतंर शिक्षण, अध्ययन संबंधी मार्गदर्शन विश्वासपुर्ण माहिती प्रदान करणे, सामाजिक बाधीलकीस प्रोत्साहन देणे, बौध्दीक मनोरंजन करणे संशोधन कार्यास प्रोत्साहन देणे इत्यादी कामे ग्रंथालये करत असतात म्हणुनच ग्रंथालये ही कोणत्याही धार्मिक, तिर्थस्थळापेक्षा कमी नाहित.

**संदर्भ :**

१) बगरी नागप्पा दासप्पा –(१९७३) पुस्तकालय पध्दति इलाहाबाद–नीलाम प्रकाशन. पा. नं. १४ ते २१ व १०० ते १०८
२) पारखी रघुनाथ श्शतानंद –(२००१) ''ग्रंथालय परिचय'' पुणे– युनिव्हर्सल प्रकाशन. पा. नं. १ ते २७
३) जैन प्रकाशन व इतर –(२००९) ''सुलभ ग्रंथालयशास्त्र'' नागपुर–विश्व पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स. पा. नं. ४ ते ११, ३१ ते ३४ व ५१ ते ५९
४) चंपू के. एल व इतर –(२००९)''ग्रंथालय संघटन'' लातुर– निकिता पब्लिकेशन. पा. नं. १ ते १९, ४० ते ४८, १२९ ते १४३, १६६ ते १७३
५) बालेकर श.श – (२०१०) ''सार्वजनिक ग्रंथालये'' औरंगाबाद– किर्ती प्रकाशन.पा. नं. ५७ ते ८८
६) ढाकणे बालाजी निवृत्ती –(२०१२)''ग्रंथालय साधक '' औरंगाबाद ग्रंथालय माहितीशास्त्र प्रबोधनी. पा. नं. ७१ ते १५५

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

# सहकारी चळवळ आणि राजकारण : विकासात्मक वाटचाल

**प्रा. उदयकुमार. ना. लाड**
श्रीपतराव चौगुले आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज,माळवाडी –कोतोली

**प्रस्तावना :**

जगामध्ये भारतातील सहकारी चळवळ सर्वात मोठी चळवळ मानली जाते व जवळजवळ सर्वच खेड्यामध्ये सहकारी चळवळ पोहोचली आहे. बँकिंग, मार्केटिंग, प्रोसेसिंग, हौसिंग, टेक्स्टाईल या मानवी जीवनातील विविध अंगापर्यंत सहकारी चळवळ पोहोचली आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू पंचवार्षिक योजनांचे महत्त्व सांगतांना म्हणाले होते की, खऱ्या अर्थाने नियोजनाची यशस्वी मोजदाद करावयाची असेल तर नियोजन हे किती प्रमाणात सहकारी संस्थांच्या माध्यमातून राबविले जाते यावर पंचवार्षिक योजनांचे यश मोजले जावे. कारण योजनेचा लाभ किंवा फायदे हे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यास हे एक प्रभावी साधन आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात दुष्काळामुळे भारतीय शेतकऱ्यांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागले. शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी एखादी कायमची तरतूद करणे ब्रिटीश शासनाला आवश्यक वाटले. त्यामधूनच सहकाराला अनुकूल वातावरण उपलब्ध झाले. जगात सहकारी चळवळीचा उदय प्रामुख्याने श्रमिकांच्या गरजेतून झाला. भारतात २५ मार्च १९०४ ला पहिला सहकारी कायदा संमत करण्यात आला. त्यानंतर १९१२, १९२५, १९६० च्या कायद्यात सहकारी चळवळीची व्याप्ती वाढत गेली. महाराष्ट्र राज्याचे भाग्य असे की, राज्यातील सहकारी चळवळीला चांगली दिशा देण्याचे काम करणारे कार्यकर्ते आणि चांगले नेते मिळाले. देशातील सहकारी चळवळीत आज महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर लोणी जि. अहमदनगर येथे विठ्ठलराव विखे-पाटील यांनी १९४९ मध्ये सुरू केला. त्यानंतर अनेक क्षेत्रामध्ये सहकारी चळवळीची घोडदौड चालू राहिली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीस जे खंबीर व गतीमान नेतृत्त्व लाभले, त्यामध्ये डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, विठ्ठलराव विखे-पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, रत्नाप्पाण्णा कुंभार, दत्ताजीराव कदम, यशवंतराव मोहिते, शरद पवार, तात्यासाहेब कोरे, कल्लाप्पाण्णा आवाडे, अशा समाज धुरीणांनी सहकारी चळवळ रुजविण्यासाठी महान योगदान दिले.

महाराष्ट्रात औद्योगिक समाजरचनेचा मंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी दिली. आर्थिक मंदीच्या काळातही सहकारी संस्था टिकून रहाव्यात, स्वत:च्या पायावर उभे रहावे, दुर्बल घटकांना अधिक अधिक सहाय्य करावे, आपल्या कामाचे विकेंद्रीकरण करावे, यासाठी सहकारी संस्थांनी प्रयत्नपूर्वक पावले उचलली आहेत. सहकाराबाबत राज्य सरकारने प्रथमपासून उदार थोरण स्वीकारले आहे. देशातील वित्तीय संस्थांनाही सहकारी संस्थांना वित्तसाह्य करून त्यांच्या विकासास हातभार लावला आहे.

**सहकारी क्षेत्राची वाटचाल :**

महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विस्तार अनेक क्षेत्रात झाला आहे. शेती, पतपुरवठा, नागरी पुरवठा, साखर उद्योग, दुग्धव्यवसाय, मच्छिमार व्यवसाय, रेशीम उद्योग,चर्मोद्योग, पशुपालन, वराहपालन, कुक्कुटपालन, गृहबांधणी, शेतीमाल प्रक्रियसहकारी चळवळ ही महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला फुलविणारी आणि खुलवणारी चळवळ आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकारी चळवळीचा मोठा वाटा आहे. देशातील सर्वात प्रगत औद्योगिक राज्य म्हणून महाराष्ट्राची किर्ती आहे. इ.स. १९६१ मध्ये महाराष्ट्रात ३१,५६५ सहकारी संस्था होत्या. त्याचे प्रमाण वाढून ३१ मार्च २००६ अखेर त्याची संख्या १ लाख ९२ हजार ७९७ इतकी झाली आहे. यावरून गेल्या चाळीस पंचेचाळीस वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने केलेल्या प्रगतीची कल्पना येते.

देशाच्या औद्योगिक उत्पादनापैकी २७.३ टक्के उत्पादन महाराष्ट्रात होते. दरडोई उत्पादनात महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या औद्योगिक नकाशातील महाराष्ट्राचे स्थान हे महाराष्ट्रातील उद्योगाचे विविध व विकास प्रक्रिया आणि लोकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन केलेले बदल यामुळे टिकून आहे. राज्यातील एकूण रोजगारात सहकारी क्षेत्राचा वाटा १२.५ टक्के आहे.

सहकारी संस्थांमध्ये तीन स्तरावर काम करणाऱ्या कृषि पतसंस्था आहेत. खेडेगावामध्ये प्राथमिक सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक व राज्यस्तरावर राज्य सहकारी बँक (शिखर बँक) अशी सहकारी पतयंत्रणा आहे. यापैकी प्राथमिक सहकारी पतपुरवठा

संस्थांचे जाळे राज्याच्या खेड्यापाड्यापर्यंत सर्वत्र पसरले आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी बी-बियाणे, खते, जंतुनाशके यांची खरेदी मशागतीसाठी येणारा खर्च, पीक हाती येईपर्यंत खर्चाची तरतूद. इत्यादी कारणांसाठी अल्पमुदतीची कर्जे देण्याचे कार्य या संस्था करतात. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था आणि राज्यस्तरावरील शिखर बँका पार पाडतात. महाराष्ट्रात सध्या प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची संख्या २०१३७ इतकी असून त्याची सभासद संख्या सुमारे ९१ लाख इतकी आहे.

**सहकारी सुतगिरण्या :**

आज भारतीय कापड गिरण्यात मुंबईला महत्त्वाचे स्थान आहे. तरी भारतात पहिली कापड गिरणी उभारण्यात बंगालला मान मिळाला. इ.स. १८१८ मध्ये हावडा जिल्ह्यात हुगळी नदीवर कोलकत्याजवळ चुरसी येथे फोर्ट ग्लास्टर मिलची स्थापन केली. मुंबई येथे १८५१ मध्ये श्री. कावसजी नानाभाई दावर यांनी बॉम्बे स्पिनिंग मिल आणि विव्हींग कंपनी लि., नावाची पहिली कापड गिरणी उभारली. इ.स. १९२३ च्या मुंबई कापड उद्योगधंद्यांच्या मंदीमुळे जास्त चालना मिळाली. देशाच्या अंतर्गत भागात कापड गिरण्यांचा उदय झाला. महाराष्ट्रात मुंबई-पुणे परिसरात व पश्चिम महाराष्ट्रात उद्योगधंद्यांचे केंद्रिकरण झालेले आहे.

सहकारी सुतगिरणी क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. इचलकरंजीत तर यंत्रमागाचे जाळेच आहे. इचलकरंजी आणि तिच्या परिसरात अनेक सहकारी सुतगिरण्या आहेत. देशातील पहिली सहकारी सुतगिरणी महाराष्ट्रातच उभी राहिली. इचलकरंजी येथील 'कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकर सहकारी संस्था' ही होय. आशिया खंडातील सर्वात मोठी सुत गिरणी इचलकरंजीत असून 'डेक्कन को-ऑप. स्पिनिंग मिल' ही होय. तसेच इचलकरंजीतच देशातील पहिली महिला सुतगिरणी उभारली. तिचे नाव 'इंदिरा गांधी महिला सुतगिरणी' असे आहे.

**सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राचे राजकारण :**

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी चळवळीने मोलाची भूमिका बजावलेली आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील सत्तेची विविध केंद्रे आपल्या ताब्यात ठेवण्यात सहकारी संस्थांचे पुढारी यशस्वी झालेले आहेत. म्हणून ग्रामीण भागात सहकारी संस्था या राजकीय सत्तेच्या शक्तीस्त्रोत समजल्या जातात. आज महाराष्ट्राचे राजकारण तीन आराखड्यात खेळले जाते. त्यातील पहिला आखाडा राज्यस्तरावरचे राजकारण हा आहे. दुसरा आखाडा पंचायत राज्य संस्थांचे राजकारण हा ा, ग्राहक भंडार, हातमाग व्यवसाय इत्यादी अनेक क्षेत्रात सहकारी चळवळीचा विस्तार झाला आहे. आहे आणि तिसरा आखाडा सहकारी संस्थांचे राजकारण हा आहे. सत्तेच्या राजकारणाचे हे तिन्ही आखाडे राजकीय सत्तेने नियंत्रित केलेले आहेत. १९६० पासून महाराष्ट्राच्या राजकारणावर काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व आहे. राज्यातील सहकारी संस्थांचे राजकारण हे राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत गटबाजीच्या राजकारणाशी संबंधित आहे.

**सहकारी संस्था नवीन सत्ता केंद्रे :**

सहकारी चळवळीला यशवंतराव चव्हाणांनी महत्त्वाचे स्थान दिले होते. शेती क्षेत्रासाठी उपयुक्त अशा सहकारी पतसंस्था व सेवा सहकारी संस्था स्थापन करून ग्रामीण भागातील आपली प्रभावक्षेत्रे निर्माण होतील. कर्तृत्वान कार्यकर्ते निर्माण होतील आणि ग्रामीण भागाचा कायापालट होईल असे त्यांचे मत होते. महाराष्ट्र सरकारने राज्यात सहकारी चळवळीच्या विकासाला मोठा हातभार लावला. कारण विकासाच्या प्रेरणा राज्यस्तरावरून व केंद्रस्तरावरून प्रवृत्त कराव्या लागणार होत्या. यशवंतराव चव्हाणांना असे वाटले की, सहकारी संस्थांच्या सहाय्याने लोकांच्या मनात विकास प्रक्रियेबाबत जागृती निर्माण करता येईल आणि विकास कार्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा पाठिंबाही मिळवता येईल त्याचप्रमाणे या संस्थांना लोकशाही स्वरूप देऊन ग्रामीण भागात मजबूत राजकीय पाया तयार करणेही शक्य होईल. त्यामुळे त्यांनी अनेक काँग्रेस पुढाऱ्यांना सहकारी क्षेत्रात सामील व्हावयास प्रवृत्त केले. सहकारी क्षेत्रातील लोकांना त्यांनी काँग्रेस पक्षात सामावून घेतले. विरोधी पक्षातून काँग्रेसमध्ये आलेल्या अनेक पुढाऱ्यांना त्यांनी सहकारी संस्थांत अधिकारपदे दिली. अनेकांना त्यांनी सहकारी साखर कारखाने काढण्यास प्रवृत्त केले.

सहकारी संस्थांबरोबरच १९६२ साली महाराष्ट्रात पंचायत राज्याचा स्विकार करण्यात आला. त्यानुसार ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी नवी सत्ता केंद्रे निर्माण केली. महाराष्ट्रातील पंचायत राज्य व्यवस्थेमध्ये जिल्हा परिषदांचे स्थान महत्त्वाचे होते. सहकारी संस्था व पंचायत राज्य संस्थांच्या मदतीने ग्रामीण भागात प्रवेश करून प्रभावी क्षेत्रे व सत्ताकेंद्रे निर्माण करणे आणि ग्रामीण जनतेला विकास कार्यामध्ये गुंतविणे ही दोन उद्दिष्टे साध्य करावयाची होती. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती इत्यादीद्वारा सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यामुळे ग्रामीण आर्थिक विकासाला मोठीच मदत झाली. ही राजकीय सत्तास्थाने आणि सहकारी बँका, भूविकास बँका, सेवा सहकारी सोसायट्या इत्यादी आर्थिक सत्तास्थाने ही परस्परांना समांतर आणि पूरक आहेत. या कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त अशी चळवळ आहे. कारण या सहकारी संस्थांच्या सहाय्याने राजकीय कार्यकर्ते ग्रामीण भागात

आपले प्रभावक्षेत्र निर्माण करू शकतात. आपल्या पाठीराख्यांचे व समर्थकांचे एक जाळे निर्माण करता येते शिवाय सहकारी संस्थांच्याजवळ जी साधनसामुग्री असते त्या साधनांचा निवडणुकीत वापर करता येतो.

**सहकारी साखर कारखान्यांची भूमिका :**

सहकारी चळवळीमध्ये सहकारी साखर कारखान्यांचे योगदान फार मोठे आहे. देशामध्ये २९५ सहकारी साखर कारखाने असून राष्ट्रीय उत्पादनात त्याचा हिस्सा ६० टक्क्यापर्यंत आहे. महाराष्ट्रात जवळजवळ १३५ साखर कारखाने असून जवळजवळ ५५ टक्के साखर सहकारी साखर कारखान्यातून निर्माण होते. साखर कारखाने ग्रामीण भागात विखुरले असल्याने ग्रामीण जनतेशी त्यांची जवळीक आहे. ग्रामीण भागाचे प्रश्न समजावून घेऊन ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट व विकसित करण्याचे काम करीत असतात. ४० हजार कोटींची उलाढाल साखर कारखाने करतात व सर्व पैसे ग्रामीण भागात ऊस दराच्या रूपाने पगार, तोडणी, वाहतूक या कामासाठी खर्ची पडतात. दुष्काळ, पूर यासारख्या नैसर्गिक संकटाबरोबरच ऊसावर सर्वत्र पडलेला लोकरी मावा रोग यामुळे उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. भारतातील साखर उद्योग सध्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेबरोबरच ऊस पुरवठ्याच्या अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडला आहे. आज राज्यातील जवळजवळ १०० सहकारी साखर कारखाने आर्थिक संकटात आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडण्याचा धोका निर्माण झालाआहे.

सहकारी संस्थांमध्ये साखर कारखान्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण सत्तेच्या राजकारणासाठी आवश्यक असणारी साधनसामग्री आणि लोकांचा पाठींबा साखर कारखान्याच्या मदतीने मिळविता येते. राजकारणाचा विचार करता सर्व सहकारी संस्थांमध्ये सहकारी साखर कारखाने सर्वात जास्त महत्त्वाचे आहेत. कारण साखर कारखाने राजकीय सत्तेची केंद्रे आहेत. त्यामुळेच प्रत्येक साखर कारखान्याच्या अध्यक्षास आमदार, खासदार किंवा मंत्री व्हावयाचे असते तसेच प्रत्येक आमदार, खासदार व मंत्री आपला स्वत:चा असा साखर कारखाना स्थापन करण्याची इच्छा बाळगून असतो. ज्या उमेदवारांच्या पाठीमागे साखर कारखान्याचे बळ असते. तो विधानसभेत किंवा लोकसभेत सहज निवडून येतो. कधी कधी लोकांचा त्यांच्यावर राग असला तर मात्र हे उमेदवार पराभूत होतात. राजकारणात स्थिर होण्यासाठी व लोकांचा बाठींबा सातत्याने मिळविण्यासाठी साखर कारखान्यासारखे दुसरे चांगले स्थान नाही. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील ग्रामीण भागामधील एकूण चित्र पालटण्यास सहकारी साखर कारखानदारी बहुतांशीपणे जबाबदार आहे. ग्रामीण भागात रोजगाराची उपलब्धता निर्माण झाली. रस्ते तयार झाले तसेच शैक्षणिक संस्था, वैद्यकीय संस्था व आर्थिक संस्थांचे सर्वदूर जाळे निर्माण झाले. त्याद्वारे राज्यातील ग्रामीण भागातील अर्थकारण व एकूण प्रगतीमध्ये सहकारी साखर कारखानदारीचा बहुमोल वाटा आहे.

**सहकाराचा राजकारणातील प्रभाव :**

सहकारात राजकारण असते ते स्वाभाविक आहे. लोकांचा सहभाग ज्या गोष्टीत असतो तिथे राजकारण येणे स्वाभाविक अटळ असते. सहकाराचा आणि राजकारणाचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते राजकीय क्षेत्रात कार्य करताना आढळतात. महाराष्ट्राच्या राजकारणात 'शुगर लॉबीचे' वर्चस्व आहे. वसंतराव नाईक यांनाही साखर कारखानदारांच्या वाढत्या सामर्थ्यांची भीती वाटत होती म्हणून त्यांनी सहावर्षापेक्षा कोणत्याही पदाधिकाऱ्यांकडे साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राहू नये, असा कायदा करण्याचा घाट घातला. वसंतदादा पाटील यांनी त्यास विरोध केला. शेवटी सरकारला हा नियम लागू करता आला नाही. वसंतदादा पाटील यांची १९७२ मध्ये वसंतराव नाईक सरकारात पाटबंधारे मंत्री झाले. त्यांनी सहकारी साखर कारखानदारीची लॉबी जास्त प्रबळ केली. १९७५ साली वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्यांनी सहकारी संस्थांची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या धोरणामुळे साखर कारखानदार चिडलेले होते. १९७७ साली वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. सहकारी चळवळीतील एक ज्येष्ठ कार्यकर्ता महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झाला. १९७८ मध्ये काँग्रेस पक्षात विभाजन झाले. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखानदारांची लॉबीही विभागली. १९७८ मध्ये शरद पवारांनी वसंतदादांचे सरकार पाडले आणि ते मुख्यमंत्री झाले. त्यामुळे महाराष्ट्रात शुगर लॉबी पुन्हा विभागली. श्री. शंकरराव चव्हाण यांनी १९८६ साली पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावरर सहकारी साखर कारखानदारांचे पंख कापावयास सुरूवात केली. सहकारी साखर कारखानदारीने लोकांना गुलाम केले आहे असे त्यांचे मत होते. त्यानंतरच्या काळात शरद पवार यांनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर सहकारी साखर कारखाने आपल्या मागे उभे करण्यास सुरूवात केली. १९९५ मध्ये शिवसेना-भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले. या सरकारनेही सहकारी चळवळी विकसित करण्याकडे विशेष लक्ष दिले नाही. ऑक्टोबर १९९९ मध्ये राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार सत्तेवर आले. आणि त्यानंतर ऑक्टोबर

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi<br>Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
|---|---|---|

२००४ व २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीतही राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार सत्तेवर आले आहे. त्यामुळे सहकार चळवळ विकासाला पोषक परिस्थिती ठरली.

सहकारातून व्यक्ती व समाज यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याची एक फार मोठी संधी लाभली आहे. एकंदरीत सहकार चळवळीचा आढावा घेतला तर असे म्हणता येईल की, सहकार चळवळ ही जनतेच्या कल्याणाचे प्रभावी माध्यम बनले आहे. घराघरात सहकार पोहचले असल्याने ते लोकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहे. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावले आहे आणि सर्वांगिण विकास घडवून आणण्याची संधी मिळाली आहे. सहकार हा शक्तीशाली वृक्ष आहे. आपल्या भागातील सहकार वृक्ष कसा वाढेल याची काळजी घेणे आवश्यक आहे. भारत आत्मनिर्भर करण्याचे सामर्थ्य सहकार चळवळीत आहे. राज्याच्या ग्रामीण भागात सधनता, सुबत्ता आणि साक्षरता आणण्याचे महत्त्वाचे कार्य करण्यात सहकाराला विसरता येणार नाही.

**संदर्भ सूची :**

१. प्रा. के. एस.भिवसनकर : महाराष्ट्र शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, फेब्रुवारी १९९८
२. प्रा. ए. आर. राखेलकर, प्रा. अशोक डांगे : सहकार तत्त्वे आणि व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे द्वितीयावृत्ती १९८९
३. प्रा. काकासाहेब कुराडे, प्रा. आप्पासाहेब पवार : शेती क्रांतीच्या दिशा नवसाहित्य प्रकाशन, बेळगांव, प्रथमावृत्ती १९८१
४. अशोक जैन : महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती जून १९९३
५. डॉ. शोभा कारेकर, डॉ. शरद घोडके : महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर, प्रथमावृत्ती २००४
६. एस. आर. पाटील : सहकार सुगंध, रयत सेवा कृषी उद्योग संघ, कोल्हापूर १९८८
७. प्रा. सौ. अनघा फाटक : महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, मुरलीधर पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती २००१
८. आचार्य शांताराम गरुड : कृषी औद्योगिक समाजाची २५ वर्षे, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी प्रकाशन, १९८५
९. प्र. चि. शेजवलकर : महाराष्ट्राचा आर्थिक विकास, व्हिनस बुक स्टॉल, पुणे, प्रथमावृत्ती १९६१
१०. विलास पाटील : महाराष्ट्राचे शासन व राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती २००३

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी

**प्रा. कमलाकर एन. राक्षसे,**
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

**प्रस्तावना :** आपल्या देशात अनेक परकीयांनी आक्रमणे केली. आपल्या देशाची अनेक परकीयांनी संपत्तीही लुटून नेली. यामध्ये इंग्रज, डच, फ्रेंच, मुघल इत्यादींचा समावेश होतो. भारतासारख्या एवढ्या मोठ्या भूभागावर मूठभर लोकांनी सत्ता गाजवली. भारतातल्या सर्व लोकांनी परकीयांच्या विरोधात शस्त्रे उगारली नाहीत. त्याचे कारण भारत हा विविधतेने नटला असला तरी विविधतेने फाटलेला सुध्दा होता. वर्ण व्यवस्थेनुसार काही विशिष्ट लोकांनीच लढायचं, काही विशिष्ट लोकांनीच ज्ञानसाधना करायची. अशा काही बंदिस्त स्तरीकरणामुळे भारताची शक्ती विभाजीत झाली होती. आज भारताच्या संविधानाने सर्व जाती धर्माच्या लोकांना समान अधिकार दिल्याने ते एकसंघ झाल्याचे दिसतात. म्हणून आज तरी भारतावर हल्ला करण्यापूर्वी त्यांना हजार वेळेस विचार करावा लागेल. कारण विविधतेने नटलेल्या भारताला एकाच माळेत गुंफण्याचे काम स्वातंत्र्यानंतरच्या काळात झालं.

प्रस्तुत संशोधन लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मनिरपेक्ष राष्ट्रबांधणी यांचा संशोधनपर उहापोह करण्यात आलेला आहे.डॉ.आंबेडकरांना या देशाचे सामाजिक आणि राजकीय ऐक्य अतिशय महत्वाचे वाटत होते.देशात स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक व राजकीय परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हतीच.हा समाज वेगवेगळ्या गटा-गटात विभागलेला होता. तरी पण काही काळानंतर व उचित प्रयत्नानंतर ही परिस्थिती पालटू शकेल अशी खात्री डॉ.आंबेडकरांना होती. भारत एक एकात्म राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील असा आशावाद त्यांनी घटना समितीसमोर भाषण करताना व्यक्त केला होता.

मानवी इतिहासात राष्ट्रवादाने हाहा:कार केले आहेत. प्रचंड हत्याकांडे व रक्तपात घडवून आणले आहेत. पण त्याचबरोबर नव्या राष्ट्रांनाही जन्म दिला आहे. अनेक राष्ट्रांनी स्वातंत्र्य सांभाळलेली आहेत.म्हणजे राष्ट्रवाद ही केवळ विध्वंसक शक्ती नसून ती एक विधायक व रचनात्मक शक्तीही आहे. मानवाला त्या शक्तीने मोलाची शिकवण ही दिली. लेनिन सारखी डॉ. आंबेडकर राष्ट्रवादाची परिभाषा करीत नाहीत.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, स्वातंत्र्य म्हणजे काय ? ते जनतेचे स्वातंत्र्य अनेक स्वतंत्र देशाची जनता खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतच नाही. देशांतर्गत गुलामगिरी ती भक्ष्य ठरते. या संदर्भात डॉ. आंबेडकर अमेरिकेतील निग्रोचे उदाहरण देतात. अमेरिकेला सर्वांत अगोदर स्वातंत्र्य मिळाले. परंतु अमेरिकेतील देश बांधवांना (निग्रोना) स्वातंत्र्य मिळाले नाही. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, राष्ट्राचे खरेखरे स्वातंत्र्य व्हायचे असेल तर त्या राष्ट्रातील सर्व जाती/वर्गांना प्रामुख्याने गुलामगिरीत खितपत पडलेल्या वर्गांना प्राप्त झाले पाहिजे. गरजा, भय, छळ, या सर्वांपासून स्वतंत्र असलेली जनताच स्वातंत्र्याचा खरा अर्थच आणून देत असते.

डॉ. आंबेडकरांच्या मते, राष्ट्राच्या ऐक्यापुढे महत्वाचा अडथळा कोणता असेल तर तो म्हणजे आपल्या देशातील जातीयता, राष्ट्राचे ऐक्य व सहजीवनातील आनंद या दोहोंना जातीयता मारक ठरते. संकुचितपणा व समाजविघातक वृत्ती यांची जोपासना ती करते. एखाद्या गटाचे संरक्षण बेकायदेशीर व बळजबरीच्या मार्गाने करणे एवढेच त्याचे उद्दिष्ट असते. डॉ.आंबेडकरांना केवळ राजकीय ऐक्य अभिप्रेत नव्हते. भातृभावाच्या प्रखर भावनेने परस्परबध्द झालेला लोक समुदाय अशी त्यांनी राष्ट्राची व्याख्या केलेली आहे. सामाजिक उतरंड, सामाजिक स्तरीकरण यामुळे भेदभाव पडतात. अशा बाबींना एखाद्या सार्वभौम राष्ट्रात स्थानच असू शकत नाही.

जागतिक क्षेत्रात आक्रमकता आंबेडकरांना मान्य नव्हती. तसेच अंतर्गत राजकारणात, आंदोलनाचे मार्ग त्यांना त्याज्य वाटतात. ते गांधींच्या चळवळींच्या मार्गांना विरोध करायचे. त्याचे कारण असे की, चळवळीमुळे वाईट पायंडे पाडले जावू शकतात जे की ताबडतोब मिटविता येणे शक्य होत नाही. अशा चळवळी हिंसक व विध्वंसक बनून सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यास बाधा उत्पन्न करू शकतात. तात्कालिक ऐक्याच्या हेतूने एखाद्या गटासंबंधी अनुयायांचे धोरण स्विकारणेही डॉ. आंबेडकर अमान्य करतात. कारण की, अनुयायी संबंधीत गटाचे समाधन करू शकत नाहीत. काँग्रेसच्या मुस्लीम विषयक धोरणाला आंबेडकरांनी विरोध दर्शविला. अनुयायांच्या मार्गाने हिंदू-मुस्लीम यांचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच चिघळत जावून जटील बनत गेले. त्यापेक्षा तडजोडीचा मार्ग आंबेडकरांना जास्त पसंत होता. तडजोड घडवून आणण्याकरीता स्वतंत्र पाकीस्तानची निर्मिती करणे भाग पडले तर तेही पत्करले,

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

कारण त्यामुळे किमान मुस्लीमांचा अनुनय नेहमी करण्याची गरज उरणार नाही. म्हणूनच सर्वांनी पाकिस्तानचेही स्वागत करायला तयार राहिले पाहिजे असे त्यांचे मत होते.

राष्ट्राच्या ऐक्यासाठी समान भाषा हा मुख्य आधार ठरू शकतो असे त्यांना वाटत असे. भारतामध्ये अनेक भाषा आहेत. यामुळे देशाच्या ऐक्यात निश्चितच अडथळा निर्माण होऊ शकतो. एक समान भाषा असल्यास राष्ट्र निर्मितीस साह्यभूत ठरते. सर्व भारतीयांना जर एकत्रित होऊन एक समान संस्कृती उभारावयाची असेल तर त्यांना हिंदी भाषा अंगीकारावी लागेल यात तीळमात्र शंका नाही.

देशात १९५३ साली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना होण्याच्या अगोदर म्हणजेच १९४८ साली भाषावार प्रांत रचना आयोगाला एक प्रतिवेदन सादर केले होते. त्यांनी भाषावार प्रांत रचनेचा मुद्दा उचलून धरला होता. त्यांनी 'एक भाषा एक राज्य' हे सूत्र नाकारून 'एक राज्य एक भाषा' हे सूत्र मांडले होते.

या सुत्राचे विश्लेषण करताना एक विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांचे एकच असे संपूर्ण राज्य असावे. ते आकाराने कितीही मोठे असले तरी चालेल या विचाराला त्यांचा विरोध होता. एकच भाषा बोलणारे जर मोठ्या प्रमाणावर असतील तर त्या भाषेच्या आधारावर एकापेक्षा अधिक राज्यांची निर्मिती केली पाहिजे असे त्यांचे सूत्र होते. छोट्या राज्यांची कल्पनासुध्दा राष्ट्रीय ऐक्यासाठी महत्वाची आहे असे डॉ. आंबेडकरांचे प्रतिपादन आहे. हे विचार आजही प्रासंगिक आहेत.

डॉ. आंबेडकर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकतेची सुरूवात ईश्वराला स्मरून करण्याच्या सुचनेविरूध्द होते.डॉ. इस्माईल फारूखी यांच्या अयोध्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा दिला आहे की, सर्व व्यक्तींना धार्मिक बाबतीत समानता असणे आणि राज्यसत्तेला कोणताच धर्म नसणे अशी आपल्या राज्यघटनेची योजना आहे.

संविधानाच्या कसोटीवर कोणत्याही कायद्याची वैधता निश्चित करायची असेल तर संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा अन्वयार्थ अनु.२५ ते अनु.२८ यातील तरतुदींसह प्रास्ताविक तेचे वाचन करूनच लावायला पाहिजे. भारतीय धर्मनिरपेक्षतेचे तत्व विविध धर्म समुहांशी, परस्पराविषयीची सहिष्णुता आणि धर्माच्या आधारे नागरिकांमध्ये पक्षपात न करण्याची राज्यसत्तेची भूमिका यावर आधारित आहे.

डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर संविधानाच्या प्रास्ताविकतेत काही बदल केले गेले. डॉ. आंबेडकर हे परिवर्तनवादी होते. त्यामुळे संविधानाच्या ३६८ व्या कलमान्वये भारतीय संविधानात कालसाक्षेप बदल करण्याची मुभा त्यांनी संविधानात दिली आहे. भारतीय संविधान मनुष्य निर्मित आहे. तिच्यात काळानुसार दुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे. डॉ. आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने संविधानाचा ड्राफ्ट तयार करत असताना त्यांच्यासमोर आदर्श राज्यपध्दत होती. ती बुध्दकालीन गणराज्याची जगभराच्या विशेषत: अमेरिका व इंग्लंड येथील घटना धर्मातीत होत्या. त्यांना धर्मसत्ता अमान्य होती. त्यामुळे धर्म आणि राजकारण हे दोन विभिन्न घट एकमेकांना समांतर असलेले. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हा शब्द मूळ संविधानाच्या प्रास्ताविकतेत घालावा असे आंबेडकरांना वाटले नाही.

भारतातील विविधता लक्षात घेवूनही देशी आणि विदेशी घटनातज्ज्ञांनी आपली मते मांडली आहेत. तत्कालीन घटना समितीचे ज्येष्ठ सदस्य के.टी. शहा यांनी धर्मनिरपेक्ष हे विशेषण लावले जावे असा आग्रह धरला होता. तशी दुरूस्ती सुचविली होती. या दुरूस्तीला आंबेडकरांनी विरोध केला होता. तेंव्हा ते म्हणाले होते की, 'प्रजासत्ताकाला अशी विशेषणे लावणे म्हणजे लोकशाही नष्ट करण्यासारखे आहे. भारतीय राज्यघटनेतील तत्वांची, मुल्यांची अंमलबजावणी जाणीवपूर्वक व जबाबदारीने होणे गरजेचे आहे.'

गेल्या साठ-पासष्ठ वर्षात राष्ट्र बांधणीचे आणि राष्ट्र उभारणीचे कार्य करण्यात डॉ. आंबेडकरांची भूमिका अतुलनीय आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. भोळे भा. ल. - आधुनिक भारतातील विचार, पिंपळापूरे पब्लीकेशन, नागपूर.
२. डॉ. भोळे भा. ल. - भारतीय शासन आणि राजकारण - पिंपळापूरे पब्लीकेशन, नागपूर.
३. डॉ. मोहन दिवाण, प्रा. जयंत देवधर, प्रा.विवेक दिवाण - भारतातील राज्यांचे राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर.
४. ज. वि. पवार - धर्मनिरपेक्षता, संविधान आणि डॉ. आंबेडकर - दि.६ डिसेंबर, २०१५ - महाराष्ट्र टाईम्स मधील लेख.
५. जटावा डी. आर. - दि पोलिटीकल फिलॉसॉफी ऑफ आंबेडकर, फोनिक्स प्रकाशन, आग्रा.
६. डॉ. आंबेडकर - रायटींग आणि स्पीचेस - महाराष्ट्र शासन प्रकाशन.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित नेतृत्वांची चळवळ

(संदर्भ : गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे)

प्रा. दयानंद इनामदार
राज्यशास्त्र विभाग
श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली

**प्रस्तावना :**

भारतीय समाजात अनेक रूढी, परंपरा होत्या, त्यापैकी काही रूढी अनिस्ट आहेत. ‘अस्पृश्यता’ ही त्यापैकी एक भयाक प्रथा होती. हया प्रथेमुळेच मानवी मूल्यांचे अवमूल्यन झाले. माणूस म्हणून जगणे हा अधिकार सुध्दा नाकारला गेला.ज्ञान, संपत्ती यापासून अस्पृश्य समाजाला वंचित ठेवण्यात आले, गुलामगिरीत जखडून टाकले. त्यामुळे भारतीय समाजाचा विषमता हा पाया झाला. आपल्या देशातील देश बांधवामध्ये सार्वत्रिक भान नाहीसे झाली, परिणामी जाती - जाती मध्ये समाज दुभागल्याने एकसंघ बनू शकला नाही. एवढे प्रचंड नुकसान अस्पृश्यते सारख्या प्रथेमुळे देशाचे व समाजाचे झाले. या प्रथेविरूध्द अनेक संघर्ष उभे राहिले हे संघर्ष विषम समाज रचनेविरूध्द होते, तसेच ते ‘समता’ हे तत्व समाज व्यवस्थेत स्वीकारले जावे यासाठी होते. नव्या समाजामध्ये पुढे आलेल्या सामाजिक नेतृत्वाने मानवाला ‘मानव’ म्हणून प्रतिष्ठा मिळावी; धर्म, जात, वर्ण, लिंग यांचा विचार न करता ‘एकमाणूस म्हणजे एकमूल्य’ या पध्दतीने माणसाचा विचार व्हावा. हा आग्रह धरला प्राचीन काळी भगवान बुध्द, वर्धमान महावीर यांनी मानवतावादासाठी असा प्रयत्न केला होता. पुढे बाराव्या शतकात बसव या कर्नाटकातील समाज परिवर्तनवादी क्रांतीकारकाने जातीभेदावर बंड उभारले ‘मी ब्राम्हण नाही’ असे सांगून त्यांनी स्वतः जन्माने प्राप्त होणारी जात ही नाकारली आणि नव्या ‘लिंगायत’ धर्माचा प्रसार केला.

भारतीय ब्रिटीशांच्या राजवटीमुळे एकूणच भारतीय समाजात हिंदू धर्माची चिकित्सा होऊन नव्या मूल्यांचा स्वीकार करण्याकडे भारतीयांचा कल वाहू लागला. इंग्रजांच्या विचारात समतेची, न्यायाची व व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये रूजलेली होती. त्याचा परिणाम भारतीयांवर होणे क्रमप्राप्त होते. इंग्रजी शिक्षणाचा पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम भारतातील समाज सुधारकावर झाला. भारतीय समाजातील दलितांमध्ये जागृती निर्माण करण्याचे त्यांचा उध्दार करण्याचे सर्वप्रथम कार्य महात्मा फुले, रामस्वामी नायकर (पेरियार) नारायण गुरू या महापुरूषाने केले महात्मा फुल्यांनी १९५२मध्ये दलितांसाठी शाळा स्थापन करून त्यांच्यातील अज्ञान दूर करून जिज्ञासा निर्माण केली.

महात्मा फुल्यांच्या विचाराच्या प्रभावातून दलितांमध्ये स्वाभिमान, शौर्य, लढाऊपणा निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रामध्ये दलित वर्गाला जागृत करण्याचे कार्य ज्या दलित नेतृत्वांनी प्रारंभी केले. त्यामध्ये प्रामुख्याने गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडेया समाज सुधारकाने केले. दलित बांधव जाणीवेच्या जागृतीची चळवळ उभी केली; पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या चळवळीला मृतरूप देऊन शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा ही हाक देऊन क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणले. त्याची पूर्व तयारी कशी झाली. याचा हा धावता आढावा घेणे अभ्यासाच्या दृष्टीने क्रम प्राप्त आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) डॉ. आंबेडकर पूर्व दलित चळवळ समजावून घेता येईल.
२) अस्पृश्यता निवारण चळवळीमागील तात्विक भूमिका स्पष्ट करता येईल.
३) डॉ. आंबेडकर पूर्व दलित नेतृत्व समजावून घेता येईल.

**माहितीचे संकलन** : भारतीय समजा व्यवस्था ही जातीवर आधारलेली असल्यामुळे जन्मावरून माणसाची जात व दर्जा ठरवला गेला, कमी प्रतीचे, हलकी, कष्टाची कामे कनिष्ठ जातीतील लोक करीत असत. शुद्र वर्णाच्या लोकांना अस्पृश्य मानले जात होते. या व्यवस्थेविरूध्द महाराष्ट्र राज्यातील दलित वर्गाला जागृत करण्याचे कार्य गोपालबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे या नेतृत्वाने केलेले आहे. त्याचा संक्षिप्त आढावा.

**गोपालबाबा वलंगकर** : समाजातील उच्चवर्णीयांनी कनिष्ठ वर्गीयावर विशेषता दलितावर लादलेल्या गुलामगिरी विरोधात दलित समाजाला जागृत करण्याचे काम गोपाळबाबा वलंगकर यांनी केले.

**अल्प परिचय** :_गोपाळबाबा वलेगकर हे इंग्रजांच्या फलटणीत हवालदार होते. त्यांचा जन्म १८४० मध्ये झाला. त्यांचे मुळगाव रायगड जिल्हयातील महाडजवळ ‘रावदूल’ हे होते. त्यांचे मुळनाव गोपाळनाक विठ्ठलनाक वलंगकर असे होते. त्यांचे शिक्षण नॉर्मल परीक्षा पास होते.

**समाजिक व शैक्षणिक कार्ये :** म. जोतीराव फुल्यांच्या विचाराचा प्रभाव वलंगकरांच्यावर होता. अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत त्यांच्या मनात चिड होती. १८८६ साली फलटणीतून निवृत्त झाल्यानंतर ते दापोली या ठिकाणी स्थायिक झाले. तेथून त्यांनी अस्पृश्य उध्दाराची चळवळ उभा केली, त्यासाठी त्यांनी 'अनार्थ दोष परिहार समाज' या संघटनेची स्थापना केली. ते म्हणत ''अस्पृश्यता ही ईश्वर निर्मिती नसून ती एक सामाजिक रूढी आहे.'' या समाज संघटनेच्या शाखा स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रभर दौरे काढले. समजा सुधारणा व लोक शिक्षणासाठी किर्तन या माध्यमाचा त्यांनी उपयोग केला. समाजाला उद्‌देशून ते आपल्या किर्तनाच्या माध्यमातून म्हणायचे ''आपल्यावर लादलेला कलंक आपण धूवून टाकला पाहिजे.'' माणुसकीच्या हक्कासंबंधी जागृत करणे कसे गरजेचे आहे. हिंदूशास्त्र कसे थोतांड व लबाडीचे आहे. असे प्रखडपणे ते लोकांना सांगायचे. त्यावेळच्या 'सुधारक' व 'दिनबंधु' या वर्तमान पत्रातूनही ते आपले प्रखड विचार लेखांव्दारे मांडत होते. त्यांनी आपल्या 'विटाळ विध्वंसन' या पुस्तकातून जातिभेद व अस्पृश्यता या संबंधी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रश्नांची उत्तरे सवर्ण हिंदूनी व त्यांचे धर्माधिपती शंकराचार्य यांनी द्यावेत असे इ. स. १८८८ मध्ये त्यांनी आव्हान केले होते. अस्पृश्य वर्गामध्ये धार्मिक, सामाजिक व आर्थिक जोखडातून मुक्त होण्याची प्रेरणा त्यांच्या कार्यातून अस्पृश्यांना मिळाली. त्यांच्या सामाजिक सुधारणा चळवळीतून अस्पृश्यांमध्ये आपल्या हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण झाली. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी माता रमाबाई आंबेडकर यांच्या कुटुंबाशी त्यांचा जवळचा संबंध होता. आपण आपल्या समाजाचे देणं लागतो, या उध्दात भावनेतून त्यांनी समाज विकासाचे कार्य केले आहे. अशा या अस्पृश्य समाजातील पहिल्या पत्रकाराचा व नेतृत्वाचा मृत्यू वयाच्या १०० व्या वर्षी इ.स. १९४० इ साली झाला.

**शिवराम जानबा कांबळे :** महाराष्ट्रामध्ये गोपाळबाबा वलंगकर यांच्या कार्याने अस्पृश्यवर्गामध्ये नवचेतना निर्माण झाली होती. त्यावेळच्या तरूणांवर अधिक प्रभाव पडला होता. पुण्याचे शिवराम जानबा कांबळे हे अधिक प्रभावी झाले होते.

**अल्पपरिचय :** जन्म१८७५ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे मुळ गांव भांबुर्डे हे होते. अस्पृश्य निवारणाचे आणि दलित चळवळीचे खंद्‌दे पुरस्कर्ते शिवराम जानबा कांबळे होते.

**सामाजिक व शैक्षणिक कार्य :** शिवराम जानबा कांबळे यांच्यावर जसा गोपाळबाब वलंगकर यांचा प्रभाव होता, तशाच महात्मा फुले, बाबा पद्‌मनजी, आगरकर, लोकहितवादी, प्रो. राजारामशास्त्री भागवत या समाजसुधारकांच्या विचारसणीचा प्रभाव होता. त्यांनी हा सुधारकांचे लेख, पुस्तके वाचून अस्पृश्यच्या सुधारणेचा आपला दृष्टिकोण बनविला. तरूणपणीच त्यांनी अस्पृश्य वर्गामध्ये सुधारणा व्हावी. त्यांना शिक्षण, नोकरी मिळावी, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचार दूर व्हावा, त्यांच्या मध्ये असलेले अज्ञान दूर व्हावे यासाठी त्यांनी चळवळ उभी केली. अस्पृश्य समाजाला लष्कर व पोलीस खात्यात नोकऱ्या मिळाव्यात व त्यांच्या मुलांचा शैक्षणिक खर्च सरकारने करावा, यासाठी २४ नोव्हेंबर १९०२ रोजी सासवड जि. पुणे येथे परिसरातील ५१ गावाच्या महार लोकांची परिषद घेतली, व त्यांनी १५८८ लोकांच्या सहयांचे निवेदन सरकारला सादर केले होते. अस्पृश्य समाजांच्या न्याय हक्कांची मागणी करणारा हा पहिला अर्ज होय. इ.स. १९०४ ला पुण्यामध्ये त्यांनी 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' या संस्थेची स्थापना केली, तसेच 'श्री सच्चिदानंद वाचन गृह' सुरू केले. अस्पृश्य समाजात जागृती व्हावी, त्यांच्या अंधश्रध्दा नष्ट कराव्यात, अन्यायाविरोधी मानसिकता तयार व्हावी, यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना त्यांना बडोदयात बोलावून त्यांचा मान सन्मान केलात्र. महाराजांच्या सहाय्याने 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरू केले. अनिष्टरूढी विरूध्द मोहिमच त्यांनी या मासिकाव्दारे सुरू केली. त्यांना त्यांच्याच समाजातील काही लोकांनी विरोध करून मासिक बंद पाडले. त्यानंतर त्यांनी 'सूचिपत्र' नावाचे पुस्तक लिहून सरकार व गावकरी हे महार लोकांवर कामानिमित्ताने कसे अन्याय-अत्याचार करतात हे या पुस्तकाच्याव्दारे अनुभवातून मांडले. १९०२ साली सार्वजनिक हौदावर पाणी पिण्याचे धाडस गोविंद वरूद मुकुंदा महार यांनी केले, त्यास हायकोर्टाने निर्दोष केले. या संबंधीचा अहवाल 'सूचिपत्र' या पुस्तकात मिळतो. सामाजिक सुधारणेसाठी अस्पृश्यांची मनोभूमिका तयार व्हावी म्हणून त्यांनी ५ एप्रिल १९१० ला जेजूरी जि. पुणे येथे दुसरी सोमवंशीय परिषद भरवली. या परिषदेच्या माध्यमातून लष्कर व पोलिस खात्यात अस्पृश्यांना भरती करून घ्यावी. या मागणीचे निवेदन त्यावेळचे भारतमंत्री क्यू यांच्याकडे निवेदनाव्दारे केली. तसेच इंग्रज सरकार हिंदू लोकांना दुखवू इच्छित नाही, म्हणून अस्पृश्यावर अन्याय करणारी भूमिका घेते असा ही आरोप त्या निवेदनात करण्यात आला होता. अस्पृश्यांच्या हक्काबरोबरच त्यांच्यामध्ये मुरळी सोडणे, देवदासी या अनिष्ट प्रथा बंद पाडण्यासाठी त्यांनी चळवळ केली याचा परिणाम म्हणून काही स्त्रियांनी दुष्ट रूढीतून मुक्त होवून विवाह केले. आा १९२९ साली पर्वती मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केले. या खंबीर नेतृत्वाचा मृत्यू वयाच्या ६५ व्यावर्षी म्हणजे १९४० मध्ये झाला. शिवराम जानबा कांबळे या समाजसुधारकाने लेखणीव्दारे समाजप्रबोधनाची चळवळ उभा केली.

**किसन फागू बनसोडे :** किसन बनसोडे यांनी आपल्या लेखनाव्दारे आणि सामाजिक प्रश्नांवरपरिषदा भरवून दलित समाजाचा जागृत करण्याचे महत्वाचे कार्य केले आहे.

**अल्प परिचय** :किसन फागू बनसोडे हे विद्रोही कवी होते त्यांचा जन्म नागपूर जवळील 'मोहपा' या गावी १८७९ सालीझाला. आपल्या कवितेच्या माध्यमातून दलितांच्या वेदना समाजापुढे मांडला.

**साहित्यातून समाज परिवर्तन :** किसन फागू बनसोडे हे दलित समाजाच्या गुलामगिरीची जाणीव झालेला हा एक अस्वस्थ कवी होता ते आपल्या कवितेतून म्हणतात.

जगात कोठे नाही,तो भेद येथे पाही,
जन्माने वर्ण ठरवी, हा हिंद देश माझा ।

वर्ण व्यवस्थेच्या समाज रचनेने माणसा - माणसात भेदाच्या उतरंडी निर्माण केला आणि या देशाचा प्रचंड नुकसान झाले. हे दुःख बनसोडे यांना अस्वस्थ करणारे आहे. ती वेदना इतरांना सुध्दा अस्वस्थ करून सोडते. किसन बनसोडे यांच्या कवितेची वादळी सुरूवात आहे. त्यांनी आपल्याकवितेतून दलितावर होणारा अन्याय प्रखरपणे व्यक्तकेलेला आहे. त्यांची कविता दलितांच्या जाणीव जागृतीसाठी प्रेरणा स्त्रोत आहे. त्यांच्या कवितामुळे स्वातंत्र्योतर काळात दलित साहित्यीकांना एक प्रेरणा मिळाली.

**सामाजिक व शैक्षणिक कार्ये :** किसन बनसोडे यांनी साहित्य परिवर्तना बरोबरच अस्पृथ्यांच्या उन्नतीसाठी १९०३ साली 'सन्मार्ग बोधक' अस्पृश समाज संस्था स्थापन करून दलितांच्या सन्मानासाठी चळवळ उभा केली. १९०७ साली मुलीसाठी शाळा काढली. पुरूषा बरोबर स्त्री सुध्दा सुधारली पाहिजे.

स्त्री आणि पुरूष हे समाज सुधारणेची दोन चाके आहेत. त्यामुळे प्रथम स्त्रीला शिक्षण देणे गरजेचे आहे. गरीब मुलांना राहून शिक्षण घेता यावे म्हणून वस्तीगृहे सुरू केली. त्याचबरोबर निराश्रित लोकांच्यासाठी 'निराश्रित हिंदी नागरिक' या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून निराधर लोकांची सेवा केली. १९२० साली नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'बहिस्कृत हितकारणी परिषद' च्या अधिवेशनामध्ये प्रभावी असे भाषण केले त्या सभेला सन्मानीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. किसन फागु बनसोडे यांच्या कार्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गौरव केला होता. गोपाळबाबा वलंगकर यांनी सामाजिक क्रांतीची प्रज्वलीत केलेली मशाल पुढे नेण्याचे काम किसन फागु बनसोडे यांनी प्रभावीपणे केले. दलितामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे काम त्यांनी आपल्या कार्यातून निर्माण केले.

संतांच्या अध्यात्माने भक्तीच्या जोखडातून बाहेर पडून सरळ - सरळ भौतिक पातळीवरील मुक्तीचा विचार महात्मा फुले यांनी मांडला. त्यानंतर शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांच्या सारखे जाणते राजे व दलित समाजातून पुढे आलेले दलित समाजाच्याजाणीव जागृतीसाठी स्वतः चळवळ उभी करणारे गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे व किसन फागू बनसोडे यांनी अस्पृथ्यांमध्ये आत्मसन्मानाची जाणीव निर्माण केली. 'मानवता' हे मुल्य केंद्र मानून सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक या सर्वक्षेत्रात समान संधी प्राप्त होण्यासाठी लढा उभारला. समाजामध्ये नवक्रांतीची पुल्लींग निर्माणझालीत. दलित बांधव आपल्या अस्तित्वाची व अस्मितेची लढाई करू लागले.

त्यामुळे वलंगकर गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे व किसन फागू बनसोडे यांना विसरून दलित चळवळीचा इतिहास मांडता येणार नाही.

**सारांश :**

भारतीय समाजामध्ये जाती विरहीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे व किसन फागू बनसोडे सारख्यासमाजसुधारकांनी केलेले कार्य खूप मोलाचे आहे. आधुनिक काळामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समताधिष्ठीत समाज निर्माण करण्यासाठी क्रांतीकारी योगदान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात १९५० साली स्वतंत्र भारताने नवी राज्यघटना स्विकारली. या घटनेच्या माध्यमातून 'अस्पृश्यता' नष्ट केल्याचे घोषित करण्यात आले. संविधानानुसार जो अस्पृश्यतेचा पुरस्कार करेल त्यास कायद्याने गुन्हेगार ठरविण्यात आले. आज कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली असली तरी व्यवहारात ती पूर्णपणे नष्ट झाली असे म्हणता येणार नाही. आज सुध्दा जातीच्या व धर्माच्या आधारे माणसा-माणसामध्ये मुडदे पाडले जात आहे. राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान निर्माण होत आहे. राष्ट्रपुरूष हे राष्ट्रासाठी असतात. ते जातीसाठी नसतात यांचा विचार आपण करीत नाही.आपणास अस्पृश्यता निवारण करावयाचे झाल्यास समाजाच्या मानसिकतेमध्ये परविर्तन घडवून आणावे लागले. अशा परिवर्तनवादी चळवळीचे स्वरूप व त्या पाठीमागीलवैचारीक भूमीका सध्याच्या बदलणाऱ्या काळात सर्वांनी समजावून घेतली पाहिजे.

**संदर्भ सुची :**

१) जोगदंड पी. जी. 'दलित चळवळ' सिध्दांत आणि व्यवहार.
२) कसबे रावसाहेब 'दलित चळवळीची वाटचाल'.
३) निकुंबे डॉ. सी. एच. 'शिवराम जानबा कांबळे.
४) पाटील बी. बी.चव्हाण उर्मिला 'महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि चळवळी.
५) लिंबोणे शरण कुमार 'दलित पॅंथर'.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# पंडीत नेहरू /राष्ट्रवाद, लोकशाही विचार.

**प्रा. मच्छिंद्रनाथ मारुती सूर्यवंशी.**
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस व
सायन्स कॉलेज चिखली ता.शिराळा, जि.सांगली.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख.

पंडीत जवाहरलाल नेहरू स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांनी भारताला स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. भारतीय जनता रूढी प्रथा परंपरेला जोखंडाखाली होती. इथे संस्थानिक राजेशाही पध्दती प्रमाणे वागत होते . एका बाजूला मोठे श्रीमंत जमीनदार तर दुसऱ्या बाजूला खचलेली गरीब जनता . त्यांना स्वातंत्र्याचे लाभ मिळवून द्यावयाचे होते. नेहरूंना एका बाजूला ब्रिटिशांच्याबरोबर तर दुसऱ्या बाजूला भारतातील श्रीमंत संस्थानिक राजे ,राजवाडे, यांचेबरोबर टक्कर द्यावी लागत होती.

पंडित नेहरू यांच्यावर मोतीलाल नेहरू, महात्मा गांधी त्यांचे शिक्षक एफ.टी. ब्रुक्स आणि सिडने वेब, जे.एस.मिल यांचा प्रभाव पडला होता. त्यांनी थिऑसॉफीकल सोसायटी , तिचे ज्ञान बेझंटबाई यांच्याकडून मिळाले होते.

उदारमतवादाचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य हा त्यांचा जीव की प्राण होता. कार्लमार्क्सच्या विचाराने प्रभावित होवून आर्थिक समता व समाजवादावर भर दिला. त्यासाठी पंचवार्षिक योजना नियोजनबध्द अर्थव्यवस्था, गांधीजीची साधन सुचीता या सर्वांचा प्रभाव पडला होता.

**राष्ट्र उभारणी जडणघडण** - राष्ट्र उभारणीच्या कार्य करताना ते इतके गढून गेल्याचे जाणवले की त्यांचा राष्ट्रवाद हा आंतरराष्ट्रीय वादात विरून गेला होता. जगात शांतता नांदावी म्हणून त्यांनी वेळोवेळी आपली भूमिका स्पष्ट केली.

भारताचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून लोकशाही समाजवाद. स्वातंत्र्य, समता या मूल्यांची जोपासना केली. देशाला केवळ राजकिय स्वातंत्र्य मिळून उपयोगाचे नाही तर सामाजिक, आर्थिक ,राजकीय,सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात स्वातंत्र्य मिळाले पाहिजे . सर्वांचा विकास झाला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. राष्ट्रप्रेम राष्ट्रीयत्व देशसेवेसाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले होते.

मोतीलाल नेहरू यांचे मुन्शी मुबारक अली यांनी ब्रिटिंशानी इथे कसा अन्याय अत्याचार चालविला आहे, याचे कथन केले. इटलीत जसे मॅझिनी , काहूर गॅरिबाल्डी यांनी लढा दिला. तसा आपण सुध्दा भारतात दिला पाहिजे.

स्वदेशी चळवळ, परकिय मालावर बहिष्कार , वंगभंग चळवळ, लाला लजपतराय पंजाबमध्ये लढा देत होते. या सर्व घडामोडीचा परिणाम नेहरू यांच्यावर झाला होता.

**१९१६ पासून राजकिय कारकिर्दीला सुरुवात** - गांधीजीची भेट झाल्यावर सशस्त्र लढा ऐवजी अंहिसात्मक मार्गाने लढा दिला पाहिजे. तरच सर्वसामान्य लोक या लढ्यात सहभागी होतील. अहिंसात्मक मार्ग स्विकारून भारतीय जनतेला स्वातंत्र्याची गरज पटवून दिली.

जगातील बऱ्याच राष्ट्रांना स्वातंत्र्य आहे तसे भारतीयांना स्वयंनिर्णयाचा अधिकार असला पाहिजे. स्वत:च्या देशात ब्रिटिश लोक स्वातंत्र्य देतात व बाहेरील राष्ट्रात साम्राज्यवादाचे स्तोम वाढवितात.स्वातंत्र्य देत नाहीत याची चीड त्यांना होती.

राष्ट्रवाद ही एक मनोवस्था आहे. ती एक मनोवस्था आहे. ती एक ऐक्याची भावना आहे. परकियांनी जर स्वराष्ट्रावर आक्रमण केले तर लोकांच्यात द्वेषांची संतापाची लाट उसळेल. पारतंत्र्यात तर ही भावना तीव्र होते. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपल्या हृदयात राष्ट्रप्रेमाची ज्योत तेवत ठेवली पाहिजे असे त्यांचे मत होते.

**आर्थिक राष्ट्रवाद कल्पना अमान्य :** नेहरूंच्या मते भूतकाळातील घटनांचा वारसा घेऊन राष्ट्रवादी बनले पाहिजे पण भूतकाळातील अंधश्रध्देवर अवलंबून राहू नये. राष्ट्रवाद हा स्फुर्तीस्थान समजला पाहिजे, भोळसट कल्पना , अंधश्रध्दा धर्माबाबतीतली खोट्या समजती याविरुध्द आंदोलन केले पाहिजे.

त्यांना हिंदू राष्ट्रवाद मुस्लीम राष्ट्रवाद मान्य नव्हता. आपल्या देशात एकच राष्ट्रवाद आहे तो म्हणजे भारतीय राष्ट्रवाद होय.

**धर्म** - भारतातील सर्व धर्मियांनी ऐक्य भावनेने राहिले पाहिजे. त्यांना धर्मातीत राज्य हवे होते. सर्व धर्मीयांच्यात एकता असली पाहिजे.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi<br>Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

**धर्मनिरपेक्ष नेहरू –** भारतात हिंदू मुस्लीम बौध्द ख्रिश्चन असे सर्वधर्मांचे लोक राहतात. त्यामुळे कोणत्याही धर्माचेवर्चस्व असता कामा नये. विविधतेत एकता निर्माण झाली पाहिजे. आपल्या इतिहासातून आपणाला प्रेरणा मिळाली पाहिजे. १९४७ पासून १९६४ पर्यत त्यांनी नियोजन, लोकशाही समाजवाद, पंचवार्षिक योजना आणि जगात भारताची पतप्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**लोकशाहीबाबत मत –** नेहरूंना रा. स्वातंत्र्य पाहिजेच होते. पण या स्वातंत्र्याने भारतीय जनतेचे दारिद्रय, दु:ख निवारण झाले पाहिजे. स्वातंत्र्य, समता, शोषणमुक्ती व्यक्तीला प्राप्त झाली पाहिजे.

**लोकशाहीवर श्रध्दा –** स्वातंत्र्य, समता, बंधुता ही लोकशाहीची तत्वे होती.प्रत्येकाला आपल्या गुणांनुसार विकास करता आला पाहिजे तशी राज्याने परिस्थिती उभी करावी. समतेसाठी दारिद्रय विषमता कमी करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

**लोकशाही ही एक जीवनप्रणाली मानली**

लोकांना जागृत केले तरच लोकशाही उपयुक्त ठरते. सरकार हे लोकांच्या पाठिंब्यावर चालते. त्यासाठी मतदान अधिकार प्रौढ मताधिकार असला पाहिजे. निरक्षरता अज्ञान कमी झाले पाहिजे.

**भांडवलशाहीचा विरोध**

भांडवलशाहीत आर्थिक शोषण होते. सत्ता, संपत्ती ही थोडया लोकांच्या हातात जाते. सत्ता श्रीमंताच्या हितासाठी वापरली जाते. जसे फॅसिझम या पध्दतीवर त्यांनी टिका केली.साम्यवादाला विरोध

ब्रिटिश स्वत:च्या देशात लोकशाही नांदवतात व इतरत्र हुकूमशाही पध्दत राबवतात. याला नेहरूंनी विरोध केला.

**लोकशाही शासन प्रकार चांगला.**

- लोकशाहीत कारभार लोकांच्या मतानुसार चालतो.
- लोकांचे पक्षाकडून प्रबोधन होते.
- शांततेच्या कायदेशीर मार्गाने बदल होतात.
- अहिंसा, सहिष्णूता याचा आधार घेवून समता प्रस्थापित करता येवू शकते यावर त्यांचा विश्वास होता.

**मुल्यमापन –**

राष्ट्रवाद, लोकशाही समाजवाद , अलिप्ततावाद , धर्मनिरपेक्षता या तत्वांच्या आधारे संपूर्ण जगाला देणगी दिली. त्यांना शांतीदूत नेहरू म्हणतात.

स्वातंत्र्यानंतर त्यांनी सर्व जातीधर्मांना समान मानले. मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करून पंचवार्षिक योजना अंमलात आणल्या. सर्व जाती धर्मात ऐक्य प्रस्थापित केले . भारताच्या सर्वांगीण विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला.

## महाराजा सयाजीराव गायकवाड – सुशासित राज्यकारभाराचा आदर्श


**प्रा. ए. बी. मोहिते**
सहाय्यक प्राध्यापक –राज्यशास्त्र
म.ह.शिंदे महाविद्यालय,तिसंगी



### गोषवारा

आधुनिक भारताच्या इतिहासात बडोदा संस्थान हे एक प्रगतिशील राज्य म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात या राज्याने 'महाराजा सयाजीराव गायकवाड' यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याणकारी राज्याचा आदर्श निर्माण केला. अशिक्षित शेतकरी कुटुंबातून आलेल्या सयाजीरावांनी आपल्या ६४ वर्षाच्या कारकिर्दीत सुधारणावादी राज्यव्यवस्था निर्माण करुन सुशासनाचा आदर्श निर्माण केला. ब्रिटिशांच्याकडून मिळालेल्या मर्यादीत अधिकारांचा वापर करुन शिक्षण, स्थानिक स्वराज्य, समाजसुधारणा, धर्म सुधारणाा, स्त्री शिक्षण, रस्ते, रेल्वे, पाटबंधारे, कृषी विकास, सहकार, बँक,उदयोगधंदे, प्रशासन व्यवस्था, ग्रंथालये, शिष्यवृत्ती, वर्तमानपत्रे, पुस्तक छपाई,न्याय व्यवस्था, प्रशासन व्यवस्था,आपत्ती निवारण, आरोग्य, स्वच्छता, कला, साहित्य, विज्ञान, संस्कृती इ. सर्व क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला त्यांचे विचार व कार्य भारतीयांसाठी दिशादर्शक आहेत. विशेषतः प्रशासकीय सुधारणांच्याव्दारे सुशासन निर्माण करण्याचे कार्य भारतातील प्रशासकीय सेवकांना मार्गदर्शक स्वरुपाचे आहे. म्हणूनच त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा अभ्यास करणे सद्यस्थितीत महत्वाचे ठरते.


### प्रास्ताविक

बडोदा संस्थानचे अधिपती महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्हयातील कवळाणे या गावी झाला. वडील काशिराव गायकवाड यांना आनंदराव, गोपाळराव व संपतराव अशी तीन मुले होती. बडोदा संस्थानचे राजे खंडेराव गायकवाड यांचे १८७० साली निधन झाले. ब्रिटिश सरकारने खंडेरावांची पत्नी जमनाबाई यांना दत्तकपुत्र घेण्याची परवानगी दिली. जमनाबाईंनी १२ वर्षाच्या अशिक्षित गोपाळरावांची दत्तकपुत्र म्हणून निवड केली. २७ मे १८७५ रोजी दत्तकविधान झाले आणि गोपाळरावांचे नाव 'सयाजीराव तीसरे'असे ठेवण्यात आले.

बडोदा संस्थानचे दिवाण टी माधवराव हे कुशल प्रशासक होते. त्यांनी राज्यकारभाराची घडी बसवून सयाजीरावांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. सयाजीरावांचा मराठी,गुजराती, उर्दू व इंग्रजी भाषांबरोबरच इतिहास, भूगोल व गणिताचा अभ्यास सुरु झाला. या अभ्यासानंतर टी माधवरावांनी सयाजीरावांना राज्यकारभाराचे शिक्षण देण्यासाठी तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन केले. राज्याची कर्तव्ये, सुनियंत्रित राज्यकारभार, कायदे व न्याय,जमिन महसूल व व्यवस्थापन, पोलीस,लष्कर इ. विषयांवर सुमारे १५० व्याख्यानांचे आयोजन केले. २८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीरावांनी समारंभपूर्वक अधिकार ग्रहण केले आणि दैनंदिन राज्यकारभारात लक्ष देण्यास सुरुवात केली. अल्पावधितच त्यांनी एक लोक कल्याणकारी सुशासित राज्यकारभाराचा आदर्श देशासमोर ठेवला. त्यांच्या प्रागतिक राज्यकारभाराचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे –** प्रस्तुत शोध निबंधासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या लोकभिमुख राज्यकारभाराचा अभ्यास करणे.
२) बडोदा संस्थानातील प्रशासकीय सुधारणांचा अभ्यास करणे.
३) बडोदा संस्थानातील सुप्रशासनाच्या तत्वांचा अभ्यास करणे.

वरील उद्दिष्टांना अनुसरुन उपलब्ध साधनसामुग्रीच्या आधारे प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

### संशोधन पध्दती

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

### राज्यकारभाराचा उद्देश व राज्यकर्त्याचे कर्तव्य

महाराजा सयाजीरावांना २८ डिसेंबर१८८१ रोजी राज्याधिकार प्राप्त झाले. त्यानिमित्ताने पुण्याचा सार्वजनिक सभेने महाराजांचा मानपत्र देऊन सत्कार केला. त्या प्रसंगी सयाजीराव म्हणाले की, ''माझ्या प्रिय प्रजाननांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे हाच माझ्या जीवनाचा पहिला व प्रबळ असा उद्देश आहे.'' सयाजीरावांनी या उद्देशाला अनुसरुनच आपला राज्यकारभार सुरु

केला होता. प्रजेचे कल्याण हेच त्यांनी अंतिम ध्येय मानले होते. प्रशासकीय कामाचा परिचय झाल्यानंतर १८८२ साली बडोदा संस्थानातील पाच सुभ्यांचा(जिल्हयांचा) दौरा केला. राज्यातील रयतेशी संवाद साधावा, त्यांची सुखःदुखे ऐकावी, गावे,शहरे, शाळा, सरकारी कचेऱ्यांना भेटी देऊन त्यांचे प्रश्न समजून घेणे हा या दौऱ्यामागचा उद्देश होता. सयाजीरावांच्या मते राजा आणि प्रजा या दोघांचे कल्याण एकच आहे. प्रजेच्या हितासाठी राज्यकर्त्याने सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. प्रजेचे कल्याण हेच माझे कर्तव्य आणि तोच माझा मोक्ष हा सयाजीरावांचा सिध्दांत होता.

**राज्यकर्त्यांकडून जनतेच्या अपेक्षा**

राज्यातील सामान्य जनतेला सुप्रशासन आणि सुराज्य हवे असते. ते निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची व अधिकाऱ्यांची असते. त्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात असे महाराज म्हणतात.‘‘ सुराज्यात प्रजेच्या तीन अपेक्षा असतात (१) हलका कारभार (२) राजा व प्रजा यांच्यामध्ये कमीत कमी मध्यस्थ अथवा अंमलदार असावेत (३) कमी खर्चाची पण शिघ्र न्याय मिळण्याची पध्दत असावी या तीन गोष्टी साध्य झाल्या म्हणजे राज्ययंत्र रयतेस सुखावह वाटते.’‘ सयाजीरावांनी आपल्या राज्यात सुप्रशासनाच्या माध्यमातून सुराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या भाषेत राज्यकारभार करणे, मध्यस्थांची संख्या कमी करणे व जनतेला जलद न्याय मिळाला तर राज्याची प्रगती जलद गतीने होऊन प्रजेच्या गरजा पूर्ण होवून स्वराज्य निर्माण होईल असे सयाजीरावांचे मत होते.

**परस्पर सहकार्य व सहसंघटना**

सयाजीराव वेळोवेळी आपल्या राज्यातील सर्व खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, परिषदा घेऊन एकत्र चर्चा, विचारविनिमय करुन त्यांना स्वतः मार्गदर्शन करत असत.‘‘शरीराचे सर्व अवयव व ज्याप्रमाणे एकमेकांना पूरक व हितकारक बनून शरीराला पूर्णतःआणतात त्याप्रमाणे सर्व खात्यांनी परस्पर पूरक होऊन राज्यकारभाराला संपूर्णत्व प्राप्त करुन दिले पाहिजे.‘‘ सहकार्याशिवाय कोणतेही कार्य पूर्णत्वास जात नाही असे सयाजीरावांचे मत होते. याबरोबरच सर्व खात्यांमध्ये कामाची वाटणी करुन दिल्यास सर्व व्यवहार सुरळीत चालतील तसेच काही अडचणी आल्यास त्या दूर करुन हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास जाण्यासाठी प्रयत्न करणे यास सयाजीराव सहसंघटन म्हणतात.

**आत्मपरिक्षण आणि शिक्षण**

सयाजीराव म्हणतात की,‘‘मी नेहमी अंतर्निरीक्षण किंवा आत्मपरिक्षण करतो. त्यामुळे मला माझ्यात जे दोष आहेत, उणिवा आहेत त्या निदर्शनास येतात व त्या दूर करण्याचा प्रयत्न करतो.‘‘ थोडक्यात स्वतः विषयी कोणताही भ्रम न ठेवता स्वयंमूल्यमापन केल्यास राज्यकारभार सुधारतो व हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास जाते. याबरोबरच राजा हा सुविद्य आणि ज्ञानी असला पाहिजे. तसेच प्रजाही तितकीच शहाणी व समंजस असली पाहिजे हे गुण शिक्षणाने मानसामध्ये येतात म्हणून ते शिक्षण हे सर्व सुधारणांचा पाया आहे असे मानतात. राज्य चालविणे हे एक शास्त्र आहे. राज्यकर्त्यांच्या ठायी काही विचार व तत्वांची बैठक असावी लागते तरच ते प्रजेच्या हिताचा राज्यकारभार करतील.

**चांगल्या सेवकांचे आवश्यक गुण**

राज्याच्या सेवेमध्ये असणाऱ्या नोकरांजवळ काही गुण असावे लागतात. मनुष्याची प्रगती अथवा अवनती त्याच्या गुणांवर अवलंबून असते. सेवकांना आपल्या कामात प्रगती करण्यासाठी पुढील गुणांची आवश्यकता असते.

लक्षपूर्वक काम करणे, चौकस दृष्टी ठेवणे, आत्मविश्वास, नैतिक धैर्य, खऱ्या खोटयाचे ज्ञान, महत्वकांक्षा, स्वयंस्फूर्ती, आत्मसंयमन, आशावादीपणा, प्रसंगावधान, इच्छाशक्ती, स्मरणशक्ती, निश्चितपणा, संभाषणशक्ती, संघटनशक्ती, भाषणशक्ती इ.

वरील गुण सेवकांनी आत्मसात केले तर ते आपले काम उत्तमरितीने करु शकतील याबरोबरच सेवकांनी आपल्यातील अवगुणांची हकालपट्टी केली पाहिजे. प्रगतीस अडथळा ठरणारे अवगुण पुढीलप्रमाणे आहेत.

विसराळूपणा, निराश होणे, मनाचा कमकुवतपणा , निरुत्साह, कल्पना शक्तीचा अभाव, अनिश्चितपणा, पध्दतशीरपणा किंवा शिस्त नसणे, स्वतःस हलके समजणे इ.

**अधिकाऱ्यांची निवड**

राज्यकारभार चालविण्यासाठी राजाचा केवळ क्षात्रधर्म पुरेसा नसतो. राज्याचे खरे काम वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चालते, त्यामुळे हुषार व पात्र अधिकारी निवडण्याची कला राजाकडे असावी लागते. सर्व भेदभाव विसरुन केवळ सेवाभावाने काम करणाऱ्या सेवकांचा संच तयार केला पाहिजे. विविध क्षेत्रातील गुणीजनांचा सातत्याने शोध घेतला पाहिजे. प्रशासनाची गुणवत्ता शासकवर्गाच्या

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

कर्तव्यपरायणतेवर व कौशल्यांच्या नैपुण्यावर अवलंबून असते. यासाठी सयाजीराव सेवकांच्या शिक्षणात व प्रशिक्षणात स्वतःलक्ष घालीत असत. आपल्या आस्थापनातील सेवकांना सयाजीराव नोकर न मानता साधक मानतात. साध्यानुसार कामाची पध्दती ठरविणे, गरजेनुसार साधनांची उपलब्धी करुन देणे, गरजेनुसार साधने विकसित करणे आणि कामाचे शास्त्र बनवून कार्यसिध्दीस पोहोचवणे ही प्रशासकीय व्यवस्थापनाची चतुःसूत्री सांगितली आहे.

**कर्तव्यदक्ष व कार्यक्षम सेवक**

सयाजीराव महाराजांनी कर्तव्यदक्ष सेवक कसे असावेत त्यांनी कोणत्या गोष्टी आत्मसात कराव्यात तसेच सेवकांची निवड करताना कोणत्या तत्वांचे पालन करावे याविषयी मार्गदर्शन केले आहे.

1) अंमलदारांनी आपले ज्ञान लिहून ठेवावे. हाताखालील नोकरास समजून सांगावे, नवीन माहिती दुसऱ्याकडून घेण्यास लाजू नये.
2) अंमलदारांनी स्वयंस्फूर्तीने, विवेकाने व पूर्वाकलन करुन काम करावे. प्रत्येक कामाचे धोरण व उद्देश समजून घेतले पाहिजे.
3) वरिष्ठ अंमलदारांनी विविध खात्यांमध्ये परस्पर सहयोगासाठी सहसंघटकाची भूमिका पार पाडावी, श्रमविभागणीचे तत्व पाळावे.
4) अंमलदारांनी दुसऱ्यांनी अनुसरावे असे शिष्टाचार पाळावेत, मानापमान व दिखावू गोष्टींचे स्तोम माजवू नये.
5) सेवकांनी निर्व्यसनी असावे, कामाचे ठिकाण स्वच्छ व सुशोभित असावे, कारभारात समंजस व काटकसर वृत्ती ठेवावी.
6) सेवकांनी नियम व निर्बंधाचे काटेकोर पालन करावे, नियमांमुळे कर्तव्यात स्पष्टता येते व निर्बंधामुळे दुर्वतनाचे नियंत्रण होते. अर्थात निर्बंध हे कुंठितगती नसून प्रगतीप असावेत.
7) शिक्षा हे साध्य नसून अनेकांचे हित साधण्याचे साधन असावे, गुन्हयाप्रमाणे शिक्षा, अपराधाचे परिमार्जन व भावी अपायांचा प्रतिकार हे शिक्षेचे तत्व असावे.
8) चांगल्या व निःस्वार्थ सेवेसाठी उत्तेजनाची तरतूद असावी. त्यामुळे प्रशासनाची गुणवत्ता वाढते.
9) जुने ते सर्व कालबाहय अशी भूमिका न घेता जुन्यातील चांगल्याचा स्विकार करावा, समाजहित साधणारे रिवाज चालू ठेवावे.
10) राज्यातील साधन सामुग्रीची माहिती सतत तयार ठेवावी तीचा वापर विकासयोजना व राज्याचे अंदाजपत्रक तयार करताना होतो.
11) भावी सुधारणांची किंवा योजनांची प्रथम धारणा ठरवून त्या जशा पूर्ण होतील तशी त्यांची नोंद ठेवावी.
12) आर्थिक स्वावलंबनासाठी पडीक जमीन लागवडीखाली आणणे, पाटबंधारे प्रकल्प बांधणे, विहीरी, तलावांची दुरुस्ती, उदयोग व्यापाराला उत्तेजन इ. उपायांमुळे बडोदा राज्याचा आर्थिक पाया भक्कम झाला.
13) सेवक भरती करताना पात्र लायक व राजनिष्ठ नोकर मिळविण्याचा प्रयत्न केला. जवळचे लोक ज्ञानी व कार्यक्षम, विव्दान,व्यवहारी नसतील तर राज्याचे नुकसान होते. म्हणून त्यांना दूर ठेवले. सेवकांना विशेष कौशल्ये संपादन करण्यासाठी विदेशात प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे धोरण ठेवले.
14) सेवक भरती करताना समतेच्या तत्वाचा अवलंब केला. जात, धर्म, भाषा, वंश, रंग असा भेदभाव केला नाही. सरकारी सेवेत स्त्रियांनाही दाखल केले व त्यांच्याशी सभ्यतेचा व्यवहार ठेवण्याची दक्षता बाळगण्याचे निर्देश दिले.
15) न्यायदान पायरी पायरीने करण्याची पध्दत विकसित केली. तपास व तथ्य शोधनावर भर दिला, शासन मंजूरीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची साधक बाधकता तपासूनच निर्णय प्रक्रियेत दाखल करण्याची पध्दत स्विकारली. तसेच लेखी हुजूर हुकूम काढण्याची पध्दत स्विकारली.
16) राजघराण्यातील व्यक्तींना विशेषाधिकार दिले नव्हते. राजपुत्रांच्या मनात स्वतःविषयी फाजील कल्पना येऊ देणे घातक असल्याने अधिकाऱ्यांना हुजूर हूकूमांव्दारे खास सूचना देण्यात आल्या होत्या.

वरीलप्रमाणे सयाजीराव महाराजांच्या व्यक्तिनिरपेक्ष व वस्तुनिष्ठ सुशासनप्रणालीचे रहस्य होते असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष –** बडोदा संस्थानच्या राज्यकारभार पध्दतीचा व सुशासनप्रणालीचा आढावा घेतल्यानंतर पुढील निष्कर्ष काढता येतील.

1) महाराजा सयाजीरावांच्या राज्यकारभाराचा प्रमुख उद्देश हा प्रजेच्या सर्व प्रकारच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे हा होता.
2) सयाजीरावांनी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावर विसंबून न राहता प्रत्यक्ष जनतेला भेटून त्यांच्या अडीअडचणी व प्रश्न समजून घेण्यावर भर दिला.
3) हुशार, कार्यक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करताना गुणवत्तेला प्राधान्य दिले व प्रशासनाचा दर्जा उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न केला.
4) सयाजीरावांनी सुशासनाच्या माध्यमातून सुराज्य निर्माण केले.
5) सयाजीरावांनी राज्यातील सर्व खात्यांमध्ये सहकार्य व सहसंघटन निर्माण करण्यावर भर दिला.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

6) सयाजीरावांनी नेहमी आत्मपरिक्षणावर भर दिला. त्यामुळे उणीवा दूर होवून राज्यकारभार सुधारला व हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास गेले.
7) सयाजीरावांनी सेवकांचे गुण-दोष सांगून सेवकांनी स्वतःमध्ये चांगल्या गुणांचा परिपोष करण्यास सुचविले आहे.
8) सयाजीरावांनी सेवकांच्या प्रशिक्षणांवर व प्रजेच्या शिक्षणावर भर दिला आहे. कारण सर्व सुधारणांचा पाया शिक्षण हा आहे असे त्यांचे मत होते.
9) सयाजीरावांनी कर्तव्यदक्ष सेवकांनी कसे वर्तन करावे याचे मार्गदर्शन केले आहे. तसेच राज्यप्रशासन चालवताना कोणत्या तत्वांचा अवलंब करावा याचे मार्गदर्शन केले आहे.

वरील निष्कर्षावरुन दिसून येते की, कार्यक्षम प्रशासन व निष्ठावंत, कर्तव्यदक्ष सेवकवर्गाच्या माध्यमातून सयाजीरावांनी आपल्या राज्यात सुशासनाचे पर्व निर्माण केले.

**समारोप**

सयाजीराव महाराजांनी कोणतेही औपचारीक शिक्षण न घेता राज्यकारभारचे शिक्षण व अनुभव, व्यासंगीवृत्ती, वाचन, मनन, चिंतन, तज्ज्ञांचा सहवास व मार्गदर्शन, परदेश प्रवास पाहून त्यांनी स्वतःला विकसित केले. त्याबरोबरच आपल्या संस्थानातील प्रजेलाही आधुनिक शिक्षण देवून त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला. हे कार्य करत असताना त्यांनी आपल्या संस्थानाची एक कार्यक्षम, सुसंघटित प्रशाासनव्यवस्था निर्माण केली आणि नागरिकांच्या हिताचे रक्षण करुन एक आदर्श राज्य निर्माण केले. राज्यकारभार करताना त्यांनी सुप्रशासनाची अनेक तत्वे आचरणात आणली. आज २१ व्या शतकात सुप्रशासनाची चांगल्या राज्यकारभाराची सर्वत्र अपेक्षा केली जाते. सयाजीरावांनी १०० वर्षापूर्वीच आपल्या राज्यात सुप्रशासन निर्माण केले होते. त्यांच्या कार्याची व विचारांची आपल्या देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आजही तितकीच प्रस्तुतता आहे. म्हणूनच त्यांना युग प्रवर्तक राजा म्हणून ओळखले जाते.

संदर्भ :

१) भांड बाबा, संपादित- महाराजा सयाजीराव-गौरवगाथा युग पुरुषाची, खंड१२, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७.
२) डॉ.वरखेडे रमेश, संपादित, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग-१, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७.
३) डॉ.वरखेडे रमेश, संपादित, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग-२, सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७
४) भांड बाबा, युगद्रष्टा महाराजा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१७.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# पर्यावरण संवर्धन चळवळ व्यक्तीगत संस्थात्मक वा गटात्मक

**प्रा. भरत पाटील**
भूगोल विभाग
श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड
सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली

**प्रा.डॉ.बी.एस.जाधव**
भूगोल विभागप्रमुख
श्री विजयसिंह यादव आर्टस् ॲण्ड
सायन्स कॉलेज, पेठवडगांव

**प्रस्तावना :**

पर्यावरणाची नैसर्गिक चौकट मानवी क्रियांनी, तंत्रज्ञानाने ओलांडली जात आहे. यांचा समाजावर तसेच पर्यावरणावरमोठया प्रमाणात परिणाम होत आहे. विकासाची वाटचाल करताना मानवी समाजाने पर्यावरणातल्या इतर जैविक व अजैविक घटकांची शास्त्रीय दखल न घेतल्यामुळे या सर्वांचा पर्यावरणाच्या एकुण स्वरूपावर विघातक दुष्परिणाम झाला.

आपण जर पृथ्वीचा इतिहास लक्षात घेतला तर आपल्याला असे आढळुन येते की पृथ्वीवरील नैसर्गिक परिस्थिती सतत बदलत गेली आहे.या बदलांना प्रामुख्याने नैसर्गिक घटक जबाबदार आहेत. या बदललेल्या निसर्गाचा उपयोग मानवाने आपल्या विविध व्यवसायांच्या विकासासाठी केलेला दिसतो.पण जेव्हा लोकसंख्या बेसुमरी वाढली तेव्हा त्याच्या मागण्या वाढल्या.मागण्या पुरवण्यासाठी औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिकणामूळे नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला. नगरे व शहरे यांच्यामध्ये वाढझाली.लोकांचे राहणीमान वाढले. मानवाच्या भौतिकसुखासाठी निसर्गातील घटक जास्तीत जास्त ओरबडले जाऊलागले. मानवाने पाणी, मृदा, वने, खनिजे, जैवविविधता यांचा अविवेक आणि अतिरेकी पध्दतीने वापर केल्याने नैसर्गिक पर्यावरणावर मोठया प्रमाणात ताण वाढला गेला.

**व्याख्या :**

''पर्यावरणाच्या विद्रोही परिस्थितीला योग्य वळणावर आणणयासाठी मानवाने आखलेले नियोजन व त्या दृष्टीने केलेली कृती म्हणजे पर्यावरण चळवळ होय''.मानव निसर्गाची रचना बदलत असून पर्यावरणनियसमस्या निर्माण करत आहे या समस्या थांबविण्यासाठीमानवी आरोग्य व नैसर्गिक आरोग्य समृध्द ठेवण्यासाठी मानवाने केलेली सततची धडपड म्हणजे पर्यावरण चळवळ होय.

**उद्दिष्टेः**

१) व्यक्तीगत पातळीवरील पर्यावरण विषयक चळवळीचा अभ्यास करणे.
२) संस्थात्मक वा गटात्मक पर्यावरण विषयक चळवळीचा अभ्यास करणे.

**व्यक्तीगत चळवळी**

**१) सुंदरलाल बहुगुणा व 'चिपको' आंदोलन चळवळ :** सुंदरलाल बहुगुणा यांनी आपले आयुष्य वृक्ष वाचविण्यासाठी वेचण्याचे ठरवून सुमारे १० हजार कि.मी.पायी प्रवास केला व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व जनतेस समजावून दिले. लाकूड तोड जंगलात आले की वृक्षास मिठीमारून प्रथम आपल्यावर वार करा असे बहुगुणा सांगू लागले.त्याचा परिणाम होवून स्थानिक लोक यामध्ये सहभागी होवू लागले व झाडे तोडण्यास विरोध करू लागले. वृक्षास मिठी मारून बसण्याच्या पध्दतीमुळे या चळवळीस 'चिपको आंदोलन' नाव पडले.

१८८२ साली देशातील पर्यावरणाचे हाल दाखविणारा नागरिकांचा पहिला अहवाल प्रकाशित झाला. अहवालाच्या अखेरीस पर्यावरणाच्या भीषण अवस्थेबद्दल चिंता व्यक्त करून ताडळीने सुधारणेचा आग्रह धरला.चिपको आंदोलन करून वृक्ष तोड रोखणा-या झुंजार महिलांना हा अहवाल अर्पण केला आहे.

**२) के.सी.श्रॉफ यांचे पर्यावरण संवर्धन चळवळ :** श्रॉफ यांनी बडोदयाजवळ रसायन कारखानाच्या जवळ असलेल्या विहिरीच्या सभोवताली विश्वामित्री नदीतील गढूळ पाणी आडवून झाडे वाढविली. त्यामुळे आटलेल्या विहिरींना कालांतराने पाणी लाभले. निलगिरीची वने वाढवून खा-या जमिनीचा कायापालट केला. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना कामटेक फाऊंडेशनचे पहिले पारितोषिक लाभले.

**३) विलासराव साळुंखे यांची पर्यावरण चळवळ :** २५ वर्षापूर्वी त्यांनी सुमारे हेक्टरी १ लाख घनपूट पाणी वापरून ६ हजार झाडे वाढविली. या झाडामध्ये मोठया प्रमाणात फळझाडे असल्याने लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्यामुळे लोकांचे स्थलांतराचे प्रमाण एकदम घटले. उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या त्यांच्या यशस्वी प्रयत्नामुळे त्यांना पाणी पंचायतीचे प्रणेते असे म्हणतात.

**४) बिंदेश्वरी पाठक यांची पर्यावरण चळवळ :** यांनी पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी १९७० साली सुलभ सौचालय संस्थेची स्थापना केली. त्यांचे कार्य बिहारपासून ते पश्चिम बंगालपर्यंत पसरलेले आहे. त्यांनी सफाईच्या कामाला वाहून घेतले.

**५) सुनीता नारायण यांची चळवळ :** भारताच्या नामांकीत पर्यावरणतज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे. 'हरित राजनीती' आणि 'अक्षय विकास' या विचारांच्या त्या समर्थक आहेत.वातावरणातल्या प्रदूषणाचा अनिष्ट परिणाम हा महिला, लहान मुले आणि गरीब लोकावर होतो असे त्या मानतात.

**६) विश्वेश्वरच्या यांची चळवळ :** विश्वेश्वरच्या हे स्थापत्य अभियंता होते. त्यांनी भारतातील अनेक धरणे बांधण्यासाठी मदत करून भारत समृध्द बनवण्यासाठी हातभार लावला पण धरणे बांधताना त्यांनी धरणाच्या पाण्याखाली जाणा-या वस्त्यांची निर्मिती केली. त्यांच्या या सामाजिक प्र्यावरणपूरककार्याबद्दल भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

**७) मेधा पाटकर यांची पर्यावरण चळवळ :** नर्मदा नदीवर गुजरात-मध्यप्रदेश-महाराष्ट्र राज्याच्या पाणी समस्येवर उपाय म्हणून सरदार सरोवर हे धरण बांधण्याचे ठरविले.परंतु अगोदर ठरविलेली उंची वाढवण्याचे गुजरात सरकारने ठरविले. परिणामी जमिनी, जंगले व आदिवासी लोकांचे जीवन धोक्यात आले. धरण विस्थापितांच्या पुर्नवसनासाठी व मोठया धरणामुळे नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाचा होणारा -हास टाळण्यासाठी अनेक वर्ष नर्मदा बचाव ही पर्यावरण चळवळ चालवत आहेत.

**८) अरूण देशपांडे यांची पर्यावरण संवर्धन चळवळ :** शहराकडून शिवाराकडे घेवून जाणारी एक अभिनव अशी विचारधारा आहे. केवळ ५ टक्के खर्चात आधुनिक सोयी सुविधांनी युक्त अशी प्र्यावरणपूरक विज्ञानग्राम नावाची वसाहत वसवली. नागरिक - ग्रामीण जीवनाचा अनोखा संगम विज्ञानग्राममध्ये केलेला दिसून येतो. अशाप्रकारे त्यांनी प्र्यावरणाच्या संगोपनाचे काम केलेले आहे.

**९) राळेगणसिध्दीचे आण्णा हजारे यांची पर्यावरण संवर्धन चळवळ :** राळेगणसिध्दी या गावचे आण्णा हजारे या समाज सेवकाने स्वतः वृक्षारोपण करून अगदी कावडीने त्यांना पाणी देवून 'हरितक्रांती' घडवून आणली.टेकडीवरून पावसाने ओघळणारे पाणी साठविण्याची संकल्पना प्रत्यक्षात एक चळवळ म्हणून राबविली.आण्णा हजारे यांनी श्रमदानाचे महत्त्व गावक-यांना पटवून देवून पर्यावरण चळवळ राबवली.

**१०) राजेंद्रसिंह राणा यांची जल चळवळ :** राजेंद्रसिंह यांनी गेली काही दशके पाण्याची चळवळ ठेवत ठेवली आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राजेंद्रसिंह यांनी जी चळवळ चालू केली त्यातील 'जौहड' ही पावसाने पाणी साठवून ठेवण्यासाठी उभारण्यात येणा-या छोटया तलावांची चळवळ विशेषत्वाने नजरेत भरणारी ठरली.२० वर्षातनऊ हजार तलाव तयार करून त्यांनी राजस्थानमधील अनेक पाणी टंचाईग्रस्त असणा-या गावची पाण्याची समस्या सोडवली आहे.तसेच त्यांच्या प्रयत्नाने गंगेला मिळणा-या ११५ उपनद्यांपैकी ७ नद्यांचे पुर्नजीवन करण्यात यश आले. त्यांच्या या कार्याची दखल घेवून पाण्याच्या क्षेत्रातील नोबल पारितोषिक म्हणून ओळखला जाणा-या 'स्टॉकहोम वॉटर प्राईज' साठी त्यांची निवड झाली. तसेच त्यांच्या या जल चळवळीवरून त्यांना 'जलपुरूष' यानावाने ओळखले जाते.

**संस्थात्मक पर्यावरण चळवळ**

**१) पश्चिम घाट बजाव योजना :** पश्चिम महाराष्ट्र काही लोकांनी एकत्र येवून सहयाद्रीच्या पश्चिम उताराकडच्या जंगलाचे संरक्षण व संवर्धन करावयाचे ठरविले व त्या पध्दतीने ही चळवळ चालवली. त्यामुळे ही एक सामाजिक चळवळ समजली जाते.

**२) महाराष्ट्रातील सामाजिक वनीकरण :** महाराष्ट्र सरकारने व्यक्तीगत व सहकारी पातळीवर सामाजिक वनीकरणाची चळवळ राबवली आहे. लोकांना आर्थिक मदत देवून वनीकरण करून घेणे, कमी पर्जन्यप्रदेशात कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळविणे, जमिनीतील जल पातळी संतुलित राहणे, वातावरण थंड राहावे अशा पर्यावरणीय बहुउद्देशाने ही चळवळ अस्विवात आली.

**निष्कर्ष**

१) पर्यावरणविषयक चळवळीतील व्यक्तीगत पातळीवरील सुंदरलाल बहुगुणा यांचे 'चिपको आंदोलन', के.सी.श्रॉफ, विलासराव साळुंखे यांची पर्यावरणविषयक चळवळ, बिंदेश्वरी पाठक यांचे पर्यावरणविषयक काम, सुनीता नारायण यांचे 'हरित राजनीती' आणि 'अक्षय विकास', मेधा पाटकरांचे 'नर्मदा बचाव' आंदोलन, अरूण देशपांडे यांचे विज्ञानग्राम, आण्णा हजारे यांची राळेगणसिध्दीतील पाण्याची क्रांती आणि राजेंद्रसिंह राणा यांच्या 'जोहड' या पाण्याच्या चळवळीचा अभ्यास केला.

२) पश्चिम घाट बचाव योजना व महाराष्ट्रातील सामाजिक वनीकरण यांचा अभ्यास केला.

**स्मारोप :** व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या अती गरजेपोटी वैश्वीक नैसर्गिक संपत्तीचे होणारे नुकसान टाळणे हे गरजचे आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण जबाबदार सहभागातून आणि मैत्रीपूर्ण व्यवहारातून टिकवले पाहिजे. म्हणून व्यक्तीगत वा संस्थात्मक किंवा गटात्मक पर्यावरण संवर्धन चळवळी या भविष्याच्यादृष्टीने आशादायक आहेत.

**संदर्भ**

१. अहिराव, सिरसीकर, आलिझा पेणसे, परचूरे, पाटील रा.गो., चौधरी, पर्यावरणशास्त्र, अहिराव प्रकाशन १९८८
२. आलिझा, वराट, धाकटे, भोस, पर्यावरण विज्ञान निराली प्रकाशन १९९२
३. पाटील जयश्री पर्यावरण विज्ञान १९८७
४. पर्यावरण भूगोल डॉ.विठ्ठल घारापूरे

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रभक्ती गीतांचे असणारे योगदान

**कु. श्रध्दा तुकाराम भालेकर**
बी.ए. भाग - ३
इतिहास विभाग म.ह.शिंदे महाविद्यालय तिसंगी

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये अनेक घटकांचे योगदान आहे. भारताला एक स्वातंत्र्य राट्र म्हणुन जगामध्ये जो मानसन्मान आहे त्यापाठीमागे अनेक समाजसुधारकांचे, क्रांतीकारकांचे, विचारवंताचे देशभक्तांचे प्रचंड योगदान आहे. पण याव्यतिरिक्त भारतीय स्वातंत्र्य आंदोलन काळात देशात निर्माण झालेल्या अनेक विचारांचे घोषवाक्यांचे तसेच देशभक्तीपर गीतांचे सुध्दा फार मोठे योगदान असल्याचे दिसून येते.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात देशाच्या विविध भागात विविध पध्दतीची राष्ट्रभक्ती जागृत करणा-या अनेक देशभक्तीपर गीतांची निर्मिती झाली.ज्या देशीभक्तीपर गीतांच्या माध्यमातून देशातील विविध प्रदेश, प्रांत, विभाग एकत्र आले. त्यांच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण होवून राष्ट्र ही संकल्पना रुजण्यास सुरवात झाली. तसेच लोकांच्यातील जातीयतेची, विषमतेची दरी कमी होवून देशातील प्रत्येक माणूस देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातुन एकमेकांशी जोडला गेला. व त्यांच्यात धार्मिक सहिष्णूता निर्माण झाली. व देशासाठी सर्वस्व त्याग देण्याची मनोवृत्ती तयार झाली. या सर्वापाठीमागील या काळात निर्माण झालेल्या राष्ट्रभक्तीपर गीतांचे फार मोठे योगदान आहे.

आज १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी या दिवशी आपण अभिमानाने ही राष्ट्रगीत ऐकतो इतरवेळी मात्र आपणास त्यांची आठवण सुध्दा होत नाही. पण एकेकाळी याच गीतांनी स्वातंत्र्य आंदोलनाची पार्श्वभूमी तयार केली होती.याच गीतांनी तरुण-तरुणींनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात स्वतःला झोकून देण्याची प्रेरणा दिली होती. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधामध्ये मी भारतीय स्वातंत्र्य आंदोलन काळात ज्या गीतांनी स्वातंत्र्याची पार्श्वभूमी तयार करण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडली अशा काही मोजक्याच राष्ट्रभक्ती गीतांचे असणारे महत्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१. **वंदे मातरम् - बंकीम चंद्र चट्टोपाध्यात** : वंदे मातरम् हे गीत भारतीय स्वातंत्र्य आंदोलन काळात प्रत्येक भारतीयांच्या ओठावर होते. वंदे मातरम हे गीत बंकीम चंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७० मध्ये संस्कृत व बंगाली भाषेत लिहीले.जे त्यांनी आनंदमठ नावाच्या कादंबरीमध्ये १८८१ मध्ये सामाविष्ठ केले गेले. वंदे मातरम् हे पहिल्यांदा १८९६ मध्ये कलकत्ता येथील अधिवेशनात गायीले गेले. हे गीत या काळात भारतीय स्वातंत्र्याचे स्फुर्तीस्थान झाले होते. देशातील प्रत्येक क्रांतीकारक, विद्यार्थी, तरुण-तरुणी यांना या गीताने प्रेरणा दिली. ब्रिटीश सत्तेच्या विरोधात निघणा-या प्रत्येक मोर्चाच्या वेळी हे गीत गात लोक सहभागी होत असत. या गीतांनी भारतीय लोकांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळत. म्हणून ब्रिटीशांनी वंदे मातरम् म्हणण्यावर बंदी आणली होती. वंदे मातरम् हे गीत म्हणणा-या प्रत्येकाला ब्रिटीशांनी तुरुंगात टाकले. व त्यांचा छळ केला. हे गीत म्हणजे त्या काळातील भारतीयांसाठी स्वातंत्र्याचे स्फुर्तीगीत होत. वंदे मातरम् या राष्ट्रगीतानी सपुर्ण भारत जोडला गेला. त्याच्यात एकतेची भावना निर्माण झाली. देश एकसंघ वनविण्यामध्ये व लोकांना एकत्र बांधुन ठेवण्यामध्ये या राष्ट्रगीतांचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. पुढे स्वातंत्र्यानंतर हेच गीत राष्ट्रगीत बनले.

२. **सारे जहाँ से अच्छा - मोहम्मद इकबाल** : भारतीय स्वातंत्र्य आंदोलनकाळात ज्या अनेक गीतांनी भारतीयांच्या स्वातंत्र्याची प्रेरणा मिळत होती. त्यामध्ये ‘सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा’ या राष्ट्रभक्ती गीताचे विशेष महत्व आहे. हेगीत या काळात भारतीयांचे राष्ट्रगीत बनले होते. या गीताचे कवी मोहम्मद इकबाल यांनी १६०४ मध्ये हे गीत प्रथमतः उर्दु भाषेत प्रकाशित केले होते. पण पहिल्यांदा सार्वजनिकरित्या ते लाहोर (सध्या पाकिस्तान) येथे गव्हरमेंट कॉलेजमध्ये गायिले गेले. त्यावेळी हिंदूस्ता याचा अर्थ भारत, पाकिस्तान आणि बांग्लादेश असा एकत्र मिळुन होता. पुढे इ.स.१९२४ मध्ये हे गीत बंग - ई - दरा या उर्दु पुस्तकात प्रकाशित झाले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत हे गीत अत्यंत लोकप्रिय झाले होते. या गीताने भारतीयांच्या मधील भेदाभेद, जातियता, धार्मिक विषमता नष्ट करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली होती.

मजहब नही सीखाता आपस में बैर रखना ।
हिंदी है हम हिंदोस्ता हमारा ।।

वरील गीतातील ओळीमधून भारतीय लोकांच्यात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यामध्ये या गीताचा वाटा किती मोठा होता हे लक्षात येते.त्यामुळे आपण सर्व भारतीय एक आहोत ही भावना स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभागी होण्यासाठी प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देत होती. आणि म्हणूनच या गीतांचे भारतीय स्वातंत्र्याची पार्श्वभूमी तयार करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली असे आपणास म्हणता येईल.

३. **जण – गण – मन – रविद्रनाथ टागोर :** स्वातंत्र्य भारताचे राष्ट्रगीत म्हणून ज्या गीतास मान मिळाला ते गीत म्हणजे जण – गण – मन होय. अखंड भारताची संकल्पना या गीतातून रविंद्रनाथ टागोर यांनी मांडली. इ.स. १९११ मध्ये 'रविंद्रनाथ टागोर' यांनी या गीताची रचना संस्कृतमध्ये केली होती. पण हे गीत सर्वात प्रथम कॉंग्रेसच्या २६ कलकत्ता येथील राष्ट्रीय अधिवेशनात सादर केले गेले. तर इ.स १९४३ मध्ये या गीतास कॅप्टन रामसिंग यांनी गीतबध्द केले. तेव्हापासून भारतीय स्वातंत्र्यचळवळीत या गीतांनी लोकांच्यात राष्ट्रभक्ती निर्माण करण्यात महत्वाची भूमिका पार पाडली.

ब्रिटिश सत्तेच्या विरोधात निघणा-या प्रत्येक मोर्चे, आंदोलन, चळवळीत हे गीत भारतीयांना प्रेरणा व स्फुर्ती देत असे. स्वातंत्र्याच्या या अंतिम टप्यात या राष्ट्रगीतांनी भारतीयांच्यातील राष्ट्रभक्ती जागृत करुन सर्वांना एकत्र बांधून ठेवून त्याच्यात देशाबद्दल एकसंघाची भावना निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावली. त्यामुळे त्यांचे विशेष महत्व आहे.

भारतीय स्वातंत्र्यानंतर म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंडित जवाहरलाल नेहरु यांनी लाल किल्यावरुन हे राष्ट्रगीत गायीले गेले.तर पुढे २४ जानेवारी १९५० मध्ये म्हणजे संविधान लागू होणाच्या दोन दिवस आधी त्यास सन्मानाने स्वतंत्र्य भारताचे राष्ट्रगीत म्हणून मान्यता देण्यात आली.

**निष्कर्ष –**

१. भारतीय स्वातंत्र्या चळवळीची पार्श्वभूमी तयार करण्यामध्ये या राष्ट्रगीतांचे महत्वपुर्ण योगदान आहे
२. भारतीय स्वातंत्र्या चळवळीत या राष्ट्रगीतांनी भारतीय लोकांच्यात राष्ट्रीयतेची, समतेची, धार्मिक सहिष्णूतेची भावना निर्माण केली.
३. भारतीय स्वातंत्र्या चळवळीत या गीतांनी क्रांतीकारकांना, विद्यार्थ्यांना,तरुण-तरुणींनी प्रेरणा दिली ज्यामुळे ते स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय झाले.

**सदर्भ –**

1. Central Chinnya mission trust, Awakening Indian to India, Sandeepany Sadhanalaya, 2003 P.G. 313.
2. Ibid – P.G. 314.
3. Ministary of Information & Broad Casting, India 2017, Addotopma; Dirctory General publication P. G. 28
4. Ibid – P 29
5. www. Wikipedia.com

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# शेतकरी बाजार – शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाचा एक चिकित्सक अभ्यास

**डॉ.प्रा. बी. डी. इंगवले**
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी

**प्रस्तावना :**

कोणत्याही उद्योग व्यवसायाचे यश त्याच्या उत्पादनाच्या कार्यक्षम बाजारपेठेवर अवलंबून असते. औद्योगिक उत्पादनाप्रमाणेच शेतमाल उत्पादनासाठी सुध्दा सुसंघटित व कार्यक्षम बाजारपेठेची आवश्यकता असते. पूर्वी भारतीय शेतकरी केवळ उदर निर्वाहासाठी शेती करत होता. शेती उत्पादनात वाढावा नसल्याने बाजारपेठेचा प्रश्न नव्हता आणि बाजारपेठेसाठी उत्पादन हा दृष्टीकोनही शेतकऱ्यांनी स्विकारलेला नव्हता. परंतु ब्रिटिश राजवटीत भारतीय शेतीचे व्यापारीकरण घडून आले. व्यापारी पिके घेवून चांगले उत्पन्न प्राप्त करता येते हा दृष्टिकोन स्वीकारून हळूहळू बाजारपेठेसाठी उत्पादन घेतले जाऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने शेतीच्या विकासासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले. शेतीचे उत्पादन आणि उत्पादकता या दोहोंत वाढ झाली. १९६६-६७ मध्ये हरित क्रांती घडून आली. वाढत्या उत्पादनामुळे हा शेतमाल बाजारात नेऊन विकण्याची गरज निर्माण झाली. औद्योगिकरण, शहरीकरण, पायाभूत सुविधातील वाढ, संख्यात्मक पत पुरवठा, शेती मालाच्या निर्यातीचे महत्व इ. कारणामुळे शेती उत्पादनात वाढावा निर्माण होत गेला. त्यामुळे शेती मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठांची गरज निर्माण होत गेली.

उत्पादक आणि ग्राहक यांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये व्यापार होण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणाऱ्या यंत्रणेला बाजारपेठ असे म्हणता येईल. शेती मालाच्या विक्री व्यवस्थेत शेतकरी, ग्राहक आणि या दोहोंना जोडणारे व्यापारी, दलाल, मध्यस्थ, अडते आदींचाही समावेश होतो.

**समस्या विधान :** प्रस्तुत संशोधनाचा विषय 'शेतकरी बाजारामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळत असून भारत देश आर्थिकदृष्ट्या सक्षम बनेल.'

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. उत्पादक ते ग्राहक या साखळी मधील मध्यस्थांची संख्या कमी रणे.
२. उत्पादन काढणीनंतर हाताळणी, वाहतुक व साठवणुकीमध्ये होणारे फळे व भाजीपाल्याचे नुकसान कमी करणे.
३. ग्राहकास योग्य दरामध्ये उच्च प्रतीचा भाजीपाला व ताजी फळे उपलब्ध करून देणे.
४. उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

**लाभार्थी :** शेतकरी, नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, उत्पादकांच्या सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, कृषी पणन सहकारी संस्था इत्यादींना शेतकरी बाजारपेठेचे लाभ प्राप्त होतील.

**संशोधन पध्दती व माहिती संकलन :** प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम माहितीचा वापर केला आहे. संशोधन पध्दती ही वर्णनात्मक आहे. विविध शासकीय मासिकातील विविध लेखांचा आढावा घेवून स्वत: संशोधकाने निष्कर्ष काढला आहे.

**शेतकरी बाजार संकल्पना :** शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कारण भारत स्वतंत्र होताना जवळपास ८०% लोकसंख्या शेतीवर आधारित होती. राष्ट्रीय सकल उत्पन्नात शेतीचा वाटा ५७% दरम्यान होता. सातत्याने औद्योगिक व सेवा क्षेत्र विकासावर भर दिल्याने ही क्षेत्रे चांगली विकसित झाली. मात्र शेतीवर आधारित लोकसंख्येचे प्रमाण पाहिजे त्या प्रमाणात घटले नाही. आजही देशातील जवळपास ६८% तर राज्यातील ५५% लोकसंख्या शेतीवर आधारित आहे.मात्र सकल राष्ट्रीय उत्पन्नातील तिचा वाटा आता १७% तर राज्यातील वाटा ११% ते १२% वर आला आहे.

जागतिकीकरण, हवामान बदल, घटती जमीन धारणा, अनियिमत पाऊस, तापमानातील लक्षणीय वाढ व घट, वेगाचे वारे, कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव, मजुरांची वाणवा, वाढता रासायनिक खत आणि कीड नाशकांचा वापर, बाजारभावातील चढ-उतार इत्यादी अनेक समस्यांना सामोरे जाताना शेतकरी अगदी मेटाकुटीला आला आहे. तरूण शेतकरी शेतीकडे वळू इच्छित नाही. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे. अशा परिस्थितीत त्याला उभारी देण्यासाठी शासन ही पिक विमा सवलतीच्या दरात पिक कर्ज, बियाणे खतावर अनुदान, कृषि अवजारे, संरक्षित शेती, विहीर, गांडुळ खत, सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रियेवर अनुदान,

किमान आधारभूत किंमतीवर शेत मालाची खरेदी नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना मदत, पिक कर्ज माफी, जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण इत्यादी सारख्या विविध बाबी राबवत आहे.

शेतकऱ्याने अत्यंत कष्टपूर्वक पिकवलेल्या शेत मालाची विक्री दलालांच्या हातात असल्याने शेतकऱ्यास चांगला भाव मिळत नाही. बाजारात ग्राहक मोजत असलेल्या किंमतीच्या धान्याच्या बाबतीत ३५% ते ४०% वर भाजीपाल्याच्या बाबतीत १५% ते २०% पैसे उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात पडतात. ही दलालाची साखळी जोडण्यासाठी शासनाने उत्पादक ते ग्राहक भेट विक्री संधी शेतकऱ्यास शेतकरी बाजारच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ ही योजना दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ पासून श्री संत सावता माळी यांचे नावाने राबवत आहे. यामध्ये अनेक शेतकरी गट/समूळ/उत्पादक कंपन्या ह्या सहभागी झाल्या आहेत. विविध शहरामध्ये ही योजना प्रभावीरित्या राबविली जात आहे. राज्यात आता साधारणत: १३५ ठिकाणी शेतकरी बाजार भारतात यामध्ये मुंबई, पुणे येथे १०० हून अधिक ठिकाणी, तर नाशिक, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर सारख्या विविध शहरामध्ये हे बाजार भरवले जातात.

कृषी पणन मंडळाने शेतकरी बाजार ही संकल्पना पुणे शहरात राबविण्याचा निर्णय घेतला आणि दिनांक २९ जून, २०१४ रोजी गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे राज्यातील पहिला शेतकरी बाजार सुरू केला. पुण्यात भोसलेनगर येथे दर शुक्रवारी संध्याकाळी ४ ते ७ दरम्यान अशा प्रकारचा शेतकरी बाजार भरतो. या बाजाराला नुकतीच भेट दिली असता, शेतकरी व ग्राहक यांचा खूप उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. येथे जवळपास ३५ ते ४० शेतकरी बाजार लावले होते. ग्राहकांची खूप गर्दी होती. शेतकऱ्यांनी वांगी, बटाटा, टोमॅटो, कारली, दुधी, लाल भोपळा, ढोबळी मिरची, हिरीव मिरची, पालक, शेपू, करडई, मेथी, कोबी, फ्लॉवर, वाटाणा, पावटा, राजगिरा, घासोळे, कोथिंबीर, कांदापात, चिकू, केळी, पपया, संत्री, गूळ, काकवी, ज्वारी, बाजरी, डाळी, नाचणी, मटकी, नारळ, गावठी अंडी, दुध, दही, पापड, कुरड्या इत्यादी अनेक शेती उत्पादने विक्रीस आणली होती. यापैकी अनेक उत्पादने ही सेंद्रिय उत्पादने होती. जी आरोग्याचे दृष्टीने खूप चांगली आहेत. ग्राहक देखिल खुशीने जास्त भाव देऊन ही उत्पादने शेतकऱ्यांकडून खरेदी करताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.

आज ६०० शेतकरी बाजारांच्या आयोजनांसाठी स्वामी समर्थ शेतकरी बचत गट, राधाबाई शेतकरी महिला बचत गट व शाश्वत कृषि विकास गट या गटांना पणन मंडळाने परवानगी दिलेली आहे. बाजाराच्या जागा आवश्यक त्या सुविधांसह पणन मंडळास उपलब्ध करून देण्याबाबत महानगरपालिका, पुणे व पिंपरी-चिंचवड यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. याच धर्तीवर नागपूर शहरात-२ तर मुंबई-१ असे एकूण राज्यात २६ शेतकरी बाजार सुरू आहेत. याशिवाय नाशिक, जळगांव, बीड, अहमदनगर, कोल्हापूर व अमरावती येथे शेतकरी बाजार सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. शेतकरी बाजारात शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना टेन्ट, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, क्रेटस् खरेदीवर ५०% अनुदान देण्याचा, शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी येणाऱ्या खर्चास आणि शेतकरी बाजार सुरू करण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी, जाहिराती इ. साठी प्रति बाजार रू.५०,०००/- खर्चास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे.

राज्यात पहिल्या टप्प्यात सुमारे १०० शेतकरी बाजार उभे करण्यात येणार आहेत. शेतकरी बाजार सुरू करताना प्रथमत: त्या भागाची पाहणी करण्यात येते. त्या भागामध्ये सद्यस्थितीत असलेला भाजीपाल्याचा व्यवसाय कशा पध्दतीने चालतो. परिसरात राहणाऱ्या लोकांना कोणत्या वारी आणि कोणत्या वेळी बाजार सोयीचा ठरू शकतो इ. बाबी विचारात घेवून योग्य जागेची निवड करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जागा निवडीनंतर त्यासाठीच्या आवश्यक परवानग्या तसेच बाजाराचा वार आणि वेळ निश्चित झाल्यानंतर त्या परिसरातील लोकांशी व्हॉटस्-अप, एस.एम.एस., जाहिराती आणि वृत्तपत्रांमध्ये माहिती पत्रके टाकून लोकांपर्यंत शेतकरी बाजाराबाबतची माहिती पोहचविण्यात येते. बाजाराच्या उद्घाटनाच्या दिवशी विविध वृत्तपत्रामध्ये बाजाराबाबतच्या बातम्या छापून येतील यासाठी आवश्यक कार्यवाही कृषी पणन मंडळातर्फे करण्यात येते.

शेतकरी बाजारामध्ये बाजारभावांबाबत कोणतेही नियंत्रण कृषि पणन मंडळातर्फे ठेवण्यात येत नाही. बाजारामध्ये चांगल्या दर्जाचा भाजीपाला आणि फळे ग्राहकांना उपलब्ध करून देणे, कृषि माल उच्च दर्जाचा असावा. जास्त पुढे गेलेला, किडका, सडलेला, रोगट, फुटलेला म्हणजेच जो माल ग्राहक खरेदी करणार नाहीत, अशा प्रकारच्या मालाची शेतकरी बाजारामध्ये आवक होऊ नये यासाठी आवश्यक मार्गदर्शक सुचना शेतकऱ्यांना वेळोवेळी देण्यात येतात.

शेतकरी बाजारामध्ये येणाऱ्या अंदाजे ७५ शेतकऱ्यांनी प्रतवारी व संकलन केंद्र उभारणी, शेतमाल शेतापासून थेट शेतकरी बाजारापर्यंत आणण्यासाठी वाहन उपलब्ध असणे, बास्केट, वजनकाटे, टेबल आणि विक्रीसाठी क्रेटस् असणे आवश्यक आहे. योग्य

वजन, हाताळणीत कमी नुकसान आणि चांगल्या दर्जाचा भाजीपाला ग्राहकांना उपलब्ध होईल. शेतकरी बाजारात काही मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी आणि थेट विक्रीसाठी सहभागी होणाऱ्या शेतकी कंपन्यांना खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते.

**शेतकरी बाजारासाठी प्रत्येक शेतकऱ्यास –**

| अ.नं. | तपशील | अंदाजे रक्कम | अनुदान (५०%) |
|---|---|---|---|
| १. | टेन्ट | ७०००.०० | ३५००.०० |
| २. | इलेक्ट्रॉनिक वजनकाटा | ५०००.०० | २५००.०० |
| ३. | केट्स | १२५००.०० | ६२५०.०० |
| | **एकूण** | **२४५००.००** | **१२२५०.००** |

शेतकरी बाजारात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यास सुविधांसाठी येणाऱ्या खर्चाच्या ५०% म्हणजेच सुमारे रू.१२,२५०/- प्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांचे प्रशिक्षण** : शेतकरी बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार चालविण्याचे तसेच बाजारात येणाऱ्या ग्राहकांबरोबर कसे वागावे, चांगले संबंध, शेतमाल विक्री, शेतमाल माहिती, वजनाची हमी, भावाबाबत माहिती देण्याकरीता आणि संपूर्ण बाजाराचे आयोजनाबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. सदर प्रशिक्षण विनामूल्य असून शेतकरी बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कृषि पणन मंडळातर्फे करण्यात येतो.

**शेतकरी बाजाराचे शेतकऱ्यांना मिळणारे फायदे :**

१. शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उत्पादक सहकारी संस्था यांच्यामार्फत थेट ग्राहकांना शेतमाल विक्रीची संधी.
२. कृषीमाल शेतातून थेट बाजारात येत असल्याकारणाने काढणीनंतरच्या होणाऱ्या नुकसानीत मोठी घट.
३. रोख स्वरूपात १००% मालाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या हातात.
४. आपल्या मालाचा बाजारभाव ठरविण्याचा शेतकऱ्याला अधिकार.
५. अत्यंत कमी शेतमाल विक्री खर्च.
६. ग्राहक आणि शेतकरी यांच्यात सामंजस्य निर्माण होते.
७. ग्राहकांच्या मागणीनुसार मालाचा पुरवठा होतो.
८. थेट विक्रीमुळे मध्यस्थांना मिळणारी रक्कम थेट शेतकऱ्यांना प्राप्त होते.
९. बाजारात विक्री होणाऱ्या मालाचा अंदाज आल्याने भाजीपाला शिल्लक राहात नाही.
१०. शंभर टक्के रोखीने व्यवहार.
११. कोणत्याही प्रकारच्या परवान्याची आवश्यकता नाही.
१२. ग्रामीण भागातील युवकांना चांगल्या अर्थार्जनाचा रोजगार उपलब्ध.
१३. शेतकरी बाजाराची वेळ व ठिकाणे निश्चित असल्याकारणाने शेतमाल काढणीचे आणि विक्रीचे नियोजन करणे शेतकऱ्यांना शक्य होते.

**शेतकरी बाजाराचे ग्राहकांना फायदे :**

१. ताजा स्वच्छ शेतमाल ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून उपलब्ध.
२. शेतकरी विक्री करीत असल्याकारणाने मालाच्या प्रतीबाबत खात्री.
३. थेट शेतकऱ्यांशी संवाद होत असल्याकारणाने ग्राहक आपली गरज शेतकऱ्यांना सांगू शकतात.
४. घराजवळ भाजीपाला बाजारपेठ उपलब्ध.
५. थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल विक्रीचे ग्राहकांना समाधान.
६. भाजीपाला खरेदीचे आठवड्याचे नियोजन करता येते.
७. एकाच छताखाली भाजीपाला फळे, धान्य, कडधान्य, दुध, डाळी, प्रक्रिया उत्पादने, ग्रामीण उत्पादने ग्राहकांना उपलब्ध.
८. शेतमालाचे वजन, इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यामार्फत होत असल्याने ग्राहकांना वजनाबाबत विश्वास.
९. पुणे शहरामध्ये प्रत्येक वारी वेगवेगळ्या ठिकाणी भाजीपाला विक्रीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**निष्कर्ष** : कृषि बाजारपेठ संदर्भात महाराष्ट्र शासनाने शेतकरी बाजार ही क्रांतीकारक योजना आहे. शेतकऱ्यांनी योग्य नियोजन केल्यास या शेतकरी बाजारातून शेतीचा शाश्वत विकास घडून येईल. या शेतकरी बाजारातून पुढील महत्वाचे निष्कर्ष दिसून येतात.

१. शेतकऱ्यांना शेतकरी बाजारातून नियमित उत्पन्न मिळत असल्यामुळे सावकारी कर्जाची गरज भासणार नाही.

२. शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्यास निश्चित मदत होईल.
३. कृषि मुल्य आयोगाच्या मदतीची फारशी गरज असणार नाही. शेतकरी बाजारामुळे उत्पादक शेतकरी आणि उपभोक्ता ग्राहक यांच्यामध्ये हित साधले जाईल. मध्यस्थ, दलाल, आडते यांचे कायमचे निर्मुलन होईल.शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्रेय वाढण्यात वाढ होईल.
४. अर्थव्यवस्थेतील बेकारी कमी होण्यास शेतकरी बाजारामुळे मदत होईल. शेतकरी स्वत: विक्रेता होईल.त्यामुळे तो बेकार राहणार नाही.
५. शासनाला शेतमाल किंमत निश्चित संदर्भात हस्तक्षेप करावा लागणार नाही. कारण शेतकरी बाजारात शेतकरी उत्पादन खर्चावर आधारित शेतमाल किंमत आकारण्यात येईल. सर्व उत्पन्न शेतकऱ्यांना प्राप्त होईल.
६. शेतकऱ्यांच्या नावाखाली चाललेले राजकीय अड्डे, शेतकरी बाजारामुळे उद्ध्वस्त होईल. राजकीय वादाला आळा बसेल.
७. शेतकरी बाजारपेठेमुळे शेतकऱ्याला कृषि अर्थशास्त्राचे ज्ञान होईल. बाजारपेठेची मागणी विचारात घेऊन उत्पादनाचे नियोजन केले जाईल.
८. तरूण शेतकऱ्यांना स्वयंम रोजगार प्राप्त होईल.
९. शेतकरी बाजारपेठेमुळे शासनाला देशांतर्गत उत्पादन व बाजार व्यवस्थेचा विचार करून आयात-निर्यात विषयक धोरण राबविणे योग्य ठरले. त्यामुळे खुल्या धोरणाचा भारतीय शेतीवर वाईट परिणाम होणार नाही.
१०. शेतकरी बाजारपेठेमुळे कृषि पर्यटनाला चालना मिळेल. लोकांना निसर्गात राहण्याचा आस्वाद घेता येईल. त्यातून शेती पूरक रोजगार निर्मिती होईल.
११. शेतकरी बाजारामुळे शासनाला शेती क्षेत्र संक्रमणावस्थेत कृषि विकासाच्या दृष्टीने दीर्घकालीन विषय तंत्रज्ञान, जमीन व आदान वितरण व्यवस्था या सर्व घटकांचा विचार करणारे धोरण राबविण्यात यश मिळेल.
१२. शेतकरी बाजारामुळे त्या त्या स्थानिक भागात कृषि प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल. त्यातून स्त्रियांना मोठ्या प्रमाणात रोजगार प्राप्त होईल.
१३. ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी दूर करण्याच्या दृष्टीने शेतकरी बाजार ही योजना अतिशय महत्वपूर्ण योजना आहे.

अशाप्रकारे भारतीय कृषि क्षेत्रात शेतकरी बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांची आर्थिक क्रांती होईल. वाढत जाणाऱ्या शहरांचा ताण कमी होईल. देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल.देश सतत विकासाच्या नव-नवीन अवस्थांमध्ये बांधला जाईल आणि शेतकरी हा या अर्थव्यवस्थेतील बळीराजा होईल. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासाची चक्रे या बळीराजाच्या हातात राहतील आणि या भारतासारख्या सुस्थित कृषिप्रधान देशाचा चिरंतन आर्थिक विकास फारच झपाट्याने होईल हे निश्चितच आहे.

**सारांश :**

शेतकरी बाजार या क्रांतीकारक योजनेमुळे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. उदा. खरेदी - विक्री मधील समस्या, शासनाचे कर्ज धोरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती बेकारी, शेती प्रश्नावरून होणारे राजकीय कलह, वाढणारी शहरे, घटते शेती उत्पन्न, मध्यस्थ, दलाल, अडते इ. यामधील सर्व समस्या दूर होण्यास मदत होईल आणि शेतकरी बाजारातून देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढेल, शेतकरी स्वयंपूर्ण, आर्थिकदृष्ट्या सक्षम बनेल, ग्राहकांचे हित साधले जाईल आणि जागतिकीकरणात भारताची अर्थव्यवस्था फाच बळकट होईल.

**संदर्भ सूची :**

१.विनयकुमार आवटे (जानेवारी, २०१८) ''शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविणारा शेतकरी बाजार''मासिक कृषि पणन, मित्र प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, कृषि पणन मंडळ, पुणे, पान नं.४२ ते ४३.
२.डॉ. भास्कर ना. पाटील (फेब्रुवारी, २०१६) '' शेतकरी बाजार - शेतकऱ्यांना थेट शेतमाल विक्रीची संधी'' मासिक कृषि पणन, मित्र प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, कृषि पणन मंडळ, पुणे, पान नं.५ ते ९.
३.ना.चंद्रकांत दादा पाटील (जून, २०१६)''शेतमाल विक्रीसाठी शेतकऱ्यांना विविध पर्याय हेच लक्ष'' मासिक कृषि पणन, मित्र प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, कृषि पणन मंडळ, पुणे, पान नं.५ ते ८.
४.डॉ. वसुधा पुरोहित (२०१६) 'कृषि अर्थशास्त्र' श्री. शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक प्रकाशन,औरंगाबाद.

# गट शेती–शाश्वत विकासाचा मार्ग

**प्रा. ए. बी. कांबळे**
असोसिएट प्रोफेसर
स.ब.खाडे महाविद्यालय,कोपार्डे

**प्रस्तावना :–**

भारत हा कृषीप्रधान देश असून अद्यापही देशातील जवळजवळ 55 टक्के ते 60 टक्के इतकी लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. विकासाबरोबर देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा हिस्सा कमी होत असला तरी जागतिक अर्थव्यवस्थेशी तुलना करता तो अधिक आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्व कमी होत नाही. शेती विकासासाठी शेतीचे पारंपारिक व मागास स्वरूप बदलून आधुनिक शेती पध्दतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. परंतू शेतजमिनीचे आकारमान लहान, शेतीचे पावसावरील अवलंबित्व, भांडवलाची कमतरता, जलसिंचन सुविधेचा अभाव, विक्री व्यवस्थेचा अभाव, कृषी संशोधन याकडे होणारे दुर्लक्ष, शेतमालाला मिळणारी कमी किंमत यासारख्या समस्यामुळे शेतीच्या उत्पादकतेत व प्रगतीत घट होत आहे. भारतामध्ये शेतीची उत्पादकता वाढून शेतीचा विकास होणेसाठी गट शेतीचा अवलंब केला जात आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारतातील गट शेतीची पार्श्वभूमी, गटशेतीचे फायदे व तोटे सरकारने योजलेले धोरण/उपाय यांचा आढावा घेणेचा प्रयत्न केलेला आहे.

**गट शेतीची उद्दिष्टे :–**

1. गट शेतीची पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. गट शेतीचे फायदे व तोटे अभ्यासणे.
3. गट शेतीसाठी धोरणात्मक उपाय सुचविणे.

**अभ्यास पध्दती :–** प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करणेत आला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ वृत्तपत्रातील लेख, ॲग्रोवन, दिवाळी अंक, इंटरनेट इ.चा वापर करणेत आला आहे.

**गट शेती म्हणजे काय ?**

''एका गावातील/समुहातील शेतकऱ्यांनी एकत्र येवून शिवारातील संलग्न भौगोलिक क्षेत्रामध्ये सामुहीक शेती करणे, शेती उत्पादन प्रक्रिया व मुल्यवर्धन करणे, एकत्रीत विपणनासाठी सामुहिक स्वरूपाची व्यवस्था करणे आणि या सर्व माध्यमातून आपल्या समुह गटाचा विकास घडवून आणणे म्हणजे गट शेती/ समुह शेती होय.''

या व्याख्येवरून एखादया गावातील/समुहातील लहान शेतकरी /सीमांत शेतकरी एकत्र येवून एक शेती गट स्थापन करतात. या गटात आपली जमीन समाविष्ट करतात. जमिनीत सामुहिकरित्या पिकाचे उत्पादन घेण्यापासून ते त्याची विक्री करेपर्यंतची सर्व प्रकारची कार्य परस्परांच्या मदतीने गटाच्या माध्यमातून पार पाडून शेतीच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ घडून आणतात.

**गट शेतीची पार्श्वभूमी :–** भारतामध्ये लोकसंख्या वाढीमुळे शेतजमिनीचे सातत्याने विभाजन व तुकडीकरण होत असू तीची धारणक्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. सन 2010–11 च्या अहवालानुसार महाराष्ट्रात 1970–71 मध्ये 4.28 हेक्टर इतकी धारण क्षमता होती ती कमी होत जावून 2010–11 मध्ये 1.44 हेक्टर प्रति खातेदार इतकी कमी झाली आहे. काही ठिकाणी तर ती फक्त 11 ते 15 गुंठे इतकी कमी झाली आहे. इतक्या कमी धारण क्षेत्रावर एखादया शेतकऱ्याला शेती करणे फायदेशीर ठरत नाही. शेती क्षेत्राचा आकार वाढविणे आणि शेती साधने एकत्र करून फायदेशीर उत्पन्न घेणे व शेतकऱ्यांचे दारिद्रय कमी करणे यासाठी समुह शेती/गट शेतीचा अवलंब केला जात आहे.

**भारतातील गट शेती :–** भारतामध्ये सहकारी शेतीच्या स्वरूपात गट शेती/समुह शेती अस्तित्वात होती पण यातील उणीवामुळे सहकारी शेती लोप पावली. सध्यस्थितीत भारतामध्ये सामाजिक आणि आर्थिक कारणामुळे शेतकऱ्यांची वैयक्तिक जमीन धारण क्षमता कमी होत गेल्याने शेतीची साधने व यातून निघणारे उत्पादन यांचे संतूलन साधने आणि फायदेशीर उत्पन्न मिळविणे शेतकऱ्यांना अवघड होत आहे. यासाठी गट/समुह शेतीच्या माध्यमातून शेती साधने एकत्र करून आधुनिक पध्दतीने शेती उत्पादन घेणे हा उत्तम पर्याय होवू शकतो. हे इतर देशातील अनुभवावरून लक्षात येते.

भारतात काही राज्यामध्ये यशस्वीपणे गट शेती केली जात आहे तसेच महाराष्ट्र राज्यातील जालना, औरंगाबाद, बीड, लातूर, अमरावती, उस्मानाबाद इ. जिल्हयातील अनेक गावात गट शेती यशस्वी केली आहे. उदा. जालना जिल्हयातील जिराडगाव या खेडयात डॉ.कापसे यांच्या पुढाकाराने केसरी आंबा उत्पादनात गट शेतीचा प्रयोग यशस्वी केला. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात डाळींब, संत्री, मोसंबी, आवळा, सिताफळ या पिकातही गट शेती यशस्वी केली. त्यानंतर डॉ.कापसे व शेती विभागातील तज्ञ अधिकारी यांनी गटातील शेतकऱ्यांना विश्वासात घेवून कापूस, तुर, सोयाबीन, गहू, मोसंबी, डाळींब या पिकांचे उत्पादन घेण्याचा कार्यक्रम आखला. यासाठी गटाच्या माध्यमातून आधुनिक तंत्राचा यंत्राचा वापर केला. सुधारित बि–बियाणे, खते, जंतूनाशके व अवजारांचा वापर केला. जलसिंचनाची (ठिबक सिंचन, स्प्रींकलर) सुविधा केली. पारदर्शक व्यवहार ठेवले, त्यामुळे शेतीची दर एकरी उत्पादकता व उत्पन्नात वाढ झाली. हे पुढील आकडेवारीवरून लक्षात येते.

**दर एकरी उत्पादकता व उत्पन्न**

| अ.क्र. | पिकाचे नाव | गट शेती पुर्वी | | गट शेती नंतर | |
|---|---|---|---|---|---|
| | | दर एकरी उत्पादन (क्विंटल) | दर एकरी उत्पन्न (रूपये) | दर एकरी उत्पादन (क्विंटल) | दर एकरी उत्पन्न (रूपये) |
| 1. | कापूस | 6 ते 10 | 24000 ते 40000 | 25 ते 50 | 100000 ते 120000 |
| 2. | तुर | 6 ते 7 | 21000 ते 24500 | 15 ते 17 | 52500 ते 59000 |
| 3. | सोयाबीन | 7 त 9 | 22400 ते 28800 | 15 ते 18 | 48000 ते 57600 |
| 4 | गहू | 10 ते 15 | 10000 ते 15000 | 25 ते 30 | 25000 ते 30000 |
| 5 | मोसंबी | 4 ते 5 टन | 40000 ते 50000 | 15 ते 18 टन | 150000 ते 180000 |
| 6 | डाळींब | 4 ते 5 टन | 200000 ते 250000 | 15 ते 18 टन | 500000 ते 600000 |

वरील आकडेवारी लक्षात घेता वरील सर्वच पिकांच्या बाबतीत दरएकरी उत्पादकता व उत्पन्नात भरीव वाढ झाल्याचे दिसून येते. यारून गट शेतीच्या माध्यमातून लहान व सीमांत शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होवून त्यांच्या राहणीबाबत वाढ होत आहे. म्हणजे गट शेती ही गरीब शेतकऱ्यांच्या प्रगतीचे /विकासाचे साधन आहे असे म्हणावे लागेल.

### गट शेतीचे फायदे :–

1. गट शेतीमुळे उच्च तंत्राचा व यंत्राचा वापर केल्याने शेती व्यवसाय करणे सोयीचे होते.
2. गट शेतीमुळे उत्पादन व वाहतूक खर्चात बचत होवून फायदा होतो.
3. गट शेतीच्या माध्यमातून शेतमालावर प्रक्रिया करून योग्य किंमत मिळणेस मदत होते.
4. गट शेतीमधून मोठया प्रमाणात भांडवलाची उभारणी करणे शक्य होते.
5. गट शेतीमुळे प्रक्रिया उद्योग व शेतीपुरक जोडधंदे यामुळे रोजगारीत वाढ होते.
6. गट शेतीमुळे शेतीपुरक व्यवसाय करणे शक्य होवून लहान शेतकरी व सीमांत शेतकरी यांच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ होणेस मदत होते.
7. गट शेतीच्या माध्यमातून शेतमालाची विक्री केल्याने योग्य किंमत मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होवून त्यांचे राहणीमान सुधारतो.

### गट शेतीचे दोष :–

1. गट शेतीसाठी आवश्यक संख्येने शेतकरी एकत्र येत नाहीत.
2. गट शेतीसाठी पुरेसे भांडवल उभा करणे शक्य होत नाही.
3. गट शेतीचे योग्य व्यवस्थापन होत नाही.

### गट शेतीसाठी धोरणात्मक उपाय :–

गट शेतीमध्ये असलेल्या काही अडचणीमुळे/उणीवामुळे त्यांच्या विकासावर मर्यादा येते. म्हणून महाराष्ट्र सरकारने राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न 2022 सालापर्यंत दुप्पट करण्याचे धोरण जाहीर केले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी गट शेतीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यासाठी सन 2017–18 व 2018–19 या दोन वित्तीय वर्षात अंमलबजावणी करणेसाठी पथदर्शी योजना आखण्यात आली आहे. या योजनेत पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

1. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अथवा कंपनी नोंदणी अधिनियम 1956 च्या तरतुदी अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून शेतकरी गटाची नोंदणी करणे आवश्यक आहे.
2. दोन वर्षात या योजनेअंतर्गत प्रत्येक गटास जास्तीत जास्त 1 कोटी रूपये अनुदान देण्यात येणार आहे.
3. प्रति वर्षी 200 शेतकरी गटांना यासाठी पात्र ठरविण्यात येणार आहे.
4. पीक पध्दती व शेतीचा प्रस्ताव विचारात घेवून गट शेतीसाठी आदर्श नमुना प्रकल्प मॉडेल तयार करणेत येईल.
5. यामध्ये पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग व रेशीम उद्योग आदी विभागांच्या आदर्श नमुना प्रकल्पाचा समावेश करणेत येईल.
6. या योजनेत शेती अवजारे व बॅंकेचाही समावेश करणेत आला आहे.
7. गटातील सदस्यांची संख्या वाढण्यासह या सदस्यांचे एकूण क्षेत्र 100 एकरांच्या पटीत वाढले तर वाढीव असलेल्या प्रत्येकी 100 एकरासाठी प्रत्येकी एक कोटी रूपयांचे वाढीव अनुदान देय राहणार आहे.
8. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या व पुरस्कारास पात्र ठरलेल्या शेतकरी गटांना प्रथम क्रमांक 25 लाख रूप्ये द्वितीय क्रमांक 15 लाख रूप्ये व तृतीय क्रमांक 5 लाख रूपये याप्रमाणे पारितोषिके देण्यात येणार आहेत.

**समारोप :—**

गट शेतीमुळे लहान शेतकरी व सीमांत शेतकरी यांच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ होत आहे. हे लक्षात घेता गट शेती ही शेतकऱ्याच्या फायदयाची आहे. परंतू त्यातील काही अडचणीमुळे गट शेतीच्या विकासावर मर्यादा येते. तरीही गट शेतीचा विकास झाला पाहिजे. यासाठी महाराष्ट्र शासनाने 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट वाढले पाहिजे म्हणून सन 2017—18 व 2018—19 या दोन वित्तीय वर्षात पथदर्शी योजना आखून तिची प्रभावी अंमलबजावणी करून गट शेतीला प्रोत्साहन देण्याचे / विकास करणेचे धोरण आखले आहे. परिणामी गट शेती ही शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासाचे साधन बनेल.

**संदर्भ :—**

1. कृषी अर्थशास्त्र — डॉ.गंगाधर वि.कायंदे—पाटील
2. ॲग्रोवन सकाळ — दिवाळी अंक 2017
3. दैनिक लोकसत्ता — 22 नोव्हेंबर 2017
4. इंटरनेट — महाराष्ट्रातील गट शेती

## भारताच्या कृषी विकासाच्या व्यूहरचनेचे शिल्पकार पंडित नेहरू

**प्रा. डॉ. प्रमिला विजय डोणे,**
न्यू कॉलेज, कोल्हापूर.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये जशी पंडित नेहरूंची महत्वाची भूमिका आहे, तशीच भूमिका स्वातंत्र्योत्तर काळात घेवून त्यांनी भारताला एकात्म व अखंड भारत बनवण्यासाठी प्रयत्न केले. कारण त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू मानव हा होता. स्वातंत्र्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था म्हणजे जुन्या चालीरीती व परंपरा यामध्ये अडकलेली, अज्ञान व निरक्षर अशा जनतेची शेतीवर आधारित असलेली अर्थव्यवस्था, त्यातून निर्माण झालेले दारिद्र्य, विषमता अशा समस्यांतून संक्रमण करीत असलेली अर्थव्यवस्था होती. ब्रिटीश राज्य व त्यांनी हव्या असलेल्या पध्दतीचा व उपलब्ध असलेल्या भारतीय नैसर्गिक साधनांचा वापर करून त्यांनी त्यांची अर्थव्यवस्था बळकट केली होती. त्यातूनच ज्यांच्यावर भारतीय लोकांचा उदरनिर्वाह चालत असे अशा निसर्गदत्त शेतीवर अनिष्ठ चालीरीती व बंधनाचे वर्चस्व लादून भारतीय शेतकऱ्यांचे जीवन दरिद्र बनवले होते. स्वातंत्र्यानंतर भारताची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता अनेक तज्ञांनी विकास योजना मांडल्या. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेती क्षेत्राचा विकास झाल्याखेरीज देशाचा विकास होणार नाही हे विचारात घेऊन स्वतंत्र देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी नियोजनाच्या माध्यमातून कृषी क्षेत्राच्या विकासाकरीता व्यूहरचना तयार केली. निसर्गात उपलब्ध असणाऱ्या शेती क्षेत्राचा वापर योग्य कारणाकरीता करणे व शेती क्षेत्रावर ब्रिटीशकालीन व्यवस्थेत असलेले जमीनदारांचे वर्चस्व कमी करून शेती मालकाला जमिनीचा हक्क प्राप्त करून देणे व शेती उत्पादन वाढवण्याची व्यूहरचना तयार करण्याचे काम त्यांनी केले.

देशातील गरिबी दूर करण्याकरीता औद्योगिकरणास पर्याय नाही. त्याकरीता छोटे मोठे उद्योग उभारणे महत्वाचे आहे. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया ज्याच्यावर अवलंबून आहे, त्या कृषी व्यवसायाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून त्यांनी प्रथम शेती विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट ठरवले व त्यानुसार व्यूहरचना तयार केली हीच व्यूहरचना कृषी विकासाला प्रेरक ठरली, ती आजच्या कृषी विकासाला पूरक ठरत आहे.

**उद्दिष्टे :**

१. ब्रिटीश कालावधीतील भारतीय शेतीचा अभ्यास करणे.
२. स्वतंत्र भारताच्या कृषी विकासात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कृषी विकास विषयक व्यूहरचनेचा अभ्यास करणे.

**गृहितक :**पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कृषी विषयक धोरणामुळेच कृषी विकास शक्य झाला.

**अभ्यास पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. पंडित नेहरू यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा आणि पंडित नेहरू यांच्यावर विविध अर्थतज्ञानी लिहिलेल्या पुस्तकाचा तसेच संदर्भ ग्रंथ, इंटरनेट यांचा वापर सदर शोधनिबंधासाठी केलेला आहे.

**विषय विवेचन :** स्वातंत्र्य संग्रामात ब्रिटीशाविरूध्द शांततेच्या मार्गाने गांधीजींच्या बरोबर प्रखर असे आंदोलन करणारे आंदोलक, पारंपारिक विचारप्रणालीतून समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असलेले विचारवंत, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, भारतातील समस्या सोडवायच्या असतील तर मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारणारे तसेच समाजातील तळातील माणसांपर्यंत शासनाच्या योजना कशा पोहचवता येतील याचा विचार मांडणारे व अंमलात आणणारे नियोजनकर्ता म्हणून पंडित नेहरूंचे व्यक्तिमत्व ओळखले जाते.

ब्रिटीशकालीन भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाचा कणा म्हणून मानलेल्या शेती विकासाकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था सुधारावयाची असेल तर कृषी अर्थव्यवस्थेत सुधारणा करणे अपेक्षित आहे. कृषी विकासातूनच देशाला अनेक समस्यांची सोडवणूक करता येते हे ओळखूनच पंडित नेहरूंनी कृषी विकासाला प्राधान्य दिले.

**पंडित नेहरू यांनी कृषी क्षेत्रासाठी नियोजन काळात केलेल्या खर्चाचा तपशील :** देशाचा जलद आणि नियोजनबध्द विकास हा पंचवार्षिक योजनेद्वारा होऊ शकतो हे रशियासारख्या देशाने सिध्द केले.याच विचारातून पंडित नेहरूंनी पंचवार्षिक योजनांची व्यूहरचना तयार केली. त्यापैकी पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजना कालावधीत, शेती विकास आणि औद्योगिकरण यांना केंद्रस्थानी मानून नियोजनाची वाटचाल सुरू केली. नेहरूंच्या काळात तीन पंचवार्षिक योजना झाल्या. त्यांच्या खर्चाची माहिती पुढील तक्त्याद्वारे दिली आहे.

### पंचवार्षिक योजना काळातील खर्च

| खर्चाच्या बाबी | पहिली योजना | | दुसरी योजना | | तिसरी योजना | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष खर्च | एकूण खर्च शेकडा प्रमाण | प्रत्यक्ष खर्च | एकूण खर्च शेकडा प्रमाण | प्रत्यक्ष खर्च | एकूण खर्च शेकडा प्रमाण |
| कृषी व संबंधित क्षेत्र | २९० | १४.८ | ५४९ | ११.७ | १०८९ | १२.७ |
| जलसिंचन पूर नियंत्रण | ४३६ | २२.२ | ४३० | ९.२ | ६६५ | ७.८ |
| ऊर्जा | १४९ | ७.६ | ४५२ | ९.७ | १२५१ | १४.६ |
| ग्राम व लघुउद्योग | ४२ | २.१ | १८७ | ४.०० | २४१ | २.८ |
| उद्योग व खाणी | ५५ | २.८ | ९३८ | २०.०० | १७६२ | २०.० |
| वाहतूक दळणवळण | ५१८ | २६.४ | १२६१ | २७.०० | २११२ | २४.६ |
| इतर | ४७२ | २४.१ | ८५५ | १८.३३ | १४९२ | १३.४ |
| शैक्षणिक व वैज्ञानिक संशोधन | १४९ | ७.६ | २७३ | ५.६८ | ६६० | ३.७ |
| आरोग्य व कुटुंब कल्याण | ९८ | ५.०० | २१६ | ४.६ | २५१ | २.९ |
| **एकूण** | **१९६०** | **१००** | **४६७२** | **१००** | **८५७३** | **१००** |

संदर्भ : भारतीय नियोजन मंडळाचे अहवाल

**पंडित नेहरूंनी राबवलेले कृषी विषयक व्यूहरचना व साध्य झालेल्या बाबी :**

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरूंनी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चाधिकारी समितीकडे कृषी क्षेत्राचे उत्पादन वाढवणे व त्यारीता जमिन विषयक सुधारणांची दिशा ठरवणे या संदर्भात अधिकार देण्यात आले. या समितीने पूर्वीच्या जमीन व्यवस्थेमुळे निर्माण झालेले आणि कृषी उत्पादन वाढीला बाधा आणणारे अडथळे दूर करणे आणि पूर्वीच्या जमीन व्यवस्थेतील सामाजिक अन्याय, कूळांचे शोषण नष्ट करणे, कसेल त्याची जमीन, कृषी व्यवस्था पण सुधारणा, शेत मजुरांच्या स्थितीत सुधारणा करणे. ग्रामीण जनतेला प्रतिष्ठा आणि संधीची समानता मिळवून देणे आणि ग्रामीण जनतेचे राहणीमान सुधारणे यासारखी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी काही कार्यक्रम दिले. त्यानुसार पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनामध्ये कार्यक्रमाचे नियोजन केले व ते कार्यक्रम कार्यक्षमपणे राबवण्याचे धोरण पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी निश्चित केले. त्यानुसार

**कृषी विकास कार्यक्रमात साध्य झालेल्या बाबी –**

**१.जमीन विषयक सुधारणात झालेला बदल :** पहिल्या पंचवार्षिक योजनांमध्ये जमिन विषयक सुधारणांचे धोरण जाहिर केले. त्यानुसार कायदे, जमीन विषयक सुधारणा कार्यक्रम निश्चित केला. त्यातून जमिनीच्या मालकी हक्काचे समान वाटप आणि उत्पादन वाढीस चालना मिळावी म्हणून आर्थिक विकास साधण्यासाठी जमीनविषयक सुधारणा हे एक साधन ठरले.

**२.मध्यस्थांचे उच्चाटन :** पहिल्या पंचवार्षिक योजनेत जमीनदारी पध्दतीचे (मध्यस्थांचे) उच्चाटन करण्याचे कायदे केले.कारण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील एकूण जमिनीच्या ४५% जमीन मध्यस्थांच्या अधिकाराखाली होती.अशा मध्यस्थांचे उच्चाटन करून, कायद्यानुसार त्यांच्याकडील अतिरिक्त जमीन काढून २ कोटींपेक्षा अधिक कुळांना जमिनीची मालकी मिळवून देण्यात आली. तसेच १.६ कोटी एकर जमीनदारांकडील पडीक जमीन आणि डोंगरे ही सरकारी मालकीची झाली. नियोजन काळात सरकारने त्या जमिनीचा विकास केला.कुळांना जमिनीचा मालकी हक्क मिळाला.या कायद्यामुळे सरकारला जमीन महसूल गोळा करण्याचा अधिकार मिळाला. त्यामुळे महसूल गोळा करणाऱ्या मध्यस्थांचे उच्चाटन झाले.

महसूल गोळा करण्यात सरकारला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. यामध्ये जमीनदारांच्या नोंदीमध्ये असलेल्या प्रॉपर्टींचा प्रामुख्याने समावेश होतो. या प्रॉपर्टी असल्या तरी पंडित नेहरू यांनी नियोजनातून मध्यस्थांचे उच्चाटन करण्याचा कार्यक्रम समर्थपणे राबवला. त्यातून सरकार व शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. याची परिणिती आजच्या शेती व्यवस्थापनात दिसून येते.

**३.कूळ कायद्यातील सुधारणा :** जमीन विषयक सुधारणा कायद्यामुळे अर्थव्यवस्थेत झालेला बदल लक्षात घेता, सरकारने कूळ कायद्यात सुधारणा केल्या. यामध्ये प्रामुख्याने पहिल्या योजनेत पंडित नेहरूंनी कुळांना दिल्या जाणाऱ्या खंडाच्या स्वरूपात केलेली शिफारस महत्वपूर्ण ठरली. त्यानुसार खंडाचे प्रमाण एकूण उत्पादनाच्या २० ते २५% इतके निश्चित केले. त्यामुळे कूळ कायदे करून खंडाचे प्रमाण इतर देशातील विविध घटक राज्यांनी निश्चित केले. या कूळ कायद्यामुळे कुळांना काढून टाकण्यावर कायद्याने बंदी आली. त्यामुळे कुळांना जमीन कसण्याबाबत शाश्वती मिळाली. त्यामुळे त्यांच्याकडून जमिनीत गुंतवणूक केली जाऊ लागली. याचा

कायम देशातील ९७.१० लाभ कुळांना ते कसत असलेल्या ६७.८७ लक्ष हेक्टर जमिनीचा मालकी हक्क मिळाला.या कुळ कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या योजनेत झाली. कुळांना जमिन कसण्याची शाश्वती व मालकी हक्क मिळाल्याने त्यांच्यात उत्पादन वाढीची प्रेरणा निर्माण झाली. त्यामुळे निश्चितच या प्रेरणेतून कृषी विकासाला दिशा मिळाली.

या नियोजनाच्या माध्यमातून पंडित नेहरूंनी देशातील सीमांत, अत्यल्प भूधारक, अल्प भूधारक शेतकरी आणि भूमिहीनांना जमीन देऊन, जमीन मालकी हक्कांतील विषमता दूर करण्याकरीता कमाल भू-धारणा कायदा करून त्यांच्या काटेकोर अंमलबजावणीतून मालकी हक्कातील तफावत दूर करणे, कूळ पध्दत कमी करणे, सहकारी ग्राम व्यवस्थेकडे वाटचाल करणे व भूमिहीन शेत मजूरांना जमिनीची मालकी मिळवून देणे शक्य झाले.

कमाल भू धारणा कायद्याचा परिणाम म्हणजे १९५९ मध्ये राज्य सरकारनी कमाल जमीन धारणेबाबत केलेला कायदा, विविध राज्यांनी जमिनीचा प्रकार, सुपिकता, पाणी पुरवठ्याच्या सोयी इ. घटकांचा वापर करून भूधारणा कमाल मर्यादा ठरविली. त्यानुसार देशातील निरनिराळ्या राज्यात जमिनीची कमाल मर्यादा ठरवण्यात आली. उदा. आंध्र प्रदेश, जम्मू काश्मीर, मध्यप्रदेश, ओरिसा, पंजाब, पश्चिम बंगाल इ. राज्यात एका व्यक्तीच्या मालकीची जास्तीत जास्त किती जमीन असावी हे ठरवण्यात आले. आसाम, केरळ, गुजरात, राजस्थान इ. राज्यात एका कुटुंबाकडे जास्तीत जास्त किती जमीन असावी हे ठरवण्यात आले. कमाल भू धारणा मर्यादा कायद्यानुसार ओलिताखालील जास्तीत जास्त १८ एकर जमीन आणि बिना ओलिताखालील जास्तीत जास्त ५४ एकर जमीन ही कमाल जमीन मर्यादा ठरवण्यात आली. भू धारणा कायद्यामुळे सामाजिक न्याय साधता आला.

**४.धारण क्षेत्राचे एकत्रीकरण** :पहिल्या पंचवार्षिक योजनेत जमीन विषयक सुधारणाचा भाग म्हणून धारण क्षेत्राचे एकत्रीकरण ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. लहान आकाराच्या शेतीत उत्पादन वाढ करता येत नाही. म्हणूनच या योजनेत जमिनीचे विभाजन व उपविभाजन टाळण्यासाठी राज्य सरकारने कायदे केले. या कायद्यानुसार वारसा हक्कानुसार विभाजन करावे. परंतु मशागत एकत्र व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पध्दतीने शेती करावी हा नियम केला. या धोरणाला काही राज्यात कायदे केले. पंडित नेहरूंनी राबवलेल्या या धोरणातून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस २.९५ कोटी एकर शेतजमिनीचे एकत्रीकरणाचे काम पूर्ण झाले.

**५.भूदान चळवळ** : पंडित नेहरू यांनी राबवलेल्या जमीन सुधारणा कायद्यात सुधारणा करण्यासाठी आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सुरू केली. भूदान चळवळी बरोबरच १९५७ पासून ग्रामदान चळवळ सुरू करण्यात आली. परंतु या दोन्ही चळवळीतून जमिनी मिळाल्या. परंतु जमीन कसण्यासाठी लागणारी साधनसामग्री त्याच्याकडे नसल्याने जमिनीचा वापर करता आला नाही. परंतु कृषी उत्पादन वाढीसाठी आचार्य विनोबा भावे यांनी भू साधारणेची आवश्यकता लोकांना पटावी आणि त्याकरीता अनुकूल वातावरण निर्माण व्हावे याकरीता झालेले प्रयत्न उत्पन्न वाढीस योग्य होते.

**६.सहकारी शेती** : रशियाने आर्थिक विकासाकरीता जी व्यूहरचना वापरली होती, त्यापैकी सहकारी शेती हा एक प्रकार होय. सहकारी शेतीचा प्रयोग राबवण्याचे प्रयत्न पंडीत नेहरूंनी केले. त्यानुसार १९५९ साली सहकारी शेती अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली. याचे फलित म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेत जमिनीचे एकत्रीकरण आणि सामुदायिक लागवड विचार घेता, सहकारी संयुक्त शेती आणि सामुदायिक शेती प्रकाराला उत्तेजन देण्यात आले. म्हणूनच पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस १००० सहारी संस्था अस्तित्वात आल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पंडित नेहरू यांनी सहकारी शेती संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. १९६९ साली एस.निजालिंगप्पा यांनी स्थापन केलेल्या सहकारी शेती संस्था अभ्यासगटाने सहकारी शेतीच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले. त्यामुळेच १९६१ मध्ये सहकारी शेती संस्थांची संख्या ६३२५ व सभासद संख्या ३.०५ लाख झाली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सहकारी शेती संस्थांची संख्या ४६२२० सभासद संख्या २.१३ लाख इतकी झाली. सन १९९१ अखेर सहकारी शेती संस्थांची संख्या ४६,२२० आणि सभासद संख्या ५६ लाख इतकी वाढलेली दिसते. यावरून पंडित नेहरूंनी सहकारी शेतीकरीता घेतलेली भूमिका महत्वाची ठरलेले दिसून येते.

**७. शेती विकासासाठी नवीन व्यूहरचना** : शेती क्षेत्र हे कृषी विकासासाठी पायाभूत क्षेत्र मानून पंडित नेहरूंनी कृषी विकासासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेत प्रयत्न केले. त्याकरीता त्यांनी शेतीमध्ये अमुलाग्र बदल करण्याचे धोरण स्वीकारले. १९६०-६१ साली परंपरागत व जुनी शेती पध्दती बदलून शेतीसाठी नवीन व्यूहरचना व हरित क्रांतीचे धोरण स्वीकारले. १९५९ स्थापन फोर्ड फौंडेशन तज्ज्ञ समितीच्या सल्ल्यानुसार प्रकर्षित प्रदेश विकास कार्यक्रम देशातील विविध राज्यातील ७ जिल्ह्यात लागू केला. प्रथम:च शेती विकासासाठी एकूण खर्चाच्या ३१%, दुसऱ्या योजनेत २०%, तर तिसऱ्या योजनेत २१% खर्च करण्याचे ठरवले.

पंडित नेहरू यांनी शेती क्षेत्रात केलेल्या क्रांतिकारक बदलाची नोंद यामध्ये कृषी विकासासाठी प्रकर्षित शेती जिल्हा कार्यक्रम १९६०, राष्ट्रीय बियाणे महामंडळ १९६३, भातरीय राज्य शेती महामंडळ १९६९, सहकार विकासासाठी राष्ट्रीय सहकार विकास आणि गुदाम महामंडळ १९५६, पाणी पुरवठा योजना, खते बियाणासाठी शेतकऱ्यांना अंशदान योजना, शेतीचे यांत्रिकीरण, शेतीला कर्ज पुरवठा देणाऱ्या योजना, शेती संशोधन मंडळ, शेती महाविद्यालये, विद्यापीठे, शेतमाल किंमतीसाठी कृषी मूल्य आयोग (१९६५), शेतमाल विपणनासाठी नियंत्रित बाजारपेठा, शेतमाल साठवणूकीसाठी केंद्रीय व राज्य वखार महामंडळ (१९५७), शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता शेतमजूर चौकशी समिती १९५१, राष्ट्रीय मजूर समिती १९६९, किमान वेतन कायदा, शेतकऱ्यांसाठी अधिक धान्य पिकवा मोहीम, ग्रामीण विकासासाठी सामुदायिक विकास कार्यक्रम १९५२, धान्य विभाग, धान्य वसुली, किमान आधार किंमती, अन्न महामंडळ १९६५, अन्नधान्य स्वयंपूर्णता असे अनेक क्रांतिकारक निर्णय कृषी विकासाकरीता घेतले गेले, ज्याचा उपयोग शेती विकासाकरीता महत्वपूर्ण योजना राबवण्याकरीता होत आहे.

**निष्कर्ष :**

१.स्वातंत्र्यानंतरचा व पहिल्या तीन नियोजनापर्यंतचा कालखंड हा नेहरू युग मानला जात होता.

२.पंडित नेहरूंनी कृषी विकासासाठी जमीनदारी पध्दतीचे उच्चाटन करणारे कायदे कमाल भू धारणा कायदा, धारण क्षेत्राचे एकत्रीकरण, कूळ कायद्यांचे उच्चाटन यांसारख्या कायद्याची अंमलबजावणी कार्यक्षमतेने केल्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्या.

३.सहकारी शेती, शेतीचे उत्पादन वाढवण्याकरीता स्वीकारलेले धोरण यामुळे तिसऱ्या पंचवार्षिक योजना अखेरीस सहकारी शेती संस्थांची संख्या ८०४८ आणि सभासद संख्या २.१३ लाख इतकी झाली. १९९१ अखेर सहकारी शेती संस्था ४६,२२० आणि सभासद ५६ लाख इतकी झाली याचा अर्थ सहकारी शेतीसाठी पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका महत्वपूर्ण होती.

४.पंडित नेहरूंच्या कालखंडात भारताचा कृषी विकास झाला. त्यामुळेच सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित झाला.

५.आधुनिक कृषी विकासाबरोबर, औद्योगिक विकासाकडे लक्ष केंद्रित करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करता येतात. हा त्यांचा दृष्टीकोन आजच्या अर्थव्यवस्थेत विकासाला पोषक ठरत आहे.

६.नेहरूंनी तीन पंचवार्षिक योजनामध्ये केलेल्या विविध कायद्यामुळेच कृषी क्षेत्राच्या मालकी हक्कात व उत्पादनात अमूलाग्र बदल झाला.

७.हरितक्रांतीच्या धोरणामुळेच कृषी उत्पादनात वाढ होऊन अन्नधान्याचा प्रश्न सोडवता आला.

८.समाजवादी समाजरचना प्रस्थापित करताना औद्योगिक विकासाबरोबर त्यांनी कृषी विकासाला प्राधान्य दिले.

**समारोप :**

भारताची सध्याची आर्थिक स्थिती आणि समस्या विचारात घेता, आजही पंडित नेहरूंचे आर्थिक विचार व कृषी विकासासाठी केलेले प्रयत्न अर्थव्यवस्थेत नवीन योजनांचा विस्तार व कायदे करण्यास उपयुक्त ठरत आहेत. पंडीत नेहरूंचे विचार समजून घेवून भारताच्या कृषी धोरणात त्यांची अंमलबजावणी केल्यास वर्तमानकालीन समस्या सोडवण्यास मदत होणार आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. Data and Sundharam (2015), Indian Economy - I, Chand & Company, New Delhi.
२. M. L. Jhingan (2012), Economics of Development & Planning.
३. Jawaharlal Nehru (2004), 'The Discover of India', Books India Ltd., New Delhi, India, Page No.150-155.
४. Selected Works of Jawaharlal Nehru, Volu. VI to XIV, 'A Project of the Jawaharlal Nehru Memorial Fund, Orient Longman Ltd., New Delhi - 1982'.
५. चंपा नेरकर मिलिंद, सुहास कुलकर्णी (२००४), 'यांनी घडवले सहस्त्र', रोहन प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती, पान नं.४५ ते ४७.
६. डॉ. आपटे प्रभा (१९९०), पंडित नेहरू आणि संसदीय परंपरा, मॅजेस्टीक प्रकाशन, पान नं.७ ते १०.
७. गोडबोले माधव (मे, २०१४), जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व एक सिंहावलोकन, राजहंस प्रकाशन, पुणे.
८. मासिके – प्रबोधन प्रकाशन ज्योतीचे विविध अंक, अर्थसंवाद मासिकाचे अंक, इंटरनेट.

# ज. र. तथा दादा पेडणेकर : सामाजिक व राजकीय योगदान

**प्रा. भीमराव जोतिबा शिंदे**
ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय,गडहिंग्लज

**प्रस्तावना –**

निःस्वार्थ जनसेवेचे व्रत घेऊन जीवनाचा प्रत्येक श्वास समाजासाठी समर्पित करणारा देवमाणूसच.दादांची आठवण झाली की, त्यांच्या सहवासातील लोकांचे डोळे पाणावतात. त्यांच्या निष्काम कर्मयोगाची आठवण होते.कंठ दाटून येतो.अंतःकरण गहिवरुन येते. आभाळएवढी उंची लाभलेला हा देवमाणूस अनेकांच्या हृदयात घर करुन राहिला.मनात आनले असते तर दादा सधन बनू शकले असते. पण पैशापाठीमागे धवले तर दादा कसले.'ऊतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' अशी उर्मी मनात बाळगून समाजाला वेळ देण्यातच ब्रम्हानंद समजणारे दादा अनेकांना आठवतात.गडहिंग्लजच्या इतिहासातील 'या सम हा' असा निष्काम कर्मयोगी म्हणजे ज.र. पेडणेकर तथा दादा पेडणेकर.

**निःस्वार्थ समाजसेवा** – जनतेची कामे करताना स्वतःची शिदोरी सोबत घेऊन व स्वतःच्या गाठीचे पैसे खर्चुन प्रवास करायचे. फुकटचा चहा सुध्दा पिण्याची त्यांची वृत्ती नव्हती. सर्वस्वी ते समाजाचे होते. 'आता उरलो उपकारापुरता' या संततुकारामांच्या अभंगातील ओळी त्यांच्या जीवनाला तंतोतंत लागू पडताना दिसतात. गडहिंग्लजचा नागरीक कोणी अडचणीत असेल तर दादा बेचैन व्हायचे. सत्तेवरच्या पक्षाला दादांचा आदर वाटे व नैतिकतेचा धाक वाटे. जनतेच्या हिताचेच राजकारण त्यांना करावे लागे. सोनारने कान टोचावेत त्याप्रमाणे सत्ताधीशांना कर्तव्य लक्षात आणून देत असत.

**नैतिकतेचा उपासक** –औषधे विकत घेऊ न शकणा-या गरजूंना गुपचुप औषधे घरी नेऊन पोहचवत असत.अडल्या-नडलेल्यांना औषधं उदार द्यावी लागतात म्हणून कधी कुरकुर केली नाही. दादांचे स्वतःचे औषधाचे दुकान होते. हा अनुभव त्यांचे स्नेही साळूंखे गुरुजी यांनी घेतला होता. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणजे जो आपुले, तोची साधु ओळखावा देव तेथेची जाणावा' हे संत वचन ते प्रत्यक्ष जगले. दादांच्या नैतिक वागण्याला त्यांच्या पत्निचा पाठिंबा होता. दादांची आर्थिक परिस्थिती तशी खुप नाजूक होती मित्रांकडून होणारी मदत या निःस्पृह वृत्तीला म्हणजे दादांना वेदना देणारी ठरे. पण मित्रांच्या प्रेमामुळे त्यांचा नाईलाज होई. डॉ. घाळी स्वतः सत्तेवर असताना वेळोवेळी दादांचा सल्ला घ्यायचे. दादा विरोधी पक्षातले असूनही त्यांना उपनगराध्यक्ष पदाचे अधिकार दिले होते. दादांच्या हृदयातील त्यांच्या नैतिक दबदब्यामुळे गडहिंग्लजचे राजकारण म्हणजे भ्रष्टाचारविरहित रामराज्यच.

**संकटकालीन आधारवड**– आर्थिक चणचणींमुळे दादांच्या कुटुंबियांचे खूप हाल होत होते. आंबिल अथवा झुनका भाकर हिच ती त्यांची पक्वान्नं होती. असे असूनही दादा निःस्पृह वृत्तीनेच जगले व सतत जनतेच्या मदतीला धावले. घरातली रोजच्या वापरात असलेली वस्तू दुस-यांच्या अत्यंत गरजेच्यावेळी स्वतः पाठवून देत 'न बोलविता येतो व न मागता देतो तो देव असतो' म्हणून देव माणूस वाटतात. दादांनी भीमराव नेवडे नावाच्या मित्राला स्वतः जामीन राहून त्यांचे कुटुंब स्थिरस्थावर करण्यासाठी नेवडेंना जमीन विकत घेऊन दिली. दादांचे आणखी एक मित्र भीमराव चव्हाण यांचे घर जळाले. विमा कंपनीने त्रुटी काढून मदत नाकारली पण दादांनी जिथे जिथे जावे लागेल तेथे जाऊन संबंधित अधिका-यांना भेटून नुकसान भरपाई मंजूर करुन घेतलीच. तेव्हाच दादांच्या मनाला शांत वाटले. भीमराव नेवडेंनी दादांना काम केल्याच्या बदल्यात काही पैसे देऊ केले पण पैसे घेतील तर दादा कसले.

आजरा तालुक्यातील वाटंगे गावच्या शेतक-याची दुस-यांनी बळकावलेली जमिन दादांनी मध्यस्थी करुन परत मिळवून दिली.त्या शेतक-याने पीक आल्यावर एक पोतं धान्य दादांना आनंदाने देऊ केलं पण दादांनी केलेल्या कामाचा मोबदला कधीच घेतला नाही.

**शैक्षणिक दृष्टिकोन** – प्रतिष्ठित व्यक्तिच्या मुलींना शाळेत नापास व्हावे लागल्याने दादांच्या शिक्षक मित्रावर आलेला दबाव, निवडणून प्र. गणक म्हणून काम करताना याच शिक्षक मित्रावर आलेलं संकट, बॅ. नाथ पै शाळेचे मैदान वाचविण्यासाठी या शिक्षक मित्राला करावा लागलेला संघर्ष अशावेळी दादा योग्य व सत्याच्या बाजूने ठाम राहिले होते. सहकारी कार्यकर्त्यांची दादांच्यावर ओढवलेली नाराजी, कार्यकर्त्यांच्यात व दादांच्यात निर्माण झालेली दरी, या कोणत्याही गोष्टीची तमा दादांनी बाळगली नाही. तत्वांशी कधीही तडजोड केली नाही. सत्याची कास कधी सोडली नाही कारण 'सत्यं शिवं सुंदरं' ची प्रचितीच जणू त्यांना आली होती. अविश्रांतपणे संकटातल्या मित्रांसाठी धावून जाण्याची वृत्ती, न्याय मिळवून देण्याची धडपड म्हणजे निःस्वार्थ वृत्तीचं मूर्तिमंत उदाहरणच.

गडहिंग्लज नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाची सुरुवात व क्रीडामहोत्सवाची सुरूवात दादांच्या पुढाकारानेच झाली. २ ऑक्टोबरच्या गांधी जयंतीच्या शहर सफाईच्या कामात शाळेतल्या मुलांच्याबरोबर स्वतः पूर्णवेळ हजर राहायचे हे आठवडाभर चालायचं, स्वतःच्या घरातून विद्यार्थ्यांना नाचण्याची आंबिल पुरविताना दादांना खूप समाधान मिळे. सत्याग्रहाच्या वेळी दादा सर्वांच्या पुढे असायचे.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

**राष्ट्रीय नेतृत्वांचा सहवास आणि जडणघडण** – दादांच्या लहानपणीच पितृछत्र हरपले. अत्यंत आर्थिक हालाकीच्या परिस्थितीतसुध्दा दादांनी समाजात असामान्य असं स्थान मिळवलं.दादांच्या वैचारीक जडणघडणीला डॉ. राम मनोहर लोहिया श्री एस.एम. जोशी, श्री. ना.ग.गोरे इ. मंडळी कारणीभूत होती.समाजवादी पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते होते. समाजवादी पक्षाचे जनता पक्षात विलिनिकरण झाल्यानंतर जनता पक्षाच्या वृध्दीसाठी दादांनी अहोरात्र प्रयत्न केले. कॉंग्रेस पक्ष बलवान असताना दादांनी जनता दलाला यश प्राप्त करून दिले. दादांचे राहणीमान अत्यंत साधे होते. दलित वस्तीत त्या काळी झुणका भाकर कार्यक्रम दादा घ्यायचे. अनेकांचे कतृत्व दादांच्या सहवासात बहरले. जातीय राजकारणांचा तिटकारा दादांना होता. जकात विभागाचे सभापती असताना जकात नाक्यांना रात्री अपरात्री भेट देत. यातून अत्यंत कर्तव्यदक्षवृत्ती दादांची दिसते. दादांच्याकडून अनेकांनी आत्मसन्मानाचा , तत्वाशी तडजोड न करण्याचा गुण घेतला. सर्वसमभाव वृत्तीचे दादा होते.

**समाजासाठी समर्पित** – आणिबाणीच्या प्रसंगी दादा भूमिगत झाले होते. दादांना पकडण्याचा आदेश पोलिसांना मिळाला होता. एवढा चांगला माणूस तुरुंगात पाठवणे पोलिसांना महापातक वाटे. म्हणून दादा स्वतः पोलिसांच्या स्वाधीन झाले. त्यांना तुरुंगवास झाला व शेवटी निर्दोष सुटलेही. दादा समाजकार्य करत असतांना त्यांच्या पत्नी सुधाताई सारे व्यवहार सांभाळून घराचं घरपण जपत होत्या. त्यामुळेच दादा पूर्णवेळ समाजासाठी समर्पित होते.

**समारोप** –

सत्यासाठी बंड करणारे, स्वतः होऊन मदतीला जाणारे, निर्भेळ समाजकारण व राजकारण करणारे, परखड मत मांडणारे, तत्वाशी तडजोड न करणारे, निःस्पृह व निःस्वार्थ वृत्ती असणारे, कर्तव्यदक्ष असणारे, संकटकाळी मित्र होणारे, आर्थिक हालाकीत सुध्दा दुस-यांसाठी धडपडणारे, समाजहितालाच प्राधान्य देणारे दादा म्हणजेच ज. र. पेडणेकर. दादा नगराध्यक्ष पदावर विराजमान झाले नसते तरच नवल ! निष्काम व निःस्पृह वृत्तीमुळेच दादा या उंचीवर पोहचले. देव माणूस बनले. निःस्वार्थता म्हणजे दादा आणि दादा म्हणजे निःस्वार्थता. समाजकार्य व राजकीय कार्य करणा-यांना दादा दीपस्तंभ बनून येणा-या पिढयांना मार्गदर्शक ठरतील. अशा दादांना शतशः प्रणाम.

**संदर्भ** –

१. 'समाजवादी नेतृत्व : ज. र. पेडणेकर' – प्रा. विठ्ठल बन्ने
२. 'पुरोगामी क्रांतीकारक : ज. र. पेडणेकर ' – जे. बी. बारदेस्कर
३. 'दादा : एक प्रगल्भ व्यक्तिमत्व' – वि.म. शिंत्रे
४. अनुभव कथन – श्री व सौ. साळुंखे

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक

**डॉ. दादासाहेब बापूराव जाधव**
श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

युरोपियन भारतात व्यापारासाठी आले आणि या ठिकाणी राज्यकर्ते बनले. राज्यकर्ते बनत असताना त्यांना स्वत:च्या स्वार्थासाठी आप्तस्वकीयांनी यामध्ये मीर जाफर ते अगदी शेवटच्या टप्प्यातील राघोबादादा असो सर्वांनी देश गुलामगिरीत टाकण्यात सिंहाचा वाट उचलेला दिसून येतो. जर छत्रपती शिवाजी महाराजांनी रूजवलेली राष्ट्रभक्ती अंगिकारली असती तर ब्रिटिशांनी १५० वर्षे भारतावर राज्य केले नसते. महाराष्ट्रामध्ये १८१८ या काळात ब्रिटिशांनी पेशव्यांकडून मराठी सत्ता आपल्या ताब्यात घेतली आणि संपूर्ण हिंदूस्थानावर आपला अंमल निर्माण केला. याचा परिणाम राज्यकर्ता बरोबरच तळागाळातील जाती जमातींच्या वर झाला. आशयाच जाती जमातीतील एक भटकी विमुक्त जमात म्हणून रामोशी समाजाला ओळखले जाते. या रामोशी समाजातील उमाजी नाईक यांनी इंग्रजांच्या विरोधात शस्त्र पहिल्यांदा हाती घेतले आणि हिंदूस्थानच्या इतिहासात पहिले हुतात्मा झाले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उमाजी नाईकांनी ब्रिटिशांच्या विरोधात उभारलेल्या लढ्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**रामोशी समाज :** भारतामध्ये मूळ रहिवाशी असलेल्या अनेक जाती-जमाती अस्तित्वात होत्या. त्यामध्ये असूर, नाग, द्रविड इ. होय. आर्यांच्या आगमनानंतर आर्यांनी वरील जाती जमातींशी संघर्ष करून आपले वर्चस्व निर्माण केले. पुढे या जाती-जमाती जंगल, दऱ्या डोंगरात आश्रयास गेले. या जातींचे पुढे नामांतर आदिवाशी जाती-जमाती मध्ये झाले. अशा अनेक जाती- जमाती संपूर्ण भारतात विखुरलेल्या आहेत. उदा. भिल्ल, संथाळ, कोल, मुंडा, गोंड, नागा, कोरकू, कोलम, लोहार, मुंडवा, गदान इत्यादी होय. मात्र राज सत्तांच्या काळातीही या जाती जमाती आपले अस्तित्व राखून होत्या. परंतु इंग्रजांचा अंमल भारतावर निर्माण झाल्यानंतर या आदिवाशी जाती-जमातींच्या प्रत्यक्ष जीवनावर झाला. सहाजिकच रामोश्यांच्या जीवनावरही परिणाम झाला. त्यांना रानवशी किंवा रामवंशी असेही म्हटले जाते. रामोशी शरीराने धाडशी, शूर, विश्वासू, कटक आणि सर्वात महत्त्वाचे धन्यासाठी स्वत:चा प्राण देण्यास कमी करत नसत. पुढे गावगाड्यात त्यांचा समावेश १८ आलुतेदारात झाला. या आलुतेदारीत त्यांना गावात जागल्याचे काम करावे लागत असत. त्यांना या कामाच्या बदल्यात रामोसपट्टी म्हणून धान्याच्या स्वरूपात मोबदला मिळत असे.[१]

**शिवाजी महाराजांच्या काळातील रामोश्याची परिस्थिती :** छत्रपती शिवाजी महाराजांना माणसांची पारख होती. त्यांनी रामोश्यांच्या अंगी असणारे गुण जाणले आणि त्यांच्याकडे गडाच्या रखवालीची कामे सोपविली. या रखवाली बरोबरच त्यांना 'नाईक' ही पदवी दिली होती. रामोशी समाज गडाच्या रखवाली बरोबरच जोड धंदा म्हणून शेती, पशुपालन इत्यादी व्यवसाय करीत असत. वरील साधने उदरनिर्वाहासाठी कमी पडत असत. काही वेळा पावसाअभावी शेती पिकत नसत. त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत असे. म्हणून ते काही वेळा सरदार, जहागिरदार, वतनदान यांच्या सांगण्यावरून दरोडेघालत असत. या दरोड्यातील मोठी रक्कम जहागिरदार सरदार घेत असत. फार थोडी रक्कम त्यांच्या वाट्याला येत असे.[२]

**पेशवेकाळातील रामोश्याची परिस्थिती :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मिळालेली वतने पेशवे काळातही राखून होती.[३] इ. स. १८०३ मध्ये दुसरा बाजीराव आणि इंग्रजांच्यात वसाईचा तह झाला. या तहानुसार दुसरे बाजीरावाने रामोशी समाजाची वतने काढून घेतली.[४] याचा अप्रत्यक्ष परिणाम या समाजाच्या जीवनावर झाला. इंग्रजी सत्तेविषयी या समाजाच्या मनात असंतोष निर्माण झाला.[५]

**उमाजी नाईक :** उमाजी नाईक यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात भिवंडी या गावी ७ सप्टेंबर १७७१ या दिवशी झाला. उमाजी नाईक यांच्या वडिलांचे नाव दादाजी खोमणे तर आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते.[६] वडील पूरंदरच्या रखवालीची कामे करीत होते. उमाजी नाईक यांनी लहानपणीच आपल्या वडिलांच्याकडून गोफण चालविणे, तीरकामठा मारणे, कुऱ्हाड चालविणे, भाला फेकणे, तलवार व दांडपट्टा चालविणे अवगत केले होते. उमाजीचे वय ११ वर्षे असतानाच वडिलांचे निधन झाले.[७] उमाजी खंडोबाचे निस्सिम भक्त होते. यानंतर पुढे राजसत्तेची आदलाबदल घडून आली. १८०२ मध्ये इंग्रज आणि दुसरा बाजीराव यांच्यात वसईचा तह झाला आणि मराठी मुलखाचा कारभार इंग्रजांच्या परवानगीने सुरू झाला. इतर किल्ल्यांच्या प्रमाणेच पूरंदरच्या रखवालीची कामे रामोशांच्याकडे होती. या रखवालीवरती रामोशी समाजाचा चरितार्थ चालत असे. मात्र इंग्रजांच्या सांगण्यावरून गडाच्या रखवालीची कामे दुसऱ्या बाजीरावाने रामोशांच्याकडून काढून घेतली. याचा परिणाम त्यांच्या चरितार्थावर प्रत्यक्ष झाला. समाजाची उपासमार होऊ

लागली. उमाजी नाईक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आणि ज्या इंग्रजांनी त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणली अशा इंग्रजांना राजज्य निर्माण करून देणार नाही अशी खंडोबा चरणी बेल भंडारा उचलून शपथ घेतली.[८] कारण बाजीरावाने रामोशी समाजाचे हक्क, वतने, सनदा, इनामे, नेमणूका काढून घेतल्या होत्या. परिणामी उमाजी नाईक आणि पेशवे यांच्यात तेढ निर्माण झाली. इंग्रजांच्या अन्याय अत्याचारी धोरणाविरोधात सर्वात प्रथम उमाजी नाईठक यांनी लढा उभा केला होता. मात्र त्यांना महाराष्ट्रात राहणे कठीण वाटू लागले म्हणून शेजारी निजामशाहीत निघून गेले मात्र तिथेही त्यांच्यावर अन्याय झाला.[९] पुन्हा पूरंदररच्या भागात उमाजी नाईक यांनी धाडसाने इंग्रजांच्या विरोधात धोरण सुरू ठेवले. उमाजी नाईक इंग्रजांच्या विरोधात लढत असताना लूटालूट करीत असअे. त्यांच्या खजिन्यावर डाका टाकत असे. दरोडे टाकत असत. मात्र हे सर्व करीत असताना त्यांनी सामान्य जनतेला कधीही त्रास दिला नाही. म्हणून या लढ्याला सामान्य जनतेचा सदैव पाठिंबा राहिलेला होता. जेजुरीच्या परिसरात उमाजी नाईक आणि इंग्रज यांच्यात चकमकी झाल्या होत्या. लुटीतून किंवा दरोड्यातून मिळालेली रक्कम ते गोर–गरीब जनतेमध्ये वाटून टाकत असे आणि उरलेली रक्कम खंडोबा देवास अर्पण करीत असे. परिणामी राज्य इंग्रजांचे आणि भागात अंमल उमाजी नाईक यांचा अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अशी नोंद स्वत: बिटिशांनी करून ठेवलेली आढळते. उमाजी नाईकांच्या साथीला या समाजातील विठोजी नाईक, कृष्णा नाईक, खाशाबा रामोशी, बाबू सोळसकर इत्यादी मंडळी होती. यांच्या साथीने उमाजी नाईक सर्व कारवाया करीत असे.[११]

उमाजी ला इंग्रजांनी तुरुंगात टाकले तुरुंगात असताना त्यांनी लिहायला वाचायला शिकले. तुरुंगातून सुटून आल्यानंतर पुन्हा लढ्याचे सत्र चालूच ठेवले. शिवाजीनगर (भांबुर्डे) येथे इंग्रजांचा खजीना होता या खजिन्यावर त्यांनी रात्रीचा डाका टाकला आणि हा खजिना लूटला. या लूटीतील रक्कम जेजुरी येथील कऱ्हेपठार तर कोंडाणपूर या ठिकाणांच्या देवस्थानास अर्पण केली होती. पटवर्धन यांचे वऱ्हाड मिरज येथून पुण्यास निघाले असता जेजुरी येथे त्यांनी लुटले तर १८८६ मध्ये पंढरपूरच्या एका ब्राह्मण सावकारावर या भागातच डाका टाकला. मात्र इंग्रज उमाजी नाईक यांचा बिमोड करण्यासाठी सतत प्रयत्न करीत होते. मात्र उमाजी नाईक इंग्रजांना दाद देत नव्हते. मठोर देवीच्या डोंगरात कॅप्टन बोईड यास त्यांनी माघार घेण्यास भाग पाडले होते. परंतु इंग्रज उमाजी नाईक यांना संपविण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार होते. त्यांना पकडून देणाऱ्यास बक्षीस जाहीर केले. शेवटी बापूसिंग परदेशी, नाना रामोशी आणि काळू रामोशी हे बक्षिसास बळी पडले. उमाजी नाईक यांना भोर जवळ उत्रोळी येथे पकडून दिले आणि ३ फेब्रवारी १८३२ या दिवशी इंग्रजांनी पुणे येथे खडकमाळ या ठिकाणी त्यांना फाशी दिली.[१२]

ब्रिटिशांच्या विरोधात पहिला लढा उमाजी नाईक यांनी उभा केलेला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे लुलमी राजवटीच्या विरोधात आपले राज्य उभा केले त्याप्रमाणेच उमाजी नाईक यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा उभा करून त्यांच्या जुलमी अन्यायी धोरणास प्रत्यक्ष झुगारून दिलेले होते. जुलमी सावकार, जहागिरदार, वतनदार यांच्या बरोबरच इंग्रजांना त्यांनी सळो की पळो करून सोडले आणि भारताच्या इतिहासात ब्रिटिशांच्या विरोधात पहिला लढा उभा करणारे आणि देशासाठी पहिला प्राण देणारे आद्य क्रांतिकारक म्हणून उमाजी नाईक यांचा मान पहिला आहे.

**संदर्भ :**


१. झांबरे स. द : ‘महान भारतीय क्रांतिकारक’, प्रथम वर्ष १७७०–१९००, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००७, पृ. ५९
२. पाशी चुनखडे : ‘ग्रामीण समाजशास्त्र’, फडके प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती दुसरी, १९९०, पृ. ८७
३. झांबरे स. ध. : उपरोक्त, पृ. ५९
४. वैद्य सुमन/कोठेकर शांता : आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर, चौथी आवृत्ती, जुलै २००४, पृ. ५
५. पवार जयसिंग : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, लेख शाहू छत्रपती आणि गुन्हेगार जमाती, लेखक : लक्ष्मण माने, महाराष्ट्र इतिहास प्रबोधन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००१, पृ. ५०२
६. Captain Alexander Mackintosh : tribe of Ramoossies Including the life of the chief oomiah Naik, Bombay American Mission Press, Bombay 1833, Page No. 125
७. खोबरेकर वि. गो. : महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे, मुंबई १९९४, पृ. ४२–४३.
८. दिक्षित ना. सी. : आधुनिक भारत, पिंपळपुरे अ‍ॅन्ड पब्लिशर्स, पुणे, प्रथमावृत्ती २००९, पृ. १९५
९. आठवले सदाशिव : उमाजी राजे, मुक्काम डोंगरी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९१, पृ. २०
१०. खोबरेकर, वि. गो. : उपरोक्त पृ. ४४

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# मराठीतील आद्य वृत्तपत्र : मुंबापूर वर्तमान

**धनराज शिंदे**
Head,Department of History,
D.K.A.S.C College, Ichalkaranji,
Tal. : Hatkanangale, Kolhapur

आजच्या गतीमान विविध माध्यमांच्या युगात थोडे भुतकाळात पाहताना भारतीय आणि मराठी पत्रकारितेसही एक मोठी वैभवशाली परंपरा असल्याचे दिसते. मुख्यत्वे पाश्चात्यांच्या आगमनापासून भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा उदय आणि विकास घडून आला. ३१ डिसेंबर १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेनंतर व्यापारवादाबरोबर राजकीय महत्त्वकांक्षा ब्रिटीशांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढीस लागल्या. इंग्लंडमध्ये एक प्रभावी शक्ती म्हणून वृत्तपत्राचे स्थान हे बळकट झाले होते. इंग्लंडमधील इ.स. १६८८ च्या वैभवशाली राज्यक्रांतीमागे वृत्तपत्रांचा सहभाग मोठा होता. इंग्लंडमधील या घडामोडींचे पडसाद त्याच्या जगभरातील वसाहतींवरती पडत होते. त्यातून मत प्रकटीकरणासाठी वृत्तपत्रासारख्या साधनाच्या वापराची निकड वाढू लागली. त्यातून हिंदुस्थानात प्रथम वृत्तपत्रे आरंभ करण्यास कंपनीच्या माजी सनदी नोकरांनी पुढाकार घेतला. कारण वृत्तपत्र निर्मितीत आघाडी घेण्यासारखी भारतीय समाजजीवनाची मनस्थिती नव्हती. त्यामुळे वासुदेवशास्त्री खरे भारतात वृत्तपत्र उशिरा सुरू होण्याबाबत विचार व्यक्त करतात की, 'हिंदुस्थानात राज्यतंत्र अव्यवस्थित व सत्ताधीश व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून असल्याने लोकमत आजमावण्यासाठी येथील राज्यकर्त्यांना गरज वाटली नाही. लोकांना बातम्यांविषयी औतुक्य असले तरी लोकमत तयार होण्याची कोणतीही क्रिया घडली नव्हती व तशी अपेक्षाही नव्हती. त्यामुळे वृत्तपत्रासारखे साधन येथे निर्माण होईल, अशी परिस्थिती नव्हती.[१]

**भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा जनक – जेम्स हिकी :** भारतीय वृत्तपत्रकरिता, वृत्तपत्रसृष्टीचा अधिकृतपणे जनक जेम्स ऑगस्टस हिकी याने वृत्तपत्र काढण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न केला. त्याने २९ जानेवारी १७८० रोजी बेंगाल गॅझेट (Bengal Gazette) किंवा कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर (Calcutta General Advertiser) या नावाने हिकीने इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. 'हिकीज गॅझेट' म्हणून ते प्रसिद्धीस आले. त्याच्या पत्रावर पुढील बोधवाक्य/ब्रीदवाक्य होते 'A weekly Political and Commercial Paper open to all parties but influnece by none' आपल्या पहिल्या अंकातच त्याने आपला परिचय कंपनीचा मुद्रक अशा स्वरूपात करून दिलेला आहे. हिकीच्या पूर्वासुरीची फारशी माहिती उपलब्ध नाही. तो विद्वान व सुसंस्कृत असल्याचेही त्याच्या लिखाणावरून वाटत नाही. त्याला फारशी प्रतिष्ठाही नसावी. व्यापारामध्ये कमावलेल्या २००० रुपयातून १७७८ साली त्याने एक छापखाना विकत घेतला. विशिष्ट ध्येयाऐवजी खटपटीतून त्याने वृत्तपत्र काढले.[२] वृत्तपत्र छापण्याची आपणास विशेष आवड आहे, असे मुळीच नाही. त्याबद्दल मला ओढही नाही, कष्टपूर्वक काम करण्याची मला सवय नाही. पण मनाला व आत्म्याला स्वातंत्र्य लाभावे, म्हणून हे कष्ट घेण्यास मला आनंद वाटतो. या पहिल्या वृत्तपत्राचे काही अंक ब्रिटीश म्युझीयमच्या वृत्तपत्रसंग्रहालयात व काही कलकत्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयात आहेत. पत्राचा आकार १२ बाय ८ इंच होता. पत्राची प्रथम दोनच पाने होती. बरीचशी जागा जाहिरातीने व्यापलेली होती. हे वृत्तपत्र केवळ कंपनीचे व्यापारी, युरोपीयनांसाठी होते. त्यात कलकत्त्यातील ताज्या घडामोडीही छापत. नवोदित कवींसाठी ङ्पोएटस् कॉर्नरफ नावाचे सदरही प्रसिद्ध होई. विविध वस्तू, मालाच्या लिलावाच्या जाहिरातीही प्रसिद्ध होत.[३]

पुढे कलकत्ता, मद्रास, मुंबई या कंपनी सरकारच्या अंमलाखालील प्रदेशात वृत्तपत्रांचा उदय झाला तरी त्याचे स्वरूप व वाचकवर्ग हा त्या त्या ठिकाणच्या इंग्रज समाजापुरता मर्यादित होता. त्यामुळे या वृत्तपत्रांचा खप हा १००-२०० या आसपास असे. वृत्तपत्र मालक, संपादकासमोर केवळ ब्रिटीश वाचक वर्ग तोही संख्येने नगण्य असल्याने त्यातील मजकूर ब्रिटीश शासकांना आवडेल असाच होता. भारतातील ब्रिटीशांना इंग्लंडमधील पार्लेमेंटमधील चर्चेचे कुतूहल असल्याने ७-८ महिन्यांपूर्वीच्या जुन्या पार्लेमेंटमधील चर्चाही उत्सुकतेने वाचल्या जात. युरोपातील बातमीपत्रे, संपादकीय, वाचकांची पत्रे, क्वचित प्रसंगी काव्यही प्रकाशित करण्यात येत असे. जहाजांची ये-जा, येणाऱ्या-जाणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे, सराकारी जाहिरनामे, जाहिराती इ. मजकूर वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत असे. ज्या देशात हे ब्रिटीश रहात होते. उद्योग-व्यापार करत होते आणि सत्ताही चालवत होते त्या हिंदुस्थानातील जनतेचे जणू अस्तित्वच नाही, असे आरंभीच्या वर्तमानपत्रांचे स्वरूप होते. येथील घडामोडी, जनतेची सुख-दु:खे जीवन यांना या पत्रात अजिबात स्थान नव्हते. थोडक्यात युरोपीयन, अॅग्लो इंडियन लोकांचे मनोरंजन हाच आरंभीच्या वृत्तपत्रांचा प्रधान उद्देश होता व यातून जनमतही भडकण्याची भीती नसल्याने आरंभी या वृत्तपत्रांवर निर्बंध घालण्याचा प्रश्नच निर्माण झाला नाही. ब्रिटीशांकडून चालविल्या

जाणाऱ्या या आरंभिक वृत्तपत्रांमधून एक तयार नमुना उपलब्ध करून दिल्याने त्या अनुषंगाने वृत्तपत्राची निर्मिती, विकास करणे भारतीय वृत्तपत्रांना शक्य झाले. आरंभीची वृत्तपत्रे ही इंग्रजी समाजासाठी असली तरी इंग्रजांचा परिचय आणि त्यांची सत्ता प्रस्थापित असल्याने इंग्रजी भाषेची ओळख भारतीयांना झाली. सरकारची भाषा म्हणून सुशिक्षितांनी ती अवगत केली. त्यातून भारतीय व देशी भाषांतील वृत्तपत्र व्यवसायाचा आरंभ बंगालमध्ये झाला. [४]

**भारतीय देशी भाषिक पहिले वृत्तपत्र – बेंगाल गॅझेट :** इंग्रजांचा सत्ताकारणाचा पहिला घनिष्ठ संबंध हा बंगालशी आल्याने तेथूनच विचारमंथनास सुरुवात झाली. लोकसंवाद आणि प्रबोधनाचे वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम असल्याची जाणीव नवशिक्षित बंगाली तरुणांना झाली. बंगालात प्रादेशिक वृत्तपत्रविद्या वाढीचे प्रयत्न बंकिंगहॅमने केले. इ.स. १८१८ मध्ये 'कलकत्ता जर्नल' या पत्राची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्याचे स्वरूप राजकीय, व्यापारी, वाङमयीन गॅझेट असे करण्यात आले. बंकिंगहॅमनेच भविष्यकाळात वृत्तपत्रे ही हितवर्धक असल्याचे नमूद केले. वृत्तपत्र व्यवसायाची शास्त्रीय आणि निरपेक्ष चौकट उभी करून त्याने इंग्रजी व देशी भाषिक वृत्तपत्र व्यवसायात एक प्रभावी दुवा (link) म्हणून कार्ये केले. त्यावरून पुढील अनेक भारतीय भाषिक पत्रांनी प्रभावी प्रवास केला. इ.स. १८१८ पासून भारतीय वृत्तपत्र इतिहासात दुसरे पर्व सुरू झाले. आत्तापर्यंतचे सर्व वृत्तपत्रांचे संपादक हे विदेशी होते. परंतु १५ मे १८१८ मध्ये बंगाली व पहिले भारतीय भाषिक वृत्तपत्र 'बेंगाल गॅझेट' प्रसिद्ध करून गंगाधर भट्टाचार्य यांनी भारतीय भाषिक वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला. या वृत्तपत्राचा उद्देश व स्वरूप व्यापारी होते. या पत्रामागील प्रेरणा व प्रोत्साहन भारतीय प्रबोधनाचे अग्रदूत राजाराममोहन रॉय यांची होती. [५]

**वृत्तपत्रास अनुकूल मुंबईचे 'कॉस्मापॉलिटन' स्वरूप :** हिंदुस्थानात प्रादेशिक वृत्तपत्रांची वाढ होत असताना त्याचा प्रथम विस्तार बंगाल प्रांतात झाला व त्यानंतर मुंबई प्रांतात घडून आला. तरी मराठीऐवजी गुजराथी वृत्तपत्राच्या आरंभानंतर मराठी वृत्तपत्रांची वाटचाल सुरू झाली. गुजराथी वृत्तपत्र मुंबईत निघण्याचे कारण मुंबईतील मुद्रणाच्या सोयी व त्यात पारशी समाजाने आघाडी घेतली होती. शिक्षणातही पारसी समाज आघाडीवर होता व त्यांनी गुजराथी ही आपली स्वभाषा म्हणून स्वीकारली होती व वृत्तपत्रांसाठी आवश्यक साक्षरांचा वर्ग मुंबईत मुबलक होता. तसेच त्यातून गुजराथी वृत्तपत्राच्या निर्मितीनंतर मराठी वृत्तपत्रही मुंबईतच निघणे अपरिहार्य होते. पुणे जरी सांस्कृतिक राजधानी असली तरी जुन्या परंपरागत कल्पनांचा पगडा त्यावेळी पुण्यावर होता. याउलट मुंबई हे चोहोबाजूनी मराठी मुलखाने वेढले असूनही त्या शहरावर पाश्चात्य संस्कृतीची छाप आरंभापासून राहिली. मुंबईचे केवळ मराठी स्वरूप न राहता त्याला मिश्र स्वरूप प्राप्त झाले. एक व्यापारी शहर म्हणून मुंबई विकसित होत गेल्याने अशा शहरातील लोक नवीन गोष्टी चटकन स्वीकारतात. त्यातच शिक्षणाच्या वाढत्या व्यापकतेबरोबर गुजराथीप्रमाणे वृत्तपत्रासारखी साधने आपण निर्माण करावी, अशी इच्छा मुंबईतील मराठी समाजात निर्माण होऊ लागली. मुंबईच्या 'कॉस्मॉपॉलिटन' स्वरूपामुळे हिंदू, मुस्लिम, पारशी, ख्रिस्ती, गुजराथी असे अनेक धर्माचे, जातीचे लोक एकत्र आले. त्यातून १८७० पर्यंत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक सुधारणांच्या चळवळीचेही 'मुंबई' हेच केंद्र राहिले. [६]

**विल्यम चॅपलीनची मराठी वृत्तपत्रांबाबत भूमिका :** मराठीतील पहिले अधिकृत वृत्तपत्र म्हणून बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' पत्रास मान दिला जातो. परंतु 'दर्पण' पूर्वीही मराठी वृत्तपत्र काढण्याबाबत सूचना पुढे आल्या होत्या. मुंबई प्रांतातील पहिला गव्हर्नर जनरल माऊंट स्टुअर्स एलफिन्स्टन नंतर दुसरा गव्हर्नर जनरल विल्यम चॅपलीनने मराठी वृत्तपत्र काढण्याची सूचना केली होती. त्याबद्दल त्याचे अनुकूल मत तयार करण्याचे काम शनिवारवाड्यातील इंग्रजांचे निशाण फडकविणारा म्हणून कुप्रसिद्ध बाळाजीपंत नातू याने केली होती. परंतु अशा मराठी वृत्तपत्रातून कठोर लिखाण असता कामा नये, असे चॅपलीनचे मत होते.

**मराठीतील आद्य पत्र – मुंबापूर वर्तमान :** 'दर्पणच्या'पूर्वी एक मराठी वृत्तपत्र अस्तित्वात असल्याचा पुरावा मिळतो. त्या वृत्तपत्राचे नाव 'मुंबापूर वर्तमान' असे असून २० जुलै १८२८ रविवार रोजी त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला होता. हे पत्र प्रकाशित होणार असल्याची जाहिरात १ जुलै १८२८ च्या 'बॉम्बे गॅझेट'मध्ये प्रसिद्ध झालेली असून सदर गॅझेटची प्रत मिळाली आहे. परंतु या पत्राचा मालक, संपादक, प्रकाशक कोण होता, हे पत्र किती काळ चालले याचा काही पुरावा उपलब्ध होत नाही. परंतु या पत्राच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध झालेला एक लेख 'बॉम्बे गॅझेट'च्या अंकात प्रसिद्ध केला होता. 'बॉम्बे गॅझेट'मधील हीच गोष्ट 'एशिया जर्नल' या इंग्रजी दैनिकात पुनर्मुद्रित करण्यात आली व हा लेख 'मुंबापूर वर्तमान'मधून घेतल्याचा उल्लेखही आहे. [७] या बॉम्बे गॅझेटमधील ९ जुलै १८२८ च्या अंकात या वर्तमानपत्राची मराठी व इंग्रजीही जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यापैकी मराठी जाहिरातीत ''काही चांगल्या मनुष्यांची अपेक्षा होती म्हणोन महाराष्ट्र वर्तमानपत्र प्रकट करणे ती आजपर्यंत राहिली, परंतु सांप्रत तद्विषई पुर्तेपणि बंदोबस्त करून घ्या पत्रावरून सर्वांना सूचना करतो की, पुढील महिणा जुलैची तारीख २० या दिवशी ती पत्रं प्रसिद्ध होंवू पाहतात. त्यास ह्या कारणी जे साहित्य करण्यास हेतु धरताहेत, त्यांणी कृपा करून अखबार कबिसे गृहामध्ये पुनः

आपली अभिधाने अविलंबे पाठवावी आणि मागे मुंबे गॅझेटमध्ये केले होते त्याप्रमाणे सर्व धरून त्या पत्राचे नाम मुंबईच्या वर्तमान होते ते सोडून मुंबापूर वर्तमान असे ठरविले.''

हीच जाहिरात 'बॉम्बे कुरियर' या मुंबईतील आणखी एका इंग्रजी पत्रात ५ जुलै १८२८ प्रसिद्ध झाली होती.[८] परंतु हेच आद्य मराठी पत्र होते असेही निश्चितपणे म्हणता येणार नाही. 'बॉम्बे गॅझेट'च्या पत्राच्या प्रास्ताविकामध्ये 'एक नवीन मराठी वर्तमान पत्र' असा उल्लेख आहे. त्यामुळे त्यापूर्वीही असे पत्र निघत असण्याची शक्यता आहे.

या सर्व पुराव्यावरून मुंबापूर वर्तमान हे मराठी पत्र २० जुलै १८२८ पासून सुरू झाल्याचे निर्विवादपणे दिसते. परंतु पत्राचा चालक व संपादक, प्रकाशक, पत्राचा कालावधी याबाबत फारशी माहिती उपलब्ध होत नाही. तत्कालिक 'बॉम्बे गॅझेट', 'बॉम्बे कुरियर' ही इंग्रजी आणि 'मुंबईना समाचार' हे गुजराती पत्रांचा अभ्यास करता मुंबापूर वर्तमानपत्राबाबत माहिती मिळत नाही. त्याचप्रमाणे हे साप्ताहिक, पाक्षिक की मासिक याबाबतही माहिती स्पष्ट होत नाही. मात्र हे पत्र फार दिवस चालले नसावे, असा निश्चित तर्क निघतो. त्यामुळे बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' पत्रास मराठी वृत्तपत्र निर्मितीचे जनकत्व मिळते.

**मराठीतील अधिकृत आंग्ल–मराठी पत्र – 'दर्पण' :** बाळशास्त्री जांभेकर हे मराठीतील अधिकृत पहिले वृत्तपत्रकार, पहिले मासिककार, पहिले परिभाषानिर्माते, पहिले शाळातपासणीस, पहिले प्राचार्य, पहिले शुद्धीकरणकर्ते, पहिले समाजसुधारक, पहिले इतिहाससंशोधक, ज्ञानेश्वरीचे पहिले प्रकाशक असे मराठीतील अनेक 'पहिल्या' गोष्टींचे जनकत्व आचार्य बाळशास्त्री जांभेकरांकडे जाते. १८१२ ते १८४६ असे अवघे ३४–३५ वर्षाचे अल्पायुष्य लाभलेल्या जांभेकरांना मराठी, इंग्रजी, बंगाली, संस्कृत, कन्नड अशा एकूण नऊ भाषा अवगत होत्या. तसेच भाषाज्ञान, इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, पुरातत्त्व अशा विविध विषयांत त्यांचा रस होता. त्यांच्या प्रचंड विद्वत्तेविषयी बॉम्बे टाईम्स, कुरिअर, ज्ञानोदय, ओरिएन्टल ख्रिश्चन स्पेक्टेटर, मुंबई सुप्रिम कोर्टाचे न्यायाधीश सर टी. ई. पेरी, डॉ. विल्सन, न्या. चंदावरकर व असंख्य नियतकालिकांनी, थोर व्यक्तींनी गौरवोद्गार काढले आहेत.

बाळशास्त्रीच्या पत्राचे 'दर्पण' हे नाव, त्याचा एकूण साचा यात अनुकरणाची शक्यता दिसते. बंगालात 'समाचार दर्पण' हे पत्र मिशनऱ्यांनी सुरू केले होते व जांभेकरांना बंगाली भाषा ज्ञात असल्याने त्याच्या ते वाचण्यात आले असण्याची शक्यता आहे. कारण मराठी दर्पण प्रमाणेच बंगाली 'समाचार दर्पण'मध्ये इंग्रजी व बंगाली मजकूर परस्पर समोरासमोर येत असे. वयाच्या २० व्या वर्षी जांभेकरांनी हरिश्चंद्र जनार्दन वासुदेव यांचे सहकार्य आरंभापासून लाभले. दर्पणची सर्वप्रथम घोषणा/प्रस्ताव (प्रॉस्पेक्टस्) हे १२ नोव्हेंबर १८३१ ला झाली. त्यात स्पष्ट केले होते की, ''स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी नि येथील लोकांचे कल्याण, याविषयी स्वतंत्रतेने व उघड रितीने विचार करावयास स्थळ व्हावे, म्हणून 'दर्पण'पत्र सुरू करण्यात येत आहे.'' त्यापुढे संपादकीय धोरण स्पष्ट केले आहे.

'दर्पण' पत्राचा पहिला अंक शुक्रवार ६ जानेवारी १८३२ रोजी बाहेर पडला. प्रथम काही महिने पत्र पाक्षिक होते. परंतु वाचकांच्या मागणीने ४ मे १८३२ पासून ते साप्ताहिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. या साप्ताहिकाच्या प्रत्येक पृष्ठास दोन स्तंभ होते. डावीकडे इंग्रजी मजकूर असे व त्याचेच भाषांतर उजवीकडील स्तंभात देत असत. पत्राचा आकार १९□११ इंच असून आठ पाने देण्यात येत. याची त्रैमासिक वर्गणी सहा रुपये होती. बाळशास्त्री हे आरंभीच्या अंकांवरती संपादक म्हणून छापले असून हरिश्चंद्र जनार्दन वासुदेव हे त्यांचे सहकारी होते. रघुनाथ हरिश्चंद्र व जनार्दन वासुदेव हे त्यांचे सहकारी होते. रघुनाथ हरिश्चंद्रजी दर्पणचा आर्थिक व्यवहार पाहत दर्पण पत्रास कोणताही विषय वर्ज्य नव्हता. हिंदू विधवांचा पुनर्विवाह, धंदे शिक्षणाची आवश्यकता, बंगाली रंगभूमी, रहदारी–जकात असे अनेक विषय दर्पणमध्ये असत. वाचकांच्या पत्रव्यवहारासही दर्पणमध्ये आरंभापासून स्थान होते. क्वचित संपादकीय उत्तरासहीत पत्रे प्रसिद्ध होत असत. अत्यंत स्पष्टपणे वाचक आपली मते मांडत असत. स्तुतीपत्रे कटाक्षाने टाळली जात. 'दर्पण'चा उल्लेख आणखी एका वेगळ्या कारणाने केला जातो. मानधन न घेता जांभेकरांनी या पक्षाचे संपादकपद पाहिले व मराठी वृत्तपत्रसृष्टीत एक नवा आदर्श निर्माण केला. तरीही स्वस्पर्शी वृत्तांमुळे दर्पणने वेगळेपण निर्माण केले होते. अल्पावधीत दर्पणने ३०० च्या वर खपाचा आकडा गाठला. त्यावेळची अत्यल्प साक्षरता, वृत्तपत्र हा नवीन उपक्रम त्यामुळे पैसा खर्च करून वृत्तपत्र वाचणारे अत्यल्पच होते.[९] एक पत्र अनेकांकडून वाचले जाई. त्यावेळच्या कोणत्याही वृत्तपत्राचा खप ३०० ते ४०० च्यावर जात नसे. त्यामुळे दर्पणचा हा खप त्या काळाच्या तुलनेने चांगला होता. 'वृत्त' देण्याचे स्वरूप समजण्यासाठी खालील छोटी दर्पणमधील 'बातमी' अभ्यासणीय ठरते.

**या देशचे लोकांतून मोठ्या सरकारी जगांवर नेमणुका**

राज्यकारभारातील कित्येक खात्यात विश्वासाचे, अबरूचे आणि जोखिमाचे जगावर या देशचे लोकांस नेमले असता चांगले राजनीतीस योग्य आहे किंवा नाही, या गोष्टीचा विचार एथील सरकार आणि कोर्ट ऑफ डायरेक्टर याणी बहुत वेळा केला आहे.....तथापि आजून या देशांतील लोकांतून कोणाची नेमणूक मोठ्या जागेवर झाली नाही.(दर्पण दि.२ मार्च १८३२)

परंतु एका बदनामी खटल्यावरून जांभेकरांना ८०० रु. दंड भरावा लागला. त्याचाही मोठा फटका दर्पणला बसला. या मराठीतील आद्य वृत्तपत्राने भारतीय जनतेच्या आशा-आकांक्षा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. शिवाय भारतीय जनतेची भूमिका ब्रिटीशांना कळावी हाही दर्पणचा प्रधान हेतू होता. सरकार व प्रजा यांच्यातील दुव्यांचे कार्य करण्याच्या उद्देशानेच दर्पणकारांनी बातम्या इंग्रजी व मराठीत देण्याची पद्धत अवलंबिली असावी. हे लोकप्रिय आणि प्रतिष्ठित म्हणून स्थापित होत असताना अचानक २६ जून १८४० च्या अंकात 'Last Farewell' हे निरोपाचे संपादकीय लिहून वाचकांचा निरोप घेण्यात आला. यातून पत्र बंद करण्याबाबतची संदिग्धता कायम राहिली. दर्पण पत्र बंद करण्यापूर्वी १ वर्षे अगोदर जांभेकरांनी 'दिग्दर्शन' नामक मराठी भाषिक मासिक काढण्याचा संकल्प केला होता. हे केवळ मराठीतीलच पहिले मासिक नसून पश्चिम भारतातील इतर देशी भाषांमधील हा पहिलाच प्रयोग होता. हे मासिक मे १८४० मध्ये सुरू झाले. ते मुख्यत्वे भौतिकशास्त्राचे ज्ञान मिळविण्यासाठी कार्यरत होते. त्याव्यतिरिक्त साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान याचेही लेख त्यात प्रसिद्ध होत.[१०] एकूणच अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया आरंभापासूनच वैचारिक प्रगल्भतेवर घातल्याने भविष्यात त्याची वाटचाल गतीने झाली. त्यामुळे मुंबापूर वर्तमान हे आद्य वृत्तपत्र असले तरी अधिकृतरित्या बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' पत्रास त्याच्या भक्कम पुराव्यांमुळे मराठी आद्य वृत्तपत्राचा मान मिळतो.

**संदर्भ टीपा :**

१. केळकर न. चि., 'मराठे व इंग्रज, प्रस्तावना लेखक' वासुदेवशास्त्री खरे, श्री साई प्रकाशन, पुणे (द्वितीय आवृत्ती) २००१, पृष्ठ क्र. ३.
२. मेनन संगीता (अनु. संजय तांबट), कहाणी 'टाईम्स ऑफ इंडिया'ची, मंजुल पब्लिकेशन हाऊस भोपाळ (प्रथम आवृत्ती) २०१४, पृष्ठ क्र. १७.
३. लेले रा. के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन (द्वितीय आवृत्ती) २००४, पृष्ठ क्र. २७, २८.
४. नटराजन जे. - हिस्ट्री ऑफ इंडियन जर्नालिझम, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली, १९९३, पृष्ठ क्र. ७.
५. ग. बा. सरदार, 'राजर्षि शाहू महाराजांच्या विचारांची दिशा', राजर्षि शाहू गौरव ग्रंथ, संपा. पी. बी. साळुंखे, मुंबई १९७६, पान क्र. ४५६.
६. लेले रा. के., उपरोक्त, पृष्ठ क्र. ५६.
७. मुख्य वृत्त 'मुंबई दर्पण नव्हे' 'मुंबई वर्तमान' पहिले मराठी वृत्तपत्र, नवा प्रकाशझोत, पान क्र. ३, रविवार १६ जुलै १९९०, दै. तरुण भारत.
८. लेले रा. के., उपरोक्त पान क्र. ५५, ५६.
९. जोशी सु. ह., मराठी पत्रकारिता, पहिली पाऊले, डायमंड प्रकाशन, पुणे २००९, पान क्र. १.
१०. जोशी वि. कृ., लेले रा. के., उपरोक्त पान क्र. २९३.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi<br>Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

# राष्ट्र उभारणीतील गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाचे योगदान

**डॉ. संभाजीराव आनंदा मोरे**
इतिहास विभाग प्रमुख,
म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी,
ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर.

महात्मा गांधीजीचे राजकीय गुरू, उत्तम अध्यापक, संसदपटू, नेमस्तवादी, राजकीय नेते, कष्टाळूपणा, नि:स्वार्थीपणा, देशप्रिती आणि सर्व्हट्स ऑफ इंडिया सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष ही गोपाळ कृष्ण गोखल्यांची कामगिरी होय. स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी असणाऱ्या व्यक्तीमध्ये गोपाळ कृष्ण गोखल्यांचे नाव आदराने घेतले जाते. भारतीय राष्ट्रकार्यामध्ये अमूल्य व महत्वपूर्ण कार्य करणारा समाज म्हणजे 'भारत सेवक समाज' होय. देशसेवेच्या कोणत्याही शाखेमध्ये व भारताच्या प्रगतीसाठी देशसेवक उभा करणारा समाज म्हणजे 'भारत सेवक समाज' होय. भारत सेवक समाजाने देशसेवला साम्राज्यांतर्गत स्वराज्याला वाहून घेतले होते. देश बांधणीच्या कार्यात समर्पित वृत्तीने सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांची, प्रशिक्षित व्यक्तींची गरज असते.म्हणून त्यांनी देशसेवेसाठी कार्यकर्ते निर्माण करणारी 'भारत सेवक समाज' ही संस्था स्थापन केली. सदर शोधनिबंधात भारत सेवक समाजाने राष्ट्रबांधणीमध्ये जे महत्वपूर्व योगदान दिले आहे.त्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात भारत सेवक समाजासाठी गोखलेंच्या योगदानाचा अभ्यास करणे, निधी संकलन करून इमारत व समृध्द ग्रंथालयाची उभारणी कशी केली, भारत सेवक समाज कसा नावारूपाला आणला, टिकाकारांच्याबाबत गोखल्यांची भूमिका काय होती आणि राष्ट्र बांधणीमध्ये भारत सेवक समाजाने कोणती भूमिका पार पाडली याचा आढावा संदर्भग्रंथाच्या माध्यमातून घेतला आहे.

गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे, १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यात कोतळूक येथे झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली.[१] ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य, सुधारकचे संपादक, मुंबई विद्यापीठाचे फेलो, मुंबई प्रांतिक कायदे मंडळाचे सभासद व भारत सेवक समाजाचे संस्थापक होते.

देशापुढील विविध प्रश्नांचा अभ्यास होण्याची गरज होती. यासाठी सुशिक्षित तरूणांची संस्था स्थापन करावी आणि समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र या सर्व अभ्यासाला जागतिक अभ्यासाची जोड घावी.[२] राष्ट्राच्या सेवेसाठी प्रामाणिक, निष्ठावंत आणि त्यागी भावनेने कार्य करणारे सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तयार करणे.[३] आपला समाज स्वायत्तेचा उपभोग घेण्यासाठी लायक बनवायचा तर नि:स्वार्थी अशा समाज सेवकांची एक संस्था निर्माण केली पाहिजे असे गोखल्यांना वाटत होते. आणि याच हेतूसाठी त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली होती. स्वत:चे सुखी जीवन सोडून व नोकरीचा त्याग करून देशसेवेचा एक मार्ग त्यांनी आपल्यासमोर घालून दिला. हे त्यांचे देशसेवेसाठी केलेले योगदान विसरता येणार नाही.[४] दुष्काळ निवारण, दलितांची सेवा व उद्दार, शिक्षण प्रसार व हिंदू मुस्लीम ऐक्य यासारख्या उद्दिष्टांना डोळ्यासमोर ठेवून भारत सेवक समाजाची त्यांनी स्थापना केली.[५]

**भारत सेवक समाज सदस्यांची शपथ :**

१.माझ्या डोळ्यापुढे सदैव देशाच्याच कल्याणाची गोष्ट प्रथम राहील. माझ्याकडे जे काही उत्कृष्ट आहे, ते ते सर्व मी आपल्या देशाच्या सेवेत अर्पण करीन.
२.देशसेवा करताना माझ्या मनाला स्वार्थाचा लवलेशही होऊ देणार नाही.
३.सर्व हिंदी लोकांना मी भाऊ असे समजेन व सर्वांच्या उन्नतीसाठी पंथ व जात बाजूस ठेवीन.
४.माझ्या कुटुंबासाठी 'भारत समाज सेवक' जे काही देईल त्यातच मी आनंद मानीन.
५.मी माझे खाजगी आचरण पवित्र ठेवीन.
६.मी कोणाबरोबरही खाजगी व्यक्तीगत भांडणे करणार नाही.
७.भारत सेवक समाजाचे ध्येय मी सतत डोळ्यासमोर ठेवीन.[६]

प्रत्येक नवीन सभासदाला भारत सेवक समाजामध्ये सहभागी झाल्यानंतर पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा घ्यावी लागे. 'देशभक्ती, नि:स्वार्थीपणा सर्व भारतीयांबद्दल प्रेमभाव, समाज देऊ शकेल तेवढ्यावरच स्वत:ची व कुटुंबाची गुजराण, परस्पर मैत्रीभाव, शुध्द आचरण, व्यक्तीगत भांडण, तंटे बंद ही भारत सेवक समाजाची सर्व उद्दिष्टे मनात ठेवून वर्तन करणे.'[७]

**सभासदांसाठीचे नियम :**

१.भारत सेवक समाजाच्या उमेदवाराने पहिली पाच वर्षे अभ्यास करावा.२. सभासदाने अभ्यासाखेरीज आठवड्यातून दोनदा भरणाऱ्या सभांपैकी एका सभेत निबंध वाचन व दुसऱ्या सभेत वादविवाद करावयास हवा.३. नव्या सदस्याने एक वर्ष देशभर फिरून लोकस्थितीचा अभ्यास करावा. सदर काळात आदेश, संदेश, उद्देश, भाषणे हे सर्व वाणीचे प्रकार वर्ज्य करावेत.[८]

भारत सेवक समाजाची गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापना केल्यानंतर पोटच्या पोरापेक्षा त्यांनी या संस्थेला प्रिय मानले आणि तिला चालती बोलती व्यक्ती करण्यासाठी अहोरात्र कष्ट केले. संस्थेच्या सेवकाला पहिली पाच वर्षे अभ्यासात खर्च घालावी लागत. त्यासाठी गोखले यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपासून जे जे काही कंपनीमार्फत व स्वतंत्रपणे प्रसिध्द झाले, ते त्यांनी ग्रंथालयासाठी जमा करून त्याचा संग्रह केला.[९] चोवीस सभासदांना दीक्षा देऊन आंतरराष्ट्रीय राजकारणात संघटना नावारूपाने विधायक कार्य करण्याची पात्रता त्यांनी निर्माण केली. अनेक शाखा स्थापन करून सभासदांना राहण्याची जागा, ग्रंथसंग्रह, छापखाना व वृत्तपत्रे एवढी साधने अस्तित्वात आणली.[१०] ना.गोपाळ कृष्ण गोखलेंच्या भारत सेवक समाजास जाऊन मिळावे असे म.गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद यांच्या मनात आले होते. यातच भारत सेवक समाजाच्या जीवन हेतूचे रहस्य साठविलेले आहे.[११]

गोपाळ कृष्ण गोखले यांचे आयुष्य सेवकाच्या उपासनावृत्तीने स्वत:हून लादलेल्या आत्मसंयमाने, सार्वजनिक कार्यकर्त्याच्या दूर्दम्य राष्ट्रभक्तीने, मिशनऱ्यांच्या अथक उद्यमाने आणि बालकाच्या निरागसतेने परिपूर्ण होते.[१२] उदारमतवादी तत्वज्ञानाचा त्यांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडलेला होता. ते नेहमी म्हणत, आपली सार्वजनिक जीवनातील प्रत्येक गोष्ट ही नैतिक ध्येयाने प्रेरित असली पाहिजे. त्यांनी सामाजिक व राजकीय जीवनामध्ये नैतिकतेला सर्वात जास्त महत्व दिले. खरोखरच भारत सेवक समाजाने सर्व प्रांतातील नवोदित कार्यकर्त्यांच्या स्वार्थत्यागाला व सेवावृत्तीला एक कार्यक्षेत्र निर्माण करून दिले हे सत्य आहे.[१३] म.गांधी गोखलेंना खूप मान देत व प्रत्येक कृतीतून त्यांचा आदर करीत व आपण सत्यनिष्ठ नायकाच्या शोधात होतो व तो आपणास गोखले यांच्यामध्ये सापडला असे ते म्हणत होते.

गोखले देश हेच दैवत मानून देशसेवेसाठी स्वार्थत्यागाने आयुष्यभर झटले. भारत सेवक समाज सर्वस्वी धर्मनिरपेक्ष, सर्वसमावेशक, पवित्र, समानता, नि:स्वार्थी, सहकार्ययुक्त, जाती, पंथ, भाषा इ. आदर ठेवणारा होता. भारत सेवक समाजाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण प्रसारासाठी नि:स्वार्थी कार्यकर्ते, दलितांची सेवा व उध्दार, दुष्काळ निवारण, हिंदू मुस्लीम ऐक्य, राष्ट्रीय जीवनाला बळकटी आणण्यासाठी प्रयत्न केले. सार्वजनिक कार्यास वाहून घेण्याची त्यांची तयारी देशभक्तासारखी होती. देशाच्या उज्वल भवितव्यासंबंधी त्यांना विश्वास होता म्हणूनच भारत सेवक समाजातून आपल्या सदस्यांना शपथेद्वारे सार्वजनिक जीवनाच्या पावित्र्याला महत्व देऊन सक्षम राष्ट्रबांधणीला हातभार लावला. म्हणूनच महात्मा गांधीजींनी गोखलेंच्या मृत्यूनंतर उपवास केला व वर्षभर पायात पादत्राणे न घालण्याचा निश्चय केला.[१४]

प्रजेला सुख लाभेल असा शासनाचा राज्यकारभार असावा यासाठी गोखले यांनी भारत सेवक समाजाच्या व्यासपीठावरून नेहमी विचार मांडले होते. देशसेवेसाठी, समाजसेवेसाठी, नि:स्वार्थी कार्यकर्ते निर्माण करणारी संस्था म्हणजे भारत सेवक समाज होता. भारतीय समाज सुधारणेचा वेग वाढावा, देश बलवान व्हावा, युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा अशी त्यांची दृष्टी होती. त्यातूनच महसूल, बँक, शेती, उद्योग, व्यवस्थापन व स्वराज्य संस्था यासाठी त्यांनी ठोस पावले उचलली व बदलासाठी सर्व शक्ती पणाला लावली.[१५] त्यातूनच राष्ट्रबांधणीस चालना मिळून सक्षम भारत निर्माण होण्यास मदत झाली.

गोपाळ कृष्ण गोखले खरेखुरे भारत सेवक होते. पद्दलितांचा उध्दार कसा करावा, देशाचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याचा विचार त्यांनी आयुष्यभर केला व त्याचसाठी भारत सेवक समाजाच्या माध्यमातून राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासासाठी आयुष्यभर झटले. भारतीय सार्वजनिक जीवनात असणाऱ्या निराशेला दूर करण्याच्या उद्देशानेच त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. 'सुशिक्षित भारतीयांनी देशसेवेसाठी स्वत:वर एक प्रकारचा कर लादून घ्यावा, हा कर पैशातून नसून देशसेवेसाठी माणसे निर्माण करण्याच्या स्वरूपाचा असावा' हे त्यांचे वचन आजही अमर आहे.[१६] यातूनच राष्ट्रबांधणीबाबत गोखलेंचा विचार किती आशयगर्भ होतो याचा आजही प्रत्यय येतो. म्हणूनच लोकमान्य टिळक गोखलेंना श्रध्दांजली वाहिली त्यावेळी म्हणाले होते, 'हा हिंदुस्थानचा हिरा, महाराष्ट्राचे रत्न आणि कार्यकर्त्याचा राजपुत्र या स्मशानभूमीत चिरनिद्रा घेत आहे. त्यांचे दर्शन घ्या आणि त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करा.'[१७]

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

**सारांश :**

भारत सेवक समाजाच्या माध्यमातून गोपाळ कृष्ण गोखले यांनी केलेले कार्य सर्वश्रेष्ठ आहे. त्यांनी लोकशिक्षणातून समाज जागृती केली. भारतीय सनदशीर राजकारणाला महत्व प्राप्त करून दिले. भारताच्या सार्वजनिक जीवनाला एक नैतिक व उदारमतवादी अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे महान कार्य त्यांनी केले. ना.म.जोशी, काकासाहेब लिमये, श्रीनिवास शास्त्री, पं.हृदयनाथ कुंझरू अशा व्यक्ती भारत सेवक समाजाने घडविल्या. त्यांनीही आपल्या कार्याने भारत सेवक समाजाला प्रतिष्ठा मिळवून देऊन एक आदर्श भारत देश घडविण्याचा प्रयत्न केला.

आज सर्वच क्षेत्रात घोटाळ्याचे राजकारण दिसत आहे. प्रामाणिकपणाचा अभाव दिसतो आहे. समाजसेवेची आवड असणाऱ्यांनी आपल्या व्यासंगाचा पाया भक्कम ठेवला पाहिजे. नि:स्वार्थी, उदारमतवादी समाजकारणाचा मार्ग स्विकारला पाहिजे आणि त्याचसाठी गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून कार्य केल्यास विकसित देश व्हावयास वेळ लागणार नाही.

**संदर्भ :**

१. टोपे त्र्यंबक कृष्णराव : नामदार गोपाळ कृष्ण गोखले : जीवन परिचय, गोखले एज्युकेशन सोसायटी,नाशिक, १९८३.
२. तळवलकर गोविंद : नेक नामदार गोखले, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, २००३, पृ. ३७७.
३. दै. लोकमत, दि.१५ ऑगस्ट, २००९.
४. वैद्य सुमन आणि शांता कोटेकर : आधुनिक भारताचा इतिहास, नागपूर, २००८, पृ.४१२.
५. महादेव शास्त्री जोशी (संपा.) : भारतीय संस्कृती कोश, पुणे, १९९९, पृ.१२५.
६. सानेगुरूजी : ना.गोपाळ कृष्ण गोखले, रिया पब्लीकेशन, कोल्हापूर, २०११, पृ.१६७.
७. कुलकर्णी प्रसाद (संपा.) : प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, २०१५, पृ.१७.
८. भोळे भास्कर : आधुनिक भारतातील राजकीय विचार, नागपूर, २००३, पृ.२०९.
९. फाटक न.र. : आदर्श भारत सेवक समाज गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र, मौज प्रकाशन, मुंबई, १९६७, पृ.७८.
१०. गोखले पु. पां. : ना. गोपाळ कृष्ण गोखले, नीळकंठ प्रकाशन, पुणे, १९६६, पृ.७७.
११. कित्ता, पृ. ७९.
१२. भोळे भास्कर : उपरोक्त, पृ.२१०.
१३. प्रधान ग.प्र. : स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, पुणे, १९९६, पृ.६२.
१४. मोरे सदानंद : लोकमान्य ते महात्मा (खंड १), पुणे, २००७, पृ.२३४.
१५. लोकराज्य, मार्च, २०१५, पृ.३४.
१६. गद्रे दि. का. : आधुनिक भारतीय राज्यविचार, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७५, पृ.७७.
१७. वाळिंबे वि.स. : सत्तावन ते सत्तेचाळीस, पुणे, १९६७, पृ.४९२.

# राष्ट्र निर्माते : पांडुरंग सदाशिव साने

**प्रा.डॉ.तानाजी रामचंद्र हवलदार**
इतिहास विभाग प्रमुख
विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि
बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा

भारताला स्वातंत्र्य मिळण्याअगोदर व मिळाल्यानंतरही अनेक थोर नेत्यांनी राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्वपूर्ण कार्य केले आहे. पांडुरंग सदाशिव साने म्हणजेच सानेगरूजी हे भारतीय स्वतंत्र्यसैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, थोर मराठी सहित्यीक होते. त्यांनी राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्वाचे योगदान दिले आहे. सानेगुरूजी यांचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्हयामध्ये दापोली गावाजवळ पालगड या गावी २४ डिसेंबर १८९९ रोजी झाला. वडीलांचे नाव सदाशिव व आईचे नाव यशोदाबाई असे होते. आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव सानेगुरूजी यांच्यावर होता.

सानेगुरूजी यांचे प्राथमिक शिक्षण दापोली येथे झाले. पुढील शिक्षणासाठी ते मामाकडे पुणे येथे गेले. परंतु काही दिवसातच दापोलीस परत आले. दापोली येथे माध्यमिक शिक्षण चालू असताना कौटुंबिक अडचणीमुळे त्यांनी शिक्षण बंद केले. नोकरी स्विकारली. मात्र मित्राच्या शिफारसीने पुन्हा औंधच्या शिक्षण संस्थेत प्रवेश घेतला. औंधमध्ये प्लेगची साथ आल्याने सर्व विद्यार्थी घरी पाठविले गेले. सानेगुरूजी देखील पुणे येथे मामाकडे गेले. पुण्यामध्ये नूतन मराठी विद्यालयामध्ये प्रवेश घेतला. १९१८ साली उच्च माध्यमिक परीक्षा पास झाले. न्यू पूना कॉलेज मधून मराठी व संस्कृत या दोन विषयामध्ये बी.ए. व एम.ए.ची परीक्षा पास झाले. तत्वज्ञान विषयामध्येही पदवी संपादन केली. शिक्षण पूर्ण झालेनंतर खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या अमळनेर मधील प्रताप हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्विकारली. १९२४ ते १९३० या कालखंडात तेथे कार्यरत होते. या कालखंडात त्यांनी वस्तीगृहाचे अधिक्षक म्हणूनही काम केले. अधिक्षक असतांना विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. महात्मा गांधीजीच्या विचारांचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर होता.

**सानेगुरूजींचे लेखन कार्य :-** सानेगुरूजी यांनी विपुल लेखन केले आहे. साधी सरळ ओघवती भाषा, भावपूर्ण संस्कारक्षम निवेदनशैली हे त्यांच्या लेखणीचे विशेष गुण होते. अनेक कथा, कादंब-या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यामधून त्यांची संवेदनशिल साहित्यीक ही बाबा दिसून येते. *'श्यामची आई', 'नवा प्रयोग', 'सुंदर पत्रे', 'हिमालयाची शिखरे', 'क्रांती', 'समाजधर्म', 'आपण सारे भाऊ'* या सारख्या अनेक प्रसिध्द साहित्याची निर्मिती केली. सानेगुरूजी यांनी जवळ जवळ १३५ पुस्तकांचे लेखन केले. पैकी एकूण ७३ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. विद्यार्थी दशेत *'विद्यार्थी'* नावाचे मासिक प्रकाशित केले. ते अतिशय लोकप्रिय झाले. सन.१९३८ ला त्यांनी 'कॉंग्रेस' हे दैनिक सुरू केले. त्याचे शिर्षकावर *'कॉंग्रेस मायबाप! जातील सर्व ताप'* असे वचन छापलेले असे. १९३७ मध्ये त्यांनी *'सोन्या मारूती'* ही कादबंरी लिहली. त्यामधून त्यांनी रा.स्व.संघाच्या संकुचित तत्वाज्ञानाला विरोध केला. श्रमिकांच्या एकीचे महत्व विशद केले. सन. १९४८ साली त्यांनी *'साधना'* हे मासिक चालू केले. आजआखेर ते चालू आहे. सानेगुरूजी यांच्या अनेक कविता देशभक्तीपर होत्या. *'पत्री'* या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून त्यांनी देशभक्तिपर कविता प्रसिध्द केल्या. त्यातीलच *'बलसागर भारत होवो'* यासारख्या कवितांनी जनतेमध्ये मोठया प्रमाणात जागृती निर्माण केली. या कवितेचा वाढता प्रभाव पाहून ब्रिटिश सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या होत्या. *'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे',* या कवितेतून त्यांनी मानवतेची शिकवण दिली.

**स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग :-** सानेगुरूजी यांचा प्रथम पासूनच स्वातंत्र्य चळवळीकडे ओढा होता. महात्मा गांधी यांनी १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. सानेगुरूजींवर महात्मा गांधी यांचा प्रभाव होता. सानेगुरूजींनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाले. सन.१९३० ते १९४७ या कालखंडात सानेगुरूजींनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेतला. सन.१९३२ मध्ये विनोबा भावे यांचे बरोबर तुरूंगात होते. एकूण आठ वेळा त्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली. धुळे, त्रिचनापल्ली, नाशिक, येरवडा आणि जळगाव इ. ठिकाणी कारावास भोगावा लागला. एकूण सहा वर्षे सात महिने इतका कालखंड तुरूंगात होते. स्वातंत्र्यासाठी सात वेळा अन्नत्याग करून उपोषण केले. त्रिचनापल्ली येथे तुरूंगात असताना चंद्रोदय भट्टाचार्य यांच्या बरोबर संबध आला. त्याच्याकडून बंगाली भाषा अवगत केली. पुढे तमिळ भाषाही शिकले. दुष्काळात शेतक-यांची करमाफी व्हावी म्हणून विशेष प्रयत्न केले. जळगाव जिल्हयातील १९३६ सालचे फैजपूरचे अधिवेशन यशस्वी व्हावे म्हणून विशेष प्रयत्न केले. १९४२ ला भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार व प्रसार केला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्र सेवा दालाची स्थापना केली. अशा प्रकारे सक्रियपणे अखेरपर्यंत राष्ट्रकार्यात सहभागी होते.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

**आंतरभारती चळवळ :-** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सानेगुरूजी समाजवादी पक्षात सामील झाले. आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात, प्रातां-प्रातांतील भेद नष्ट व्हावेत असे या चळवळीत अभिप्रेत होते.

**जाती निर्मुलनातील कार्य :-** महात्मा गांधी यांचेबरोबरीने १९४७ साली संपूर्ण भारतभर फिरून जाती निर्मुलनाचे काम सानेगुरूजी यांनी केले. पंढरपूरामध्ये सनातन लोक अस्पृश्यांना मंदीरामध्ये जाण्यास परवानगी देत नव्हते. अस्पृश्यांना पंढरपूरचे विठ्ठल मंदीर उघडण्यासाठी सानेगुरूजी यांनी दौरा केला. सनातनवाल्यांनी ऐकले नाही. परिणामी सानेगुरूजीनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. दि. ०१ मे ते ११ मे १९४७ या कालखंडात त्यांनी उपवास केला. सनातनवाल्यांनी नमते घेतले व मंदीराचे दरवाजे अस्पृश्यासाठी उघडले गेले. सानेगुरूजी यांनी लिहलेल्या *बेबी सरोजा, करूणादेवी, मिरी* या कादंबरीतून त्यांनी अस्पृश्यांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. 'अस्पृश्योध्दार' नावाची एक नाटीकाही त्यांनी लिहली. *'ते आपले घर'* ही नाटीका त्रिचन्नापल्लीच्या तुरूंगात असताना लिहली. समाजसुधारणा करणारा राजा आणि सनातनी दिनकरराव या दोघामधील संघर्ष यामध्ये दाखवला आहे. अस्पृश्यता फक्त कायदयाने दुर होणार नाही तर ती पालन करणा-याचे मन बदलले पाहीजे असे त्यांचे मत होते.

सानेगुरूजी यांचा मृत्यू ११ जून १९५० रोजी झाला. आयुष्याच्या अखेरपर्यंत समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यासारख्या अनिष्ठ रूढी व परंपराना त्यांनी विरोध केला. सानेगुरूजींच्या व्यक्तिमत्वातून पुढील पिढीतील अनेक थोर व्यक्तित्व घडली गेली त्यामध्ये एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, मधु दंडवते, ग. प्र. प्रधान, प्रकाशभाई मोहाडीकर, यदुनाथ थत्ते, राजा मंगळवेढेकर, रा.ग. जाधव इ. समावेश होतो. लेखक, शिक्षक, कार्यकर्ता, वक्ता, स्वातंत्र्यसैनिक, समाजसेवक अशा अनेक भूमिका साने गरूजी यांनी पार पाडल्या. त्यांच्या बाबत अचार्य अत्रे म्हणतात-

***"ज्ञानेशाची ओवी, तुकारामाचा अभंग, मोरोपंताची आर्या, तसेच गुरूजींच्या गोष्टी मराठी साहित्यात अनंत कालपर्यंत टिकतील"***

**संदर्भ ग्रंथ यादीः-**

1) राजा मंगळवेडेकर, *साने गुरूजींची जीवनगाथा,* साधना प्रकाशन, पुणे १९७५
2) चैत्र रेडेकर, *साने गुरूजी,* गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०११.
3) विनोबा भावे, *प्रेमाने हलविले वर्धा,* परमधाम प्रकाशन, १९९७.
4) सुधा बोडा, *सानेगुरूजींचा मंदिर प्रवेश,* बडोदा, १९९७.
5) चंपा लिमये (संपा), *साने गरूजींची अप्रकाशित पत्रे*
6) पु.ल.देशपांडे, *मातृहृदयी साने गुरूजी,* १९७०
7) नरहर कुरूंदकर, *साने गरूजींचे साहित्य,* साधना, ९ जून, १९७३
*8)* ना.ल.वैध, *साने गरूजीःव्यक्ती आणि वाड्ःमय*
9) ग.प्र.प्रधान, *साने गुरूजींची पुनर्भेट,* साधना, ११ जून, १९९४.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi<br>Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढयात दिलेले योगदान

**प्रा.पी.आर.फराकटे**
इतिहास विभाग प्रमुख
सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड जि.कोल्हापूर

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य क्रान्तीकारकानी स्वतःला झोकनू दिले होते. त्यापैकी महान स्वातंत्र सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या माध्यामातून स्वातंत्र लढयात दिलेले योगदान अन्यय साधारण महत्वाचे होते. इ.स. १८८५ रोजी थोर विचारवंत उमेषचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षेखाली अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. ही घटना हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासात अभूतपूर्व कलाटणी देणारी ठरली. कारण राष्ट्रीय कॉंग्रेस ही देशपाळीवर स्थापना झालेली पहिलीच राजकीय संघटना असून तिनेच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले किंबहुना स्वातंत्र्यही मिळवून दिले. कॉंग्रेसच्या वाटचालीत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या पद्धतीवरून तीन स्वतंत्र विचारसणीचे गट उदयास आले होते ते म्हणजे मवाळ, जहाल, आणि सशस्त्र क्रांतीकारक हे होय. महात्मा गांधीच्या कालखंडात गांधी -नेहरू कॉंग्रेसचा स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग मान्य नसणारे अनेक लढवय्ये नेते पुढे आले. त्यापैकीच एक म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस होयं गांधींजींच्या बद्दल अत्यंत आदर असला तरी सुभाषबाबुंना त्यांचा स्वातंत्रयप्राप्तीचा मार्ग मात्र अमान्य होता. परिणामी सलग दोन वेळा राष्ट्रीय कॉंग्रेसच्या आधिवेशनाचे अध्यक्ष होणाऱ्या सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसचा त्याग करून भारतमातेच्या स्वातंत्र्यांसाठी एका स्वतंत्र मार्गाचा अवलंब केला. त्याचच एक भाग म्हणून 'स्वराज्य पक्ष', फॉरवर्ड ब्लॉक , भारताचे हंगामी सरकार, अझाद हिंद सेना, परीकय देशांची मदत आणि दुसरे महायुद्ध यांसंदर्भात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दिलेले योगदान अतुलनीय स्वरूपाचे होते यात तिळमात्र शंका नाही. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांच्या विचारसरणीला कट्टर विरोध असला तरी त्यांच्याबददल सुभाष बाबुंच्या मनात असणारा आदर हा अत्यंत उच्च दर्जाचा होता. त्यांचा हा आदर्श विदयमान राजकारणातील नेत्यांनी घेण्याचा प्रयत्न केल्यास भारतीय लोकशाहीच्या बळकटीला अनूकूल वातावरण तयार होईल असा विश्वास वाटतो. म्हणूच प्रस्तुत शोधनिंबंधात तात्कालीन कॉंग्रेस व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्धिष्टये

१) स्वातंत्र्यपूर्व राष्ट्रीय कॉंग्रेसच्या विचारसरणीचा अभ्यास करणे.
२) नेताजी सुभाषचंद्र यांच्या क्रांतीकारक विचारसरणीवर प्रकाश टाकणे.
३) महात्मा गांधी व नेताजी यांच्या विचारसणीतील तफावत जावून घेणे
४) नेताजींच्या कॉंग्रेसमधील कार्याचा आढावा घेणे
५) नेताजींच्या कॉंग्रेसमधून बाहेर पडण्याच्या निर्णयावर प्रकाश टाकणे.

**संशोधन पद्धती** सदर शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला आहे. याशिवाय विविध मासिके,वर्तमानपत्रे, लेख, यांचाही अभ्यास करून हा शोध निंबध पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## सुभाषचंद्र बोस यांचा अल्प परिचय

श्रीमंत वडिल जानकीदास व अर्धशील व पुण्यशिल अशा प्रभादेवी यांच्या पोटी २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे सुभाषचंद्राचा जन्म झाला. विध्वता,सुसंस्कार व दानधर्म ही त्यांच्या कुंटुंबाची वैशिष्टये होती.१९१९ रोजी त्यांनी कलकत्ता विद्यपीठाची पदवी घेतली. त्यानंतर निकटवर्तीय यांच्या इच्छेमुळे आय.सी.एस. करण्यासाठी त्यांना इंग्लंडला जावे लागले तेंव्हा ते म्हणतात की,''ठीक आहे मेजदा, एखाद्या चिमुकल्या बेटाएवढा तो इंग्रजाचा देश हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाला दोन शतके आपल्या बोटावर कसे नाचवतो .त्यांच्या अंगी सामर्थ्य तरी काय आहे. ते मला या निमित्ताने जाऊन पहायचे आहे.'' पुढे ते आय.सी.एस. उत्तीर्ण होवून इंग्रजांच्या सेवेतही रूजू झाले.पण जेंव्हा इंग्रजांच्या राजसिंहासनाशी एकनिष्ठ रहाण्याची शपथ घेण्याची पाळी त्यांच्यावर आली तेंव्हा त्यांनी त्यास नकार दिला.कारण राष्ट्रकार्यासाठी त्यांना आपल्या पायात कोण्त्याही बेडया आडकावून घ्यायच्या नव्हत्या. म्हणूनच त्यांनी एका वर्षातच इंग्रजी नोकरीचा राजीनामा देवून स्वातंत्रचळवळीत उडी घेतली. ते देशभक्तीचे मोठे उपासक होते.

राणाप्रताप,छत्रपती शिवाजी महाराज व इटलीचा महान देशभक्त गॅरीबाल्डी हे त्यांची प्रेरणास्थाने होती. महात्मा गांधीजींच्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या राजकारणात ते जहालवादी राजकारणी म्हणूनच ओळखले गेले.

**सुभाषचंद्र बोस व राष्ट्रीय कॉंग्रेस :**

सुभाषचंद्र बोस यांनी १९२१ मध्ये उच्च आधिकाराच्या जागेकडे पाठ फिरवून भारतीय राजकारणात उडी घेतली, तेव्हा नुकतच जहाल युगाचे महान नेते लोकमान्य टिळक यांच्या निधनाने देशाच्या राजकारणात महात्मा गांधीचा उदय होवून त्यांच्याच हातात राष्ट्रीय कॉंग्रेसची पर्यायाने स्वातंत्रलढयाची सर्व सूत्रे आली होती. आहिंसेवर आधारित असणाऱ्या महात्मा गांधीजींच्या राजकारणात एक जहालवादी राजकारणी म्हणूनच सुभाषचंद्र बोस यांना ओळखले जावू लागले. १९२० मध्ये महात्मा गांधीनी सुरू केलेल्या असहाकर चळवळीत ते सहभागी झाले. परीणामी १९२१ ला त्यांना सहा महिने कारावासाची शिक्षा झाली. पण असहकार चहवळ स्थगित करण्याचा गांधीजींनी घेतलेला निर्णय त्यांना कदापी मान्य झाला नसल्याने त्यांनी गांधीजीवर टिका केली. त्यातूनच महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस यांच्यात राष्ट्रीय कॉंग्रेसमधील राजकीय विरोधाला सुरूवात झाली. परीणामी सुभाष बाबुंनी स्वराज्य पक्षाचे समर्थन करून सर्व बगांल ढवळून काढला. १९२८ मध्ये स्वराज्य पक्षाने कोलकत्ता मध्ये झालेली कार्पोरेशनची निवडणूक जिंकली, आणि देशभक्त चित्तरंजन दास यांना कलकत्यांचे महापौर तर सुभाषचंद्राना महानगरपालिकेचे मुख्य कार्यकारी आधिकारी बनविण्यात आले. दरम्यान बंगालमधील क्रांतीकारकांशी नेताजींचे सलोख्याचे संबध आहेत. हे लक्षात येताच बंगालच्या सरकारने त्यांना तिन वर्षाची शिक्षा ठोठावून मंडालेच्या तुरंगात रवानगी केली. महात्मा गांधीजींच्या विचारसरणीला विरोध करणाऱ्या सुभाषबाबुंची ऐवढी मोठी राजकारणात छापा होती की ते ब्रम्हदेशात तुंरूगांत असतानाच त्यांच्या अनुपस्थितीत बंगाली जनतेने त्यांची बंगालच्या कायदेमंडळावर निवड करून त्यांचा सन्मान केला होता. या घटनेवरून भारतीय राजकारणातील महात्मा गांधींच्या विचारांना विरोध करणाऱ्या जनतेचा मोठा समूह आस्तित्वात होता ही गोष्ट सिद्ध होते. पुढे नेहमीच प्रकृती खालवल्याने त्यातच त्यांनी सरकारच्या विरोधात उपोशण केल्याने १९२७ ला त्यांना कैदमुक्त करण्यात आले. त्याचवेळी भारतात सायमन कमिशन आले होते. तेंव्हा नेताजींनी सायमन कमिशन विरोधी चळवळीचे नेवृत्व करून संपूर्ण बंगालमध्ये सायमन विरोधी वातावरण निर्माण करून सोडले होते.गांधींच्या विचारसरणीला त्यांचा विरोध असला तरी ब्रिटीशविरोधी वातावरण तयार करणाऱ्या त्यांच्या नेताजींनी कधीच विरोध केला नाही.

महात्मा गांधीजींच्या कालाखंडातील राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये सरळ सरळ दोन विचारसणीचे नेते होते. पैकी कॉंग्रेसमधील गांधींजींच्या मवाळ धोरणाला विरोध करून जहालवादी विचार सरणीचा पुरस्कार करणाऱ्या गटाचे सुभाषचंद्र बोस हे एक बडे नेते होते. त्यांचा गांधीजींना व्यक्तीशः विरोध नसून त्यांच्याबद्दल मोठा आदर होता. पण त्यांच्या विचारसाणीला मात्र कडाडून विरोध होता. उदा. १९२८ च्या कॉंग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात घेण्यात आलेल्या अंतर्गत स्वायत्ततेच्या ठरावाला सुभाषचंद्र बोस यांनी कडाडून विरोध केला होता कारण ते संपूर्ण स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते.दरम्यनच्या काळात अखिल भारतात त्यांची लोकप्रियता ऐवढी वाढली होती की, १९ फेबुवारी १९३८ मध्ये गुजराथमधील हरीपुरा या खेडयात राष्ट्रीय कॉंग्रेसचे एकावन्नावं अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे सुभाषचंद्र बोस हे अध्यक्ष झाले. ऐवढेच नाही तर यानंतरच्या वर्षी म्हणजेच १९३९ च्या मार्च महिन्यात त्यावेळच्या मध्यप्रांतातील त्रिपुरा या खेडयात कॉंग्रेसचे बावण्णावं अधिवेशन भरणार होते. यावेळी सुभाषबाबुंच्या अध्यक्षपदास खुद्द महात्मा गांधीजींचाही विरोधच होता. कारण एकतर सुभाषबाबु यापूर्वी अध्यक्ष झाले होते आणि दुसरे म्हणजे गांधीजींच्या विचारसरणीचे ते कट्टर विरोधक होते. म्हणूनच गांधीजींनी यावेळी पट्टभी सितारामय्या हे अध्यक्ष व्हावेत अशी इच्छा व्यक्त केली. परिणामी मौलाना अझाद यांनी आपेले नांव मागे घेतले. पण वैशिष्टय म्हणजे सुभाषचंद्र बोस यांनी मात्र माघार घेतील नाही. पर्यायाने अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली आणि १३७६ विरूद्ध १५७५ मंतानी सुभाषबाबु निवडून आले. ही निवडणूक म्हणजे राष्ट्रीय कॉंग्रेसमधील मवाळ विचारसारणीचा पर्यायाने महात्मागांधीजींचा पराभव असून जहाल विचारसरणीचा पर्यायाने सुभाषचंद्र बोस यांचा विजय होता. पुढे काही दिवसातच सुभाषबाबुंनी गांधीजींच्या मनाविरूद्ध निवडणुक लढवल्याची खंत असो किंवा कॉंग्रेसच्या जेष्ठ नेत्यांबरोबर काम करणे आवघड वाटल्याने अध्यक्षपदाचा त्यांनी राजीनामा दिला. त्यांच्या वरील कृतीवर उलट-सुलट प्रतिक्रीया उमटल्या. दरम्यानच सुभाषबाबु व महात्मा गांधी यांच्यामधील वैचारिक व भावनिक मतभेदावर बोट ठेवून त्यांच्यात दुरावा निर्माण करण्याचा अनेकांच्या कडून प्रयत्नही झाला. आणि सुभाषबाबुंच्या हितशत्रूंना या कामात यशही आले. पण तेंव्हापासूनच महात्मा गांधीनी सुभाषचंद्र बोस यांची प्रचंड धास्ती घेतली तर सुभाषबाबुंच्या मनात कॉंग्रेसचा त्याग करून सशस्त्र क्रांतीचे विचार आधिक वेगाने घोंघावू लागले. ज्याचा त्यांनी अत्यंत सलगीतल्या व्यक्तींच्या व्यतिरिक्त अन्य कुणाजवळही त्याचा गौप्यस्पोट केला नाही. कदाचित देशाच्या स्वातंत्र्यासाठी देश सोडण्याचा निर्णय सुभाषबाबुंनी याच विचार मंथनातून घेतला गेला असावा हे नाकारता येत नाही. पुढे त्यांनी कॉंग्रेसचा त्याग करून 'फॉरवर्ड ब्लॉक' हा नवा राजकीय पक्ष स्थापन केला. गांधीजीं एके ठिकाणी म्हणतात की,'' एका बाजूला आमच्या अहिंसेच्या तत्वज्ञानाला जगाच्या प्रांगनात एक मंगल अधिष्ठान प्राप्त झाले आहे. तेंव्हा अहिंसेचे धवल वस्त्र परिधान करून जगापुढे मी कोणत्या तोंडाने सांगु की, माझ्या कॉंग्रेसचा अध्यक्ष गुप्तपणे हिटलरच्या एजंटशी संधान बांधतो आहे''

तर यास प्रतिउत्तर म्हणून सुभाषबाबुंचे अनुयायी म्हणतात की ''चाचाजी तुम्ही सारे अहिंसेचे पुजारी आहात आणि आम्ही नेताजींचे धारकरी! आमच्या तलवारीमुळे जर कॉग्रेसच्या अहिंसेला उणेपणा येत असेल तर आपण अशा संकटात पडताच कशाला.'' या एकमेंकाना दिलेल्या उत्तर प्रतिउत्तमधून राष्ट्रींय कॉग्रेसमध्ये असणाऱ्या मवाळ व जहाल विचारसरणीतील अंतर्गत विरोध किती उच्च कोटीचा होता याची कल्पना येते.

**समारोप :**

एका श्रीमंत घरात जन्मलेल्या सुभाषबाबुंनीं ऐश आरामीच्या जीवनाचा त्याग करून भारताच्या स्वातंत्र्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. महात्मा गांधी हे निशस्त्र उठावाच्या मार्गाचे नेते होते तर नेताजी हे सशस्त्र उठावाच्या मार्गचे नेते होते. त्यांनी गांधीजीच्या प्रती मनात प्रचंड आदर ठेवला असला तरी त्यांच्या विचारसरणीला मात्र कडाडून विरोध केला. ते जहालवादी विचारसरणीचे कट्टर भक्त असून ते आपल्या सवंगडयांना म्हणत असत की, ''आहिसेंचा वेड आग्रह धरून चूप बसू नका! क्रांतीच्या मार्गावर आपलं थडग बांधल गेल तरी बेहत्तर त्या थडग्यातूनच बारूदाच्या चिळकांडया उडू देत. मग गुलामीचे साखळदंडही तूटू देत'' सगल दोन वेळा राष्ट्रीय कॉग्रेसचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या नेताजींनी शेवटी कॉग्रेसचा त्याग करून फॉरवर्ड ब्लॉक नावाचा नवा राजकीय पक्ष स्थापन केला. दरम्यानच १९३९ ला दुसऱ्या महायुद्धास प्रारंभ झाला. तेंव्हा इंग्रजांची अडचण ती भारताची संधी या हेतूने त्यांनी परदेशात जावून आझाद हिंद सेनेच्या सहाय्याने ,हंगामी सरकारची स्थापना करून 'तुम मुझे खुन दो, मै तुझे आझादी दुंगा ! असे अवाहन करून 'चलो दिल्ली'चा नारा देवून स्वातंत्र्य प्रातीचा प्रयत्न केला. अखेर त्यांना यामध्ये अपयश आले असले तरी स्वताः गांधीजीनी नेताजींच्या या कार्याची व लोकप्रियतेची खरोखरच धास्ती घेतली होती. कारण नेताजींच्या लढयाकडे संपूर्ण देशवाशीयांचे आकर्शण वाढू नये म्हणून त्यांना कोणत्यातरी कार्यात गुंतवून ठेवण्यासाठी गांधीजीनी १९४२ च्या लढयाचा विचार केला. असे काही इतिहासकारांचे मत आहे. जशी गांधीजींना महात्मा ही उपाधी दिली गेली तशी सुभाषबाबुनाही जनतेने नेताजी ही उपाधी दिली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी गांधीजीनी तुरंगवास भोगला तसा नेताजींनींही भोगला होता. खरे पहात महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस या दोघानींही स्वातंत्र प्राप्तीसाठी मनापासून प्रयत्न केले. दोघांचे मार्ग जरी वेगळे असले तरी ध्येय मात्र एकच होते. म्हणूनच कॉग्रेसच्या राजकरणात ज्याप्रमाणे गांधीजींनी महत्वाचे स्थान होते त्याप्रमाणे सुभाषचंद्र बोस यांना ही अत्यत महत्वाचे स्थान होते हे मान्यच करावे लागते.

**संदर्भ सूची**

१) वि.स.वाळींबे 'नेताजी,कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ पुणे, १९८९
२ प्रा.ह.त्र्य. 'रणझुंजार नेताजी' गोकुळ मासिक प्रकाशन पुणे १९९७.
३) गौतम पंडीत 'नेताजी सुभाषचंद्र बोस 'महानकार्य आणि सर्मपण' मितल प्रकाशन कोल्हापूर १९७८
४) शांतीलाल भंडारी ''क्रांतीपर्व'' सुमेध प्रकाशन ,डोंबिवली २००२
५) डॉ. जयसिंगराव पवार ''हिदुस्थानच्या स्वातंत्र चळवळींचा इजिहास'' फडके प्रकाशन कोल्हापूर.२००२
६) डॉ.बी.एन सरदेसाई '' आधुनिक भारताचा इतिहास '' फडके प्रकाशन ,कोल्हापूर.२००४
७) डॉ.नभा काकडे ''आधुनिक भारताचा इजिहास'' आक्षरलेणे प्रकाशन ,सोलापूर २००५
८) ''प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक), समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी ऑगष्ट २०१२.
९) उपरोक्त, कित्ता ,जानेवारी २०११.
१०) दैनिक सभाव्य २५ जानेवारी२०१३
११) दैनिक सभाव्य,२८ एप्रिल २००७

## संशोधन कार्यात 'आशय विश्लेषणा'चे महत्त्व

श्री. दगडू अर्जुनजगताप
ग्रंथपाल,
लोकनेते गोपिनाथाजी मुंडे महाविद्यालय,
मंडणगड, जिल्हा रत्नागिरी ४१५ २०३

**प्रस्तावना (Introduction) :-**

कोणत्याही प्रकारचे सशोधन कार्य हे ग्रंथालयाच्या सहकार्याशिवाय पूर्ण होऊशकत नाही कारण ग्रंथालय हे ज्ञानाचे भांडार आहे व सशोधकास जुने संदर्भ शोधावयाचे झाल्यास व नवीन ज्ञानाला दिशा देण्यासाठी ग्रंथालायाशिवाय दुसरा पर्याय नाही म्हणून कोणत्याही प्रकारच्या संशोधन कार्यामध्ये ग्रंथालायाला अनन्यसाधारण महत्व आहे समाजामधील नवनवीन घटकांचे, संकल्पनाचे, सिद्धांताचे संशोधन करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यापैकीच एक मार्ग म्हणजे आशय विश्लेषण हे होय. आशय विश्लेषणाला संशोधन तंत्रामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. कारण या तंत्राद्वारे आशय किवा आंतरिक तथ्य हयाचेहि विश्लेषण करून निष्कर्ष काढले जातात. म्हणून आज समाजशास्त्रीय संशोधन कार्यात आशय विश्लेषनाला महत्व प्राप्त झाले आहे. हे समाजशास्त्रील एक महत्वाचे तंत्र असून ते सर्वांना माहित व्हावे या उद्दशाने याचा आढावा या लेखामध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण व्याख्या (Definitions ) :-** अनेक तज्ञानी आपापल्या परीने 'आशय विश्लेषण' संकल्पनेच्या व्याख्या केलेल्या आहेत
१.**बी. बेरलसन** :- 'संज्ञापनातील व्यक्त वा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे'
२.**कॉप्लन** :- यांच्या मते 'आंतरवस्तू विश्लेषण पद्धती एक दिल्या गेलेल्या वस्तूच्या अर्थाची एक क्रमबद्ध आणि गुणात्मक व्याख्या करण्याचा प्रयत्न आहे.'
3.**पी. व्ही. यंग** :- यांच्या मते 'मुलाखती, प्रश्नावली, अनुसूची इत्यादीच्या लिखित किवा मौखिक साधनाद्वारे संकलित केलेल्या तथ्याचा पद्धतशीर वस्तुनिष्ठ व प्रमाणबद्ध आर्थ विषद करण्याच्या संशोधनात्मक तंत्राला आशय विश्लेषण म्हणतात' खरे तर आशय विश्लेषण तंत्राचा सामाजिक संशोधनामध्ये सर्व प्रथम उपयोग माल्कम विली यांनी केला

**आशय विश्लेषण म्हणजे काय ? (Content Analysis) :-** जेव्हा मनुष्य वाचायला, पाहायला व समजायला लागला तेव्हाच त्याच्या मनात कशाचातरी विचार करण्यास सुरुवात झाली. मानवाच्या मनामध्ये जन्मताच विचार करण्याची क्षमता असते. व यातूनच नवनवीन संकल्पनेची निर्मीती होते. आशय विश्लेषणा मध्ये कोणत्याही प्रकारच्या प्रक्रियांचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे एखाद्या वाचकाने माहिती संबधी विचारणा केली असता त्यातील विषयाचे आशय विश्लेषण करताना लागणाऱ्या प्रतीक्रीयांचाही समावेश होत असतो एखादया गोष्टी बाबत अनेकजण आपापल्या परीने माहिती सांगत असतात. परंतु त्याच्या सांगण्याचा आशय बदललातरी गाभा मात्र तोच असतो. म्हणजेच आपणास थोडक्यात असे म्हणता येईल कि आशय विश्लेषण म्हणजे एखाद्या आशयाचे विश्लेषण होय.

**आशय विश्लेषणाचे महत्त्व (Importance of Content Analysis) :-** आशय विश्लेषण हे तंत्र शास्त्रीय संशोधनातील एक महत्वपूर्ण असे तंत्र आहे हया तंत्राचा संबंध संज्ञापन प्रचार अथवा मध्यमाद्वारे प्राप्त झालेल्या तथ्याचा अशयासी असतो हया तंत्राची महत्वाची बाब म्हणजे यामध्ये गुणात्मक विषयांचे परीणामत्मक अद्ययन करता येते उदा. एखाद्या कादंबरीतील पत्र अथवा वर्तमानपत्रातील लेख, प्रसिद्ध व्यक्तीचे भाषण, हे गुनात्मक विषय आहेत परंतु हया गुणात्मक विषयाचे स्वरूप आणि विशेष हया तंत्र द्वारे सारणी, ग्राफ , इत्यादीच्या माद्यमातून त्व्ल्जची मांडणी करून व्यवस्थितपणे दाखविता येते तसेच हया तंत्र द्वारे समाजातील एखाद्या समुहाची मानसिक प्रवृत्ती जाणता येते व त्यामुळे एखाद्या समाजसुधारकांची, नेत्याची योजना यशस्वी होण्यास त्याकरिता एखादा कार्यक्रम आखण्यास साहयभूत होते. दुसरे महत्वाचे म्हणजे या तंत्र द्वारे साहित्य, शिक्षण, करमणुकीची साधने याचा समाजावर पडलेल्या प्रभावाचे विश्लेषण करणे शक्य होते. हे तंत्र वैज्ञानिक असून त्याद्वारे प्राप्त होणाऱ्या परिणामाची, तथ्यांची सत्यता पारखणे शक्य होते.

**आशय विश्लेषणाचे एकक (Units of Content Analysis) :-**
१.**शब्द** :- एखाद्या लेखात, भाषणात किवा अन्य लिखित व मौखिक सामग्रीमध्ये काही विशेष शब्दाची किवा संकेताची किती पुनराव्रत्ती झाली आहे हयाच्या आधारे महत्वपूर्ण निर्णय काढले जातात
२.**वाक्ये व परिछेद** :- वाक्य व परीच्छेद हेही एकक बनू शकतात, कारण वाक्य व परीच्छेद एक निश्चीत विचार मांडतात.
३.**पात्रे** :- कथा, कादंबरी, नाटक, चित्रकथा याच्यातील पात्रे हेही आशय विश्लेषणाचे एकक असू शकतात

४. **एखादा भाग** :- एखाद्या मासिकातील, पुस्तकातील, वर्तमानपत्रातील एखादा भाग अथवा अंश हा आशय विश्लेषणाचा एकक होऊ शकतो.

५. **स्थान आणि काळ** :- वर्तमानपत्रे , साप्ताहिके, मासिके विविध परकारची नियतकालिके ह्यामध्ये भिन्न भिन्न विषयांना किती जागा मिळते तसेच नाटक, रेडीओ, कथा कोणकोणत्या कार्यक्रमाला किती वेळ देण्यात येतो. यालाही एकक म्हणून मान्यता देण्यात येते

**ग्रंथालय व माहितीशास्त्रात आशय विश्लेषण तंत्राचा वापर:-**

१. संदर्भ सेवा
२. सार लेखन
३. विषय निर्देश
४. उपभोक्ता प्रथकरण
५. माहिती केवा आणि उत्पादनाचे विपणन
६. आशय विश्लेषण तंत्राच्या माद्यमातून ग्रंथालयातील विविध नोंदीचे प्रथकरण करता येते.
७. माहिती पुनर्प्राप्ती थिसारस तयार करण्यामध्ये आशय विश्लेषण तंत्राचा वापर करता येतो.

**आशय विश्लेषणातील पायऱ्या :-** आशय विश्लेषणातील रूपरेषा तयार करताना पुढील प्रमुख पायऱ्या आहेत

१. तक्त्याची निवड
२. एककाची निवड
३. श्रेणी विभाजन
४. श्रेणीचे परीक्षण
५. योग्य पद्धतीचा उपयोग
६.अध्ययनाची रूपरेखा
७.एककाचे मापन
८.विश्लेषनात्मक निर्वाचन किवा अध्ययन
९.अहवाल

**आशय विश्लेषणाच्या मर्यादा (Limitations of Content Analysis) :-**

कोणत्याही प्रकारच्या विषयामध्ये काही प्रमाणात मर्यादा असतात त्याच पद्धतीने आशय विश्लेषणामध्ये व वरील सर्व माहितीच्या आधारे आशय विश्लेषण या तंत्राचे महत्व लक्ष्यात येते. परंतु हे तंत्र कितीहीमहत्वाचे असले तरी त्याला काही मार्यादा आहेत. यामध्ये पहिली मर्यादा अशी कि ह्या तंत्राचा अध्ययन विषय नेहमी गुणात्मकच असतो व गुणात्मक तथ्यावरून परीणामात्मक व वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढणे कठीण असते. अनेक वेळा संशोधक हा मुख्य विषय सोडून आडमार्गाला जातो तसेच गुनात्मक तथ्यांचे विश्लेषण करताना पक्षपाती दष्टीकोन टाळणे असंभव होते. निष्कर्ष काढताना स्शोधाकाचे स्वतःचे विचार व पूर्वग्रह त्यात मिसळण्याची शक्यता असते. कधी कधी आशय विश्लेषणाचे एकक निवडने व त्याचे वर्गीकरण करणे हे कार्य योग्य पद्धतीने होत नाही त्यामुळे सपूर्ण विश्लेषण चुकीचे ठरते. आभ्यास पद्धतीची योग्य निवड करणे हे काम बरोबर होत नाही. परंतु ह्या सर्व मार्यादा असल्यातरी त्या दूर करण्याचा प्रयत्न चालू आहे. तसेच ह्या मर्यादा असूनही हि आशय विश्लेषणाची पद्धती लोकप्रिय होत आहे

**सारांश (Conclusion) :-** आशय विश्लेषणामध्ये या तंत्राच्या माद्यमातून गुणात्मक तथ्याचे सांख्यकीय व वस्तूनिष्ठ तत्यात रुपांतर करता येते. आशय विश्लेषण म्हणजे काय, आशय विश्लेषण पायऱ्या, त्याचे संशोधानातील महत्व आणि त्याच्या मर्यादा या बाबी लक्षात घेता वरील विवेचनावरून आपल्या असे लक्षात येते कि आशय विश्लेषण हे एक सामाजिक संशोधनातील महत्त्वपूर्ण तंत्र असून त्यामध्ये काही मर्यादा असूनही ते दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे तंत्राचा सर्व अंगानी आभ्यास होणे आवश्यक आहे

**संदर्भ (References) :-**

१. घाटोळे,(डॉ.) रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती, २०१०, मंगेश प्रकाशन,नागपूर.
२. निकोशे,(डॉ.)सत्यप्रकाश, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र सशोधन पद्धती, २००७, प्रज्ञा प्रकाशन , नागपूर.
३. सुतार, ध. भ., ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, २०११, ए.बी.एस. पब्लिकेशन्स, वाराणशी.

## भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील यशवंतराव चव्हाणांचे योगदान

**प्रा. जनार्दन श्रीकांत जाधव**
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग म.ह.शिंदे महा. तिसंगी

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्याच नव्हे तर, देशाच्या राजकरणामध्ये ज्यांनी आपल्या कार्य–कर्तुत्वाचा ठसा उमटवला व आधुनिक भारताची जडण–घडण करण्यामध्ये महत्वाची भूमिका निभावली असे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. एका सर्वसामान्य कुटूंबात जन्माला येऊन ज्यांनी आधुनिक भारताच्या इतिहासावर स्वत:ची छाप सोडली ते यशवंतराव चव्हाण एक लोकप्रिय नेतृत्व होते. यशवंतराव चव्हाणांच्या जीवनाचा आपल्याला वेगवेग्ळ्या दृष्टीकोणातून विचार करावा लागतो.

यशवंतराव चव्हाण म्हणजे स्वातंत्र्य सैनिक, कुशल राजकारणी, मुत्सदी प्रशासक, संसंदपटू उच्च अभिरूचीचा रसिक, साहित्यिक, विचारवंत, शिक्षण तज्ञ, अनुभव संपन्न व्यक्तीमत्व, चिंतनशील व्यक्ती, संयमी तसेच विचारप्रवर्तक राजकारणी, चारित्र्य संपन्न नेता, ओजस्वी वक्ता, सौजन्यमुर्ती प्रतिभावंत अशा कित्येक शब्दात त्यांचे वर्णन करता येईल. हेच यशवंतराव चव्हाण प्रति शिवाजी म्हणून देखील ओळखले जात होते.

यशवंतराव चव्हांणाचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये दिलेले योगदान हे अत्यंत महत्वाचे आहे. देशाचे स्वातंत्र्य मिळवण्यामध्ये आणि ते टिकवण्यामध्ये ज्या लाखो लोकांनी योगदान दिले होते. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांची भूमिका आणि कार्य विशेष महत्वाचे होते. यशवंतराव चव्हाण हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये केवल सामील झाले नाहीत तर त्यांनी आपले प्रत्येक पाऊल अत्यंत विचाराने उचलले दिसते. ते कधीही कोणत्याही प्रसंगात भावनिक होऊन कोणत्याही गोष्टीच्या आहारी गेले नाहीत तर प्रत्यक्षात परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करून योग्य तो निर्णय घेतलेला दिसतो. म्हणूनच यशवंतराव चव्हाण फक्त एक स्वातंत्र्य सैनिक नव्हते तर ते कर्तबगार मुत्सदी सुद्धा होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात दिलेले योगदान, आणि त्यांच्या कार्य कर्तृत्वाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सातारा जिल्हयास धगधगता ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. एक भूमिगत क्रांतीकारक म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असेच आहे. स्वातंत्र्य आंदोलनातील त्यांच्या कार्याविषयी मतमतांतरे असली तरी एकंदरीतच त्यांच्या योगदानाकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही. म्हणूनच प्रस्तुत संशोधनपर निबंधात यशवंतराव चव्हाण यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान या दृष्टीकोणातून मांडणी करण्यात आली आहे.

**यशवंतराव चव्हाणांच्या क्रांतीकारक विचारांची बैठक :**

यशवंतराव चव्हाण आणि वाचन यांचा अत्यंत जवळचा सबंध आहे. त्यांच्या चौफेर वाचन वृत्तीमुळे त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. वाचनाची ही आवड पुण्याच्या येरवडा जेल मध्ये असतानाच निर्माण झाली होती. इ. स. १९३३ मध्ये यशवंतरावाना तुरूंगवास झाला होता व त्यांना येरवडा जेल मध्ये १२ नंबरच्या बराकी मध्ये ठेवण्यात आले होते. या काळात त्यांचा तेथे अनेक राष्ट्रीय नेत्यांशी संबंध आला. तेथे त्यांना त्यांच्या मित्रांच्या सहकार्याने पुस्तके वाचण्यास मिळत होती.[१]

जेलमध्ये असताना त्यांनी बर्नांड रसेल यांचे रोड्स टू फ्रिडम हे पुस्तक त्यांनी वाचले होते. त्या पुस्तकामुळे त्यांच्या विचारांची दिशा बदलली व स्वातंत्र्याचा प्रश्न हा भारतापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण मानव जातीचा आहे ही भावना त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली. गांधीजी, लेनीन यांच्या जीवनावरील पुस्तकांनी त्यांच्या विषयी आदराची भावना निर्माण झाली.[२] राजशास्त्र आणि इतिहासाची त्यांना विशेष गोडी होती. कोल्हापूर मधील राजाराम कॉलेजच्या ग्रंथालयात ते तासनतास वाचन करीत असत. एस. जी वेल्स यांच्या ‘आऊट लाईन ऑफ हिस्टरी’ या पुस्तकाने त्यांची इतिहासाकडे बघण्याची दृष्टी बदलली.

त्याचबरोबर, लोकमान्य टिळकांचा स्वातंत्र्याचा मंत्र, गांधीजींची असहकार चळवळ, महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा प्रभाव शालेय जीवनापासूनच त्यांच्या मनावर पडलेला होता. त्यामुळे राष्ट्रप्रेम, देशभक्ती, निष्ठा या गोष्टीतून त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. महात्मा फुले, मार्क्स, रॉय, गांधी, नेहरू इत्यादींच्या विचारांचा जबरदस्त पगडा त्यांच्यावर होता.[३]

इ. स. १९३० साली टिळक हायस्कूल मध्ये असताना यशवंतराव चव्हाण हे हायस्कूलच्या आवारातील लिबांच्या झाडावर झेंडा लावून आपल्या मित्रासमवेत झेंडा वंदन करत असत. ही गोष्ट आज आपणास किरकोळ वाटत असली तरी त्या काळी आपल्या देशावर ब्रिटीशांचा अंमल होता हे लक्षात घ्यायला हवे. त्यांनी दाखवलेल्या धाडसाबद्दल त्यांना अठरा महिन्यांचा कारावास देखील

झाला होता.[४]

महाविद्यालयीन जीवनात त्यांचा सबंध लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्थापन केलेल्या संघटनांशी आला. व ते क्रांतीकारक विचारांच्या कडे आकर्षित झाले. पण शेवटी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने काही साध्य होणार नाही असे त्यांना वाटल्याने त्यांचा क्रांतीवरील विश्वास उडाला व ते गांधी विचाराकडे आकर्षित झाले.

**यशवंतराव चव्हाण आणि गांधीजींची असहकार चळवळ :**

इ. स. १९२० मध्ये टिळक युगाचा अस्त होऊन गांधी युगाची सुरवात झाली होती. गांधीजीनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग, असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह, बार्डोलीचा सत्याग्रह यासारख्या घटनांनी यशवंतराव चव्हाण गांधीजींच्या विचारांच्याकडे अधिक आकृष्ट झाले होते. मात्र आपण पक्के गांधीवादी आहोत हे त्यांना सांगता येत नव्हते. कारण गांधीजी आणि नेहरू यांच्या विचारामध्ये असणारा फरक त्यांना अस्वस्थ करत होता. पुढे जेव्हा महाराष्ट्रात केशवराव जेधे यांनी कॉंग्रेस मध्ये सक्रिय सहभाग घेतला त्यावेळी यशवंतराव चव्हाण सुद्धा त्यामध्ये सक्रिय सहभागी झाले.

यशवंतराव चव्हाण यांनी कराड, सातारा भागात अनेक मोर्चांचे नेतृत्व केले. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ते हे मोर्चे घेऊन जात व ब्रिटीश सत्तेचे प्रतिक असलेल्या मालावर, कचेरीवर बहिष्कार घालत होते आणि तेथे कॉंग्रेसचा झेंडा लावत असा कार्यक्रम नित्य असायचा हा कार्यक्रम दिसावयास साधा वाटत असला तरी त्या पाठीमागे फार मोठा अर्थ होता. त्यामुळे ब्रिटीश सरकारला सर्वसामान्य लोकातून असणारा विरोध स्पष्ट दिसत होता. या काळात यशवंतराव चव्हाणांनी तासगाव, कराड, बडूज, इस्लामपूर इत्यादी ठिकाणी मोर्चे काढले व ते यशस्वी करून दाखवले. यामध्ये वडूज व इस्लामपूर मोर्चावेळी प्रचंड गोळीबार झाला व यामध्ये अनेक कार्यकर्ते शहीद झाले. त्यामुळे संपूर्ण सातारा जिल्हा या काळात धगधगता ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य यशवंतराव चव्हाण करत होते असे दिसते.[५]

**१९४२ चे स्वतंत्र आंदोलन आणि यशवंतराव चव्हाण :**

१९४२ च्या आंदोलनाची कार्य पद्धत काय असावी हे ठरवण्यासाठी गांधीजींच्या नेतृत्वाखाली ५ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबई येथे अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक भरवली होती. त्या बैठकीसाठी स्वत: यशवंतराव चव्हाण आपल्या सहा–सात कार्यकर्त्यासहित मुंबईस गेले होते. या बैठकीतील सर्व भाषणे त्यांनी मन लावून ऐकली विशेषत: गांधीजींच्या भाषणाने ते भारावून गेले. ''आज पासून तुम्ही स्वतंत्र आहात'' हा गांधीजींचा संदेश ते कराडला घेऊन आले व बद्रीकाश्रमात आपल्या कार्यकर्त्यांशी रात्रभर चर्चा केली व आजपासून आपण भूमिगत होऊन चळवळ करावयाची असा त्यांनी निर्णय घेतला.

या काळात यशवंतराव चव्हाण यांनी ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी आधारभूत गोष्टींचा विध्वंस करणे व स्वातंत्र्य लढ्याचा संदेश जनतेपर्यंत पोहचवणे तसेच स्वातंत्र्य लढ्यासाठी सातारा जिल्हयास संघटीत करण्याचे महत्वपूर्ण काम त्यांनी केले होते.[६]

**१९४२ च्या आंदोलनातील भूमिगत कार्यकर्ता म्हणून यशवंतराव चव्हाणांचे कार्ये :**

१९४२ च्या कॉंग्रेसच्या मुंबई येथील बैठकीत 'चले जाव' चा ठराव संमत झाला होता. त्यामुळे ब्रिटीश सरकारने त्याच रात्रीपासून वर्किंग कमिटीमधील लोकांना व राष्ट्रीय नेत्यांना अटक करण्यास सुरवात केली होती. यावेळी स्वत: यशवंतराव चव्हाण हे या बैठकीस उपस्थित होते व ते ०९ ऑगस्टला कराडला येणार होते. त्यामुळे त्यांची अटक टळली होती पण यावेळी त्यांना भेटण्यासाठी आतुर असलेला विद्यार्थी वर्ग मात्र नाराज झाला. कारण यशवंतराव चव्हाण हे ०९ ऑगस्ट, १९४२ पासूनच भूमिगत होऊन कार्य करू लागले होते. ब्रिटीश सरकार त्यांना कोणत्याही क्षणी अटक करणार होते. असे असले तरी यशवंतराव चव्हाण भूमिगत असतानाही ते या विद्यार्थ्यांच्या बैठकीस उपस्थित राहिले व त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की,''ही चळवळ तुरूंग भरतीची नाही तर ती करू किंवा मरू या इर्षेने स्वातंत्र्याचा लढा लढवण्याची आहे. या चळवळीत आपल्याला सर्वसंग परित्याग करून स्वत:च्या जीवाची आहुती दयावी लागेल आणि पुढे होणाऱ्या नुकसानीस आपण स्वत:च जबाबदार असणार आहोत. तेव्हा मनाची तयारी ठेवा.''

यशवंतरावांच्या या अहवानास प्रतिसाद म्हणून कराड मधील चाळीस/पन्नास विद्यार्थ्यांनी शाळा सोडून ते प्रत्यक्षात चळवळीत सहभागी झाले. यावरून यशवंतरावांचा प्रभाव किती होता हे सहज लक्षात येते. शिवाय सातारा जिल्हयाच्या नेतेपदी त्यांची एकमताने निवड करण्यात आली होती हे लक्षात घ्यायला हवे.[७]

यशवंतराव चव्हाण यांनी यावेळी कराड, वडूज, पाटण, वाळवे, तासगाव इत्यादी कचेऱ्यावर प्रचंड मोर्चे संघटीत केले.

त्यांच्या या कार्यामुळे ब्रिटीश सरकारने त्यांना पकडून देण्यासाठी एक हजार रूपये इतके बक्षीस जाहीर केले होते. पण यशवंतराव मात्र गनिमी काव्यांनी भूमिगत चळवळीचे नेतृत्व करत होते. त्यांनी भूमिगतांची संघटना निर्माण केली त्यामुळेच सातारा जिल्हा क्रांती काळात देशात अग्रभागी राहिला.[८] याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांना जाते.

यशवंतराव चव्हांणाचा ठाव ठिकाणाचा शोध घेण्यासाठी सरकारने त्यांची पत्नी व त्यांच्या बंधुस नाहक त्रास देण्यात आला होता. त्यांना तुरूंगात टाकण्यात आले होते हे लक्षात घ्यायला हवे.

स्वातंत्र्य चळवळीत काम करणाऱ्या या सर्व कार्यकर्त्यांच्या सभा हया किर्लोस्करवाडी, औंध, ओगलवाडी, कुंडल, यासारख्या गावातून होत असत. व त्यातून कार्यक्रमांची व डावपेचांची आखणी होत होती. यावेळी यशवंतराव चव्हाणांना श्री. आप्पासाहेब सहस्त्रबुद्धे, श्री. अच्युतराव पटवर्धन यांचे मार्गदर्शन मिळत होते.[९]

भूमिगत म्हणून काम करत असताना यशवंतराव चव्हाणांच्या बरोबर लक्ष्मणराव धन्वतरी, काशीनाथ शेटजी, महादेवराव जाधव, भिकुबा साळुंखे, बाबुराव कोतवाल इत्यादी धडाडीचे कार्यकर्ते होते. ते रेल्वे स्टेशनवर अचानक हल्ले करणे, खजिना लुटणे, शस्त्र पळवणे यासारख्या गोष्टी करत असत. हे भूमिगत कार्यकर्ते प्रत्येक गावात जास्तीत जास्त एक रात्रच वस्तीला थांबायचे त्यापेक्षा जास्त नाही. यशवंतरावांना या काळात आपल्या आजारी बंधुना भेटता आले नाही व अतिसाराने त्यांचा मृत्यू झाला. पुढे १९४३ साली आपल्या आजारी पत्नीस भेटण्यासाठी ते फलटणला जात असताना वाटेत त्यांची गाडी पंक्चर झाल्याने ते ठरलेल्या वेळेत न पोहचता सकाळी पहाटे फलटण मध्ये पोहचले त्यामुळे त्यांच्या वाड्यास पोलिसांनी गराडा घातला व ते पकडले गेले.

**यशवंतराव चव्हाण व पत्री सरकार :**

भूमिगत होऊन कार्य करत असताना कराड, सातारा भागात 'पत्री' सरकार चालवण्यामध्ये सुद्धा यशवंतरावांची भूमिका महत्वाची होती. समाज विघातक कार्य करणाऱ्या व स्वातंत्र्य विरोधात गुन्हे करणाऱ्यांना शासन करण्यासाठीच 'पत्री' सरकारचा जन्म झाला होता. म्हणूनच १९४२ ची चळवळ गांधीजींनी स्थगित केल्यानंतर सुद्धा साताऱ्यामध्ये 'पत्री' सरकारचे काम सुरूच होते. ते सुरू ठेवायचे किंवा नाही याविषयी अनेक मतमतांतरे होती. या संदर्भात यशवंतराव म्हणतात की, आपण जर पत्री सरकारचे काम सुरूच ठेवले तर ब्रिटीश सरकार आपल्याला केंद्र करेल व आपली दडपशाही होईल. त्यामुळे गांधीजींच्या आदेशानुसार आपण थांबायला हवे असे त्यांचे मत होते.[१०] गांधीजींच्या विषयी त्यांना नितांत आदर होता. त्यांच्यावर त्यांची निष्ठा होती मात्र गांधीजींचा हा विधायक कार्यक्रम देशापुढील सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडवू शकेल की नाही याविषयी नेहरूंची जशी मन:स्थिती संदिग्ध होती. तशीच ती यशवंतरावांनी देखील होती. म्हणून शेवटी ते नेहरू तत्वाकडे आकर्षित झाले.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

**निष्कर्ष:**

१) एक भूमिगत क्रांतीकारक म्हणून यशवंतराव चव्हाणांचे कार्य महत्वाचे आहे.
२) गांधी आणि नेहरू विचारांचा समन्वय यशवंतरावाच्या व्यक्तिमत्वामध्ये दिसून येतो.
३) भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सातारा जिल्हा जागृत ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य यशवंतराव यांनी केले.
४) यशवंतराव चव्हाण हे एक स्वातंत्र्य सेनानी बरोबरच कर्तबगार मुत्सद्दी कार्यकर्ते होते.
५) भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील यशवंतराव चव्हाणांचे योगदान नाकारता येणार नाही.

**संदर्भ :**

१) सौ. चव्हाण वेणूताई स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णाकाठ अक्षर जुळवणी प्रकाशन, २०१२, पृ. क्र. ११८.
२) उपरोक्त पृ. क्र. १२३-१२४.
३) काळे बाबुराव, यशवंतराव चव्हाण, राणे प्रकाशन, पुणे, १९६५, पृ. क्र. ८ व २१.
४) उपरोक्त पृ. क्र. २१ व २३.
५) पाटील बाबासाहेब, कृष्णापुत्र रिया प्रकाशन, कोल्हापूर. पृ. क्र. ३१५
६) सौ. चव्हाण वेणूताई,उपरोक्त पृ. क्र.६५-६६.
७) काळे बाबुराव, उपरोक्त पृ.क्र. ३६.
८) काळे बाबुराव, उपरोक्त पृ. क्र. ३७-३८.
९) सौ. चव्हाण वेणूताई, उपरोक्त पृ. क्र. ६७
१०) उपरोक्त पृ. ६८

# राष्ट्रीय व सामाजिक विकासातील ग्रंथालयांचे महत्व

श्री. पाटील कृष्णात पांडुरंग
B.A; M.Lib & Isc
संशोधक विद्यार्थी ,कोल्हापूर

**प्रस्तावना:—** व्यक्ती, समाजअसो वा राष्ट्र यांच्या जडणघडणीत ग्रंथ व ग्रंथालयांचे महत्व अनन्यसाधारण व उल्लेखनीय आहे. समाज निर्मित ग्रंथालय ही समाजातील प्रत्येक घटकास ज्ञान व सुसंस्कार देऊन त्याद्वारे सुजाण व कार्यक्षम, स्वावलंबी नागरिक घडवणारी लोकशाही स्वरुपाची संस्था होय.

समाजाने प्राचीन काळापासून आपल्या भौतिक गरजा भागविण्यासाठी आदर्शवत उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध प्रकारच्या जसे श्शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, आरोग्य, उदयोग, व्यवसाय, संशोधन अशा सामाजिक संस्था आपआपल्या क्षेत्रामध्ये सामाजिक हितासाठी कार्यरत असणा—या संस्थाची निर्मिती केली आहे. या संस्थाच्या बरोबरीने ग्रंथालय ही सुध्दा एक सामाजिक संस्था आहे. इतर संस्था हया त्यांच्या कार्यक्षेत्रापुरत्या मर्यादीत सेवा देत असतात परंतु ग्रंथालय ही संस्था समाजातील नागरीक, बालवाचक विदयार्थी, युवक, उद्योजक, नोकरदार, संशोधक अशा विविध प्रकारचे उपभोक्ते यांच्या गरजा भागवण्याचे कार्य करीत असतात. सामाजिक ग्रंथालये वाचकांना मनोरंजन बरोबर त्यांना ज्ञान, माहिती, देऊन बौध्दिक विकास घडवणे, सुसंस्कार करणे, संशोधन कार्यास मदत करणे. एकंदरीत समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक अशा विविध भागांचा विकास करुन बलशाली राष्ट्र निर्माण करण्यास ग्रंथालयांचा सहभाग वाढत आहे.

ग्रंथालयांचे समाजातील विकासाचे अढळ स्थान लक्षात घेऊन भारत सरकारने इ.स. १९८५ मध्ये डॉ. डी. पी. चटटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने ग्रंथालय व माहिती व्यवस्थेचा धोरणात्मक मसुदा तयार केला त्यामध्ये ग्रंथालय समाजाशी बांधील राहण्यासाठी, ग्रंथालय व्यवस्थापन कार्यक्षम करण्यासाठी विविध अंगाचा विचार करण्यात आला. राष्ट्रीय कार्यक्रमातंर्गत माहिती संघटन, पुर्नप्राप्ती प्रशासन यांना प्रोत्साहन देणे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, दर्जात्मक सुधारणा, राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेली देशाविषयी माहिती व वारसासंस्कृती जतन करणे. तसेच ग्रंथालय माहिती सेवेचा उपयोग समाजासाठी करणे अशा प्रकाराच्या मसुद्यामध्ये ग्रंथालयात आणि राष्ट्र विकासासाठी पाऊल उचलले असल्याचे दिसुन येते.

ग्रंथालय विकासासाठी राष्ट्राने १९५१ पासून पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी केलेली आहे. एकूण सर्व पंचवार्षिक योजनेचा पूर्ण अभ्यास केला असता इतर योजनेपेक्षा ७वी पंचवार्षिक योजनेत ग्रंथालय प्रतिष्ठानची स्थापना करुन सार्वजनिक ग्रंथालय चळवळ वाढवण्यासाठी प्रयत्न केले आहेत.समाजाने स्थापन केलेली शैक्षणिक, विशेष राष्ट्रीय विशेष करुन ग्रंथालये औपचारिक —अनौपचारिक शिक्षणाबरोबर, कौशल्ये विकास, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधने, संशोधन आणि विकास अशा विविधांगानी राष्ट्राचा चौफेर विकास घडवून आणण्याचे कार्य ग्रंथालये करित असतात. आणि अशा ग्रंथालयांवरती राष्ट्राची आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास, प्रगती, संस्कृती वारसा जपण्याचे कार्य व राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे. त्यासाठी राष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक विशेष, राष्ट्रीय ग्रंथालयाबरोबर सार्वजनिक ग्रंथालय सुधारक विधेयक समंत करुन त्यांची दर्जा व कार्यक्षमता वाढवण्यासाठी विकास घडवून आणणे अपेक्षित आहे.

**ग्रंथालय विकास :—** १७ व्या श्शतकात म्हणजेच ब्रिटीश राजवटीत भारतातील सार्वजनिक ग्रंथालये उदयास आली. इ.स. १८३६ साली कोलकत्ता येथे पब्लिक लायब्ररीची स्थापना करण्यात आली. कालांतराने पब्लिक लायब्ररीचे इंपिरियल लायब्ररी असे नामकरण केले. मात्र भारत स्वतंत्र झालेनंतर १९४८ साली या लायब्ररीचे पुर्न:निर्मिती करुन भारताचे 'राष्ट्रीय ग्रंथालय ' असे रुपांतर करण्यात आले.

राष्ट्रीय ग्रंथालय स्थापनेनंतर ग्रंथालय क्षेत्राात आमूलाग्र बदल घडून आले. तसेच सार्वजनिक,शैक्षणिक ग्रंथालयाबरोबर संशोधन वैद्यक, कृषी, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रातील संशोधकाच्या उपभोगकर्त्यांच्या गरजा भागवून संशोधन कार्यास चालना मिळण्यासाठी विशेष ग्रंथालयांची निर्मिती करण्यावर भर दिला गेला.

**आधुनिक समाजातील ग्रंथालयांचे महत्व व कार्य:—** मानव आपले विचार संक्रमण चित्राद्वारे, चिन्हाद्वारे, संकेताच्या द्वारे करत असे. लिपीचा शोध लागल्यानंतर शीलालेख, ताम्रपट, भुर्जपत्र चामडे यांचा लेखन साहित्य म्हणून वापर करू लागला.मुद्रण कलेचा शोध आणि कागद निर्मिती हे शोध मानवाचे ज्ञान, विचार ग्रंथाद्वारे समाजापर्यंत पोहचवण्यास तसेच जतन करण्यासत अनुकूल ठरेल. कालांतराने मुद्ण कलेतील होत गेलेल्या विकासामुळे ग्रंथ आणि प्रलेख निर्मितीत लक्षणीय वाढझाली. निर्मित झालेले मौल्यवान ज्ञान, माहिती यांचा पुढील पिढीसाठी उपयोग व्हावा तसेच वाचनसाहित्याचे जतन व्हावे यासाठी ग्रंथालय स्थापना ही संकल्पना उदयास आली.

महितीचे जतन व प्रसारित करण्यासाठी नवीन ग्रंथालये स्थापनेत आली त्याच प्रमाण सार्वजनिक, शैक्षणिक व संशोधन ग्रंथालये ही सामाजिक विकास साधण्यासाठी आपआपल्या परिने कार्यकरत असल्याचे दिसून येते.विज्ञान आणि तंत्रज्ञानात झालेल्या आमूलाग्र बदलामुळे माहिती र्निमितीला चालना मिळाल्याने व दिवसेंदिवस हजारो पाने छापली गेल्यामुळे माहितीची विस्फोट झालेला आहे त्यामुळेच सध्याचे युग हे 'माहितीचे युग' असे वर्णन करण्यात आले आहे. माहितीचा वापर ग्रंथालयाशी संबंधीत असल्याने ग्रंथालयशास्त्राला माहितीशास्त्राची जोड मिळाली आहे.

संगणक क्रांतीमुळे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र क्षेत्रातील सेवेमध्ये दर्जेदार विश्वासहार्यता असणे आवश्यक आहे. ग्रंथालये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवून वाचक, विधार्थी, उपभोकत्यांना डिजिटाईज्ड व इंटरनेट आधारित सेवा देत आहेत.सध्या सोशल नेटवर्कचा वापर वाढल्यामुळे वाचक व सेवक यांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होते, वाचनसाहित्याचा मोठया प्रमाणावर वापर होतो तसेच अपुरा निधी व मर्यादित जागा यावर मात करून ग्रंथालय सेवा अधिक सक्षमपणे दिल्या जात आहेत दिवसेंदिवस उपभोक्यांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन तसेच ग्रंथालयावरचा ताण कमी करण्यासाठी ग्रंथालयांचे आधुनिकीकरन करणे आवश्यक आहे. जेणेकरून उपभोकत्याला संदर्भ सेवा, प्रतिलिपी सेवा, इंटरनेट सेवा, भांषातर सेवा, सार सेवा इत्यादी सेवा विनासायास व शिघ्र पध्दतीने देऊन शैक्षणिक, सामाजिक व संशोधन कार्यास उत्तेजन मिळेल. आपल्या राष्ट्रातील ग्रंथालये वर्षानुवषे सध्यस्थितीत सर्व प्रकारच्या वाचकांच्या माहितीविषयक मुलभूत अपेक्षित गरजा भागवण्यासाठी तत्परतेने सेवा देत आहेत.म्हणून आधुनिक समाजात भारतातील ग्रंथालयाना त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे मानाचे स्थान आहे

कविवर्य न. श. पोहनेरकर यांनी ग्रंथालयांचे समाजातील महत्व ग्रंथबोध मध्ये विषद केले आहेत.

जिथे ग्रंथ नाही तिथे ज्ञान नाही ।
जिथे ज्ञान नाही तिथे सौख्य नाही।
ग्रंथालयाविना जो गाव राही।
तिथे जीवना अर्थ काहीच नाही ।।

**कार्ये**

समाजात विविध क्षेत्रातील संस्था आपआपल्या उद्दिष्टानुसार कार्य करत असतात. त्याचप्रमाणे ग्रंथालय ही व्यापक क्षेत्र असणारी सामाजिक संस्था असुन ती राष्ट्राच्या आर्थिके, सामाजिक, राजकिय, विकासासाठी कार्य करत आहे. ग्रंथालयांची सर्वसाधारण कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) वाचनसाहित्य संग्रह जतन करणे**
**२) मनोरंजन करणे**
**३) विश्वासार्ह माहितीचे वितरण करणे**
**४) निरंतर शिक्षणाचे केंद्राचे कार्य**
**५) संशोधन कार्यास उत्तेजन देणे**
**६) राष्ट्रीय विकासास सहकार्य करणे**

**ग्रंथालयाची राष्ट्रीय धोरणे:—**

एखादया ग्रंथालयाचे विशिष्ट उदिदष्टये, ध्येय सिध्द करण्यासाठी व त्यावर उपाययोजना म्हणून एखादया कार्यक्रमाची रुपरेषा ठरवून तो हाती घेणे म्हणजेच त्या ग्रंथालयाचे धोरण होय.

ग्रंथालय विकासाची धोरणे निश्चित करुन धोरणांची अंगीकार वा अमंलबजावणी केल्यास ग्रंथालयाचा विकास सुस्थितीत व पारदर्शी, सक्षमपणे होण्यास मदत होते. आपल्या देशातील ग्रंथालये व संघटना यांच्या वारंवार मागण्यामुळे ग्रंथालय राष्ट्रीय धोरण आखण्यात आल्याचे दिसुन येते.

**अ) ग्रंथालय व माहिती व्यवस्थेचा धोरणात्मक मसुदा**

इ.स. १९८५ मध्ये प्रा. डी. पी. चटटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रंथालय शास्त्रातील निवडक तज्ञ यांची समितीची नेमणुक करुन भारत सरकारने देशातील ग्रंथालये व माहिती व्यवस्थेचा धोरणात्मक मसुदा तयार करण्याची जबाबदारी सोपवली होती. चटटोपध्याय समितीने पूर्ण अभ्यासांती ग्रंथालय व्यवस्था व्यापक व कार्यक्षम करणेसाठी एकूण १० प्रकरणांत या मसुदयाची सर्वसमावेश अशी व्यापक रुपात मांडणी केली आणि सदर ग्रंथालय विषयक धोरणात्मक मसुदा भारत सरकारला ३१मे १९८६ रोजी सादर केला.

**धोरणात्मक मसुदयाची उदिदष्टये**

क)राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत माहिती— संघटन, पुर्न:प्राप्ती, विनियोग यांना प्रोत्साहन देणे.

ख) माहिती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करुन राष्ट्रातील उपलब्ध असलेल्या ग्रंथालय आणि माहिती व्यवस्थेत दर्जात्मक सुधारणा करुन नवीन तंत्रज्ञानाधारित कार्यक्रम आखणे.

ग) नवनिर्मित झालेल्या ज्ञानाचे संपान करुन राष्ट्रातील नागरीकांना उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करणे.

घ) जागतिक व राष्ट्रीय स्तरावर आर्थिक पत गतिमान होण्यासाठी ग्रंथालय व माहिती सेवेचा वापर कितपत होतो यासाठी स्वतंत्र व कार्यक्षम यंत्रणा उभारणे.

च) ग्रंथालय व माहिती क्षेत्रातील कर्मचा–यांना नवीन तंत्रज्ञानावर आधारीत व्यावसायिक प्रशिक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करणे व प्रोत्साहन देणे.

छ) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या सांस्कृतिक वारसाचा प्रसार करणे व जतन करणे.

**आ) ग्रंथालय विकासास पोषक अशी अन्य क्षेत्रातील राष्ट्रीय धोरणेः–**

क) शैक्षणिक धोरणे : मे १९८६

१) भारत सरकारने या शैक्षणिक धोरणामध्ये ग्रंथ निर्मिती बरोबर देशातील अस्तित्वात असणा–या ग्रंथालयांची सुधारणा करणे व ग्रंथालयापासून वंचित असणा–या ठिकाणी नवीन ग्रंथालये स्थापन करण्यासाठी पूर्ण देशभर मोहिम राबवण्याचे जाहिर केले.

२) देशातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये ग्रंथालय, तसेच नवीन संस्थेच्या मान्यतावेळी ग्रंथालय सुविधा असावी व ग्रंथपाल प्रशिक्षित असणे बंधनकारक असेल असे शासनाने स्पष्ट केले होते.

ख) ग्रंथविषयक धोरण – १९८६

१) ग्रंथविषयक धोरणामध्ये अल्प किंमतीत ग्रंथ/ पुस्तके उपलब्ध करुन देणे व ग्रंथाचा दर्जा वाढवणे.

२) बालवाचक व इतर गटातील वाचकांसाठी रूचीनुसार पुस्तके निर्माण करणे.

ग) विज्ञानविषयक धोरण – १९५८

१) ज्ञान निर्मिती, संपादन व माहिती प्रसारित करणा–या व्यक्तीला बौध्दिक प्रेरणा मिळेल असे प्रोत्साहन देण्यात यावे.

२) संशोधक वा वैज्ञानिकांमुळे उपयोजित व भौतिक सुविधा निर्माण होतील त्यांचा सर्वकष फायदा सामान्य नागरिकांना देण्यासाठी भर दयावा.

घ) माहितीविषयक धोरण

लोकशाहीमध्ये समाजातील प्रत्येक नागरीकांना आर्थिक, सामाजिक, राजकीय, विषयावरील आवश्यक माहिती सातत्याने दिली गेली पाहिजे. माहिती विषयक धोरणाच्या मसुदयाच्या दृष्टीने विचार केल्यास सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्व अधोरिखित होते.

**राष्ट्रीय ग्रंथालय विकासात्मक राष्ट्रीय योजना व कार्यक्रम**

देशातील ग्रंथालय विकासासाठी राष्ट्रीय नियोजनामध्ये स्वातंत्र्यानंतर सन १९५१ पासुन पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

पहिली पंचवार्षिक योजना– १९५१ ते ५६

१. ग्रामीण भागातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस पोषक ठरतील असे सामाजिक कार्यक्रम घेणे.
२. जिल्हा ग्रंथालय व राज्य विभागीय ग्रंथालये यांच्याशी संलग्नित सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे निर्माण करणे.
३. डिलिव्हरी ऑफ बुक्स कार्यक्रमाअतंर्गत मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे राष्ट्राचे ठेव ग्रंथालय म्हणून स्थापना करण्यात आली.

दुसरी पंचवार्षिक योजना– १९५६ ते ६१

१. राष्ट्रीय स्तरावर जिल्हा, राज्य व मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये संपर्काचे जाळे निर्माण करणे.

तिसरी पंचवार्षिक योजना– १९६१ ते ६६

या योजनेत नवीन कार्यक्रम न आखता पूर्वीच्या आखलेल्या कार्यक्रमावरती भर देण्यात आला. त्यामध्ये काही राज्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन्यात आली.

चौथी पंचवार्षिक योजना– १९६६ ते ७१

देशातील सार्वजनिक ग्रंथालय विकासासाठी नेमलेल्या अभ्यास गटाने ग्रंथालयासाठी नियोजन बध्द कार्यक्रम बनविला.

पाचवी पंचवार्षिक योजना– १९७१ ते ७५ व सहावी पंचवार्षिक योजना– १९७५ ते ८०

ग्रंथालय विकासासाठी कोणत्याही समितीची निवड न करता शासकीय यंत्रणेने विविध विभागांतर्गत कार्यक्रम अल्प प्रमाणात अमलात आणले.

सातवी पंचवार्षिक योजना– १९८५ ते ९०

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

१. या योजनेत सार्वजनिक, शैक्षणिक, विशेष ग्रंथालयांसाठी स्वतंत्रपणे १० कोटींची तरतुद
तर राष्ट्रीय ग्रंथालयांसाठी ७० कोटी माहितीशास्त्रासाठी १५० कोटी व माहिती व्यवस्थेसाठी १० कोटी. तसेच १२ कोटी ही रक्कम ग्रंथालय व माहितीशास्त्र विकास, ग्रंथालय संचलनालय, ग्रंथालय संघटना, प्रकाशने यासाठी ही तरतुद केली गेली.
सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास करण्यासाठी राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानची १९७२ साली स्थापना करण्यात आली.
ग्रंथालयांचे आधुनिकीकरण करणे, राष्ट्रीय ग्रंथालय धोरणे, ग्रंथालयांच्या गरजा, ग्रंथासाठी स्वतंत्र खाते, संगणक प्रणाली, देशांतर्गत संगणक जाळे, निर्माण करणे या कार्यक्रमावर भर देण्यात आला.

**ग्रंथालय कार्यक्रम:—**

ग्रंथालयांचा सर्वांगीण विकास हा ग्रंथालयाची उदिदष्टये, दिल्या जाण—या सेवांवर अवलंबून असतो आणि ग्रंथालया प्रसार हा ग्रंथालयात राबवले जाणारे उपक्रम, समाज प्रबोधनपर कार्यक्रम, व्याखाने, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथप्रदर्शन यावर ब—यासशा अवलंबून असतो. अशा कार्यक्रमातुनच समाज जागृती होणे, ग्रंथालयात वाचकांचा ओघ वाढणे, ग्रंथालय प्रसार होणे, एकंदरितच ग्रंथालय विकासासाठी चालना मिळते.

**उपक्रम**

**१) व्याख्याने / व्याख्यानमाला**
**२) साहित्यीकांचा गौरव/ लेखक आपल्या भेटी**
**३) ग्रंथ प्रदर्शन**
**४) ग्रंथालय प्रशिक्षण**
**५) फिरते ग्रंथालय**
**६) ग्रंथालय सप्ताह**

**समारोप:—**

समाजात आरोग्य, कृषी संशोधन, उदयोग, शैक्षणिक अशा अनेक संस्था समाजासाठी मर्यादित स्वरुपाच्या सेवा देत असतात. परंतु ग्रंथालय ही संस्था राष्ट्र बांधणीसाठी वेगवेगळी उदिदष्टये आमलात आणून जबाबदार नागरिक घडवण्याचे कार्य ग्रंथालयातुन केले जाते. देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, प्रशासन, सांस्कृतिक, अध्यात्मिक क्षेत्रातील गरजेची पूर्ती करण्यासाठी ग्रंथालये वेगवेगळया तंत्रज्ञानाच्या आधार घेऊन समाजाचा चोहोबाजूंनी विकास घडविण्याचे कार्य करत आहे.

देशाच्या जडणघडणीचे काम ग्रंथालयाच्या सहभागातून घडवून आणता येते. समाजाचा विकास, प्रगती ही ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या माहिती ज्ञानावर अवलंबुन असते. योग्य वेळी योग्य माहिती उपलब्ध करुन देणे हे ग्रंथालयाचे प्रमुख कार्य मानले जाते. विदयार्थी, शिक्षक, शेतकरी, उद्योजक, संशोधक यांना त्यांच्या कार्यात विश्वासहर्ता, गुणात्मक दर्जा, यश संपादन करण्यासाठी ग्रंथालय प्रमुख भूमिका निभावताना दिसतात. समाजातील प्रत्येक घटकांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठीशशैक्षणिक, सार्वजनिक, विशेष राष्ट्रीय असे वेगवेगळया क्षेत्रानुसार ग्रंथालयांची स्थापना केली आहे. प्रत्येक ग्रंथालयांचे क्षेत्रे भिन्न—भिन्न जरी असली तरी त्यांची समाजातील कार्ये ही एकच प्रकारची आहेत. अशी कार्ये पार पाडण्यासाठी ग्रंथालये वाचन चळवळ वाढण्यासाठी, ग्रंथालयाचा प्रसार करण्यासाठी, समाजात समता, बंधुभाव व धर्मनिरपेक्षता यांची मुल्ये जपण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन ग्रंथालये सेवेसाठी समाजाशी बांधीलकी जपताना दिसतात. म्हणून भारत सरकारने ग्रंथालयांचे समाजातील स्थान लक्षात घेऊन ग्रंथालय धोरणे राबवून ग्रंथालयांना अधिक बळकटी देण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत.

**संदर्भ:—**

१)पोहनेरकर, न.शो (१९९७) ग्रंथबोध ग्रंथालयाचे श्लोक : औरंगाबाद मराठा विभाग ग्रंथालय संघ. पृष्ठ क्र.१ ते ६
२) चप्पू, के.एल.व इतर (२००९) ग्रंथालय संघटन: लातूर निकिता प्रकाशन. पृष्ठ क्र.२ ते ११
३) जैन, प्रकाश व इतर (२००९) सुलभ ग्रंथालयशास्त्र : नागपूर, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्युटर्स पृष्ठ क्र.४—५, ३५—३७, ५६—५८, ७१
४) पारखी, गंगाधर (२०१२) ग्रंथालय विकासदर्शन : पुणे युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ठ क्र.१—१३
५) ढाकणे, निवृत्ती बालाजी (२०१२) ग्रंथालय साथक : औरंगाबाद ग्रंथालय माहितीशास्त्र प्रबोधनी पृष्ठ क्र.१२५—१३४

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत महात्मा गांधीजींच्या 'स्वदेशी' चळवळीचे योगदान

**कुबेर दिनकर दिंडे,**
M.A., B.Ed., Net
मु.पो.बहिरेश्वर, ता.करवीर, जि. कोल्हापूर.

**सारांश**

महात्मा गांधीजींच्या संपूर्ण आर्थिक विचारात नैतिकता आणि अध्यात्मिकता आढळून येते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सत्य आणि अहिंसा यासाठी घालवले. साहजिकच याचेही प्रतिबिंब त्यांच्या आर्थिक विचारात दिसून येते. त्यांना आपल्या संपूर्ण जीवनकार्यातून विशेषत: आर्थिक विचारातून 'रामराज्य' आणावयाचे होते. हे रामराज्य त्यांना फक्त भारतातच आणावयाचे होते असे नाही. तर ते त्यांना संपूर्ण विश्वामध्ये आणावयाचे होते. यासाठीच त्यांनी 'स्वदेशी' ची संकल्पना मांडली.'स्वदेशी' तत्व फक्त भारतालाच नव्हे तर जगातील सर्व देशांना उपयोगी आहे. व्यापारातून, संपत्ती मिळवण्यातून, अनेक देशामध्ये राजकीय तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. ते होऊ नये म्हणून प्रत्येक देशाने या 'स्वदेशी' चा वापर करावा की जेणेकरून व्यापारावरून कोणत्याही देशा-देशामध्ये वाद-विवाद होणार नाहीत. १९२० मध्ये त्यांनी सुरू केलेली चळवळ आजच्या बदलत्या अर्थव्यवस्थेत अत्यंत गरजेची झालेली आहे. सध्याच्या सर्व आर्थिक समस्यांवर 'स्वदेशी' हे महात्मा गांधीजींचे तत्वच रामबाण उपाय आहे.

**१.प्रस्तावना :**

भारताच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना एक वेगळेच महत्व आहे. महात्मा गांधीजींनी आपल्या संपूर्ण जीवनभरात अनेक विषयावर आपले विचार मांडले. परंतु महात्मा गांधीजींनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र असे विचार कधीही मांडले नाहीत. त्यांनी अर्थशास्त्रावर असा कोणताही महत्वाचा ग्रंथ लिहिलेला नाही. परंतु आयुष्यभर त्यांनी सत्य, अहिंसा, सर्वोदय, ग्रामोद्योग, धर्म, राजकारण, समाजकारण यांवर आपले जे विचार मांडले, त्यामध्येच त्यांचे आर्थिक विचार अंतर्भूत होते. त्यांच्या अनेक अनुयायांनी हे आर्थिक विचार संकलित करून त्या विचारांना त्यांनी 'गांधीवादी अर्थशास्त्र' असे नांव दिले. परंतु महात्मा गांधींना आपले स्वत:चे असे 'गांधीवादी अर्थशास्त्र' आहे हे मान्य नव्हते. असे असले तरी आजपर्यंत त्यांच्या या आर्थिक विचारांवर जेवढी चर्चा, विचारमंथन व लिखाण झालेले आहे, तेवढे लिखाण, चर्चा आणि विचारमंथन आपल्या देशातील इतर कोणत्याही अर्थतज्ज्ञांच्या आर्थिक विचारांवर झालेले नाही. यामध्येच त्यांच्या आर्थिक विचारांचे महत्व कळून येते. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचे तीन अवस्थेत विभाजन दिसून येते. पहिली अवस्था १९१९ पर्यंत, दुसरी १९१९ ते १९३४ पर्यंत आणि तिसरी अवस्था १९३४ ते १९४८ पर्यंत. या तीन अवस्थांमध्ये गांधीजींनी दुसऱ्या अवस्थेत 'स्वदेशी' या विचारावर भर दिला आणि स्वदेशी चळवळ सुरू केली, जी आजही आपल्या देशाच्या विकासाला पूरक आहे.

**२.संशोधनाची उद्दिष्टे :**

१. महात्मा गांधीजींच्या जीवनचरित्राचा अभ्यास करणे.
२. म. गांधीजींच्या 'स्वदेशी' या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
३. देशाच्या आर्थिक विकासात म. गांधीजींच्या 'स्वदेशी' च्या योगदानाचा अभ्यास करणे.
४. जागतिकीकरणाच्या कालखंडात म. गांधीजींच्या 'स्वदेशी' चे महत्व अभ्यासणे.

**३.संशोधन पध्दती :** भारतीय अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत म. गांधीजींच्या 'स्वदेशी चळवळीचे योगदान' या संशोधन लेखासाठी पूर्णत: दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**४.महात्मा गांधीजींचा जीवन परिचय :** महात्मा गांधीजींचे पूर्ण नांव मोहनदास करमचंद गांधी असे होते. २ ऑक्टोबर, १८६९ रोजी त्यांचा गुजरात राज्यामध्ये पोरबंदर येथे जन्म झाला. १८८७ साली मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते पुढील शिक्षणासाठी लंडनला गेले. तेथे कायद्यातील बॅरिस्टर ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली. पुढे ते भारतात परत आल्यानंतर त्यांनी वकिली सुरू केली. त्यानंतर १८९३ मध्ये ते एका खटल्याच्या संदर्भात दक्षिण अफ्रिकेला गेले. तेथील सरकार भारतीयांवर करत असलेले अत्याचार त्यांनी पाहिले आणि तेथील सरकारविरूध्द आंदोलन उभारले. सत्याग्रहाचा अवलंब दक्षिण अफ्रिकेत त्यांनी सर्वप्रथम केला. १९१५ पासून त्यांनी आपले सर्व लक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे कार्य करण्यात केंद्रीत केले. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे त्यांच्या हाती आली. १९२० मध्ये असहकार आंदोलन, १९३० ची दांडी यात्रा, १९४० मध्ये सविनय

कायदेभंग, १९४२ मध्ये चले जाव चळवळ आणि आंदोलन, १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले.

महात्मा गांधीजींनी विश्वस्त कल्पना, ग्रामस्वराज्य सर्वोदय, यांत्रिकीकरण, विकेंद्रीकरण, श्रम प्रतिष्ठा आणि स्वदेशी याबाबत आर्थिक विचार मांडले. यापैकी काही आर्थिक विचारासाठी त्यांनी चळवळी सुरू केल्या. त्यातील एक चळवळ म्हणजे 'स्वदेशी चळवळ' जी १९२० च्या असहकार चळवळीचा एक महत्वाचा भाग होती.

**५.महात्मा गांधीजींची स्वदेशी चळवळ :** महात्मा गांधीजींनी १९२० मध्ये स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम इंग्रजांशी असहकार आंदोलन पुकारले आणि या असहकार आंदोलनाचा सर्वांत महत्वाचा भाग होता विदेशी वस्तुंवर बहिष्कार आणि स्वदेशी वस्तुंचा वापर. महात्मा गांधीजींच्या मते प्रत्येक भारतीयांनी स्वदेशीचा आग्रह धरला तर देशातील उद्योगांना उत्तेजन मिळेल. परदेशातून भारतात येणाऱ्या वस्तुंचे आक्रमण थांबवता येईल. परदेशी वस्तुंची मागणी कमी झाल्यामुळे परदेशी जाणारी देशी संपत्ती थांबेल, ती आपल्या देशातच राहील. देशात राहिलेल्या संपत्तीचा उपयोग देशाच्या विकासासाठी करता येऊ शकेल. प्रत्येक भारतीयाने भारतात तयार होणाऱ्या वस्तूंचाच वापर करावा. परदेशातून वस्तू आयात करण्याचे थांबवले तर देश आर्थिकदृष्ट्या संपन्न बनेल असे गांधीजींना वाटत होते. देशातील लोकांनी देशातच तयार होणाऱ्या वस्तू घेतल्या तर देशातील सर्व वस्तुंची मागणी वाढेल. परिणामी, पुरवठा वाढवावा लागेल, पुरवठा वाढवायचा असेल तर उत्पादन वाढवावे लागेल आणि उत्पादन वाढवायचे असेल तर देशातील लोकांना कामावर घ्यावे लागेल आणि त्यांना काम मिळाल्यामुळे त्यांना पगार द्यावा लागेल. त्यांना पगार दिल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल. परिणामी, त्यांची मागणी वाढेल. म्हणजे स्वदेशी – मागणी वाढ – पुरवठा वाढ – उत्पादन वाढ – उद्योगांच्या संख्येत वाढ – रोजगार वाढ – उत्पन्न वाढ – स्वदेशी वस्तुंच्या मागणीत वाढ असे अर्थव्यवस्थेचे चक्र गतीमान होईल असे गांधीजींना वाटत होते. देशामध्ये सर्व प्रकारच्या रोजगारात वाढ करण्याचे आणि लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांच्या संख्येत वाढ करण्याचे सामर्थ्य या एका गांधीजींच्या 'स्वदेशी' चळवळीत होते. एवढेच नव्हे तर देशातील अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम या एका स्वदेशी तत्वात आहे.

**६.भारताच्या आर्थिक विकासात 'स्वदेशी' चे योगदान :** महात्मा गांधीजींच्या 'स्वदेशी' च्या तत्वात देशातील लोकांनी फक्त देशातच तयार होणाऱ्या वस्तू वापरावयाच्या आणि सर्व विदेशी वस्तुंचा त्याग करावयाचा हा महत्वाचा भाग होता. स्वातंत्र्यापूर्वी आपल्या देशामध्ये जो काही औद्योगिक विकास झाला आणि स्वातंत्र्यानंतरही जो काही औद्योगिक विकास झाला, त्यांच्यामध्ये सिंहाचा वाटा या स्वदेशीचाच होता. १९४७ नंतर १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणापर्यंत देशात उद्योगांचा जो विस्तार झाला, तो स्वातंत्र्याच्या काळात देशातील लोकांच्या अंगात भिनलेल्या या स्वदेशीमुळेच. स्वातंत्र्यानंतर देशात लघु, कुटीर व मध्यम उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढले. या सर्व उद्योगातून तयार होणाऱ्या वस्तुंना परकीय बाजारपेठ उपलब्ध नव्हती. त्यामुळे स्वदेशीमुळे देशातच यांना बाजारपेठ उपलब्ध झाली. त्यामुळे देशातील उद्योगांना देशातच बाजारपेठ उपलब्ध करून देणे हाच मुख्य उद्देश या 'स्वदेशी' चा होता. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी भारताला कच्च्या मालाचा पुरवठादार आणि पक्क्या मालाची बाजारपेठ असे स्वरूप दिले होते. त्यामुळे देशातील अनेक उद्योगांचा ऱ्हास झाला होता. कमीत कमी किंमतीत भारतातून कच्चा माल घ्यावयाचा आणि इंग्लंडमध्ये त्यावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करून तो जास्त किंमतीने भारतात विकावयाचा या धोरणातून इंग्रजांनी भारताचे प्रचंड आर्थिक शोषण केले. हे शोषण थांबवण्यासाठी महात्मा गांधीजींनी 'स्वदेशी' चा पुरस्कार केला. देशातील उद्योग क्षेत्राची प्रगती करावयाची असेल तर ती जास्तीत जास्त विक्रीतूनच होत असते. म्हणून स्वातंत्र्यानंतर देशाची लोकसंख्या जशी प्रचंड प्रमाणात वाढत गेली, तशी त्या लोकसंख्येने अर्थव्यवस्थेवरील बंधनामुळे आणि विदेशी वस्तू देशात उपलब्ध होत नसल्यामुळे स्वदेशी वस्तु विकत घेतल्या. परिणामी, १९९१ पर्यंत देशात मोठ्या प्रमाणावर लघु, कुटीर, मध्यम व मोठ्या उद्योगांचा विकास झाला.

**७.जागतिकीकरणाच्या कालखंडात 'स्वदेशी' चे महत्व :** १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानंतर संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणावर उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण सुरू झाले. त्यामुळे विदेशी वस्तू मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ लागल्या. तुलनेने देशी वस्तुंपेक्षा स्वस्त अशा या वस्तू उपलब्ध होऊ लागल्यामुळे देशी उद्योगांचे भवितव्य धोक्यात आले. देशी उद्योग विरूध्द परदेशी उद्योग यांच्यामध्ये ही अशी गळेकापू स्पर्धा सुरू झाली. देशाच्या अर्थव्यवस्थेचे विदेशी अर्थव्यवस्थेशी संगनमत होऊन एक विश्व अर्थव्यवस्था निर्माण झाली. परिणामी, विदेशी कंपन्या देश व उद्योग यांना १३० कोटी लोकांची बाजारपेठ म्हणजे भारत असे वाटू लागले. त्यामुळे देशी उद्योग व आपल्या अर्थव्यवस्थेसाठी कधी नाही इतकी गरज स्वदेशीची भासू लागली आहे. सध्याच्या या गतीमान युगात देशी उद्योगांना महात्मा गांधीजींचे 'स्वदेशी' चेच तत्व तारू शकते. देशातील सर्व लोकांनी या स्वदेशी तत्वाचा वापर

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

केला तर सर्व विदेशी कंपन्या, उद्योग व देश यांना भारतीय बाजारपेठेत शिरकाव करता येणार नाही. थोडक्यात सध्याच्या या जगा किंवा मरा अशा घातक स्पर्धेमध्ये आपण 'स्वदेशी' ची कवचकुंडले वापरून निश्चितच तरू शकतो.

**निष्कर्ष :**

महात्मा गांधीजींचे सर्व आर्थिक विचार हे त्यांच्या नैतिक व अध्यात्मिक सिध्दांतावर आधारलेले होते. त्यांच्या मते अर्थशास्त्र व नीतीशास्त्र हे परस्परापासून वेगळे करताच येत नाही. महात्मा गांधीजींचे स्वदेशी तत्व सुध्दा नैतिकतेवर आधारलेले आहे. एखादा देश स्वत:चा आर्थिक फायदा होण्यासाठी स्वत:च्या देशात उत्पादित केलेल्या वस्तू दुसऱ्या देशात विकून त्या देशाचे आर्थिक शोषण करत असेल तर ते नैतिकतेत बसत नाही असे त्यांचे मत होते. जे अर्थशास्त्र एखादी व्यक्ती राष्ट्राच्या नैतिक कल्याणाचा विचार करत नसेल तर ते अनैतिक आहे. तसेच जे अर्थशास्त्र एखाद्या देशाला दुसऱ्या देशाचे शोषण करण्यास सांगत असेल तर ते सुध्दा अर्थशास्त्र अनैतिक आहे असे गांधीजींना वाटत होते. अशाप्रकारे जगातील प्रत्येक देशाला 'स्वदेशी' या तत्वाचा उपयोग होतो. त्यामुळे स्वदेशी तत्व विश्वव्यापी व विश्वउपयोगी ठरते. सध्याच्या बदललेल्या व्यापार धोरणामुळे अनेक देशा-देशात जे राजकीय तणाव निर्माण होत आहेत, ते दूर करून सर्व देशात, जगात शांतता, अहिंसा आणि सत्य फक्त आणि फक्त महात्मा गांधीजींचे 'स्वदेशी' तत्वच निर्माण करू शकते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. Economic thought of Mahatma Ganhi - M. Maharajan - Discovery Publishing House.
2. Gandhian Thought An Analytical Study - J. K. Mehta - Ashish Publishing House.
3. Gandhi in the West - Sean Scammer - Cambridge University Press.
4. Gandhi - Kathryn Tidrick - I. B. Tauris and Company Ltd. Publication.
5. Mahatma Gandhi, Life Ideology and Thoughts - Raj Kumar, Vijendra Kumar - Mangal Deep Publication.
6. Gandhian Thoughts An Overview - Dr. Ravindra Kumar Gyan Publishing House.

**हिंदी :**

1. भारतीय राजनीती के नक्षत्र – विवेक शर्मा – रितु पब्लीकेशन.
2. गांधी साहित्य मेरे समकालीन – सस्ता साहित्य मंडळ.
3. गांधी और भावी विश्व व्यवस्था – रामजी सिंह – कॉमनवेल्थ.

**मराठी :**

१. महात्मा गांधी आदिपर्व – प्यारेलाल – पराग एजन्सीज.
२. राष्ट्रपिता महात्मा गांधी – सुजाता टिकेकर – मुक्तरंग प्रकाशन.
३. महात्मा आणि बोधीसत्व – अलीम वकील – मित्र प्रकाशन.
४. गांधीजी होते म्हणून – बाळ पोतदार – किसानशक्ती प्रकाशन.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यवीरांगना वीणा दास

**डॉ. मधुकर विठोबा जाधव**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
ता. चंदगड, जि. कोल्हापूर

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला जगाच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास अनेक थोर देशभक्तांच्या कार्यकर्तृत्वाने लिहिला आहे. अनेक क्रांतिवीरांनी इंग्रजांशी लढता लढता प्राणांची आहुती दिली, काही देशभक्त हसत हसत मायभूमीसाठी फासावर चढले, काही देशभक्तांनी आजन्म असा कारावास पत्करून देशसेवेला जीवन समर्पित केले, काहीनी अन्यायी इंग्रज अधिकाऱ्यांना समोरासमोर गोळ्या झाडल्या व स्वत: कारावास स्वीकारला तर अनेक क्रांतिकारकांनी आयुष्यभर भूमिगत राहून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. या सर्व देशभक्तांच्या त्यागामुळे भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्यलढ्यामध्ये तरूण महिला क्रांतिकारकांचे कार्य श्रेष्ठ आहे.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये स्त्री शक्तीचा सहभाग सुरूवातीपासूनच होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये अनेक महिला क्रांतिकारकांनी आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेवून देशसेवेला अजरामर केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास वेगवेगळ्या आंदोलनांनी भरलेला आहे. मवाळवाद, जहालवाद, महात्मा गांधी यांची अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग चळवळ व क्रांतिकारकांची सशस्त्र क्रांतिकारी चळवळ या प्रकारच्या लढ्यामुळे भारत देश ढवळून निघाला. अशा आंदोलनांनी इंग्रजी राजवटीच्या विरोधारत भारतीयांनी दीर्घकाळ लढा दिला. भारतीय क्रांतिकार्यामध्ये महिला क्रांतिकारकांनी केलेले कार्य अद्वितीय असेच आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये तरूण महिला क्रांतिकारकांचा सहभाग हे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. क्रांतीकार्यामध्ये तरूण जसे पुढे होते त्याचप्रमाणे तरूणी ही क्रांतीकार्यामध्ये मागे नव्हत्या. त्यांनीही क्रांतीकार्यामध्ये स्वत:ला झोकून देऊन भारताचा स्वातंत्र्यलढा चालविला.

लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली, त्यातून ब्रिटिशांचा साम्राज्यवाद व फोडा आणि राज्य करा ही निति भारतीयांना समजून आली. त्यामुळे भारतीयांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला. ब्रिटिशांच्या विरोधी स्त्री-पुरुष क्रांतीकारक रस्त्यावर उतरले. स्वदेशी आंदोलनात स्त्री वर्गांनी सक्रिय सहभाग नोंदविण्यास सुरूवात केली. परदेशी मालाची जाळपोळ करणे, गुप्त कट रचणे, गुप्त बातम्यांची देवाण-घेवाण करणे, भूमिगत क्रांतीकारकांना जेवण व शस्त्रास्त्रे पुरविणे, तुरुंगात गेलेल्या क्रांतिकारकांच्या घरी अन्न-धान्य पुरविणे व त्यांना आधार देणे, रास्ता रोको आंदोलन करणे, खेड्यातील लोकांना स्वातंत्र्य चळवळीची माहिती देणे, सरकारी इमारतीवर रात्री अपरात्री तिरंगा फडकविणे इ. कार्य अतिशय जोमाने क्रांतिकारक करीत होते. भारतमातेच्या क्रांतीकारकांना विविध प्रकारची मदत करण्याबरोबरच स्त्री क्रांतिकारकांनी हातात बंदूक घेऊन क्रांतीकार्यामध्ये सहभागी होऊन देशासाठी हसत हसत हौतात्म्य स्वीकारले.[१]

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या आगमनानंतर मोठ्या प्रमाणात स्त्रीया राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय झाल्या.[२] सूत कातणे, विदेशी कापडाची होळी करणे, दारू दुकानासमोर निदर्शने करणे या कार्याद्वारे स्त्रीया देशसेवा करू लागल्या.[३] १९१७ च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनात स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आणि स्थानिक सरकारातून प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे स्त्रियांमध्ये जागृती होऊन त्या स्वातंत्र्यलढ्यात उतरल्या.[४] त्यातूनच एक हजार स्त्रियांनी १९२१ मध्ये मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनाच्या विरोधात भाग घेतला. क्रांतीकारक चित्तरंजन दास यांच्या पत्नी वासंती देवी, त्यांची बहिण उर्मिला देवी व भाची सुनिता यांनी कलकत्त्यात क्रांतीकार्यात भाग घेऊन स्वातंत्र्य चळवळीला बळ दिले.[५]

त्यानंतर संपूर्ण भारतभर स्त्रियांनी क्रांतीकार्यात सहभाग नोंदविला. सविनय कायदेभंग चळवळीत स्त्रियांचा सहभाग आणखीनच वाढला. मुंबई, बंगाल, मद्रास, अलाहाबाद, दिल्ली व लाहोर या प्रांतातील स्त्री क्रांतीकारकांनी तीव्र आंदोलन करून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले.[६]

अवंतिकाताई गोखले, कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसाबेन मेहता, उर्मिला देवी, ॲनी बेझंट, कस्तुरबा गांधी, वासंती देवी, अनुसयाबेन साराभाई, कमला नेहरू, सरोजिनी नायडू, मनीबेन पटेल, सुचाता कृपलानी, अमृता कौर, अरूणा असफअली, दुर्गादेवी चाफेकर, प्रेमा कंटक, सुशिला पै, ज्योतिर्मयी देवी, हेमप्रभा दास, सुधाताई जोशी, मेहताबेन पटेल, सिंधुताई देशपांडे, जे. एम. सेनगुप्ता, सुचीता कृपलानी, मिरदुला साराभाई, मातागिनी हिजरा, मिरा बेन आदि अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्यलढ्यात पुरस्कार घेऊन

अतुल धैर्य दाखवून मोठा पराक्रम केला. १९३० ते १६४२ या कालखंडामध्ये ज्या क्रांति वीरांगना क्रांतिकार्यात सहभागी झाल्या त्यामध्ये प्रीतिलता वड्डेदार, शांती घोघ, सुनिता चौधरी, कल्पना दत्त, वीणा दास, कल्याणी दास, नेली सेनगुप्त, वनलता दासगुप्ता, सुहासिनी गांगुली, सावित्री देवी, अमिता सेन, रेणुका सेन, श्रीदेवी मुत्सदी, प्रकाशवती पाल, सुशिला मोहर, राणी गिडालू, नेली सेनगुप्ता, सारला देवी, ननिबाला देवी व यमुना देवी यांचा उल्लेख करावा लागेल. ज्यांनी स्वातंत्र्याच्या वेलीवर स्वत:च्या जीवाची पर्वा न करता बलाढ्य अशा इंग्रज सत्तेविरोधी शस्त्र हाती घेऊन भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला गतिमान केले.

सुशिक्षित तरूण मुलींचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग हे बंगालमधील क्रांतिकारी चळवळीचे प्रमुख वैशिष्ट्य होय. प्रतिलता वड्डेदार, कल्पना दत्त, शांती घोष, सुनिता चौधरी, वीणा दास, शोभाराणी दत्त इत्यादी तरूण मुलींची नावे आंदोलनाच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये महत्त्वाची ठरतात. त्यातीलच एक तरूण वीर क्रांतिकारक महिला म्हणजे वीणा दास होय.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील विद्यार्थी क्रांतिकारी महिला म्हणून वीणा दास यांचे नाव घेतले जाते.[७] वीणा दास यांचा जन्म २४ ऑगस्ट १९११ रोजी बंगाल प्रांतामध्ये झाला. ती चितगावची राहणारी होती. वीणा दासचे पिता श्री. वेणीमाधव दास एक आदर्श देशभक्त कलकत्त्याच्या सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. वीणा दास यांच्यावरती वडिलांच्या देशभक्तीचा प्रभाव लहान वयापासूनच होता. वडिलांची प्रेरणा घेऊन वीणा दास क्रांतिकार्यात उतरली, लहान वयापासूनच ती गुणी व सुसंस्कृत होती.[८]

वीणा दास यांचे वडील थोर देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे गुरू होते. श्री वेणी माधव यांना कल्याणी देवी व वीणा देवी या दोन मुली होत्या. कल्याणी देवी फैजुन्निसा गर्ल्स हायस्कूलच्या मुख्य प्राध्यापिका झाल्या आणि विद्यार्थी वर्गाला क्रांतीच्या मार्गावर जाण्यासाठी घडवू लागल्या. तिनेच शांती घोष व सुनिती चौधरी यांना बगीतून सोडल्यामुळे तिला सहा वर्षाची शिक्षा झाली होती. मोठ्या बहिणीप्रमाणेच वीणा दासही क्रांतीच्या मार्गावर अग्रेसर झाली. इंग्रजांच्या वाईट कृत्यामुळे ती सुडाने पेटून उठली होती.

सायमन कमीशनला विरोध करण्यासाठी वीणा दास प्रथम क्रांतिकार्यात उतरली. १९२८ ला संपूर्ण भारत देशामध्ये सायमन परत जा चा नारा दिला जात होता. वीणा दासने कॉलेजमधील मुलींना एकत्र करून कॉलेजच्या प्रवेशद्वारावर निदर्शने करून धरणे आंदोलन केले. यातूनच त्यांच्या क्रांतिकार्याला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.[९]

इंग्रजांनी चितगाव, ढाक्का अशा ठिकाणच्या क्रांतीकारकांवर अमानुषपणे लाठी हलला केला होता यामध्ये काही क्रांतीकारक ठार झाले होते. भारतीय महिलांनाही इंग्रजांनी अपमानीत केले होते.[१०] तेव्हा या अपमानाचा बदला घेण्याचे वीणा दास यांनी ठरविले व त्याच कालखंडामध्ये म्हणजेच १९३१ मध्ये कोमिल्ला येथील शांती घोष व सुनिता चौधरी या शाळकरी विद्यार्थीनींनी जिल्हादंडाधिकाऱ्यावर गोळ्या झाडून त्याची हत्या केली.[११] यातून प्रेरित होऊन वीणा दास क्रांती दलाच्या सदस्य झाल्या व असहकार आंदोलनामध्ये सहभागी झाल्या. आंदोलनात सहभागी झाल्याबद्दल त्यांना अटक झाली. कैदेतून सुटका झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्या कलकत्त्याच्या वसतिगृहामध्ये राहत होत्या. तेव्हाच त्या क्रांतिकार्याशी जोडल्या गेल्या व हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या सभासद झाल्या व गुप्तपणे क्रांतिकार्याला सुरूवात केली.[१२] महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बी.ए. ची पदवी घेण्यासाठी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला उपस्थित राहिली.[१३]

कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाचे अध्यक्ष म्हणून दि. ६ फेब्रुवारी १९३२ रोजी बंगालचे गव्हर्नर मिस्टर स्टॅनले जॅक्सन यांना आमंत्रित करण्यात आले होते. या पदवीदान समारंभामध्ये वीणा दास यांना ही बी.ए. ची पदवी मिळणार होती. पदवी दान समारंभाच्यावेळी जॅक्सन भाषण देण्यासाठी उभे राहत असताना वीणा दासने व्यासपीठावर आलेल्या स्टॅनले जॅक्सनला त्याच्यासमोर उभे राहून आपल्या पिस्तुलमधून एका पाठोपाठ अशा पाच गोळ्या झाडल्या. एवढ्यात कर्नल सुहरावर्दीने वीणाचा हात पकडला व तिला थांबविले परंतु तिचे सर्व नेम हुकले. स्टॅनले जॅक्सन यातून बचावला. तेथेच वीणा दासला अटक झाली व तिच्यावर खटला भरला त्यावेळी तिला विचारण्यात आले, तु हे कृत्य का केले. तेव्हा तिने जे उत्तर दिले ते अतिशय महत्त्वाचे आहे. त्या म्हणाल्या, अन्याय संपावयाचा असेल तर गोळीनेच उत्तर दिले पाहिजे म्हणून मी हे कृत्य केले आहे . अशी जाहीर कबुली वीणा दास या क्रांतीकारी वीरांगनेने दिली. वीणा दास यांनी हे कृत्य देशप्रेमाने प्रेरित होऊन केले होते. या गुन्ह्याबद्दल तिला ९ वर्षाची शिक्षा दिली.[१४]

इ.स. १९३९ मध्ये जेलमधून सुटल्यानंतर त्यांनी छोडो भारत आंदोलनामध्ये सक्रीय सहभाग घेतला. त्यामध्ये त्यांना पुन्हा ३ वर्षाची कारावासाची शिक्षा झाली. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी आपले कार्य कामगार व मजूरांसाठी घालविले व विविध विषयांवर मोठ्या प्रमाणात लिखाण करून भारतीय समाज जागृतीला चालना दिली.[१५]

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

**सारांश :**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये वीणा दास या महिला क्रांतिकारकांनी केलेले कार्य अद्वितीय असेच आहे. वीणा दास ही देशासाठी अहोरात्र कष्टणारी महिला क्रांतिकारक होय. 'वंदे मातरम्' हे गीत शेवटपर्यंत मुखावर असणारी, 'स्वातंत्र्य' ह्या एकाच ध्येयाने प्रेरित झालेली, शेवटच्या श्वासापर्यंत स्वातंत्र्याचा विचार करणारी स्वातंत्र्यवीरांगना म्हणजे वीणा दास होय. भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये त्यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले व तमाम भारतीयांसमोर देशासाठी केलेल्या त्यागाची व बलीदानाची प्रेरणा ठेवली आहे.

**संदर्भ सूची :**

१. Ray B. M., 'The Freedom Movement and Feminist Consciousness in Bengal, New Delhi, 1995, p. 185.
२. देशपांडे प्र. न. (संपा.), संशोधक, धुळे, सप्टेंबर २००६, पृष्ठ २९.
३. Brown J. Y., Gandhi : Prisoner of Hope, London, 1989, p. 57.
४. देशपांडे प्र. न. (संपा.), संशोधक, धुळे, सप्टेंबर २००६, पृष्ठ ५५.
५. बंद्योपाध्याय, प्लासी ते विभाजन तक, नवी दिल्ली, २०१२, पृष्ठ ४२४.
६. Forbes G., Women in Modern India, New Delhi, 1998, p. 125.
७. दै. सकाळ ९ ऑगस्ट २०१२.
८. कवि माधवी, १०१ श्रेष्ठ महिला, लातूर, २०१०, पृष्ठ ५३.
९. गोस्वामी सुधा, भारतवर्ष की चर्चित महिलाएँ, आगरा, पृष्ठ १५५.
१०. कित्ता, पृष्ठ १५६.
११. विपीन चंद्र, इंडियाज स्ट्रगल फॉर इंनडिफेन्स, दिल्ली, १९९०, पृष्ठ २९६.
१२. उपरोक्त, १०१ श्रेष्ठ महिला, पृष्ठ ५३.
१३. उपरोक्त, भारतवर्ष की चर्चित महिलाएँ, १५६.
१४. उपरोक्त, कवि माधवी, १०१ श्रेष्ठ महिला, पृष्ठ ५३.
१५. कित्ता, पृष्ठ ५३.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

## राष्ट्र उभारणीस बळ प्राप्त करून देणारे महिला सक्षमीकरण

**श्रीमती मीना भा. सावंत**
सहा. प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी.

**प्रस्तावना :**

२६ जानेवारी, १९५० रोजी भारत प्रजासत्ताक देश बनला. डॉ. आंबेडकरांच्या कुशल नेतृत्वामुळे भारताची राज्यघटना तयार झाली. समाजाच्या विकास प्रक्रियेला चालना देणारे जे अनेक घटक आहेत, त्यापैकी कायदा हा महत्वाचा घटक आहे. भारतीय स्त्रियांना अनेक मौलिक अधिकार कायद्याने प्राप्त झाले. स्वातंत्र्यापूर्वी अनेक समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे स्त्रियांचे जगणे सुसह्य झाले. तर स्वातंत्र्यानंतर घटनेला अनुसरून करण्यात आलेल्या विविध तरतुदी, कायदे, विकास योजना, सोयी-सवलती, विविध क्षेत्रातील आरक्षण यामुळे स्त्रियांचा दर्जा उन्नत होण्यास मदत झाली. म्हणूनच भारताच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढलेला दिसून येतो. एकूणच समतेच्या तत्वावर भारतातील विभिन्न प्रांतातील, धर्मातील, जातीतील, भिन्न संस्कृती व भिन्न आर्थिक स्तरातील स्त्रिया जागृत झाल्या व आपले अधिकार व हक्क प्राप्तीसाठी एकवटल्या. सर्व भारतीय स्त्रियांना आपले प्रश्न, आपल्या समस्या व त्यासाठी द्यावा लागणारा लढा यामध्ये समानता जाणवली. साहजिकच, भारतीय स्त्रियांमध्ये परस्परांविषयी आत्मियता निर्माण झाली. संघटीत झालेल्या जनसमुहामुळे राष्ट्र उभारणीस बळ प्राप्त झाले. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळातील विविध तरतुदी, कायदे, योजना यामुळे स्त्रियांमध्ये निर्माण झालेले सक्षमीकरण अभ्यासणे महत्वाचे ठरते.

**उद्दिष्टे / हेतू :**

१.भारतीय स्त्रियांचा समाजातील दर्जा अभ्यासणे.
२.स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचा दर्जा उंचावणारे घटक अभ्यासणे.

**संशोधनाची पध्दत :**सदर संशोधनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने इंटरनेट, उपलब्ध संदर्भ ग्रंथ, मासिके यांचा अभ्यासासाठी वापर करण्यात आला आहे.

**भारतीय स्त्रीचा दर्जा :**

भारतीय समाजाच्या जडण-घडणीत आजपर्यंत स्त्रियांचे स्थान दुय्यम असलेचे दिसते. स्त्रियांचे होणारे शोषण, अत्याचार, यांची पाळेमुळे आपल्याला भारतीय ऐतिहासिक घटनात दिसतात. वैदिक कालखंडात स्त्री दर्जा जवळ-जवळ समान होता. तिला उपनयनाचा, शिक्षणाचा, प्रौढ विवाह, स्वयंवर, वर निवडीचा, सामाजिक कार्यात पुरूषाच्या बरोबरीने भाग घेण्याचा अधिकार होता. सामाजिक बदलांबरोबरच सामाजिक मूल्यांत परिवर्तन झाले. उत्तर स्मृतीकाळात धार्मिक कर्मकांडाना महत्व येत गेले. जातीव्यवस्था काटेकोर झाली. कुलवान व वेदसंपन्न पुरूष मिळावा म्हणून वरदक्षिणा म्हणजे हुंडा देण्याची प्रथा निर्माण झाली. वंश शुध्दतेसाठी अंतर्विवाहाबरोबरच, बालविवाहाची, जरठकुमारी विवाहाची प्रथा वाढत गेली. स्त्रियांचे स्वातंत्र्य नष्ट झाले. शिक्षणाअभावी स्त्रीच्या व्यक्तीमत्वाचा, ज्ञानाचा, प्रगल्भतेचा विकास खुंटला. एक प्रकारचे मानसिक परावलंबीत्व तिच्या वाट्याला आले. तिच्या वारसा हक्कावर, मालमत्तेवर गदा आली. चूल आणि मूल हे तिचे कार्यक्षेत्र बनले. शिक्षण व ज्ञानाअभावी स्त्रीचा विकास खुंटलाच, पण कुटुंब आणि समाजाचाही विकास खुंटला.

ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतीय समाजसुधारक व त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे ब्रिटीशांनी केलेल्या कायद्यामुळे स्त्रियांना शिक्षण, आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह, सतीबंदी, मालमत्तेत वारसा, बालहत्या बंदी, प्रौढ विवाहास मान्यता अशा सुधारणा घडून आल्या. तरीसुध्दा सामाजिक जीवनात स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, एकूण साक्षरता, त्यांचे होणारे शोषण यामुळे स्त्रियांच्या दर्जात सातत्याने घसरण दिसून येते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रियांच्या दर्जात हळूहळू परिवर्तन होण्यास सुरवात झाली. अनेक क्षेत्रात

त्या समानतेने हक्क बजावू लागल्या. त्यासाठी घटनात्मक तरतुदी, कायदे, शिक्षण, सोयी-सवलती, रोजगार, आर्थिक विकास, राजकीय सहभाग, स्त्रियांच्या हक्कांची त्यांना झालेली जाणीव या बाबींमुळे स्त्रियांचा दर्जा उन्नत होण्यास मदत झाली.

**स्त्रियांचा दर्जा उंचावणारे घटक :**

**१)घटनात्मक हक्क :**भारताच्या राज्यघटनेमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक, व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्ती विकासाची समान संधी देण्यात आली. कोणत्याही क्षेत्रात लिंगभेद केला जाणार नाही असे घटनेने स्पष्ट केले.

**२)इ.स.१९५४ चा विशेष विवाह कायदा :** या कायद्याने आंतरधर्मिय, आंतरजातीय विवाह करण्यास कायदेशीर परवानगी मिळाली. त्यास नागरी विवाह कायदा म्हटले जाते. या अन्वये विवाह हा करार बनला. काही अटींवर घटस्फोटाची कायद्याने मुभा मिळाली.

**३)हिंदू विवाह कायदा, १९५५ :** डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाला बराच विरोध झाला. पुढे यातील विवाह विषयक बाबींचा समावेश हिंदू विवाह कायदा, १९५५ यात करण्यात आला.या कायद्यातील तरतुदी हिंदू स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी क्रांतीकारी ठरल्या.

**४) विवाहाच्या वयाचा कायदा :**स्वातंत्र्यपूर्व काळात १८ वर्षाखालील मुलगी हे लग्नासाठीचे वय मानले जात होते. १९५८ मध्ये झालेल्या कायद्यातील दुरूस्तीमुळे मुलाचे वय २१ वर्षे व मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण अशी सुधारणा करण्यात आली.

**५) हुंडा प्रतिबंधक कायदा :** आपल्या देशात हुंडा प्रथेमुळे बळी गेलेल्या निष्पाप मुलींची संख्या मोठी आहे. त्यामुळे १९६१ला नवीन कायदा अंमलात आणला. विवाहाच्या ७ वर्षाचे आतील स्त्रीचा अनैसर्गिक मृत्यू दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आला.

**६) कल्याणकारी कायदे :**स्त्रियांना शिक्षण मिळावे, त्यासाठी आर्थिक मदत, वसतिगृहाची सोय, व्यवसाय शिक्षणाच्या सोयी केल्या गेल्या. बाळंतपणासाठी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सहा महिने ते कमाल अडीच वर्षे रजेची तरतूद, गर्भ ठेवण्याचा व गर्भपाताचा हक्क, शारीरिक व मानसिक कारणास्तव गर्भपाताचा हक्क, कुटुंब मर्यादित ठेवण्याचा हक्क इत्यादी तरतुदींमुळे चूल आणि मूल यात अडकलेली स्त्री घराबाहेर पडू लागली.

**७) आदिवासी, निम्न जाती, ग्रामीण स्त्रियांसाठी कल्याणकारी योजना :**देवदासी पुनर्वसन, फसवल्या गेलेल्या मुलींचे पुनर्वसन करून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले गेले. या स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी शासकीय तसेच सेवाभावी संस्था जोमाने कार्यरत आहेत. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी महिला आर्थिक विकास मंडळाची स्थापना, महिला बचत गटाची चळवळ, त्यांना चार टक्के व्याज दराने होणारा कर्ज पुरवठा यामुळे वंचित समाजाच्या खालच्या स्तरातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सबल होत आहेत.

**८) हिंदू वारसा कायदा :**१९५६ च्या कायद्याने स्त्रियांना पित्याच्या मालमत्तेत भावा इतकाच समान वाटा देण्यात आला.

**९)समान वेतन व कारखाना सुधारणा कायदा :** १९७६ च्या कायद्याने स्त्री-पुरूष कर्मचाऱ्यांमध्ये वेतनाच्याबाबत असणारा विभेद दूर करण्यात आला. तसेच कारखान्यात कामाविषयीचे नियम, आठवड्याची सुट्टी, स्वच्छतागृह, विश्रांतीची जागा, नऊ तास काम, रात्री १० ते ५ पर्यंत कामास परवानगी नाही या खास तरतूदी करण्यात आल्या व स्त्रियांना सुरक्षित नोकरीची हमी देण्यात आली.

१०)भारतीय राज्य घटनेने स्त्रियांना प्रौढ मतदानाचा व निवडणूक लढवण्याचा हक्क दिलेला आहे. १९९२ ला झालेल्या ७३ व्या घटना दुरूस्तीने स्त्रियांना पंचायत राज्य स्तरावर एक तृतीयांश जागा राखीव करण्यात आल्या. त्यामुळे आदिवासी, ग्रामीण स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढू लागला.

**११)कौटुंबिक छळापासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा :** लोक सहभाग व स्त्री चळवळीच्या रेट्यातून कौटुंबिक छळापासून स्त्रीच्या संरक्षणाचा कायदा २६ ऑक्टोबर, २००६ रोजी सर्वत्र अंमलात आला. या दिवाणी कायद्याने न्यायालयीन आदेशाने स्त्रीचे छळापासून संरक्षण करणे शक्य आहे. स्त्रीला समानतेने, सन्मानाने, शांततेने व प्रतिष्ठेने हिंसामुक्त जीवन जगण्याचा अधिकार या कायद्याने मिळाला आहे.

अशा तऱ्हेने विविध कलयाणकारी कायदे, योजना, आर्थिक, सामाजिक, राजकीय सबलीकरणाच्या विविध तरतुदींमुळे राष्ट्र विकासात अर्ध्या लोकसंख्येचे योगदान, महत्व समाजाच्या लक्षात येऊ लागले आहे. स्त्रियांचे सक्षमीकरण पूर्णांशाने झाल्याशिवाय संपूर्ण राष्ट्र विकसित होऊ शकत नाही. या जाणिवेतूनच आज स्त्रियांचा विविध क्षेत्रात मुक्त संचार होऊ लागलेला आहे.

**निष्कर्ष :**

१.अलिकडच्या काळामध्ये स्त्रियांना प्राप्त झालेल्या निर्णय-स्वातंत्र्यामुळे प्रौढ विवाह, प्रेम विवाह, आंतरजातीय विवाह, आंतरधर्मिय विवाहाचे प्रमाण वाढल्याचे दिसते.

२.स्त्री कल्याण संस्था, स्त्री संघटना, महिला मंडळे, स्त्री विषयक चर्चा सत्रे, परिषदा, स्त्रियांची आंदोलने यामुळे स्त्रियांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणीव निर्माण झाली आहे. त्या हक्काची अंमलबजावणीसाठी आग्रही आहेत.

३.स्त्रियांचा शैक्षणिक स्तर भारतामध्ये उत्तरोत्तर वाढत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार स्त्रियांची साक्षरता ६५.४६ टक्क्याने वाढली आहे. प्रतिष्ठित अशा नोकरी व व्यवसायात स्त्रियांची संख्या वाढत आहे. दरवर्षी १.२५ लाख स्त्री डॉक्टर, २५% स्त्रिया सायन्स-इंजिनियर क्षेत्रात आहेत. स्त्री शिक्षणातील ही वाढ समाजावर अनुकूल परिणाम करणारी आहे.

४.संघटीत व असंघटीत क्षेत्रात स्त्रिया पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. १९९१ पासून स्त्रिया सैन्यदलातही काम करू लागल्या. त्यातून स्त्रिया स्वावलंबी झालेल्या व आपल्या कुटुंबाची जबाबदारी सक्षमपणे वाहताना दिसत आहेत. त्यातून त्यांचा स्वाभिमान व आत्मविश्वास जागा होत आहे.

५.भारताच्या लोकसभा व विधानसभेमध्ये सदस्यपदी काही प्रमाणात महिला नेतृत्व करत होत्या. त्यांनी आपल्या देशाचे पंतप्रधान पद १७ वर्षे सांभाळले. राष्ट्रपती पदापासून सरपंच पदापर्यंत महिलांनी आपले भरीव योगदान दिले आहे. राष्ट्रपती पदापासून संरक्षण पदापर्यंत स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. त्याशिवाय ३३% आरक्षणाच्या विधेयकामुळे स्त्रियांच्या कधीही न थांबणाऱ्या राजकीय सहभागाची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे देशभरातील दहा लाखाच्यावर स्त्रियांना पंचायत राज्य व्यवस्थेमध्ये आणले आहे.

६.अनेक प्रकारची सामाजिक, सांस्कृतिक बंधने असतानाही स्त्रियांनी प्रशासकीय, न्यायालयीन, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रिडा क्षेत्रातील त्यांची कामगिरी, त्यांना मिळालेले मानसन्मान, त्यांनी समाजासाठी दिलेले योगदान राष्ट्र उभारणीस मोलाचे ठरले आहे.

७.देशातील सर्वोच्च असे 'भारतरत्न' सारखे पुरस्कार इंदिरा गांधी, मदर तेरेसा, अरूणा असफली, लता मंगेशकर यांना देण्यात आले. त्याबरोबरच प्रतिष्ठित असे पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री असे किताब, तसेच संगीत नाटक, अकादमी पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार अनेक महिलांनी प्राप्त केले आहेत.

८.कलाक्षेत्र हे तर खास महिलांचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. संगीत, नृत्य, नाट्य, सिनेमा, हस्तकला, चित्रकला इ. अनेक क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. काही कला प्रकारात स्त्रियांनी आपले नाव कायमचे कोरून ठेवले आहे.

९.कारकूनी क्षेत्रापासून प्रशासनातील उच्च सचिव पदापर्यंत स्त्रियांनी भरारी घेतली आहे.आय.ए.एस.,ाय.एफ.एस., आय.पी.एस., निवडणूक आयुक्त अशा विविध पदावर केंद्र व राज्य सरकारी सेवेमध्ये आपला ठसा उमटवला आहे.

१०.स्वातंत्र्योत्तर काळात अनेक क्रिडा प्रकारात स्त्रियांनी भारताची शान वाढवणारी कामगिरी केली आहे. ॲथलेटिक्स, गिर्यारोहण, बुध्दीबळ, मुष्टीयुध्द, नेमबाज, कुस्ती, बॅडमिंटन, टेनिस, क्रिकेट या क्रिडा प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नांव उज्वल केले आहे.

**सारांश :**

अशा तऱ्हेने स्त्रिया समाजातील सर्व क्षेत्रात आपला ठसा उमटवत. समाजातील आपले स्थान स्वकर्तृत्वावर उंचावत आहेत. तरीसुध्दा ही अर्धी लोकसंख्या पूर्णत: सक्षम झाली आहे असे म्हणता येत नाही. पुरूषप्रधान मानसिकतेचा पगडा अजूनही सर्व समाजावर आहे. परंपरावादी भूमिकेतून अजूनही स्त्रिया बाहेर पडलेल्या नाहीत. खऱ्या अर्थाने स्त्री-पुरूष समानता समाजात जेव्हा रूजेल तेव्हाच राष्ट्र विकासाचा फायदा होईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती', सुमेध प्रकाशन, पुणे.
२. माधवी कुंटे, 'स्त्री सुक्त', डायमंड प्रकाशन, पुणे.
३. ज. श. आपटे, पुष्पा रोडे, 'भारतातील महिला विकासाची वाटचाल', डायमंड प्रकाशन, पुणे.
४. विद्युत भागवत, 'स्त्री प्रश्नाची वाटचाल', प्रतिभ प्रकाशन, पुणे.
५. योजना मासिक (महिलांचे सक्षमीकरण), ऑगस्ट, २००१.

# स्वर्गीय, आमदार तुकाराम कोलेकर यांचे राष्ट्रबांधणीतील योगदान.

**प्रा. गुरूनाथ कृष्णा मोरे**
इतिहास विभाग
ओंकार महाविद्यालय,गडहिंग्लज, - महाराष्ट्र

**प्रस्तावना :**

भारताच्या जडणघडणीमध्ये ज्या,ज्या व्यक्तीमत्त्वानी भरीव योगदान दिले त्यापैकी एक म्हणजे शेतकरी कामगार पक्षाचे महान नेते स्वर्गीय आमदर तुकाराम कोलेकर होय त्यांनी राजकीय सामाजिक, आर्थिक,सास्कृतिक, शैक्षणिक व शेती या सारख्या विविध क्षेत्रांतील कार्याव्दारे महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. तु.कृ. कोलेकर हे जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक, शेकापक्षाचे आमदार, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे सेनानी, सीमा लढयातील नेते आणि महाराष्ट्रातील पुरोगामी शेकापक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते. सदर शोध निंबधात त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**जडण घडण**

कै. तुकाराम कृष्णाजी कोलेकर साहेब यांचा जन्म २ सप्टेंबर १९१६ साली एका गरीब कुटूंबात झाला. त्या काळात ब-याच गावामध्ये शाळा नव्हत्या त्यामुळे शिक्षणापासून शेतकरी कुटूंबे दूरच होती. शेतकऱ्यांच्या मुलांनी शेती करणे एवढयापुरतेच कार्यक्षेत्र होते पण म. जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे व कोल्हापूरच्या छ. राजर्शी शाहू महाराजांच्या प्रयत्नातून बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटू लागले व बहुजन समाजातील लोक आपल्या मुलांना शाळा शिकविण्यास तयार होऊ लागले.

**राजकीय कार्य –**

कोल्हापूरला शिक्षण घेत असताना त्यांच्या सार्वजनिक कार्याला सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतर विशिष्ट ध्येयाने व विचाराने महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. या पक्षाच्या समाजवादी विचाराच्या कार्याकडे कोलेकर साहेब आकर्षीत झाले. या सुमाराला नेसरी पासून जवळच कोवाड यागावी दि. ५ मे १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षाची पहिली शेतकरी परिषद भाई दाजीबा देसाई, व्ही.एस. पाटील यांच्या मार्गदर्शनासाठी यशस्वी झाली. याच धरतीवर १९४९ ला कोलेकर साहेबांच्या पुढाकाराने क्रांतीसिंह नाना पाटील, तुळशीदास जाधव, भाई थत्ते यांच्या मार्गदर्शनाखाली नेसरी या स्वतःच्या गावी मोठया लोकसहभागातून परिषद पार पाढली. या परिशदेच्या वेळी पष्चिम महाराश्ट्रातील नेसरी या स्वतःच्या गावी मोठया सहभागातून परिशद पार पाडली. या परिषदेच्या वेळी पश्चिम महाराष्ट्रातील बहुसंख्य कॉग्रेस पक्षाचे कार्येकर्ते शेकाप मध्ये दाखल झाले. शिकापच्या दामाडी तत्त्वज्ञानायशी ते एकनिष्ठ राहिले. सुरूवातीला ‘ गाव तेथे ग्रामपंचायत ’ या योजनेमुर्फत नेसरी गावात ग्रामपंचायत स्थापन केली. १९४२ मध्ये जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षामार्फत पहिल्या निवडणूकीत भाईचा विजय झाला. जिल्हा परिषदेवरसुध्दा निवडणून आले. सन १९६७ ला विधान सभेच्या निवडणूकीत शेकापचे उमेदवार म्हणून निवडणून आले. जनसामान्यांचे प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. बहुजनांच्या हितासाठी अनेक चळवळी उभ्या केल्या. कापूस एकाधीर योजना, रोजगार हमी योजना, शेतमजूराचा प्रश्न, त्याचबरोबर शेतमालाला किफायतशीर दर बांधून घेतला. महाराष्ट्रातील व कर्नाटकातील सीमाप्रश्न, महागाई, बेकारी, गरीबी, सावकार विरोधी धोरण रेशनिंगची चळवळ जमिनदार व इनामदार यांचा रोष पत्करून कसेल त्याची या कुळकायदयाच्या अंमलबजावणीबाबत चळवळी केल्या. शेतीला बारमाही पाणी मिळवण्यासाठी केलेल्या चळवळी, महागडा दाभोळ वीज प्रकल्प बंद करा अशा अनेक जनहिताच्या प्रश्नासाठी शेकापच्या माध्यमातून कोलेकरसाहेब शेवटपर्यंत झटत राहिले.

**सामाजिक कार्य :**

तुकाराम कोलेकरांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण एका विशिष्ट पार्श्वभूमीवर झालेली आहे. महात्मा जोतीराव फुले हे महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक त्यांच्या विचारातून सत्यशोधक समाजाची निर्मिती झाली. ही चळवळ छ. शाहू महाराज यांनी पुढे नेली या चळवळी विचारांचा व तत्वांचा परिणाम भाई कोलेकर यांच्यावर झाला.

समाजातल्या अंधश्रेध्देविषयी ते अत्यंत पोटतिडकीने बोलायचे “ अज्ञानी समाजाला प्रथमतः शिक्षणाची गरज आहे. शिक्षाणाची या समाजाला शहाणपण येईल यावर माझा पुर्ण विश्वास आहे. मार्क्सवादी विचारसारणी व फुले, आंबेडकर यांच्या शिकवणीनुसार समाजामध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. समाजात विषमता निर्माण करणाऱ्या रूढी धर्माचे अवडंबर, अंधश्रध्दा, कर्मकांड, मुर्तीपूजा, तीर्थयात्रा, जत्रा, यात्रा , विवाहप्रसंगीचा अवाढव्य खर्च इत्यादी समाजाचे मागासलेपणाचे व दारिद्रयाचे खरे कारण आहे. यासमाजाला निसर्गनियमाची ,विज्ञानाची व प्रबोधनाची ओळख झाल्याशिवाय त्यांना विकासाची दिशा दिसणार नाही. त्यासाठी समाजपरिवर्तन खरी गरज आहे. अंधश्रध्देचे समाजापासून उच्चाटन व्हावे म्हणून कोलेकर साहेबांनी आपल्या सहकारी मित्राच्या बरोबर समाजापूढे अंधश्रध्देचे गांभीर्य दाखवून दिले. दिनदुबळयांना जवळ केले. त्यांच्या हक्कासाठी प्रसंगी ते रस्त्यावर आले.

**शेतीला पाणी पुरवठा**

शेतीला बारामाही पाणी पुरवठा करण्यासाठी जनआंदोलनातून सरकारचे लक्ष वेधून घेतले. या मध्ये रामतीर्थचे धरण अडकूर, हडलगे, तारओहोळ असे अनेक कोल्हापूर पध्दतीचे बंधारे त्यांचेबरोबर ओहळपूल घटप्रभा नदीवरील फाटकवाडी प्रकल्प उचंगी प्रकल्प इत्यादीठी त्यांनी सत्याग्रह उपोषण मोर्चे हरताळ इ. माध्यमातून व अथक प्रयत्नातून पाठपुरावा करून या भागात पाण्याची व्यवस्था केली. म्हणूनच आज या भागात शेतीही बारमाही पाण्याखाली झालेली दिसते. ज्या धरणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार होते अशा धरणाला विरोध केला. आजचे हिकडलचे धरण पुर्वी घटप्रभा नदीवर तारेवाडी जवळील बेळगाव गोंड येथे होणारे होते धरण महाराष्ट्रात व लाभ मात्र कर्नाटकाला अशी परिस्थिती होती आजरा चंदगड तालुक्यातील ३५ खेडे पाण्याखाली जाणार होती अशा प्रकारचा धोका ओळखून कोलेकर साहेबांच्या नेतृत्वाखाली तुकाराम पाटील, बाबू नाईक, एल वाय पाटील, विठ्ठल गुरबे, आबासाहेब शिंगटे, शंकर पाटील तसेच आक्कुताई पाटील ,जनाबाई सुतार या महिलांही आंदोलनात सक्रिय राहिल्या होत्या. आंदोलनाला लोकांचा प्रचंड पाठिंबा मिळाला. धरणांच्या उद्घाटनावेळी तीव्र असे रासता रोको आंदोलन करून लोकांच्या भावना सरकारला पटवून दिल्या.

**सहकार क्षेत्रातील कार्य :**

सुरूवातीपासुनच साहेब सहकाराचे महत्व जाणून आपल्या सर्वजनिक कार्याची वाटचाल करीत होते. तिथल्या नडलेल्या शेतकऱ्यांची भयानक परिस्थिती साहेबांनी अनुभवली होती. उधार, उसनवारी करायची, कर्ज फिटत नाही म्हणून थोडीफार असणारी जमीन सावकाराला दयायची अशी स्थिती या समाजाची होती. यातूनच सुटका करण्यासाठी म्हणून सन १९४३ मध्ये आपल्या सवंगडयाच्या मदतीने नेसरी विकास सेवा संस्थेची सोसायटीची स्थापना केली. गडहिंग्लज तालुक्यातील पहिली पत संस्था महात्मा जोतीबा फुले यांच्या नावाने नेसरी गावात सन १९७७ ला स्थापना केली. या संस्थेमार्फत माफक व्याज दराज गरजूना आर्थिक सहकार्य केले. खास करून गडहिंग्लज तालुक्यातील काटेवाले यांच्यासाठी साहेबांच्या पुढाकारांने काटेवाले पत संस्थेची स्थापना केली. साहेबांच्या संघटन कौशल्यातून जिल्हा कामगार फेडरेशन स्थापना झाली. या संघटनेमुळे असंघटीत कामगार वर्ग संघटीत होवून अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागू लागला.

**शैक्षणिक कार्य**

सहेबांना विद्यार्थी दशेपासूनच शैक्षणिक कार्याची आवड होती. आपण ज्या गरीबीतून शिक्षण घेतले व आपल्याला ज्या अनंत अडचणींना तोंड दयावे लागले त्याची जाणिव त्यांना होती महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे, शामराव देसाई यांच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव होता. या विचारातून सन १९५५ ला शिक्षण समिति क।। नेसरी या शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे संस्थापक कोलेकर साहेब तर चेअरमन म्हणून श्री. विठ्ठलराव शंकरराव शिंदे होते. साहेब या संस्थेचे सेक्रेटरी म्हणून काम करीत होते. या शाळेत स्वतः त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. सन १९६८ मध्ये बटकणंगले येथे संस्थेची शाखा सुरू केली. सन १९७८ - ७९ मध्ये एस.एस. हायस्कूल नेसरी व छ . शिवाजी ज्यु कॉलेज सुरू केले. उच्च शिक्षणाची गरज भागविण्यासाठी १९९५ साली कला आणि वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. दोन बालवाडया सुरू केल्या इंग्रजी शिक्षणाचे महत्व ओळखून एस.एस. इंग्लिश मेडिअम स्कूल सुरू केले आज या भागात या शिक्षण संस्थेत बालवाडी शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**समारोप**

कोलेकर साहेब राजकारणी थोर शैक्षणिक विचारवंत होते आपवल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत आपल्या तत्वांशी विचारांशी एकनिष्ठ होते. शेकापशी तब्बल ७० वर्शाहून अधिक काळ सार्वजनिक जीवनात कोलेकर साहेबांनी वावर केला. समाजात परिवर्तन घडावे गोरगरीबांचे प्रश्न सुटावेत त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण व्हावे यासाठी धडपडणाऱ्या साहेबांचे शनिवारी दि. ७ एप्रिल २०१२ रोजी सायंकारी कोल्हापूर येथील खाजगी रूग्णालयात हृदय विकाराने निधन झाले. डाव्या विचारांचा जाणता नेता हरपला अशा शब्दात अनेकांनी दुःख व्यक्त केले. एकादा हाती घेतलेला लाल बावटा अखरेच्या श्वासापर्यंत त्यांनी सोडला नाही. यातूनच त्यांच्या निष्ठेचे व सचोटीचे दर्शन घडले ही त्यांची एकनिष्ठा आजच्या राजकारणातील सर्वच कार्यकर्त्यांना आदर्श ठरेल यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१. शिवप्रताप , २०११-१२, संपा. डॉ. पाटील के.आर. पृ.क्र. ७, ११.
२. सुवर्ण गौरव , २००५-०६ संपा. डॉ. दिवेकर गोपाल, पृ.क्र. ८ ते १०६.
३. ॲड.हेमंत कोलेकर यांची मुलाखत. दि.७ एप्रिल २०१७

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# भारतातील उच्च शिक्षणातील संस्था–विद्यापीठ अनुदान आयोग

**श्री. एन.पी.महागांवकर( ग्रंथपाल )**
कला,वाणिज्य आणि विज्ञाण महाविद्यालय,कोवाड
ता.:–चंदगड,जि.कोल्हापूर (महाराष्ट्र )

## प्रास्ताविक

विकास हा शब्द आज राजकीय, सामाजिक, आर्थिक चर्चा विश्वासात मध्यवर्ती झाला आहे.खराखुरा विकास परिवर्तन व्हायचा असेल तर तो शिक्षणातूनच होत असतो.शिक्षण व्यवस्था जेवढी प्रगतशिल,सक्षम असेल तर देशाचा विकास साध्य होण्यास वेळ लागणार नाही.म्हणून शिक्षणाचा विस्तार व गुणात्मक विकास या बाबीवर लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे. समाजाला विशेष ज्ञान आणि कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे. वैज्ञानिक दृष्टीकोणाची निर्मिती करून अज्ञान व अंधश्रध्दा दूर करणे,व्यक्तिच्या व्यक्तीमत्व विकासाला गती देणे,बेकारी दारिद्र व आर्थिक विषमता दूर करणे आणि माहिती व तंत्रज्ञानाधिष्ठीत समाजाची उभारणी करणे या सर्व बाबीमध्ये उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची असते. उच्च शिक्षाणाच्या बाबतीत एकूण देशाच्या पातळीवर संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी मोठया प्रमाणात प्रयत्न करायला हवेत यासाठी उच्च शिक्षणात विद्यापीठ अनुदान आयोगाचे कार्य महत्वाचे आहे.

आजच्या काळात ज्ञानाला विशेष महत्व आहे.ज्ञानाची जोपासना करणारे देश जगाचे नेतृत्व करत आहेत. ज्ञान असणारे ते वापरू शकणारे,नवीन ज्ञान निर्मिती करणारे लोक आज ज्या देशात असतील तेच देश जगाचे नेतृत्व करू शकतात. ज्ञानाची जोपासना करणा–या संस्था म्हणजे विद्यापीठे व इतर संशोधन संस्था,महाविद्यालये होय.जगभरात ज्या देशानी आपल्या शिक्षण संस्था विद्यापीठे व महाविद्यालये निर्माण केली तेच देश आज जगात अग्रेसर आहेत. अमेरिका,ब्रिटन,जपान,जर्मनी अलिकडे चीननेही उच्च शिक्षण अधिक कसदार करण्यासाठी कंबर कसली जाते.

आज जर देश जागतिक पातळीवर जायचा असेल तर उच्च शिक्षणात सुधारणा करणे आवश्यक आहे.त्यासाठी उच्च शिक्षणातील कार्यरत असलेल्या पुढील संस्था आहेत.

१) विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission.)
२)राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली (National Council for Education Research And Training)
३) राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (National Institute of Educational Planning and Administration )
४)भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषद (Indian Council of Social Science Research)
५)शैक्षणिक प्रगत अभ्यास केंद्र (Case Centre of advanced studies of Education)
६)राष्ट्रीय शिक्षक–शिक्षण परिषद (National Council of Teacher Education)

वरील संस्था पैकी विद्यापीठ अनुदान आयोग,नवी दिल्ली या संस्थेचा सखोल अभ्यास मी या प्रस्तूत शोध निबंधात करण्याचा प्रयत्न करत आहे.

## विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission)

उच्च शिक्षणाचा दर्जा निर्धारित करणे,तो राखणे,त्या बाबत विद्यापीठाशी समन्वय साधणे,विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या गरजा ओळखून त्याना अनुदान देणे. या कार्यासाठी स्थापलेला आयोग म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग होय. या आयोगाची कल्पना भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे १९१९मध्ये यु.के. मधील विद्यापीठात सुचली. भारतात प्रत्येक प्रातांत किंवा प्रांताच्या समुहासाठी अनुदान समिती असावी असे डॉ. अरनाभ झा यांनी सन १९३६ तत्कालीन आंतर विद्यापीठीय शिक्षणाच्या सुधारणांबाबत शिफारशी करण्यासाठी विद्यापीठ शिक्षण आयोग नेमण्यात आला. त्याच धर्तीवर डिसेंबर १९५३ मध्ये तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री मौलाना अब्दल कमाल यांनी औपचारिकरीत्या विद्यापीठ अनुदान आयोग कायदा संसदेत संमत केला.व नोव्हेबर १९५६ मध्ये अधिसूचना भारत सरकारने जारी केली.

## विद्यापीठ अनुदान आयोगाची रचना:–

उच्च शिक्षणाचा दर्जा राखणे व समन्वय साधणे या आधिकाराबरोबर वित्तीय आधिकार देण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम १२ नुसार अनुदानास पात्र असणा–या विद्यापीठाना व महाविद्यालयांना अद्यापन,संशोधन, व विस्तार कार्य करण्यासाठी केंद्र शासन या आयोगाला योजना निधी व योजनेत्तर निधी उपलब्द करून देते. याचे कार्यालय दिल्ली येथे असून या आयोगामध्ये एक अध्यक्ष,एक उपाध्यक्ष व दहा इतर सभासद असतात.त्यांची नेमणूक केंद्र सरकार करते.केंद्र किंवा राज्य शासणामध्ये आधिकारी नसलेल्या व्यक्ती पैकी एकाची निवड अध्यक्ष म्हणून करण्यात येते. इतर १० सभासदापैकी २ केंद्र सरकारचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी त्या सरकारच्या आधिका–यामधून निवडलेले असतात.किमान चार सभासद निवड करते वेळी

विद्यापीठात सेवेत असलेल्या प्राद्यापकांमधून निवडले जातात.उर्वरित सभासद पुढील व्यक्तीकडून निवडले जातात.१) कृषी,व्यापार,उद्योग किंवा वनविद्या या विषयाचे ज्ञान किंवा अनुभव आहे. २)जे अभियांत्रिकी, कायदा, वैद्यक किंवा अशाच प्रकारच्या उच्च शिक्षणावर आधारलेल्या व्यवसायाचे प्रतिनिधी आहेत.३) जे विद्यापीठाचे कुलगुरू किंवा विद्यापीठीय प्राद्यापक नसेल तरी केंद्र सरकारच्या मते नामवंत शिक्षण तज्ञ आहेत किंवा ज्यानी उच्च अकॅडमिक प्रतिष्ठा मिळवलेली आहे. मात्र या १० सभासदापैकी निदान दोन निम्मे सभासद जे केंद्र शासन किंवा राज्य शासनमध्ये आधिकारी नाहीत.अशापैकी असणे गरजेचे आहे.

**✱विद्यापीठ अनुदान मंडळाकडे तीन प्रमुख शाखा कार्यरत आहेत.**

**१) शिक्षक—शिक्षण मंडळ (Teacher Education Committee)**

शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने या समितीची स्थापना केली.यात सात सभासद असतात. त्यांचा कालावधी दोन वर्षाचा असतो. शिक्षक शिक्षणामध्ये नावीन्य व संशोधन संदर्भात जाणीवा निर्माण करणे. तसेच राष्ट्रीय विद्यावेतन आणि अद्यापक विद्यावेतन मार्फत अध्यापन व संशोधनास प्रोत्साहन दिले जाते. आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे,परिषदांत सहभाग घेण्यासाठी प्रवास खर्च सुध्दा मंडळामार्फत देंण्यात येतो.विद्यापीठ अंतर्गत व्याख्याने देण्यासाठी विविध विद्यापीठातील प्राद्यापकांनच्या नियुक्त्या करतात.विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राद्यापकांसाठी निवासांच्या सुविधा दिल्या जातात.पीएचडी नंतरच्या संशोधनासाठी सहयोगी संशोधकांच्या नेमणूका करणे इ. प्रकारे शिक्षकांच्या विकासासाठी महत्वपूर्ण योगदान विद्यापीठ अनुदान आयोगच्या साहयाने दिले जाते.

**२)संशोधन (Research)**

विद्यापीठ अनुदान मंडळामार्फत विद्यापीठातील प्राद्यापकांना स्वत:च्या संशोधन कार्यासाठी पुरेशा प्रमाणात अनुदान दिले जाते. सन १९५३—५४ मध्ये शिक्षण मंडळाने शिक्षण क्षेत्रातील समस्यावर संशोधन कार्य करणा—या व केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्य केलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयातील विभागातील प्राद्यापकांना संशोधन अनुदान देण्यास सुरूवात केली. हे संशोधन कार्य प्रशिक्षण महाविद्यालयातून दिले जाते.आर्थिक मदतीशिवाय संशोधन कार्य पूर्ण होण्यासाठी लागणा—या इतर साहित्य सुविधाही उपलब्द करून दिल्या जातात.

**३)प्रगत अभ्यास केंद्र (Centre For Advanced Studies)**

भारतातील अध्यापन व संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे या केंद्राची स्थापना केली. आधुनिक व उच्चस्तरीय अभ्यास केंद्रे युजीसी च्या मार्गदर्शनाखाली चालवली जातात.देशातील विद्वान व जेष्ठ प्राद्यापक यांचा समन्वय साधून सामूहिक कार्यासाठी प्रोत्सान केले जाते.

**✱कार्ये**

**✱शैक्षणिक सुधारणांबाबत शिफारस करणे.**

युनायटेड किंग्डमधील विद्यापीठ अनुदान मंडळ व भारतातील विद्यापीठ अनुदान आयोग या मधील फरक असा की युनायटेड किंग्डमधील विद्यापीठ अनुदान मंडळ याचे कार्य फक्त विद्यापीठाना अनुदान देणे हे कार्य मर्यादित आहे.तर भारतातील विद्यापीठ अनुदान मंडळ विद्यापीठाना अनुदान देण्याबरोबर विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा निर्धारित करणे व त्यात समन्वय साधणे ही वैधानिक जबाबदारी पार पाडावी लागते. विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम १२(ई) (ब)नुसार आयोग कोणत्याही विद्यापीठाला शैक्षणिक सुधारणेबाबत उपाययोजनाची शिफारस करू शकतो.त्याच प्रमाणे या बाबत कोणती कार्यवाही करावी या बदद्ल मार्गदर्शन करण्याचे कार्य करते.

**✱ विद्यापीठाना अनुदान देणे:**

विद्यापीठाना दिले जाणारे अनुदान हे साधारणपणे प्रत्येकी पाच वर्षाच्या कालावधीसाठी असते.पंचवार्षिकच्या सुरवातीस आराखडा तयार केला जातो. व विद्यापीठ अनुदान आयोग मंडळाचे काही सभासद भेट देवून तपासणी करतात.सर्व विद्यापीठांच्या मागण्यांचा एकत्रीत विचार करून आयोग पाच वर्षासाठी लागणा—या रक्कमेची मागणी केंद्र सरकारकडे करतात.ती रक्कम शासन विद्यापीठ अनुदान आयोगाकडे देते. आयोगाकडून ती विद्यापीठास मिळते.पंच वार्षिक अनुदानाच्या पध्दतीमुळे विद्यापीठाना योजना राबविता येतात.

**✱उच्च शिक्षणाचे नियोजन करणे**

उच्च शिक्षणाचे नियोजन करणे,शिक्षणाचा दर्जा सुधारून ते राष्ट्राच्या गरजा भगविण्यास समर्थ हवे म्हणून विद्यापीठाना अनुदान मंजूर करणे व त्यांचे वाटप करणे हे प्रमुख कार्य आहे.विद्यापीठातील शैक्षणिक माहिती ही देशातील व विदेशातील गोळा करून ती संदर्भासाठी उपलब्द करणे.नवीन विद्यापीठ स्थापण्यास अभिप्राय देणे,शासण व विद्यापीठ यांना समस्येचे निराकरण करण्याचा सल्ला देणे. विद्यापीठ अभ्यास कामात सुसुत्रता आणणे . उच्च शिक्षणाच्या विकासासाठी विविध योजना अवलंबने अशी कामे करावी लागतात.

**✵ अनुदानावर नियंत्रण:**

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान हे भांडवली खर्चासाठी, दैनदिन व आवर्ती खर्चासाठी त्याच प्रमाणे एकाद्या योजणेसाठी अनुदान दिले जाते.अनुदान योग्य कामासाठी वापरले की नाही याची तपासणी आयोगाकडून केली जाते.शासन आणि आयोग या दोहांचा विश्वास संपादन करून तसेच विद्यापीठाच्या स्वायत्ततेस कायम महत्व देवून उच्च शिक्षणाचा विश्वास साधण्यास भर दिला जातो.शासकीय खर्चाची जाणीव विद्यापीठाना करून देणे व उच्च शिक्षणाची गरज पुरविण्यास शासणाला प्रवृत्त करणे. ही दोन्ही कार्ये विद्यपीठ अनुदान आयोगाला करावी लागतात.आजवर आयोगाने विद्यापीठाना अनुदाने दिलेली आहेत.उदा.ग्रंथालये इमारती बांधण्यासाठी,ग्रंथालये पुस्तके खरेदी करण्यासाठी,ग्रंथालयातील फर्निचर खरेदीसाठी, महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची योजना सुध्दा असते.व इतर महाविद्यालयीन शैक्षणिक साहित्य मिळण्यासाठी आयोग अनुदान देते.त्याच बरोबर महाविद्यालयाची इमारत बांधण्यासाठी,लॅबोटररी इ.साठी आयोग अनुदान देत असते.त्याचप्रमाणे विद्यार्थी वस्तीगृह बांधणे,प्राद्यापकांच्या वेतनश्रेणी सुधारणे,संशोधन प्रबंध प्रसिध्द करण्यास आर्थिक साहय देणे, प्राद्यापकांच्या परिषदा व चर्चासत्रे घडवून आणणे,नामवंत प्राद्यापकांना मानधन देणे.या सर्व दिलेल्या अनुदाणाचे योग्य वापर होतो की नाही यावर नियंत्रण ठेवत असते.

**✵इतर कार्य**

देश स्वातंत्र झाल्यानंतर विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या संख्येत बरीच वाढ झालेली आहे.त्याच प्रमाणे उच्चशिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांची संख्याही बरीच वाढ झालेली आहे.या वाढीतून उद्‌भवलेली बेशिस्त कशी आटोक्यात आणता येईल या संबधी आयोगात योग्य सूचना केलेल्या आहेत.प्राद्यापकांच्या उद्‌बोधनासाठी अकॅडमिक स्टॉफ कॉलेजांची निर्मिती करण्यात आलेली आहे. यामध्ये प्राद्यापकांना उद्‌बोधन होण्यासाठी ओरियंटेशन (उजळणी कोर्स) व रिफ्रेशर कोर्स करण्यासाठी आयोग अनुदान देते.तज्ञांच्या सहाय्याने परीक्षा पध्दतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी आयोगाने चर्चासत्रे घडवून आणली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणांची अंमलबजावणी अभिमत,खाजगी,स्वायत व सरकारी विद्यापीठे (केंद्र व राज्य) यांच्या मार्फत काही प्रमाणात केली जाते.

**✵विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शनाखाली चालणा—या संस्था:—**

**शैक्षणिक प्रगत अभ्यास केंद्र (Centre of Advanced Studies of Education)**

सेंटर फॉर ॲडव्हान्स स्टडीज ऑफ एज्यूकेशनची स्थापना एम.एस.विद्यापीठ,बडोदा .येथे झाली. विद्यापीठ अनुदान मंडळाने या केंद्राच्या स्थापणेसाठी लखनऊ आणि रोही खंड विद्यापीठास अनुदान दिले. तसेच हरियानामधील कुरूश्रेत्र येथेही केंद्राची स्थापना झाली आहे.

**✵सेंटर फॉर ॲडव्हान्स स्टडीज ऑफ एज्यूकेशनची कार्ये**

१)शिक्षण व शिक्षक प्रशिक्षणासंदर्भातील संशोधन कार्यास प्रोत्साहन देणे.२)शिक्षक—अध्यापक नियोजनकर्ते व प्रशासकांना महत्वपूर्ण माहिती उपलब्द करून देण्यासाठी पुस्तके आणि नियतकालिकांचे प्रकाशन करणे.३)समाजविकासासाठी विविध उपक्रमास प्रोत्साहन देणे.४)शिक्षक— शिक्षणासंदर्भातील संशोधन कार्यास अनुदान व विद्यावेतन देवून प्रोत्साहन देणे.५)शिक्षक आणि विद्वान संशोधकास आर्थिक साहय व शिष्यवृती देणे.६)एन.सी.इ.आर.टी.एन.सी.टी.ई. आणि यू.जी.सी. यांच्याशी संयुक्तपणे विस्तार उपक्रमांचे आयोजन करणे.

सार

उच्च शिक्षणचा दर्जा निर्धारित करणे,तो राखणे त्या बाबत विद्यापीठांशी समन्वय साधणे, विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या गरजा ओळखून त्याना अनुदान देणे या कार्यासाठी उच्च शिक्षणसाठी स्थापन झालेली संस्था म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग होय.या संस्थेने प्रमुख तीन शाखा कार्यरत केल्या आहेत. १) शिक्षक—शिक्षण मंडळ शाखा २) संशोधन शाखा ३) प्रगत अभ्यास केंद्र शाखा या संस्थेची मुख्य कार्य म्हणजे विद्यापीठाना अनुदान देणे,अनुदानावर नियंत्रण ठेवणे, उच्च शिक्षणाचे नियोजन करण, शैक्षणिक सुधारणा बाबत शिफारशी करणे इ.होय. ही शैक्षणिक संस्था देशातील उच्च स्तरीय आहे.

**संदर्भ:—**

१)ठोंबरे, सतिस व शिंदे, प्रकाश —''भारतातील शैक्षणिक प्रशासन'' कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद(२०१५)
२)तांबोळी,शमसुदिद्न—''महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास,नवे दालन नव्या संधी'' डायमंड पब्लिकेशन,पुणे.(२००९)
३) University News -----Sept.2017
४) University News -----Nove.2017
५) University News -----Dec.2017

# महात्मा जोतिबा फुले – एक समाजसुधारक

**प्रा. दत्तात्रय हरी नाईक**
समाजशास्त्र विभाग,
श्री. लहू बाळा परितकर महाविद्यालय,
पणोरे ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :-**

मानव हा एकजसा विकासप्रिय प्राणी आहे. तसा तो शांतताप्रिय आणि सुधारणावादी विचारांचा आहे. समाज मग तो कोणताही असो. त्या समाजामध्ये सुव्यवस्था रहावी यासाठी मानव सातत्याने प्रयत्नशील असतो. प्रत्येकाला मानव म्हणून जगण्याचा जो काही अधिकार आहे, नव्हे त्याचा तो मूलभूत हक्कच आहे. अशा या हक्कांवर समाजातील काही मूठभर लोक अंकुश आणतात. किंवा अनेक बंधनांनी बांधून टाकतात. त्यावेळी ती बंधने परंपरेने चालतात. आणि शेवटी त्या लोकरूढी, लोकनिती, बनतात. अशा या अन्यायकारी, अनिष्ठ चालीरीती ज्यावेळेस समाजात मोठया प्रमाणात चालतात. त्यावेळी बहुजन वर्ग त्याखाली दबला जातो, खचला जातो. हे सर्व कोठेतरी थांबले पाहिजे असे जेंव्हा काहींना विशेषतः पुरोगामी विचाराने प्रभावित झालेल्या विचारवंतांना वाटते. तेंव्हा ते समाजात जनजागृती घडवून आणतात. या प्रबोनात्मक विचारांनी प्रेरित झालेल्या लोकांना आपण समाजसुधारक या नावाने ओळखतो. यामध्ये राजाराम मोहन रॉय, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतिबा फुले, महर्षी धो.के.कर्वे आणि राजर्षी छ. शाहू महाराज तसेच यांचा वसा पूढे चालवणारे युगपुरूष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक समाजसुधारकांचा आपणास उल्लेख करता येईल. या सर्व समाजसुधारकांचे कार्य अतुलनीय आहे. पण माझ्या मनी रूतलेले ते माझे लोकप्रिय समाजसूधारक ज्यांना ''उक्ती प्रमाने कृती करणारे असे ओळखतात. ते म्हणजे महात्मा जोतिबा फुले यांची राष्ट्रउभारणीतील कार्यकारणी याचा आपण या प्रबंधाच्या माध्यमातून अभ्यास करणार आहोत. डॉ. आंबेडकर हे जोतिबांना आपले गुरू मानत. महात्मा फुले यांनी समाजात शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तसेच ईश्वर हा निर्गुण, निराकार आहे. ''सर्वसाक्षी जगतपती त्याला नकोच मध्यस्थी'' असा संदेश त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवला.

**व्याख्या :-**

'' प्रचलित समाज व्यवस्थेत काही अंशी बदल घडवून आणण्यासाठी चळवळीत सहभागी व्यक्तींना ''समाजसुधारक'' म्हणतात.''

**१) उद्देश –**

१. महात्मा फुले यांनी केलेल्या शैक्षणिक विकासाचा आढावा घेणे.
२. महात्मा फुले यांनी स्त्री व अस्पृश्यांविषयी केलेल्या सामाजिक कार्यांचा आढावा घेणे.
३. एकूण समाज सुधारणेच्या सामाजिक कार्यांचा आढावा घेणे.

**जोतीराव गोविंदराव फुले** :-(एप्रिल ११, इ.स. १८२७- नोव्हेंबर २८, इ.स. १८९०) महात्मा फुले नावाने प्रसिध्द्, हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स. १८९० या साली मिळाली. शेतकऱ्यांचे आसूड हा ग्रंथ महात्मा फुले यांनी लिहला.

**बालपण आणि शिक्षण**

जोतिबा फुले यांचे मुळ गाव सातारा जिल्हयातील कटगुण हे होते. त्याच गावी महात्मा फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव व आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोऱ्हे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणुन ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढझाले. कटगुणहून त्यांचा परिवार पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आला. खानवडी येथे फुले आडनावाची बरीच कुटुंबे आहेत. जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी सावित्रीबाई यांचेशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कुलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुध्दी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच – सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पुर्ण केला.

**१) शैक्षणिक कार्य**

अ) स्त्री शिक्षणास चालना
ब) कनिष्ठ जातिच्या शिक्षणास चालना
क)मोफत व सक्तीचे शिक्षण
ड) शाळांची स्थापना

महात्मा फुल्यांच्या कवितेतल्या शिक्षणाचे महत्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिध्द् आहेत.

विद्येविना मती गली । मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्रय आणि समाजातील जातीभेद पाहुन ते अस्वस्थ होत असत. ही समाजाची परिस्थीती सुधारण्याचा त्यांनी निश्चय केला. त्याप्रमाने त्यांनी इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रिबाईंवर सोपवली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची हि मुहुर्तमेढ ठरली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इ.स. १८५२ मध्ये शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. पण जोतिराव आपल्या भुमिवर ठाम होत असत. समाज सुधारकांच्या कार्याला गती दिली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षणकार्यास प्रवृत्त केले. शाळेच्या मुख्याध्यापक पदी आरूढझालेल्या पहिल्या भारतीय महिला म्हणजे सावित्रीबाई. त्याचप्रमाने स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होत.

## २) सामाजिक कार्य

अ) स्त्रियांची उन्नती
ब) अस्पृश्यांची उन्नती
क) शेतकऱ्यांची उन्नती
ड) गिरणी कामगारांचे कल्याण : अन्याय व त्यांचे शोषण यांना वाचा फोडण्यासाठी ‘दिनबंधू’ हे साप्ताहिक सुरू.
इ) दुष्काळ ग्रस्तांना मदत : इ.स १८७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडल्याने अनेकांना आपली खेडी सोडावी लागली व मुलांना मात्र खेडयातच ठेवले. अशा लहान मुलांसाठी फुलेनी १७ मे १८७७ इ. रोजी व्हिक्टोरिया अनाथालय सुरू केले.

मानवी हक्कावर इ.स. १७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींना शिक्षण यावर त्यानी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते.

‘कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे’ असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची (अस्तीत्ववादी) विचारसरणी होती. मानावाने गुण्यागोविंदाने रहावे असे मत होते. त्यांनी लिहिलेल्या ‘शेतकऱ्यांचा आसूड’ या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्रयाची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणून ही जोतिरावांचे दर्शन होते. ‘नाती हाच मानव जिवनाचा आधार आहे’ हा विचार मांडणारे जोतिराव एक तत्वचितक व्यक्तिमत्व होते.
मुलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारे वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्विकारली पाहिजे हे जोतीराव फुलेनी आपल्या ‘सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे. त्यातील काही महत्वाची वचने पुढीलप्रमाणे आहेत.

- स्त्री अथवा पुरूष एकंदर सर्व गावाचे, प्रांताचे, देशाचे, खंडाचे संबंधात अथवा कोणत्याही धर्मातील स्वतः च्या संबंधात, स्त्री आणि पुरूष उभयतांना आठवा, सर्व स्त्रियांनी अथवा एकमेकात एकमेकांनी कोणत्याही प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुंटुब समजून एकमताने सत्यवर्तन करून रहावे.
- आपणा सर्वाच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांना उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मता स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसात सर्व हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे.
- आपणा सर्वाच्या निर्माणकर्त्याने सर्व मानवी स्त्री - पुरूषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे. जो आपल्यापासून दुसऱ्या एखादया व्यक्तिस कोणत्याही प्रकारचे नुकसान देत नाही, अथवा जो कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवांचे हक्क समजून इतरांना पीडा देत नाही त्याला ‘सत्यवर्तन’ करणारा म्हणावे.
- आपल्या सर्वाच्या निर्मिकाचे एकंदर सर्व स्त्री - पुरूषास एकंदर सर्व मानवी सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहे. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखादया व्यक्तिवर जबरी करू शकत नाही, त्याप्रमाणे जबरी न करणारास सत्यवर्तन म्हणावे.
- स्त्री अथवा पुरूष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यास श्रेष्ठ मानतात, परंतू शेतकरी वगैरे यांना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात. त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.

महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा जो बोध केला त्यातील ही वचने आपण वाचली कि लक्ष्यात येते, जोतीरावाचा आवाका किती मोठा होता. त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता.

त्यासाठी मानवी वर्तनात, म्हणजेच व्यवहारात आमुलाग्र बदल घडवून आणायचा होता. त्यासाठी मानवी स्वभाव आणि मानसिकता यात काय बदल केले पाहिजेत याबाबतही जोतीरावांनी विपुल लेखन केले आहे. 'अखंड' या काव्यप्रकारात त्यांनी 'मानवाचा धर्म' 'आत्मपरीक्षण', 'नीती', 'समाधान', 'सहिष्णूता', सदसदविवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता इत्यादीगोष्टीवरही भाष्य केले आहे. जोतीरावांनी विविध अखंडातून जे विचार मांडले, मानवी जीवनाला दिशा देणारा जो उपदेश केला, त्यातील काही निवडक भाग येथे विचारात घेतला पाहिजे.

**३) सत्यशोधक समाज** –२४ सप्टेंबर इ.स.१८७३ रोजी महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरूवात केली. त्यांनी भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावस विरोध करण्यास सुरूवात केली. महात्मा फुले यांनी सत्यशोधक स्थापना केली तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. त्याचवेळी त्या कन्याशाळेच्या शिक्षिका म्हणूनही कार्य करीत होत्या. दीनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्यावेळी लेखन प्रकाशनचे कार्य केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत चळवळ पोहचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. तथाकथित उच्चवर्णीयांकडून होणाऱ्या अन्यायापासून, अत्याचारापासून व गुलामगिरीतून शुद्रातिशुद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्कांची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ।। हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरूध्द आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरूवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली.

**सत्यशोधक समाजाची तत्वे :**

१. ईश्वर हा एकच असून तो सर्वव्यापी, निराकार, विश्वनिर्माता व सत्यरूप असून सर्व मानव ही त्याची लेकरे आहेत.
२. ईश्वराची भक्ती करण्याचा हक्क सर्वांना असून त्यासाठी ब्राम्हण, पुरोहितांच्या मध्यस्थीची गरज नाही.
३. मनुष्य हा त्याच्या जातीने किंवा जन्माने श्रेष्ठ ठरत नसून त्याच्या गुणांमुळे श्रेष्ठ ठरतो.
४. ईश्वराने धर्मग्रंथ लिहलेले नाहीत व तसे प्रमाणही नाही.
५. पुर्नजन्म, कर्मकांड, उपास-तपास, जप-तप, नवस करणे इ. गोष्टी अज्ञानमुलक आहेत.

**लेखन साहित्य** –

'सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. या समाजाचे मुखपत्र म्हणून 'दीनबंधू' हे साप्ताहिक चालविले जात असे. तुकारामाच्या अभंगांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. अभंगांच्या धर्तीवर त्यांनी अनेक 'अखंड' रचले. त्यांना सामाजिक विषमतेवे जागतिक भान होते. आपला 'गुलामगिरी' ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला. 'अस्पृश्यांची कैफियत' हा महात्मा फुलेचा अप्रकाशित ग्रंथ आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा ग्रंथ त्यांचा मृत्यूनंतर इ.स.१८९१ मध्ये प्रकाशित झाला.

जोतिबा फुले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून लोकांनी त्यांना 'महात्मा' ही उपाधी दिली. त्यामुळे जोतिबा फुले हे महात्मा फुले या नावाने ओळखले जावू लागले. त्यांनी अनेक पुस्तके लिहीली. त्यापैकी काही –

| अ.क्र. | नांव | साहित्य प्रकार | लेखन काळ |
|---|---|---|---|
| १ | तृतीय रत्न | नाटक | इ.स. १८५५ |
| २ | छ. शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा | पोवाडा | इ.स. जून १८६९ |
| ३ | ब्राम्हणांचे कसब | पुस्तक | इ.स. १८६९ |
| ४ | गुलामगिरी | पुस्तक | इ.स. १८७३ |
| ५ | हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन | निवेदन | इ.स. १८८२ |
| ६ | शेतकऱ्यांचा आसुड | पुस्तक | इ.स. १८८३ |
| ७ | इशारा | पुस्तक | इ.स. १८८५ |
| ८ | सार्वजनिक सत्यधर्म | पुस्तक | इ.स. १८९१ |

जोतीराव फुल्यांच्या गावी म्हणजे खानवडी येथे, दरवर्षी महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन भरते. याशिवाय फुले-आंबेडकर साहित्य संमेलन, फुले-शाहू-आंबेडकर राष्ट्रीय साहित्य संमेलन, सावित्रीबाई फुले साहित्य संमेलन आदी अनेक दलित साहित्य संमेलने फुले यांच्या नावाने भरतात.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या नावाच्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. त्यांच्या नावचे पुरस्कारही अगणित आहेत.

**तृतीय रत्न** –तृतीय रत्न या नाटकाचा सारा इतिहास नाटयपूर्ण आहे. जोतिबांनी २८ व्या वर्षी इ.स.१८५५ साली हे नाटक लिहिले. नाटक लिहिण्याचा हेतू जोतिबा लिहितात, ‘भट जोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शुद्रास खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्यमार्गावर आणतात, या सर्व गोष्टीविषयी मी एक लहानसे नाटक करून इ.स. १८५५मध्ये दक्षिण प्राइज कमिटीला अर्पण केले; परंतू तेथेही असल्या भिडस्त भट सभासदांच्या आग्रहामुळे युरोपियन सभासदांचे काही चालेना. तेव्हा त्या कमिटीने माझी चोपडी नापसंत केली. अखेर त्यांनी ते पुस्तक एका बाजूला टाकून काही वर्षे लोटल्यांनतर दुसरी लहानशी ब्राहयणांच्या कसबाविषयी नवीन चोपडी तयार करून आपल्या स्वतःच्या खर्चाने छापून प्रसिध्द केली. असे महात्मा फुलेंनी आपल्या शब्दांत एका लेखन कार्यात लिहले.

**महात्मा फुलेंच्या कार्याचे राष्ट्र उभारणीतील योगदान :** महात्मा फुलेंच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्याचा भारतीय समाजावर मोठा प्रभाव पडला. तो पुढील प्रमाणे

**अ)बुध्दिवादी विचारांचा प्रभाव :** सत्यशोधक समाजाने मानवी कल्याण, सुख समाधान, एकता व साधी - सरळ धार्मिक तत्त्वे लोकांसमोर मांडली.

**ब)अमुलाग्र परिवर्तनास चालना :** महात्मा फुले यांच्या आधुनिक विचारांच्या प्रभावाने महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जावू लागले.

**क)सामाजिक जागृती :** समाजातील दुर्बल घटकांना त्यांचे अज्ञान, शोषण व गुलामगिरी यांची जाणीव झाली.

**ड) नविन धार्मिक विचारांची निर्मिती :** व्यक्तीने प्रामाणिकपणे कष्ट करून कुटुंबाचे पोषण करणे. सामाजिक कर्तव्य निष्ठेने पार पाडणे असा धर्माचा खरा अर्थ मांडला. तसेच, व्यक्तिने स्वतः च्या व समाजाच्या भौतिक व नैतिक विकासासाठी झटावे ही नविन दृष्टी त्यांनी समाजास दिली.

**इ) प्रेरणा व मार्गदर्शन :** फुलेंचे विचार हे नंतरच्या समाज सुधारकांना प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरले. उदा. राजर्षी छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादींनी फुलेंचे विचार व कार्य यांचे अनुकरण केले.

**समारोप–**

विद्याध्यायनासाठी ज्यांचा सतत असे प्रयास,
त्यांचे अखंड जीवन म्हणजे, जणू एक खडतर प्रवास.
परि स्त्री शिक्षण; हा एकची असे ध्यास, हा एकची असे ध्यास,

या उक्तीप्रमाणे महात्मा जोतीराव फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने व स्वत-ःच्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतिशील क्रांतिकारकाचा होता. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भरून जाऊन आपले सर्व जीवन समर्पित करणारे ते थोर पुरूष होते

भारतीय समाजामध्ये फोफावलेली अंधश्रधा ही धार्मिक साखळीत अडकलेली असून त्यामूळे श्रध्दाळू लोक बऱ्याच अंधश्रध्दांना आपला खरा धर्म मानतात. व अप्रत्यक्षरित्या धर्माला विसरतात. यातूनच अनेक अनिष्ठ चालिरिती परंपरागत समाजात रूजलेल्या आहेत. अनिष्ठ चालीरिती मानव म्हणून जगण्यात अडथळे आहेत. हे अडथळे दूर करण्याचा प्रयत्न समाज सुधारकांनी केलेला आहे. त्यापैकी महात्मा फुले हे समाजसेवेच्या ध्यासाने प्रेरित झालेले व्यक्तिमत्व म्हणावे लागेल.

**निष्कर्ष :–**

१. महात्मा फुले हे विधायक गोष्टींचा पाठिंबा व विघातक गोष्टींना विरोध दर्शवतात.
२. महात्मा फुले समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षण या तंत्राचा प्रभावीपणे वापर करतात.
३. महात्मा फुले बहुजन समाजातील दुर्बल समजल्या जाणाऱ्या स्त्री व दलित वर्गांच्या उध्दारासाठी कृतिशील प्रयत्न करतात.
४. महात्मा फुले विविध ग्रंथ सामृग्रीच्या माध्यमातून विविध स्तरातील शोषक लोकांमध्ये जाणीव व जागृती निर्माण करण्याचे कार्य करतात.
५. समाजसुधारक प्रचलित समाज व्यवस्थेतील विकासातील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करतात.

**संदर्भ ग्रंथ :**

१. महात्मा फुले (चरित्र) : धनंजय कीर
२. महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य : तानाजी ठोंबरे
३. महात्मा जोतिबा फुले (संपादित) प्रकाशक : सूर्या अध्यापन साहित्य
४. महात्मा जोतिबा फुले यांचे १०१ मौलिक विचार. संपादन : नागनाथ कोतापल्ले

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# राष्ट्र बांधणी – एक सामाजिक शिक्षण प्रक्रिया

**प्रा. प्रकाश बा. कांबळे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

**प्रस्तावना :**

राष्ट्राला इंग्रजी भाषेत Nation म्हटले जाते. Nation हा शब्द Natus या लॅटिन शब्दापासून बनला आहे. Natus म्हणजे एकाच वंशाच्या लोकांचा समूह होय. **प्रा. बर्जेस** यांच्या मते, 'राष्ट्र म्हणजे भौगोलिक एकता असलेल्या प्रदेशात वास्तव्य करणारा व वांशिक एकता असणारा लोकांचा समूह होय.' परंतु भारताच्या संदर्भात राष्ट्र म्हणजे, वांशिक, भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, प्रादेशिक विविधता असलेल्या लोकांचा एकात्म समाज होय. अनेक वर्षांच्या प्रदीर्घ वास्तव्यातून अनेक बाबतीत विविधता असणाऱ्या समुदायांमध्ये एक समान संस्कृती आकाराला येते. **रामसे मूर** म्हणतात की, राष्ट्र म्हणजे परस्परांविषयीच्या काही आत्मीयतांनी स्वाभाविकपणे स्वतःला एकरुप मानणारा जनसमुदाय होय.' भारत हे असेच एक परस्परांविषयीच्या आत्मीयतांनी स्वतःला एकरुप मानणारे राष्ट्र आहे. भारत देशाला पाच हजार वर्षांचा प्रदीर्घ इतिहास आहे. आर्य आणि अनार्य यांच्या परस्परांविषयीच्या आणि त्यांच्या समिश्र सांस्कृतिक जीवन पध्दतीचे ते एक प्रतीक आहे. हिमालय ते कन्याकुमारी आणि कच्छ ते आसाम अशा आवरस-चौरस पसरलेल्या जवळ-जवळ दोन हजार मैलांच्या खंडप्राय देशाला **'भारतवर्ष'** म्हटले जाते. वैविध्यपूर्ण अशा भारतीय समाजाची राष्ट्र बांधणी कशी आकाराला आली याचा शोध घेण्याच्या हेतूने 'राष्ट्र बांधणी –एक सामाजिक शिक्षण प्रक्रिया' या शोध निबंधाची निवड केली आहे.

**उद्देश :** सदर शोध निबंधाचे उद्देश पुढीलप्रमाणे-

१) शैक्षणिक ध्येये संस्कारातून राष्ट्र बांधणी प्रक्रिया अभ्यासणे. २.शिक्षण स्तर अंतर्गत उपक्रमातून राष्ट्र बांधणी प्रक्रिया अभ्यासणे.

**अभ्यासपध्दती :** सदर शोध निबंधासंदर्भात माहितींचे संकलन करण्यासाठी संदर्भ पुस्तके, मासिके आणि संशोधन ग्रंथ या दुय्यम स्त्रोतांचाआधार घेण्यात आला आहे. संकलित केलेल्या माहितीचे शोध निबंधाच्या उद्देशांप्रमाणे वर्णनात्मक आणि स्पष्टीकरणात्मक पध्दतीने विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राष्ट्र बांधणीच्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे राबविण्यात येत असलेल्या ध्येय-धोरणांचा आणि उपक्रमांचा वास्तविक अर्थाने शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**माहितीचे विश्लेषण :**'राष्ट्र बांधणी –एक सामाजिक शिक्षण प्रक्रिया' या शोध निबंधासंदर्भात संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे-

शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. शिक्षणातून व्यक्तीला सामाजिक प्राणी बनविण्याचा प्रयत्न केला जातो. औपचारिक शिक्षण पध्दतीची सुरुवात होण्याच्या अगोदर कुटुंब किंवा समाजातून व्यक्तींच्या सुप्त गुणांचा विकास साधला जात होता. आणि त्यांच्यात स्वावलंबन निर्माण केले जात होते. समाजाच्या प्रथा, परंपरा, सामाजिक मुल्ये, नितीतत्वे,प्रमाणके इत्यादींद्वारा व्यक्तींच्या वर्तनांना नियंत्रित करून सामाजिक आणि भौगोलिक एकात्मता निर्माण केली जात होती. पुढे औपचारिक शिक्षण पद्धतीला सुरूवात झाली. अशा शिक्षणातून व्यक्तीमध्ये योग्य बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला. व्यक्तींच्या सुप्त गुणांना संधी देऊन व योग्य दिशा दाखवून त्याचा विकास साधला जाऊ लागला. हा विकास शारीरिक, बौद्धिक आणि भावनिक पातळीवरचा आहे. औपचारिक शिक्षणातून आपण ज्या समाजात आणि भौगोलिक प्रदेशात रहातो त्यांच्याप्रती प्रत्येकांच्या मनात आदर, प्रेम, त्याग, बलिदान इत्यादी भावनांची निर्मिती करण्यावर भर देण्यात आला. या सर्व भावना व प्रेरणा राष्ट्र बांधणीच्या आधार स्त्रोत आहेत.

देशातील सर्व व्यक्तीमध्ये सामाजिकता व राष्ट्रीयत्व शिक्षणातून निर्माण केले जाते. प्रत्येकाला समाजाबद्दलची आणि राष्ट्राबद्दलची कर्तव्य काय आहेत याची माहिती दिली जाते. प्राचीन ग्रीक तत्ववेत्ते **प्लेटो** म्हणतात की, 'शिक्षण हे व्यक्तीच्या कल्याणासाठी व राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी असते.' शिक्षणातून व्यक्तीच्या सुप्तशक्तींचा विकास साधला जातो व त्याला समाजाचा जबाबदार नागरिक बनविला जातो. **डॉ. बेनीप्रसाद** म्हणतात की, 'शिक्षण म्हणजे मनुष्याचे समाजीकरण करण्याचे व समाजाच्या विस्तृत जीवनाशी मनुष्याच्या व्यक्तीमत्वाचा समन्वय घडवून आणण्याचे एक महत्वपूर्ण साधन आहे.' शिक्षणातून देशातील सर्व जाती, धर्म, भाषा, प्रदेशांच्या लोकांमध्ये एकात्मता निर्माण केली जाते. राष्ट्राभिमान, त्याग, सहिष्णुता, मानवता, सत्य, अहिंसा, सदाचार विवेक, न्याय इत्यादी राष्ट्रीय मूल्यांचे संस्कार केले जातात. 'जगा आणि जगू द्या' या उदात् मूल्याची जोपासना करण्याचा

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

प्रयत्न केला जातो. राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान टाळून त्याचे संरक्षण व संवर्धन करणे, देशाचा इतिहास, साहित्य, संस्कृती, विज्ञान या ज्ञान शाखांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचा प्रयत्न केला जातो.

समाजातील सर्व व्यक्तींमध्ये नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्करण शिक्षणातून केले जाते. या संदर्भात **अरविंद घोष** म्हणतात की, 'शिक्षणातून मानसिक प्रवृत्तींचे नियमन व नैतिक मूल्यांचे संस्कार करून तद्द्वारा व्यक्तींचा शारीरिक व बौद्धिक विकास होऊन खरा मानव निर्माण होईल.' कोणत्याही समाजाची व राष्ट्राची खरी प्रगती ही चारित्र्य संपन्न व्यक्तींवर अवलंबून असते. नैतिकता म्हणजे प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, ध्येयनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, विनयशीलता, बंधुभाव अशा अनेक गुणांचा समुच्चय होय. अशा गुणसंपन्न व्यक्तींमुळेच राष्ट्र बांधणीची प्रक्रिया गतीमान होत असते. व्यक्तींच्या सुसंस्कृततेचा विकास शिक्षणातून होत असतो. म्हणजेच व्यक्तीने समाजाच्या मानदंडाप्रती आदर बाळगणे आणि वर्तन निर्धारित करणे होय. थोडक्यात, शिक्षणातून सर्वधर्म समभाव, सहिष्णुता, अन्य जातीसमूहातील लोकांबद्दल प्रेम, आदर, शिस्त, संघटनात्मक बांधिलकी, समाजाचे योग्य नेतृत्व, मतदानप्रती जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

शिक्षणातून संपर्क भाषांचा आदर आणि विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. भारतात मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि विश्वभाषा बोलल्या जातात. राष्ट्रीय एकात्मतेच्या वाढीसाठी हिंदी ही राष्ट्र भाषा म्हणून तिचा स्वीकार आणि विकास करण्यावर भर देण्यात आला आहे. इंग्रजी भाषेचे आंतरराष्ट्रीय महत्व ओळखून इंग्रजी भाषेच्या शिक्षणावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर घटनेचे कलम ४५ अन्वये मातृभाषेतून प्राथमिक स्तरावरील शिक्षण देणे अनिवार्य मानण्यात आले आहे. भारतीय घटनेने धर्मनिरपेक्ष राज्याचा स्वीकार केला आहे. शिक्षणातून सर्व धर्म समभावाची शिकवण देण्यावर भर देण्यात आला आहे. सन १९४८ च्या **डॉ. राधाकृष्णन** आयोगाने धर्मनिरपेक्ष शिक्षणाची शिफारस केली आहे. त्यांच्या मते, 'भारताच्या राज्यसत्तेवर कोणत्याच धर्माचे अधिपत्य नाही. कोणत्याही धर्माला इतर धर्मापेक्षा वेगळी वागणूक दिली जाणार नाही. घटनेने प्रत्येकाला त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. तरीपण त्याबतीत एक लक्ष्मणरेषा आखून दिली आहे. धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क अमर्याद नाहीत. इतरांच्या मूलभूत हक्कांवर गदा येणार नाही याची प्रत्येकाला स्वधर्माचरण करताना काळजी घ्यावी लागते' अशा प्रकारे राष्ट्र उभारणीसाठी धर्मनिरपेक्ष तत्त्वाचे अनुकरण करण्यावर भर दिला आहे.

शिक्षणातून सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केला जातो. समाजातील उच्च-निचता, श्रेष्ठ-कनिष्ठता, स्पृश्य-अस्पृश्यता इत्यादी विषमता घटनेचे कलम १५, १६, १९ आणि ३९ अन्वये नष्ट करण्यात आल्या आहेत. जातीपेक्षा व्यक्तीच्या गुणाला व कर्तृत्वाला महत्व द्यावे, जन्माने सर्व माणसे समान आहेत या उदात् मानवी मूल्यांचे आचरण करण्याचे संस्कार शिक्षणातून केले जातात. शिक्षणातून व्यक्तींना उत्पादनाभिमुख बनविण्याचा प्रयत्न केला जातो. जेणेकरून राष्ट्राच्या एकूण उत्पादनात प्रतीवर्षी वृध्दी होत जाईल याची दक्षता घेण्यात आली आहे. याकरिता कोठारी कमिशनने शाळांमधून गणित, विज्ञान हे विषय अनिवार्य केले आहेत. श्रमाची प्रतिष्ठा वाढावी म्हणून कार्यानुभवाला महत्व देण्यात आले आहे. व त्याद्वारे समाजोपयोगी उत्पादन कार्य करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय शिक्षणामध्ये संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा समावेश करून कौशल्यपूर्ण व्यक्तीमत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षणातून केवळ राष्ट्रीय भावना वृद्धीगंत केल्या जातात असे नाही तर वाढत्या लोकसंख्येच्या आवश्यकता पूर्ण करणाऱ्या कौशल्यपूर्ण शिक्षणाचे धडे घेतलेल्या व्यक्तींची निर्मिती केली जाते.

**शिक्षण स्तर अंतर्गत उपक्रमांतून राष्ट्र बांधणी** :शिक्षणाच्या सार्वत्रिकरण धोरणाचा भाग म्हणून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण अशा चार स्तरांवर शिक्षण दिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक क्षमतांचा विचार करून शिक्षणाचे स्वरूप निर्धारित करण्यात आले आहे. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावनांची वाढ करण्याच्या हेतूने अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय चिन्हे, राष्ट्रीय पक्षी यांची विद्यार्थ्यांना माहिती दिली जाते. शाळेत स्वातंत्र्यदिन प्रजासत्ताक दिन हे राष्ट्रीय सण समारंभपूर्वक साजरे केले जातात. बलीदान दिन, शिक्षक दिन तथा राष्ट्रीय पुरूषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या जातात. थोर पुरूषांच्या जीवनाचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला जातो. भारताचे भौगोलिक पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक जीवन पध्दती यांची सोप्या भाषेत ओळख करून दिली जाते. तसे पहाता प्राथमिक शिक्षण शिक्षणाचा पाया मानला जातो. घटनेचे कलम ४५ अन्वये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञानाची जान येते. तसेच राष्ट्रप्रेम, विचार स्वातंत्र्य, सहकारभाव, चिकित्सक वृत्ती या सर्व सामाजिक गुणांचा विकास होतो. प्राथमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण केली जाते. त्यांना निर्मल व निरोगी जीवनाची सवय लावली जाते. कौटुंबिक व समाजिक मुल्यांची जोपासना करण्याची सवय लावली जाते.कौटुंबिक व सामाजिक

मुल्यांची जोपासना करण्याची मनोवृत्ती निर्माण केली जाते. समाजातील वेगवेगळया सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांतून मुलांचा सहभाग वाढवून सहकार, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्राभिमान जोपासण्याची प्रेरणा दिली जाते.

माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही निश्चित शैक्षणिक उपक्रम राबविण्यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांना भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाचे ज्ञान दिले जाते. देशाच्या आर्थिक विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली जाते. भारतातील भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक वैविधतांची माहिती दिली जाते.विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण करण्यासाठी लेखन, वाचन, वादविवाद कौशल्यांमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. राष्ट्र पुरूषांविषयी माहिती देणाऱ्या तज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना सर्वसामान्य, तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांना कार्यतत्पर, व्यवसाय कुशल, कार्यक्षम स्वावलंबी व चारित्र्य संपन्न बनविण्याचा प्रयत्न केला जातो.माध्यमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांना शिस्तीची सवय, शारीरिक श्रम शिक्षण, प्रतिष्ठा व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करू दिली जाते. जात, धर्म, वंश, भाषा, वर्ग व जमात विषयक भेदभाव दूर करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, न्याय या मुल्यांचे संस्कार केले जातात. लोकशाही यशस्वी करण्यासाठी शिस्त, सहकार्य, सहिष्णुता, सामाजिक संवेदना, सहनशक्ती असणाऱ्या गुण संपन्न व्यक्ती निर्माण केल्या जातात. त्यातूनच लोकशाही निष्ठा असणारे, सामाजिक मुल्यांचे जतन करणारे, समाजाचे योग्य नेतृत्व करणारे विचारी, अभ्यासू नागरीक तयार केले जाता्र

विद्यापीठ स्तरावरील शिक्षणातून विद्यार्थ्यांना वेगवेगळया विषयांची सैध्दांतिक पार्श्वभूमी समजावून दिली जाते. भाषा, साहित्य, कला, संस्कृती इत्यादी विषयांचा तुलनात्मक अभ्यास करण्यावर भर दिला जातो.विद्यार्थ्यांनी विविध ज्ञानशाखांमध्ये संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.समाजातील मानवी मुल्यांच्या संशोधनावर भर देवून संशोधित घटकांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जातो.विद्यार्थ्यांना मुक्त व चौफेर अभ्यासाची दालने खुली करून त्यांना परिपक्व व प्रगल्भ बनविण्याचा प्रयत्न केला जातो. भारताचा सांस्कृतिक वारसा, तत्वज्ञान, कला, विज्ञान आणि अन्य क्षेत्रातील ज्ञान विस्तारातून त्याचे राष्ट्रीय विकासातील स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. अध्यापन व संशोधन यांच्या परस्परावलंबी विकासाद्वारे गुणवता वाढवून जागतिक स्तरावरील विद्या केंद्रे निर्माण करण्यावर भर दिला जातो. उच्च शिक्षणातून संलग्न महाविद्यालयांचा गुणात्मक विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.बदलत्या कौशल्यपूर्ण व्यक्तीमत्वाची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला जातो.देशाच्या सामाजिक सांस्कृतिक, राजकीय शैक्षणिक,आर्थिक क्षेत्रांच्या विकासासाठी नाविण्यपूर्ण बौध्दीक योगदान देऊन चारित्र्यपूर्ण राष्ट्र उभारणी करण्याचा प्रयत्न उच्च शिक्षणातून केला जातो. भारतीय संस्कृती, सभ्यता, एकात्मता, मुल्ये, इतिहास इत्यादी अनेक विषयांवर परिसंवाद, चर्चासत्र यांचे आयोजन करून नव्या पिढीला राष्ट्र उभारणीची प्रेरणा दिली जाते.

**निष्कर्ष** : शिक्षणाची ध्येये आणि शिक्षण स्तर अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक उपक्रमातून राष्ट्र बांधणी पोषक अशा व्यक्तीमत्वांची जडणघडण केली जाते.औपचारिक शिक्षण पध्दतीला सुरूवात झाल्यानंतर व्यक्तींचा शारीरिक, बौध्दीक आणि मानसिक विकास करण्याबरोबर सामाजिक जाणीवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रामाणिकता, सत्यप्रियता, ध्येयनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, विनयशीलता, बंधुभाव अशा अनेक नैतिक मुल्यांचे विद्यार्थ्यांवर संस्कार करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतामध्ये अनेक जाती, धर्म, वंश, संस्कृती, प्रदेशांचे लोक राहतात.त्यांच्यामध्ये सहकार्य, सहिष्णुता निर्माण करण्याबाबतचे विद्यार्थ्यांना धडे दिले जातात.शिक्षणातून राष्ट्रीय मुल्ये, कायदा, सुव्यवस्था, लोकशाही यांचे पालन करणाऱ्या राष्ट्रहित दक्षा व्यक्तीमत्वांची निर्मिती केली जाते. नितीमत्ता ही राष्ट्राची बहुमुल्य अशी संपत्ती आहे, त्याचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या व्यक्ती शिक्षणातून निर्माण केल्या जातात.देशातील शेती, व्यापार, उद्योग क्षेत्रांचा विकास करण्याच्या हेतूने शिक्षणातून कौशल्यपूर्ण व्यक्तीमत्वाची जडणघडण केली जाते.देशाचा विकास आणि एकसंघता यासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक, साहित्यिक, सांस्कृतिक, औद्योगिक अशा विविध क्षेत्रात दूरदृष्टिच्या कुशल, अनुभवी नेतृत्वांची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला जातो.राष्ट्रीय सुरक्षा आणि शिस्त या राष्ट्र बांधणीच्या आवश्यक बाबी आहेत.भविष्यात उद्‌भवणाऱ्या राष्ट्रीय संकटांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि शिस्त असणाऱ्या नव युवकांची निर्मिती शिक्षणातून करण्याचा प्रयत्न केला जात्रे

**संदर्भ** :

१) डॉ. नंदपुरे ईश्वर, डॉ.वानखेडे,अचला : प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, प्रकाशन– विसा बुक्स. नागपूर, पृष्ठ –१९९.
२) डॉ. कोत्तापल्ले, लक्ष्मण : भारतातील सामाजिक कल्याण प्रकाशन,प्रकाशन– विसा बुक्स. पब्लिशर्स,औरंगाबाद, पृष्ठ –१३९.
३) मेहेंदळे, य. श्री : समाजशाास्त्राची मूलतत्वे, मेहेंदळे प्रकाशन, पुणे पृष्ठ– ४६९.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

# स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शेतकरी चळवळी

**प्रा. पद्माकर सदाशिव**
(समाजशास्त्र विभाग)
श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली

**प्रस्तावना :**

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर स्वातंत्र्य चळवळीत मोठया संख्येने सहभागी झालेल्या ग्रामीण भागातील जनतेच्या आकांक्षा उंचावल्या. ज्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी परकीय सरकार बरोबर लढा दिला होता त्या समस्या आता स्वकीय सरकार सोडवेल आणि आपल्या जीवनात थोडा प्रकाश येईल अशी आशा त्यांना वाटू लागली. स्वातंत्र्यानंतर सत्तेवर आलेल्या कॉंग्रेस सरकारच्या नेत्यांना या गोष्टींची जाणीव होती. कॉंग्रेसने आपल्या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी वेळोवेळी प्रस्ताव मांडलेले होते. व मागण्या केल्या होत्या. आता मागण्यांची पूर्तता करण्याची जबाबदारी कॉंग्रेस सरकारवर होते.

शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी शेतीमध्ये सुधारणा करण्याची गरज होती. ब्रिटीश राजवटीच्या धोरणामुळे भारतातील शेतीव्यवस्थेवर अनेक विपरीत परिणाम झाले. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या गरजेमुळे भारतात ताग, कापूस, तीळ यांचे उत्पादन वाढविले गेल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनापेक्षा नगदी पिकामध्येच वाढझाली. त्यामुळे अन्न धान्याच्या टंचाईत भर पडली. शेतीचे व्यापारीकरण होवून पैशाचा वापर वाढला, त्यामुळे ज्यांच्याजवळ पैसा होता अशा जमीन मालकाची भरभराट झाली. बाकी शेतकरी व कुळांची स्थिती हलाखिची बनली. शेतकऱ्यांना बाजारपेठेसाठी उत्पादन करावे लागण्याची प्रक्रिया सुरू झाली. देशांतर्गत व जागतिक बाजारपेठेशी जोडले गेल्याने तेथे होणाऱ्या चढ उताराचा शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर परिणाम होवू लागला. ब्रिटीशांनी भारतीय हस्तोद्योग नष्टप्राय केल्यावर त्यातील कारागीर शेतीकडे वळले. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढला व शेतमजुरांचे प्रमाण वाढले. ब्रिटीशांच्या जंगल विषयक कायद्यामुळे आदीवासी व शेतीशी संबंधीत शेतकऱ्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम झाला. ब्रिटीश औद्योगिक हितसंबंध जपण्यासाठी इंग्रज सरकारने भारतात औद्योगिकरण होवू दिले नाही. या सर्व प्रक्रियातून निर्माण झालेली व्यवस्था शेतीला हानीकारक तर होतीच. पण तिच्यामुळे ग्रामीण भागात कमालीचे दारिद्रय, बेकारी व उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली. या अन्याय व पिळवणूकी विरूध्द देशातील आदीवासी शेतकऱ्यांनी उठाव केला व चळवळी केल्या. परंतू परकीय सरकारने त्यांच्यासाठी कोणत्याही मूलभूत सुधारणा किंवा उपाय योजले नाहीत. ही जनता स्वातंत्र्यानंतर या अवस्थेतुन बाहेर पडण्याची वाट पाहत होती. स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या वेगवेगळया चळवळीमधून परकीय सरकारने लादलेले असहय कर व सारा यांना विरोध केला गेला होता. त्याचप्रमाणे जमीनदारी नष्ट करण्यासाठी मागणी मोठया प्रमाणात मुळ धरीत होती.

**२) उद्‌दिष्टये :-**

१) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतीची स्थिती अभ्यासणे.
२) शेती सुधारण्यासाठी योजलेल्या उपायांची माहिती घेणे.
३) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळीचे स्वरूप समजावून घेणे.

**३) जमीन सुधारणा व शेतीच्या विकासासाठी शासणाच्या उपाययोजना** - शेती क्षेत्रातील विकास मुख्यतः दोन घटकावर अवलंबून असतो. १) तंत्रज्ञानात्मक २) संस्थात्मक

तंत्रज्ञानात्मक घटकामध्ये शेतीला लागणारी खते, बियाणे, अवजारे, यंत्रे इत्यादी सारख्या गोष्टी येतात. यांच्यातील सुधारणामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते.

संस्थात्मक सुधारणामुळे जमीन कसणाऱ्याच्या हाती जमीनीची मालकी येईल अशा प्रकारे जमीनीचे फेरवाटप करणे. तसेच शेतीचे आकारमान सुधारणे, कुळांना संरक्षण देणे, खंड आकारणीवर निर्बंध घालणे इ. गोष्टी येतात.

**३.१ जमीन - सुधारणा :-** जमीन सुधारणेचा उद्‌देश हा सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून जमीन मालकाची फेररचना करणे व जमीनीचा जास्तीत जास्त उपयोग होईल अशा दृष्टीने जमीन धारणा करणे.

१) मध्यस्थ ही संस्था नष्ट करणे - म्हणजे जमीनदारी मालगुजारी या संस्था नष्ट करणे.
२) कुळांच्या संबंधातील सुधारणा -यात खंड नियंत्रित करणे, कुळांना मुदतीबाबत संरक्षण देणे,कुळांना जमीनीचा मालकी हक्क देणे.
३) शेतीसंबंधी फेररचना - यात जमीनीची तुकडेबंदी तसेच तुकडेजोड हा बाबी येतात.
४) कमाल जमीन धारणा मर्यादा ठरविणे -

**३.२ १९५७ ते १७६५ मधील सुधारणा –** महाराष्ट्र १९५७ ते १७६५ या काळात सुधारणा करण्यात आल्या.

१) कसेल त्याची जमीन – या तत्वाच्या आधारे कुळकायदे केले गेले. कुळ कायद्याव्दारे प्रत्यक्षात शेती न कसणाऱ्या शेतमालकांची मालकी रद्द करण्याचा प्रयत्न केला गेला. 'इनाम', 'वतन' इ. सरनामा शाहीतील जमीन मालकीचा प्रकार रद्द करण्यात आले. सरकारचे जमीन कसणारा शेतकरी व शासन यांच्यामध्ये असणारे सर्व मध्यस्त काढून टाकले.

२) जमीनीच्या मालकीचे विकेंद्रीकरण – कुळकायदा होवूनही जमीनीच्या धारणेतील विषमता नष्ट झाली नाही. थोडया श्रीमंत शेतकऱ्यांच्या हातात मोठया प्रमाणात जमिनी होत्या व दुसऱ्या बाजुला थोडया जमीनी बाळगण्याची किंवा भुमिहीनांची संख्या मोठी होती.जमिनीच्या मालकीचे फेरवाटप होण्यासाठी 'कमाल' जमीनधारणा कायदा प्रथम १९६१ साली करण्यात आला. त्यानंतर १९७५ साली या कायद्यात पुन्हा सुधारणा करण्यात आली.

३) तुकडेजोड कायदा शेतजमिनीच्या विक्रीमुळे किंवा कुटुंबाच्या घटकामध्ये तिचे वाटप झाल्यामुळे लहान-लहान तुकडे होतात. व असे लहान शेतजमिनीचे तुकडे शेतीच्या उत्पादकतेला हाणीकारक ठरतात. म्हणून शेत जमिनीचे तुकडे होणे टाळणे.

**३.३ जमीन विषयक सुधारणांचे परिणाम :**

केवळ कायदे केल्यामुळे शेतीत किंवा जमीन धारणामध्ये बदल झाले किंवा सुधारणा झाल्या असे नाही. जमीन विषयक सुधारणांचे कायदे करून देखील जमिनीच्या मालकीच्या वाटणीत फारसा बदल झाला नाही. कारण कायदे करण्यापूर्वी त्यांचा बराच काळ वाजागाजा केल्यामुळे मधल्या काळात जमिनदारांनी असंख्य कुळांची जमिनीवरून हकालपट्टी केली.

कमाल जमिनधारणा कायदा झाला तरी मोठया जमिनमालकांनी आपल्या नातेवाईकांच्या किंवा खोटया नावावर हस्तांतरित करून स्वतःच्याच ताब्यात ठेवल्या. तुकडेजोड कायद्याचा फायदाही बडया शेतमालकांनी आपल्या सोयी प्रमाणे चांगल्या जमिनी मिळविण्यासाठी तसेच जमीनमालक व प्रत्यक्ष कसणारा यांनी भागीदारी पध्दतीने शेती कसण्यास मान्यता देण्यात आली. त्यामुळे कुळ ठेवून आधी वाटा खंड म्हणून गिळंकृत करण्याची जमिनदारी पध्दत एका प्रकारे वेगळा मार्गाने आणू आधिकृत करण्यात आली.

**३.४ सहकारी पतपुरवठा :**

शेतीच्या विकासातील एक मुख्य अडचण भांडवलाची कमतरता ही असते. ही अडचण सोडविण्यासाठी सरकारने ग्रामीण भागात पतपुरवठा संस्था सुरू करण्यात प्रोत्साहन दिले. त्यांच्या जोडीने सहकारी तत्वावरील बाजारसंघ शेतकऱ्याला खरेदी विक्री व्यवहारात मदत करण्यासाठी सरकारच्या उत्तेजनाने स्थापन केले गेले. बँका व बाजारपेठा प्रमाणेच कृषि औद्योगिक क्षेत्रातही सहकारी चळवळीने महाराष्ट्रात जोर धरला. सहकारी तत्वावर महाराष्ट्र ठिकठिकाणी साखर कारखाने, सुत गिरण्या सुरू झाल्या. सहकारी साखर कारखाने, खरेदी-विक्री संघ, पतपेढया सुतगिरण्या याव्दारे ग्रामीण महाराष्ट्रांचा भांडवली विकास होवू लागला. पण तो प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रापुरता मर्यादीत राहिल्याने प्रादेशिक विषमता वाढीस लागली. तसेच सहकारी संस्थांचा व त्यातून होणाऱ्या विकासाचा फायदा ग्रामीण क्षेत्रातील मुठभर सधन लोकांना मिळाला. भुमिहीन शेतमजुर व गरीब शेतकऱ्यांना हे फायदे फारसे न मिळाल्यामुळे शेतीचा सर्वांगिण व भरघोस विकास होऊ शकला नाही. धान्योत्पादन हव्या त्या वेगाने वाढू शकले नाही. धान्याची तुट असल्यामुळे जवळ – जवळ १९७० सालापर्यंत भारताला वेळोवेळी परदेशातून धान्य आयात करावे लागत असे. अशा वेळी धान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होण्याची गरज तातडीची बनली. त्यासाठी हरित क्रांतीचे धोरण स्वीकारले गेले.

**३.५ हरित क्रांती :**

शेतीचे पारंपारिक तंत्र बदलून नविन तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीचा विकास घडविणे हे हरित क्रांतीचे स्वरूप होते. या आधुनिक शेती तंत्रात रासायनिक खते, कीटकनाशके, संकरित जातीची व सुधारित बियाणे यांचा वापर करून ट्रॅक्टर व इतर कृषियंत्राच्या सहाय्याने वीज डीझेलसारख्या इंधनाची मदत घेवून, भरपूर पाणी पुरवठयाच्या सहाय्याने शेती करणे, व उत्पादन वाढविणे यांचा अंर्तभाव होतो. खात्रीचा व भरपूर पाणीपुरवठा हा हरित क्रांतीतील कळीचा प्रश्न होता. त्यामुळे असा पाणीपुरवठा उपलब्ध असलेल्या पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेशाचा हा काही भाग या ठिकाणी हरित क्रांतीच्या योजनेला भरपूर यश मिळाले मात्र पावसाच्या पाण्यावर होणाऱ्या कोरडवाहू भागांना तिचा फायदा झाला नाही.

**३.६ हरित क्रांतीचे परिणाम :**

१) नविन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे धान्योत्पादनात भरघोस वाढझाली.

२) काही भागांमध्ये शेतकरी एका ऐवजी अनेक पिके घेवून शकत असल्यामुळे काही ठिकाणी मजुरांना स्थलांतरही करावे लागले.

३) नव्या तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे शेती व उद्योगक्षेत्राचे संबंध अधिक धनिष्ट झाले. शेती व उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल पुरवीत असल्यामुळे शेतीचे उद्योगक्षेत्राशी संबंध होताच.

४) पाणी पुरवठयाच्या सोयीमध्ये वेगवेगळया प्रदेशांत असणाऱ्या तफावतीमुळे हरितक्रांती काही ठिकाणीच यशस्वी झाली. यामुळे प्रादेशिक विषमता निर्माण झाली.

५) छोटया शेतकऱ्याची ऐपत नसल्यामुळे व भांडवलाचा अभाव असल्यामुळे त्यांना नविन तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेता आला नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील कमी जमीन असणारे बहुसंख्य शेतकरी हरितक्रांतीच्या फायद्यापासून वंचित राहिले.
६) नविन व्यवस्थेत शेतकरी त्याच्या शेतीला लागणाऱ्या गोष्टींसाठी तसेच विकावयाच्या शेतमालासाठी बाजारावर मोठया प्रमाणात अवलंबून राहू लागला नविन तंत्रज्ञानासाठी अधिक भांडवलाची गरज असल्यामुळे शेतीला अधिक कर्जपुरवठयाचीही गरज भासू लागली. त्यामुळे भारतीय शेतीचे झपाटयाने भांडवलीकरण झाले.

**३.७ इतर योजना :** हरित क्रांती खेरीज सरकारने इतरही योजना विविध स्तरातील शेतकऱ्यांसाठी राबविल्या. गरीब व मध्यम शेतकरी व शेतमजुर यांच्या कल्याणासाठी व विकासासाठी काही योजना होत्या. तर काही दुष्काळ निर्मुलनासाठी व काही सर्वांगिण ग्रामविकासासाठी होत्या.

१. १९६७ साली इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली सरकारने बॅकांचे राष्ट्रीयीकरण करून ग्रामीण भागातील गरीबासाठी पतपुरवठयाचा एक मार्ग उपलब्ध करून दिला.
२. चौथ्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट केलेली व १९६७ साली सुरू झालेली छोटया शेतकऱ्यांसाठी विकास योजना लागु करण्यात आली.
३. अल्प सुधारक शेतकरी व शेतमजुरांसाठी योजना ही पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (१९७४—७९) राबविण्यात आली.
४. राजस्थानातील अत्योंदय कार्यक्रम यात खेडयातील सर्वात गरीब अशा पाच कुटुंबाना कर्जपुरवठा करण्याची योजना होती.
५. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना या योजनेचा उद्देश ग्रामीण बेरोजगारांना त्यांच्या गावातच रोजगार मिळण्याची हमी त्यांची विविध काळात होणारी उपासमार व त्यामुळे लादले जाणारे स्थलांतर टाळणे हा होता.

**४. भारतातील शेतकरी चळवळी :**

**१) तेलंगणातील शेतकरी उठाव -१९४६ — ५१ :** परदेशी अभ्यासकांच्या मे भारतीय शेतकरी आंदोलनापैकी विचारात घेण्यासाठी आंदोलने म्हणजे केवळ तेलंगणातील १९४६ चा शेतकरी उठाव व बंगालमधील 'तेलंगा' चळवळ होय.

तेलंगणा हा पूर्वीच्या निजामाच्या हैद्राबाद या संस्थांनी राजाचा एक विभाग भारतातील इतर भागाप्रमाणेच हैद्राबाद संस्थानांतही सरंमजाम शाही शेती पध्दतीमुळे लहान शेतकरी, कुळे व शेतमजुर यांना अत्याचारांना तोंड द्यावे लागत असे. कुळांना मुदतीची निश्चिती नसते, वारेमाप खंड द्यावा लागणे, सावकाराकडून होणारी पिळवणूक, देशमुख व जहागिरदारांकडून होणारी वेठबिगारीची सक्ती या सर्व गोष्टी विरूध्द शेतकऱ्यांमध्ये असंतोष, निर्माण झाला होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्या भागात शेतकऱ्यांचे संघटन करून या असंतोषाला वाचा फोडली.

१९४७ मध्ये भारत स्वातंत्र्य झाल्यावर हैद्राबाद संस्थात भारतात विलीन करण्याचे निजामाने नाकारले. त्याच्यामुळे मुस्लीम रझाकारांच्या टोळया अत्याचार करू लागल्या. त्या वेळी शेतकऱ्यांच्या दलांनी त्यांनाही चोख उत्तर दिले. १९४८ साली भारत सरकारने हैद्राबाद संस्थानात सैन्य पाठवून पोलिस कारवाही केली. तेव्हा सैन्यानी हा उठाव मोडून काढण्याचा निकराचा प्रयत्न केला. उठावातील हवा काढून घेण्यासाठी काही सुधारणांचे प्रस्ताव आणले. जहागिरदारी नष्ट केली.

**२) १९५१ ते १९६५ मधील शेतकऱ्यांची आंदोलने :** स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकऱ्यांची आंदोलने जर पाहिली तर आपल्याला दिसतो की, त्यातील बहुतेक आंदोलनात कॉग्रेस सहभागी होता किंवा पाठिंबा होता. कॉग्रेस पक्षाव्यक्तिरिक्त डाव्या पक्षांनी विशेषता भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आंदोलने चालविला. स्वातंत्र्य प्राप्तीच्या जरा अगोदर व थोडया नंतरच्या कालावधीत झालेली तीन महत्वाची आंदोलने म्हणजे तेलंगा, वारली व तेलंगणा १९४८ ते १९५१ या कालावधीत कम्युनिस्ट पक्षावर भारत सरकारने बंदी घातली होती. त्या बंदीचा परिणाम त्यांच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमधील संघटना कार्यावरही झाला.

स्वातंत्र्यानंतर कॉग्रेसचे सरकार स्थापन झाले व शेतकरी आंदोलनामागे कॉग्रेस उभी राहण्याची शक्यता संपली. कॉग्रेसने जमीनदारी निर्मुलन, कुळकायदे, कमाल जमीनधारणा इ. लागू करण्यास सुरूवात केली. नव्याने झालेले कायदे, कार्यान्वित झालेल्या योजना यांचा थोडाफार परिणाम झाला होता व जिथे त्यांचा विपरीत परिणाम झाला होता तिथे गरीब शेतकऱ्यांचा आवाज उठविण्याचे आंदोलन होऊ शकले नाही. १९५१ साली तेलंगणचे आंदोलन मागे घेतल्यानंतर जवळ - जवळ १५ वर्षे आपल्याला शेतकरी आंदोलनांच्या आघाडीवर सामसुम दिसते. या पंधरा वर्षाच्या कालावधीत देश स्वातंत्र्यानंतरची घडी बसविण्यात गुंतला होता. या काळात आपल्याला देशात ठिकठिकाणी भाषावार आंदोलने झालेली दिसतात.

**३) नक्षलवादी चळवळ : १९६७ :** पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्हयातील सिलिगुडी तालुक्यात नक्षलवादी या संथाल आदीवासी गावात संथाल शेतकऱ्यांनी जमीनदारांविरूध्द १९६७ सालाच्या मे महिण्यात उठाव केला आणि त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या आदीवासी शेतकऱ्यांनी पोलिसांना सशस्त्र प्रतिकार केली. नक्षलवादी उठावाची ही सुरूवात होती. या लढयाचे नेतृत्व चारू मझुमदार, कानु संन्याल व जंगल संयाल या नेत्यांनी केले होते. या नेत्यावर मार्क्स व लेनिनखेरीज चीनच्या क्रांतीकारी नेत्यांचा माओ ओ

डॉगचा प्रभाव होता. शेतकऱ्यांच्या क्रांतीतून सर्वकष क्रांती घडवून आणणे हा विचार प्रणालीचा गाभा होता. विचार प्रणालीच्या या मुदयावरून नक्षलवादी चळवळीच्या नेत्याचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाबरोबर मतभेद झाले. पक्षाला हा लढा मान्य नव्हता. मतभेदांचा शेवट १९६९ साली पक्ष फुटून नक्षलवादी विचारांचा गट बाहेर पडण्यात आला. या गटाने कम्युनिस्ट पक्ष (मार्क्स-लेनिनवादी) असे नाव घेतले. दरम्यानच्या काळात १९६७ मध्येच जवळजवळ २ महिने चालेलेल्या नक्षलवादी सशस्त्र उठाव संपुष्टात आला होता. यासारख्याच उठाव आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम येथे झाली. १९६९ नंतर नक्षलवाद्यांची चळवळ कमी - अधिक प्रमाणात बिहार, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, तमिळनाडू व महाराष्ट्राचा काही भाग या ठिकाणी चालु राहिला. या चळवळीचा पाया नेहमीच आदिवासी, शेतमुजर व गरीब शेतकरी राहिला आहे.

नक्षलवादी चळवळीनंतर पुन्हा एकदा देशभर शेतकरी आंदोलनांना सुरूवात झाली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभांनी देशात ठिकठिकाणी शेतकऱ्यांना संघटीत करून त्यांच्या प्रश्नांसाठी छोटी - मोठी आंदोलने केली.

**५) निष्कर्ष :**

स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतीय शेतीला योग्य दिशा देण्याच्या अनुषंगाने विविध पावले उचलली गेली. स्वतंत्र भारतात शेतकरी हिताच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करून शेतीचा विकास करण्यात आला. स्वातंत्र्य भारतातील बहुतांश शेतकरी आंदोलने ही हिंसात्मक स्वरूपाची असल्याची समजते.

**संदर्भ सुची :**

१) विसाव्या शतकातील महाराष्ट्र : य.दी.फडके.
२) शेतकरी संघटना : शरद जोशी
३) शेतकरी आंदोलन : रमेश पाध्ये
४) महाराष्ट्रातील दुष्काळ : दत्ता देसाई

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com

# ब्रिटिश सरकरचे सतीप्रथेविषयक धोरण

**पूनम रमेश भुयेकर**
इतिहास विभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना :–**

कोणत्याही राज्यातील स्त्रियांच्या स्थितीवरून त्या राज्याचे सर्वांगीन मूल्यमापन केले जाते. या नियमाला मराठा राज्यसुध्दा अपवाद नव्हते. मराठयांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास समजावून घ्यावयचा असेल तर मराठेकालीन समाजिक व्यवस्थे अंतर्गत येणाऱ्या सतीप्रथेचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. सतीप्रथा हे मराठेकालीन समाज व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्टे होते. या प्रथेविषयी बर्निअर, बार्बोसा, निकोलस मनुची, इ. परदेशी प्रवाशांनी सतीचे प्रसंग पाहून त्याची वर्णने लिहून ठेवलेली आहेत. सती जाण्याचा विधी प्रदेश परत्वे प्रथा परंपरेनुसार वेगवेगळे असल्याचे व त्यात कालानुरूप बदल झालेले आढळतात ही वाईट प्रथा बंद करण्यासाठी भारतीय तसेच परकिय व्यक्तीनी मानवतावादी दृष्टीकोनातून प्रयत्न केला आहे. एकूणच ब्रिटिश सरकारचे सती प्रथेसंदर्भात असणारे धोरण यावरती प्रकाश टाकण्याचे काम प्रस्तुत पेपरमधून करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती –** सदर शोधनिंबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला.

**संदर्भ साधने –** प्रस्तुत शोधनिंबंधासाठी प्राथमिक व दुय्यम तसेच प्रकाशित व अप्रकाशित सदंर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. डॉ. विजया वाड मराठी विश्वकोष खंड 18, रा. श. वाळंबे महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, गंगा प्रसाद गुप्त बर्निअर की भारत यात्रा, जी. सी. वाड वाड डायरी खंड 1, वा.कृ. भावे पेशवेकालीन महाराष्ट्र, स. मा. गर्गे करवीर रियासत, ताराबाईकालीन कागदपत्रे खंड, इ. तसेच संशोधनासाठी निवडलेले कागद दफतर क. 38 पुडके क. 2 पत्र नं. 18997–18998 या अप्रकाशित साधनांचा वापर केला आहे.

**सती प्रथा –** पती मृत झाला असता त्याच्या प्रेताबरोबर सहगमन करणारी स्त्री म्हणजे सती. सती या संज्ञेचा सर्वसामान्य शब्दार्थ साध्वी, तपस्विनी किंवा प्रतिव्रता असा आहे. या आत्मदहन किंवा सहमरण कृतीला सती प्रथा म्हणतात. सहमरण, सहगमन, अनुमरण, अन्वारोहण इ. संज्ञानाही सतीचा निर्देश करण्यात येतो. पी. थॅामस, मोनिअर विल्यम्स, अ.स. अळतेकर आदी विव्दानांच्या मते जगातल्या अनेक प्राचीन टोळयांच्या समजाव्यवस्थेत, युरोप व अतिपूर्वेकडील देशात सती जाण्याची प्रथा प्रचलित होती. सतीची प्रथा भारतातातील मुख्यत्वे बंगाल, राजस्थान, पंजाब, महाराष्ट्र, कर्नाटक, कश्मीर आदी प्रदेशातून अस्तित्वात असल्याचे दाखले, सिलालेख, प्राचीन संस्कृत साहित्य आणि परदेशी प्रवासी यांच्या वृत्तांतातून मिळतात.[1] सतीच्या चालीबद्दल जुन्या वाङमयातील पहिला उल्लेख महाभारतात आहे. त्यात पंडूबरोबर माद्री सती गेली. तसेच इ.स. 510 मध्ये भानुगुप्ताच्या सेनापतीची पत्नी सती गेल्याचा उल्लेख ऐरण येथील शिलालेखात सापडतो. या पध्दतीने हळुहळू ही प्रथा भारताच्या विविध भागात प्रचलित झाली व 18 व्या शतकात मराठा व पेशवे काळात ही प्रथा रूढ झाली.

**सती प्रथेसदंर्भात परकीय प्रवाशांची वर्णने –**

**1. इब्नबतूता –** प्रत्यक्ष पाहिलेल्या एका सातीच्या प्रकाराचा इब्नबतूताने आपल्या प्रवासवर्णनात उल्लेख केला आहे. विधवा स्त्रिने नवरा मृत्यू पावल्यावर सहगमन केलेच पाहिले असा हिंदू लोकांत नियम नसला तरी तिने सती जावे अशी मात्र लोकांची इच्छा असते, आणि सहगमन करणाऱ्या स्त्रीचे सारे कुटूंब उजळून निघाले असे त्यांना वाटते आणि जी स्त्री सती जात नाही तिचा नातेवाईक तिरस्कार करतात व पतीशी ती एकनिष्ट नाही असे मानतात असे बतूताने लिहून ठेवले आहे.[2]

2. बर्निअर या फ्रेंच प्रवाश्याने 1556–1568 या काळात हिंदुस्थानांत खूप प्रवास केला. लाहोर येथे बारा वर्षाच्या एका मुलीला सक्तीने सती जाववयास लावल्याचा प्रकार त्याने डोळयानी पाहिला. चितेजवळ येताच ही मुलगी भयंकर घाबरली पण तीन चार ब्राम्हणांनी म्हाताऱ्या बाईच्या मदतीने त्या मृतप्राय झालेल्या मुलीचे हातपाय घटृ बांधले आणि तिला चितेत लोटले असा प्रकार बर्निअरने वर्णिला आहे.

स्वेच्छेने सती जाणाऱ्या एका बाईचे उदाहरण बर्निअर स्वतः पाहिले होते. सदर बाई नवऱ्याच्या चितेवर बसली. चारपाच ब्राम्हणांनी चिता सर्व बाजूंनी पेटवली. चिता धडाडली त्या बाईची वस्त्रे पेटली पण दुःखाची एवढी सुध्दा छटा तिच्या चेहऱ्यावर दिसलीच नाही असे बर्निअर म्हणतो.[3] तसेच जेम्स फॉर्बस, चार्लस् मलेट यांनीही सती प्रथेविषेयी उदाहरणे सांगीतली आहेत. म्हणजेच या काळातील स्त्रीयाच्या मनावर सती जाण्याविषयी ठोसपणे बिंबवण्यात येई की, त्या स्वेच्छेने सती जात व ज्यांना सती म्हणजे हे मुळात माहितच नाही अशा स्त्रीयावर सती जाण्याची जबरदस्ती केल्याचे दिसते.

18 व्या शतकात मराठा पेशवे काळात सती प्रथा रूढ होती. लोकहितवादींच्या लिखाणवरून दिसते. उंच्च जातीत म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य याच्यामध्ये नवरा मेला म्हणजे स्त्रिया सती जात. ही चाल मोठी प्रबळ झाली होती व स्त्रीया हा मान मोठा समजून अग्नीत उडया टाकत.[4] इ.स. 1728–29 मध्ये शंकराजी महाडिक यांच्या मृत्यू नंतर त्याची पत्नी भवानीबाई महाडीक सती गेली.[5] डिसेंबर 1749 मध्ये सातारचे शाहू छ. यांचा मृत्यू झाला त्यांच्या पत्नी सकवाराबाई सती जाण्यास तयार नव्हत्या तरीही नानासाहेब पेशव्यांनी जबरदस्तीने तिला सती जाण्यास भाग पाडले. व जर ती सती गेली नाही तर तिची अप्रतिष्ठा होईल म्हणून तिची इच्छा नसतानाही तिला सती जाण्यास प्रवृत्त करण्यात आले तसेच शाहू महाराजांबरोबर सती जाण्याचा निर्धार आणखी दोन स्त्रियांनीही केला त्यात शाहूंची आवडती रखेलेही सती गेली.[6]म्हणजेच काही स्त्रिया स्वेच्छेने सती जात व काहींना जबरदस्तीने सती जाण्यास प्रवृत्त केले जाई.

सती जाणे म्हणजे स्वतःस जीवंतपणे जाळून घेणे होय. यासारख्या स्त्रियांच्या बाबतीत लोकोत्तर धैर्यांचे व स्वार्थ त्यागाचे कृत्य दुसरे कोणतेही नसेल ते कृत्य करण्यास तयार होणाऱ्या स्त्रियांना समजात दैवतुल्य मान मिळत असे. सती जाणारी स्त्री सर्व जीवंत स्त्री पुरूषांत श्रेष्ठ

समजली जाई ती सतीचे वाण घेवून निघे. तेव्हा तिच्या पायावर सर्व अबालवृध्द डोके ठेवून तिच्या आशिर्वादाने स्वतःस पावन करून घेत. पुष्कळ वेळा पुरूषांच्या मृत्यूसमयी स्त्रीचे वय अत्यंत अल्प असे अल्पवयी स्त्रीया नवऱ्याच्या मागे बिघडतील या समजुतीने त्यांच्यावर सती जाण्याची सक्ती होई. व अशा जालीम उपायाने व्यभिचारास आळा घालण्यात येई.[7] म्हणजेच एकूणच या काळातील स्त्रीया सती गेल्या नाही तर त्या व्यभिचाराच्या मार्गाला लागतील हे स्पष्ट होते. पण हे सर्वार्थाने योग्य आहे असे वाटत नाही. कारण सती न जाणा–या सगळयाच स्त्रीया या व्यभीचाराच्या मार्गाला लागतील असे ठामपणे सांगता येत नाही. उदा. अहिल्याबाई होळकर, महाराणी ताराराणी.

सती जाताना उत्सव केला जाई सती जाणाऱ्या स्त्रीची पातळ आणि चोळी यांनी ओटि भरली जात. इ.स. 1811–12 मध्ये भिकाजी हरीसोनी मृत्यू पावले त्यांच्यात भार्येने सहगमन केले. सरकारातून सतीच्या चोळी–'पातळाबद्दल 5 खर्च झाले. चोळी पातळ देवून सतीचा सन्मान करण्याची सरकारची रीत नागाव महालांत होती.[8]

वरील उदाहरणावरून मराठे राज्यकर्ते, सरदार, सरकारी पातळीवरून सतीला मदत करीत. प्रोत्साहन देत होते पण ब्रिटिश आमदानीत राज्यकर्त्यांचे सतीविषयची धोरण बदलले दिसते.

ब्रिटिशांनी सती प्रथेस विरोध दर्शवण्यास सुरूवात केल्यानंतर किंवा इंग्रजांची परवानगी घेतल्याशिवाय सती जाता येणार नाही असा नियम केल्यामुळे राज्यकर्त्याच्या भूमिकेतही बदल झाल्याचे दिसते. उदा. सती जाण्याच्या वहिवाटीच्या नियमांचा उल्लेख सदरच्या पत्रातून दिसतो. यादी सरकवीसदार तालुके वाई जि. दक्षिण प्रांती कोकण यास सतीबाबत वहिवाट करण्याविषयचे उमगले याचा तपशील पुढीलप्रमाणे.

1. सन 1818 मध्ये तालुके, मजकुरी ज्या हिंदूच्या बायका सती जातात याविषयी एक बुक व रिपोर्टमध्ये मसुदा लिहून पाठविणे व सतीची वहिवाट चालवून रिपोर्ट करणे म्हणजेच सती जाणा–या स्त्रीयांनी सरकारची परवानगी घ्यावी असा नियम होता. व त्याची नोंद करून ठेवावेअसा आदेश.[9]
2. सन 1821 मध्ये रिड साहेब यांनी सतीबाबत मजकूर लिहला. धनाथ भट नरवणे यांच्या मृत्यू नंतर त्यांची पत्नी अस्थीबरोबर सती गेली. याबद्दल सर्वाच्या जबाऱ्या घेवून पाठविले व ब्राम्हण स्त्रीया सती जाताना रेग्युलेशन प्रमाणे जात तर त्यांना जाऊ दयावे.[10] यावरून ब्रिटिश सरकारचे सती प्रथेसंदर्भात असणारे धोरण लवचिक स्वरूपाचे होते हे दिसते.

**सती प्रथेविषयी ब्रिटिश सरकारचे धोरण –** सतीच्या प्रथेविषयी जेव्हा चर्चा होई तेव्हा चालीला धर्मशास्त्राची पूर्ण संमती असून फार प्राचीन काळापासून हजारो वर्षे ती चालत आलेली आहे असाच मुद्दा आग्रहाने मांडण्यात येत असे. एखादी चाल पाळणे म्हणजे धर्माचे पालन करणे अशी जेव्हा लोकांची पक्की समजूत असते तेव्हा सरकार व प्रजा यांच्यामध्ये विरोध उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. सनातनी लोक धर्मशास्त्रातील वचनांचा सतीला अनुकूल असा जो अर्थ करतात तो ग्राहय नाही हे पुराव्यानीशी सिध्द करण्याची जबाबदारी कोणातरी हिंदू पंडितानेच स्वीकारणे जरूय होते. आणि ही जाबाबदारी व्दारकानाथ टागोर आणि राजा राममोहन रॉय यांनी स्वीकारली. सतीच्या चालीला धर्मशास्त्राची अनुज्ञा नाही हे हिंदू पंडितांनी सिध्द करण्यापूर्वी या बाबतीत खुद्द सरकारला राज्यकारभाराच्या दृष्टीने काही महत्वाच्या हालचाली करव्या लागल्या.

मार्क्विस ऑफ कॉर्नवॉलिस ग. ज. असता सतीला प्रत्यक्ष बंदी करण्याची जरी अधिका–यांना परवानगी नसली तरी सतीसाठी जर कोणी परवानगी मागितली तर तिला ताबडतोब नकार द्यावा अशी या अधिका–यांना सरकारने सक्त ताकीद दिली होती. सरकारचा अतिशय तीव्र विरोध आहे असे अधिका–यांच्या वृत्तीवरून लोकांच्या लक्षात यावे अशी सरकारची इच्छा होती.

मार्क्विस ऑफ वेलस्लीने सतीबंदीच्या प्रत्यक्ष कायदा न करतांही सतीच्या प्रकारात सामील असलेल्या लोकांवर इतर सामान्य गुन्हेगारांप्रमाणे खटला करून व त्यांना शिक्षा ठोठावून या चालीला पायबंद घालण्याचा प्रयत्न करावा असे ठरविले आणि निझामात अदालत पुढे हा प्रश्न त्याने विचारासाठी ठेवला. निसामत अदालतीने वेलस्लीचे म्हणणे मान्य केले नाही. सतीची चाल बंद झालीच पाहिले हे हया न्यायाधिशांना मान्य केले होते पण ही गोष्ट अगदी तातडीने होणे शक्य नसून काही कालावधीची याला जरूर आहे व ती क्रमाक्रमानेच झाली पाहिजे अशी न्यायाधीशांची विचारसरणी होती.

सतीच्या बाबतीतील गुन्हयांची संख्या झपाटयाने वाढत गेल्यामुळे काही तरी करावे असे सरकारला वाटले आणि 1805 मध्ये निसामत अदालत कोर्टाच्या न्यायाधिशांनी या बाबातीत ज्या शिफारशी करून ठेवलेल्या होत्या त्या सूचनांचे एक पत्रक न्यायखात्यातीलसर्व अधिका–यांकडे पाठवावे असा हूकूम विलायतेला परत जाण्यापूर्वी 1813 मध्ये लॉर्ड मिंटो याने दिला. सतीच्या एखाद्या विशिष्ट प्रकाराला परवानगी देणे हे पूर्वी अधिका–यांच्या मर्जीवर ठेवले पण आता अधिका–यांच्या परवानगीवाचून सती जाण्यास बंदीच करण्यात आला. एखादी बाई सती जाऊ इच्छीत असेल तर सर्वात जवळ जो मॅजिस्ट्रेट असेल त्याला वर्दी देणे सक्तीचे ठरले.

सतीच्या चालीला धर्मशास्त्राची संपूर्ण मान्यता आहे. आणि सती जाणे म्हणजेच धर्मपालन करणे या सतीतनी लोकांच्या आग्रही मताला उत्तर देण्याचे काम प्रथम राजाराम मोहन रॉय यांनी 1818 साली केली. बंगाल प्रांतात राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या चालींचे निर्मूलन व्हावे यासाठी अनेक वर्षे वादविवाद करून पुस्तके लिहून आणि व्याख्याने देवून समाजातील लोकांची मते तयार करण्याचे काम निरलसपणे केले.

इंग्लडमध्ये 6 जून 1828 रोजी ब्रिटिश पार्लमेंटास सतीच्या चालीविरूध्द हयूम यांनी केलेल्या अर्जावर चर्चा झाली. आणि मानवता या तत्वाशी सतीची चाल सर्वस्वी विरोधी असून हिंदूधर्मशास्त्र सुध्दा त्या चालीला अनुकूल नाही असे हयूम यांनी म्हटले. याच सुमारास लॉर्ड विल्यम बेंटिक गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. बेटींकने सैन्यातील वरिष्ठ अशा 49 अधिका–यांना एक गुप्त पत्रक पाठविले. त्याना बेंटीकला उत्तर पाठविले. 5 – अधिका–यांनी हिंदूच्या चालीरीतीत सरकारने हस्तक्षेप करण्यास सक्त विरोध केला. 12 – अधिकारी सतीची चाल बंद व्हावी या मताचे पण त्यांना ही चाल प्रत्यक्षपणे बंद करावी हे मान्य नव्हते. आपल्या अधिकाराचा अप्रत्यक्षपणे उपयोग करून ही चाल बंद करावी असे – 8 अधिका–यांचे मत होते.

24 – ही चाल सार्वत्रिक रीतीने ताबडतोब व पूर्णपणे नष्ट करावी असे मत.

1818 मध्ये निजामत अदालत कोर्टातील पाच न्यायाधीशापैकी चौघांनी सतीबंदाच्या कायद्यास अनुकूल मत दिले. एक वर्षानंतर पाचव्या न्यायाधीशानेही अनुकूल मत दिले. देशांतील सर्वात वरिष्ठ न्यायालयाचे मत अशा प्रकारे सतीबंदीला अनुकूल पडले यामुळे बेंटीकला उत्तेजन मिळाले आणि कायद्यानेसतीला बंदी करण्याच्या बाबतीत आपल्याला सहकार्य द्यावे अशी त्याने कौन्सिलच्या सभासदांना विनंती केली.

4 डिसें. 1829 ला सतीबंदीचा कायदा पास झाला व सदर कायदयाचा मसुदा 7 डिसें. 1829 च्या कलकत्ता गव्हर्नमेंट गॅझेटमध्ये प्रसिध्द करण्यात आला. सती जाणे अथवा एखादया स्त्रीला या बाबतीत मदत करणे हा फौजदारी गुन्हा ठरला आणि अशा गुन्हयाबद्दल गुन्हेगाराला शिक्षा देण्याचा फौजदारी कोर्टाना अधिकार देण्यात आला. गुन्हयाला दंडाची अथवा कैदेची किंवा एकाच वेळी दोन्ही शिक्षा मिळेल असे जाहीर केले. प्रत्यक्ष देहांताची शिक्षा देण्याचाही अधिकार कोर्टाला मिळाला. एखादी बाई सती जाणार आहे अशी बतमी एखाद्याला कळताच ती ताबडतोब अधिका–यांच्या कानांवर घातली पाहिजे. नाही तर फार मोठी शिक्षा होईल असेही जाहीर करण्यात आले. हा कायदा प्रथम बंगाल प्रांतालाच लागू केला. नंतर 1830 मध्ये त्यामध्ये थोडासा बदल करून तो मद्रास व मुंबई प्रांतातही लागू करण्यात आला.[11]

बंगालमधील सतीप्रथेविषयी आकडेवारी पी. थॉमस यांच्या विमेन थ्रु एजीस (1964) या पुस्तकात आढळते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस सतींची किमान संख्या 378 होती. (1815) आणि कमाल 889 (1818) होती. या प्रांताच्या तुलनेत महाराष्ट्र, कर्नाटक व अन्य प्रदेशात ही संख्या मोजकीच होती.[12]

सती जाण्याची चाल बुवासाहेब महाराजांच्या काळातच इंग्रजांनी बंद केली होती. इ.स. 1827 साली त्या वेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड बेटींक याने त्यासाठी कायदाही केला. त्या कायद्यामुळे बुवासाहेबांच्या राणी बबईसाहेब यांनी 1838 साली सती जाण्यास प्रतिबंध करण्यात आला होता.[11] पण असे जरी असले तरी हा कायदा पास झाल्यानंतर ही सतीची प्रथा काही प्रमाणात अस्तित्वात असल्याचे दिसते. 19 व्या शतकात सातारा येथे सती प्रथा अस्तित्वात होती. जर सतीप्रथेविरोधी कायदे झाले. जाहीरनामे निघाले तरी सती प्रथा पूर्णपणे बंद झाली नाही. माहूली येथे 1838 मध्ये एक स्त्री सती गेली. एकंदरीत साताराचे महाराज हे परंपराप्रिय असून रूढी परंपरविरोधी जाण्याची त्यांची तयारी नव्हती असे दिसून येते.[13] म्हणजेच ब्रिटिशांनी या प्रथेसंदर्भात कायदा करूनही स्त्रीया सती गेल्याचे दिसते.

भारतात साम्राज्य विस्तार करत असताना ब्रिटिशांनी येथील समाजाचा व सामाजिक प्रथांचा अभ्यास करून या प्रथा समाजातून क्रमाक्रमाने नष्ट करून आपल्या सत्तेचे दृढीकरण केले. व असे करत असताना त्यांनी येथील लोकांची मदत घेवून या समाजाला विघातक असणा–या प्रथा नष्ट केल्या त्यामुळे सतीप्रथे संदर्भातील ब्रिटिश राज्यकर्त्यांचे कार्य अनन्यसाधारण आहे असेच म्हणावे लागेल.

**निष्कर्ष –**

1. सतीप्रथा हे मध्ययुगीन समाजाचे प्रमुख वैशिष्टये होते.
2. सतीप्रथा हे समाजातील पुरूष प्रधानतेचे उदाहरण आहे. पती निधंनानंतरही त्याचा पत्नीच्या देहावरचा आणि जीवनावरचा हक्क संपत नाही. हेच या प्रथेतून स्पष्ट होते.
3. सुखवस्तु घराण्यातच ही प्रथा अस्तित्वात होती.
4. समाजावर धर्माचा जबरदस्त पगडा असल्याचे दिसते.
5. ब्रिटिशांचे धर्माबाबत असणारे दुर्लक्ष (इग्नोरंन्स पॉलिसी) स्पष्ट होते.

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

**संदर्भ –**

1. डॉ. वाड विजया – मराठी विश्वकोश खंड 18 महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ, मुंबई 2009 पृ. 585–586
2. डॉ. वाळींबे रा. श. – महाराष्ट्राची सामाजीक पुर्नघटाना भाग 1 प्रतिभा मुद्रणालय पुणे. 1962 पृ. 112
3. गंगा प्रसाद गुप्त – बर्निअर की भारत यात्रा, नॅशनल बुक ट्रस्ट, 2001 पृ. 189–193
4. डॉ. वाळींबे रा. श. – महाराष्ट्राची सामाजीक पुर्नघटाना भाग 1 प्रतिभा मुद्रणालय पुणे. 1962 पृ. 117
5. वाड जी. सी. – वाड डायरी, खंड 1. पत्र क्र. 294
6. पवार आप्पासाहेब – ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड 2 पत्र क्र. 248
7. भावे वा. कृ. – पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. 232
8. आवळसकर एस. व्ही. – नागाव आर्थिक व सामाजिक जीवन, पॉप्युलर बुक डेपो. मुंबई. पृ. 124
9. संशोधनासाठी निवडलेले कागद, दफतर क्र. 38 पुडके क्र. 2 पत्र क्र. 18997 अप्रकाशित पुणे अभिलेखागार पुणे.
10. संशोधनासाठी निवडलेले कागद, दफतर क्र. 38 पुडके क्र. 2 पत्र क्र. 18998 अप्रकाशित पुणे अभिलेखागार पुणे.
11. डॉ. वाळींबे रा. श. – महाराष्ट्राची सामाजीक पुर्नघटाना भाग 1 प्रतिभा मुद्रणालय पुणे. 1962 पृ. 123–130
12. डॉ. वाड विजया – मराठी विश्वकोश खंड 18 महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ, मुंबई 2009 पृ. 586–587
13. गर्गे स. मा. करवीर रियासत. गो. य. राणे प्रकाशन पुणे. 1968 पृ. 581

# राजर्षि शाहू महाराज यांचे देश उभारणीतील कार्य

**प्रा.डॉ.बाबासाहेब एस. शिंदे**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
स.ब.खाडे महाविद्यालय,
कोपार्डे, ता.करवीर, जि.कोल्हापूर.

**प्रस्तावना**

इ.स.पूर्व काळापासून ते एकोणिसाव्या, विसाव्या शतकापर्यंत पृथ्वीच्या पाठीवर अनेक महान सम्राट व राजेरजवाडे होऊन गेले; पण समाजाच्या अगदी तळाच्या पातळीवर मानवतेवर माणून म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फारच थोडे होऊन गेले. त्यापैकी कोल्हापूर संस्थानचे छ.शाहू महाराज हे होत. त्यांनी आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणणारे ते प्रजाहित दक्ष राजे होते. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्त्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक स्थैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व आखिल महाराष्ट्रात नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व समाजालाही या कर्तव्याच्या अनुरोधाने मार्गदर्शन केले. या काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले सर्वांगीण वर्चस्व निर्माण केले होते व हे वर्चस्व टिकविण्यासाठी बहुजन समाजावर निरनिराळी सामाजिक व धार्मिक बंधने लादलेली होती. या बंधनातून बहुजन समाजाची सुटका करून त्याला प्रगत बनविण्याचे कार्य शाहू राजांनी केले. त्यांच्या या कार्यामुळेच असामान्य व्यक्तिमत्त्वाचा, बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून त्यांना लोकप्रियता मिळाली.

हा संशोधन पेपर सामाजिक संशोधनातील दुय्यम तथ्यांच्या आधारे तयार करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) राजर्षि छ. शाहू महाराजांचे विविध समाजाकरिता वसतिगृह स्थापनेमागील विचार जाणून घेणे.
२) राजर्षि छ. शाहू महाराजांचे आरक्षणाबाबतचे विचार जाणून घेणे.
३) राजर्षि छ. शाहू महाराजांचे कृषिविषयक धोरण जाणून घेणे.
४) राजर्षि छ. शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्याचा आढावा घेणे.

राजर्षि शाहू महाराज उदारमतवादी शिक्षणाचे प्रणेते होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाज जीवनात क्रांतीची बीजे पेरत होते. विषमतेने व्यापलेल्या समाज जीवनाला समातनेच्या पातळीवर आणणारे होते. खाजगी हितसंबंधाकडून समाजहिताकडे जाणारे होते. आणि म्हणून राजर्षिंच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यालया व्यापक मानवतावादाचे अधिष्ठान लाभलेले होते.

स्वातंत्र्यापूर्व काळात बहुजन समाजाची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. त्यामुळे बहुजन समाज सर्वच बाबतीत मागासलेला होता. बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. अशा वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणणे महत्त्वाचे होते. त्यासाठी या समाजापर्यंत त्यांनी प्राथमिक शाळा नेऊन पोहचवली. परंतु दुय्यम आणि उच्च शिक्षणासाठी सर्व सोयी ग्रामीण भागापर्यंत पोहचविणे त्या काळामध्ये अवघड होते. म्हणून ग्रामीण भागामध्ये जी हुशार, होतकरू आणि गरीब मुले असतील त्यांच्या दुय्यम आणि उच्च शिक्षणाची गैरसोय होऊ नये याकडे राजर्षिंनी लक्ष दिले होते.

**वसतिगृहांची जननी**

शाहू छत्रपतींनी १९७१ ते १९२१ या २० वर्षाच्या कालखंडात जी २१ वसतिगृहे निरनिराळ्या जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केली होती त्या पाठीमागे प्रत्येकाला आपला शैक्षणिक विकास करून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे हा हेतू होता. तसेच त्या पाठीमागे बहुजनांच्या दारिद्रयामुळे त्यांचे शिक्षण थांबू नये असाही प्रामाणिक प्रयत्न होता. स्व-घरापासून दूर असलेले घर म्हणजे वसतिगृह अशी भावना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करून वसतिगृहात्मक शिक्षणाची प्रचंड चळवळच राजर्षिंनी सुरू केली. या चळवळीचा हेतू समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना विद्या मिळावी हाच होता. अत्यंत माफक पैशात या सर्व वसतिगृहातून विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवणाची सोय केली जात होती. ज्यांना याही वसतिगृहात राहणे आर्थिक दृष्टिकोनातून परवडत नव्हते

त्यांच्यासाठी प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग सारखी संस्था जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आली होती. सर्व समाजाच्या मुलांना एकाच वसतिगृहात ठेवून त्याचा शैक्षणिक विकास साधावा असा राजर्षिंचा विचार होता.

सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह कोल्हापूर येथे सुरू केले. परंतु त्या वसतिगृहामध्ये फक्त ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला गेला. या घटनेचा शोध-बोध घेतल्यानंतर शाहुंनी सर्व शुद्र मागासलेल्या जाती-जमातीसाठी वसतिगृहांची योजना हाती घेतली. समाजसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेने शाहुंनी त्या जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहे उपलब्ध करून देऊन शिक्षणाची संधी घेण्यास तयार ठेवावयाचे होते. त्या-त्या जमातीच्या पुढाऱ्यांना एकत्र करून शिक्षणातून स्वजातीचा आता तरी उद्धार करा असे सांगावयाचे होते. प्रत्येक जाती जमातीने आपले हित ओळखूनच ते कसे साध्य करावे, स्वप्रयत्नातून स्वहित साधण्याचा मार्ग त्यांनी दाखवून दिला. शिक्षणाच्या बाबतीत ज्या ज्या जाती मागे पडल्या आहेत त्यांना एकाच जातीचे मानून पिढ्यानपिढ्या पिछेहाट झालेल्या, अंत्यजापासून वंजाऱ्यापर्यंत सर्व समाजाला वर खेचण्याचा राजर्षिंचा मनापासून प्रयत्न होता. समाजमनावर जातीनिष्ठतेचा असलेला पगडा ओळखूनच त्यांनी शिक्षणासाठी जातवार वसतिगृहे काढण्यास प्रोत्साहन दिले.
सर्व जातीजमातीसाठी वसतिगृहे स्थापन करण्याचे खालील उद्देश होते.

१) समाजाच्या सर्व स्तरास वसतिगृहात्मक शिक्षणविषयक जागृती निर्माण करणे.
२) शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी कमी करणे.
३) दुय्यम व उच्च शिक्षणास वाव करून देणे.
४) शिक्षणासाठी वसतिगृहात राहण्याची आवड व सवय निर्माण करणे.
५) विद्यार्थ्यात स्वावलंबन सहिष्णुता देशप्रेम, सहकार्य इत्यादी गुण वाढीस लावणे.
६) जातिभेदाची भावना क्षीण करणे.
७) स्वप्रयत्नातून स्वतःचा विकास करण्यास उत्तेजन देणे.

या व्यापक जाणीवेमधून शाहू महाराजांनी वसतिगृहांच्या स्थापनेची चळवळ उभी केली. वसतिगृहांच्या निर्मितीमागे असलेल्या त्यांच्या राष्ट्रवादी प्रवृत्तीची प्रकर्षाने जाणीव होते.

**आरक्षण धोरणाचे जन्मदाते**

आधुनिक काळात सामाजिक प्रबोधनाची सुरुवात १९ व्या शतकात झाली. जोतीराव फुले यांनी भारतातील सामाजिक प्रबोधनास सुरुवात केली. फुलेंच्या मृत्यूनंतर सामाजिक कार्य छत्रपती शाहू महाराज यांनी सुरू ठेवले. शाहूंना देशातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक प्रश्नांची जाणीव होती. ब्राह्मणी व्यवस्था हीच खऱ्या अर्थाने सामाजिक प्रबोधनामधील अडथळा आहे. ही गोष्ट वेदोक्त प्रकरणामुळे त्यांच्या लक्षात आली. त्यामुळे वेदोक्त प्रकरणानंतर समाजात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक लोकोपयोगी कायदे केले. अज्ञानी व मागासलेल्या बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शाहू महाराज मोठ्या हिरीरीने अटीतटीने लढले.

ब्राह्मणांचा अहंकार, त्याची श्रेष्ठत्त्वाची भावना इत्यादी आणि ब्राह्मणी वर्चस्व यामुळेच भारताची सर्वच क्षेत्रात अधोगती झाले असल्याचे निदान त्यांनी केले. समाजातील दुर्बल घटकांचा तसेच वंचित समाजाचा विकास, मागासलेल्या लोकांच्या शिक्षणास उत्तेजन देणे आणि त्यांची प्रगती व्हावी या उद्देशाने त्यांनी मागासवर्गीय लोकांना कोल्हापूर संस्थानातील नोकऱ्यांमध्ये ५० जागा राखीव ठेवण्यात आल्यात. परंतु विशेष मागासलेल्या जातीत हे प्रमाण अपेक्षेप्रमाणे फलद्रूप झाले नाही. शाहू महाराजांच्या मागासलेल्या लोकांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय हा अतिशय क्रांतीकारी होता. शोषीत समाजाला शोषण करणाऱ्या समाजापासून आर्थिक संरक्षण देण्यासाठी राखीव जागा नोकरीत ठेवण्याचा निर्णय केला. सामाजिक समतेच्या दृष्टीने शाहूंनी टाकलेले हे क्रांतीकारी पाऊल होते.

बहुजन समाजाला शासन आणि प्रशासनात प्रतिनिधीत्व मिळावे आणि राज्यकारभारात सर्व जातीचा समावेश व्हावा व सर्व जातींना पूर्ण संधी मिळावी या हेतूने महाराजांनी आपल्या राज्यात निम्म्या जागा मागासलेल्या वर्गाकरिता राखून ठेवल्या. स्वतंत्र मतदार संघाची मागणी करून स्वतंत्र भारतात बहूजन समाजाच्या हाती राजकीय सत्ता देण्याचा प्रयत्न होता.

शाहू हे सामजिक लोकशाहीचे आधारस्तंभ. शाहू महाराजांनी समाजातील विषमतेवर आधारित असलेली ब्राह्मणी व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सामाजिक गुलामगिरीत खितपत पडलेल्या लोकांचा विकास करण्यासाठी अनेक जाचक कायदे

आणि परंपरा नष्ट केल्या. कोल्हापूर संस्थानातील महारांना वतनाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याची योजना त्यांनी आखली. महार वतनदारांच्या सनदी नोकर म्हणून नेमणूका केल्या. महार, मांग, रामोशी व बेरड या जातीवर लादलेली अमानूष अशा हजेरी पद्धतीचे त्यांनी निर्मुलन केले. तळागाळातील संपूर्ण लोकांची सामजिक गुलामीतून मुक्तता झाली पाहिजे. याचा त्यांनी विचार करून आरक्षणाचा निर्णय घेतला. विषम समाज व्यवस्थेत समता प्रस्थापित करण्याकरिता आरक्षण हाच योग्य तोडगा आहे.

**कृषिधोरण**

भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे. शेती विकास म्हणजे राष्ट्रविकास हा दृष्टिकोन शाहू छत्रपतींनी आयुष्यभर जोपासला होता. शेती हा येथील समाजाचा प्रमुख व्यवसाय होता. शेतीतून येणाऱ्या उत्पन्नात आपला चरितार्थ चालविणे समाजाला अशक्य बनत होते. त्यामुळेच सावकाराकडून काढलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली हा समाज पिचला होता. या समाजाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी उपाययोजना करणे महत्त्वाचे वाटू लागले. त्याचप्रमाणे बहुजनाचे दारिद्रय संपुष्टात यावे यासाठी शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात कृषि विकासाचे विविध प्रकल्प मोठ्या जिद्दीने राबविलेले दिसतात.

कृषिकर्म पवित्र आहे. ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्य जात उपजिवीका करते ते कृषिकर्म हलके अथवा वाईट असे मानने चुकीचे आहे. कृषिकर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख होऊन सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. असे त्यांचे शेतीविषयक विचार होते. शेतकऱ्यांशी जीवाभावाच्या गप्पा करीत असताना ते आपल्या चाणाक्ष डोळ्यांनी शेती आणि शेतकरी या दोन्हीचेही अभ्यासपूर्ण निरीक्षण करीत होते. त्यांच्या नजरेतून शेतकऱ्यांचे दारिद्रय व शेतीची दुरावस्थाही सुटत नव्हती. अज्ञान आणि दारिद्रय यामुळे शेतीची उत्पादकता कमी होत चालली होती. शेतीची उत्पादकता कमी असल्यामुळे शेतकरी दरिद्री होता. दारिद्रयाचे दुष्टचक्र नाहीसे करण्यासाठी नियोजनपूर्वक शेती सुधारणा हाच त्यावर रामबाण उपाय आहे. असा शाहू छत्रपतींचा ठाम विश्वास होता. शेती आणि शेतकरी यांच्यासंबंधी संशोधनाची कास धरल्याखेरीज आपल्या शेतकरी प्रजेचे दारिद्रय नष्ट होणार नाही. या विचारातूनच त्याच्या मनात विविध प्रकल्प येऊ लागले. नवनवीन बी-बियाणे, खतांचा वापर, पाणी पुरवठ्याच्या योजना, शेतकऱ्यांना स्वस्त दराने पतपुरवठा, शेतमजूर आणि गरीब शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला, शेतीला पूरक असणारे जोडधंदे, शेती मालाची किफायतशीर खरेदीविक्री, शेती प्रदर्शने अशा असंख्य प्रकारच्या योजना शाहूंच्या मनात आकार घेत होत्या.

शाहू महाराजांनी शेतीच्या व्यवसायातील प्रचलित पद्धतीमध्ये आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्याकडे लक्ष पुरविले. एवढेच नव्हे तर, शेतीमध्ये नवीन तऱ्हेच्या पिकांची लागवड करण्यावर विशेष भर दिला. भात, ज्वारी, मका, बाजरी या पारंपारिक पिकांपेक्षा नवीन नगदी पिके घेऊन लोकांच्या उत्पन्नात वाढ करावी. काही भागात नवीन रोजगार उपलब्ध होईल या हेतूने महाराजांनी कॉफीची लागवड केली. तसेच काही ठिकाणी चहा, वेलदोडे, देवकापूस, तंतू वनस्पती या नवीन पिकांच्या मळ्यांच्या लागवडीचे प्रयोग करण्यास प्रारंभ केला. कृषि व्यवसायामध्ये नवीन पिकांची लागवड करण्याबरोबरच त्याला पुरक अशा अन्य सुविधा पुरविण्याकडेदेखील छत्रपती शाहू महाराज यांनी लक्ष पुरविले. त्यासाठी त्यांनी शेती मालाच्या उठावासाठी शाहुपुरी ही वसाहत स्थापन केली.

तसेच शेतीतील नवीन सुधारित तंत्र शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याच्या हेतूने छत्रपती शाहू महाराज यांनी 'दि किंग एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टिट्युशन' या नावाच्या शेती संस्थेची स्थापना केली. या संस्थेतील अधिकाऱ्यांमार्फत खेडोपाडी शेतीसाठी उपयुक्त नवीन लोखंडी उपकरणे आणि सुधारित खते यांचा प्रचार केला. भारतीय शेती ही पावसावर अवलंबून आहे. तसेच दुष्काळाचे कायमचे उच्चाटन व्हावे या उद्देशाने शाहू महाराजांनी शेतीला कायमचा व पुरेसा पाणी पुरवठा करण्याकरिता कालवे खोदणे, जुन्या तलावाची बांध-बंदिस्ती करणे, नवीन तलाव बांधणे यासारख्या योजना राबविण्यास सुरुवात केली. त्यांना असे वाटत होते की, आपल्या देशातील लोकांनी जुन्या शेती पद्धती ऐवजी सुधारलेल्या शेतीशास्त्राचा आणि अवजारांचा अवलंब केला पाहिजे. सुधारलेले तंत्रविज्ञान शिकण्याच्या दृष्टीने कारागीरांनी पुढे आले पाहिजे.

**शिक्षणविषयक धोरण**

छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्रयाचे जीवन जगत होते. राजर्षिंनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चय केला. बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक

शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती होणार नाही. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. अशी छत्रपती शाहूंची विचारसरणी होती.

नवसमाजनिर्मितीसाठी प्रत्येकास शिक्षण दिले पाहिजे ही समतावादी भूमिका त्यांनी पत्करली. शिक्षणप्रसाराशिवाय सर्व समाजात सांस्कृतिक आणि वैचारिक अभिसरण सुरू होणार नाही असा त्यांना दृढ विश्वास होता. शिक्षणाच्या पायावरच सर्व समाजाची उन्नती करता येईल या गोष्टीचे भान ठेवूनच राजर्षिंनी आपल्या काळात सार्वत्रिक आणि सक्तीच्या शिक्षणाचा पुकारा केला. कारण शिक्षणाशिवाय सारा समाज अनर्थाच्या वाटेवरील वाटसरुसारखा भटकत राहील. शिक्षणाशिवाय सारा समाज मतिहीन होईल, नीतीभ्रष्ट होईल, गतिहीन होईल आणि कायमचा खचून जाईल म्हणून त्यांनी सर्वांसाठी शिक्षणाची सोय केली. त्यांचे शिक्षणविषयक विचार अत्यंत मौलिक आणि क्रांतीकारक होते. वैयक्तिक पातळीपासून सामाजिक राष्ट्रीय पातळीपर्यंत त्यांचे शिक्षणविषयक विचार होते. मानवाचे सर्वार्थाने आधुनिकीकरण हाच त्यांच्या शैक्षणिक विचारांचा मूळ गाभा होता. त्यांच्या शिक्षणाविषयक विचारांना वास्तवतेचा आणि उपयुक्ततेचा स्पर्श होता.

राजर्षि शाहू महाराज मोठे समाजचिंतक होते. त्यांच्या शिक्षणविषयक मौलिक चिंतनात शैक्षणिक कार्याचे मूळ कंद दिसून येतात. जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री–पुरुषास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध, एकजीव आणि बलवान होऊ शकत नाही. याविषयी त्यांना पूर्ण विश्वास वाटत होता. यासाठी सर्वप्रथम सर्व समाजाला शिक्षणाची गरज आहे. या गोष्टीवर सर्वाधिक जोर दिला. शिक्षणास ते मानवी गुंतवणूक मानत असत. त्यांना केवळ शिक्षणासाठी शिक्षणप्रसार करावयाचा नव्हता. शिक्षणातून कर्तबगार माणसांची नवी पिढी त्यांना निर्माण करावयाची होती. स्वातंत्र्याविषयी लोकांच्या मनात नव्या ऊर्मी–ऊर्जा निर्माण करावयाच्या होत्या. शिक्षण हे एक संस्कारक्षम आणि नवनिर्मितीक्षम सुत्र आहे हे त्यांनी जाणले होते.

राजर्षिंना दीन दुबळ्या, हीन–दीन, दुर्बल–दुर्मुख आणि दलित–दुर्लक्षित समाजाला शिक्षणातून सबळ, समर्थ, सिद्ध आणि समृद्ध करावयाचे होते. त्यांना समाजातील प्रत्येक माणसाचे मन शिक्षणाच्या साधनाने बदलून टाकावयाचे होते. या दूरदृष्टीच्या शाहुंनी आपल्या कारकिर्दीत गुणवत्ता असलेला एकही तरुण दृष्टिआड केला नाही. महार, मांग, चांभार, ढोर, कैकाडी, फासेपारधी, रामोशी आणि न्हावी समाजातील सर्वांना आपल्या हाताशी धरून शिक्षण दिले. त्यांना शिक्षणातून सर्व समाजाला जाणते करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी आपला राजदंड सार्वत्रिक, सार्वजनिक शिक्षणासाठी अंमलात आणला.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महत्त्व दिले. गावाचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी त्यांनी पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरू केले. शैक्षणिक प्रगतीत शिक्षक घटक महत्त्वाचा असल्याने या शिक्षकासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. आपल्या देशातील विषमतेचे कारण त्यांनी ओळखले होते. अज्ञान हेच दारिद्र्याचे आणि विषमतेचे मूळ आहे, हे जाणून अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाची गंगा त्यांनी आपल्या गोर–गरीब रयतेच्या दारापर्यंत नेली. छत्रपती शाहू महाराजांच्या या शैक्षणिक कार्याचे सूत्र मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे जाणारे खाजगी हितसंबंधाकडून सार्वजनिक कल्याणाकडे नेणारे व जातीभेद विषमता यांनी ग्रासलेल्या समाज जीवनाला समानतेच्या पातळीवर आणणारे होते.

## निष्कर्ष

सर्वसामान्य, वंचित व बहुजन समाजातील व्यक्तींना शिक्षणाचे हक्क मिळवून देण्याचे काम राजर्षि शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केले. त्यासाठी वंचित घटकांसाठी वसतिगृहे उभी केली, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग सारख्या संस्थेची स्थापना करून सामाजिक एकी करण्याचा आणि वंचित व बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

आर्थिक व सामाजिक विषमता कमी करण्यासाठी तसेच शोषित समाजाला शोषण करणाऱ्या समाजापासून आर्थिक संरक्षण देण्यासाठी नोकरीमध्ये आरक्षण आणि राज्यकारभारात भाग घेता यावा यासाठी राखीव मतदार संघाच्या आरक्षणाचे धोरण कोल्हापूर संस्थानात जगात सर्वप्रथम या लोकाभिमुख राजाने प्रथमतः केल्याचे दिसून येते.

दुष्काळामुळे तसेच शेतीमधील दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदण्यासाठी शेतकऱ्याची आर्थिक उन्नती होणे आवश्यक असल्याचे शाहू महाराजांना दिसून आले. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांनी संशोधनाची कास धरावी. आपल्या शेतीत नवनवे प्रयोग करावेत, सुधारित बियाणे, खते, अवजारे व तंत्रज्ञान यांचा वापर करावा यासाठी ते प्रयत्नशील राहिल्याचे दिसून येते.

बहुजन समाजाची आर्थिक प्रगती व्हावी या दृष्टीने तसेच दुष्काळावर कायमस्वरूपी मात करता यावी यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात कालवे खोदणे, तलाव बांधणे इ. लोकोपयोगी सामजिक कार्य अखंड भारतात फक्त कोल्हापूर संस्थानानेच केल्याचे दिसून येते. विशेष महत्त्वाची बाब मुबलक बारमाही पाण्याची सोय व्हावी यासाठी राधानगरी धरणाची निर्मिती शाहू महाराजांनी केल्याचे दिसून येते.

कृषीच्या बाबतीत शाहू महाराज अधिक संवेदनशील असल्याचे दिसून येते. कारण त्यांच्या मते शेती करणे हे काम शुद्र किंवा हलक्या दर्जाचे नसून ते अतिशय उच्च दर्जाचे आहे. कारण कृषिकार्यामुळे शेतकरी स्वतः सुखी होऊन समाजालाही सुखी करते इतके त्यांचे शेतीबाबत उदात्त स्वरूपाचे विचार होते.

वंचित व बहुजन समाजाला समानतेच्या पातळीवर आणण्यासाठी शिक्षणाच्या बाबतीत शाहू महराज अधिक सकारात्मक असल्याचे दिसून येते. कारण त्यांच्या मते, जोपर्यंत सर्व समाज साक्षर होत नाही तोपर्यंत तो समाज बलवान व एकजीव होऊच शकत नाही असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच शाहू महाराज शिक्षणाला गुंतवणूक मानत असत. सध्याच्या कालखंडात शाहू महाराजांच्या विचारानेच शैक्षणिक धोरण ठरविणे आवश्यक आहे.

## संदर्भ सूची

१) https://en.m.wikipedia.org.wiki>shahu
२) www.culturalindia.net-Reformers
३) डॉ. संगवे विलास (१९९७), शाहू छत्रपती, प्रकाशक शाहू रिसर्च इन्स्टिट्युट १९९४.
४) डॉ.जाधव रमेश – लोकराजा शाहू छत्रपती – प्रकाशक, सुरेश एजन्सी २०५, शुक्रवार पेठ, कोल्हापूर.
५) प्राचार्य भगत रा.तु. – राजर्षि शाहू छत्रपती जीवन व शिक्षणकार्य – प्रकाशक रीया पब्लिकेशन्स, २०५ ब, ३०, शीतल बंगला, नागाळा पार्क, कोल्हापूर.
६) प्रा.साळुंखे नानासाहेब – शाहूंच्या आठवणीत – वृषाली प्रकाशन, ४२/२, मनिषानगर, रिंगरोड, कोल्हापूर.

# भारतीय ज्ञानकेंद्राचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**प्रा.रा.सु.गडकरी**
ग्रंथपाल,
र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड.

**सारांश -**

आपल्या देशामध्ये विविध संस्था हया राष्ट्र उभारणीचे कार्य करीत आहेत. यात प्रामुख्याने शाळा, महाविदयालये, विदयापीठे, संशोधन संस्था, औदयोगिक, वैज्ञानिक कृषी संस्था इ. सर्व संस्थांचे मोलाचे योगदान आहे. त्याच बरोबर ग्रंथालयांचे ही योगदान अनन्यसाधारण आहे. अध्ययन, अद्यापन व संशोधन ही शैक्षणिक कार्य पूर्ण करण्यासाठी ग्रंथालये महत्त्वाची भूमिका निभावतात. निरंतर शिक्षण, दूरशिक्षण, तसेचं मुक्त शिक्षण पध्दतीमध्ये ग्रंथालयांना विशेष महत्त्व आहे. ग्रंथालयामध्ये माहितीच्या साधनांचा संग्रह केला जातो. त्यावर प्रक्रिया करून तो वाचकांसाठी उपलब्ध केला जातो. यासाठी ग्रंथ, नियतकालिके, हस्तलिखिते, प्रबंध, दृकश्राव्य साधने इत्यादी माहिती साधनांचा संग्रह ग्रंथालये करीत असतात. आधुनिक युगामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे. त्यामुळे ग्रंथालयही डिजिटल स्वरूपाचे साहित्य उपलब्ध करून देत आहेत. ई-बुक, ई-जर्नल तसेचं विविध विषयांवरील डेटाबेस आज उपलब्ध झालेले दिसतात. संशोधकांना माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाने कोणत्याही ठिकाणी कोणत्याही वेळी माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे ग्रंथालयांचे स्वरूप ग्रंथालयापुरते मर्यादित न राहता ते ज्ञानकेंद्र म्हणून उदयास येत आहे. भारतीय ज्ञानकेंद्राचा थोडक्यात आढावा या लेखामध्ये घेण्यात आला आहे. यामध्ये राष्ट्रीय ग्रंथालय कोलकता, NDL of India, INFLIBNET, N-list, e-shodhshindu, ई-पीजी पाठशाळा, शोधगंगा इत्यादी संस्थांचे भारताच्या विकासातील योगदानावरचे विवेचन करण्यात आलेले आहे. या संस्थांचे उद्देश, कार्य, ज्ञानसाहित्य संग्रह इ. बाबींचा आढावा घेण्यात आला आहे.

**कि-वर्ड** -राष्ट्रीय ग्रंथालय कोलकाता, NDL of India, INFLIBNET, N-list, e-shodhshindu, ई-पीजी पाठशाळा, शोधगंगा.

**प्रस्तावना -**

समाजाची विविध अंगे व त्यांच्यामध्ये होत असलेली विकासाची प्रक्रिया आपण पाहतो. त्यामुळे मानवी जीवन हे विविध क्षेत्रामध्ये प्रगत होताना दिसत आहे. सध्याचे युग हे अतिशय वेगवान असून माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये झालेल्या संशोधनामुळे अधिकच गतिमान झालेले आहे. ज्ञानाच्या विविध क्षेत्रे विस्तारत आहेत. तंत्रज्ञानामध्ये झालेल्या क्रांतीमुळे आजचे ज्ञान उदया जुने झालेले दिसते. काळाबरोबर चालणे व आपले अस्तित्व सक्षम करणे आवश्यक असते. आपण प्रामुख्याने विचार करणार आहोत तो ग्रंथालयांचा. प्राचीन काळापासून अस्तित्वात असणारी ग्रंथालये आणि त्यांच्याकडे असलेले ज्ञान साहित्य. त्याचे जतन करणे व ते पुढील पिढीकडे सुपूर्द करणे अशी पूर्वी ग्रंथालयांची प्रतिमा होती. आधुनिक युगामध्ये कालानुरूप केलेले माहिती तंत्रज्ञानाचे प्रभावी उपयोजन हे ग्रंथालय विकासासाठी महत्त्वाचे संक्रमण आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालयांनी आपल्या सेवा व सुविधांचा विकास केलेला दिसतो. त्यामुळे आजचे ग्रंथालयाचे स्वरूप हे ज्ञान केंद्र असे झाले आहे. प्रामुख्याने वाचनालय - ग्रंथालय - माहिती केंद्र - ज्ञानकेंद्र असा प्रवास झालेला आपण पहात आहोत. भारताच्या विकासामध्ये या ज्ञान केंद्राचे योगदान महत्त्वाचे आहे. देशाच्या बौध्दिक विकासासाठी अनेक ज्ञान संस्था कार्य करताना दिसतात. त्यातील काही संस्थांचा आढावा आपण घेणार आहोत.

**भारतातील ज्ञानकेंद्रे -**

आपल्या देशामध्ये शिक्षणाची मोठी परंपरा आहे. प्राचीन काळापासून शिक्षणाचा प्रवाह निरंतर वाहत आहे. प्राचीन काळी गुरूकुल शिक्षण पध्दती अस्तित्वात होती. गुरू शिष्य परंपरा असे तिचे स्वरूप होते. ज्ञानार्जनासाठी विदयार्थी गुरूकुलामध्ये प्रवेश घेत व ज्ञान मिळवित. नालंदा, तक्षशीला अशी जगविख्यात विदयापीठे आपल्या देशामध्ये होती. अनेक देशातील विद्वान शिक्षणासाठी भारतात येत होते. आजच्या युगामध्येही भारतात उच्च दर्जाची शिक्षण यंत्रणा कार्यरत आहे. शालेय शिक्षणापासून ते उच्चशिक्षणापर्यंतच्या सोयी आज सर्वत्र उपलब्ध आहेत. प्राथमिक विद्यालये ते विद्यापीठे ज्ञानार्जनाचे कार्य करीत आहेत. तसेचं या संस्था ज्ञान संवर्धनाचे, निर्मितीचे, प्रसाराचे कार्य करीत आहेत. अध्ययन, अध्यापन व संशोधन हया महत्त्वाच्या शैक्षणिक कार्यामध्ये ग्रंथालयाचे योगदान महत्त्वाचे आहे. निरंतर शिक्षण, दूरशिक्षण आणि मुक्त शिक्षण पध्दतीमध्ये ग्रंथालयांना विशेष महत्त्व आहे. या शिक्षण पध्दतीमध्ये वाचनसाहित्य आणि पर्यायाने ग्रंथालय हेच शिक्षणाचे प्रमुख साधन असते. नवीन ज्ञान देणे, कौशल्ये विकसित करणे, दृष्टीकोन विकसित करणे, मुल्ये व त्यांचे महत्त्व सांगणे इ. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ग्रंथालयांची महत्त्वाची भूमिका असते. आपण पाहतो की, ग्रंथालयांनी आपले सेवा व सुविधांमध्ये दर्जात्मक व गुणात्मक विकास केला आहे. पारंपारिक सेवांबरोबरचं ग्रंथालये आधुनिक माहितीच्या सेवा देत आहेत. त्यामुळे त्यांचे स्वरूप हे ज्ञानकेंद्र असे झालेले दिसते.

**ज्ञानकेंद्राची कार्ये –**

1.संशोधकासाठी आवश्यक माहिती पुरविणे.

2.अध्यापकांना, संशोधकांना त्यांच्या विषयातील ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी ज्ञान साहित्य पुरविणे.

3.उपभोक्त्यांना आनंद, आत्मशोध, व्यक्तिगत विकास इ. माहितीची साधने पुरविणे.

4.प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माहितीची साधने उपलब्ध करणे व माहितीच्या सेवा देणे.

5.संशोधनाचा वेग व गुणवत्ता वाढविण्यासाठी मदत करणे.

6.डिजीटल स्वरूपातील ज्ञान साहित्याची निर्मिती करणे व उपभोक्त्यांना उपलब्ध करून देणे.

इत्यादी कार्ये ज्ञान केंद्रे करीत असतात. आपले देशातील बहुतांश विद्यापीठ ग्रंथालये, संशोधन ग्रंथालये ही ज्ञान केंद्र म्हणून कार्यरथ आहेत. आपण प्रमुख ज्ञान केंद्राचा आढावा घेणार आहोत. या ज्ञान केंद्रामध्ये ग्रंथ, नियतकालिके, हस्तलिखिते, ई-बुक्स, ई-जर्नल, डिजिटल साहित्य, डेटाबेस इ. संसाधने असतात. खालील ग्रंथालयांचा आपण विचार करणार आहोत. ही ग्रंथालये प्रामुख्याने भारतातील ज्ञान केंद्रे म्हणून उदयाला येत आहेत.

**1. राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकाता –**

भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय हे कोलकाता येथे असून इ.स. 1836 साली स्थापन करण्यात आले. सुरूवातीस कलकत्ता पब्लिक लायब्ररी म्हणून स्थापन झालेले व त्यानंतर इ.स. 1891 मध्ये इंपिरियल लायब्ररीची स्थापना कलकत्ता येथे झाली. इ.स. 1902 मध्ये लॉर्ड कर्झन याने दोन्ही ग्रंथालयाचे विलीनीकरण केले व इ.स. 1903 मध्ये ते जनतेच्या उपयोगासाठी खुले करण्यात आले. भारत स्वतंत्र्य झाल्यानंतर इ.स. 1948 मध्ये भारत सरकारने इम्पिरियल लायब्ररीचे 'राष्ट्रीय ग्रंथालय' असे नामकरण केले. त्यानंतर चार वर्षाच्या प्रयत्नांनी अनेक सुधारणा करण्यात आल्या व 1 फेब्रुवारी 1953 पासून ग्रंथालय जनतेसाठी औपचारीकरीत्या सुरू केले गेले. त्यावेळचे शिक्षण मंत्री अब्दुल कलाम आझाद यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.

हे ग्रंथालय भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अखत्यारीत कार्य करते. ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी 'कौन्सिल फॉर नॅशनल लायब्ररी' कडे आहे. या ग्रंथालयात जवळजवळ 30 लाख ग्रंथ व इतर ज्ञान साहित्य आहे. या हस्तिलिखित, डिजिटल साहित्य, मायक्रोफिल्म, वृत्तपत्रे, नियतकालिकांचे बांधीव अंक इत्यादी साहित्य आहे. हे ग्रंथालय देशातील प्रमुख ग्रंथालय म्हणून कार्य करते. भारतामध्ये प्रकाशित झालेले सर्व साहित्य मिळविणे, संग्रह करणे, देशातील ग्रंथालयाचे प्रतिनिनिधीत्व करणे त्यांच्या मध्ये ग्रंथालयाचे जाळे तयार करणे, आंतरग्रंथालयीन सेवा देणे, सांघिक तालिका तयार करणे, देशाची राष्ट्रीय ग्रंथ सूची तयार करणे इत्यादी महत्त्वाची कार्ये राष्ट्रीय ग्रंथालय करते. भारतातील सर्व नागरिकांना या ग्रंथालयाचे सभासदत्व घेता येते. राष्ट्राच्या उभारणीमध्ये राष्ट्रीय ग्रंथालयाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

**2. नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया**

मानव संसाधन विकास मंत्रालयाने त्यांच्या माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या माध्यमाने शिक्षण या राष्ट्रीय शिक्षण अभियानातंर्गत नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया या मार्गदर्शी प्रकल्पाची सुरूवात दि. 6 एप्रिल 2015 रोजी केली. यामधून डिजिटल ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली आहे. जगभरातील डिजिटल स्वरूपातील साधनांचा संग्रह केला आहे. तसेच संसाधनांचा शोध घेण्यासाठी प्रगत शोध सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. कमीत कमी प्रयत्नांमध्ये कमीत कमी वेळेमध्ये योग्य माहितीचा शोध घेता येतो.NDL India मध्ये भारतातील प्रमुख भाषेतील सामग्री ठेवण्यासाठी रचनात्मक आराखडा तयार केला आहे.

शिक्षणाद्वारे समता व संधीचे समर्थन व सक्षमीकरण करण्यासाठी देशभरातील डिजीटल ज्ञानाची संपत्ती NDL India एकत्रित करते. तसेच कोणत्याही ठिकाणी अध्ययन करणाऱ्यांना एक समृद्ध, उपयुक्त आणि विश्वासार्य डिजिटल ज्ञानाचा स्त्रोत प्रदान करण्याचा प्रयत्न करते. त्याबरोबर डिजिटल साक्षरतेला चालना देण्याचे कार्य केले जाते. राष्ट्रीय डिजीटल लायब्ररी ही शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, शिक्षक, विद्यार्थी, व्याख्याते, दिव्यांग विद्यार्थी आणि ज्यांना शिकण्याची इच्छा आहे अशा प्रत्येकासाठी एक व्यासपीठ म्हणून कार्य करते. विद्यार्थ्यांना कोणत्याही ठिकाणी इ-लर्निंगची सोय करण्यासाठी ग्रंथालय कार्य करीत आहे.

NDL India मध्ये डिजीटल स्वरूपातील 7 लाख ई बुक्स, 3 लाख ई जर्नल, 95000 अधिक प्रबंध तसेच दृक व श्राव्य साधने आहेत. याचा वापर करता येतो. ही साधने ऑनलाईन पाहता, वाचता येतात तसेच डाउनलोड करण्याची सोय करण्यात आली आहे. NDL India हे भारतातील प्रगत डिजीटल ज्ञानकेंद्र आहे.

**3. INFLIBNET (इनफ्लिबनेट)**

इनफ्लिबनेट ची स्थापना विद्यापीठ अनुदान आयोगाने इ. स. 1991 मध्ये केली. हे युजीसीचे एक स्वायत्त आंतर विद्यापीठीय केंद्र आहे. हे केंद्र सुरवातीला राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत परियोजना म्हणून सुरू करण्यात आले होते. त्यानंतर जून 1996 रोजी हे स्वायत्त केंद्र म्हणून कार्य करू लागले. INFLIBNET अंतर्गत देशातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन व विकास संस्था व इतर महत्वाच्या संस्थांची ग्रंथालये एकमेकांना जोडण्याचे काम केले जाते.

1. उद्दिष्टये - देशान्तर्गत ग्रंथालये आणि माहिती केंद्राचे जाळे (नेटवर्क) प्रस्थापित करणे व माहिती हाताळण्याची शक्यता निर्माण करणे
2. युनियन कॅटलॉगच्या माध्यमाने पुस्तके व इतर साहित्याबद्दलची माहिती पुरविणे व ती मिळण्याची शक्यता निर्माण करणे.
3. आंतरराष्ट्रीय स्तरावरील डेटाबेस ऑनलाईन तत्वावर उपलब्ध करून देणे.
4. वेगवेगळया विषयांवर त्यात काम करणाऱ्या समृध्द संस्थेच्या मदतीने विस्तृत ग्रंथसंग्रह तयार करणे.
5. तालिकीकरण सहकार्य व आंतरग्रंथालयीन देवाणघेवाणीस प्रोत्साहन देणे.
6. ग्रंथालय संगणकीकरण करणे व त्यात एकजिनसीपणा आणून त्यासाठी मानके तयार करणे.
7. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, संशोधक, समाजशास्त्र शास्त्रज्ञ, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यात परस्पर सुसंवाद सेवा देणे.
8. ऑन लाईन पध्दतीवर माहिती सेवा देणे.
9. ग्रंथालय - ग्रंथालय अंतर्गत सहकार्य वाढविणे.
10. ग्रंथालयाच्या संगणकीकरणात उपयुक्त अशी एकात्मिक संगणकप्रणाली बनविणे.

**4. ई पीजी पाढशाला –** मानव संसाधन विकास मंत्रालयाने आयसीटीच्या माध्यमाने शिक्षण या राष्ट्रीय शिक्षण अभियानार्तगत ई-पीजी पाठशाळा उपक्रम युजीसी मार्फत राबविली जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत सामाजिक विज्ञान, कला, ललित कला, मानव्यकी, नैसर्गिक विज्ञान, गणित, भाषा, भाषा विज्ञान, इ. विविध विषयांमध्ये गुणवत्ता, अभ्यासक्रम आधारीत परस्पर संवादी ज्ञान सामग्रीचा विकास केला जात आहे. यात पदवीत्तर स्तरावरील 77 विषयांमधील ई सामग्रीचा विकास केला आहे. यात 18000+ e text, 16000+Video, 3200+ Experts, 30000+Quiz इ. ज्ञान सामग्रीचा समावेश आहे.पदवीत्तर स्तरावरील अध्ययन, संशोधनासाठी अत्यंत महत्वाचा ज्ञान स्त्रोत आहे.

**5. शोधगंगा –** शोधगंगा हे भारतीय विद्यापीठाद्वारे सादर केलेल्या प्रबंधाचे एक डिजीटल भांडार आहे. हे केंद्र विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्वायत्त आंतर विद्यापीठीय केंद्र म्हणून कार्यरथ आहे. या केंद्रामार्फत भारतातील विद्यापीठांना पी. एचडी व एम. फिल. तसेच महत्वाच्या शोधनिबंधाचे व प्रबंधाचे ई-स्वरूपात एकत्रिकरण करण्यात आले आहे. युजीसीने शोधगंगा या रेपॉजिटरीची स्थापना जून 2009 मध्ये केली. भारतातील सर्व विद्यापीठांनी पी.एचडी प्रबंधाची व एम. फीलचे शोधनिबंध यांची सॉफ्टकॉपी देण्याचे युजीसीचे नियमाने बंधनकारक करण्यात आले. त्यामुळे संधोधकांना स्वःतचा प्रबंध यामध्ये संग्रहीत करता येतो व कोणत्याही विद्यापीठाचा प्रबंध पाहता येतो, वाचता येतो. यामुळे या संग्रहाची संशोधनात्मक गुणवत्ता वाढली आहे. तसेच प्रगत शोध सुविधांची सोय उपलब्ध आहे.

दि. 4 ऑक्टोबर 2016 रोजी भारतातील 293 विद्यापीठांनी शोधगंगा प्रकल्पात सहभागी होण्यासाठी INFLIBNET केंद्राशी सामंजस्य करास केला आहे या केंद्राअंतर्गत भारतीय प्रबंधाचा पूर्ण मजकुर जगभरातील शैक्षणिक समुदायापर्यत उपलब्ध करण्यात आला आहे. आज रोजी पर्यत 357 विद्यापीठे व सी एफ टी आयसंस्था 13 यामध्ये सहभागी आहेत.

**6. N-List** - नॅशनल लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सव्हिसेस इन्फास्ट्रक्चर ऑफ स्कॉलररी कंटेट या प्रकल्पाची सुरवात. युजीसी-इन्फोनेट डिजिटल लायब्ररी कन्सोर्टियम, INFLIBNET सेंटर आणि इ-डेस्ट एआयसीटीई कन्सोर्टियम यांचे संयुक्त विद्यामानेने झाली आहे.

या प्रकल्पामध्ये विशेषता 12B/2F शासकीय, अनुदानित महाविद्यालये तसेच विनाअनुदानित महाविद्यालये यांचा समावेश करण्यात आला आहे. भारतातील जवळपास 3204 महाविद्यालयांनी ही सुविधा घेतलेली आहे.

वार्षिक वर्गणीवरून याचे सभासदत्व घेता येते. या प्रकल्पांतर्गत 6000+ ई जर्नल, 31,35,000+ ई बुक्स, उपलब्ध करण्यात आली आहेत याचा वापर उपभोक्ते करू शकतात. तसेच प्रत्येक उपभोक्तासाठी युजर आयडी व पासवर्डची स्वतंत्र सोय करण्यात येते. यातील साहित्य ऑनलाईन वाचता येते तसेच डाउनलोड करता येते.

**7. ई-शोधसिंधु** - MHRD चे तज्ञ समितीच्या शिफारशी नुसार ई-शोधसिंधु कन्सोर्टियमची स्थापना केली आहे. या प्रकल्पामध्ये तीन कन्सोर्टियम एकत्रिकरण करण्यात आले आहे. यामध्ये UGC- INFONET, DIGITAL LIBRARY CONSORTIUM, N-LIST , INDEST- AICTE यांचा समावेश आहे.

खास करून भारतातील विद्यापीठे, तसेच केंद्रसरकार अनुदानित तंत्रज्ञान संस्था उदा. IIT, IIM, त्याचबरोबर, तंत्रविज्ञान महाविद्यालयांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये 230 विद्यापीठे, 94-CFTI, 3000+ तंत्र महाविद्यालये, तंत्रज्ञान संस्था यांनी सभासदत्व घेतले आहे. या प्रकल्पाअंतर्गत 15000 ई जर्नल, 16 डेटाबेस व 31,35,000+ ई बुक्स, उपलब्ध केले आहे. प्रगत शोध सुविधेसह हे साहित्य ऑनलाईन वाचता येते व डाउनलोड करता येते.

**समारोप**

आधुनिक युगामध्ये तंत्रज्ञानाचा प्रगतीमुळे ज्ञान साहित्य प्रचंड प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. तसेच हे साहित्य सहज वापरता येते. दर्जेदार व गुणात्मक ई संसाधनाचा वापर संशोधक इंटरनेटच्या सहायाने करतात. कन्सोर्टियमच्या माध्यमातून हे ज्ञानसाहित्य शाळा महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्थांना त्यांचे शैक्षणिक काम करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. ई संसाधना मुळे यांचा वापर सर्वदूर होत आहे. काही संशोधनात्मक संसाधने हे महागडी असतात. ती सर्व महाविद्यालयांना घेणे शक्य होत नाही. त्यामुळे एकत्रित प्रकल्पांमुळे ही संसाधने युजीसीच्या प्रयत्नांने सर्व महाविद्यालयांना कमी खर्चात उपलब्ध होत आहेत. याचा उपभोक्ते वापर करत आहेत. तसेच याचा किती वापर झाला याबाबत डेटा ही माहितीकेंद्रे उपलब्ध करून देतात. या ज्ञानकेंद्राची माहिती सर्वांना व्हावी यांचा वापर अधिकाधिक संशोधकांनी करावी या दृष्टिकोनातून थोडक्यात माहितीच्या देण्याचा प्रयत्न केला आहे.हया संस्था ज्ञान संवर्धन विकास व प्रसार करतात. देशाची बौधिक संपदा संशोधकांना उपलब्ध करून देतात. यांचे योगदान अन्य साधारण आहे.

**संदर्भ -**


1. डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश (2008) संपा. कोण्णूर एम. बी, कोण्णूर सुजाता, आणि माणगांवकर उषा:प्रभा ं, डायमंड पब्लिकेशन्स, पूणे.
2. संगणक शब्दकोश (2011) संक. सप्रे मधुकर, डायमंड पब्लिकेशन्स, पूणे.
3. ग्रंथालय संदर्भ सेवा : तात्विक व प्रात्यक्षिक (2003) साखरे राजेंद्र रमाकांत, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
4. नरगुंडे रवेती, (2007) ग्रंथालये आणि सामाजिक विकासः युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
5. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण (2010) फडके द. ना. युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
6. लोकराज्य, वाचनः एक अमृतानुभव जून- जूलै 2011 माहिती व जनसंपर्क महासंचालनायल, मुंबई.
7. http://inflibnet.ac.in
8. http://epgp.inflibnet.ac.in/index.php
9. http://shodhganga.inflibnet.ac.in
10. https://www.inflibnet.ac.in/ess/techinst.php
11. http://www.nationallibrary.gov.in
12. https://ndl.iitkgp.ac.in
13. http://nlist.inflibnet.ac.in
14. https://www.ugc.ac.in


ISSN 2349-638X
www aiirjournal.com

## राष्ट्र बांधणी मधील भारतीय सैन्यदलाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**-रीना रामचंद्र कांबळे**
संशोधक विद्यार्थीनी,समाजशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**१) गोषवारा :-**

'सर सलामत तो पगडी पच्चास' या हिंदी मुहावरानुसार देश सुरक्षित असेल तर देशाचा सर्वांगिण विकास होऊ शकतो. यासाठी भारतीय सैन्यदल नेहमी तत्परतेने आपली भूमिका पार पाडत आला आहे. १९६५, १९७१ युद्ध असु दे, किंवा सीमा भागावरील लष्करी कारवाया असु दे भारतीय सैन्य दल नेहमी शौर्याने धाडसाने भारत भुमीचे रक्षण करत आला आहे. यांच्या रक्षणामुळे देशाचा सर्वांगीण विकास सहज साध्य झाला आहे. १.४ दशलक्ष सैन्य भारताच्या रक्षणासाठी कार्यरत आहे. त्यांचे राष्ट्र संरक्षण, सीमा व्यवस्थापन, अंतर्गत सुरक्षा ही राष्ट्र बांधणी मधील भूमिका अत्यंत महत्वाची आहे त्याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधातुन घेतला आहे.

**शिर्षक शब्द :-**सैन्यदल, राष्ट्र बांधणी, सीमा व्यवस्थापन.

२) **प्रस्तावना :-** मानवाची निर्मीती झाली तेव्हा मानव निसर्गात मुक्त होता. पण जेव्हा मानव आपापसात संघर्ष करू लागला तेव्हा हा संघर्ष सोडविण्यासाठी राज्य निर्माण झाले. राज्याची शक्ती म्हणून सैन्यदल पुढे आले सुमारे ६ लाख वर्षांपूर्वीच्या काळापासून भारतात युद्ध कोणत्या ना कोणत्या स्वरूपात होत होती. शत्रुचा पराभव करणे, दुसऱ्याचे साम्राज्य जिंकून आपली साम्राज्य सीमा विस्तृत करणे, गोधन स्त्री अपहरण झाले तर ते परत मिळवण्यासाठी युद्धे होत होती. रामायण, महाभारत काळात मोठी युद्धे झाली याचे पुरावे आपणांस पाहावयास मिळतात.

युद्ध परंपरा जशी पुरातन आहे तसा सैन्यदल ही पुरातन आहे. वेदकाळात अष्टबळ, षट्बळ आणि चतुरंगं बळ असे सैन्यदल होते. क्षत्रिय नव्हे तर ब्राम्हण व इतर वर्गातील लोकांना युद्ध कला शिकवली जात होती. हत्तीदल, रथदल, पायदल असे प्रबळ सैन्यदल रामायण महाभारत काळात होते असा उल्लेख आढळतो. प्राचीन, मध्ययुगीन काळाचा विचार केला तर प्रत्येक राज्याने आपले राज्यबळ वाढविण्यासाठी आपल्या रक्षण करण्यासाठी परकीय शत्रुचा पराभव करण्यासाठी चतुंरंग सेना मोठ्या प्रमाणात निर्माण केली आणि या सैन्यदलाच्या आधारे साम्राज्य वाढवले. मुस्लीम, ब्रिटीश राजे लोकांनी ही सैन्य बलाच्या जोरावर भारतावर दिर्घकाळ राज्य केले हा इतिहास आहे.

तर स्वातंत्र्यानंतर भारतीय सैन्यदलाने ही आपल्या शौर्य पराक्रमाच्या जोरावर भारताला एक प्रभावी राज्य बनविण्यात यश संपादन केले आहे. संरक्षण, विकास व मुसेद्दिगीरी या त्रीसुत्राच्या जोरावर भारताची राष्ट्र बांधणी भारतीय सैन्यदलाने केली आहे.

**३)अभ्यासाची उद्दिष्टे :-**

३.१)भारतीय सैन्यदलाची माहिती अभ्यासणे.

३.२)भारतीय सैन्यदलाची राष्ट्र बांधणी मधील भूमिका अभ्यासणे.

४) **संशोधन पध्दती :-**प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णात्मक संशोधन आराखड्याचा वापर केला.

५) **तथ्य संकलन :-**प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम साधनाचा वापर केला. यात पुस्तके, मासिके, वेबसाईट, सैनिक कल्याण मंडळाचा वार्षिक अहवाल याचा समावेश होतो या व्दारे तथ्य संकलन केले.

६) **भारतीय सैन्य दल :-** कोणत्याही राष्ट्राची सेना दल हे त्या राष्ट्राच्या अस्तित्वाची व अस्मितेची प्रतिके असतात. भारतीय सैन्य दल हे जगातील एक उत्कृष्ठ सेना दल आहे. युद्ध नीतीचा सिद्धांत असो वा नेतृत्वाचे कसब असो भारतीय सैन्य दल नेहमी कार्यक्षम राहिला आहे. भारतीय सैन्य दलाने नेहमी आपली कामगिरी चोखपणे बजावली आहे. यात त्यांना खूपसे यश तर क्वचित थोडेफार अपयश ही आले आहे हे साहजिकच आहे याला सैन्यदल अपवाद नाही. अशा या भारतीय सैन्य दलाची चार प्रमुख अंगे आहे.

१) वायुसेना दल
२) नौसेना दल
३) स्थलसेना दल
४) निमलष्कर दल

**६.१) वायुसेना दल :-**अवकाश करवी संरक्षण करणारी सेना म्हणजे वायुसेना होय. वायुसेना हे युद्ध शास्त्राचे एक प्रमुख अंग आहे. शत्रुच्या आघाडी वरीष्ठ ठाण्यांवर, तोफांच्या ताफ्यावर, रणगाड्यांच्या समुहावर, दारूगोळाच्या साठ्यांवर, दळणवळणाच्या मार्गावरील महत्वाच्या स्थानावर हल्ले चढवून त्यांचा विध्वंस करणे, टेहळणी करणे, शत्रुच्या वेगवेगळ्या मोर्चाची व ठिकाणाची भेदक माहिती पुरविणे अशी महत्वपुर्ण कामे वायुसेना नेहमी धाडसाने करत असते. भारतीय वायुसेनाकडे रशियन बनावटीची, फ्रेंच बनावटीची लढाऊ विमाने आहे. तसेच आय. एल-७६, ए. एन-३२, एच. एस-७४८ अशी छोटी हेलिकॉप्टर व विमाने आहे. जबरदस्त इच्छाशक्ती, बेडर निग्रह वृत्ती कोणत्याही प्रतिकुल परिस्थितीला तोंड देण्याची तयारी खरोखर वाखाण्यासारखी आहे.

**६.२) नौसेना दल :-**प्राचीन काळापासून सागरी शक्तीचा इतिहासाच्या उत्क्रांतीवर मोठा परिणाम झाला आहे. ज्या राष्ट्रांनी ही शक्ती विकसित केली ती राष्ट्रे प्रगती पथावर अग्रणी राहिली. यात ब्रिटीश, अमेरिका, रशिया, फ्रान्स याच्या बरोबर भारताचा ही समावेश होतो. भारताला ८००० किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे तर ७२३ सागरी बेटे भारताच्या अधिपत्याखाली येतात. सागरी मार्गी देशाचे संरक्षण करणारी सेना म्हणजे नौसेना दल होय. भारताकडे १०० हुन अधिक लढाऊ जहाजे आहे. आय. एन. एस, आदित्य, कुलिश, दर्शक, विराट, सिंधु या युद्ध नौका भारतीय नौसेनेत आहे. प्रतिस्पर्धी राष्ट्रांनी अण्वस्त्र हल्ला केल्यास त्यावर मात करण्याचे सामर्थ्य सेना दलात आहे.

**६.३ स्थलसेना दल/पायदल :-** स्थल सेना हा सैन्य दलाचा आत्मा आहे. भारताच्या सुरक्षा दलाचा सर्वांत मोठा सहभाग स्थलसेना हा आहे. प्रत्यक्ष जमिनीवर पाय रोवून लढाई करण्याचे काम स्थलसेना करते. स्वयंपुर्णता, स्वनिर्भयता याच्या जोरावर जमिनीवर प्रत्यक्ष मोर्चे बांधुन भूभागाचा ताबा राखणे, कोणत्याही वातावरणात सहजपणे वावरणे, विना विलंब हालचाली करणे हे स्थल सेनेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे त्याच्या मुख्य तुकडीला बटालियन म्हटले जाते. प्रत्येक बटालियन मध्ये ८०० सैनिक असतात तर २० अधिकारी असतात. तसेच प्रत्येक बटालियन मध्ये चार रायफल कंपन्या तर प्रत्येक रायफल कंपनीत १२० सैनिक असतात पायदल हा लष्कराचा पाया आहे. त्यांच्यावर साऱ्यांची मदार आहे युद्ध शास्त्रात किती ही प्रगती होवो कितीही आधुनिक शस्त्रास्त्रे येवोत हातात रायफल, डोक्यावर हेल्मेट व कमर पट्ट्यात टांगती गोळ्यांची बंडोलियर असणारा सैनिक राष्ट्रभक्तीचे प्रतिक आहे.

**६.४) निमलष्कर दल :-** देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेसाठी हे दल नेहमी कार्यरत असते. यात राष्ट्रीय रायफल, सीमा सुरक्षा दल, मध्यवर्ती राखीव पोलीस दल, रेल्वे पोलीस दल, आसाम रायफल, औदयोगिक सुरक्षा दल याचा समावेश निमलष्कर दलामध्ये होतो. देशाअंतर्गत भागातील अतिरेकी कारवायाना आळा घालणे, सीमा भागात पहारा देणे ही कामे निमलष्कर दल करत असतो. त्याचे हे कार्य भारतीय सैन्य दलाप्रमाणे मोठे आहे यात काही शंका नाही.

**७) राष्ट्र बांधणी मधील भारतीय सैन्यदलाची भूमिका :-**राष्ट्र बांधणी हे काम एका विभागाचे एका व्यक्तीचे नसुन त्यात सर्व भारतीयांचा सर्व विभागाचा समावेश होतो. राष्ट्र बांधणी मध्ये शिक्षक, राजकीय नेते, समाज सुधारक, कायदा, प्रशासन, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, सामाजिक नेते स्वातंत्र्य सेनानी यांची भूमिका जशी विशेष उल्लेखनीय आहे तशी भारतीय सैन्यदल व तेथे कार्यरत असणारा सैनिक याची ही राष्ट्र बांधणी मधील भूमिका अत्यंत महत्वाची आहे कारण संरक्षणावर विकास तर विकासावर राष्ट्र बांधणी अवलंबुन असते म्हणजे राष्ट्र बांधणी चा खरा भक्कम पाया संरक्षण आहे आणि या संरक्षणाचे काम भारतीय सैन्यदल व दलातील सैनिक करत असतात. त्याचा आढावा खालील काही घटकांवरून करता येईल.

**७.१) राष्ट्रीय एकात्मता :-**स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतीय समाजात राष्ट्रीय एकात्मता टिकवण्याचे कार्य प्रामुख्याने कोणी केले असेल तर ते आपल्या भारतीय सैन्यदलांनी धार्मिक कटुतावाद, जातीय असंतोष, बाहय आक्रमण यापासून देशाचे संरक्षण पोलीस दल तत्परतेने करत असते. पण हे कृत्य थांबवण्यास पोलीस दल अपयशी ठरते तेव्हा तेव्हा भारतीय सैन्य हे काम नि:पक्षपातीपणे यशस्वी करते. ही राष्ट्र बांधणी मधील भारतीय सैन्य दलाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

**७.२) विविधतेमधून एकता :-** राष्ट्र बांधणी मध्ये ज्या विविध घटकाचा समावेश होता. त्यापैकी एक महत्वाचा घटक म्हणजे विविधतेमधून एकता साधणे होय आणि ही भूमिका देखील आपले भारतीय सैन्यदल करीत असते. बहुभाषिक, बहुधार्मिक, बहु सांस्कृतिक-रचनात्मक सीमा भागातील लोकांमध्ये एकता साधणे, त्याच्या विकास कार्याला हातभार लावणे, मानवी हक्क, संरक्षण, गरज त्याच्या पर्यंत पोहचणे. त्याच्यात आत्मविश्वास, आत्मनिर्भयता निर्माण करणे हे काम भारतीय सैन्य दल करीत असतो.

**७.३) अंतर्गत सुरक्षा राखणे :-** स्वातंत्र्योत्तर काळानंतर संपूर्ण देशभरात अंतर्गत सुरक्षा राखण्याची महत्वाची भुमिका कोण पार पाडत असेल तर ते आपले भारतीय सैन्यदल होय. यात १९५० च्या दशकातील पूर्व राज्यामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे काम आसाम

रायफल ने केले. तर जुन १९८४ मध्ये पंजाब मधील दहशतवादी कारवाया विरोधी लढा भारतीय सैन्य दलाने दिला तो वाखण्याजोगा आहे. तर १९९० मध्ये काश्मीर खोऱ्यात वारंवार होणारे दहशतवादी हल्ले रोखण्याचे काम भारतीय सैन्य दल करते. या अशा अंतर्गत सुरक्षा मुळे देशाचा विकासाचा वेग वाढला आणि देशाची योग्य विकासात्मक बांधणी झाली.

**७.४) सीमा व्यवस्थापन :-** राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सीमाचे रक्षण करण्याचे काम आपले भारतीय सैन्यदल नेहमी तत्परतेने करत आले आहे. भारत-चीन, भारत-पाकिस्तान, भारत-श्रीलंका यांच्या सीमा व्यवस्थापनाचे काम भारतीय सैन्य दल करते. हे कार्य ही भूमिका राष्ट्र बांधणी मधील अत्यंत महत्वाची आहे.

**७.५) नैसर्गिक आपत्तीत मदत कार्य :-** भूकंप, चक्रीवादळ, पुर इत्यादी नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आपले सैन्य दल नेहमी पुढे असते व बचत कार्य करून देशसेवा ही करत असतात. यात २०१३ मधील उत्तर खंडामधील पुरामध्ये सापडलेल्या नागरिकांना बाहेर काढण्याचे काम असो किंवा वैष्णव मंदीर, अमरनाथ यात्रा सुरक्षा असो देशसेवा नागरिक सेवा हे काम ते मोठ्या हिंमतीने करत असतात ही त्याची हिंमत राष्ट्र बांधणी मधील अत्यंत महत्वाची आहे.

**७.६) धर्म निरपेक्षतेचे मानवी मुल्याचे रक्षण :-**कठोर परीक्षा चाचण्याच्या वर आधारित व गुणवत्तेच्या जोरावर भारतीय सैनिकांची सैन्य दलात निवड होते. कुंटूंबापासून शेकडो मैल दुर राहून तो प्राणाची बाजी लावून धर्मनिरपेक्षपणे मानवी मूल्यांचे रक्षण करतो. ही त्यांची भूमिका राष्ट्र बांधणी मधील अत्यंत महत्वाची आहे.

**७.७) जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी सेना :-** भारतीय सैन्य दलातील जवान हा सक्तीने नव्हे तर स्वयंम निर्णयाने भारतीय सैन्य दलात दाखल होतो. त्यामुळे सैन्य दल हे जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी सेना आहे आणि त्याचे राष्ट्र संरक्षण कार्य हे प्रत्येक राष्ट्राच्या राष्ट्र बांधणी मध्ये अत्यंत मोलाचे आहे. राष्ट्र संरक्षणाबरोबर इतके अत्यंत महत्वाची कामे ते करत असतात जसे भारतीय सैन्य दलाने जगातील सर्वांत उंच पुल बांधला तो 'बेली ब्रिज' असेल किंवा लोह मधील चुंबकीय पुल असेल तिची बांधणी व देखभालाचे काम भारतीय सैन्य करत असते.

**७.८) सेवानिवृत्त नंतर ही देश संरक्षणाचे काम :-**वयोमानानुसार सैनिक जेव्हा सेवानिवृत्त होतो तेव्हा तो आपल्या कुंटूंबात परत येतो. तारूण्यात हे सैनिक सेवानिवृत्त होतात पण काम, कष्ट, तत्परता, सेवा ही सैनिक वृत्ती त्यांना बसू देत नाही आणि मग हे माजी सैनिक पुन्हा देश रक्षणाचे काम करत राहतात. आज मानवी समाजातील महत्वपूर्ण इमारतीचे संरक्षण, शाळा, कॉलेज, दवाखाने, प्रशासकीय कार्यालय याच्या सुरक्षा ची जबाबदारी हे सैनिक पार पाडतात. म्हणजे पुन्हा संरक्षणाच्या नाड्या माजी सैनिकाकडे येतात हे त्याचे काम राष्ट्र बांधणी मध्ये महत्वाचे आहे.

**सारांश :-**

राष्ट्र बांधणी मधील प्रत्येक घटकाचे कार्य हे त्याच्या घटकांपर्यंत मर्यादित राहते जसे शिक्षकांचे काम शिक्षणापुरते राजकीय नेत्याचे काम राजकारणापुरते असते. पण भारतीय सैन्य दलाचे काम हे लष्करापुरते मर्यादित राहत नाही तर ते सर्वव्यापी आहे कारण संरक्षण नाही तर विकास नाही. विकास नाही तर राष्ट्र बांधणी करता येणार नाही त्यामुळे राष्ट्र बांधणी मधील भारतीय सैन्य दलाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे आणि त्यांच्या भूमिकेबदल आपणा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

**संदर्भ सुची :-**

१) पी. के. मलिक - "राष्ट्र उभारणी मधील भारतीय लष्कराची भूमिका," भारतीय स्ट्रॅटेजिक स्टडीज-२०१७.
२) पी. एस. चौधरी- "भारतीय युद्ध तंत्र," डायमंड प्रकाशन, २००१.
३) कृष्ण कुमार - "भारतीय सैन्य दलाचा इतिहास," के. के. प्रकाशन, २०१७.

# दलित पॅंथर एक चळवळ

**प्रा. संभाजी शंकर कांबळे**
समाजशास्त्र विभाग
श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड
सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली
ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळ काही काळ थांबल्यासारखी झाली होती. दलित समाज भांबावलेला होता. 'दलित पॅंथर' च्या उदयामुळे दलित चळवळ पुन्हा गतिमान झाली. 'दलित पॅंथरची' स्थापना ९ जुलै १९७२ रोजी झाली. या काळात दलितांवर अन्याय अत्याचार होत होते. तर दुसरीकडे या जुलमांना वाचा फोडणारी प्रभावी अशी संघटना दलितांकडे नव्हती. शिक्षण, विज्ञान, कायदा, आंबेडकरी विचारधन आणि चळवळ यामुळे दलित सुशिक्षित तरूणांमध्ये आत्मसन्मानाची भावना प्रबळपणे वर्धमान होत होती. दलितांना भेडसावणारे प्रश्न सुटत नव्हते. ते अधिक बिकट व जटील होत होते. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा सांगणारा रिपब्लिकन पक्ष मात्र प्रभावीपणे काम करू शकत नव्हता. 'अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर स्वतंत्र संघटना' नव्हती. जातिअंताच्या प्रश्नांवर प्रखरपणे लढणारी संघटना असणे ही काळाजी गरज होती.

याच काळात महाविद्यालयातून शिक्षण घेणारे दलित तरूण शहराशहरांत झाले होते. प्रत्येक महाविद्यालयात रिपब्लिकन विद्यार्थी संघटना स्थापन झालेल्या होत्या. या संघटनांतून दलित विद्यार्थी सामाजिक प्रश्नावर संघर्ष करत होते. पण हया चळवळी खूपच तोकडया होत्या. त्यांचे बळ महाविद्यालयाच्या होस्टेल पुरतेच मर्यादित होते. महाराष्ट्रातील अनेक दलित तरूण शहराशहरातल्या वसतीगृहात केंद्रित झाले होते. हया पार्श्वभूमीवर 'दलित पॅंथर' चा उदय ही अपरिहार्य घटना होय.

**उद्दिष्टये :**

१. आंबेडकर अनुयायांच्या रिपब्लिकन पक्षाच्या यशापयशाची चिकित्सा करता येईल.
२. दलित युवकांच्या चळवळीची कारणमीमांसा सांगता येईल.
३. 'दलित पॅंथर' हया चळवळींची कारणमीमांसा सांगता येईल.
४. नामांतराच्या चळवळीची माहिती सांगता येईल.
५. मंडळ ओयोगाचा लढा या विषयाची माहिती घेता येईल.

**दलित पॅंथर चळवळी :**

**१) दलित पॅंथरचा उदय :** शहरामध्ये दलित तरूणांच्या स्वतंत्र संघटना होत्या परंतू राज्यव्यापी संघटन नव्हते. त्यामुळे हया संघटनांना दिशा आणि धोरण नव्हते. देशामध्ये कुठेही दलितांवर अन्याय झाला की दलित तरूणांच्या संघटना आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत होत्या. हया प्रतिक्रिया स्थानिक पातळीवरच होत होत्या. त्यांना राज्यव्यापी व्यासपीठ मिळत नव्हते. त्यांचा दबाव पडत नव्हता. ही संघटनात्मक गरज 'दलित पॅंथर' च्या स्थापनेमुळे पुर्ण झाली.

दलित पॅंथर म्हणजे दलितांवर होणाऱ्या अन्याया विरूध्दची चळवळीत प्रतिक्रियाच होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील असीम श्रध्दा, दलित समाजविषयाचा अपार जिव्हाळा, सामाजिक विषमेविरूध्द पेटून उठलेला संतप्त तरूण हया मुळे 'दलित पॅंथर' ही संघटना अल्पावधीत राज्यभर पसरली. गावोगाव पॅंथरच्या छावण्या निघाल्या. पॅंथरची बेदरकार भाषणे, गर्दी खेचणाऱ्या वादळी सभा, हाणामारी, मोर्चे, पोलिस केसेस हयामुळे दलित पॅंथर ही संघटना चर्चित ठरली. बाबासाहेबांच्या निधनानंतर मरगळ आलेल्या समाजाला पॅंथर एक नवी ठिणगी वाटू लागली.

नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, राजा ढाले, रामदास सोरटे, लतीक खाटीक, अविनाश महानेकर, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अरूण कांबळे, रामदास आढवले, गंगाधर गाडे, टी.एम. कांबळे, प्रितमकुमार शेगावकर, उमाकांत रणधीर, दयानंद मस्के आदी पॅंथर नेत्यांनी 'दलित पॅंथर' ची चळवळ वाढवली. नामदेव ढसाळ हयांनी सुनिल दिघे हया 'नक्षलवादी' कार्यकर्त्याच्या सहकार्याने 'दलित पॅंथर' चा जाहीरनामा तयार केला. हया जाहीर नाम्याला कम्युनिस्ट विचारांवरती आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. दलितांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मोर्चे, घेराओ, निदर्शने, बंद, सभा, जिथे दलितांवर अन्याय झाला आहे. त्या गावी जावून अन्याय करणाऱ्याला जाब विचारणे अशा घटनांमुळे 'दलित पॅंथर' ही संघटना दलित तरूणांमध्ये प्रिय झाली. 'दलित पॅंथर' चे मुखपत्र 'विद्रोह' हे नामदेव ढसाळ व ज.वि.पवार चालवित होते. हया मुखपत्रामध्ये दलितांच्या प्रश्नांवर जळजळीत लेखन प्रकाशित होई. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत 'दलित पॅंथर' ने कोणाला पाठिंबा द्यायचा हयावरून नामदेव ढसाळ आणि राजा

ढाले हयांच्यात मतभेद झाले आणि या वादातून 'दलित पँथर' ही नामदेव ढसाळ यांची संघटना आणि मास मुव्हमेंट ही राजा ढाले यांची संघटना निर्माण झाली.

**२) भारतीय दलित पँथरची स्थापना :**

दलित पँथर बरखास्ती नंतर प्रा. अरूण कांबळे, भाई संगारे, रामदास आठवले, उमाकांत रणधीर, एसेम प्रधान, अँड प्रितमकुमार शेगावकर, वामन निंबाळकर, टी.एम.कांबळे, दयानंद मस्के आणि यशपाल सरवदे हयासारख्या पँथर नेत्यांची पँथरच्या बरखास्तीस आक्षेप घेतला आणि आम्ही 'दलित पँथर' ही संघटना चालवू अशी भूमिका जाहीर केली. दलित संघटनेचे जाळे देशभर पसरत होते. त्यामुळे 'दलित पँथर' संघटनेचे पुनर्रजीवन करून 'भारतीय दलित पँथर' असे नव्या संघटनेचे नामकरण केले. हया संघटनेचे अध्यक्ष म्हणून अरूण कांबळे हयांची निवड करण्यात आली. भारतीय पँथरने प्रमुख मागण्या केल्या त्या पुढील प्रमाणे -

१. मुलभूत आणि पायाभूत धंद्यांचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे.
२. बौध्दांना केंद्र शासनाच्या सवलती मिळाल्या पाहिजेत.
३. जातीयवाद पसरविणारे अभ्यासक्रमातील लेखन वगळले पाहिजे.
४. १०+२+३ हया दलितद्रोही अभ्यासक्रम बंद झाला पाहिजे.
५. दलितांवरील अन्याय, अत्याचार बंद झाला पाहिजे. दलितांवर अन्याय, अत्याचार होवू नये म्हणून फिरती न्यायालये आणि फिरती पोलिस यंत्रणा राबविली पाहिजे.
६. 'मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नामांतर झाले पाहिजे.

**३) नामांतराची चळवळ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडा ही आपली कर्मभूमी मानली. मराठवाडया सारख्या मागासलेल्या प्रदेशात उच्च शिक्षणाची अधिक निकड आहे. हे जाणून त्यांनी औरंगाबाद येथे 'मिलींद' महाविद्यालयाची स्थापना केली. हया कार्यामूळे मराठवाडयातील शैक्षणिक चळवळीचे ते प्रनेते ठरले. मराठवाडयाच्या भूमीवर बाबासाहेबांनी केलेल्या कार्याचे उचित स्मारक असावे म्हणून मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांचे नाव घ्यावे अशी मागणी पुढे आली. ही मागणी पुढे रेटण्यासाठी औरंगाबाद मधील दलित पँथरचा सहभाग मोठा होता. पँथरच्या या मागणीसाठी 'दलित पँथर' ने मराठवाडयातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सहयांची मोहिम सुरू केली. दिवसेंदिवस नामांतराची चळवळ अधिक व्यापक होत गेली. दलित पँथरने आपल्या मागणीसाठी गंगाधर गाडे हयांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठावर मोर्चा नेला. दलित पँथरच्या मागणीची दखल घेऊन मराठवाडा कार्यकारणीने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर 'डॉ. बाबासाहेब वि. आंबेडकर विद्यापीठ' असे करावे अशा आशयाचा ठराव पास केला. नामांतर वाघांचा हा पहिला विजय होता. १९७६ ते १९९४ हया काळात भारतीय दलित पँथरने नामांतराच्या निमिताने महाराष्ट्रभर संघटनेचे जाळे विणले. अनेक मोर्चे काढून पँथरने मागणी लोकांपुढे मांडली. नामांतर लढयामुळे दलित चळवळीला नवे परिणाम मिळाले.

नामांतर विरोधकांनी नामांतराला विरोध केला. मराठवाडा ही आमची अस्मिता आहे. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाने नामांतर करू नये अशी भूमिका नामांतर विरोधी संघटनांनी घेतली. सर्वांनी केलेल्या अन्यायापुढे नमुन न जाता दलितांनी आपली सतत पुढे रेटली. नामांतररासाठी दलित तरूणांनी आत्मदहन केले. नांदेडच्या गौतम वाघमारे हया पँथर कार्यकर्त्यांच्या आत्मदहनाने नामांतराचा प्रश्न चिघळला. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नाम विस्तार केला.

**४) दलित मुक्ती सेना :**

प्रा. जोगेंद्र कवाडे हयांनी नामांतराचा लढा उग्रपणे लढविला. प्रा. कवडे यांनी 'दलित मुक्ती सेना' या दलित युवकांच्या जहाल संघटनेची स्थापना केली. कवाडे यांच्या आक्रमक व विद्रोही भाषणामुळे दलित युवक 'दलित मुक्ती सेनेत' सहभागी झाले. प्रा. कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा 'लॉग मार्च' काढला. या लॉग मार्च मध्ये हजारो दलित तरूण सहभागी झाले संपूर्ण महाराष्ट्रातून ठिकठिकाणी लॉग मार्च निघाले. या लॉग मार्च मध्ये अनेक पुरोगामी संघटनांचा आणि कार्यकर्त्यांचा सहभाग होता. ठिकठिकाणी लॉग मार्च अडवून अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. प्रा. कवाडे यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे त्यांच्यावर ठिकठिकाणी जिल्हाबंदीचे आदेश लागू केले गेले. प्रा. कवाडे यांनी २५ जानेवारी १९९४ रोजी दलित मुस्लीम अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघाची स्थापना केली. आणि दलित मुस्लीम हयांच्यात ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न केले.

**५) मंडल आयोगाचा लढा :**

प्रसिध्द गांधीवादी काकासाहेब कालेकर हयांच्या अध्यक्षतेखाली १९५३ मध्ये पहिल्या मागासवर्ग आयोगाची स्थापना करण्यात आली होती. कालेलकर आयोगाने देशातील २३११ जातींना मागासवर्ग म्हणून ठरविण्याची शिफारस केली. पण हया आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नाही. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी जनता पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात

कालेलकर आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले होते. केंद्र आणि अनेक राज्यात जनता पक्षाची सरकारे अस्तित्वात आली. बिहारात कर्पुरी ठाकूर सत्तेवर येताच त्यांनी इतर मागासवर्गीयासाठी २६ टक्के राखीव जागांची शिफारस केली आणि बिहारात राखीव जागांविरूध्द तीव्र आंदोलन पेटले. राखीव जागांच्या अंमलबजावणीच्या प्रश्नावर जनता पक्षाज तीव्र मतभेद निर्माण झाले. या प्रश्नावर पडदा पाडण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी १९७८ मध्ये दुसऱ्या मागासवर्ग आयोगाची स्थापना केली. या आयोगाची अध्यक्षपद न्यायमूर्ती बी. पी. मंडल यांच्याकडे देण्यात आले.

मंडल आयोगाने मागासवर्ग ठरविण्यासाठी तीन प्रकारचे निषक निश्चित केले. ते म्हणजे सामाजिक निकष, शैक्षणिक निकष व आर्थिक निकष इत्यादी निकषाच्या आधारे इतर मागासवर्गीयांना नोकरी, शिक्षण, उद्योगधंदे आणि केंद्र, राज्य आणि स्थानिक संस्थांच्या निवडणूकांमध्ये राखीव जागा ठेवण्याची शिफारस केली मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के राखीव जागा ठेवण्यात याव्यात अशी शिफारस केली.

**निष्कर्ष :-**

१) आंबेडकर अनुयायांच्या रिपब्लिकन पक्षाच्या यशापयशाची माहिती घेतली.
२) दलित युवकांच्या चळवळींची कारणमिमांसा केली.
३) दलित पॅंथर चळवळीची माहिती समजावून घेतली.
४) नामांतर चळवळीबाबत माहिती मिळाली.
५) मंडल आयोगाची माहिती मिळाली.

**सारांश –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी दलित चळवळीचे नेतृत्व केले. बाबासाहेबांच्या नावांने आणि विचाराची प्रेरणा घेऊन दलित चळवळी अस्तित्वात आल्या त्यामध्ये दलित पॅंथर ने हाती घेतलेल्या नामांतराचा प्रश्न, मंडल आयोगाचा लढा, दलित मुक्ती सेना अशा अनेक प्रश्नांवर चर्चा करण्यात यावी. १९९० मध्ये दलितांच्या सर्व सामाजिक संघटना बरखास्त करून रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले परंतू हे ऐक्य अवाजवी ठरले हया ऐक्याच्या प्रक्रियेत अनेक सामाजिक संघटना बरखास्त झाल्या. त्यांचे पुन्हा पुनर्रजीवन झाले नाही. मात्र राजा ढाले यांनी आपल्या 'मास मुव्हमेंट' या संघटनेचे पुनर्रजीवन करून आपल्या संघटनेला 'सम्यक क्रांती' असे नाव दिले. काही पॅंथर कार्यकर्ते दलित पॅंथरची चळवळ चालवत आहेत पण ही अवस्था नैराश्य आणि कोंडी झालेली वाटते.

**पुस्तके : संदर्भ –**

१) https://mr.m.wikipwdia.org
२) दलित साहित्य : एक अभ्यास संपादक – अर्जुन जंगले
३) दलित चळवळ : चिंता आणि चिंतन सुभाष गायकवाड
४) दलित चळवळ आणि साहित्य डॉ. कृष्णा किरवले
५) दलित कांदबरी : आशय आणि अविष्कार डॉ. विलास काळे
६) ग्रामीण दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा डॉ. मधुकर मोकाशी
७) दलित पॅंथर (संपादित) पुणे, सुगावा, शरणकुमार लिंबाळे
८) बंद दरवाजा, मुंबई, लक्ष्मण माने

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# मा.शरदरावांची राजकारणातील वाटचालःएक दृष्टिक्षेप (सन १९४० ते १९९५)

**प्रा.डॉ.संतोष तुकाराम कदम,**
इतिहास विभाग प्रमुख
एस.बी.आर.कॉलेज, म्हसवड,संलग्न शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना –**

महाराष्ट्राला सामाजिक, राजकीय, शौक्षणिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक क्षेत्राचा थोर वारसा लाभला आहे. महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षि शिंदे अशा अनेक कर्तव्यसंपन्न विभूतिंच्या कार्यकर्तृत्त्वाचा वारसा लाभला आहे. हा वारसा पुढे अनेक मंडळीनी चालविला त्यातील एक महत्वाची व्यक्ती म्हणजे शरदराव पवार हे होत. ते धुरंधर राजकारणी आहेत. त्यांनी राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, संरक्षण, सहकार, शेती, औद्योगिकीकरण व क्रीडा अशा विविध क्षेत्रात आपले बहुमोल विचार मांडले आहेत. या सर्व विचारामध्ये महाराष्ट्राला अग्रेसर बनवायचे त्यांचे ध्येय दिसून येते.

**पूर्वचरित्र –** शरदराव पवार यांचा जन्म १२ डिसेंबर १९४०रोजी सौ.शारदाबाई आणि श्री.गोविंदराव पवार या दांपत्याच्या पोटी पुणे जिल्हयातील काटेवाडी या गावी झाला. शरदरावांचे वडील गोविंदराव एका सरकारी संस्थेत नोकरीला होते. शेती सावकाराकडे गहाण होती उरलेली शेती शारदाबाई बघायच्या. नंतर गोविंदराव पुण्याला आले शिवाजी मराठा हायस्कूलमधून ते आठवी पास झाले त्यानंतर त्यांनी शाळा मास्तरची नोकरी पत्करली काही वर्षे ही नोकरी केल्यानंतर ते बारामती जवळील काटेवाडी येथे शेती करण्यासाठी आले नंतर त्यांना बारामतीच्या खरेदी विक्री संघात एक अधिकारी म्हणून नोकरी मिळाली. शरदरावांचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. लहानपणी शरदरावांचे शिक्षण बारामतीतील नगर पालिकेच्या शाळेत मराठी माध्यमात झाले तर माध्यमिक शिक्षण बारामती येथील एम.ई.एस.हायस्कूलमध्ये झाले. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांना राजकारणाचे बाळकडू मिळाले. आणि येथून त्यांच्या नेतृत्व विकासाला सुरुवात झाली तो या क्षणापर्यंत एका उत्तुंग व समर्थ नेतृत्वाचा विकास प्रवाह सुरुच आहे.

**शरदरावांची राजकीय वाटचाल –** शरदरावांनी कॉलेज निवडणूकीत वर्ग प्रतिनिधी नंतर जनरल सेक्रेटरी या निवडणूकांमध्ये यश प्राप्त केले. यावेळीच त्यांनी आपल्या युवक मित्रांचे संघटन केले. पुणे येथे त्यांनी सातारा, कोल्हापूर, खानदेश, नगर, नाशिक, कोकण अशा जिल्हावार संघटना तयार केल्या त्या सर्व प्रमुखांच्या शरदरावांबरोबर सतत संपर्क होता. जेंव्हा शरदराव कॉलेजचे जी.एस.होते त्यावेळी महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून स्व.यशवंतराव चव्हाण व एन.डी.ए. प्रमुख रिअर ॲडमिरल सॅमसन या सारख्या उच्च पदस्थ अधिका-यांना निमंत्रित करून कार्यक्रम यशस्वी करण्याची नेतृत्वकला त्यांनी विकसित करण्यास सुरुवात केली.

सन १९५६ साली त्यांनी गोवामुक्ती आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला. सन १९६१ साली अखिल भारतीय युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस म्हणून शरदरारावांची निवड झाली. एक विद्यार्थी नेता युवकांचा नेता झाला. येथून ख-या अर्थाने त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. पुढे त्यांनी चिनी आक्रमणाला विरोध करण्या-या मोर्चाचे १९६२ साली संयोजन केले. जवळ जवळ ५०,००० विद्यार्थी आणि युवकांनी या मोर्चात भाग घेतला होता. शरदरावांच्या संघटना कौशल्यावर व लोकप्रियतेवर तेव्हाच शिक्कामोर्तब झाले. शरद पवारांना एक व्यापक व्यासपीठ प्राप्त झाले. वयाच्या २४ व्या वर्षी ते महाराष्ट्र राज्य युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. सन १९६६ साली पवारांना युनेस्कोची शिष्यवृत्ती मिळाली. त्या अंतर्गत त्यांना पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड, अमेरिका, जपान, डेन्मार्क, नॉर्वे, कॅनडा, स्वीडन इ. देशांना भेटी देण्याची संधी मिळाली त्यांना तेथील राजकीय पक्षांचा आणि त्यांच्या पक्षबांधणी करायच्या पध्दतीचा जवळून अभ्यास करता आला.

सन १९६७ साली शरदराव वयाच्या २७ व्या वर्षी बारामती विधानसभा मतदार संघातून उभे राहिले ३५,००० एवढया प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून बघितले नाही. सन १९६७ ते १९७२ अशी पाच वर्षे विधानसभेत आमदार म्हणून काम करीत असताना त्यांनी शेती, जलव्यवस्थापन, मनुष्यबळ नियोजन, बेकारी इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास केला. या निमित्ताने त्यांचा जनसंपर्क वाढला अभ्यासामुळे त्यांच्या विचारांना एक वेगळीच धार आली. स्वपक्षीय व विरोध पक्षीय आमदार ही त्यांच्या संपर्कात येवू राहू लागले. सन १९७० साली शरदराव महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सचिव बनले. या काळात त्यांनी चर्चासत्रे, शिबीरे घेऊन कॉंग्रेसला नवचैतन्य प्राप्त करुन दिले. सन १९७२ साली ते पुन्हा बारामती विधानसभा मतदार संघातून ५०,००० इतक्या प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यावेळी मा. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात गृह, प्रसिध्दी या महत्वाच्या खात्यांचे राज्यमंत्री पद त्यांच्याकडे सोपविण्यात आले व नंतर शिक्षणमंत्री, कृषीमंत्री, उद्योगमंत्री झाले. शरदराव शेतीमंत्री झाले तेंव्हा महाराष्ट्रातील शेतक-याला आपलाच गौरव झाला असे वाटले. शरदरावांनी शेतक-यांना अल्प व्याजाने कर्ज व स्वस्त दरात वीज पुरवठा उपलब्ध करुन दिला. आदिवासीं साठी तर त्यांनी बिनव्याजी कर्जाची सोय केली. सन १९७२ ते ७३ च्या

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

दुष्काळात 'अन्न आणि नागरी पुरवठा' या खात्याचीही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. परप्रांतातून अन्न धान्याची सोय करुन त्यांनी दुष्काळावर मात केली आणि तेंव्हापासूनच संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे शरदराव असे समीकरणच ठरुन गेले.

सन १९७८ मध्ये विविध पक्षांचे ४० आमदार घेवून शरदराव काँग्रेसच्या बाहेर पडले आणि विधानसभा निवडणूक लढले. जनता पक्ष, शेकाप अशा निरनिराळया पक्षाचे नेते यामध्ये सामील झाले. सर्वांनी मिळून पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) या नावाने आघाडी तयार केली. या निवडणुकीतील विजयानंतर शरदराव पहिल्यांदा वयाच्या ३८व्या वर्षी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. ते सर्वात तरुण मुख्यमंत्री होते. निरनिराळया विचारांची मंडळी या मंत्रीमंडळात असली तरी शरदराव कुशलतेने निर्णय घेत. ग्रामीण भागातील जनतेच्या आणि शेतक-यांच्या हिताचे बरेच निर्णय या काळात झाले. शरदराव मुख्यमंत्री असतानाच सर्वात आधी शेतक-यांचे १२७ कोटींचे कर्ज माफ करण्यात आले पदवीधर बेरोजगारांना रोजगार भत्त्याची घोषणा त्यांनी केली. या नंतर शरदरावांनी केंद्र आणि राज्य सरकाराच्या महागाई भत्त्यातल्या तफावती दुर करण्याचा पहिला निर्णय घेतला. तसेच कर्मचा-यांसाठी नेमलेल्या भोळे आयोगाने ठेवलेल्या विसंगती शरद पवार यांनी दूर करून टाकल्या. दि. १ मार्च १९८० पासून केंद्रीय कर्मचा-यांना जो महागाई भत्ता मिळतो. तोच महागाई भत्ता राज्य कर्मचा-यांना मिळेल असा निर्णय शरद पवार यांनी जाहीर करुन टाकला पण त्याच्या पुर्वीच इंदिरा गांधी यांनी शरद पवार यांचे महाराष्ट्रातील सरकार बरखास्त करुन महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट आणली होती.

महाराष्ट्रात पुन्हा निवडणूका झाल्या आणि काँग्रेसला बहुमत मिळाले. बॅरिस्टर ए.आर.अंतुले दि.९ जून १९८० ला मुख्यमंत्री झाले आणि शरदराव विरोधी पक्ष नेते झाले. विरोधी पक्ष नेते झाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम नागपूरातील हिवाळी अधिवेशन कालावधीत जवळगाव ते नागपूर अशी शेतकरी दिंडी काढली त्यामध्ये एन.डी.पाटील, राजाराम बापू पाटील, गणपतराव देशमुख असे अनेक नेते सहभागी झाले होते. ही दिंडी एवढी भव्य होती की, तीन महिन्यानंतर अखिल भारतीय पातळीवर देवीलाल यांनी दिल्लीमध्ये जो शेतकरी महामेळावा घेतला त्या शेतकरी महामेळाव्याचे अध्यक्षपद शरद पवार यांना दिले गेले.

शरद पवारांनी मंडल आयोगाच्या निर्णयाची पहिली अंमलबजावणी मुख्यमंत्री असताना केली आहे. घटनेने दिलेल्या १० टक्केच्या दलित वर्गाच्या आरक्षणाची कक्षा महाराष्ट्रात ओबीसी सह २७ टक्केपर्यंत नेण्याचा निर्णय शरद पवार यांच्याच कारकिर्दीत घेतला गेला आहे. आणि नोकरीत २७ टक्के आरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य झाले. महिला आयोगाची स्थापना शरद पवार मुख्यमंत्री असताना देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात झाली. महाराष्ट्राच्या पुरोगामी निर्णयात पंचायत राज निर्मिती, रोजगार हमी, नेत्याला कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा, मुलींना मोफत शिक्षण, गर्भजल निदान विरोधी विधेयके असे हे निर्णय शरद पवार यांच्या कार्यकाळातील महत्त्वाचे निर्णय मानावे लागतील. पंचायत राज्यव्यवस्थेत महिलांना ३० टक्के आरक्षणाचा निर्णयही शरद पवार मुख्यमंत्री असताना केला गेला आहे.

दि.६ डिसेंबर १९८६ पर्यंत म्हणजे पुन्हा काँग्रेसमध्ये येईपर्यंत शरद पवार विरोधी पक्षाच्या बाकावरच वावरत होते. सन १९८६ ला ते काँग्रेसमध्ये आल्यानंतर दि.२४ जून १९८८पर्यंत काँग्रेस पक्षात त्यांचा वावर केवळ आमदार म्हणूनच होता. यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर असलेल्या शंकरराव चव्हाण यांना बाजूला करून दि.२४ जून १९८८ रोजी शरद पवार महाराष्ट्राचे दुस-यांदा मुख्यमंत्री झाले. यावेळी रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत त्यांनी फळबाग योजनेची घोषणा केली. त्याकाळात महाराष्ट्रात अडीच लाख हेक्टरमध्ये लागवड होती. आज ती १६ लाख हेक्टरपर्यंत गेली आहे. याच योजनेत कोकणात आंबा, काजूची आणि दुष्काळी भागात डाळिंबाची लागवड झाली. या राज्याच्या शेती उत्पादनापैकी २५ टक्के उत्पादन फळबागेपासून होऊ लागले.

फेब्रुवारी १९९०मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला १४१ जागा मिळाल्या तरीही १२ अपक्ष आमदारांच्या पाठिंब्यावर शरद पवार यांनी दि.४ मार्च १९९० रोजी मुख्यमंत्री म्हणून तिस-यांदा शपथ घेतली. जाने. १९९१ मध्ये शरद पवारांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्याची मागणी काही मंत्र्यांनी राजीव गांधीकडे केली. पण त्याला राजीव गांधीनी नकार दिला. सन १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत पवारांनी काँग्रेस पक्षाचा राज्यात एकहाती प्रचार केला. पक्षाने राज्यात ४८ पौकी ३८ जागा जिंकल्या. निवडणुक प्रचारादरम्यान राजीव गांधींची हत्या झाली. पी.व्ही.नरसिंहराव आणि अर्जुनसिंग यांच्याबरोबर पवारांचे नावही पंतप्रधान पदाच्या शर्यतीत आहे अशा बातम्या वर्तमानपत्रांत आल्या. मात्र काँग्रेस संसदीय पक्षाने पी.व्ही.नरसिंह राव यांना नेतेपदी निवडले आणि दि.२६ जून १९९१ रोजी शरद पवारांना केंद्रीय मंत्रीमंडळात संरक्षणमंत्री म्हणून प्रथमच शपथविधी झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या जागी सुधाकरराव नाईक यांची निवड करण्यात आली. काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदामुळे सुधाकरराव नाईक यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर शरद पवारांना दि. ६ मार्च १९९३ रोजी चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सुत्रे हाती घ्यावी लागली.

शरद पवार चौथ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर दि.१२ मार्च १९९३ रोजी मुंबईत भीषण बाँबस्फोट झाले त्यात २५७ लोक ठार तर ६०० हून अधिक लोक जखमी झाले. शरद पवारांनी केवळ दोनच दिवसात भेदरलेल्या मुंबईचे जीवन पूर्वपदावर आणले. पुढे दि.३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये भूकंप होऊन दहा हजारांपेक्षा जास्त लोक ठार झाले. या

संकटाबरोबरच राज्यात कमालीच्या वाढलेल्या भ्रष्टाचाराबद्दल मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त गो.रा.खैरनार यांनी पवारांना दोषी धरुन त्यांच्यावर अनेक आरोप केले. प्रख्यात समाजसेवक आण्णा हजारे यांनी वनखात्यातील वाढत्या भ्रष्टाचाराविरोधात उपोषण केले. तेंव्हा पवारांचे सरकार भ्रष्टाचारी अधिका-यांना पाठिशी घालत आहे असा आरोप झाला. जळगाव येथील सेक्स स्कँडलमध्ये अनेक तरुणींवर लैंगिक अत्याचार झाले त्यात काँग्रेस पक्षाचे स्थानिक नगरसेवक सामील आहेत असा आरोप झाला. दि.२३ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथे वंजारी समाजातील लोकांचा शिक्षण आणि सरकारी नोक-यांमध्ये आरक्षणाची मागणी करण्यासाठी मोर्चा निघाला. त्यात चेंगराचेंगरी होऊन १२३ लोक मृत्युमुखी पडले. यामुळे जनतेत सरकार विरुध्द नाराजी वाढली आणि प्रथमच राज्यात काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. सन १९९६ च्या लोकसभा निवडणूकीपर्यंत पवार राज्य विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते होते. सन १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी बारामतीतून विजय मिळविला आणि त्यानंतर ते राष्ट्रीय राजकारणात उतरले. त्यांनी आज अखेर राष्ट्रीय राजकारणात आपल्या कार्य कर्तव्याचा ठसा उमठवल्याचे आपणास दिसून येते.

**समारोप :** शरदरावांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद एकूण चार वेळा भूषवले. या काळात त्यांनी जनहिताचे अनेक निर्णय घेतले औद्योगिक क्षेत्राला उत्तेजन देण्याची त्यांनी योजना आखली आणि ती अंमलात आणली. साखर कारखान्यातून निघणा-या मळी व बगॅसपासून अल्कोहोल निर्मितीला त्यांनी चालना दिली. औद्योगिक क्षेत्रातील लायसन्स संदर्भातील नियम ढिले केले. तोटयात जाणारे उद्योगधंदे बंद केले आणि त्यातील कामगारांना पुन्हा प्रशिक्षण देवून काम दिले तसेच फळबागा आणि पर्यटनाच्या विकासासंबंधी नव्या योजना आखल्या विशेषतः पर्यटनाला उद्योगाची प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नांव देण्याचा निर्णय घेतला आणि दलितांना न्याय दिला. गडचिरोली, चंद्रपूर पट्टयातील आदिवासींना मुख्य प्रवाहात आणून त्यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय शोषण थांबविण्याची विशेष कृती योजना त्यांच्याच प्रेरणेने आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आमलात आली.

शरदरावांच्या जीवनातील एक आगळावेगळा पण अलौकिक पैलू म्हणजे सामान्य माणूस (common man) हा शरदरावांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू आहे. तरीही समाजातील सर्व घटकांशी त्यांचे सौहार्दाचे संबंध आहेत. ज्या सहजतेने ते शेतक-यांमध्ये मिसळतात त्याच सहजतेने श्रीमंत उद्योजकांमध्येही वावरतात आणि विशेष म्हणजे दोघांनाही ते आपले वाटतात यालाच म्हणतात माणसांची मने जिंकणे. ते देश आणि विदेश पातळीवरील नेत्यांमध्येही आपले वजन राखून असतात. तरुण पिढीबद्दल ते आशावादी आहेत. आजही ते १७ ते १८ तास काम करतात त्यांनीच म्हटल्याप्रमाणे कष्ट हेच भांडवल तसेच कर्तृत्व हेच भांडवल, श्रेष्ठत्व हेच भांडवल, सदगुण हेच भांडवल, सामान्यांची संमती हेच भांडवल, एवढे सारे बरोबर असेल तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही.ज्याप्रमाणे शेक्सपियरचा हॅम्लेट म्हणतो, ***The time is out of joint : o Cursed spite / that ever I was born to set it right*** त्याप्रमाणे म्हणत. शरदरावांनी राजकीय, सामाजिक वाटचाल केली तर ते आपल्या ध्येयाची पूर्ती करू शकतील.

एक प्रशासक म्हणून शरदरावांनी आपला एक वेगळा ठसा उमटविलेला आहे. कोणत्याही प्रश्नाचा ते अभ्यास करतात मग इतरांशी सल्ला मसलत करतात आणि तरीही अंतिम निर्णय घेण्याचे आपले स्वातंत्र्य ते अबाधित ठेवतात. प्रशासनातील खाचा-खोचा-ठेचा त्यांना जवळून माहित असल्याने नोकरशाहीतील माणसे त्यांना टरकून असतात. एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांनी नाव कमावले आहे हे मान्यच करायला हवे. आपल्या ४० ते ५० वर्षाच्या राजकीय जीवनात त्यांनी कर्तृत्वाचे डोंगर उभे केले आहेत त्या कर्तृत्त्वाचा आलेख मांडताना माझे शब्द अपुरे पडतात यास्तव त्यांच्या महान कार्याचा इथे केवळ धावता आढावाच घेतलेला आहे.

## संदर्भसूची


१) नष्टे पद्माकर, लोक नेते, पुजा प्रकाशन, पुणे २०१३, पान २२.
२) सातपुते अशोक, महाराष्ट्रातील मोठी माणसे, अमित प्रकाशन, पुणे २०१३, पान १३०
३) शिंदे- चौगुले सहदेव डॉ पाथेय-भाग १, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर २०१२ पान १३८–१३९
४) चव्हाण सरोजिनी नितीन, शारदाबाई पवार, सकाळ प्रकाशन, कोल्हापूर २०११, पान १९३
५) पवार प्रतापराव, वाटचाल, सकाळ प्रकाशन, पुणे २००५, पान ५४.
६) दै.सकाळ दि.१२/१२/२०१४ , पान ६
७) पाटील मनोज, यशवंत, आदिश्रेय प्रकाशन, पुणे,२०१५, पान ६६व ६७.
८) दै.सकाळ, दि.१२/१२/२००९, पान १०.
९) पवार शरद(राजकीय आत्मकथा), लोक माझे सांगाती, राजहंस प्रकाशन, पुणे-२०१६, पान ५३ व ५९
१०) दै.सकाळ, दि.१२/१२/२०१०, पान ११.
११) भोंगळे सुधीर (संपा), राष्ट्रवादी अंक ४३, फे.२०१३, पान २५.

# माध्यमिक स्तरावर इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेची वाचन विषयक अभिरुची – एक अभ्यास


**- प्रा. सरिता आण्णासो मोरे**

**प्रा. आण्णासो विलास जाधव**

महावीर महाविद्यालय कोल्हापूर


**प्रास्ताविक –**

मानवी जीवनात आचार – विचार राहणीमान, धर्म, संस्कृती, मूल्ये यांच्या अभ्यासाठी व ती प्रत्यक्षात आणण्यासाठी मातृभाषेचा उपयोग होतो.

सामाजिक वारशांचे प्रसारण भाषेमुळे व प्रभावीपणे होते. मातृभाषा व सामाजिक वारशांचा प्राण ठरतो. मातृभाषेच्या माध्यमातून ज्ञान आणि परंपरा जोपसण्याचा आणि वाढविण्याचा एक अखंड प्रवास सुरु होतो. मातृभाषा ही वाड:मयीन आवड निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे. भाषेच्या माध्यमातून तोंडी व लेखी आत्मप्रकटीकरण प्रभावीपणे होते. विचार, भाषा आणि अनुभव याचे आदानप्रदान करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. व्यक्तीच्या बौध्दिक, भावनिक आणि कार्यात्मक विकास भाषेच्या माध्यमातून साधला जातो. ज्ञानप्राप्ती करून घेणे आणि साहित्याच्या माध्यमातून मनोरंजन करणे हे मातृभाषा सातत्याने करीत असते.

विद्यार्थी वाचन विषय अभिरुची वाढविणे आजच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते. कारण प्रत्येक ठिकाणी मनुष्य हा दृक स्वरुपाची संवेदन म्हणजे नेत्रेंद्रिय हे व्यक्तीचा बोधात्मक विकास करण्यासाठी उपयोगी ठरते आणि त्यामुळे व्यक्तींच्या ज्ञानाची पहिले क्षेत्र बोधात्मक क्षेत्र हे होय. यासाठी सभोवतालची कोणतीही वस्तुस्थिती बघितल्याशिवाय त्या वस्तुस्थितीचे आकलन होत नाही. म्हणून आकलन होण्यासाठी विद्यार्थ्याला वाचन करणे आवश्यक आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक होणार आहे. वाचन अभिरुची ही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी एक महत्त्वाची भूमिका ठरू शकते. म्हणून भाषिक विकासाठी प्रत्यक्ष व्यवहारासाठी सामाजिक विकासासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला वाचन विषयक अभिरुची अत्यावश्यक आहे. अभिरुची ही जशी उपजत असते तशी ती अर्जितही असू शकते. यासाठी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यावर वाचनसंस्कार करून अभिरुची विकसित करता येईल. यासाठी सदर संशोधन विषयक अभ्यासासाठी निवडला आहे.

**संशोधन समस्येचे महत्त्व आवश्यकता व गरज –**

मानवी जीवनात भाषेला जे अन्यनसाधारण महत्त्व आहे. हे लक्षात घेता शैक्षणिक दृष्टयाही भाषेचे महत्त्व आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात सुशिक्षित व सुसंस्कृत समाजात जीवन जगायचे असेल ज्ञानप्राप्ती करून घ्यायची असेल तर भाषेचा अभ्यास आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थ्याला वाचन विषयक अभिरुची वाढविणे आवश्यक आहे.

माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचे वय या अवस्थेत अत्यंत संवेदनक्षम असून या वयात झालेले संस्कार विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीसाठी महत्त्वाचे ठरावेत असे वाटतात. व्यक्तिमत्त्व विकासाठी वाचनाचा संस्कार हा श्रेष्ठ तर जीवनमूल्यांची जाणीव करून देणारा संस्कार ठरत असतो म्हणून माध्यमिक शाळेत जीवनाच्या श्रेष्ठत्तर मूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या ललित साहित्याचे वाचनही महत्त्वाचे ठरते. माध्यमिक स्तरावरील मुलांच्या ठिकाणी कमालीची जिज्ञासूवृत्ती असल्यामुळे विविध प्रकारचे ज्ञान देणारी अनेक पुस्तके ही त्याच्या वाचनात आली तर विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा अधिकाधिक निकोप पणे वृद्धिगत होत राहील. अभ्यासक्रमात असलेले ज्ञानाची व्याप्ती वाढविण्यासाठी पूरक वाचनाची गरज आहे. वाचनातून विद्यार्थ्याची सुप्तशक्ती, अभिव्यक्ती, सृजनशक्ती यासारख्या शक्तीचा विकास होऊन विशेषता मातृभाषेच्या वाचनाने बुद्धीला, विचारांना कल्पकतेला आणि सृजनक्षमतेला चालना मिळते. दृष्टी विशाल बनते, ज्ञान समृद्ध होते, मनोरंजन होते, बहुश्रुतता वाढेल, जे अनुभव घेता येत नाही त्याचे ज्ञान वाचनातून होते.

व्यक्तीला जीवनामध्ये अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. व्यक्तीच्या वाचनामुळे अनेक समस्यांना अडचणींना तो सहजपणे सामोरे जाऊ शकतो. त्यामुळे मराठी वाचनाविषयक अभिरुची विद्यार्थ्यांमध्ये किती आहे याचा अभ्यास सदर संशोधनामध्ये केले आहे.

**समस्या विधान –** माध्यमिक स्तरावरील इ ९ वी च्या विद्यार्थांच्या मराठी भाषेची वाचन विषयक अभिरुची – एक अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१. विद्यार्थ्याच्या वाचनाच्या अभिरुचीचा शोध घेणे.

२. विद्यार्थ्याच्या वाचन साहित्याची माहिती मिळवणे.

३. शालेय ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या वाचन विषयक सुविधाचा अभ्यास करणे.

**समस्येमागील गृहितके –**

१. वाचन सरावामुळे विद्यार्थ्याचे वाचन विषय अभिरुची वाढेल.
२. मूल्यधिष्ठित साहित्याची माहिती देऊन त्यांना वाचनविषयक आवड निर्माण होते.
३. जे साहित्य वाचलेले आहे त्यातील महत्त्वाची टिपणे घेऊन शब्दसंग्रह वाढतो.

**संशोधनाची कार्यपद्धती –**

संशोधनाची प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भातील संबंधित माहिती मिळवण्यासाठी शैक्षणिक संशोधनाच्या विविध पद्धतीपैकी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला आहे.

**नमूना निवड –**

सदर संशोधनासाठी सांगली शहरांची निवड केली आहे. माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्याच्या मराठी भाषेची वाचन विषयक अभिरुची अभ्यासण्यासाठी सांगली शहरातील एकूण मराठी माध्यमिक शाळा २४ आहेत. त्यापैकी जनसंख्या म्हणून ३० टक्के नी या माध्यमिक शाळापैकी ८ शाळांची निवड यादृच्छिक पद्धतीत लॉटरी पद्धतीने निवड केली आहे. प्रत्येकी २० विद्यार्थी व प्रत्येक शाळेतील ग्रंथपालांचीसुद्धा निवड करण्यात आली.

**संशोधनाची साधने –** विद्यार्थ्याच्या मराठी संशोधनाची साधने अभिरुची अभ्यासण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत ही साधने वापरण्यात आली. वृत्तपत्रे, मासिके इतर अवातंर साहित्य तसेच शाळेत राबविले जाणारे उपक्रम आणि या उपक्रमामुळे विद्यर्थ्यांच्या अभिरुचीत वाढ होते का तसेच शालेय ग्रंथालयातून विद्यार्थ्याना पुरविल्या जाणाऱ्या वाचन विषयक सुविधाचा अभ्यास यावर आधारित ग्रंथपाल यांना प्रश्नावली तयार केले. अशाप्रकारे तयार केलेली प्रश्नावली तज्ञ व्यक्तींना दाखवून अंतिम प्रश्नावली तयार केली काही प्रश्न विद्यार्थ्यांना मुलाखतीद्वारे विचारण्यात आले.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

विद्यार्थीकडून प्रश्नावली सोडवून घेतल्या व काही विद्यार्थींच्या मुलाखती घेण्यात आल्या व प्रत्येक ग्रंथपालांकडून सुद्धा प्रश्नावली सोडवून घेतल्या व त्यानंतर विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

प्रश्नावलीमधील प्राप्तांकांचा क्रमवार अधिक स्पष्ट व्हावा या करिता प्रश्नावलीत प्रत्येक प्रश्नाचे सांखिकीय विश्लेषण टक्केवारीनुसार करण्यात आले.

**निष्कर्ष –**

१. मोकळ्या वेळात करता येण्यासारख्या विविध गोष्टीपैकी २६.०७ टक्के विद्यार्थी मोकळा वेळ सिनेमा पाहण्यात घालवतात.
२. वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यांचे वाचन करण्यासाठी विद्यार्थ्यांना दररोज ३० मिनटे वेळ ३२.८२ टक्के विद्यार्थींना मिळतो.
३. पुढारी वाचणारे विद्यार्थी ७४.५३ टक्के आहेत. सकाळ व लोकमत वाचणारे विद्यार्थी अनुक्रमे ४२.०२ टक्के व ४०.७९ टक्के आहे.
४. अभ्यासाव्यतिरिक्त विनोदी कथा वाचणारे विद्यार्थी ४४.७८ टक्के आहेत.
५. विद्यार्थीनी वाचलेल्या कथासंग्रहासाठी प्रतिसाद न देणारे विद्यार्थी ९०.४९ टक्के आहे. प्रतिसाद दिलेली विद्यार्थी ९.५० टक्के आहे.
६. ग्रंथालयामध्ये दैनिक घेण्याचे प्रमाण ८७.५ टक्के आहे. साप्ताहिके व मासिके घेण्याचे प्रमाण अनुक्रमे २५ टक्के आहे.
७. एखादे मासिक वाचल्यानंतर त्यावर टिपणे काढणारे विद्यार्थी १३.७५ टक्के आहेत व न काढणारे ८६.२५ टक्के आहेत.
८. वर्तमानपत्र अगर नियतकालिक यातील एखादा भाग विद्यार्थ्यांना उपयुक्त असेल तर तो विद्यार्थ्यांना समोर आणण्यासाठी एखादी योजना कार्यान्वित करणारे ८७.५ टक्के ग्रंथपाल आहेत व एखादी योजना कार्यान्वित न करणरे १२.५ टक्के ग्रंथपाल आहेत.
९. शाळेत येणारी नवीन पुस्तके वाचकांच्या नजरेत आणण्यासाठी व योजना कार्यान्वित करणारे ७५ टक्के ग्रंथपाल आहेत यामध्ये ३७.५ टक्के ग्रंथपाल प्रदर्शन भरवतात व २५ टक्के ग्रंथपाल नवीन पुस्तके काचपेटीला लावली जातात. १२.५ टक्के ग्रंथपाल वाचन शाळा योजना कार्यान्वित करतात.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

१०. मुलांना उभे राहून वर्तमानपत्रे किंवा मासिके वाचता येतील असे लोखंडी व लाकडी स्टॅण्ड ३७.५ टक्के शाळांमध्ये आहे. लोखंडी व लाकडी स्टॅण्ड ६२.५ टक्के शाळांनमध्ये नाहीत.

११. ग्रंथालयातील प्रमुख विभागापैकी शिक्षक ग्रंथालय १०० टक्के आहे. सामान्य वाचनालय, वाचनकक्ष, अभ्यासिका, वर्ग वाचनालय अनुक्रमे ६२.५ टक्के आहे. व नियतकालिका विभाग ५० टक्के आहे. गरीब विद्यार्थी ३७.५ टक्के व संच पेट्या व सहायक विभाग २५ टक्के आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

१. ऐवले सीमा (सप्टेंबर २००५) ‘ शैक्षणिक तंत्रविज्ञान व माहिती तंत्रविज्ञान’ नित्य नूतन प्रकाशन
२. करंदीकर सुरेश, (मार्च २००५) ‘मराठी अध्यापन पद्धती’ कोल्हापूर फडके प्रकाशन.
३. कुडले म.बा. (१९८५) ‘मराठी अध्यापन’ पुणे श्री विद्या प्रकाशन देशमुख एम.जी.जुलै २०० शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठात फडके प्रकाशन.
४. भिंताडे वि. रा. (१९८९) ‘शैक्षणिक संशोधन पद्धती’ पुणे नूतन प्रकाशन
५. मुळे रा. श. व उमाटे वि.म. ‘शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे ’ नागपूर विद्या प्रकाशन.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# महात्मा ज्योतीराव फुले यांच्या जलव्यवस्थापनाबाबतच्या विचारांची प्रस्तुतता.

**प्रा. सतीश यशवंत चौगुले**
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा.
ता. वाळवा, जि. सांगली

**प्रस्तावना**

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्योत्तर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु हे झाले. भारताची सर्वच क्षेत्रात प्रगती व्हावी अशी त्यांची इच्छा होती. भारत कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे शेतीचा विकास झाला पाहिजे यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून जलसिंचनाचा विकास केला पाहिजे ही बाब पंडित जवाहरलाल नेहरुंसारख्या दृष्ट्या नेत्याच्या लक्षात आली होती.डॉ.ए. एन. खोसला हे अभियंता आणि राजकारणी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यानंतर सिंचन क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यात आला. अनेक मोठे-मोठे प्रकल्प देशातील वेगवेगळ्या नद्यांवर उभारण्यात आले. भाक्रा-नानगल, हिराकुड, दामोदर, कोयना यासारखी मोठी धरणे बांधण्यात आली. दुष्काळ हटविणे, पुर नियंत्रण, अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणणे, वीज निर्मीती, पिण्यासाठी व उद्योगांसाठी पाणी देणे अशा उद्दीष्टांनी नद्यांवर धरणे बांधून जलसिंचन योजना राबविण्यात आल्या. जलसंपत्तीचे नियोजन करणे हे सरकारचे मुख्य कार्य होते.

परंतू नदीवर कायमस्वरुपी धरण बांधण्याची पध्दत भारतात ब्रिटीशांनी आणली. तीच पध्दती स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यकर्त्यांनी अवलंबली. ब्रिटीशांच्या काळातच महात्मा ज्योतीराव फुले यांनी जलव्यवस्थापनाबद्दल आपले विचार व्यक्त केले होते. त्यांनी मांडलेल्या विचारांची चर्चा या ठिकाणी करणार आहोत.

**सिंचनाचा इतिहास –** भारतात प्राचीनकाळी लोकांना व जमिनीला पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक मातीची धरणे बांधण्यात आली होती. उत्तर भारतात नद्यांना बारमाही पाणी असल्याने त्यावर कमी उंचीची व फारच थोडा साठा करणारी धरणे बांधून पुराचे पाणी शेतात घेतले जाई. त्या पाण्यावर चांगली पीके काढण्यात येत. द. भारतात अशा बारमाही पाणी असलेल्या नद्या फारशा नसल्याने पाणी साठवण्यासाठी मातीची व क्वचित दगडी बांधकामाची छोटी धरणे बांधली गेली. इ. स. ५०० ते १८०० या काळात द. भारतात पल्लव आणि इतर राजांनी अनेक मातीची धरणे बांधल्याचे उल्लेख मिळतात.[१]

कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात तलाव बांधणे, पाणीपट्टी वसुली, सिंचन व्यवस्थेचे संरक्षण, पीक पध्दती, कुरणाची शेती, पावसाच्या नोंदी व तलावातील गाळ काढणे यावरील कराची चर्चा आली आहे. तसेच कौटिल्य म्हणतो, ‘ अन्नधान्याचे पीक उत्तम, भाजीपाला उत्तम व ऊस कनिष्ठ. कारण उसाच्या पीकाला पाणी जास्त लागते.’ अशा पध्दतीने कौटिल्याने शेती आणि पाण्याचा विचार केलेला दिसतो. पाराशर ऋषी यांचा कृषी पाराशर हा ग्रंथ प्रसिध्द आहे. त्यामध्ये प्रमुख कालवा, चाऱ्या, उपचाऱ्या व त्यांचे नियंत्रण याची चर्चा आली आहे. त्यांनीच शेतीच्या पाणी पुरवठ्यासाठी रहाटगाडग्याची कल्पना मांडली आहे. हेमाद्री पंडिताने आपल्या दानखंड्या उपग्रंथामध्ये सिंचनाची माहिती दिली आहे. अशा प्रकारच्या जलसिंचन व्यवस्थेच्या नोंदी रामायण, महाभारत, सिंधू संस्कृती या काळातही आढळतात.[२]

**फड पध्दती –** मध्ययुगीन काळापासून खानदेशात फड पध्दती होती. या पध्दतीमुळेच खानदेशात ऊस, केळी, कापूस आणि भात यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात येत होते. नदीवर बंधारे बांधून कालव्याद्वारे पाणी सिंचनासाठी वळविले जात होते. सिंचनाखालील क्षेत्राचे चार भाग केले जात होते. अशा प्रत्येक भागाला फड असे म्हटले जात होते. एका फडामध्ये अनेक प्रकारचे लाभधारक असत. एका फडामध्ये मात्र एकाच प्रकारचे पीक घेतले जात होते. पहिल्या फडात बारमाही तर दुसऱ्या फडात दुहंगामी, तिसऱ्या फडात एक हंगामी तर चौथ्या फडात पाणी उपलब्ध असेल तरच पीक घेतले जात होते. दर चार वर्षांनी प्रत्येक फडात एकदा बारमाही पीक घेता येत होते. त्यामुळे शेतीचा पोत चांगला रहात होता. खानदेशात यादव राजांनी व अहिल्याबाई होळकर यांनी बंधारे बांधून फड पध्दतीला राजाश्रय दिला होता.[३]

अशाच पध्दतीने राजर्षि शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थापात फड पध्दती अवलंबली होती. राजर्षी शाहु महाराजांनी राधानगरीचे धरण बांधले. या धरणातले पाणी पंचगंगा नदीत सोडले जात होते. पंचगंगा नदीतून मोटेच्या सहाय्याने फड पध्दतीने सिंचन केले जात होते.[४]

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

**ब्रिटीशांचे जलसिंचनविषयक धोरण –** संपूर्ण भारतातील जमीन आणि पाण्याबद्दलची जलसिंचनाची पहिल्यांदा शास्त्रीय पध्दतीने अभ्यासपूर्ण माहिती ब्रिटीश अधिकारी व तज्ञांनी एकत्रित केली.[५] हाऊस ऑफ कॉमन्सने १८७९ मध्ये एक खास समिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारशींपैकी महत्वाची शिफारस अशी होती की,' सरकारी जबाबदारीवर कर्ज उभारुन ज्या योजना पुढे किफायतशीर ठरतील, म्हणजे ज्यापासून मिळणारे उत्पन्न काम सुरु केल्यापासूनचा काळ धरुन भांडवलावर जे वर्षासाठी व्याज आकारायला हवे त्या इतके तरी मिळेल अशा योजनाच हाती घेतल्या जाव्यात.[६] या शिफारशीला अनुसरुनच तत्कालीन इंग्रजांचा अधिक्षक अभियंता मि. बिल यांनी प्रकल्पाचा हिशेब मांडत असताना असे लिहिले आहे, प्रकल्पातून मिळणारा महसूल हा त्यावर केलेल्या गुंतवणूकीवर मिळणाऱ्या व्याजापेक्षा जास्त राहील.[७] भारतात ब्रिटीशांनी पहिल्यांदा धरणे बांधली, ही धरणे भारतातील शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या हेतूपेक्षा धरणातील बांधकामातील गुंतवणूकीतून नफा कमवण्याच्या हेतूने बांधल्याची दिसतात.

**महात्मा फुलेंचे जलसिंचन विषयक विचार –**ब्रिटिशांनी पाण्याचे आणि माणसाचे वर्षानुवर्षाचे नाते तोडण्याचा प्रयत्न चालवला होता. म्हणून महात्मा फुलेंनी काही सुचना केल्या होत्या. महात्मा ज्योतीराव फुले यांनी जलव्यवस्थापनाबाबत 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात पुढील शब्दात इंग्रज सरकारला सूचना देत टीका केली आहे.

१. ब्रिटीशांनी आपल्या इंजिनीयर लोकांच्या भल्यामोठ्या पगार व सिंचनासाठी काढलेल्या कर्जाच्या व्याजासाठी योजना तयार केल्या होत्या. शेतकऱ्यांचा खोटा कळवळा ब्रिटीश सरकार दाखवत होते. असा आरोप महात्मा फुल्यांनी केला आहे. त्यांच्याच शब्दात त्यांनी असे म्हटले आहे '' शेतकऱ्यांच्या शेतात भरपूर पाणी असल्याने त्यांच्या जीतराबाचा बचाव होऊन त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळावे, असा वरकांती भाव दाखवून आतून आपल्या देशबांधव युरोपियन इंजिनियर कामगारास मोठमोठे पगार देण्याचे इराद्याने युरोपातील सावकारास महामूर व्याज देण्याचा हेतू मनी धरुन त्यांचे कर्ज हिंदुस्थानच्या बोडक्यावर वाढवून, त्या कर्जापैकी लक्षावधी रुपये खर्च घालून जागोजाग कालवे बांधिले जात आहेत. व त्या कालव्यातील पाण्याची किंमत अज्ञानी शेतकऱ्यांपासून मन मानेल तशी घेऊन त्यांच्या शेतात वेळच्या वेळी तरी पाणी देण्याविषयी सरकारी कामगारांकडून तजवीज ठेवली जाते काय?''[८]

२. शेतकऱ्यांनी एकदा पाणी विकत घेतल्यानंतर पूर्ण पीक तयार होईपर्यंत पाणी पुरवण्याची जबाबदारी सरकारची होती. परंतू पीक वाळून गेले तरी पाण्याचा पुरवठा केला जात नाही, यावर महात्मा फुल्यांनी कठोर शब्दात कोरडे ओढले आहेत. ते म्हणतात, '' वक्तशीर कालव्यातील पाणी सरल्यामुळे शेतकऱ्यांची एकंदर सर्व जीतराबांची होरपळून राखरांगोळी जरी झाली तरी त्यांची जोखीम इरिगेशन खात्याचे शीरावर नाही. अहो जेथे हजारो रुपये दरमहा घशात सोडणाऱ्या गोऱ्या व काळ्या इंजिनियर कामगारास, धरणात हल्ली किती ग्यालन पाणी आहे याची साधी मोजदाद करुन ते पाणी अखेरपावेतो जेवढ्या जमिनीस पुरेल, तितक्या जमिनीच्या मालकांस पाण्याचे फर्मे द्यावेत असा तर्क नसावा काय? अहो या खात्यातील कित्येक पाणी सोडणाऱ्या कामगारांचे पाण्यासाठी आर्जव करता शेतकऱ्यांचे नाकास नळ येतात. अखेर जेव्हा शेतकऱ्यांस त्याजकडून पाणी मिळेनासे होते, तेव्हा शेतकरी त्याचेवरील धूर्त अधिकाऱ्याकडे दाद मागण्यास गेले की पाण्याचे ऐवजी शेतकऱ्यांवर मग्रुरीच्या भाषणाचा हल्ला मात्र होतो.''[९]

३.शेतकऱ्यांना पाणीपट्टी अधिक भरावी लागते, ती कमी कशी करता येईल त्यावरची उपाययोजना महात्मा फुल्यांनी सांगितली आहे. '' यास्तव आमचे दयाळू सरकारांनी दर एक शेतकऱ्याच्या शेतात पाण्याच्या मानाप्रमाणे प्रत्येकास एकेक तोटी करुन द्यावी, जीजपासून शेतकऱ्यास जास्त पाणी वाजवीपेक्षा घेता न .यावे. आणि तसे केले म्हणजे पाणी सोडणाऱ्या कामगारांची सरकारास जरुर न लागता, त्याच्या खर्चाची पैशाची बचत राहील ती पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यास पाणी घेण्याचे दर कमी करण्याचे कामी चांगली उपयोगी पडेल.''[१०] याचा अर्थ महात्मा फुले नुसते टीका करणाऱ्यांपैकी नव्हते. तर उपाययोजना सांगणाऱ्यांपैकी होते.

४. सध्या धरण बांधत असताना धरणाच्या बांधामुळे अडवलेल्या पाण्याचा विचार केला जातो. पण धरणाच्या खालील बाजूस पावसाचे पडणारे पाणी ओढे, नाले, पाणलोट क्षेत्रातून जात असते. हे पाणी तर वाहून जातेच पण त्याच बरोबर महत्वाची घटकद्रव्ये वाहून जात असतात. यावर नेमकेपणाने बोट महात्मा फुल्यांनी ठेवलेले आहे. '' एकंदर डोगर पर्वतावरील गवत, झाडांच्या पानाफुलांचे व मेलेल्या किटकश्वापदांचे, मांसहाडाचे कुजलेले सत्व, वळवाच्या पावसाने धुपून पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढ्याखेड्यात वाया जाऊ नये म्हणून उद्योगी सरकारने सोयीसोयीने काळ्या व गोऱ्या लष्करासह पोलिस खात्यातील फालतू शिपायाकडून जागोजाग तालीवजा बंधारे अशा रितीने बांधावे की वळवाचे पाणी एकंदर शेतातून मुरुन नंतर नदीनाल्यास मिळावे. त्याच प्रमाणे आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व डोंगरटेकड्यांमधील दऱ्याखोऱ्यांनी तलावतळी जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावीत. म्हणजे त्याच्या खालच्या प्रदेशात ओढ्याखेड्यांनी भर उन्हाळ्यात पाणी असल्यामुळे जागोजाग लहान मोठी धरणे घालून एकंदर सर्व विहीरीस पाण्याचा पुरवठा होऊन, ज्याजपासून  सर्व ठिकाणी बागायती होऊन शेतकऱ्यांसहित सरकारचा फायदा होणार आहे. एकंदर सर्व शेते धुपून त्यामध्ये खोंगल्या पडू नयेत म्हणून सरकारने शेतकऱ्यांपासून पाणलोटाच्या बाजूने शेताच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात.''[११] अशी महात्मा फुल्यांसारखी मांडणी विरळाच असेल.

महात्मा फुलेंनी १८८३ साली केलेली टीका आजही तंतोतंत खरी असल्याचे दिसेल. प्राचीन कालखंडापासून ब्रिटीशांनी सिंचन विषयक धोरण राबवेपर्यंत सिंचन व सिंचनविषयक कल्पना समाजमनामध्ये स्पष्ट होत्या.

**निष्कर्ष :** ब्रिटीशांनी सर्वच क्षेत्रातून पारंपारिक लोकसहभागास अवैध ठरवले होते. त्यामुळे जलाशयाची मालकी लोकांकडून इंग्रज सरकारकडे कधी गेली हेच समजू शकले नाही. त्यामुळे जलाशयाचा आणि जनतेचा संबंध तुटला. ब्रिटीशांचा भारताकडे बघण्याचा दृष्टीकोन व्यापारी होता. या देशातील भांडवली गुंतवणूक वाढली पाहिजे. त्यातून अधिकाधिक लाभ मिळाला पाहिजे आणि या गुंतवणूकीला जास्तीत जास्त राजकीय संरक्षण मिळाले पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती. जनकल्याण, नैतिक उत्तरदायित्व या जलसंधारणातील प्रेरणा नाहीशा होऊन त्या जागी एकाधिकारशाही, पाण्याचे व्यापारीकरण आणि जमिनदारांना खूष ठेवण्यासाठी कुळांचे बलिदान या धोरणाला त्यांनी प्राधान्य दिल्याचे दिसते. पाण्यावर एकाधिकार निर्माण करण्याच्या प्रक्रीयेमधून या क्षेत्रात शेकडो वर्षांच्या परंपरेने निर्माण झालेल्या लोकसहभागाला फाटा दिला गेला. त्यामुळे जलाशयाचे आणि समाजाचे सांस्कृतिक नाते तुटले गेले.[१२]

स्वातंत्र्यानंतर सिंचनाबाबतचे बऱ्याच प्रमाणात ब्रिटीशांचेच धोरण पुढे चालू ठेवण्यात आले. पाणी साठ्यापासून पाणी वाहून नेण्यासाठी कालवे काढले जात होते. कालव्याने पाणी शेतापर्यंत वाहून नेले जात होते. हे सार्वजनिक स्वरूपाचे होते. कालव्यातून वाहून आणलेले पाणी सर्वांना समान पध्दतीने दिले जात होते. भारतात ब्रिटिशांनी पहिल्यांदा धरणे बांधली. ही धरणे भारतातील शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या हेतूपेक्षा धरणाच्या बांधकामातील गुंतवणुकीतून नफा कमवण्याचा हेतूने बांधल्याची दिसतात. ब्रिटिशांनी भारतात धरणे बांधत असताना भारतीय शेती पध्दतीचा अभ्यास न करता धरणे बांधली. त्यामुळे येथील पीकपध्दती धोक्यात आली. ब्रिटिशांनी भारतात धरणे बांधण्या अगोदर पाण्यावर शेती असणाऱ्यांचा आणि नसणाऱ्यांचा समान अधिकार होता. धरणे बांधल्यानंतर शेती नसणारे लोक शेती आणि पाण्यापासून दूर फेकले गेले. धरण आणि कालव्यातील नव्या सिंचनाच्या पध्दतीमुळे पैसे देवून पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे पीक पध्दती बदलली. शेतकऱ्यावर पाण्यासाठीचे कर्ज वाढल्यामुळे नगदी पीक घेण्याचे दडपण वाढले. शेतीचा पोत लक्षात न घेता सिंचनाची सुविधा झाली. पाण्याच्या अधिक वापराने शेतीचे प्रश्न निर्माण झाले. पिकाची आणि मातीची गरज लक्षात घेऊन पाणीपुरवठा करणे गरजेचे असते. ब्रिटीश सत्तेच्या या धोरणाचा मोठा फटका जुन्या सिंचन व्यवस्थेला आणि पाणी–जमीन संबंधाना बसला. मोठी धरणे ज्या क्षेत्रात बांधली त्याच्या पाणलोट आणि बुडीत क्षेत्रातील पारंपारिक व्यवस्था मोडून पडल्या. लाभक्षेत्रात मोठ्या पाटाचे पाणी फिरायला सुरूवात झाल्यावर जुन्या सिंचन व्यवस्थेकडे दुर्लक्ष करून मोडल्या गेल्या. जुन्या स्थानिक सिंचन व्यवस्थांचा अभ्यास करून त्यांना जास्त मजबूत करणे आवश्यक होते. या व्यवस्था प्रामुख्याने कायम ठेवून सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी काय करणे आवश्यक आहे याचा विचार करणे गरजेचे होते. नव्या सिंचन व्यवस्थेची गरज या अभ्यासाच्या निकषावर तपासायला पाहिजे होती. किमान नव्या आणि मोठ्या सिंचन व्यवस्थेची आणि जुन्या सर्व व्यवस्थांची सांगड घातला येणे शक्य होतेच. यापैकी काहीच केले नाही.

महात्मा फुलेंचे जलव्यस्थापनाविषयक विचार शेतीच्या पोताचा, शेती असणऱ्याचा आणि नसणाऱ्यांचा तसेच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाबद्दल विचार करतात. जुन्या आणि नव्या सिंचन व्यवस्थेची सांगड घालणे आवश्यक आहे. म्हणूनच आजही महात्मा फुलेंच्या जलव्यवस्थापन विषयक विचारांची आजही प्रस्तुतता आहे.

**संदर्भ :**

१)जोशीतर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री,मराठी विश्वकोश,खंड ८,महाराष्ट्र राज्य,साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,१९७९, पृष्ठ क्रं. १
२) महाराष्ट्र जल व जलसिंचन आयोग अहवाल खंड १, तात्वीक विवेचन, जून १९९९, पृष्ठ क्र २०,२१.
३) उपरोक्त, पृष्ठ क्र. २५.
४) कित्ता, पृष्ठ क्र. २९.
५)पाटणकर भारत (शब्दांकन),समन्यायी पाणी वाटप धोरण,कॉ.जयंत निकम,श्रमिक मुक्ती दल,कासेगांव २३ मार्च १९९८,पृष्ठ क्र. १०.
६) महाराष्ट्र जल व जलसिंचन अयोग अहवाल उपरोक्त,पृष्ठ क्र. ३१.
७) कित्ता, पृष्ठ क्र. ३७.
८) फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई, सुधारीत ५ वी आवृती दि. २८ नोव्हेंबर १९९१, पृष्ठ क्र. ३२३.
९) उपरोक्त, पृष्ठ क्र. ३२१.
१०) कित्ता, पृष्ठ क्र. ३२२.
११) कित्ता, पृष्ठ क्र. ३२१.
१२) मोरवंचीकर रा. श्री, भारतीय जलसंस्कृती : स्वरूप आणि व्याप्ती,सुमेरू प्रकाशन,डोंबिवली.११ जुलै २००६, पृष्ठ क्र. १०६.

# संरक्षणमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रबांधणीतील योगदान

**प्रा.सयाजीराव यशवंत पाटील**
इतिहास विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरूकली
जि.कोल्हापूर-महाराष्ट्र

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील एका सर्वसामान्य शेतकरी कुंटुबात जन्मलेल्या यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या राजकारणाबरोबरच देशाच्या राजकारणातही अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी आपल्या प्रभावी व कुशल नेतृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राला तर पुढे नेलेच पण त्याचबरोबर देशाच्या राजकारणालाही एक नवे वलय प्राप्त करून दिले. व्दिभाषिक व स्वतंत्र महाराष्ट्राच्या पहिल्या मुख्यमंत्री पदापासून ते देषाच्या संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि उपपंतप्रधान यासारखी अनेक महत्वाची पदे भूषविली. त्या भूमिका साकार करत असताना राजकारणातून समाजाची सर्वांगीण प्रगती करत करत भारताची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ''हिमालयाच्या संरक्षणाला सह्याद्री धावून आला '' या सत्य उक्तीप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असणारे यशवंतराव दिल्लीकरांच्या हाकेला मान देवून दिल्लीच्या राजकारणात प्रवेशकर्ते झाले. अर्थात भारत-चीन यांच्यतील संघर्शयुद्धाचा इतिहास घडत असतानाच त्यांना संरक्षणमंत्री पदासाठी पाचारण करण्यात आले. अत्यंत विश्वासाने या पदावर काम करत असताना यशवंतरावांनी आपल्या मुत्सद्धीपणाचे सुरेख दर्शन घडविले. त्यामुळेच देशाच्या संरक्षण खात्याला एक नवी दिशा मिळाली आणि त्यांचे नेतृत्वही सर्वमान्य झाले.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :** वरिल संशोधनातून पुढील उदिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.
१) यशवंतरावांच्या प्रारंभीच्या जीवनावर प्रकाश टाकणे.
२) त्यांच्या राजकीय जडणघडणीवर प्रकाश टाकणे.
३) केंद्रीय राजकारणातील प्रवेश अभ्यासणे.
४) संरक्षणमंत्री पदाच्या कारकिर्दीचा अभ्यास करणे.
५) त्याच्यातील मुत्सद्धीपणाच्या गुणांचा शोध घेणे.

**राजकीय जडणघडण :** १२ मार्च १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील 'देवराष्ट्रे ' या गावी त्यांचा जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाल्यावर ते बी.ए. एल.एल.बी करून वकिल झाले. पण वकिलीत न रमता ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीत उतरले. गांधीजींच्या १९३० च्या सविनय कांयदेभंग चळचळीत ते सहभागी झाले. त्यातच त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. भगतसिंग -सुखदेव -राजगुरू यांच्या जीवनातील विविध घटनांचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. याचवेळी त्यांची मार्क्सवादाशी विशेषता : मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराधारेशी जवळीक निर्माण झाली. रॉय यांचा नवमानवतावाद यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता[१]. १९४० मध्ये ते सातारा जिल्हा कॉग्रसचे अध्यक्ष झाले. १९४२ च्या चलेजाव चळवळीचे सातारा जिल्ह्याचे नेतृत्व त्यांनीच केले. या दरम्यान सातारा जिल्ह्यात नाना पाटील व इतर सहकार्याचे पत्रीसरकार स्थापन झाले होते. १९४६ च्या मुंबई इलाखा कायदेमंडळाच्या निवडणुकीत सातारा मतदारसंघातून निवडून आल्याने गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले.तर १९४८ साली महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेसचे चिटनिस बनले. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्याच निवडणुकीत म्हणजेच १९५२ मध्ये कराड मतदारसंघातून ते निवडून आल्याने मोरारजी देसाईच्या मंत्रिमंडळात नागरी पुरवठा मंत्री झाले. आणि मग पुढे १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून रूजू झाले[२].

**राजकीय जीवनाला कलाटणी देणारा नाटयमय प्रसंग :**

वकिलीचा अभ्यास करण्यापूर्वीच वकिली आणि राजकारण हे एकत्र करता येते पण त्यातही जे चागंल्या तऱ्हेने करता येईल ते करायचे असा ठाम विचार करणाऱ्या यशवंतरावांनी आपल्या जीवनात राजकारणाला अधिक प्राधान्य दिले. कारण राजकारण हे स्वातंत्र्याचे राजकारण आहे यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वताःला झोकून दिले. [३]महाराष्ट्राचे विविध क्षेत्रातील अग्रेसरत्व प्रस्थापित करण्यासाठी सर्वांगीन विकासाच्या माध्यमातून आपल्या राज्याला अस्सल पुरोगामी व समृद्ध करण्याचे एक दिव्य स्वप्न त्यांनी आपल्या उराशी बाळगले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची सभारंभपूर्वक घोषणा करण्यासाठी १ मे १९६० रोजी पंडित नेहरू मुंबईत आलेले असताना यशवंतरावांनी 'हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री धावून येईल'' असा शब्द दिला होता. ती वेळ आता आली होती. १९६२ साली चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर संरक्षणविषयक निर्माण झालेल्या आणिबाणीच्या कठिण काळात राष्ट्राच्या सर्वश्रेष्ट नेत्यानं यशवंतरावांना दिल्लीला येण्याची हाक दिली. ही घटना

महाराष्ट्राचा स्वाभीमान वाढविणारी घटना होती. पण हे सर्व अत्यंत नाटयमय पद्धतीने घडत होते[४]. कृष्ण मेनन हे त्यावेळी संरक्षणमंत्री होते. पण त्यांनी संरक्षणमंत्री पदाचा राजीनामा पंतप्रधानाकडे सुपूर्द केल्याने अनेकांचे डोळे त्या खात्याकडे होते. २० नोव्हेंबर १९६२ ला यशवंतराव दिल्लीत पोहचले त्याच रात्री बिजू पटनाईक हे त्यांना भेटण्यास आले. आणि संरक्षणविषयक समस्यांचा पाढा गिरवत "चीन झपाट्याने पुढे सरकत असून कदाचित मुंबईला धोका निर्माण होऊन तुमची मुंबईच युद्धभूमी बनण्याची शक्यता आहे. अशा वेळी तुम्ही मुंबईत असाला पाहिजे" असा सल्लाही दिला.म्हणजेच चव्हाण आजूनही संरक्षणमंत्री बनण्याचा विचार बदलतील आणि आल्या वाटेने मुंबईला परत निघून जातील, असा त्यांचा समज होता. पण यशवंतरावांनी त्यांचा समज खोटा ठरविला. पटनाईकांना यशवंतराव ठामपणे म्हणाले "संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारून दिल्लीला येण्यास मी राजी नव्हतो, पण आता संरक्षणमंत्री पदाची सुत्रं स्वीकारण्याचा मी निर्धार केला आहे. देशातील आणीबाणीच्या वेळी राष्ट्राकरिता जेवढं जास्त करता येईल तेवढ करण्याचा माझा निर्धार पक्का आहे." हस्तक्षेपाचं हे नाट्य इथेच संपंल नाहीतर २१ नोव्हेंबरला यशवंतरावांचा शपथविधी झाल्या नंतरही ते संरक्षण खात्याच्या कारभारात हस्तक्षेप करतचं होते. तेंव्हा अस्वस्थ झालेल्या यशवंतरावांनी आपली व्यथा पंतप्रधानापर्यंत पोहचविली तेंव्हा तात्काळ पंतप्रधानांनी त्यांना भेटीस बोलावून "संरक्षणमंत्री तुम्हीच आहात " असे सांगून व्यथेचं पत्र फाडून टाकले. आणि खऱ्या अर्थाने यशवतंरावांच्या दिल्ली राजकारणातील प्रवेश नाट्यावर पडदा पडला [५].

**संरक्षणमंत्री पदाची प्रभावी कारकिर्द (१९६२ –१९६६) :**

भारताचे संरक्षणमंत्री म्हणून चार वर्षे काम करताना यशवंतरावांनी अनेक धोरणात्मक पावले टाकून आमूलाग्र बदल घडवून आणले. सुरूवातीलाच विविध आघाड्यांना भेटी देवून सैनिक –आधिकारी यांच्या भेटी घेवून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला. नुकत्याच झालेल्या भारत - चीन युद्धामध्ये सेनादलातील आधिकाऱ्यांचा आत्मविश्वास डळमळीत झाला होता. एकूणच संरक्षणखात्यात निराशा व एक प्रकारचा अपमान झाल्याची खंत निर्माण झालेली होती. त्यावर सकारात्मक उपाय म्हणून यशवंरावांनी सर्वच घटकांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला,त्यांना समजावून घेतले.[६] त्यांनी तीन्ही सैन्यदलाच्या प्रमुखांच्या ,सचिवांच्या ,आधिकाऱ्यांच्या , आणि सैनिकांच्या वारंवार भेटी घेतल्या. त्यातूनच सकाळ बैठकीची परंपरा सुरू केली. १९६६ या एकाच वर्षात ३६५ दिवसापैकी १६९ दिवस चव्हाण आणि प्रमुख यांच्यात बैठका संपन्न झाल्या होत्या.जवळ जवळ चार वर्षात सकाळी ९:३० ला बैठक भरत आणि तिच्यापुढे अत्यंत महत्वाच्या विषयावर सखोल चर्चा होत असे. याचवेळी चव्हाणांच्या लक्षात आले की, " सेनादलाचे वाजवीकरण करण्याकडे भारताने फारसे लक्ष दिलेले नव्हते. धोबी, नाव्ही, पारीट, सफाई कामगार अशा १० –१० , २०–२० हजार बिनलढाऊ कामगारांचा भरणा करून ठेवण्याची ब्रिटिशांची जुनीच परंपरा भारताने चालु ठेवली होती.पण त्यांना पुरेशी साधनसामुग्री, शस्त्रात्रे प्रशिक्षणाच्या सोयी दिल्या नव्हत्या. म्हणूनच पूर्वीचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन आपल्या सैन्याचा उल्लेख "कवायतीच्या मैदानावरील सैन्य " असा करत.१९५७ ला कृष्ण मेमन सरक्षण मंत्री बनले. त्यांनी सैन्य दलाला एक नवी प्रतिष्ठा मिळवून दिली. पण त्याचबरोबर अविश्वास, गटबाजी, आणि संशय यांना खतपाणी घालणारी एक वेगळीच राजकरणाची शैलीही संरक्षण खात्यात आणली होती. १९६२ च्या ऐन अडचणीच्या कालखंडातील संरक्षण यंत्रणेत गटबाजी-अविश्वास व संशयाचे सावट पसरलेले होते.[७]

यातून मार्ग काढण्यासाठी चव्हाणांनी अनेक महत्वाच्या समित्यांची स्थापना करून सर्व भारतीय समाजात संरक्षण खात्याची एक नवी जाणिव निर्माण केली. या त्यांच्या दूरदृष्टीच्या प्रयत्नाबद्दल बिग्रेडिअर दळवी असे म्हणतात की " मेनन यांच्या कारकिर्दीत देशाच्या संरक्षण व्यवस्थेला गेलेले तडे भरून काढण्याचे काम चव्हाणांनी सुरू केले. " कारण त्यांनी सैन्याचा गमावलेला आत्मविश्वास व त्यांच्या कामकाजातील शिस्तबधत्ता पुन्हा मिळवून दिली. यावेळी आपले विमानदलही फारसे सामर्थ्यवान नव्हते.उदा: एखाद्या देशाकडे एखाद्य जातीच्या विमानाचे सुटटे भाग मागितले तर ते मिळत नसत, कारण तोपर्यंत त्या देशाने तसले विमान वापरायचे सोडून देवून नव्या मॉडेलचा स्वीकार केलेला असे, म्हणूनच यशवंतरावांनी 'मिग –२१ ' ही लढाऊ विमाने तयार करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील स्वंतत्र कंपनीची स्थापना करून विमान उत्पादनास प्रारंभ केला.[८] संरक्षण खाते बळकट व्हावे म्हणून त्यांनी अमेरिकेला भेट दिली पण भारताला आधुनिक प्रकारची विमाने मिळू नयेत याची अमेरिकेने काळजी घेतली. कारण काय मदत करता येईल हे पहाण्यापेक्षा मदत न देण्यासाठी कारणे शोधून काढण्याचा ते प्रयत्न करत होते. पण दुसऱ्या बाजूला अमेरिकेने पाकिस्तानला पानबुडी आणि एफ१०४ सुपरसॉनिक जेट विमाने दिली होती. पुढे यशवंतरावांनी ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री ,संरक्षणमंत्री लॉर्ड माऊंट बॅटन अशा अनेकांच्या भेटी घेतल्या पण त्यांचा प्रतिसाद निराशाजनक होता. त्यामुळे भारताला राशियाच्या सहचर्यात आधिक जावे लागले.[९]

१९६५ चे भारत - पाकिस्तान युद्ध हे चव्हाणांच्या संरक्षणमंत्री पदाची कसोटी पहाणारे ठरले.२४ एप्रिल १९६५ रोजी पाकिस्ताने पूर्ण बिग्रेडच्या सहाय्याने रणगाडे व १०० पौट्री तोफांसह कच्छच्या रणात हल्ला केला अून युद्धाची ठिणगी पडली. २८ एप्रिलला लाल बहादूरशास्त्रीनी लोकसभेतून इशारा दिला की " पाकने आपली सद्सद्विवेकबुद्धी गहाण टाकून आपल्या आक्रमक

कारवाया अशाच चालू ठेवल्यातर आमचे सैन्य जरूर आपल्या देशाचे संरक्षण करेल,आवश्यक युद्ध सामग्रीचा वापर आम्ही योग्य पद्धतीने करू '' या घोषणेमुळे पाकचे प्रमुख आयुबखानचे पित्त खवळले अन् १ मे च्या भाषणात ते गरजले '' भारताच्या अशा वागण्याची परिणीती भारत - पाक यांच्यातील सर्वकष युद्धात होईल, ही गोष्ट भारताच्या डोक्यात शिरते आहे का?'' या आयुबखानच्या आक्षेपाला संरक्षणमंत्री चव्हाणांनी सणसणीत उत्तर दिले ''जर कोण्या देशाने भारताविरूद्ध युद्ध फुकारले तर भारताला ते आव्हान स्वीकारावेच लागेल. आणि त्याला प्रत्युत्तरही दयावे लागेल''. एवढ्यावरच न थांबता त्यांनी पंजाब सिंध सिमेवरील सैन्य व त्यांच्या लष्करप्रमुखांना सज्ज रहाण्याचे आदेशही दिले.[१०] अशा वातावरणातच भारत - पाक युद्धाला १ सप्टेंबर १९६५ पासून खऱ्या अर्थाने तोंड फुटले आणि २३ सप्टेंबरला त्याचा शेवट पाकिस्तानच्या पराभवाने झाला. दोन्ही बाजूने युद्ध समाप्ततीच्या घोषण झाल्या. कारण ६ सप्टेंबरलाच राष्ट्रसंघाने युद्धबंदीचा ठराव केला होता. वरिल युद्धाची सविस्तर आणि अत्यंत विश्वसनीय माहिती यशवंतरावांनी याचकाळात आपल्या सौभाग्यवती वेणुताईस् लिहिलेल्या पत्रातून मिळतो. युद्ध समाप्तीनंतर सलोखा निर्माण व्हावा म्हणून रशियाच्या पंतप्रधानांनी शास्त्रीजी व आयुबखान यांना ताश्कंद येथे आमंत्रित केले. त्यानुसार २ जानेवारी १९६६ ला शास्त्रीजी व यशंवतराव चव्हाण ताश्कंदला रवाना झाले.यशंवतरावानी शास्त्रीजींच्या कायमचे सहवासात राहून आवश्यक तो सल्ला देण्याचे काम केले. काश्मीर प्रश्नामुळे वाटाघाटीत काहीसा पेच निर्माण झाला.अखेर कोसिजीन यांच्या कणखर मध्यस्थीमुळे १० जानेवारीला सलोखा घडला. शांतता करारावर सह्या झाल्या. बैटक संपली, दुसऱ्या दिवशी ते दिल्लीस रवाना होणार होते. पण दुदैवाने त्याच रात्री शास्त्रीजीचे देहावसन झाले. या युद्धानेच यशंवतरावांचे मुत्सद्धी युद्धनेतृत्व सर्वसामान्य झाले. त्यांची प्रतिमा आधिकच उजळ बनली. आणि देशाचे सर्व सैन्य व जनता यशंवतराव चव्हाण यांच्याकडे एक समर्थ राष्ट्रीय नेता म्हणून पाहू लागली[११].

**समारोप :**

देशभक्ती शिवाय आपली कुठलीही अन्य पात्रता नाही तेंव्हा दिल्लीला बोलवीताना आणखी एकदा विचार करा आसं पंडीत नेहरूंना सांगणाऱ्या यशवंतरावांनी भारताचे समर्थ संरक्षणमंत्री अशीच आपली प्रतिमा निर्माण केली. १९६५ च्या भारत -पाकिस्थान युद्धाच्या निकालानंतर ती प्रतिमा अधिकच उज्वल बनली. अफाट लोकप्रियता लाभली. त्यांच्या राष्ट्रीय व्यक्तीमत्वाची खरी ओळख पटली.त्यामुळेच यशवंतराव नावाच्या महाराष्ट्राच्या सपुत्राला देशाच्या राजकारणातील अत्यंत मानाची पदे समर्थपणे भूशविता आली. हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या आयुष्यातील महत्वाचा कालखंड राष्ट्रसेवेला आर्पण केला. त्यामुळेच संरक्षणमंत्री म्हणून काम करत आसताना भारत काय आहे ही गोष्ट जशी यशवंतरावांच्या लक्षात आली. जसी यशवंतराव चव्हाण काय चीज आहे'' हे उभ्या भारताच्या लक्षात आले. संरक्षणमंत्रीपदाची सुत्रे हाती घेताच केलेल्या अभ्यासपूर्ण पहाणीतून ''चीन आज काय करेल, उद्या काय करेल, या आठवड्यात आणि मग पुढच्या आठवड्यात काय करेल एवढाच विचार आम्ही करत आलो पण आता मात्र त्यापुढचा विचार करावा लागेल '' या पार्लमेंटमध्ये केलेल्या स्पष्टीकरणावरून त्यांचा मुत्सधीपणा लक्षात येतो . तर १९६५ रोजी '' तुमच्या शाब्दीक वल्गनांना आम्ही भीक घालीत नाही'' या पाकच्या प्रमुखांना दिलेल्या झणझणीत उत्तरावरून त्यांचा कणखरपणा लक्षात येतो . म्हणजेच त्यांच्या संरक्षणमंत्री पदाच्या चार वर्षाचा अभ्यास करता '' हिमालयाच्या साहाय्याला सह्याद्री धावून गेला '' ही उक्ती सार्थ ठरवून त्यांनी या देशाच्या प्रशासकीय इतिहासात एक मुत्सद्धी संरक्षणंत्री म्हणून कार्य केल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची**

१) 'प्रबोधन प्रकाशन ज्योती 'इचलकरंजी. फेब्रुवारी २०१२. पृ. ०२
२)' कित्ता' . पृ. ०३
३) यशवंतराव चव्हाण (आत्मचरित्र ) 'कृष्णाकाठ 'पुर्नमुद्रण २००८. पृ. २४०
४) रामभाऊ जोशी' यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा' यशोदा प्रकाशन पुणे.२००८ पृ. ११८
५) 'कित्ता '. पृश्ट १२२.
६) शंकर सारडा ' यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व ' दिलीपराज प्रकाशन पुणे ,२००३. पृष्ट १४४.
७) एस.एस.खेरा 'इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम' पृष्ट २०४.
८) शंकर सारडा , उपरोक्त, कित्ता. पृष्ट १४७.
९)' कित्ता '. पृष्ट १५०
१०)' कित्ता' . पृ १५१.
११) रामभाऊ जोशी , उपरोक्त, 'कित्ता ' पृ. १२९.

# राष्ट्रबांधणीच्या कार्यातील सौ सिंधुताई सपकाळ यांचे योगदान

**प्रा. डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
प्रमुख इतिहास विभाग
ओंकार महाविद्यालय गडहिंग्लज -महाराष्ट्र

**प्रस्तावना :**

इतिहासाचा समृध्द वारसा लाभलेल्या भारत नावाच्या राष्ट्राला तथापी महाराष्ट्राला सर्वांगीन दृष्टया विकसित करण्यामध्ये अनेकांचे योगदान राहिले आहे. विशेषताः मानवतेच्या तत्वावर समाजाला आकार देण्याच्या दृष्टीने थोर समाज सेवक सौ सिंधुताई सकपाळ यांचे योगदान अत्यंत भरीव स्वरूपाचे आहे. बऱ्याच समाज सुधारणा चळवळींचा प्रारंभ महाराष्ट्रात झालेला असल्याने समाजसुधारणा चळवळीचा क्रेंद्रबिंदु महाराष्ट्र राज्यास मानावे लागेल. पूर्वीपासूनच महाराष्ट्रात असंख्या समाजसुधारणा चळवळी कार्यरत आहेत. समाजात मानव किंवा निर्सगाच्या कृतीने अनाथ, निराश्रित, व्याधीग्रस्त, पिडीत, वंचित, अशा घटकांचा माणूस म्हणून जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतलेला असतो. तोच हक्क त्यांना परत मिळवून देण्यासाठी समाजसुधारणा चळवळी अखंडपणे प्रयत्न करत असतात. म्हणजेच समाजाला अशा दुर्बल घटकांना माणूस म्हणून जीवन जगता यावे म्हणून त्यांच्यावर मायेची पाखर घालण्याचे कार्य चळवळी करत असतात. अशा चळवळीच्यामध्ये थोर समाजसेविका सौ. सिंधुताई सपकाळ यांचे योगदान वरच्या क्रमांकाचे आहे यात शंका नाही. सर्व काही उध्वस्त झालेल असतानाही दुर्दैवाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सिंुधुताईनी समाजकार्यात स्वतःला झोकून देवून मारलेली उत्तुंग भरारी आनंद देणारी आहे म्हणूनच त्या आज अखंड भारताला अनाथांच्या आई तथा महाराष्ट्राची माई म्हणूनच परिचित आहेत.

**सौ.सिंधुताई सपकाळ यांचा पूर्वइतिहासः**

ताईंचा जन्म १४ नोव्हेबंर १९४७ रोजी विर्दभातल्या वर्धा जिल्हयातील नवरगांव या गावी झाला. त्यांचे वडील गुरे वळण्याचे काम करत असत. गाव अतिषय लहान व मागासलेले असल्याने सुधारणांपासून दूरच होते. माईच्या शिक्षणास वडीलांचा पाठिंबा तर आईचा विरोध असल्याने त्यांना केवळ इ.चौथी पर्यंतच शिकता आले. वयाच्या ९ व्या वर्षांनी म्हणेजच बालवयातच त्यांचा विवाह २० वर्षांनी मोठे असणाऱ्या श्रीहारी सपकाळ यांच्याशी झाला.१८ व्या वर्शी पर्यंत त्यांची तीन बाळंतपणे झाली. पण चौथे बाळंतपण त्यांच्या जीवनालाच कलाटणी देणारे ठरले. दरम्यानच्या काळातच त्यांनी शेणवाल्या मजुरांना न्याय मिळावा म्हणून शेणाचं आंदोलन केले व त्यात यशही मिळवल. पण या घटनेमध्ये दमडाजी असतकर हा जमिनदार दुखावला गेला. आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला.नाराज जमिनदाराने माईच्या पोटातील मुल आपलचं असल्याचा अपप्रचार सुरू करून तिच्या चारित्र्याचे धिंडवडे काढले. परिणामी नवऱ्याच्या मनात शंका आल्याने त्याने सिंधुताईस बेदम मारहाण करून घराच्या बाहेर काढले त्यांना माहेरच्यांनीही मदत नाकारल्याने शेवटी भीक मागून जगण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्यावर आली.[१] अशा बिकट अवस्थेत त्या म्हणायच्या

*" ये ऊन किती कडक तापते बाई*
*अंगाची फुटते लाही.*
*दोन दिसाचा शिळा तुकडा वाढा पण*
*दार नका लावु ,पुन्हा येणार नाही."*

या काळात वाट मिळेल तिकड त्या चालत राहिल्या. शेवटी त्यांना स्मशानाचा ही आश्रय घ्यावा लागला. एका भंयकर रात्री त्या स्मशानात पडून होत्या भुकेचा आगडोंब उसळला होता. एक मृतदेह आला. अत्यंसंस्काराच मडकं फोडून जमाव निघून गेला. खिन्न काळोख दाटला होता. चित्ता धगधगत होती. मृत माणूस जळत होता. सिंधुताईच्या पोटातील भूख इतकी पेटली होती की लोकांनी हातावर दिलेले पीठ मडक्यातल्या पाण्यात कालवून चित्तेवर भाजलेली भाकरी तसीच खाल्ली त्यातून त्या पुढे चिखलदऱ्यास आल्यावर मजूरांच्या समवेत त्यांच्या मुलांचा सांभाळ करू लागल्या. असेच फिरत -फिरत पुण्यास आल्या. रस्त्यावर दिपक नावाचा मुलागा रडत बसला होता. काय करणार बिचारा अनाथ होता. सिंधुताईनी त्याच्यासाठी अपार प्रयत्न केले. पण मदतीसाठी कुणीच पुढ येईना तेव्हा माईंनी त्याला आपल्याच पदराखाली घेवून समाजकार्याचा प्रारंभ केला.[२] आणि केवळ पाच दशकात त्या अख्ख्या महाराष्ट्राच्याच माई बनल्या.

**सिंधुताई सपकाळ यांचे समाजकार्य -**

आपल्या वाटयास आलेलं दैदेवी जीवन इतरांच्या वाटयाला येवू नये. म्हणूनच त्यांनी मिळेल त्याला आधार देवून समाजकार्याचा वसा घेतला. पुण्यामध्ये रस्त्यावर रडणाऱ्या अवस्थेत सापडलेला दिपक हाच त्यांचा पहिला वारस पुत्र ठरला. असे असंख्य वारसपुत्रांना सिंधूताई मायेंच प्रेम देताना दिसतात. जगातील सर्वात पहिल्या आनाथाश्रमाची स्थापना अमेरिकेत झाल्याचा उल्लेख मिळतो. त्यास ऑर्फनोथ्रोफिया संबोधले आहे.[३] तर आधुनिक काळात ही अमेरिकेतच १९४० मध्ये जॉर्ज व्हाईटफिल्ड यांनी

बेथिस्दा ऑर्फनेजूची स्थापना केल्याचे दिसून येते. भारताचा विचार करता. डिप्रेस्ड क्लास मिशन ,नॅशनल सोशल कॉन्फरन्स, ब्राहमो समाज,आर्य समाज, प्रार्थना समाज यांनी अनाथांच्या स्वाभिमान रक्षणासाठी भरघोस कार्य केल्याचे दिसते. त्याच धरतीवर गेल्या पाच दषकात सिंधूताईनी आनाथाश्रमाच्या माध्यातून समाजसेवेला वाहून घेतलेले दिसते. त्यांच्या अथक परिश्रमातून आज त्यांच्या आनाथश्रमांमध्ये असंख्य आनाथ बालके जीवनाचा आनंद घेत आहेत.[४] सिंधूताईच्या अपार समाजसेवेची चालती बोलती उदाहरणे म्हणजेच त्यांनी स्थापन केलेल्या संस्था होय. यामध्ये प्रामुख्याने सन्मती बालनिकेतन संस्था हडपसर पुणे, अभिमान बाल भवन माळेगाव वर्धा, गंगाधर बाळ छात्रालय, गुहा अहमदनगर, ममता बालसदन कुंभारवळण ,पुणे, गोपिका वनऔषधे प्रकल्प वाढोणा वर्धा ,गोपिका गायरक्षण केंद्र माळेगाव जि.वर्धा यांचा समावेश होतो.[५]

सौ.सिंधूताईच्या या सर्व संस्था त्या महाराष्ट्रात,देशभर व देशाबाहेर दिलेल्या भाषणातून मिळणारे मानधन, शासनाची तूटपूंजी मदत यातूनच समर्थपणे चालवल्या जातात. त्यासाठी माई नेहमीच भीक मागतात, पदर पसरतात, आवाहन करतात. पण हे सर्व स्वतः साठी नसून सर्वसामान्यांच्या स्वावलंबनासाठी असते. हे विशेष होय. अनाथमुलांच्या दोन घासासाठी दिवसरात्र त्या पायाला चाके बांधून वणवण फिरणारी स्त्री म्हणून सध्यातरी सिंधुताईचाच उल्लेख करावा लागतो.[६] त्यांच्या आनाथश्रमातील प्रत्येक व्यक्ती त्यांचा मुलगा किंवा मुलगी म्हणूनच जीवन जगताना दिसतात. आज सिंधुताईना १५०० मुले आहेत. १०० मुली आहेत यात दोन दिवसाच्या मुलापांसून ७२ वर्शाच्या वृध्दापर्यंत सर्वांचा समावेश होतो. याशिवाय ४०० सुना व २०० जावई आहेत. आज यातील बरिचशी मुलं शिकून सवरून स्वतःच्या पायावर उभी आहेत. कोण डॉक्टर आहे, कोण इंजिनिअर आहे, तर कोण वकील .... हे सांगताना माईना भरभरून येते.[७]

सिंधुताई सपकाळ यांनी केलेल्या कार्याची पोहच पावती म्हणून त्यांच्या देश विदेशातील २७३ पुरस्कारांनी सन्मानीत केलेले आहे.[८] त्यांना मिळालेल्या पुरस्कारांची सर्व रक्कम त्या आनाथाश्रमासाठीच वापरतात.याशिवाय त्यांच्या जीवनावर 'मी सिंधुताई सपकाळ' हा मराठी चित्रपट ही प्रदर्शित झाला आहे. विविध वाहिण्यांनी घेतलेल्या ग्रेट मुलाखतीतून त्यांचा यशस्वी जीवनपट समाजासमोर आणण्यासाठी सदैव झुंबड उडालेली असते. देशभरातील विविध स्तरातून त्यांच्या कार्याचा गौरव होताना दिसतो. हे सर्व त्यांच्या अंतःकरणातून निरपेक्ष भावनेनं केलेल्या उदात्त समाजकार्याचंच फलित आहे.[९]

**समारोप**

आपल्या कार्याचा जनमानसात ठसा उमठविणाऱ्या सौ. सिंधुताई सपकाळ यांचे नाव आदराने घेतले जाते. प्रेमाला पोरक्या झालेल्या असंख्य निराधारांना आपल्या मायेच्या स्पर्शाने व प्रेमाने आपलसं करणाऱ्या सिंधुताईंच्या या मातेची कहानी कुणालाही थक्क करणारीच आहे. आपल्या पोटच्या ममता नावाच्या मुलीला श्रीमंत दगडूशेट हलवाई देवस्थानकडे देवून असंख्य आनाथांना आश्रय देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यामागे त्यांचा उदात्त असा माणुसकीचा हेतु होता. खरचं सिंधुताईनी माणासाना तर मानसारख वागवलच पण प्राण्यानाही माणसात आणण्याच उदात्त कार्य केल. असेच म्हणावे लागेल. वैयक्तीक फायद्यासाठी समाज कार्याचा वापर करणाऱ्या या स्वार्थी जगात वैयक्तिक मिळालेल्या ५२७ पुरस्कारांची करोडो रूपयांची संपत्ती समाजातील अनाथांसाठी वापरणाऱ्या थोर समाजसेवक सौ.सिंधुताई सपकाळ या खऱ्या अर्थाने अनाथांच्या आई आणि महाराश्ट्राच्या माई बनलेल्या आहेत. ज्या नवऱ्याने मारहाण करून राक्षसी प्रवृत्तीने घराबाहेर काढले त्याच नवऱ्याला आयुष्याच्या सायंकाळी सात देणाऱ्या सिंधुताई या खऱ्या अर्थाने मानवी मनाच्या माता आहेत. आश्रमातील मुलं स्वतःच्या पायावर उभी राहिल्याच सांगताना त्यांच्या डोळयात न कळत पाण्याच्या धारा येतात. पण त्या धारा दुखःच्या नसून आनंदाच्या आहेत. हेही त्या सांगायला विसरत नाहीत[११]. एकूणच आईचे हे कार्य हे कार्य महाराष्ट्राच्या पर्यायाने भारताच्या जडण घडणीमध्ये महत्वपूर्ण योगदान देणारे असून उद्याच्या पिढयांना दिपस्तंभा प्रमाणे प्रेरणा देत राहील यात शंका नाही.

**संदर्भसूची :**

१) सौ.सिंधुताई सपकाळ, 'मी वनवासी' (आत्मचरित्र ), रिया पब्लिकेशन, कोल्हापूर,२०१३ पा.नं. २२,२३
२)Sindhutaisapkal.com
३) एच.एस.भोगण, 'द लकीयस्ट ऑर्फन्स : अ हिस्ट्री ऑफ द हिब्रु ऑर्फन आलान्स ऑफ न्यूऑर्क', १९९१
४) डी.बी. महाजन, 'आमची माई' आदित्य प्रकाशन, औरंगाबाद २०१५ पा.नं.२६,२७
५) ममता बालसदन विशेषांक -२०१४
६) दै.तरूण भारत १२ जानेवारी २००२
७) सन्मती बालसंदन विशेषांक तथा अहवाल २०१२
८) https/mr.wikipedia. org/s/1bc
९) सौ.सिंधुताईचे वारस पुत्र दिपक यांची मुलाखत २०/०९/२०१५
१०) सौ.सिंधुताईंच्या विविध संस्थाचे अहवाल.
११)सौ.सिंधुताई सकपाळ यांची मुलाखत दिनांक २५/०९/२०१५

# राष्ट्र बांधणीसाठी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

**प्रा.सौ.स्मिता तानाजी पाटील**
श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी.

आधुनिक समाजात समाज बांधणीसाठी बरीच स्थित्यंतरे घडत आली आहेत. समाज प्रवाहाच्या त्या-त्या अवस्थेत विविध घटना व व्यक्ती या त्या क्षेत्रांना स्वाभाविकपणे प्रभावित करत असतात. तरीही विधायक विचाराच्या माणसांनीच समाजाला काहीतरी दिले आहे. आपला आचार, विचार व स्वभावाने क्रांतीकारी स्वरूपाचे कार्य, शिक्षण, राजकारण व तत्सम क्षेत्रात केले आहे हे वास्तव आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक संत समाजसुधारक होऊन गेले की, त्यांनी समाजाला अंध:कारातून प्रकाशाकडे घेऊन आले त्यातील एक सर्वांगीण पुरूष, पददलितांचा कैवारी, बहुजन समाजास हक्क मिळवून देणारा, राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवणारा छत्रपती राजर्षी शाहू महाराज होय.

शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे लोकराजे म्हणून ओळखले जातात. २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानच्या संपूर्ण कारभाराची अधिकारसूत्रे देण्यात आली. यावेळी शाहू महाराजांनी काढलेल्या जाहिरनाम्यात असे म्हटले आहे की, ''आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमच्या राज्याचा सर्व बाजूंनी अभ्यूदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे जहागीरदार, आप्तजन, सरदार, इनामदार, मानकरी, कामदार, सर्व दर्जाचे श्रेष्ठ सावकार आणि तमाम प्रजानन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची आणि सहकार्याची आम्हास आवश्यकता आहे.'' यावरून महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि मुलभूत विचारसरणीचे दर्शन घडते.

**संशोधनाचा उद्देश्य :** राष्ट्रबांधणीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :** हा शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम सामुग्रीचा उदा.पुस्तके, मासिके इ. चा वापर केला आहे.

राजर्षी शाहू महाराज मोठे समाजचिंतक होते. महात्मा फुल्यानंतर सामान्य माणसाच्या शिक्षणासाठी- कल्याणासाठी राजर्षिंनी काम केले. जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री-पुरूषास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध, एकजीव आणि बलवान बनू शकत नाही. याविषयी राजर्षींना पूर्ण विश्वास वाटत होता. खामगाव येथील शिक्षण परिषदेत बोलताना राजर्षी म्हणाले, ''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे.'' प्रत्येक मनुष्याच्या अवती-भवती जी दुनिया पसरलेली आहे. तिच्या सर्वंकष सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि नैतिक झगड्यातील शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे. म्हणूनच राजर्षी सर्वांना आपल्या हाती ज्ञान-ज्योत घेऊन जागे करत होते व त्यातूनच समाजबांधणीची प्रक्रिया सुरू होती. कारण त्यांना केवळ शिक्षणासाठी शिक्षण प्रसार करावयाचा नव्हता. शिक्षणातून कर्तबगार माणसाची नवी पिढी निर्माण करावयाची होती. देशाच्या स्वातंत्र्याविषयी लोकांच्या मनात नव्या उर्मी-उर्जा निर्माण करावयाच्या होत्या. शिक्षण हे संस्कारक्षम आणि नवनिर्मितीक्षम सूत्र आहे हे राजर्षीनी चांगलेच जाणले होते.

**राजर्षी : शिक्षणाने मागासलेल्यांचा वाली**

राजर्षी शाहूंनी उद्योग शिक्षणाचे महत्त्व ओळखून सन १९१२ साली कागल येथे जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टीट्यूट स्थापन केली. सदर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. तसेच सुतारकाम, लोहारकाम आणि ड्रॉईंगमधील कला कौशल्याचे, उद्योगाचे शिक्षणही देण्यास प्रारंभ केला. त्याचप्रमाणे पुरोहित शाळा, युवराज शाळा, पाटील शाळा, संस्कृत शाळा अशा विविध शाळा निर्माण करून राजर्षींनी वेगवेगळ्या थरातील शिक्षण प्रसाराचे काम आंतरिक ओढीने केले. अज्ञानी समाजाच्या हातात, पायात आणि मस्तकात त्राण येण्यासाठी राजर्षींना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा १९१३ मध्ये पुस्कार केला होता. शेकडो वर्षे पिचत पडलेल्या समाजाला शिक्षणाने समर्थ बनवून, आपल्या दरबारी नोकऱ्या देऊन त्यांना स्वतंत्र उद्योग काढून देऊन समाजोन्नतीचे जे कार्य केले ते खऱ्या अर्थाने राष्ट्र बांधणीचे व राष्ट्रोन्नतीचे कार्य होय. नवसमाज निर्मितीसाठी समाजाच्या डोळ्यात अंजन घालत होते. सन १९१८ मध्ये आपले सर्व आर्थिक सामर्थ्य प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करावे असे महाराजांनी ठरविले.

**जातीभेदाचे निर्मूलनासाठी शिक्षण :**

१५ एप्रिल १९२० मध्ये पुढाऱ्यांना संदेश देताना राजर्षींनी काढलेले उद्‌गार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. ''जातिपद्धती इतकी दुसरी वाईट गोष्ट नाही म्हणूनही जातिपद्धती एकदा कायमची गाडून टाकली पाहिजे. त्यासाठी लोकांची मने तयार झाली पाहिजेत व त्यासाठी शिक्षणाची गरज आहे. जातिभेदाची खरी झळ अस्पृश्यांना पोहोचत असल्यामुळे महाराजांनी 'माणसाने

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

माणसाला माणसासारखे वागवावे' या साध्या सुत्राप्रमाणे जातिभेदाच्या निर्मूलनासाठी प्रयत्न सुरू झाले. त्यातूनही त्यांचे समाजाला एकत्र करण्याचे समाजबांधणीचे कार्य दिसून येते.''

त्यांनी गंगाराम नावाच्या गृहस्थाला कोल्हापूरच्या टाऊन हॉलजवळ चहागृह काढून दिले. उच्चवर्गीयांसह तेथे जाऊन महाराज प्रथम स्वत: चहा घेऊ लागले. अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊ लागले. शिवा बेरडाच्या झोपडीत जाऊन चटणी-भाकरी खाऊ लागले. आपल्या वाड्यात अस्पृश्य डॉक्टर नेमले, मातंग समाजासाठी नवी वसाहत उभारली. अस्पृश्यांना वेठीची हलकी कामे सांगणे कायद्याने दंडपात्र ठरविले. राजर्षींनी हे आधी करून दाखविले. मग सांगितले. महाराज सांगूनच थांबले नाहीत तर अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांना बोलावून त्यांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आणि वसतिगृहाची सोय केली. सोनार, सुतार, चांभार, न्हावी, रामोशी, कोळी, कोष्टी आणि परिट समाजातील मुलांना ज्ञानाची वाट ही प्रगतीच्या शिखराकडे जाते हे पटवून दिले. लोकशिक्षण हा लोकशाहीचा पाया आहे. हे तत्व राजर्षींनी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत पाळले होते.

**अस्पृश्य समाजाच्या शिक्षणाविषयी विचार :**

राजर्षी शाहू हे भारतातील अस्पृश्यता निवारण करणारे पहिले संस्थानिक. दलितांना न्याय दिला पाहिजे असे ठणकावून सांगणारे आणि त्यांच्या हितासाठी अनेक शैक्षणिक योजना राबविणारे राजर्षी हे खरेखुरे दलितमित्र होते. ज्या काळात अस्पृश्यांना जनावरासारखे वागविले जात होते. त्या काळात अस्पृश्यांना माणसासारखे वागविणारे राजर्षी थोर मनाचे राजे होते. दलितांच्यासाठी अनेक वटहुकूम काढून लक्षणीय काम केले. शाळाखात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थांना ग्रँट किंवा इमारती वगैरे रूपाने मदत मिळते. त्यांनी स्पृश्य वर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे नाहीतर प्रिन्सिपॉल अगर खालचा दर्जाचा शिक्षक असो त्याला जाब द्यावा लागेल. आणि खाजगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल, सरकारी शाळेतून शिवाशिव किंवा विटाळ पाळू नये यासाठीही राजर्षींनी वटहुकूम काढले. स्पृश्य व अस्पृश्य मुलांना शाळेत एकत्र बसविण्यासाठी देखील खास वटहुकूम काढला.

**शिक्षणातून एक संघ समाज निर्मिती :**

राजर्षी नुसते वटहुकूम काढून थांबले नाहीत तर जे महार मांग, चांभार मॅट्रीक परिक्षा पास होऊन बाहेर पडले त्यांना राजर्षींनी वकीलाच्या सनदा दिल्या. मागासलेल्या लोकांचा कैवार घेण्याच्या भूमिकेतून राजर्षी समाजाचा रोष पत्करून एका अर्थाने मागासलेल्या लोकांची वकीली करत होते. कारण त्यांना शिक्षणातून 'एक संघ समाज' निर्मिती करावयाची होती. जाती-गोतीच्या संघर्षात अडकून पडलेल्या सरस्वतीला सर्वांच्या उंबरठ्यापर्यंत पोहचवावयाचे होते. प्रबोधन, शिक्षण, जनसंपर्क यांच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या जीवनात नवप्रकाश निर्माण करण्याचा राजर्षींचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केला. संस्थानात शैक्षणिक कराचा कायदा करणारा पहिला राजा होय. सन १८९६-९७ मध्ये अस्पृश्य शाळांची संख्या ६ पर्यंत होती. राजर्षींनी शिक्षणाचे कार्य सुरू केल्यावर शाळांची संख्या २५ वर गेला व विद्यार्थी संख्या ८५० झाली. अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणासाठी कोल्हापूर, पंढरपूर, नागपूर आणि नाशिक येथे वसतिगृहे काढली. खऱ्या अर्थाने राजर्षींनी राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. आपण सर्वजण एक आहोत ही भावना दृढ करण्याचा राजर्षींनी प्रयत्न केला. सामाजिक एकात्मता व भावनिक एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

सन १९११ साली अस्पृश्यांना फी माफीचा आदेशही काढला. शिष्यवृत्तीची तरतूद केली. राजघराण्यातील मोटार गाड्यावर महार लोकांची ड्रायव्हर म्हणून नेमणूक केली. शाहू महाराज महारवाड्यात जाऊ लागले व महार राजवाड्यात वावरू लागले. जनसंपर्काचे हे नवे नाते. निर्माण केले. आडनावामुळे जातीचा बोध होतो व लोक अस्पृश्यांच्याकडे हेटाळणीच्या नजरेने पहातात म्हणून अस्पृश्यांनी शाहूंच्या इच्छेप्रमाणे नवीन आडनांवे धारण केली. यापुढेही जाऊन शाहूंनी महार वतने रद्द केली आणि अस्पृश्यांची गुलामगिरी संपविली. सार्वजनिक परिवर्तनातील शाहूंची ही सर्वोत्तम कृती म्हंटली पाहिजे.

**राजर्षी शाहू एक विद्यापीठ :**

राजर्षींनी हलक्या समजल्या जाणाऱ्या वर्गातील माणसांना कर्तृत्व आजमावण्याची संधी दिली. शिक्षणातून सर्वांचा उद्धार हा युगधर्म बनविला. शिक्षणाच्या माध्यमाने माणसाला माणूस म्हणून जगू देणारे तत्वज्ञान सांगितले. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी समर्थ बनविणारे राजर्षींचे शिक्षणशास्त्र डोळस होते आणि म्हणून राजर्षी स्वत: एक विद्यापीठ होते. चालते-बोलते-फिरते विद्यापीठ. स्वातंत्र्यपूर्व काळात सारा समाज शिक्षणगंगेत न्हाऊन निघाला आणि स्वातंत्र्याच्या दिशेने समर्थपणे वाटचाल करत रहावा असा विचार मनात धरून प्रयत्नशील राहणारे एक अभिनव विद्यापीठ होते.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

**स्त्री शिक्षणासाठी उत्तेजन :**

पुरूषांनी हातात तलवार घेऊन लढावे आणि स्त्रीने चूल-मूल सांभाळावे या कवी टेनिसने सांगितलेलया स्त्री-कार्यक्षेत्राला धक्का द्यावयाचा होता. राजर्षींनी शाळा, कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना फी माफी देऊन उत्तेजन दिले. कृष्णाबाई केळवकर या हुशार विद्यार्थिनीला मुंबईच्या गॅट मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले. राजर्षींनी स्त्री-शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी एक विशेष अधिकाऱ्याची जागा निर्माण केली. कु.एच. लिटल नंतर राधाबाई केळकर यांची नेमणूक केली. तसेच इंदूमतीदेवींना बालविधवेला शिक्षण देण्याची सुरवात करून समाज परिवर्तनातील विधवा-मुक्ती पर्वालाच प्रारंभ केला व पुरोगामी विचारांचा पुरस्कार केला. शिक्षणाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या राजर्षींनी स्त्रीविषयक अनेक सुधारणांकडेही लक्ष पुरविले. स्त्रीविषयक कायदे, पुनर्विवाह इ. कायदे मंजूर करून त्यांची अंमलबजावणी देखील केली. स्त्रियांना क्रूरपणे वागविणे नाहीसे करावे यासाठी नियम किंवा कायदे केले.

**निष्कर्ष :**

महाराजांनी मांडलेली शिक्षण विषयक विचार १९ व्या शतकातील होते. परंतु ते आजच्या राजकर्त्याला दिशा व मार्गदर्शन करणारे होते. शिक्षणाच्या अभावामुळे बहुजन समाज शेकडो वर्ष विद्याहिन, धनहिन व सत्ताहिन राहीला होता. त्यांनी बहुजनासाठी शिक्षणाची कास धरली शिक्षण हे साधन आहे साध्य नव्हे दु:खाच्या दृष्ट चक्रातून सुटका करून घेण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळविणे नव्हे आमच्या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सूटका करून घेणे आणि सर्व लोकांच्या भल्यासाठी उपयोगी पडणारे ज्ञान मिळविणे यातच खऱ्या शिक्षणाचे महत्त्व सामावलेले आहे. शिक्षणातून शरीर, मन, बुद्धी आणि हृदय यांचा समतोल विकास होईल म्हणून राजर्षींनी शिक्षणातून सर्वांचा उद्धार होईल हा 'युगधर्म' बनविला. यातूनच राष्ट्रबांधणीची प्रक्रिया दिसून येते.

**संदर्भ :**

१. कृ.गो. सुर्यवंशी, राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे.
२. डॉ.आर.एन.करपे, राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
३. प्राचार्य रा.तु.भगत, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे.
४. प्राचार्य रा.तु.भगत, राजर्षी शाहू छत्रपती, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.
५. प्रा.नानासाहेब साळुंखे, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल व विज निर्मिती धोरण – ऐतिहासिक राष्ट्र कार्य.

**प्रा.नरेंद्र एन. सूर्यवंशी.**
इतिहास विभाग.
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे,
ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर.

इ.स. १९४२ ते १९४६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये श्रम खात्याचे मंत्री होते. जल, विद्युत आणि सार्वजनिक बांधकाम हे त्याकाळी श्रम मंत्रालयाच्या अंतर्गत होते. भारताच्या जलसिंचन , विद्युत निर्मिती तसेच नौकायन उद्योगात मोठे योगदान बाबासाहेबांचे आहे. या योगदानावर प्रकाश टाकण्याचा याशोधनिबंधाचा उददेश आहे. याबाबतीत डॉ.सुखदेव थोरात (माजी अध्यक्ष यु.जी.सी.) यांनी मूलगामी संशोधन केलेले आहे.

भारताच्या जलसंपत्ती विषयी डॉ.आंबेडकरांचे स्वतंत्र मत होते. त्यांच्या मते अतिरिक्त प्रमाणातील पाणी योग्य पध्दतीने समुद्रापर्यत पोहचले नाही. तर ते संक बनते. हया अतिरिक्त पाण्याचे योग्य नियोजन केले तर ते संपत्ती ठरते. महापूराच्या जलसमस्येकडे स्वतंत्र दृष्टीने पाहिल्याचे यावरून स्पष्ट होते. त्यांच्या श्रममंत्री पदाच्या काळात जलसिंचनाबाबतचे दोन बहुउद्देशिय प्रकल्प कार्यान्वीत झाले.

**दामोदर खोरे प्रकल्प** –डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दामोदर खोरे प्रकल्पाच्या उभारणीसाठी अभ्यासपूर्ण नियोजन केले . अतिशय वेगाने कार्यवाही करून कृति आराखडा तयार केला म्हणूनच १८ फेब्रुवारी १९४८ रोजी लोकसभेने दामोदर खोरे प्राधिकरणाच्या बिलास मंजूरी दिली आणि ७ जुलै १९४८ रोजी या प्राधिकरणाची निर्मिती झाली.

बंगाल, बिहारच्या जनतेवरील नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी अमेरिकेतील टेनेसी व्हॅली ॲथॉरिटीच्या धर्तीवर दामोदर प्रकल्प खोरे डॉ.आंबेडकरांनी कार्यान्वीत केला. या योजनेविषयी ते म्हणतात. ‛केवळ पूर नियंत्रणासाठी नदीवर धरणे बांधले जाऊ नयेत तर खोरे प्रकल्प निर्माण करीत असताना पूरनियंत्रण ,जलसिंचन ,विद्युत निर्मिती , नौकायन , उद्योगधंद्यासाठी पाणीपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचा साठा करणे असे अनेक उद्देश असावेत’. सर एच.सी. हर्ट, डॉ. सी.एच.भाभा यांनी या प्रकल्पाच्या उभारणीतील डॉ.आंबेडकरांच्या कार्याचा गौरव केलेला दिसून येतो.

**हिराकुंड प्रकल्प** –ओरिसा मधील महानदीला सतत येणारे महापूर ही ओरिसाची गंभीर समस्या होती. ८ नोव्हेंबर १९४५ रोजी डॉ. आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षतेखाली तेथे एक परिषद होवून हिराकूड प्रकल्पाची आवश्यकता विशद केली. व्हाईसरॉय वेव्हेल यांना या प्रकल्पाचे महत्व पटवून दिले. १५ मार्च १९४६ रोजी गव्हर्नर लेविस यांनी हिराकुड प्रकल्पाची पायाभरणी केली. ओरिसा राज्याचे नेते एच.के. मेहताब यांनी हिराकुड प्रकल्पाचे कार्य गतिमान केल्याबद्दल डॉ.आंबेडकरांचे जाहीर आभार मानले आहेत. इ.स. १९४६ ते १९५७ या काळात हिराकुड प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले.

**धरणग्रस्तांना नुकसान भरपाई** –धरणग्रस्तांबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अतिशय जागरूक होते ते म्हणतात. धरणे निर्माण करीत असताना शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमिनीच द्याव्यात. धरणग्रस्त शेतकऱ्यांना निव्वळ नुकसानभरपाई देणे एवढीच शासनाची जबाबदारी नसून त्या धरणग्रस्त शेतकऱ्यास पक्की निवासस्थाने उदरनिर्वाहाची नविन साधने व शासकिय नोकरीमध्ये प्राधान्य देण्याची ही जबाबदारी सरकारचीच असते. आजच्या संदर्भात सरदार सरोवर प्रकल्पाच्या धरणग्रस्तांनी मेघा पाटकरांच्या नेतृत्वात पाण्यात उभे राहून केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेबांचे या विषयीचे विवेचन अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विज निर्मिती धोरण** –भारतातील केंद्र सरकारने इ.स.१९४१ मध्ये ‛वीज आयोग कार्यालय ’ स्थापन केले. सन १९४२ साली डॉ. आंबेडकर यांनी श्रम विभागाचे मंत्री म्हणून पदभार स्विकारला तेव्हा श्रम विभागात ऊर्जा खात्याचा समावेश होत होता. डॉ.आंबेडकर हे विद्युत विकासासाठीच्या धोरण समितीचे अध्यक्ष बनले. वीज उत्पादन , वीज व्यवस्थापन आणि विज वितरण हया समस्यांवर डॉ. आंबेडकरांनी लक्ष्य केंद्रित केले. दि. २५ऑक्टोंबर १९४३ रोजी पहिली आणि दि. २ फेब्रुवारी १९४५ रोजी दुसरी बैठक या विद्युत विकासासाठीच्या समितीच्या डॉ.आंबेडकरांनी घेतल्या. या दोन बैठकीच्या कालखंडा दरम्यान त्यांनी विद्युत निर्मिती व्यवस्थापन व वितरण बाबतच्या धोरणाचा विस्तृत आराखडा तयार केला. तोच आराखडा भारताच्या वीज निर्मितीला कारणीभूत ठरला. त्यातील काही महत्वाच्या तरतूदी

**विजनिर्मिती विषयक आराखडा –**

१) विज ही जनउपयोगी बाब असल्यामुळे केंद्र सरकारने वीज उत्पादन व वितरण क्षेत्रात प्रत्यक्ष सहभागी व्हावे.
२) केंद्रशासनाने अखिल भारतीय स्तरावर केंद्रिय तांत्रिक ऊर्जा मंडळ स्थापन करावे.
३) विज विकास योजना राज्यसरकार किंवा निमशासकीय संस्थांच्या ताब्यात द्याव्यात.
४) यामध्ये ते असमर्थ असतील तर त्या खाजगी क्षेत्रास द्यावे.
५) एखादा विद्युत प्रकल्प दोन किंवा अधिक राज्यांना विद्युत पुरवठा करीत असेल तर अशा वीज प्रकल्पाचे नियंत्रण केंद्र सरकारकडे असावे.
६) देशातील वीजनिर्मिती क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक साधने उत्पादित करण्याचा केंद्र शासनाने प्रयत्न करावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या विजनिर्मिती व विज वितरणाबाबतचा अतिशय अभ्यास पूर्ण आराखडा तयार केला होता.ह्या आराखड्यानुसार देशाचे विजविषयक धोरण राबविले जाते.

**केंद्रिय तांत्रिक ऊर्जा मंडळ –**

डॉ. आंबेडकरांच्या आराखड्यातील तरतूदीनुसार केंद्रशासनाने दिनांक ८ नोव्हेंबर १९४४ रोजी केंद्रिय तांत्रिक ऊर्जा मंडळ स्थापन केले. सहा तज्ञांचा यात समावेश केला गेला. त्या तांत्रिक मंडळामार्फत भारतीय इंजिनिअयर्सना वीज अभियांत्रिकीचे अद्ययावत ज्ञान मिळविण्याकरीता प्रशिक्षणासाठी परदेशात पाठविण्याची आग्रही मागणी डॉ.आंबेडकरांनी केली त्यानुसार इंग्रज सरकारने भारतातील चार इंजिनिअर ब्रिटनमध्ये चार इंजिनिअर अमेरिकेत , दोन इंजिनिअर कॅनडात पाठवले यावरून डॉ.आंबेडकरांचे याबाबतीतले कार्य स्पष्ट होते.

**विदेशातून यंत्रसामुग्री आयात धोरण –**

भारतीय इंजिनियर्सनाविदेशात प्रशिक्षणाकरीता जसे आग्रही होते तसेच आग्रही धोरण डॉ.आंबेडकरांचे वीज निर्मिती करिता आवश्यक उपकरणे विदेशातून मागवण्याबाबत होते. ब्रिटिश भारतातून जाण्याअगोदर अशी यंत्रसामुग्री भारतात आणणे आवश्यक असल्याचे त्यांचे प्रयत्न यंत्रसामुग्री भारतात आणणे आवश्यक असल्याचे त्यांचे प्रयत्न होते त्यानुसार त्यांनी यंत्रसामुग्री ची यादी तयार केली व केंद्र सरकारच्या वतीने भारतातील वीज निर्मिती करीता लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची ऑर्डर ब्रिटनमधील संबंधित कंपन्याकडे पाठवून ते यंत्रे आरक्षित केली. वीजनिर्मितीकरीता यंत्रसामुग्री मागविण्यात विलंब हा भारताच्या हितास बाधा निर्माण करणारा होता म्हणून डॉ.आंबेडकरांनी वेळीच तातडीने कार्यवाही पूर्ण केली. इ.स.१९४३ ते १९४५ या काळातील बाबासाहेबांचे कठोर परिश्रम, जलद कृती,दूरदृष्टी ही वीज निर्मिती बाबत महत्वपूर्ण ठरतात. वीज विषयक धोरणाबाबत डॉ.आंबेडकर म्हणतात, "स्वस्त व मुबलक विजेशिवाय देशाची औद्योगिक प्रगती होऊ शकत नाही व औद्योगिक प्रगतीशिवाय लोकांची दारिद्र्यातून मुक्तता होऊ शकत नाही" देशाचे वीज निर्मिती धोरण ठरविताना डॉ. आंबेडकरांनी देशातला सामान्यातला सामान्यमाणूस डोळ्यासमोर ठेवल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष –**

इ.स.१९४२ ते १९४६ हया केवळ चार वर्षाच्या काळात केंद्रामध्ये श्रम विभागाचे मंत्री म्हणून कार्य करताना भारतातील अतिरिक्त पाण्याचे भीषण संकट दूर करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दामोदर प्रकल्प व हिराकूड प्रकल्प राबवले. त्यामुळे अतिरिक्त पाण्याचे संपत्तीमध्ये रूपांतर करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. सध्याच्या संदर्भात भारतातील नदीजोड प्रकल्प यादृष्टीने बाबासाहेबांचे याबाबतीतले मूलगामी धोरण दिसून येते. याच काळात विद्युत निर्मिती आराखडा त्यांनी तयार केला. विद्युतनिर्मिती मधून औद्योगिक प्रगती व त्यातून दारिद्र्य निर्मूलन असे त्यांचे लोक कल्याणकारी धोरण दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जल व विद्युत निर्मिती धोरणात ऐतिहासिक राष्ट्र निर्मितीचे त्यांचे कार्य स्पष्टपणे दिसून येते.

**संदर्भ –**

१) रायटींग ॲण्ड स्पिचेस ऑफ डॉ.आंबेडकर – व्हॅल्यूम –१, १९७९.
२) रायटींग ॲण्ड स्पिचेस ऑफ डॉ.आंबेडकर– व्हॅल्यूम –२, १९८२.महाराष्ट्र शासन.
३) डॉ. प्रल्हाद लुलेकर – दलितेत्तरासाठीचे बाबासाहेब.
४) डॉ. सिंगारे, डॉ.घुले – महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास , अरूणा प्रकाशन ,२००९

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

# विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक योगदान

**कु. वैशाली दशरथ चोरगे**
संशोधक विद्यार्थीनी,
इतिहास अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना –**

ज्या ठिकाणी शिक्षणाची सोय नाही. तेथे शिक्षण सुरु करणे व तेही शिक्षण कमी खर्चात व शक्यतो स्वावलंबन तत्त्वावर देणे हा रयत शिक्षण संस्थेचा प्रधान हेतू आहे. यामुळे संस्थेच्या कार्याचा प्रसार आपोआप ग्रामीण भागात जास्त झालेला आहे. तथापि काही मोठया गावी व शहरी पूर्वीच्या शैक्षणिक संस्था असून देखील संस्थेस कार्य सुरु करावे लागले. याचे कारण त्या गावच्या किंवा शहराच्या नागरीकांच्या आग्रहामुळे ज्या विद्यालयात बहुजन समाजाच्या विचाराचा तोंडावळा दिसेल व असेल अशी शाळा असवी असे त्या भागातील लोकांना वाटणे साहजिक आहे. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी संस्थेने अशा काही मोठया गावी अगर शहरी शाळा सुरु केल्या आहेत. अशापैकीच विटा, जि. सांगली हे एक केंद्र आहे. प्रस्तुत शोधनिबंधात विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेण्यात आला आहे.

**रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची पार्श्वभूमी –** कर्मवीरांनी ओगले व किर्लोस्कर कारखान्याचे विक्रेते म्हणून काम सुरु केले. त्यासाठी त्यांना भारतभर प्रवास करावा लागला. भारतातल्या, महाराष्ट्रातल्या सामाजिक परिस्थितीची जाणीव त्यांना झाली. हाच काळ त्यांच्या वैचारिक आंदोलनाचा काळ होता. त्यांच्या मनातला समाजसेवक खडबडून जागा झाला. त्यांच्या लक्षात आले. सत्य, सामाजिक समता, धार्मिक आणि आर्थिक स्वातंत्र्याचा पाया म्हणजेच शिक्षण, समाजाचे अज्ञान आणि दारिद्र्य दूर करायचे असेल तर शिक्षणा शिवाय तरणोपाय नाही. शिक्षण म्हणजेच जागृती, शिक्षण म्हणजेच समाजक्रांती आणि शिक्षण हेच नवसमाजाच्या निर्मितीचे साधन म्हणून त्यांनी सार्वत्रिक शिक्षण कार्याला सुरुवात केली.[१] किर्लोस्कर, कूपर, ओगले या भांडवलदारांनी, कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल बेजबाबदार विधाने केली. त्यामुळे कर्मवीर संतापले, त्यांनी प्रतिज्ञा केली की, माझ्या दाढीत जेवढे केस नाहीत, तेवढे पदवीधर मी निर्माण करीन आणि अन्याय करणाऱ्यांच्या छातीवर त्यांना थयथया नाचवेन. ज्योतिबांचा सत्यशोधकी वारसा, राजर्षी शाहूंची बंडखोरी, संत गाडगेबाबांचा परिवर्तनाचा ध्यास, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचा आजन्म सेवेचा वसा, महात्मा गांधींच्या स्वदेशी, स्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वाध्याय या सूत्रांचा प्राणमंत्र, दूधगावच्या आश्रमशाळेचा प्रयोग, ज्ञानदेव ध्रुव घोलप यांचे शिक्षणानंतरचे संपादकपद आणि आमदारकी या सर्वांचा संगम म्हणजे काल्याची 'सत्यशोधक परिषद' आणि या परिषदेमध्ये ४ ऑक्टोंबर १९१९ रोजी कर्मवीरांनी काले येथे रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली.[२]

**१. विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शिक्षणाची सुरुवात –**

**विटा हायस्कूल विटा**

कै. पायगौडा पाटील हे १९०२ सालच्या सुमारास विटा येथे सरकारी कचेरित नोकरी करीत होते. त्यावेळी भाऊराव पाटील हे विटा येथील प्राथमिक शाळेत शिकत होते. ते मराठी पाचवीची परीक्षा तेथेच पास झाले त्याचवर्षी भाउरावांना पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठविले, तेंव्हापासून विटयाबददल भाउरावांना आपुलकीच वाटत होती. या आपुलकीच्या शिक्षणभूमीत १५ मार्च १९५१ साली रयत शिक्षण संस्थेचे विटा हायस्कूल विटा ची स्थापना झाली.[३]

कै. भिमराव पाटील (पारे) यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत या हायस्कूलच्या स्थापनेचा नारळ फुटला, श्री. बी. व्ही. टिकले या शिक्षकास कर्मवीर आण्णांनी पहिले मुख्याध्यापक म्हणून नियुक्त केले. त्याच सभेत सर्व मुलांना मोफत शिक्षण दिले जाईल. अशी क्रांतिकारी घोषणा कर्मवीर आण्णांनी केली.[४]

विद्यालयाची सुरुवात साठ विद्यार्थी व दोन तुकडयांवर झाली. स्वतंत्र इमारत विद्यालयास नसल्याने प्रारंभी विद्यालयाचे वर्ग श्री. फुलचंद शहा यांच्या दत्तप्रसाद या इमारतीत भरत असत. दोन वर्षे हायस्कूल मोफत चालवले जात होते. आणि त्यानंतर भैरवनाथ विद्यार्थी वसतिगृहात विद्यालयाचे स्थलांतर करण्यात

आले विद्यालयाची स्वत:ची वास्तु असावी. यासाठी प्रयत्न सुरु झाले. इमारतीसाठी जागा मिळविणे आवश्यक होते. विद्यालयासाठी शितोळे व नातू आदि मंडळींनी जागा दिली. विटा व पंचक्रोशीतील अन्य उदार दात्यांनीही मदत केली तसेच शिक्षक आणि विद्यार्थी यांनी स्वत: श्रमदान करुन चार खोल्यांची इमारत उभी केली. १९६३ पर्यंत आणखी सात खोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले. १९६३ मध्ये विद्यालयाच्या इमारतीत बळवंत कॉलेज सुरु करण्यात आले. १९६९ नंतर इमारत विस्तारास परत गति आली. १९७८ मध्ये विद्यालयामध्ये १६ वर्ग होते.[५]

एकंदरित १९५१ ला स्थापन झालेल्या या हायस्कूलमध्ये १९५१.५२ ला विद्यार्थी संख्या ६० व तुकडया २ होत्या. १९५२.५३ मध्ये तीच संख्या ९० झाली व तुकडया २ होत्या. १९५३.५४ मध्ये विद्यार्थी संख्या ९४ तर १९५४.५५ मध्ये विद्यार्थी संध्या १३५ १९५५.५६ मध्ये विद्यार्थी संख्या १६१ होती. १९५६—५७ चे वैशिष्टय म्हणजे या साली मुलींनी हायस्कूलमध्ये प्रवेश घेतलेला दिसून येतो. १९५१—५५ पर्यंत येथे फक्त मुले होती. १९५६—५७ मध्ये विद्यार्थी संख्या १८५ होती. यामध्ये मुले १७९ व मुली ६ होत्या व येथून पुढे विद्यार्थ्यांची संख्या, तुकडया यामध्ये वाढ झालेली दिसून येते.[६]

या हायस्कूलमूळे विटे व त्या परिसरातील गोरगरीब जनतेच्या मुलामूलींना फार फायदा झालेला आहे. विटयात इतर कोणत्याही शाळेला लाभलेले नाही असे प्रशस्त क्रिडांगण, शास्त्र विभागासाठी पूर्ण विकसित अशा स्वतंत्र प्रयोगशाळा, स्वतंत्र शिक्षक ग्रंथालय व वर्ग वाचनालय, पुस्तक पेढी संचायिका बॅक, इ. सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनाला शिस्त व उत्तम वळण लावण्यासाठी स्काउट गर्ल गाईड व ज्युनिअर एन सी सी हे खास उपक्रम गेली कित्येक वर्षे विद्यालयात चालू आहेत. एस.एस.सी. परीक्षेत या विद्यालयाचे विद्यार्थी अनेकदा उत्तम गूण मिळवून केंद्रात पहिले आले आहेत. तसेच माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती व भारत सरकार निवासी शाळा शिष्यवृत्तीही काही विद्यार्थ्यांनी संपादन केली आहे.[७]

ग्रामीण आणि मागास समाजाच्या शैक्षणिक उध्दाराचा रयत शिक्षण संस्थेचा गेल्या अनेक वर्षाचा जो अखंड यत्न चालू आहे. त्याचाच एक छोटा अंश विटा हायस्कूलची वाटचाल आहे.

**२. उच्च माध्यमिक शिक्षणाची सुरवात —**
**संजय भगवानराव पवार ज्युनिअर कॉलेज, विटा**

कनिष्ठ महाविद्यालयास जे नाव दिले आहे ते संजय भगवानाराव पवार हे श्री. भगवानराव यशवंतराव पवार उर्फ वकील आबा व सौ. अनुसया पवार राहणार सुळेवाडी उर्फ रेवानगर यांचा एकूलता एक मुलगा होता. श्री. भगवानराव पवार हे प्रसिध्द द्राक्ष बागायतदार असून एक नामवंत कायदे तज्ञ वकील आहेत. त्यांचा मुलगा संजय अमेरिकेत सॉफटवेअर प्रोजेक्ट मायक्रोप्रोसेसिंग हा अभ्यासक्रम शिकत असतांना मित्रांच्या समवेत पिकनिकला गेला असतांना दि.२ संप्टेबर १९९५ रोजी संजय व त्यांचे मित्र त्यांच्या कारला अपघात झाला व कार त्यांच्यासह दरीत कोसळली व त्या अपघातात संजयचा मृत्यु झाला.

आपल्या एकूलत्याएका हुशार व लाडक्या मुलाचे जिवंत स्मारक उभारायचे आबांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी विटयात अनेक संस्था व शाळा महाविद्यालये असतांना सर्व सामान्य व बहुजन गरीब जनतेसाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे विटा हायस्कूलच्या कनिष्ठ महाविद्यालयास चिरंजीव संजय चे नाव देण्याची इच्छा व्यक्त केली रयत शिक्षण संस्थेच्या मॅनजिंग कमिटीने त्यांच्या इच्छेला हिरवा सिग्नल दाखवून मृतरुप दिले व साकारले संजय भगवानराव पवार ज्युनिअर कॉलेज, विटा या नावाने कॉलेजच्या इमारतीच्या बांधकामाकरीता ॲड. आबा व मातोश्री अनुसया भगवानराव पवार या उभयतांनी रु. १०,००,०००/— (दहा लाख) ची देणगी दिली. त्यातुन आजचीही भव्य व प्रशस्त इमारत उभी राहीली आहे.[८]

या कनिष्ठ महाविलयाचा नुतन इमारत उद्घाटन समारंभ मा. खासदार शरद पवार लोकसभा, मा. विरोधी पक्ष नेते, भारत सरकार, अध्यक्ष रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या हस्ते रविवार दि. २६/०४/१९९८ या साली झाला. या समारंभाचे अध्यक्ष मा. प्रा.एन.डी. पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था हे होते.[९] सुरवातीस हे महाविद्यालय विटा हायस्कूल येथे भरत होते. जागा अपूरी पडल्यामुळे सदर इमारतीचे बांधकाम करण्यात आले विटा हायस्कूलला जोडून इ. ११ वी चे कला आणि शास्त्र शाखेचे वर्ग १९७५ पासून सुरु होते. इ. १२ वी साठी कला आणि शास्त्र शाखेतून अभ्यासक्रम १९८३ पासून सुरु

झाला. १९७५ ला सुरु झालेल्या या कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी च्या विद्यार्थ्यांची संख्या १०७ होती. पूढे संख्या वाढत जावून २००० साली एकूण विद्यार्थी संख्या २४१ होती. त्यामध्ये कला शाखेत १५४ विद्यार्थी व शास्त्र शाखेत ८७ विद्यार्थी होते.[१०]

रयत शिक्षण संस्थेने लोकांच्या सहभागातून सुरु केलेल्या या कनिष्ठ महाविद्यालयामुळे विटा व आजूबाजूच्या खेडयातील गरीब, शेकडो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक विकास करण्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते. या महाविद्यालयाचे वैशिष्टय म्हणजे.

१) सुसज्य व प्रशस्त इमारत
२) सुसज्य व प्रशस्त प्रयोगशाळा
३) प्रशस्त ग्रंथालय
४) भव्य क्रिडांगण
५)हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन
६) विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना सी.ई.टी.चे मार्गदर्शन
७) गुणवत्ता वाढीसाठी उन्हाळी व हिवाळी जादा वर्ग मार्गदर्शन इ. सुविधा विद्यार्थ्यांसाठी या महाविद्यालयात उपलब्ध आहेत.[११]

### ३. वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाची सुरुवात — बळवंत महाविद्यालय, विटा

पन्नास वर्षापूर्वी रयत शिक्षण संस्थेच्या ज्ञान शाखेच्या, वटवृक्षाच्या एका फांदीपासून खानापुर तालुक्यात १५ ते २० ज्ञानशाखा रुजल्या, वाढल्या मात्र पुढील उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना त्याकाळी मोठया शहरात जावे लागे. अशा अनेक कारणांमुळे हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रावे लागे. खानापुर, विटा, आटपाडी, कडेगाव, माण—खटाव या सा—या परिसरात उच्च शिक्षण घेण्याची सोय नव्हती. साहजिक शैक्षणिक क्षेत्राकडे दुर्लक्ष होत होते. रयत शिक्षण संस्थेने खानापुर, विटा, कडेगाव परीसरामध्ये माध्यमिक शाखा सुरु केल्याने पुढील शिक्षणाविषयी चर्चा होऊ लागली. त्या काळी पश्चिम महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याची प्रसिध्दी खूप होती. त्यातच माहुलीचे देशमुख बंधु, ॲड. तात्यासाहेब भिंगारदवे, ॲड.आनंदराव पवार, मोहिते आण्णा, रा. सु. पाटील हे सर्व संस्थेशी संबंधीतच होते. ही सर्व मंडळी स्वातंत्र्यासाठी त्यागपूर्वक लढा देणारी आणि निरपेक्षभावाने समाजकारण करणारी गांधीवादी पिढी होती. वरील सर्व मंडळींनी राजकारण बाजूला ठेवून एक आदर्श सामाजिक कार्य म्हणून कॉलेज निर्मितीसाठी वाहून घेतले होते. रयत शिक्षण संस्था ही निरंतर प्रगतिपथावरील शिक्षणसंस्था असल्याने तिचे महत्व लक्षात घेऊन सर्वांनी रयतेचे कॉलेज विटा शहरात असावे असे ठरले. भूतपूर्व मामलेदार एन.आर. देसाई यांच्याच अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय समिती स्थापन केली आणि प्रत्यक्षात कार्याला सुरुवात झाली.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते आणि केंद्रीय मंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे आगमण विटा येथे झाले असता महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी शिष्टमंडळाने चव्हाण साहेबांची भेट घेवून विटयामध्ये कॉलेजची गरज कशी आहे हे पटवून दिले. त्यांनी या विधायक कार्यास तत्काळ होकार दिला. सर्वांच्या अथक प्रयत्नाने संस्थेकडून या कॉलेजला परवानगी मिळाली. संस्थेची मान्यता मिळूनही काही तांत्रिक अडचणी होत्या. जिथे महाविद्यालया सुरु करायचे असेल तिथे एस.एस.सी परीक्षेचे केंद्र असावे अशा प्रकारचा नियम होता. त्यामुळे १९६१ ला मान्यता मिळाली नाही. पुढील वर्षी १९६२ साली सर्वांच्या सहाकार्याने अखेर मान्यता मिळाली,परंतु त्याच वर्षी सार्वजनिक निवडणूका लागलयाने सर्वजन याच कार्यात गुंतल्याने महाविद्यालयाच्या उभारणीकडे दुर्लक्ष झाले. शेवटी जून १९६३ रोजी पूणे विद्यापीठ आणि रयत शिक्षण संस्था यांच्या वतीने या महाविद्यालयाची रीतसर स्थापना झाली. यशवंतराव चव्हाणांचे महाविद्यालयाच्या स्थापनेतील प्रशासकीय सहभाग तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांकडून होणारी मदत लक्षात घेवून तसेच यशवंतरावांचे वडील स्व. बळवंतराव चव्हाण यांची विटा ही कर्मभूमी व यशवंतरावांचे बालपण ही येथेच गेलेले असल्याने त्यांच्या वडिलांचे नाव महाविद्यालयाला देऊन त्यांचे स्मारक पिढयान—पिढया जतन होऊन त्यांच्या कर्मभूमीत साक्ष देत राहील याच उद्देशाने या महाविद्यालयाला बळवंत महाविद्यालय हे नाव देण्यात आले. या महाविद्यालयामध्ये सुरुवातीला कला व वाणिज्य शाखेचे पी.डी. व टी.डी. अशा दोन ज्ञानशाखा सुरु झाल्या.[१२]

१२० विद्यार्थी संख्या होऊन या महाविद्यालयाने आपल्या वाटचालीचा सुरुवात केली आज या महाविद्यालयाची विद्यार्थीसंख्या ही ४,५०० पेक्षा अधिक आहे. हेच महाविद्यालयाचे यश म्हणता येईल. आज या महाविद्यालयात ज्यूनियर विभागाअंतर्गत कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल इ. चे तर सिनिअर विभागाअंतर्गत कला, वाणिज्य, विज्ञान, बी. बी.ए., बी.सी.एस इ. शिक्षण दिले जाते.[१३]

**इमारत आराखडा —**

बळवंत महाविद्यालय सुरुवातीस विटा हायस्कूल विटा या शाखेच्या इमारतीत सुरुवातीची १२ वर्षे भरत होते. १९६७ मध्ये विज्ञान शाखा सुरु झाल्यावर इमारतीची आवश्यकता भासू लागली. म्हणून महाविद्यालयाने रु. १ लाख ८० हजारांची विज्ञान विभागासाठी इमारत अभारली नंतर ग्रन्टसमधून रु.४ लाखाची नवीन वास्तू उभारण्यात आली. जून १९७५ मध्ये महाविद्यालय स्वत:च्या इमारतीत आले. पण जागा अपूरी पडू लागली. सभागृह, रिडींग रुम,रिक्रीएशन सेंटर आणि ग्रंथालय यांना स्वतंत्र दालने नव्हती म्हणून मा. प्राचार्य शिवाजीराव भोर यांनी प्रमुख इमारतीचा संकल्प जाहीर केला. सर्व कार्यकर्ते, विविध संस्था यांच्याकडून देणगीचा ओघ वाहू लागला. सर्व पक्षातील, थरातील कार्यकर्ते भेदाभेद, अमंगल बाजूस ठेवून एक झाले. फेब्रुवारी १९७६ मध्ये मा. प्रतापशेठ साळुंखे यांच्या शुभहस्ते पाया खुदाई समारंभ झाला. २८ नोव्हें १९७६ रोजी मा. ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या शुभहस्ते कोनशिला समारंभ सोहळा संपन्न झाला. प्रमुख इमारतीच्या कामास गती मिळाली. आज अखेर १९७५—७६ सालापर्यत बांधण्यात आलेल्या वेगवेगळया वास्तूवर सुमारे रु. ९ लाख २५ हजार खर्च झाला आहे. स्वत:च्या मालकीच्या १४ एकर परिसरामध्ये महाविद्यालयाच्या इमारतींच्या योजनाबध्द बांधकामामुळे विटा. शहराच्या वैभवामध्ये भर पडली आहे.[१४]

१. **कमवा आणि शिका योजना —** कमवा व शिका ही योजना १९७५—७६ या वर्षी चांगल्या प्रकारे कार्यान्वित करण्यात आली होती. या योजनेत एकूण ८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यापैकी चार विद्यार्थी शास्त्र शाखेचे व चार विद्यार्थी कला शाखेचे होते. ''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' ही कर्मवीरांची घोषणा प्रत्यक्षात उतरविण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये सांगाल ते काम करण्याची शारीरिक व मानसिक तयारी आहे.

| | |
|---|---|
| १. महाविद्यालयाच्या ग्राउंडची सफाई | ३. झाडांना पाणी देणे |
| २. बागेत काम करेण | ४. लायब्ररीत काम करणे |

या शिवाय महाविद्यालयातील कोणत्याही प्रकारचे काम हे विद्यार्थी करतात. ही योजना कार्यान्वित करण्याचे श्रेय त्यावेळेचे महाविद्यालयाचे प्राचार्य एस.डी. भोर यांना आहे.[१५]

१९७५—७६ साली महाविद्यालयात कार्यान्वित करण्यात आलेली 'कमवा आणि शिका' योजना आजसुध्दा यशस्वीरित्या सुरु आहे. या योजनेमुळे गरीब व होतकरु विद्यार्थी यशस्वीपणे उच्च शिक्षण घेत आहेत.

२. **राष्ट्रीय सेवा योजना —** ही योजना महाविद्यालयात १९६९—७० सालापासून सुरु झाली. ही सेवा योजना केंद्र सरकारकडून व मध्यवर्ती सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने १९६९—७० साली कार्यान्वित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाकडे दिली. त्याच वर्षी या महाविद्यालयात ही योजना कार्यान्वित करण्यात मिळाली. राष्ट्रीय छात्र सेनेला पर्यायी म्हणून ही योजना मान्य करण्यात आलेली आहे. या योजनेचे मूळ उद्दिष्टय म्हणजे समाजसेवेतून शिक्षण हे आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास होण्यासाठी तो ज्या समाजात वावरतो त्या समाजाचे त्यास सत्य व सम्यक ज्ञान अनुभवातून यावे. श्रमाची प्रतिष्ठा त्यांच्या मनावर बिंबावी आणि समाजातील कोणत्याही प्रकारचे काम करण्यास मनाला संकोच वाटू नये. त्यासाठी विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेत दाखल करुन घेण्यात येते. १९६९—७० या वर्षी या योजनेत विद्यार्थी संख्या मर्यादित असल्याने ९० विद्यार्थी व १० विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आला होता. आज सुध्दा ही योजना उत्सफुर्त व यशस्वीपणे कार्यान्वित केली जाते.[१६]

३. **बुक — बॅक योजना —** गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी बुक बॅक योजना महाविद्यालयात राबविली जाते. या योजनेत सिनियर विभागाची ४२०५२ व ज्यूनिअर विभागात ७२३७ पुस्तके आहेत.[१७]

४. **वसतिगृहाची सुरुवात — भैरवनाथ विद्यार्थी वसतिगृह**

समाजाचे दारिद्रय, अडाणीपणा, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती यामुळे ग्रासलेला समाज, शिक्षणात मागे राहिलेल्या या समाजाचा उध्दार करण्यासाठी बाळकृष्ण मोहिते (आण्णा) यांनी आबा पाटील, सदाशिव पवार, गोविंदराव पवार, बाबूराव पाटील, रघुनाथ भाट यांच्यासह अनेक सहका—यांना जोडीला घेवून २१ डिसें १९४७

रोजी विटा येथे श्री. भैरवनाथ विद्यार्थी वसतिगृहाची घोषणा केली. व १९४८ च्या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्ष बोर्डींगची सुरुवात केली. १९५१ साली विटा हायस्कूलची स्थापना झाल्यानंतर या हायस्कूलला उच्चवर्णीयांचा कडाडून विरोध झाला. म्हारा—मांगाची शाळा म्हणून हेटाळणी करीत. त्यामुळे या हायस्कूलमध्ये मुल मिळत नसत. अशावेळी नाऊमेद होता, मोहिते आण्णा तालुकाभर फिरले व त्यांनी भैरवनाथ विदयार्थी बोर्डिंगमधील मुलांची संख्या वाढवली.व हया मुलांना विटा हायस्कूलमध्ये प्रवेश दिला.खांदयावर पोते टाकून, आण्णा तालुक्यातील गावागावात गेले.लोकांना मदतीचे आवाहन केले. कोणी सरपण दिले, कोणी मिरची कांदा, लसूण दिले, कोणी धान्य दिले, कोणी पैसे दिले. समाजाने आण्णांना भरभरुन दिले.कधीही रिक्त हस्ते पाठविले नाही. ही सर्व मदत घेवून आण्णांनी भैरवनाथ बोर्डिंग व विटा हायस्कूल या दोन्ही शाखा चालविल्या.[१८]

सन १९६३ मध्ये बळवंत कॉलेज ची स्थापना झाल्यानंतर सन १९६३ ते १९७५ या काळात बळवंत कॉलेज विटा हायस्कूल, विटा येथे भरत होते. तेंव्हा कॉलेजमध्ये प्रवेश होणारे विदयार्थी हे जत, आटपाडी, दहीवडी, कडेगाव अशा अनेक दूरदूरच्या गावाहून येत होते. कॉलेजला स्वत:ची इमारत नसल्याने वसतिगृहाला ही इमारत नव्हती. त्यावेळी याच भैरवनाथ बोर्डिंग मध्ये बळवंत कॉलेजच्या बाहेर गावाहून येणा—या विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली होती. बळवंत कॉलेज स्वत:च्या नव्या वास्तूत आल्यानंतर वसतिगृहाची नुतन इमारत झाली आज याच इमारतीत वसतीगृह असून वसतिगृहातील अनेक विद्यार्थी 'कमवा आणि शिका' या योजनेतून शिकत आहेत. [१९]

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर खेडयापाडयात उच्च शिक्षण पोहचावे म्हणून रयत शिक्षण संस्थेने जी महाविद्यालये स्थापन केली; त्यापैकी बळवंत हे एक महाविद्यालय आहे.

**सारांश —**

ज्या ग्रमीण शेतकरी कष्टकरी रयतेला शिक्षण व सुसंस्कारित जीवन यांचा लाभ झाला नव्हता. ज्या बहुजन समाजाला अज्ञान व दारिद्रय यांचीच सोबत होती. अशा मागासलेल्या सामान्य जनापर्यंत शिक्षणाची गंगा नेऊन त्यांचा उध्दार करण्याचे महान कार्य कर्मवीर भाउराव पाटील यांनी आपल्या रयत शिक्षण संस्थेमार्फत अव्याहतपणे केले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे विटा शहरातील रयत शिक्षण संस्थेची शैक्षणिक वाटचाल आहे. विटा शहरात रयत शिक्षण संस्थेने माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयांची तसेच बाहेरगावाहून येणा—या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सोय केल्यामुळे विटा शहर व आजूबाजूच्या खेडयातील बहुजन समाजातील मुलांना माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षणाची संधी मिळाली, निश्चितच विटा शहराच्या शैक्षणिक वाटचालीत रयत शिक्षण संस्थेचे योगदान अत्यंत महत्तवपूर्ण आहे.

**संदर्भ —**

१. मंगला कामत, महाराष्ट्रातील समाजसुधारक, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००१,पृ. ७२
२. विश्वास सायनाकर, चरित्र ग्रंथमाला प्रा. डॉ. एन. डी. पाटील, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, सप्टेंबर २०१२, पृ. १२५.
३. विटा हायस्कूल व संजय भगवानराव पवार ज्युनिअर कॉलेज, विटा, सुवर्ण महोत्सवी वर्ष स्मरणिका, २००१—०२, पृ.४१
४. विटा हायस्कुल रौप्य महोत्सव स्मरणिका,१९७८,पृ.७
५. कित्ता, पृ. ८
६. कित्त, पृ. १४
७. कित्ता, पृ. ९
८. संजय भगवानराव पवार ज्युनियर कॉलेज, शाखा अंतर्गत माहिती फाईल.
९. संजय भगवानराव पवार ज्युनियर कॉलेज, कोनशिला.
१०.विटाहायस्कुल,विटा,जनरल रजिस्टर, १९७५—२०००
११.विटा हायस्कूल व संजय भगवानराव पवार ज्युनियर कॉलेज, विटा, माहितीपत्रक.
१२.बळवंत कॉलेज, विटा सुवर्णमहोत्सवी विशेषांक २०१३—१४,पृ. २८—२९
१३.प्राचार्य डॉ.सुरेश साळुंखे यांचे प्रकाशकीय मनोगत, बळवंत कॉलेज,विटा,सुवर्णमहोत्सवी विशेषांक, २०१३—१४.
१४.बळवंतकॉलेज,विटा, वार्षिक अहवाल १९७६—७७, पृ.७६—७७.
१५.बळवंत कॉलेज,विटा,वार्षिक अहवाल १९७५—७६, पृ. ७६—७७.
१६.उपरोक्त, बळवंत कॉलेज सुवर्ण महोत्सवी विशेषांक, पृ. ८६.
१७.बळवंत कॉलेज, विटा वार्षिक अहवाल १९९७—९८.
१८.ॲड. सुभाष पाटील, समाजभूषण मोहिते आण्णा, प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, खंड २, ऑगस्ट १९९७, पृ. १७—१८.
१९.उपरोक्त, बळवंत कॉलेज, सुवर्णमहोत्सवी विशेषांक, पृ. ११५.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# माहिती साक्षरता आणि ग्रंथालय

**युवराज आनंदराव पाटील**
ग्रंथपाल, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक
कॉलेज, चिखली ता.शिराळा जि.सांगली

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकात माहिती विविध मार्गाने व विविध स्वरुपात मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. यातील नेमकी माहिती मिळविण्यासाठी कौशल्याची गरज आहे. यासाठी माहिती साक्षरता असणे आवश्यक आहे. इंटरनेटवरील माहितीच्या साठयामुळे माहिती साक्षरतेस महत्व प्राप्त झाले आहे. अमेरिकेत १९८० पासून माहिती साक्षरता ही संकल्पना रुढ आहे. पूर्वी ग्रंथालय शास्त्रात शिकविल्या जाणाऱ्या सुचीयुक्त अभ्यासक्रमाचे आधुनिक रुप म्हणजे माहिती साक्षरता होय. अमेरिकेतील ACRL या संस्थेने माहिती साक्षरते संदर्भात २००० साली मानके प्रसिद्ध केली.

महिती साक्षरतेचे शैक्षणिक कार्यक्रम राबवताना ग्रंथपालांना महत्व देण्यात आलेले आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर समाजातील सर्व घटक करु लागल्याने माहिती साक्षर नागरिक निर्माण करण्याची गरज भासू लागलेली आहे. याची जबाबदारी ग्रंथालय क्षेत्रातील तज्ञांना पार पाडावी लागणार आहे. या क्षेत्रात ग्रंथपालांना शिक्षकाची भूमिका पार पाडावी लागणार आहे. यासाठी यामध्ये पारंगत होणे ही गरज बनलेली आहे. शैक्षणिक तसेच सामाजिक संस्थाही माहिती तंत्रज्ञानाचा कामकाजात वापर करु लागल्याने माहिती साक्षर समाज ही गरज बनलेली आहे.

**माहिती साक्षरता संकल्पना :**

विविध क्षमतांचा एकत्रित परिणाम म्हणजे माहिती साक्षरता. आपणास हवी असलेली माहिती शोधून तिचा वापर करण्याची क्षमता प्राप्त करणे म्हणजे माहिती साक्षर होणे होय. तंत्रज्ञानाच्या युगात माहितीच्या स्त्रोतांचा सुकाळ आहे. आवश्यकतेपेक्षा मोठया प्रमाणावर माहिती उपलब्ध होत आहे. त्यातून आपल्याला हवी असणारी निवडक माहिती मिळवणे हे कठीण होत चाललेले आहे. माहिती आपल्याकडे ग्रंथालय, इंटरनेट, प्रसारमाध्यमे या विविध मार्गांनी येत असते व ती न निवडलेल्या स्वरुपात असते. तिच्या खरेपणाबददल, किंमतीबददल अनेक प्रश्न निर्माण होतात. माहितीची दर्जात्मक अनिश्चितता व संख्यात्मक मुबलकता हे मोठे आव्हान माहिती वापरण्यात निर्माण झाले आहे. मुबलक उपलब्ध माहितीमुळे माहिती क्षमता निर्माण होत नाही. यासाठी माहितीचा परिणामकारक वापर करण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे झाले आहे ही क्षमता माहिती साक्षरतेमुळे प्राप्त होते.

माहिती युगात वाचकांना ग्रंथालयात कोणती माहिती उपलब्ध आहे? तिचा स्त्रोत कोणता व ती प्राप्त कशी करावी, संदर्भ ग्रंथ कसे हाताळावेत तसेच त्यातील माहितीचा शोध कसा घ्यावा याबाबतचे मार्गदर्शन वाचकांना करणे गरजेचे झालेले आहे व ते काम ग्रंथालयाने करणे अपेक्षित आहे.यासाठी राबविण्यात येणारे कार्यक्रम अथवा उपक्रम म्हणजे माहिती साक्षरता असे म्हणता येईल.

आज दिशाच नवनव्या संकल्पनांच्या व ज्ञानाच्या मागे लागले असल्याने समाजातील प्रत्येकाने माहिती साक्षर होणे गरजेचे आहे. माहितीची विविध माध्यमे माहित असणे गरजेचे आहे. माहित असलेल्या स्त्रोतांमधून आपणास नेमकी माहिती मिळवणे व त्याच्या विभिन्न पद्धती माहिती असणे गरजेचे आहे. बहुतांशी ग्रंथालये आज आधुनिकीकरणाच्या टप्यावर आहेत. इंटरनेट हे माहिती मिळवण्याचे प्रभावी माध्यम आहे. काही क्षणात हवी असलेली माहिती आपल्याला मिळवता येते. मात्र यासाठी इंटरनेटचा उपयोग अधिक परिणामकारक कसा करावा, माहिती शोधण्याच्या विविध पद्धती कोणत्या याबाबतची माहिती असणे गरजेचे आहे. इंटरनेटव्दारा माहिती मिळवता येते पण ती निवडलेल्या स्वरुपात मिळेल याची यात्री नसते. त्याचबरोबर मिळालेल्या माहितीच्या विश्वासार्हतेचा प्रश्न असतो. तसेच माहितीची दर्जात्मक अनिश्चिता असते. त्यासाठी माहिती परिणामकारक वापरण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. माहिती साक्षरतेमुळे ही क्षमता प्राप्त होते.

माहिती साक्षरतेमध्ये माहितीच्या स्त्रोतापासून ते वापरापर्यंतच्या सर्व टप्प्यांचा विचार करावा लागतो. माहिती साठविण्यासाठी विविध साधनांचा वापर करावा लागतो. माहिती साक्षरतेसाठी उच्च दर्जाची नेटवर्कींग सुविधा, माहितीचा संचय करता येणारी साधने, माहितीची वेगाने देवाणघेवाण होवू शकेल अशा प्रकारचे जाळे तसेच वेगाने माहितीवर प्रक्रिया करता येईल असे संगणक अशा माहिती तंत्रज्ञानाशी निगडीत साधनांचा वापर माहिती साक्षरतेसाठी करता येतो.

**माहिती साक्षरतेची गरज :**

१. कोणत्याही क्षेत्रातील शिक्षण हे अंतिम नसते. प्रत्येक क्षेत्रात रोज नवनवीन शोध लागत असतात कारण संशोधन हे निरंतर सुरु असते. त्यामुळे रोज नविन ज्ञानात भर पडत असते असे ज्ञान अवगत असल्याशिवाय त्या त्या क्षेत्रातील प्राविण्य टिकवून ठेवता येत नाही. यासाठी नविन क्षमता निर्माण करण्यासाठी माहिती साक्षरतेची आवश्यकता निर्माण होते.

२. माहिती प्राप्त करणे एवढेच माहिती साक्षरतेमुळे शक्य होते असे नाही तर प्राप्त झालेल्या माहितीमधून वेगवेगळया कसोटयांचा वापर करुन अचूक माहिती मिळविण्याचे कौशल्य आत्मसात करता येते. साहजिकच संशोधनाचा दर्जा उंचाविण्यासाठी माहिती साक्षरतेचा उपयोग होतो.
३. माहिती साक्षरतेची विविध कौशल्ये आत्मसात करताना विद्यार्थ्यांना आपोआपच स्वयंनिर्देशित शिकण्याची संधी प्राप्त होते. नविन स्त्रोत वापरण्याच्या क्षमतेमुळे त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत जातात. त्यामुळे विद्यार्थी ग्रंथालय किंवा इंटरनेटवरील माहितीकडे जातात यासाठी माहिती साक्षरतेची गरज जाणवतो.
४. माहितीला किंमत असते. माहितीचे मूल्यमापन करणे माहितीच्या वापराचे कायदयाच्या तसेच सामाजिक दृष्टिकोनातून महत्व समजणे व माहिती नैतिकतेने मिळवणे या गोष्टीसाठी माहिती साक्षरता असणे गरजेचे असते.
५. माहिती साक्षरतेमुळे माहिती प्राप्त करण्याबरोबरच तिचे योग्य व्यवस्थापन करणे शक्य होते.
६. नविन विषयात सतत पडणारी भर, उपविषयामध्ये निर्माण होणाऱ्या नविन संकल्पना यामुळे कोणत्याही विषयाची माहिती मिळवणे जिकीरीचे होत आहे. विषयांचे आंतरप्रणाली स्वरुप समजण्यासाठी माहिती साक्षरतेची गरज भासते.

**माहिती साक्षरता व ग्रंथालये :**

ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाला ग्रंथालयातील माहिती असतेच असे नाही त्यामुळे त्याला माहिती साक्षरतेची गरज असते. ग्रंथालयामधील वेगवेगळया विभागांची माहिती उपलब्ध करुन देणे माहिती साक्षरतेमुळे सोयीचे होते. सर्व विभागातील माहितीस्त्रोत शोधण्यासाठी माहिती साक्षरतेचा उपयोग ग्रंथालयामध्ये होत असतो. ग्रंथालयामध्ये वाचन साहित्याची गरज ओळखून त्या वाचकाला योग्य प्रमाणात त्याची गरज भागविण्यासाठी वाचन साहित्य संग्रह विस्कळीत कसा करावा लागेल याचे मार्गदर्शन होते. वाचन साहित्याची गरज, त्याचा वाचकाला होत असलेला उपयोग, माहितीची परिणामकारकता यासाठी ग्रंथालयामध्ये सेवकांना माहिती साक्षरता असणे गरजेचे आहे. ग्रंथालये ही डॉक्युमेंटेशन केंद्रे म्हणून विकसित होत आहेत. त्यामुळे ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता प्राप्त करणे क्रमप्राप्त आहे. माहिती साक्षरतेमुळे ग्रंथालयांच्या विकासास चालना मिळते व ग्रंथालये कार्यक्षमपणे चालतात.

**सारांश :**

जागतिक पातळीवर सर्वच क्षेत्रामध्ये ज्ञानाचा व माहितीचा विस्तार जलद गतीने होत आहेण संगणकीकरणामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. माहिती तंत्रज्ञान विकसित होत आहे. कमी वेळात संदेशवहन होत असल्याने ज्ञानाच्या नविन वाटा खुल्या होत आहेत. आज जगातील कुठलीही घटना किंवा माहिती काही क्षणात जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकते. ज्ञानाच्या या प्रचंड विस्तारामुळे विचारांची दिशा, कल्पना शक्ती या सर्वांवर परिणाम होवून त्यांचे स्वरुप बदलले आहे. अशा या माहितीच्या विस्फोटास सामोरे जाण्यासाठी माहिती साक्षरता आवश्यक आहे. ग्रंथालयात वापरण्यात येणारे तंत्रज्ञान, डिजीटल ग्रंथालय, व्हर्चुअल ग्रंथालय अशा नविन संकल्पना आलेल्या आहेत. अशावेळी विद्यार्थ्यांना याची माहिती व तंत्र अवगत असणे गरजेचे आहे. या तंत्राची माहिती नसेल तर विद्यार्थी माहितीपासून वंचित राहिल म्हणून माहिती साक्षरता हे ग्रंथालयांचे अविभाज्य अंग बनलेले आहे.

**संदर्भ सूची :**

१. फडके द.ना., ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन २००७
२. Rao, Subba P.V. Library and information technology, New Delhi : Sonali Publication 2005.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

**डॉ. शर्मिला अशोक साबळे**
सहा. प्राध्यापक
राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रूकडी

**सौ. लक्ष्मी दादासो भोसले**
सहा. प्राध्यापक (सी.एच.बी.)
स.ब.खाडे महाविद्याल कोपार्डे

पिढ्यान पिढ्या बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. त्यामुळे तो सामाजिक विषमतेच्या आणि जातीभेदाच्या कर्दनात रूतून बसला होता. त्यामुळे ता चैतन्यहीन व आगतीक झाला होता. बहुजन समाजाचे अपमानित जीणे नष्ट करून त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे यासाठी ज्यांनी आपले जीवन झिजविले त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नांव अग्रक्रमाने घेतले जाते.महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ५० वर्षाहून अधिक काळ अविरत कार्य करून भाऊराव पाटील उर्फ आण्णांनी आपल्या स्वत:चा वैशिष्ट्यपूर्ण ठसा सामाजिक आणि शैक्षणिक जीवनात उमटविला आहे. महात्मा जोतिबा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांना गुरूस्थानी मानून त्यांचे अपुरे कार्य पूर्ण करण्याचा संकल्प आण्णांनी केला. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी ति. आण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाखा महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये आहेत. या शाखांमधून अनेक जातीधर्माची मुले शिक्षण घेत आहेत. रयत शिक्षण संस्था आणि ति. आण्णांची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन :** कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मूळ घराणे ऐतवडे असे सांगितले जाते. ऐतवडे (बुद्रुक) हे गाव सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात आहे. परंतु ऐतवडे हे त्यांच्या मूळ घराण्याचे गाव नसून मुडढीद्री हे त्यांच्या घराण्याचे गाव आहे. सद्याच्या कर्नाटक राज्यातील (पूर्वीचे म्हैसूर स्टेट) दक्षिण कन्नड जिल्हा तालुका मंगलोर येथे हे गाव आहे. मुडबीद्री हे जैन यात्रेकरूंचे प्रसिध्द ठिकाण आहे. या मुडबीद्री गावचे देसाई घराणे पुढे पाटील घराणे झाले.[१]

पायगोंडा पाटील यांना चार मुलगे व दोन मुली अशी सहा अपत्ये होते. पहिला मुलगा भाऊराव यांनी शिक्षणकार्यात ऐतिहासिक कार्य केले.[२]

पायगोंडा पाटील अतिशय सज्जन,पापभिरू,सत्य अहिंसा व सदाचार यांचे आचरण करणारे,वृत्तीने पुरोगामी व उदार अंतकरणाचे होते.अशा प्रकारे भाऊराव पाटील याच्या कार्याला परंपरेने मिळालेला हा वारसा होता.[३]

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन :** कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कुंभोज या गावी ता. २० सप्टेंबर १८८७ रोजी झाला. त्यांचे पूर्वज पिढ्यान पिढ्या शेती करत होते. त्यापैकी दोघांनी कोल्हापूरच्या जैनपीठाचे महारक पट्टाचार्य पदवी भूषविले होते. अशा पुनीत व सुसंस्कृत घराण्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म झाला.[४]

भाऊरावांच्या वडिलांना रोड कारकून म्हणून सातारा-पंढरपूर रस्त्यावरील पिलीव घाटात काम करावे लागले. झोपडी बांधून ते राहत असत. अत्यंत निर्जन उजाड असा तो घाट होता. या ओसाड घाटामध्ये भाऊरावांचे आई-वडिल दोघेच राहत होते. त्यावेही भाऊराव एक-दोन वर्षांचे होते. रात्री लांडगे येत, ते झोपड्यांना धडका मारीत, नख्यांनी झोपड्या ओरबाडीत असत. भाऊरावांच्या आई ही धीट होत्या. या सर्व गोष्टींचा संस्कार व वारसा म्हणून भाऊरावांच्या स्वभावामध्ये बेडरपणा आला.[५]

लहाणपणापासून भाऊराव बंडखोर होते. नोकरीच्या निमित्ताने त्यांना वडिलांबरोबर फिरावे लागे. वडिलांचा संबंध सर्वसामान्य थरातील लोकांशी येत असे.लोकांची गरीबी हालाखी,त्यांना पहावयास मिळे. समाजातील दु:ख पाहून त्यांना गहीवरून येई.

भाऊराव पाटील १२-१३ वर्षाचे असताना ते आजोबांकडे कुंभोजला गेले होते. आजोबांनी त्यांना एक चांगला कोट घालावयास दिला. तो कोट अंगात घालून भाऊराव ऐटित हिंडत होते. इतक्यात सिदू नावाचा एक सनदी महार आला. महाराच्या अंगावर चिंध्या झालेला अंगरखा होता. भाऊरावांनी ते पाहिलं आणि त्यांचे हृदय हेलावले. सिदू महार नको नको म्हणत असताना भाऊरावांनी आपल्या अंगावरचा कोट सिदू महाराला दिला.[६] यावरून भाऊराव पाटील यांच्यामध्ये धाडस व सेवावृत्ती होती असे दिसून येते.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण :**

भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण विटे दहिवडी अशा वडिलांच्या बदलीच्या ठिकाणी झाले. विटे येथे दत्तोपंत जोशी या प्राथमिक शिक्षकाने खाजगी इंग्रजी पहिलीचा वर्ग चालविला होता. तेथे भाऊरावांचे इंग्रजी पहिलीचे शिक्षण झाले. त्यापुढील शिक्षणाची सोय विटे येथे नसल्याने भाऊराव शिक्षणासाठी कोल्हापूर येथे दाखल झाले. [७]

त्याकाळी प्रवासाच्या सोयी नव्हत्या. डोकीवर सामानाची वळकटी घेवून भाऊराव आणवाणी पायी निघाले. विटयाहून ८-१० मैल दूर असलेल्या कुंडल (किर्लोस्करवाडी) स्टेशनला आले. कोल्हापूर ते स्टेशन रेल्वेने प्रवास केला. कोल्हापूरच्या जैन वसतिगृहामध्ये भाऊरावांची मामांनी सोय केली होती.

भाऊरावांच्या इंग्रजी शिक्षणाची सुरूवात कोल्हापूर येथील प्रायव्हेट हायस्कूलमध्ये झाली. इंग्रजी दुसरी व तिसरीचे शिक्षण तेथे घेतले. पुढील शिक्षण राजाराम हायस्कूलमध्ये झाले. नाम. गोपाळराव गोखले, न्यायमुर्ती रानडे, भास्करराव जाधव, माधवराव बागल असे नामवंत समाजसुधारक व राजकारणी मंडळीचे शिक्षण या शाळेत झालेले आहे.

१९०२ मध्ये भाऊरावांनी राजाराम हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. १९०२ ते १९०७ हा भाऊरावांच्या कोल्हापूरमधील शैक्षणिक कालखंड होय.

भाऊराव पाटील शिक्षण घेत असताना वर्गातील सर्वांचे आवडते होते. भाऊरावांची वृत्ती खिलाडू होती. अभ्यासात मागे असले तरी कुस्ती, पोहणे, मल्लखांब अशा क्रिडाक्षेत्रात ते पटाईत होते. खेळाच्या स्पर्धात त्यांचा प्रथम क्रमांक असायचा. त्यामुळे भाऊरावांचा मित्रपरिवार वाढला. सरदार पाटणकर, बाळासाहेब कारखानीस, डॉ. चव्हाण, ओगले या बड्या आसामी त्याकाळी भाऊरावांचे जीवलग मित्र बनल्या होत्या.[८]

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या न्यायाने आण्णांच्या कार्यांची चिन्हे त्यांच्या विद्यार्थी दशेतील वृत्तीमधून व हालचालीमधून स्पष्ट होत होती. कोल्हापूर येथील जैन बोर्डींगमध्ये राहत असताना तेथील बुरसटलेल्या व प्रतिगामी स्वरूपाच्या नियमांविरूध्द बंड करून उठण्याचे धैय्र केवळ भाऊरावच दाखवू शकले. जेवतेवेळी सोवळे नेसले पाहिजे, दाढी करावयाची झाल्यास ती जेवणापूर्वी केली पाहिले असले नियम पाळणे हे आण्णांच्या स्वभावामध्ये नव्हते म्हणून त्यांना जैन बोर्डींग सोडावे लागले.[९]

फक्त इंग्रजी सहावी अशी शिक्षणाची शिदोरी असलेल्या या मुलाने शिक्षणक्षेत्रात केलेली मुलुखगिरी आश्चर्याने थक्क करणारी आहे. हाच मुलगा पुढे शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील बनला.[१०]

भाऊराव मुंबईला गेले. सेठ माणिकचंद पानाचंद यांनी भाऊरावांचे नाव दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्स या खाजगी शिक्षण संस्थेत घातले. जैन वसतिगृहात राहण्याची, जेवण्याची सोय केली. परंतु भाऊरावांची शिक्षणात काही प्रगती झाली नाही आणि भाऊराव घरी परत आले.[११]

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्योतीराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू व महात्मा गांधी यांना गुरूस्थानी मानले. त्यांचा समाजसेवेचा मंत्र स्विकारला. आडाणी जनतेस साक्षर, सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला. सुशिक्षित व जागृक जनता हीच खऱ्या लोकशाहीची जननी असते. या सदंर्भात कर्मवीर भाऊरावांच्या रचनात्मक, राष्ट्रसंवर्धक व शाश्वत कार्याचे महत्त्व इतिहासात केवळ असामान्य अतुलनीय असेच नोंदले जाईल.[१२]

कर्मवीर भाऊरावांच्या जीवनावर महात्मा फुले यांच्या प्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा व विचारसरणीचा फार मोठा प्रभाव पडलेला आढळून येतो. शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्यामुळे भाऊरावांना फार मोठी प्रेरणा लाभली होती.[१३]

कर्मवीर भाऊराव पाटील किर्लोस्कर कारखान्यात सेल्स ऑर्गनायझर म्हणून काम करीत होते. तरी त्यांचे सत्यशोधक समाजाचे व सत्यशोधक समाजाच्या अनुषंगाने करीत असलेले शिक्षणाचे कार्य चालू होते. लक्ष्मणराव किर्लोस्कर यानाही हे माहीत होते. बाहेरचे सामाजिक कार्य करीत असूनही भाऊराव किर्लोस्कर कारखान्याचे काम सचोटीने व प्रमाणिकपणे करीत असत. दुधगाव, काले, नेर्ले ही सत्यशोधक चळवळीची केंद्रे होती. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांची ही गावे होती. भाऊराव नेहमी तेथे जात असत. गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रगतीसाठी एक संस्था असावी असे येथील कार्यकर्त्यांना व भाऊरावांना वाटू लागले.[१४]

मोहिते नावाच्या खेडयातील एका हरीजन विद्यार्थ्याला घेवून भाऊरावांनी शिक्षणकार्याला सुरूवात केली. पिढयान पिढया ज्यांना विद्येच्या श्रीगणेशापासून वंचित ठेवलेले होते. अशा हरीजन मुलाला घेवून भाऊरावांनी आपल्या शिक्षणकार्याचा श्रीगणेशा केला. भाऊरावांनी सातारा हेच शहर आपल्या शिक्षणकार्याचे केंद्र म्हणून निवडले. भाऊरावांनी आपल्या शिक्षणकार्याची सुरवात यापूर्वी सातारा येथून केली होती. भाऊरावांनी शिकवण्या घेवून साताऱ्यातील शिक्षणप्रेमी जनतेत नाव मिळविले होते. सातारा सत्यशोधक चळवळीचे केंद्र होते. सत्यशोधक समाजाच्या कामामुळे भाऊरावांना येथील प्रमुख मंडळी परिचयाची होती.[१५]

भाऊराव पाटील सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते होते. सर्व जाती जमातीच्या मुलांना एकत्रित घेवून त्यांचा अभ्यास करवून घेणे, पुस्तके, वह्या, शाई इ. लागेल ते शिक्षण साहित्य पुरविणे. त्यांच्या दिवा बत्तीची सोय करणे. मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे. त्याना व्यसनापासून मुक्त ठेवणे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणे हा त्यांचा संस्था स्थापन्येमधील उद्देश होता. त्यांनी एक वसतिगृहही सुरू केले होते. भाऊसाहेब कुदळे, आप्पासाहेब पाटील, नाना येडेकर, श्यामगोंडा पाटील, शंकर कुदळे या मंडळींनी विशेष प्रयत्न केले. या संस्थेची मुळ जबाबदारी मादाण्णा मास्तर यांच्यावर सोपविलेली होती. मादाण्णा मास्तर हे प्राथमिक शिक्षक होते. या वसतिगृहात सर्व जातीधर्माची मिळून ५० मुले होती.[१६]

रयत शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ ५-९-१९१९ साली रोवली गेली. सत्यशोधक समाजाची मोठी परिषद काले या गावी भरली होती. काले हे कराड तालुक्यातील व सातारा जिल्ह्यातील गाव. काले येथील या परिषदेसाठी अनेक जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने आले होते. पुण्याचे नामवंत कायदेपंडीत व सत्यशोधक चळवळीचे खदे पुरस्कर्ते केशवराव बागडे हे या परिषदेचे अध्यक्ष होते. काले गाव हे उत्साही व उमदया सत्यशोधक कार्यकर्त्याचे गाव म्हणून ओळखले जात होते. नारूकाका, दाजी पाटील, भाऊराव चौगुले इ. काले गावची प्रमुख कार्यकर्ते मंडळी होती. भाऊरावांनी या परिषदेत आपले विचार प्रभावीपणे मांडले ते पुढीलप्रमाणे.[१७]

सत्यशोधक चळवळीची पूर्ती करायची असेल तर सर्व दु:खाचे मूळ अज्ञान आहे. हे अज्ञान घालवावयाचे असेल तर दीन, दलीत, बहुजन समाजातील मुलांना शिक्षण दिले पाहिजे. समाजातील सर्व थरामध्ये शिक्षण गेले पाहिजे हे राष्ट्रसंवर्धनाचे व संगोपणाचे काम आहे. बहुजन समाजातील सर्व मंडळींनी एकत्रीत येऊन हे काम केले पाहिजे. सत्यशोधक चळवळीचे हे पहिले काम आहे. म्हणून या ठिकाणी एका शिक्षण संस्थेची स्थापना केली पाहिजे.'' भाऊरावांनी उत्स्फुर्त असे विचार मांडले. भाऊरावांची कल्पना सर्वांनी उचलून धरली. याच परिषदेत शिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा झाली. तसा ठरावही मंजूर झाला. संस्थेला नाव काय द्यावयाचे याबद्दल बराच खल झाला. शेतकरी म्हणजे 'रयत' रयतेला शिक्षण देण्यासाठी संस्था काढण्याचा विचार केंद्रस्थानी असल्यामुळे प्रस्तावीत शिक्षण संस्थेला 'रयत शिक्षण संस्था' असे नाव देण्याचे सर्वानुमते ठरले. बहुमताने हा ठराव मंजूर झाला. या संस्थेतर्फे प्रथम एक वसतिगृह सुरू करण्यात आले. वसतिगृहात प्रवेश घेण्याकरिता प्रवेश अर्ज, वसतिगृहातील नियम इ. साहित्य छापून घेतले.

संस्थेचा प्रथम अहवाल प्रसिद्ध झाला. अहवालामध्ये संस्थेने दिलेले उद्देश खालीलप्रमाणे नांदविले आहेत.

**संस्थेचे नांव : रयत शिक्षण संस्था, काले.**

४ ऑक्टोंबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहुर्तावर रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.[१८]

**संस्थेचे उद्देश :**

१. मागासलेल्या वर्गात शिक्षणाची अभिरूची उत्पन्न करणे.
२. मागासलेल्या जातीतील अत्यंत गरीब विद्यार्थ्यास शक्य तर मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे.
३. सामान्य स्थितीतील विद्यार्थ्यास त्याच्या खर्चाने किंवा फारतर निम्म्या खर्चाने संस्थेत शिक्षण घेण्याकरिता ठेवणे.
४. ज्यांची सांपत्तीक स्थिती समाधानकारक आहे. अशा परगावच्या मागासलेल्या विद्यार्थ्यांची त्यांच्याच खर्चाने संस्थेत सोय करणे.
५. मागासलेल्या वर्गातील निरनिराळ्या जातीतील विद्यार्थ्यांमध्ये प्रेमभाव उत्पन्न करणे.
६. पूर्वकालीन अंधरूढीस फाटा देवून खऱ्या मार्गाचा अवलंब करण्याचे वळण देणे.
७. मिळून मिसळून वागण्यापासून संघशक्ती निर्माण होते तिचे महत्त्व कृतीने पटविणे.
८. मुले काटकसरी, स्वावलंबी, उद्योगी, उत्साही व शिलवान बनविण्याचा प्रयत्न करणे.
९. संस्थेचे शिक्षणाच्या बाबतीतील कार्यक्षेत्र वाढविणे.

संस्था सुरू करणे सोपे असते. परंतु सातत्याने चालविणे व ती टिकविणे अत्यंत अवघड व कठीण असते. भाऊराव किर्लोस्कर कारखान्यांमध्ये नोकरीस असल्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे त्यांना जमेनासे झाले. त्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

सुरवातीच्या काळात वसतिगृहाचा दैनंदिन खर्च भागविणे अवघड होते. दुधगाव, काले नेर्ले या ठिकाणी वसतिगृह सुरू केले. वसतिगृहाच्या मुलांची, जेवण्या-खाण्याची पुस्तके, वह्या, पाटी, दफ्तराची शैक्षणिक साहित्याच्या खर्चाची मोफत सोय करणे आवश्यक होते. हे मोफत शिक्षणदानाचे काम सातत्याने चालले पाहिजे, खर्चाचे सातत्य राहिले पाहिजे व लोकांचा या कामात सहभाग व आत्मियता असली पाहिजे याकरीता भाऊरावांनी एक अभिनव योजना सुरू केली.[१९]

वसतिगृहातील सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेले होते त्यांच्याकडून पैशाच्या रूपाने वसतिगृहास देणगी मिळणे अवघड होते. पूर्वी पिठाच्या गिरण्या नव्हत्या, भल्या पहाटे उठून स्त्रीया घरीच दळण दळत असत. दळण्यापूर्वी वसतिगृहासाठी मूठभर धान्य काढून ठेवावयाचे अशी भाऊरावांनी योजना तयार केली. जात्यावर एक पिशवी टांगलेली असे. दळायला बाई जात्यावर बसली की सुपातले मूठभर धान्य त्या पिशवीत टाकावयाचे पिशवीत टाकलेले मूठभर धान्य एका आठवड्यातून घराघरातून गोळा करावयाचे हे काम विद्यार्थी करीत असत. भागातील प्रतिष्ठीत मंडळींनी या योजनेला चांगले सहकार्य केले.

भाऊरावांनी महाराष्ट्रभर शाळा व वसतिगृहे सुरू केली. सुगीच्या दिवसामध्ये शिक्षक व वसतिगृहातले विद्यार्थी खळ्यांवर जाऊन धान्य गोळा करीत असत. जमिनीचा सारा वसूल करताना शाळेकरीता देणगी गोळा केली जाई. ज्याच्या घरी लग्न साहेळा असेल त्याच्या घरी जाऊन देणगीची पावती फाडली जाई. लोकही खुषीने देणगी देत असत. भाऊरावांच्या कार्याबद्दल लोकांमध्ये जागृती व अत्मियता निर्माण झाली. सर्वत्र भाऊरावांचे कार्य पोहचले.[२०] भाऊरावांच्या शिक्षण कार्याचा प्रचार व प्रसार घरोघरी व्हावा व हा शिक्षणाचा यज्ञ अव्याहत सुरू रहावा हा या मागे उद्देश होता.

१९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. कराड तालुक्यातील काले येथे एक वसतिगृह सुरू केले. काले गावाजवळ धेंडेवाडी गाव आहे. या गावामध्ये संस्थेने एक शिक्षकी शाळा सुरू केली. संस्थेची ही पहिली प्राथमिक शाळा होय. १९२१ साली या शाळेची नोंदणी झाली. या शाळेत ४८ विद्यार्थी होते. शिराज

अहमद पिंजारी हा या शाळेत नाममात्र रक्कम स्विकारून शिक्षक म्हणून काम करीत होता. पिंजारी हा काले येथील संस्थेच्या वसतिगृहातील माजी विद्यार्थी होता.[२१]

रयत शिक्षण संस्थेने बोधचिन्ह वडाचे झाड हे आहे. हिंदू धर्मामध्ये वड, पिंपळ, उंबर ही झाडे पवित्र समजली जातात. यामध्ये ब्रम्हा, विष्णू, महेश यांचा वास आहे अशी श्रद्धा आहे.[२२] संस्थेच्या जीवनामध्ये धनिनीच्या बागेस ऐतिहासिक असे महत्त्व आहे. या बागेत प्रवेश केल्यावर प्रचंड असे वडाचे झाड होते. लांबून ते वडाचे झाड वाटे, परंतू त्यामध्ये अर्धा पिंपळ व अर्धा वड असे एकत्रित झाड होते. झाडाला दगडाचा पारकट्टा होता. तीनशे वर्षापूर्वीच्या प्रचंड अशा या झाडाच्या बुंध्याचा घेर ३०-३५ फुट असावा. याच्या असंख्य पारंब्या जमिनीला टेकलेल्या होत्या. सुरवातीला या झाडाखाली सर्व कार्यक्रम चालत असत. घरदार सोडून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे हे झाड म्हणजे आधारस्थान होते. संकटकालामध्ये या वृक्षाखाली बसल्यावर भाऊरावांना आधार वाटे. सर्वांचा हा आधार वड होता. नेहमी हिरवेगार वाटणाऱ्या या झाडाची फांदी दुसरीकडे लावल्यास तेथेही रोप वाढून झाड बनत असे. कोणाही पांथस्थाने या झाडाखाली येवून तृप्त व्हावे. म्हणून कर्मवीर भाऊराव नेहमी म्हणत, ‘‘वटवृक्षासारखी माझी संस्था आहे. संस्थेची कोठेही शाखा सुरू केली की ती
वाढते’’ म्हणून भाऊरावांनी संस्थेचे बोधचिन्ह म्हणून वडाचे झाड निवडले.

वृक्षाचे महत्त्व खूप मोठे आहे. ऋषीमुनी या वृक्षाखाली बसून ध्यानधारणा करीत असत. गौतम बुद्धाला बोधीवृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले. ‘‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ हा गौतमाचा संदेश आहे. भाऊरावांनीही तोच संदेश स्विकारला. बुद्धांनी भिक्षू तयार केले, भाऊरावांनी ध्येयवादी ‘आजीव सेवक’ तयार केले. अनेकांना परदेशी पाठवून विद्याविभूषित करून आणले. अनेक सुधारकांना करता आले नाही ते भाऊरावांनी केले. त्यांनी ध्येयवादी माणसे तयार केली. आजीव सेवक तयार केले व त्यांच्याद्वारे संस्थेच्या वटवृक्षाचा पसारा वाढविला.[२३]

सद्या रयत शिक्षण संस्था ही अशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्या उद्देशाने या संस्थेची स्थापना केली तो उद्देश सफल झाला आहे. समाजातील सर्व जातीधर्माची मुले मुली रयत शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या विकासाचा थोडक्यात आढावा पुढील मुद्यांवरून समजून येऊ शकेल.

**संस्थेची विकासात्मक वाढ :**

रयत शिक्षण संस्था शताब्दीकडे वाटचाल करीत आहे. सर्वांना शिक्षणाची समान संधी लाभली पाहिजे. ह्या ध्येयाने प्रेरीत होऊन जात, गोत, धर्म, पंथ इ. सामाजिक भेद नष्ट करून समता, बंधुत्त्व, मानवता ह्याकडे स्वावलंबनाने संस्थेची वाटचाल सुरू आहे. ती पुढीलप्रमाणे -

**१.वसतिगृहे :**कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी वसतिगृहाच्या स्थापनेने संस्थेच्या कार्याला सुरवात केली. संस्थेच्या स्थापनेबरोबरच सन १९१९ मध्ये काले येथे पहिले वसतिगृह स्थापन करण्यात आले. १९२१ साली नेर्ले येथे वसतिगृह स्थापन केले होते. संस्थेच्या स्थापनेपूर्वीही कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक प्रयोग सुरू होते. शिक्षण संस्थेच्या स्थापनेपूर्वी सुमारे दहा वर्षे दुधगाव येथे वसतिगृह चालविले जात होते.

संस्थेने सातारा येथे १९२४ साली वसतिगृह सुरू केले. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी १९३२ साली स्मृतीप्रित्यर्थ पुणे येथे युनियन बोर्डींग हाऊसची स्थापना केली.स्वातंत्र्यपूर्व काळातही ह्या सर्व वसतिगृहांमध्ये मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांसह आठरापगड जातीच्या विद्यार्थ्यांना एकत्र राहण्याचे, जेवण्याचे व काम करण्याचे धडे दिले.इ.स.२००४-०५ मध्ये मुला,मुलींच्या ६८ वसतिगृहांमध्ये ही व्यवस्था आहे.

**२.शिक्षकांचे प्रशिक्षण :** शाळेविना खेडे असू नये व प्रशिक्षित शिक्षकाविना शाळा असू नये ही डॉ. भाऊराव पाटील यांची धारणा होती. १९३५ साली सातारा येथे संस्थेतर्फे अध्यापक विद्यालयाची स्थापना केली ही संस्थेची पहिली शैक्षणिक शाखा होय. संस्थतर्फे इ.स. २००४-०५ मध्ये एकूण ८ अध्यापक विद्यालये चालविली जातात.

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

**३.पूर्वप्राथमिक शिक्षण :** पूर्व प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे संस्थेने १९५४ पासून एक बालवाडी व एक बाल वसतिगृह चालविले इ.स.२००४-०५ मध्ये मराठी व इंग्रजी माध्यमाच्या मिळून संस्थेतर्फे एकूण १६ बालवाड्या चालविल्या जातात.

**४.प्राथमिक शिक्षण :**धोंडेवाडी (ता. कराड, जि. सातारा) येथे संस्थेने १९१९ साली एक प्राथमिक शाळा चालविण्यास सुरवात केली. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने शाळा विरहीत खेड्यात संस्थेने १९३८ पासून व्हॅलेंटरी शाळा उघडण्यास सुरवात केली. अशा शाळांची संख्या ५७८ होती. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्विकारल्यामुळे शिक्षकांसह या शाळा लोकल बोर्डाकडे सुपुर्द केल्या. इ.स. २००४-०५ मध्ये संस्था २६ प्राथमिक शाळा चालविते. त्यामध्ये ५ शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत.

**५.माध्यमिक शाळा :**१९४० मध्ये सातारा येथे महाराजा सयाजीराव विद्यालय या मोफत व निवासी माध्यमिक शाळेची स्थापना करण्यात आली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९४८ साली महात्मा गांधी यांच्या स्मरणार्थ संस्थेतर्फे १०१ माध्यमिक विद्यालये सुरू करण्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील १४ व कर्नाटकातील एक अशा दोन राज्यातील १५ जिल्ह्यात इ.स. २००४-०५ मध्ये ४३६ माध्यमिक विद्यालये चालविली जात आहेत.

**६.उच्च माध्यमिक शिक्षण :** महाराष्ट्र शासनाने १९७२ पासून १० + २ + ३ असा आकृतीबंध स्विकारला. त्यानुसार संस्थेच्या १६० माध्यमिक विद्यालयांमध्ये इ.स. २००४-०५ मध्ये ११ वी व १२ वीचे वर्ग सुरू आहेत.

**७.उच्च शिक्षण :**संस्थेने १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज या मोफत व निवासी कॉलेजची स्थापना केली. आर्टस्, सायन्स, कॉमर्स महाविद्यालये, प्रशिक्षण देणारी महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये व विधी महाविद्यालये मिळून इ.स. २००४-०५ मध्ये संस्थेतर्फे ४० महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे.

**८.आश्रमशाळा :** महाराष्ट्रातील आदिवासी भागामध्ये उपेक्षितांसाठी संस्थेने १९९१-९२ पासून आश्रमशाळा चालविण्यास सुरवात केली. इ.स. २००४-०५ मध्ये संस्थेमध्ये ८ आश्रमशाळा आहेत.

**९.तांत्रिक शिक्षण :**काही माध्यमिक विद्यालयामधून संस्थेने तांत्रिक शिक्षणाचे विभाग सुरू केले. आज संस्थेच्या २१ माध्यमिक विद्यालयातून वर्कशॉपसह परिपूर्ण तांत्रिक विभाग सुरू आहे. कनिष्ठ विभागात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे.

सातारा येथे १९८३ पासून अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'कर्मवीर भाऊराव पाटील' अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन असे नामकरण झाले. ह्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय आहे. इ.स. २००४-०५ मध्ये संस्थेमार्फत दोन ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) चालविल्या जातात.

**१०.माहिती व तंत्रज्ञान :** माहिती व तंत्रज्ञान ह्यांचे एकविसाव्या शतकातील महत्त्व ध्यानात घेऊन संस्थेने १९९६-९७ पासून ह्या क्षेत्रात पदार्पण केले आहे. संस्थेच्या माध्यमिक व काही महाविद्यालयात संगणक शिक्षण सुरू आहे. संस्थेने डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हे संगणक शिक्षणकेंद्र १-२-१९९९ पासून सुरू केले. त्यामध्ये एम.एस.सी.आय.टी., एम.एस.ए.सी.आय.टी. व कोडॅक हे अभ्यासक्रम सुरू आहेत.

**११.स्त्री-शिक्षण :**संस्थेच्या व्हॅलेंटरी शाळापैकी काही शाळा फक्त मुलींसाठी चालविल्या जात होत्या. संस्थेचे पहिले अध्यक्ष हमीद अली यांच्या पत्नी सौ. बेगम यांनी भाऊराव पाटील यांच्या स्त्री शिक्षण कार्याला विशेष प्रोत्साहन दिले. आवश्यक अशा स्त्री शिक्षिका तयार करण्यासाठी संस्थेने १९४२ साली सातारा येथे जिजामाता अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली. त्याचवर्षी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मरणार्थ सातारा येथे मुलींचे वसतिगृह सुरू केले. डॉ. आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ १९६० साली मुलींसाठी एक माध्यमिक विद्यालय सुरू करण्यात आली.

**१२.रयत प्रिंटीग प्रेस :** १९८२ साली सातारा येथे रयत प्रिटींग प्रेस सुरू करण्यात आली. अहमदनगर येथे ही प्रिंटींग प्रेस सुरू आहे. या प्रेसमार्फत रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयांना व शाखांना लागणारे विविध प्रकारचे साहित्य छापून पुरविले जाते. तसेच संस्थेची नियतकालीके छापून दिली जातात.

**१३.वही व प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका निर्मिती :**संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत ३ लाख प्रयोग वह्या व १२ लाख स्वाध्याय वह्या इ. ची दर्जेदार निर्मिती संस्थेच्या शिक्षकांकडून प्रथमच केली जात आहे. संस्थेतर्फे उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिक तयार केल्या जातात.

**१४.शैक्षणिक साहित्य उत्पादन केंद्र :**संस्थेच्या शाखांना दर्जेदार व टिकाऊ फर्निचर कमीत कमी किंमतीत मिळावे यासाठी फर्निचर वर्कशॉप सुरू करण्यात आलेले आहे. या वर्कशॉपमध्ये शाखांच्या मागणीनुसार ड्युएल डेक्स, कपाटे, खुर्च्या, टेबल इ. साहित्य पुरविले जाते. सदर साहित्य बाजार भावापेक्षा कमी किंमतीत पुरविले जाते.

**१५.सहकारी तत्त्वावर चालविलेल्या संस्था :**

१. दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.
२. रयत सेवा को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स लिमिटेड आणि
३. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढी लिमिटेड ह्या सहकारी कायद्यानुसार नोंदविलेल्या संस्था आहेत.

**१६.सेवकांच्या सहकार्याने चालविलेल्या शाखा :**

१. रयत शिक्षण संस्था सेवक वेलफेअर फंड
२. रयत शिक्षण संस्था सेवक कुटुंब कल्याण योजना

**१७.कर्मवीर स्मृतीभवन :**कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या अमूल्य कार्याचे स्फूर्तीदायी स्मरण भविष्यकालीन पिढ्यांना अखंडपणे रहावे या हेतूने कर्मवीर स्मृतीभवनाची उभारणी केलेली आहे. स्मृतीभवनाचे बांधकाम १९९४ साली पूर्ण झाले. ह्या स्मृती भवनात कर्मवीर आण्णांच्या रोजच्या वापरातील कपडे, खुर्ची, काठी, कपबशी, पेन, घोंगडी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी भेट म्हणून दिलेली मोटार इ. वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांच्या जीवनकार्याची सामाजिक कालखंडाची तपशील व बारकावे टिपणारी असंख्य छायाचित्रे या भव्य व देखण्या वास्तूत प्रदर्शित करण्यात आलेली आहेत. स्मृतीभवनाच्या प्रांगणात कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील याचे पुर्णाकृती पुतळे उभे करण्यात आलेले आहेत. [२४]

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मृत्यू :** भाऊरावांचे शरीर थकलेले होते. अशा अवस्थेतही भाऊरावांची धडपड चालू असायची. स्वस्थ पडून राहण्याचा व विश्रांती घेण्याचा स्वभाव भाऊरावांचा नव्हता. म्हणून त्यांना ससून रूग्णालयात ठेवण्यात आले होते. संस्थेचा व्याप प्रचंड वाढलेला होता. भाऊरावांना भेटण्यासाठी माणसांची सारखी रीघ लागलेली असायची. कोणीही भेटू नये अशी डॉक्टराची ताकीद होती. तरीही लोक भाऊरावांना भेटत असत. ''मला लोकांना भेटू द्या म्हणजे माझा आजार कमी होईल'' असे भाऊराव म्हणत असत. [२५]

भाऊरावांना लघवीचा विकार जडला होता. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नानंतरही प्रकृतीला आराम न पडता ९ मे १९५९ या दिवशी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्राणज्योत मावळली.

भाऊरावांचे मानसपुत्र संस्थेचे आजीव सदस्य इंग्रजी साहित्याचे गाढे विद्वान आणि शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू बॅ. पी.जी. पाटील भाऊरावांच्या मृत्युबद्दल लिहतात ''दलितांचा राजा गेला. गोरगरीबांचा वाली गेला. महाराष्ट्राचा ज्ञानेश्वर समाधिस्त झाला. बहुजन समाजाचा व उध्दारकर्ता गेला. साताराचा वटवृक्ष उन्मळून पडला व त्यावरील पाखरे निराधार झाली.'' [२६]

१९५५ मध्ये रशियन नेते क्रुश्चेव्ह व बुलगानीन हे भारत भेटीवर आले असता मुंबईला कर्मवीरांची त्यांच्याशी भेट झाली होती. कर्मवीरांच्या कार्याचे त्यानी कौतुक केले होते. त्यानी रशिया भेटीचे निमंत्रण आण्णांना दिले. कामाच्या व्यापामुळे व आजारपणामुळे आण्णा परदेशी जावू शकले नाहीत. २६ जानेवारी १९५९ राजी भारत सरकारने आण्णांना पद्मभूषण हा किताब देवून गौरविले. ५ एप्रिल १९५९ रोजी पुणे विद्यापीठाने

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

आण्णांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल 'डी. लिट्.' ही पदवी देवून गौरव केला. सर्व जनतेने त्याना 'कर्मवीर' ही उपाधी दिली होती. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षण महर्षी होते. खऱ्या अर्थाने शिक्षण तिर्थंकार होते.[२७]

**संदर्भ सूची :**

१. पवार. बा. ग. 'ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक, कर्मवीर भाऊराव पाटील', मातृभूमी प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. क्र. ३४.
२. पवार. बा. ग., कित्ता, पृ. ४१.
३. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ३८.
४. बॅ.पी.जी. पाटील,'कर्मविरोपनिषद : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी', सातारा,१९८९,पृ.क्र. ५.
५. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ४३.
६. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ४५.
७. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ४९.
८. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ५१.
९. पाटील. बॅ. पी. जी., उपरोक्त, पृ. क्र. ४.
१०. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ५२.
११. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ६२.
१२. पाटील. बॅ. पी. जी., उपरोक्त, पृ. क्र. ६.
१३. कित्ता, पृ. क्र. ३.
१४. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ९६.
१५. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ११७.
१६. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ९७.
१७. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ९८.
१८. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ९९.
१९. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १००.
२०. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १०१.
२१. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १५४.
२२. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १२३.
२३. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १२४.
२४. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल - २००४-०५.
२५. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ३०६.
२६. उपरोक्त, पृ. क्र. १८७.
२७. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर) १९८५-८६ लेख- शिक्षण तिर्थकार व रयत शिक्षण संस्था, प्रा. श्रीधर हेरवाड

## महात्मा जोतिराव फुले – एक द्रष्टा शिक्षण तज्ञ

**श्री.तुकाराम महादेव पाटील**
सहा.प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
र.भा.माडखोलकर महाविद्यालय चंदगड
तालुका–चंदगड,जिल्हा–कोल्हापूर(महाराष्ट्रराज्य)

**प्रस्तावना:**

महात्मा जोतिराव फुले यांनी राजकारण विरहित धर्म व समाज पुनर्रचनेची चळवळ केली.बुध्दि प्रामाण्य , इहवाद, उदारमतवाद आणि समतावाद ही चळवळीची चतु:सूत्री होती.जोतिरावांनी समग्रपरिवर्तनाचा आग्रह धरला.एकेश्वर वादाचा पुरस्कार केला.ग्रंथप्रामाण्य व मूर्तीपूजेला विरोध केला.रुढींचे निर्मूलन करुन समता धिष्ठीत समाज निर्मिती हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.आधुनिक विचारसरणीच्या जोतिरावांनी दिलेल्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतल्यास त्यांची पुरोगामी विचरसरणी स्पष्ट व्हायला हरकत नाही.

**अल्प परिचय:** महात्मा जोतिराव फुलेंचा जन्म १८२७ मध्ये पुण्यात झाला.(११ एप्रिल हि त्यांची जन्मतारीख मानली जाते) सातारा जिल्हयातील कटगुण हे त्यांचे मूळ गांव मूळचे गोऱ्हे आडनांव आजोंबाच्या फुलांच्या व्यवसाया वरुन 'फुले' असे झाले.बंडखोर वृत्तीच्या व अन्यायाविरुध्द दंड थोपटण्याच्या वृत्तीमुळे विद्यार्थी दशेतच इंग्रजी राज्य उलथून टाकणयाची कल्पना करीत. त्यासाठीच लहुजीवस्ताद साळवे यांच्याकडून नेमबाजी, दांडपट्टा यांचे शिक्षण घेतले.

**मुलींची शाळा:** पुढील काळात सामाजिक विषमतेच्या दर्शनाने त्यांचे जीवन ध्येय बदलले.स्त्रीशिक्षणांमुळे स्त्रियांचा उदधार होईल असे त्यांना वाटले ऑगष्ट १८४८ मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरु केली.बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात भरणारी हि शाळा अर्थिक अडचणीमुळे बंद पडली.नाउमेद न होता ३ जुलै १८५१ ला बुधवार पेठेत अण्णासाहेब चिपळुणकर वाड्यात मुलींची दुसरी शाळा सुरु केली.१७ सप्टेंबर १८५१ ला पुण्यात रास्त पेठेत व १५ मार्च १८५२ ला वेताळपेठेत आणखी दोन शाळा सुरु केल्या या कार्याचा गौरव म्हणून विश्रामबाग वाड्यात १८५२ ला त्यांचा सरकारने जाहिर सत्कार केला.

आपल्या अशिक्षीत पत्नीला त्यांनी साक्षर केले.तिची शिक्षीकी म्हणून नेमणूक केली.पत्नी सावित्रीबाई फुले पतीच्या कार्यात मनापासुन सहभागी झाल्या.अवमान सहन करुन ही त्यांनी आपले ब्रीद सोडले नाही.त्या पतीच्या पाठीशी ठामपणे उभारल्या.

**विधवा पुनर्विवाह:** विधवांची दयनीय परिस्थिती पाहून जोतिबांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केला.सन.१८६४ ला पुण्याच्या गोखले बागेत एका विधवेचा पुनर्विवाह घडवून आणला.

**अस्पृश्यांच्यासाठी शिक्षण:** जोतिरावांना शिक्षण प्रसारक ही गोष्ट सर्वाधिक महत्वाची वाटली.शूद्रातिशूद्रांचे व स्त्रियांचे शिक्षण त्यांना अत्यंत महत्वाचे वाटत होते.शैक्षणिक तत्वज्ञान,तंत्र प्रसार कार्यातील त्यांचे चिंतन व कार्य अद्गितीय स्वरुपाचे होते.स्त्री शूद्रातिशूद्रांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रचलित ब्राम्हणी वसाहतिक शिक्षण व्यवस्थेमध्ये बदल करण्याचा लढा ते विलक्षण त्वेषाने लढले ब्रिटीश सरकारला सुचना केल्या.ब्रिटीशश सरकार शूद्रातिशूद्रांच्या निढळाच्या घामाचा पैसा कर रुपाने गोळा करते आणि उच्च वर्णीय ब्राम्हण जातीच्या शिक्षणावर खर्च करते.त्यामुळे दरिद्रीय व अज्ञानी शूद्रातिशूद्र शिक्षणापासून वंचित राहतात.आणि युगानुयुगे चालत आलेल्या ब्राम्हणी दास्यत्वात खितपत राहतात.या संबंधात जोतिरांवानी आपला रोष सातत्याने व्यक्त केला.[१](म.फु.स.वा.१९८० पृ.२०८–२२७) स्त्री शूद्रतिशूद्र गरिब जनतेच्या शिक्षणाचा प्रश्न जोतिरावांसाठी विलक्षण आत्मीय होता.नगरसेवक म्हणून पुणे महानगरपालिकेत काम करताना ४ डिसेंबर १८८२ मध्ये सभेत बाजारासाठी ३ लाख २५ हजारांची इमारत बांधण्याचा प्रस्ताव आला होता.त्याला जोतिरावांनी विरोध केला होता हा सर्व पैसा शूद्रतिशूद्र गरिब जनतेच्या शिक्षणासाठी खर्च करावाअशी त्यांनी सूचना केली[२] ( किर धनंजय,म.जो.फु.१९७३,पृ १६३–१८५) घोर दारिद्रय व अज्ञानामुळे शूद्रतिशूद्रांना शिक्षणाचे महत्व समजत नव्हते. मुलांना शिकवणे हे धर्मभोळेपणामुळे त्यांना पाप वाटत असे. पुराणिक व कथा या ब्राम्हणांची छाप बसल्यांने स्व:ताच्या मुलांना शिकवून विख्यात विद्वान बनवने पातक वाटत होते.त्यातच ते परिस्थितीने हि लाचार असत प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामध्ये ब्रिटीश सरकारने पुढाकार घ्यावा अशी कळकळीची विनंती जोतिरावांनी केली.

**हंटर कमिशन समोरील साक्ष:** हंटर कमिशन समोरील त्यांनी दिलेल्या साक्षीत स्व:ताची भुमिका मोठ्या सामर्थ्याने व्यक्त केली आहे.ते म्हणतात (१) प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी.त्यासाठी ज्या देशी शाळांतून प्रमाणपत्र असलेले शिक्षक आहेत त्यांना सढळ हताने अनुदान द्यावे (२) शेतकऱ्याकडून सरकार सारा घेते त्याचा अर्धा भाग केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा (३)

नगरपालिकांच्या हद्दीतील प्राथमिक शाळा नगरपालिकांनी स्वखर्चाने चालवाव्या .यासाठी सरकारने योग्य तो कायदा पास करावा (४) सरकारने प्रांतिक आणि मध्यवर्ती निधीतून नगरपालिकांना भरपूर अनुदान देवून,नगरपालिकांनी आपल्या स्व:ताच्या खर्चातून आपल्या हद्दीतील प्राथमिक शाळा चालविल्या पाहिजेत असे करावे.तथापी शाळांचा संपुर्ण कारभार नगरपालीकांच्या हाती सोपवू नये.शिक्षण खात्याच्या देखरेखी खालीच त्या शाळा असाव्यात.

ग्रामीण भागातील शिक्षणाचा अभ्यासक्रम हा शहरी अभ्यासक्रमापेक्षा सोपा आणि सुटसुटीत असावा असे त्यांना वाटे.ग्रामीण भागातील अभ्यासक्रमात मोडी आणि बालबोध वाचन,हिशेब,इतिहास,भूगोल,व्याकरण यांचे सर्वसाधारण ज्ञान असावे,शेतीचे प्राथमिक ज्ञानअसावे नैतिक आणि आरोग्यविषयक काही पाठ त्यांच्याकरिता तयार केलेले असावेत असे त्यांचे मत होते.अभ्यासक्रम दैनंदिन व्यवहारास धरुन असावा.शेतकीविषयक शास्त्रशुध्द ज्ञान देणेसाठी एक आदर्श शेतीची योजना व्हावी प्राथमिक आणि ॲग्लो व्हर्नाक्युलर शाळेतील क्रमिक पुस्तकांची सुधारणा व पुनर्रचना केली पाहिजे कारण ती व्यवहार्य नाहीत किंवा त्यांच्यात प्रगतीला वाव नाही.ग्रामिण भागातील शाळांची तपासणी वर्षातून निदान चार किंवा अधिकवेळा झाली पाहीजे असे त्यांचे मत होते.शिक्षकांना पूर्वसूचना न देता शाळा तपासणी झाली पाहिजे शिक्षकांवर नियंत्रण राहिले पाहीजे व तपासणीसाठी उथळ आणि अपूर्ण होवू नये असे त्यांचे मत होते.

पारंपारिक शिक्षण व्यवस्थेने श्रमाला नाकारले;परंतु ब्रिटीश शिक्षण व्यवस्थेमध्ये हि वसाहतीक प्रभुत्व टिकवण्याची व कारकुनांची फौज निर्माण करण्याची योजना असल्यांने त्यातुन श्रम प्रतिष्ठा हे मुल्य न माननार कुचकामी वर्ग तयार होवू लागला होता ब्रिटीशांची हि श्रम प्रतिष्ठा न मानणारी शिक्षण व्यवस्था वर्ण व्यवस्थेलाच महत्व देत होती.जोतिरावांनी या व्यवस्थेला नेहमीच विरोध केला.संपुर्ण समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून श्रम प्रतिष्ठेचे मोल पटवुन दिले पाहीजे हे त्यांचे स्पष्ट मत होते.ते म्हणतात– 'शाळांना उद्योगाचे खाते जोडून मुलामुलींना धंदे शिक्षण व तंत्र शिक्षण द्यावे.ज्यामुळे मुले आपला निर्वाह सुखेनैवपने करतील आणि विचारशील आणि स्वावलंबी बनतील.' १९८२ च्या अहवालात त्यांनी हे मत व्यक्त केले आहे.[३](नरके हरी,१९९८-शतकाची शिदोरी:- सावित्रीबाई फुले - पृ -२०)

शिक्षण व्यवहारात उपयोगी पडावे सुजनशिल धंदे शिक्षण दिले पाहीजे प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लश करुन उच्चशिक्षणाकडे लक्ष पुरवावे त्यांना जरी अयोग्य वाटले तरी त्यांना सरकारी पातळीवर उच्चशिक्षणासाठी मदत सुरुच राहीवी अशी भूमिका घेतली. माध्यमिक व उच्चशिक्षणाचा विकास दर जास्त असला व संस्थात्मक खटाटोपही अधिक असला तरी त्यांचे ही स्वरुप चिंताजनक होते.शासनाचे व राज्यकर्त्या वर्गाचे धोरण शिक्षण द्रोही असता कामा नये.आपले माध्यमिक शिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेण्या खेरीज इतर कोणत्याही दृष्टीने कामाचे नाही स्वतंत्र रोजगारासाठी आवश्यक ज्ञान क्षमता कौशल्य यांच्या अभीवृध्दीचा विचारच झालेला नाही.हे शिक्षण जिवनोपयोगी बनले पाहीजे असे जोतिरावांना वाटत होते.शिक्षणाचा उपयोगा हा नोकरी मिळवणे हा असू नये.बेकारीच्या प्रश्नाकडे जोतिरावांनी शंभर वर्षापूर्वीच लक्ष वेधले आहे.आज त्याचे प्रत्यंतर येत असल्यांने जोतिरावांचे द्रष्टेपण ध्यानात येते बरे वाईट समजण्याची विवेकबुध्दी देणारे व जात व पितृसत्तेच्या रचनेने बनलेल्या समाज वास्तवाचे अचूक आकलन करुन देणारे प्रश्न व पेच उपस्थित करणारे शिक्षणतंत्र जोतिरावाना अपेक्षीत होते [४] (सरदार गं.बा.म्हात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार ग्रथांली,पृ-७०) जोतिरावांच्या शिक्षणाच्या सामर्थ्याचा दाखला मुक्ता साळवे या जोतिरावांच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता साळवे या मांगमुलीच्या निबंधातून मिळतो.१४ वर्षाचे वय असताना या मुलीने स्व:ता भोवतीच्या जातिवास्तवाचा अचूक भेद घेतला आहे.जातिवास्तवाला ऐतिहासीक बदलांच्या रचनेत उभे करुन कारणमीमांसा दिली आहे.जातिव्यवस्थेच्या अन्यायाचे विश्लेषण व ब्राम्हणी वर्चस्वाची चिकित्सा केली आहे.अस्पृश जाति समुहाचे दु:ख त्याच्यासाठी परिवर्तनाचा कार्यक्रम व संघर्ष याचे विवेचन केले आहे. [५] ( साळवे मुक्ता -२००६, मांग महारांच्या दु:खाविषयी निबंध लुलेकर-उगले(सपांदक) 'दु:खाविषयी निबंध,चिन्मय प्रकाशन ,औरंगाबाद ,पृ ११-१६.) इंग्रज राज्यकर्त्यांनी शिक्षणाचा सिदधांत झिरपता मांडला ही 'डाउनवर्ड फिल्टरेशन थिअरी' अस्पृश शूद्रतिशूद्रांच्या दृष्टीने मुळीच उपयोगी नव्हती.राजा राममोहनरॉय व महात्मा गांधी यांनी या सिदधांताचे समर्थन केले होते.हा झिरपणीचा सिदंधात ज्यांना सोयीस्कर होता ते तरी त्याच्या समर्थनाचीच भूमिका घेत होते.शोषित जनतेच्या मानगुटीवर बसलेला हा सिदंधांत विषमतेचा उत्तेजन देणारा होता.उच्चशिक्षण ही उच्चवर्णीयांची मिरास झाली त्याविरुध्द विद्रोहाचा आवाज बुलंद करण्यात जोतिरावांनी पुढाकार घेतला.

शिक्षणातून मानसाच्या अंगी नैतिक व बौध्दीक शक्तीचा परिषोष घडतो याचीच दुसरी बाजू अशी आहे की,शिक्षणाच्या अभावी मानूस नैतिक बौध्दिक दृष्ट्या पंगु होता.परिणामी व्यवहारातील त्याची पिछेहाट होते.शेतकऱ्यांचा असूड या ग्रथांच्या उपोद्घाताच्या प्रारंभी

‘ विद्येयविना मति गेली|मति विना निती गेली|

नीती विना गती गेली|गति वीना वित्त गेले |

वित्ता विना शूद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले|‘

अशा सुभाषित वजा काव्यपंक्तीती आहेत.

हंटर आयोगाला सादर केलेल्या निवेदनात फुल्यांनी मुंबई इलाख्यात प्रचलित असलेल्या शिक्षण प्रणालीबद्दल असमाधान व्यक्त केले आहे.जनतेच्या एकंदर गरजाच्या मानाने प्राथमिक शाळांची संख्या तोकडी असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले सरकार शिक्षणासाठी पैसा गोळा करते,पण ज्या कामासाठी हा पैसा उभा केला जातो त्यासाठीच तो खर्ची पडत नाही.ही खेदजनक परिस्थिती आहे.या इलाख्यातील दर दहा पैकी नऊ खेडी किंवा जवळपास १० लाख मुले-मुली आज प्राथमिक शिक्षणाच्या कोणत्याही सोई वाचून वंचीत आहेत.त्यांचे बरेचसे दारिद्र्य,स्वावलंबनाचा अभाव,सुशिक्षितावरचे त्यांचे अवलंबन या सर्व गोष्टी शेतकऱ्यांच्या शिक्षणाची जि भीषण दुरावस्था आहे.तिचीच फलश्रुती होत.देशी प्राथमिक शाळा विषयी अत्यंत कडक शब्दात ते आपले मत व्यक्त करतात.प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे,महार-मांगाच्या मोठ्या वस्तित स्वतंत्र शाळांची तजवीज करणे.शिक्षणापासून वंचित असलेल्या मुस्लिम समाजाला त्यांच्या भाषेतून शिक्षण देणे,सराकरी शाळांची विद्यार्थ्यांना प्रलोभने देणे,शिक्षणाचे उपयुक्तता मूल्य वाढविणेसाठी अभ्यासक्रमात योग्य तो बदल घडविणे असे किती तरी विचार त्यांनी व्यक्त केले.त्यावरुन शिक्षण व्यवस्थे संदर्भात त्यांचे चिंतन किती मूलगामी स्वरुपाचे होते याचा प्रत्यय येतो.

स्वतंत्र,समंता ,बंधुता या तत्वावर आधारलेल्या नवसमाज निर्मीतीची योजना शिक्षणातून,नीती विचारांच्या प्रसारातून करण्याचा त्यांचा इरादा होता.त्यांनी शिक्षणामध्ये सत्य निष्ठा , शिल संवर्धन ,नीतीमत्ता सौजन्य ,प्रगती पर विचार व व्यवहार ज्ञान यावर खास भर दिला.प्रत्येक विद्यार्थ्याला व्यवहार ज्ञान व प्रगतीपर विचारांचे बाळकडू नीतीमूल्यांच्या संस्कारातून देण्याचा त्यांचा भर होता. [६]( सरदार ग.बा.- महात्मा फुले व्यक्तीत्व आणि विचार ,ग्रंथाली ,मुंबई-पृ.१९९)

हरी रावजी चिपळुणकर हे जोतीरावांचे घनिष्ट स्नेही होते.त्यांची २ मार्च १८८८ रोजी ‘ड्युक ऑफ डचेस ऑफ कॅनॉट‘ यांच्या सन्मानार्थ मोठी मेजवानी आयोजीत केली होती.या मेजवानीसाठी अनेक मोठ मोठी प्रतिष्ठीत मंडळी बोलावली होती.या मेजवानीला जोतिराव खेडवळ मनुष्याच्या वेषात गेले.डोक्यास पागोटे ,कंबरेस पंचा,अंगात साधा बंधाचा अंगरखा,डाव्या खांद्यावर घोंगडी,उजव्या हाताता काठी,पायात फाटक्या वाहणा असे रुप घेवून जोतिराव कार्यक्रमात हजर झाले.पहारेकरी आत सोडेना.हरी रावजी चिपळुणकरांनी जोतिरावांना ओळखले आणि त्यांना सन्मानाने मंचावर बसविले.मोठ्या उत्साहाने मेजवानीस सुरवात झाली.चिपळुणकरांनी जोतिरावांचा परिचय करुन दिला आणि त्यांना भाषण करण्याची विनंती केली.जोतिरावांनी सडेतोड,मुद्देसूद व ह्रदयस्पर्शी भाषण केले. मेजवानीला आलेल्या लब्ध प्रतिष्ठीत लोकांच्या वस्त्रअलंकाराकडे पाहून तुम्ही भारताची कल्पना करु नका. भारत खेड्यात दिसतो.खेड्यातील शेतकरी हा भुकेकंगाल व बेघर आहे.तो अनवाणी चालतो.माझ्या वस्त्रापेक्षा ही वाईट असे वस्त्र वापरतो.तो अत्यंत दरिद्री व दिन आहे.राजपुत्राने महाराणी व्हिक्टोरियाला असे सांगावे की,गरिब जनता दारिद्र्या मध्ये पिचत आहे.त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे.राणीला हा आमचा निरोप द्या. [७](किर,धनंजय,१९७३, महात्मा जोतिराव फुले,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई पृ-२६४-२६५)

जोतिरांवानी अंगिकारलेले शिक्षण विषयक कार्य तडीस नेण्याच्या कामात त्यांना अनेक सहकारी लाभले होते.मुलींच्या शाळेसाठी सदाशिवराव गोवंडे यांनी जागा दिली .मुलींना पाठ्यपुस्तकेही घेवून दिली विष्णुपंत थत्ते हे ब्राम्हण ग्रहस्थ काही काळ त्यांच्या शाळेत शिक्षक होते.मोरो विठ्ठल वाळवेकर,देवराव ठोसर,अण्णासाहेब चिपळूणकर यांनीही जमेलते सहकार्य केले. आपल्या या कार्याचे नीट सुत्रसंचालन व्हावे या हेतूने जोतिरावांनी नेमलेल्या कार्यकारी मंडळात अण्णासाहेब सहस्त्रबुद्दे ,बापुरावजी मांडे,विष्णु मोरेश्वर भिडे,कृष्णशात्री चिपळूणकर ,विष्णुशात्री पंडित यांचा समावेश होता.दलित शोषितांच्या शिक्षणाबद्दल ज्यांना अस्था असेल अशा व्यक्तीना त्यांच्या जातिचा विचार न करता जोतिरावांनी सहकार्य म्हणून सोबत घेतले होते.त्यांच्या पासून प्रेरणा घेवून अनेकांनी या कार्यास स्वता:ला वाहुन घेतले होते.कोणत्याही चळवळीची शक्ती तिच्या सुत्रधारात उध्दिष्ट व मार्ग या बाबत किती एक वाक्यता आहे यावर अवलंबून असते.जोतिरावांच्या ही चळवळीत ही एक वाक्यता जोवर टिकून होती तो पर्यंत तिने शिक्षणाचे लोण

तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कार्य अभूतपूर्व प्रमाणावर साध्य केले,आणि आज १०० वर्षानंतर ही जिथून परिवर्तन वादयांनी प्रेरणा घ्याव्यात अशा एका सामाजिक प्रयोगाचा आदर्श तिने निर्माण केला.

**समारोप:**

आज ६० टक्के श्रमजीवी वर्ग प्रौढ साक्षरतेपासून वंचित आहे.काही प्रौढ स्वाक्षरी करण्याइतपतच शिकले आहेत.निरक्षरता निर्मूलनासाठी दिर्घ मुदतीच्या नियोजन बध्द व्यूवह रचना अत्यावश्यक ठरली आहे.

आज ही,स्रिया,शुद्र,अतिशुद्र शोषीत दुबळ्या वर्गाची शिक्षणाची स्थिती विचारात घेतली तर जोतिरावांच्या विचाराकडे दुर्लक्ष झालेले दिसते.विद्यार्थ्यांची उपस्थिती व त्यांनी मिळविलेले प्राविण्य या दोन कसोट्यावर आज ही प्रचंड प्रमाणावर पीछेहाट झाल्याचेच चित्र दिसते.वंचितांना आपण त्यांचा मूलभूत हक्क म्हणून शिक्षण देत नसून त्यांच्यावर उपकार करीत असल्याची सवर्णांची मानसिकता बदलणे हे एक आव्हानच आहे.व्यक्ती विकासावर भर देणारे संदर्भ शून्य शिक्षण सुशिक्षितांना समाज विन्मुख बनवत आहे .श्रम व शिक्षणाचा समन्वय आढळत नाही.शिक्षण प्रक्रियेतून पांढरपेशाचा नवा वर्ग उदयाला येत आहे.हा नवा वर्ग समाज द्रोही ठरल्याचे चित्र दिसल्यावर आजही असे वाटते की, जोतिरांवानी दिलेली शिकवण अंमलात आणण्यास आपण अयशस्वी ठरलो आहोत.काळाच्या कितीतरी पुढचे पाहणाऱ्या द्रष्ठ्या जोतिरावांनी दिलेल्या वाटेवरुन गांभीर्याने प्रवास करणे क्रम प्राप्तच आहे.

**संदर्भ:**

१.महात्मा फुले समग्र वांड:मय,१९८०,पृ-२०८-२२७
२.किर धनंजय:-महात्मा जोतिराव फुले ,१९७३ पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ.१६३-१८५
३.नरके हरी :- शतकांची शिदोरी:- सावित्रीबाई फुले,माळी मा.गो.(संपादक) सावित्रीबाई फुले:- काळ आणि कर्तृत्व, महाराष्ट्रराज्या साहित्य संस्कृती मंडळ.
४.सरदार ग.बा.:-महात्मा फुले व्यक्तीत्व आणि विचार ,ग्रंथाली प्रकाशन मुंबई.पृ.७०
५.साळवी मुक्ता:-मांग महारांच्या दु:खा विषयी निबंध,लुलेकर - उगले (संपादक), दु:खाविषयी निबंध ,चिन्मय प्रकाशन औरंगाबाद पृ.११-१६
६.सरदार ग.बा.:-महात्मा फुले व्यक्तीत्व आणि विचार ,ग्रंथाली प्रकाशन मुंबई.पृ.१५५
७.किर धनंजय:-महात्मा जोतिराव फुले ,१९७३ पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ.२६४-२६५

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

| Organised By | M. H. Shinde Mahavidyalaya,Tisangi Tal.Gaganbavada Dist.Kolhapur | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# ऑलिम्पिकवीर- खाशाबा जाधव - एक दृष्टीक्षेप

**प्रा. विक्रम सयाजी यमगेकर**
शारीरिक शिक्षण संचालक
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना -**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्येएक बलशाही राष्ट्र म्हणून जगामध्ये नावलौकिक मिळवून देण्यामध्ये अनेक व्यक्तिंचा समाजसुधारकांचा विचारवंतांचे, संतांचे जसे योगदान आहे. तसेच, जागतिक स्तरावर भारताला नावलौकिक मिळवून देण्यामध्ये अनेक खेळाडूचे योगदान आहे.

स्वातंत्र पूर्व आणि स्वातंत्र्यानंतरभारतीय मातीमध्ये अनेक खेळाडू होवून गेले ज्यांनी आंतरराष्ट्रीयस्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यामध्ये ॲथलेटिक्स मध्ये नॉर्मन प्रितचर्ड, टेनिस - लिएंडर पेस वेटालिफ्टिक- करनाम मल्लेश्वरी, नेमबाज - राजवर्धन राठोड, नेमबाज - अभीनव बींद्रा, गगन नारंग, कुस्ती - सुशिलकुमार, बॅडमिंटन - सायना नेहवाल, बॉक्सिंग - विजेंदर सिंग, नेमबाज - विजयकुमार, मेरी कॉम - बॉक्सिंग, योगेश्वर दत्त - कुस्ती, बॅडमिंटन - पी.व्ही. सिंधू, कुस्ती - साक्षी मलिक.

स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिक मध्ये भारताला पहिले पदक जिंकून दिले व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला भारताचा तिरंगा फटकावला. ऑलिम्पिक पदक ही एक साधना आहे. अथक परिश्रमानंतर प्रसन्न होणारी देवता आहे. असे मानणारे महाराष्ट्राचे सुपुत्र पै. खाशाबा जाधव म्हणून सदर प्रबंधामध्ये खाशाबा जाधव या प्रथम ऑलिम्पिक वीर यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकून भारतीय खेळामध्ये त्यांचे असणारे योगदान मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**बालपणीचा काळ-**

त्र्यंबकेश्वर भूमीत अखिल महाराष्ट्र कुस्त्यांचा आखाडा सुरू होता. दुपारी कराडचा एक तरूण मल्ल फडात जोड लावण्यासाठी आखाडयातउतरला. छोटया चणीचा तो मल्ल प्रथमच आखिल महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत खेळणार होता. या मल्लाची अंगकाळी किडकिडीत, प्रथमदर्शनी तो पैलवान वाटतच नव्हता. फड भरविण्याऱ्यांनी त्याला एक रूपयाची जोड ठरवून आखाडयात फिरवले. हा प्रकार अपमानास्पद होता. एकावन्न रूपये जोडलावण्याची प्रथा असताना एक रूपयाची कुस्ती लावण्यात येणार होती. पाच मिनीटानंतर मला मल्ल मिळाला. मुंबईचा पैलवान राक्षे.कुस्ती सुरू होताच कराडच्या मल्लांने राक्षेचाएकेरी पट काढत त्याचे पहिल्याच मिनिटालासुलतानी डावाचे अप्रतिक प्रदर्शन घडवत क्षणात राक्षेची पाठ जमिनीला टेकली. अवघ्या पंधरा सेकंदांत कुस्ती चीतपट मुलतानी डाव इतक्या सफाईनेकरणारा पैलवान आम्ही आमच्या उभ्या आयुष्यात पाहिला नाही. असे सर्व बोलू लागले. हा मुलगा कुस्तीमध्ये फार पुढे जाईल. मुलांचे पाय पाळण्यात दिसतात, ही म्हण खरी ठरली होती. तो मुलगा पुढे ऑलिम्पिक विजेता ठरला होता. अवघ्या चार वर्षातच नाशिकचा आखाडा गाजविणाऱ्या कराडच्या के.डी. जाधव उर्फ खाशाबा जाधवांनी हेलसिंगकी ऑलिम्पिक स्पर्धा गाजवून सर्वाचे बोल खोटे ठरवले. त्यांना कोणतेही यश सहजासहजी मिळाले नाही.

**जागतिक यशाचा संघर्षमय प्रवास-** कोल्हापूर इतकेच सातारा जिल्हयातही कुस्तीचे वेड घराघरात, कराडमधील कृष्णा नदीच्या काटावरील गोळेश्वर हे छोटसे जाधवांचे गाव कुस्तीमय वातावरण असलेल्या दादा जाधवांच्या घरी खाशाबा जन्मले. बाळकृष्ण जोतीराम हिराबाईनंतर पुतळाबाईच्या पोटी खाशाबाचा जन्म १५ जानेवारी १९२५ रोजी मोडक्याझोपडीत झाला. लहानपणी त्याला सर्व आण्णा या टोपण नावाने हाका मारीत. वडील दादासाहेब उत्तम कुस्तीपटू होते. त्यांच्या बरोबर छोटा खाशाबा भावांबरोबर जोर - बैठका मारत. कुस्तीचे प्राथमिक धडे शिकत. वडीलांनी खाशाबाचा कुस्तीचा श्रीगणेशा गावातील तालमीत केला. प्रतिस्पर्धी मल्लास कसे चीतपट करायचे, मान कशी पकडायची, पट कसा काढायचा हेछोटे खाशाबा वडिलांकडून मनापासून आत्मसात करीत होते. दररोजच्या व्यायामामुळे खाशाबा चपळ बनत चालले.जोर-बैठकामुळे शरीर पिळदार झाले. भावाबरोबर कुस्ती करू लागले. खाशाबांची पहिली स्पर्धा १९३४ मधील रेठरे गावातील अवघ्या दोन मिनीटांत खाशाबांनी प्रतिस्पर्धी मल्लास चीत केले. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी खाशाबांनी कुस्ती सर्वप्रथम जिंकली. साखरेचा बदामाचा खाऊ खाशाबांना बक्षीस मिळाला.

**हायस्कुलचे सोनेरी दिवस-** लोकमान्य टिळक हायस्कूल मध्ये खाशाबांनी प्रवेश घेतला. गोळेश्वर गावापासून टिळक हायस्कूल पाच किलोमीटर दूर होते. सकाळी शाळेत लवकर पोहवण्यासाठी व संध्याकाळी अंधार पडण्यापूर्वी घरी येण्यासाठी खाशाबा येता-जाता धावत जायचे व यायचे. दररोज दहा किमी. धावणे व तालमीचा व्यायाम वेगळाच टिळक हायस्कूलमधील पदापर्णातच खाशाबा सर्वोत्कृष्ठ खेळाडू बनले ते प्रथम भाग घेताना नऊ स्पर्धेत पहिले आले होते. १९४० ते १९४७ पर्यत शालेय शिक्षण पूर्ण होई पर्यत कोणत्याही खेळातील पहिला क्रमांक त्यांनी सोडला नाही. पोहणे, मल्लखांब, हातोडाफेक, वेटलिफ्टिंगमध्ये ते विजेते होते. खेळाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमात खाशाबाचा सहभाग असे. लेझीम वाजविण्यात खाशाबा सर्वोत्कृष्ठ होते. चित्रकलेचेही खाशाबांना आवड होती. भारतात शालेय पातळीवरच खेळाकडे दुर्लक्ष झाले आहे. १९४० च्या काळातही क्रीडाविषयक मुलभूत सुविधा नसताना

एक आदर्श यशस्वी खेळाडू म्हणून खाशाबा उदयास आले. आजच्या आधुनिक युगात सर्व सुविधा, मैदाने असतानाही शालेय पातळीवरच खेळाडूंची निर्मिती होत नसल्याने पुढे विद्यापीठ, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, स्तरावर दर्जेदार क्रीडापटू खेळताना दिसत नाहीत.

**उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरात-** १९४७ साली खाशाबा जाधव यांनी राजाराम महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. एका नव्या विश्वात त्यांचे पदार्पन झाले. राजाराम महाविद्यालयमध्ये शारीरिक शिक्षण संचालक म्हणून गोविंद पुरंदरे हे काम पाहत होते. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेसाठी संघ निवडीमध्ये खाशाबा जाधव यांना बऱ्याच अडचणी आल्या. संघ निवड चाचणीमध्ये खाशाबांनी त्यांच्या पेक्षा वरचड वजन असणाऱ्या मल्लांना काही सेंकंदात लोळवले व आपले स्थान निश्चित केले. राजाराम कॉलेज कडून खेळताना खाशाबांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा गाजवल्या. त्याचबरोबर आंतरविद्यापीठ स्पर्धाही गाजवल्या.

**यशाचा चढता आलेख-** आंतरमहाविद्यालय व आंतरविद्यापीठ स्पर्धा पराक्रम केलेनंतर खाशाबा जाधव यांना राष्ट्रीय स्पर्धेचे वेध लागले. मार्च १९४८ मध्ये उत्तर प्रदेशच्या लखनौशहरात राष्ट्रीय स्पर्धेसाठी खाशाबा जाधव सहभागी झाले. फ्लायवेट गटात खाशाबा ही स्पर्धा खेळणार होते. या गटात राष्ट्रीय खेळाडू निरंजन दास यांच्याबरोबर त्यांची अंतीम फेरी होती. सहा फुट निरंजन दास खाशाबांना आव्हान करत होते. 'बोल कीती सेकंदात तुला असमान दाखवू, त्यांनी स्मित हास्य करूण कुस्ती सुरू झाली आणि पहिल्यांच मिनिटात खाशाबांनी एकेरी पट काढत निरंजनला असमान दाखवले व फ्लायवेट गटात खाशाबा जाधव महाराष्ट्रातील पहिले राष्ट्रीय विजेते बनले.

राष्ट्रीय स्पर्धा गाजवल्यानंतर आता आंतरराष्ट्रीय, जागतिक स्पर्धा गाजवण्यासाठी खाशाबांची महत्वकांक्षा बनली. एप्रिल १९४८ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये भारताच्या संघामधून खाशाबा 52 kg फ्लायवेट गटात सहभागी झाले. गोळेश्वर सारख्या खेडयातून आलेल्या मल्लाची ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली.

**जागतिक कसोटी** – राजाराम महाविद्यालयात कला शाखेच्या प्रथम वर्गात शिकत असलेले खाशाबा लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होणार होते. त्यांचा सराव सुरू होता. पण स्पर्धेसाठी जाण्यासाठी पैसे कसे उभे करायचे हा प्रश्न त्यांच्या समोर होता त्यावेळी खेळांडूना स्वखर्चाने स्पर्धेला जावे लागे. त्यांना किमान आठ हजार रूपये खर्च येणार होता. पैशासाठी त्यांची भटकंती सुरू झाली. राजाराम महाविद्यालयातील मित्र कोल्हापूरातील कुस्ती प्रेमी हायस्कूलमधून वर्गणी गोळा केली. गोळेश्वर गावातील लोकवर्गणी, सकाळ – संध्याकाळी व्यायाम, कुस्ती सराव करून दुपारी खाशाबा पैशासाठी वणवण भटकत कोल्हापूरच्या छत्रपतीनीही त्यांनी मदत केली व महीन्याभरात आठ हजार रूपये जमा झाले. पण लक्ष्य ऑलिम्पिक मध्ये कुस्ती मॅटवर खेळायला लागणार,मॅट खाशाबांनी कधी बघितलेच नव्हते. स्पर्धेला एक आठवडा होता त्यावेळी पुरंदरे सरांनी मल्लखांब व जिम्नॉस्टिकच्या गादया एकत्र केल्या व त्याच्यावर मोठे जाजम टाकले व देशातील पहिले कुस्ती मॅट तयार झाले व सराव सुरू झाला. मित्रांनी त्यांना नवे शर्ट, पॅन्ट दिले. नवा कोट शिवून दिला. बुटाचा जोडही दिला. तीन आठवडयाचा प्रवास केल्यानंतर खाशाबा लंडनला पोहचले. कुस्ती बुट घालून करायचे असते. कॉस्च्युम घालून करायची असते. हे तीथे गेल्यावर समजते. या स्पर्धेमध्ये खाशाबा तिसऱ्या फेरीपर्यंत गेले. त्यांना या स्पर्धेमध्ये सहाव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

**ध्येयपूर्तीची ऐतिहासिक झेप :** लंडन ऑलिम्पिकच्या पराभावानंतर खाशाबांनी कच खाली नाही. ते मागे हटले नाहीत. त्यांना आपला एकाकी लढा सुरूच ठेवला.

१९५२ साल उजाडले. जग ऑलिम्पिकच्या तयारीला लागले होते. अर्जुनच्या लक्षाप्रमाणे खाशाबांचे एक लक्ष बनले होते. ऑलिम्पिक पदक ... ऑलिम्पिक पदक देशाचा तिरंगा अटकेपार फटकवण्याचे त्याचे ध्येय बनले होते.

१९५२ च्या हेलसिंकी (फिनलॅंड) ऑलिम्पिकसाळी खाशाबा जाधवांची भारतीय संघामध्ये निवड झाली. पण परत पैशाची समस्या लाडक्या क्रीडा पट्टूसाठी पैसे मिळवणे सुरू झाले. राजाराम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्गणी सुरू केली. लोकवर्गणीसाठी पावती पुस्तके छापली. एका रूपयापासून खाशाबा घरोघरी जावून वर्गणी मागू लागले. यामध्ये श्रीमंत शहाजी महाराज, प्राचार्य गोकाक जिल्हाप्रमुख अरविंद बाम यांनी मदतीचा हात पुढे केला लॉ कॉलेजचे प्राचार्य दाभोळकर यांनी आपला बंगला गहाण टाकला व चार हजार रू. खाशाबांस दिले. एकूण १२ हजार रू. खर्च अपेक्षीत होता स्पर्धेला जायच्या आधल्या दिवशी पर्यंत पैसे गोळा करणे सुरूच होते. त्यामध्ये पुरंदरे सराचे मोलाचे सहकार्य दिसून येते.

९ जुलै १९५२ रोजी भारतीय संघाचे कोलकत्यावरून ऑलिम्पिकसाठी प्रयाण केले. दोन दिवसानंतर ११ जुलै १९५२ रोजी भारतीय संघ हेलसिंकी शहरात आगमन झाले. कुस्ती स्पर्धा २० जुलै १९५२ पासून सुरवात झाली. फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात एकूण ३५ देशांनी भाग घेतला होता. खाशाबा जाधव १२५ पौंड बॅटमवेट गटात आपले कौशल्य दाखवणार होते. २० जुलै ला फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा सुरू झाल्या खाशाबांची पहिली लढत कॅनडाच्या बॉली बरोबर आली ती कुस्ती खाशाबांनी टांग मारत मुलतानीवर १४ व्या मिनीटाला चीतपट केले. २१ जुलै ला दुसरी लढत मेक्सिकन मल्ल बासुला बरोबर पाच मिनीटात

खाशाबांनी बासुला आसमान दाखवले. तिसऱ्या फेरीमध्ये त्यांना बाय मिळाला. २२ जुलै ला दुपारी खाशाबांची चौथी फेरी होती. जर्मनीच्या श्मीटसविरूध्द गुणाच्या फरकाने खाशाबांनी हीसुध्दा कुस्ती जिंकली.

**ऐतिहासिक दिवस :**२३ जुलै १९५२ हा ऐतिहासिक दिवस संघ व्यवस्थापक दिवाण प्रतापचंद यांनी खाशाबाला कुस्तीला आज सुट्टी आहे तु झोप म्हणून सांगून व ते हेलसिंकी गाव फिरायला गेले. थोडा वेळ विश्रांती घेतल्यानंतर खाशाबा कुस्त्या पाहण्यासाठी ट्रॅकसूट घालून कुस्ती सभाग्रहाकडे येवून बसले. येताना त्यांनी कीट पण आणले होते. सभागृहात येताच त्यांना ध्वनिक्षेपणावरून भारताचे खाशाबा जाधव व जपानचे इशी यांच्या लढतीची घोषणा ऐकली त्यांनी संयोजकांना विचारले कुस्ती आजच आहे का? संयोजकांनी कुस्ती आजच असल्याचे सांगीतले. केवळ दोन मिनीटांचा वेळ मागून खाशाबा तयार झाले. अंतीम फेरीतील पहिली लढत खाशाबा जपानच्या इशी कडून पराभूत झाले. लगेच दुसरी कुस्ती रशियाच्या मामेदबेकाम बरोबर. थकलेल्या अवस्थेत लगेच संयोजकांनी खाशाबांची पुढील कुस्ती लावली. त्यातही एका गुणाने रशियाचा मल्ल विजयी झाला. अंतिम टप्यात दोन्ही लढती जिंकलेला इशी सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. शेवटी पंचांचा निर्णय हाच अंतिम निर्णय हे तत्व पाळून खाशाबांनी खिलाडू वृत्तीचे दर्शन घडवले. त्यांना कास्यपदक मिळाले. भारतासाठी चार कुस्त्या जिंकून लाखमोलाचे काश्यपदक खाशाबांनी मिळवले. अखेर भारतीय खेळाडूचे वैयक्तिक खेळात पदकाची बाजी मारली. भारताचा झेंडा अटकेपार नेण्यात यश मिळवले. अखेर २३ जुलै १९५२ रोजी ऑलिम्पिक पदकांवर भारताचे नाव कोरले. खाशाबा जाधव यांना दादासाहेब उर्फ के.सी.जाधवांनी भारताच्या क्रीडा इतिहासात नवा इतिहास घडविला.

**खडतर प्रवास :** ४ जुलै १९५५ रोजी खाशाबांनी सब इन्स्पेक्टर म्हणून पोलीस खात्यात प्रवेश केला. खाशाबांनी पोलीस प्रशिक्षक केंद्रातही आपले क्रीडा नैपुण्य दाखवून साऱ्यांची वाहवा मिळविली. पण ऑलिम्पिक मध्ये सूवर्ण पदक मिळवण्याचे त्यांचे स्वप्न होते. ऑगस्ट १९५६ पासून मेलबोर्न ला सोळावे ऑलिम्पिक होणार होते. खाशाबांचा सराव पण जोमाने सुरू होता. पण नियतीचे चक्र फिरले. त्यांना गुडघेदुखीचा त्रास सुरू झाला. त्यामुळे ते निवड चाचणीस सुध्दा जावू शकले नाहीत. व त्यांचे ऑलिम्पिक सूवर्णपदक स्वप्न स्वप्नच राहिले.

१९८३ मध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून खाशाबा जाधाव सेवानिवृत्त झाले. १७८४ रूपये त्यांचा शेवटचा पगार होता. निवृत्तीनंतर खाशाबा गावी गोळेश्वरला आले व शेतीत रमले. निवृत्तीनंतर मिळालेली रक्कम व कराड बॅकेतून काढलेल कर्ज यातून खाशाबांनी कार्वे फाटयाजवळ घर बांधकाम सुरू केले. पण घरामध्ये प्रवेश करण्याच्या आधीच घात झाला. १४ ऑगस्ट १९८४ च्या दुपारी रेठरे गावातून खाशाबा जात असताना नियतीचे चक्र उलटे फिरले. समोरून येणाऱ्या ट्रकने त्यांना उडवले. मेंदूतून रक्तस्त्राव होऊन खाशाबांची प्राणज्योत मावळली व एका ऑलिम्पिक विराचा शेवट झाला. देशासाठी लढणारा क्रीडा योध्दा स्वातंत्र्यदिनी परलोकाम विलीन झाला.

**मरणोत्तर दखल :** १४ ऑगस्ट १९८४ रोजी खाशाबांचे अकाली निधन झाले. त्यानंतरच मरणोत्तर त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव शासनाने, क्रीडाप्रेमीनी केला. १९९२—९३ चा शिवछत्रपती पुरस्कार विशेष बाब म्हणून मरणोत्तर खाशाबा जाधवांना घोषित झाला. ऑगस्ट २००१ मध्ये मरणोत्तर अर्जुन पुरस्कार जाहीर झाला. १९९२ पासून त्यांच्या पत्नी कुसूमताईना केंद्र शासनाने मानधन सुरू केले.

**समारोप :** भारताला एक राष्ट्र म्हणून उभे करण्यामध्ये अनेक व्यक्तींचे, घटकांचे अमुल्य असे योगदान आहे. आज भारत जागतिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आज प्रत्येक क्षेत्रात भारताने जागतिक पातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे. पण क्रीडा क्षेत्रामध्ये म्हणावे तितके यश भारतास प्राप्त करता आलेले नाही. त्यापाठीमागे भारत सरकारची क्रीडाक्षेत्राविषयी असलेली उदासिनता दिसते. १२५ कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात एकेका ऑलिम्पिक पदकासाठी झगडावे लागते. पण इ.स. १९५२ मध्ये कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नसताना, घरची आर्थिक परिस्थिती बेताची असताना या देशाला खाशाबा जाधव यांनी पहिले ऑलिम्पिक पदक मिळवून दिले. आणि देशाची क्रीडाक्षेत्राची मान अभिमानेने उंचावली. पण याच खाशाबा जाधव यांच्या योगदानाची दखल घ्यायला पाहिजे होती. जेवढा मान सन्मान त्यांना मिळाला पाहिजे होता तेवढा तो त्यांना प्राप्त झाला नाही. त्यामुळे क्रीडाक्षेत्रातील भारताची कामगिरी ही नेहमीच सुमार दर्जाची राहिली आहे. भारताचे हे क्रीडा क्षेत्रातील चित्र येत्या काळात जर बदलावयाचे असेल तर खेळाबरोबरच त्यांच्या देशबांधनीतील योगदानाची दखल दखल घेतली पाहिजे. आणि असे जर घडले तर भारताचा सुवर्णवेध निश्चित आहे.**संदर्भ :**

१. ऑलिम्पिकवीर के.डी.जाधव : संजय दुधाने २०१२
२. भारतीय मल्लविद्या : जोशी मनोज
३. शारीरिक शिक्षणाचा इतिहास भाग - १ : प्रा. श्रीपाद आ. जर्दे, अंबा प्रकाशन कोल्हापूर
४. वाटचाल ऑलिम्पिकची, डायमंड प्रकाशन ऑगस्ट २००८ : संजय दुधाने

# भारतीय क्रीडा क्षेत्राचे जागतिक स्तरावरील स्थान व देशाच्या उभारणीतील क्रीडा क्षेत्राचे योगदान

**प्रा. डॉ अभिजित वणिरे**
शारीरिक शिक्षण संचालक,
स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे
ता. करवीर जि. कोल्हापूर ( महाराष्ट्र )

**प्रस्तावना -**

आज जागतिक स्तरावर पाहिले तर प्रत्येक देश विविध क्षेत्रात बलवान होण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येतो. फार पूर्वीच्या काळापासून अमेरीका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, स्पेन यासारखी राष्ट्रे विकसीत म्हणून समजली जातात. या देशानी एकेकाळी संपूर्ण जगावर वर्चस्व प्रस्थापित केलेले होते. या जोरावरच त्यांनी सर्व क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. या देशातील नागरिकांचे जीवनमान सुखकारक असल्याचे दिसते. तेथील नागरिक शैक्षणिक दृष्टया प्रगत आहेत. या देशांचे साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण, दळणवळण, नागरी सुविधा, संरक्षण व्यवस्था, अधुनिक संरक्षण तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रात ही राष्ट्रे सक्षम झालेली आहेत. क्रीडा क्षेत्रही याला अपवाद नाही. या क्षेत्रातही अमेरीका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, रशिया नेदरलॅण्ड यासारखी राष्ट्रे अग्रेसर आहेत. अनादी काळापासून या राष्ट्राची क्रीडा क्षेत्रावर मक्तेदारी आहे. विविध खेळातील नवनवीन तंत्रे विकसीत करणे व ती खेळामध्ये आमलात आणणे हे महत्वपूर्ण काम या देशांनी केलेले आहे. याचे उदाहरण म्हणजे भारतीय पध्दतीच्या हॉकीचे तंत्र संपूर्ण जगात प्रसिध्द होते.पण आज युरोपीयन देशांनी यामध्ये सुधारणा करून आपली शैली या खेळात आणली व तीच आज संपूर्ण जगात खेळामध्ये वापरली जाते. आज ऑलिम्पीक स्पर्धा असो वा जागतिक स्तरावरील कोणतीही स्पर्धा असो, अशा सर्वच स्पर्धात हे देश आघाडीवर असलेले दिसत आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे या देशांची लोकसंख्या विरळ आहे. तरीही या देशांची क्रीडा कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. या उलट भारतासारख्या मोठी व जगात २नंबरची लोकसंख्या असणा—या देशाची कामगिरी तितकीशी समाधानकारक नाही.

भारतानेही अलीकडील काळात काही विशिष्ट खेळात आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्षणीय प्रगती केलेली आहे.विशेषत: टेनिस,बॅडमिंटन, कुस्ती, बॉक्सिंग, बुध्दिबळ, जलतरण, नेमबाजी, बिलियर्ड, क्रिकेट या खेळात प्रगती झाल्याचे दिसून येते. देशाच्या सरकारकडूनही अलीकडील काळात भरीव असे सहाकार्य मिळत आहे. शासनाकडून देशातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाकरिता विविध योजना आकाराला येताना दिसून येतात.साईच्या (Sports Authority of India) माध्यमातून तसेच संनादल, टाटा अकादमी, बोकारो अकादमी याबरोबरच विविध खाजगी व सरकारी कंपन्यांकडूनही देशात विविध खेळातील खेळाडू तयार व्हावेत म्हणून प्रोत्साहन देण्याचे काम केले जात आहे. पालकांकडून यापुर्वी मुलांनी खेळात सहभागी होऊ याकरिता प्रयत्न व्हायचा पण सद्यस्थितीत पालाकांकडूनच मुलांना खेळाकरिता प्रोत्साहन मिळत आहे. सद्या अनेक पालक खेळाकडे व्यावसायिकतेच्या दृष्टीकोनातून पाहात आहेत.

प्रस्तुत विषयाव्दारे भारताचे जागतिक क्रीडा क्षेत्रात काय स्थान आहे ? देशाच्या उभारणीत क्रीडा क्षेत्र कसे उपयोगी पडते, याकरिता खेळाडूंनी कसे योगदान दिले आहे. याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**Key words** : Sports, Leadership skill, strategic thinking, contribution of sports, nation building .etc.

**उद्दीष्टे —**

1. देशाच्या क्रीडा क्षेत्राचे जागतिक स्तरावरील स्थान अभ्यासणे
2. भारतातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी कार्यरत असणा—या संस्थांचा व खेळाडूंचा अभ्यास करणे.
3. देशाच्या विकासात्मक उभारणीमध्ये क्रीडा क्षेत्राचे योगदान काय आहे ते तपासणे.

**मर्यादा —**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास कीरत असताना देशातील विविध खेळांचा तसेच या खेळात योगदान दिलेल्या विविध खेळाडूंचा अभ्यास करावा लागला असल्याने जास्तीत जास्त इंटरनेटवरील माहिती, पुस्तके व मासिके यांचा वापर केला असून सर्वच ठिकाणी भेट देऊन अथवा मुलाखतीव्दारा माहिति संकलित करणे शक्य नसल्याने ही एक मर्यादा आहे.

**माहितीचे पृथ:करण —**

प्रस्तुत अभ्यासामध्ये भारताचे क्रीडा क्षत्रातील जागतिक स्तरावरील स्थान या बाबींचा अभ्यासा करण्यासाठी विविध वेबसाईटचा तथा इंटरनेटचा वापर केला आहे. याव्दारा विविध आंतरराष्ट्रीय खेळाच्या संघटनांनी जाहीर केलेलल्या आकडेवारीचा उल्लेख केलेला आहे. तसेच देशाच्या उभारणीतील क्रीडा क्षेत्राचे योगदान याचा अभ्यास करण्यासाठी विविध पुस्तके, मासिके, इंटरीनेटवरील माहिती याचा अभ्यास केलेला आहे.

**निष्कर्ष –**

**जागतिक स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील भारताचे स्थान –** संकलित केलेल्या व प्राप्त झालेल्या माहितीच्या अधारे असे दिसून येते की, भारताचे जागतिक स्तरावर क्रीडा क्षेत्रामध्ये असणारे स्थान हे फारसे समाधानकारक नसून काही विशिष्ट खेळातच भारताने आपला दबदबा निर्माण केलेला आहे. आकडेवारी पाहिली तर असे दिसून येते की, भारताचा पुरूषांच्या व्हॉलीबॉल खेळात जगातील पहिल्या ३० देशांमध्ये ३० वा नंबर लागतो. बॅडमिंटन खेळात २ महिला खेळाडू जगातील पहिल्या पाच नंबरमध्ये स्थान प्राप्त केलेल्या आहेत. तर पुरूषांपैकीही एक खेळाडू पहिल्या पाच नंबरमध्ये आहे. हॉकीमध्ये भारताचा पुरूष संघ ६ व्या तर महिला संघ ( दि. ५–०२–२०१८ च्या आयएचएफ ने जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार ) १० व्या क्रमांकावर आहे. एक काळ असा होता की, भारतीय हॉकी संघ हा जगामध्ये अव्वल होता. या संघाने विश्वचॅम्पियन होण्याचा मान मिळवलेला आहे. त्याचबरोबर हा संघ ऑलिम्पिक चॅम्पियन अनेकदा झालेला आहे. काळाच्या ओघात विदेशी संघानी या खेळात अमुलाग्र प्रगती केली. नवनवीन तंत्र विकसित केले व हे देश भारताच्या पुढे गेले. भारत मात्र या खेळात आज पहिल्या पाच मध्येही दिसत नाही.

याशिवाय भारताने नेमबाजी, जलतरण, बिलियर्डस, बॉक्सिंग, कुस्ती, तिरंदाजी, भारोत्तालन व बुध्दीबळ या खेळातही काही प्रमाणात आपला दबदबा निर्माण केल्याचे दिसून येते. बुध्दीबळ या खेळात तर ग्रॅंडमास्टर विश्वनाथन आनंदने पाचवेळा विश्व चॅम्पियन होण्याचा मान मिळवलेला आहे. जगात सर्वात जास्त प्रेक्षकांचा पाठिंबा मिळालेल्या फुटबॉल या खेळात मात्र भारत जागतिक स्तरावर कोठेही दिसत नाही. आज जगात भारताचा फुटबॉल या खेळात १०२ वा क्रमांक आहे. पात्रता फेरीतून २४ संघ विश्वचषक स्पर्धेत उतरतात पण भारत आजतागायत एकदाही विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत सहभागी होऊ शकलेला नाही. भारताच्या क्रिकेट संघाने मात्र खेळाच्या दर्जात लक्षणीय प्रगती केल्याचे दिसून येते. या खेळात भारताने क्रिकेट खेळाची मक्तेदारी असणा–या इंग्लंड व ऑस्ट्रेलियालाही मागे टाकले आहे. जगात भारतीय क्रिकेट संघ कसोटी व एकदिवसीय प्रकारात सद्या प्रथम स्थानावर आहे. तर टी–२० प्रकारामध्ये तीस–या स्थानावर आहे. पण दुर्दैव असे की, हा खेळ सुरू होऊन १०० पेक्षा जास्त वर्षाचा काळ लोटला तरीही या खेळाला जगातील बहुसंख्य देशांनी अजून स्वीकारलेले नाही. काही मोजकेच देश हा खेळ खेळतात. परंतु तरीही भारतातील या खेळाच्या लोकप्रियतेमुळे भारतीय व विदेशातील खेळाडूंसह अनेक घटकांना प्रचंड अर्थिक फायदा झालेला आहे. या खेळामध्ये पूर्णत: व्यावसायिकता आलेली आहे. या खेळातील असणा–या प्रचंड व्यावसायिकतेमुळे फिफाचेही लक्ष भारताकडे वेधले गेले आहे. फेडरेशन दी इंटरनॅशनल फुटबॉल असोसिएशनने फुटबॉलला जास्तीतजास्त प्रेक्षक वर्ग मिळावा या उददेशाने भारतामध्ये जास्तीतजास्त आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरवण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालवलेले आहेत. नुकत्याच १७ वर्षाखालील मुलांच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धांचे भारतात आयोजन झाले होते. कबडडी या खेळातील स्थितीही काहीशी मध्यमच आहे. या खेळातही भारत जगामध्ये अव्वल आहे. पण याही खेळाच्या प्रसारामध्ये यापुर्वी आपला देश कमी पडल्याचे दिसून येते. कब्बडी खेळही काही देशांपुरताच मर्यादित राहिलेला आहे. मागील काही वर्षात प्रो कब्बडीच्या माध्यमातून खेळाडूंनी व्यावसायिक कब्बडी खेळण्यास प्रारंभ केला. मोठया प्रमाणात कब्बडी खेळाडूनाही अर्थिक फायदा होऊ लागला. त्यामुळे या खेळाकडे येत्या काही वर्षात अनेक देश आकृष्ट होतील यात शंकाच नाही. आज जपान, थायलंड, श्रीलंका, बांगला देश, अमेरीका, अफगाणिस्तान हे देश या खेळाकडे आकर्षित झालेले आहेत. गतवेळी झालेल्या विश्वचषक कब्बडी स्पर्धेत जगातील १६ देश सहभागी झाले होते. खोखो हा खेळही आपल्या देशात चांगल्या पध्दतीने खेळला जातो. या खेळाच्या राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेतल्या जातात. या खेळातील खेळाडूंना शासन स्तरावर विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. पण देशातील संघटकांमार्फत या खेळाचाही विदेशामध्ये प्रसार होऊ शकला नाही.

**देशाच्या उभारणीतील भारताच्या क्रीडा क्षेत्राचे योगदान –** देशाच्या भक्कम उभारणीकरिता ज्या पध्दतीने व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण व्यवस्था उपयुक्त ठरते त्याचपध्दतीने क्रीडा क्षेत्रही अतिशय महत्वाचा घटक ठरते. भारताच्या उभारणीमध्येही क्रीडा क्षेत्राने अतिशय मोलाची भूमिका पार पाडली आहे. प्रामुख्याने खालील घटकांच्या आधारे क्रीडा क्षेत्राचे योगदान स्पष्ट करता येईल.

१ देशातील अनेक नामवंत खेळाडू हे खेळामुळे अर्थिक दृष्टया सक्षम झ्रालेले आहेत. अर्थातच अथक परिश्रम हे ही त्याचे कारण आहे. या खेळाडूंनी सरकारच्या भांडवली उद्योगामध्ये गुंतवणूक करून देशाच्या उभारणीकरिता हातभार लावलेला आहे.

२ सचीन तेंडूलकर, महेंद्रसिंग धोनी या क्रिकेटरनी सरकारच्या ग्राम दत्तक योजनेव्दारे खेडे दत्तक घेतलेले आहे. या खेडयाची पूर्णत: विकासाची जबाबदारी त्यांनी उचललेली आहे.

३ अनेक खेळाडू देशाच्या नैसर्गिक संकटकाळात पुढाकार घेऊन अपातग्रस्तांना मदत करतात. त्सुनामी, भूकंप, पूर या घटना घडतात तेव्हा याची प्रचिती आलेली आहे.

४ माजी बॅडमिंटन खेळाडू पी.गोपीचंद, टेनिस खेळाडू, रमेश कृष्णन, बॅडमिंटन खेळाडू प्रकाश पदुकोन, कोलकात्ता येथील एम. आर.एफ. स्पेस क्रिकेट अकादमी, पैलवान सतपाल यांची दिल्ली येथील कुस्ती अकादमी यांनी त्या–त्या खेळाची प्रशिक्षण केंद्रे स्थापन करून नवीन खेळाडू घडविण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे या खेळाडूंना पैसा व नोकरी प्राप्त झालेली आहे.

५ देशातल्या अनेक खेळाडूंनी सरकारी योजनांमध्ये वा उद्योगांमध्ये समभाग स्वरूपात अर्थिक गुंतवणूक केलेली आहे. त्यामुळे विविध विकासात्मक कामे करण्यासाठी खेळाडूंचा हातभार लागलेला आहे.

६ देशाच्या संरक्षण दलामध्ये आज असंख्य खेळाडू आपले योगदान देत आहेत. या खेळाडूंच्या शारीरिक तंदुरूस्तीचा सैन्यदलाला नक्कीच फायदा होताना दिसून येतो.

प्रामुख्याने देशाच्या उभारणीमध्ये अप्रत्यक्षपणे क्रीडा क्षेत्राने कशा पध्दतीने योगदान दिलेले आहे. ते खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**अर्थिक फायदे** – देशामध्ये क्रीडा क्षेत्राचा प्रसार झपाटयाने झाल्यास विविध घटकांना अर्थिक फायदे होऊ शकतात. खेळासाठी लागणारे क्रीडा साहित्य, क्रीडा मासिके, पुस्तके, सी.डी. यांची निर्मिती झाल्याने रोजगाराची निर्मिती करण्यास मदत होते.

**सोयी–सुविधांची उपलब्धता** – देशात जागतिक स्तरावरील किंवा राष्ट्रीय स्तरावरील मोठया स्पर्धांचे आयोजन केल्यास विविध खेळांच्या अद्यावत व सोयी–सुविधांनी युक्त मैदानांची निर्मिती होते. याचा फायदा भविष्यात तयार होणा–या खेळाडूंना होत राहतो. १९८० साली दिल्ली येथे झालेल्या अशियाई स्पर्धांमुळे संपूर्ण दिल्ली शहराचा चेहरा मोहरा बदलून गेला. कॉमनवेल्थ गेम्समुळे विविध खेळाची अद्यावत मैदाने दिल्लीत तयार झाली. विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमुळे देशात विविध ठिकाणी दर्जेदार क्रिकेट मैदाने तयार झाली. प्रो–कब्बडीमुळे देशात गावागावातून कब्बडी खेळाचा प्रसार मोठया प्रमाणावर होऊ लागला. या खेळात व्यावसायिकता येऊ लागली.

**रोजगाराच्या संधी** – मोठमोठया स्पर्धांचे सातत्याने आयोजन केल्यास समाजातील विविध घटकांना लहान मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. उदा. बांधकाम मजूर, स्पर्धेसाठी वा बांधकामासाठी लागणारे विविध प्रकारचे साहित्य विक्रेते, मैदान तयार करताना लागणारे आवश्यक साहित्य, स्पर्धेवेळी बाहेरच्या देशातून येणा–या पर्यटकांकडून मिळणारा मोबदला. लॉजिंग वा बोर्डिंग अशा विविध माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेस मजबुतीच्यादृष्टीने हातभार लागतो.

**नेतृत्व निर्मिती** – खेळाच्या मैदानात खेळाडू उतरला की त्यांना सुरूवातीपासूनच नेतृत्वगुण अंगात भिनवले जातात. त्याचा उपयोग समाजामध्ये वावरत असताना खेळाडूंकडून होत असतो.आज अनेक माजी खेळाडू विविध क्षेत्रात समर्थपणे नेतृत्व करताना दिसून येतात.

**सर्वधर्मसमभाव** – खेळाडू खेळत असताना त्याचे ध्येय एकच असते खेळणे किंवा जिंकणे. त्यामुळे त्यांच्यामध्ये जातीयवाद गाडून टाकण्याची ताकद निर्माण झालेली असते. याचा फायदा भविष्यात समाजामध्ये वावरत असताना होतो. सर्व जातीधर्माच्या लोकांमध्ये मिळून मिसळून राहण्याची सवय खेळाडूंना जडलेली असते.

**योग्य नियोजनाची सवय** – खेळाडूला खेळाचा सराव करीत असताना योग्य नियोजन कसे करावे याचे तंत्र शिकवले जाते. याचा फायदा खेळाडूंना समाजामध्ये नागरिक म्हणून वावरत असताना दैनंदिन जीवनात होतो.त्यांना प्रत्येक ठिकाणी योग्य नियोजनाची सवय लागते. याचा उपयोग व्यक्ती म्हणून खेळाडूंना भविष्यात होतो.

**संघिक भावना** – सातत्याने खेळत असताना वा सराव करीत असताना क्रीडा मानसशास्त्राच्या माध्यमातून खेळाडूंना खेळातील सांघिक भावना त्यांच्यामध्ये बिंबवलेली असते.त्यामुळे भविष्यात कोणतेही वैयक्तिक अथवा सामाजिक काम हाती घेतल्यानंतर त्यांच्यात ते काम पूर्ण करीत असताना सांघिक भावना वाढीस लागते.

**अनुमान** – वरील निष्कर्ष पाहता असे दिसून येते की, जागतिक स्तरावर भारतीय क्रीडा क्षेत्रातील काही खेळांचाच दबदबा राहिलेला आहे. काही खेळामधील भारताचा सहभाग हा फक्त नावापूरताच मर्यादीत आहे. त्याकरिता शासन स्तरावर या विविध खेळांच्या पायाभूत सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच शासनाचे विविध क्रीडा उपक्रम अधिक सक्षमतेने व प्रामाणिकपणे राबविले गेले पाहिजेत.शासनाचा क्रीडा निधी खरोखरच योग्यप्रकारे वापरला जातो काय याची पडताळणी वेळच्यावेळी झाली पाहिजे.

देशातील क्रीडा क्षेत्राचे राष्ट्राच्या उभारणीत व अर्थव्यवस्था मजबूतीकरणात फार मोठे योगदान राहिल्याचे दिसून येते. खेळामुळे देशाच्या प्रगतीस चालना मिळते. खेळामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात हे दिसून येते. अनेकांना खेळामुळे रोजगार व चांगल्या नोकरी प्राप्त होतात असे दिसून येते.म्हणूनच भविष्यात शासनाकडून सद्यस्थितीपेक्षा अधिक प्रमाणात खेळाडूंकरिता नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे असे दिसते.

**संदर्भ सूची :**

1. **डॉ.घिल्दीयाल राकेश (२०१५)**,रिसर्च पेपर– रोल ऑफ स्पोर्टस् इन द डेव्हलपमेंट ऑफ अॅन इन्डिव्हीज्युअल अॅण्ड रोल ऑफ सायकॉलॉजी इन स्पोर्टस्., २७.०२.२०१५ मिन्स साना मोनोगर १३( १) १६५–१७०.
2. http://www.ncbi.nlm.nih.gov http://www.wikipedia.org/Nation Building

# लोकमान्य टिळक व त्यांची चतु:सुत्री

**कु. स्वाती सरदार पाटील,एम.ए**
गाव. माजनाळ, ता. पन्हाळा,जि. कोल्हापूर

**प्रस्तावना-**

